
म. ग्रं. सं. ठाणें
चरित्र
सं. क्र. १२८७

# विंजुला

ना.म. पटवर्धन

REFBK 0010999
REFBK-0010999

## लेखक



" श्री. नाना पटवर्धन यांचें ' विरंगुळा ' हें पुस्तक चाळून पाहिलें व थोडेंफार वाचलें. मला तें फार आवडलें."

— महर्षि धों. के. कर्वे

" ' विरंगुळा ' नामक आत्मचरित्रपर ग्रथांत श्री. ना. म. पटवर्धन यांनीं आपल्या आयुष्यांतील अनेक प्रसंग चटकदार व मनोरंजक रीतीनें वर्णन केले आहेत." "....... पुस्तक वाचतांना माझ्या मनाला जसा विरंगुळा वाटला त्याप्रमाणें इतर वाचकांनाहि वाटेल अशी माझी खात्री आहे."

— रँग्लर र. पु. परांजपे

# विरंगुळा

[एका शिक्षकाचें आत्मकथन]

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २५०७२६ वि. चारित्र
क्रमांक ... ६६७ नों. दि. २-५-११-८०

: लेखक :

**ना. म. पटवर्धन**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०८९९
ग्रंथ ... (स्थळ प्रत)

मूल्य रु. ६.००

REFBK-0010999

हीनस प्रकाशन : पुणे

आवृत्ति पहिली
जुलै १९६०

सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन

प्रकाशक :
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
४१० शनवार पेठ : पुणे २

मुद्रक :
ह. म. गद्रे
जनवाणी प्रिंटिंग प्रेस
४५ बुधवार पेठ : पुणे २



श्री. नाना नारळकर यांस

सादर अर्पण

नाना पटवर्धन

मराठी ग्रंथ सं...य, ठाणें. स्थळप्र
अनुक्रम ... वि. ......
क्रमांक ... नों: दि: ......

## ‘ विरंगुळा ’ वाचण्यापूर्वी

‘ विरंगुळा ’ हें आत्मचरित्र नव्हे. फार तर त्याला आत्मचरित्रपर लिखाण म्हणतां येईल. पहिल्यांदा तर तो खरोखरीच एक विरंगुळा, मन रिझविण्याचें व वेळ घालविण्याचें एक साधन झालें होतें.

प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें कांहीं कांहीं वेळां रात्रीं गाढ झोंप लागत नसे. गतायुष्यांतील त्याच त्याच आठवणी पुन्हां पुन्हां होत असत. त्यांतच ‘ मनीं वसे तें स्वप्नीं ’ दिसूं लागून त्यांना कधीं कधीं खऱ्याखुऱ्या स्वप्नांचें रूप प्राप्त होई. हा त्रास कसा कमी करावयाचा या विवंचनेंत असतांना रात्रीं झालेल्या आठवणी व पडलेलीं स्वप्नें दिवसां जागेपणीं लिहून काढून तरी पाहूं या असें ठरविलें, व दोन चार दिवस तसा प्रयोग करून पाहिला. याचा परिणाम असा झाला कीं, दिवसा लिहून काढलेल्या आठवणी व स्वप्नें रात्रीं पुन्हां म्हणून दिसत नाहींशीं झालीं. रात्रीच्या आठवणी कमी कमी होऊं लागल्या व दिवसाचा बराचसा काळ लेखनांत जाऊं लागून बरें वाटूं लागलें. अशा रीतीनें लेखन हें मनाच्या विरंगुळ्याचें साधन बनलें.

लिहून काढलेल्या आठवणी व स्वप्नें अर्थातच स्वैर व स्थलकालाचें बंधन नसलेलीं होतीं. त्यांच्या त्या स्वैरपणांतहि कांहीं कमी गोडी नव्हती; आणि म्हणून प्रथमतः तसलें तें स्वैर लिखाणच स्फुट स्मृतींच्या रूपानें प्रसिद्ध करावें असें वाटूं लागलें. पण पुढें या स्वैर व स्फुट लिखाणाला स्थल-कालाच्या ताण्याबाण्यांत गोंवून व गुंफून चरित्राच्या रूपाचें एखादें सलग सणंग साधलें तर पाहावें असें मनानें घेतलें व त्या दृष्टीनें लिहूं लागलों. आणि त्यांतूनच हा ‘ विरंगुळा ’ किंवा ‘ एका शिक्षकाच्या जीवनाची संगतवार कथा ’ निर्माण झाली.

या कथेंतील व्यक्ति व घटना खऱ्याखुऱ्या असून स्थळकाळासंबंधीं मात्र तितकासा खरेपणा नाहीं हें स्पष्ट करणें जरूर आहे. विस्मरणानें व अनव-धानानें इकडे तिकडे झालें असण्याचा बराच संभव आहे.

माझे मित्र श्री. द. र. कवठेकर, केशवराव शारंगपाणी, कमळाबाई देशपांडे, डॉ. दिवेकर, 'कॉंटिनेंटल'चे अनंतराव कुळकर्णी, माझे शिक्षक-बंधू स. वा. केळकर व त्यांची पत्नी सौ. सुमन, प्रो. नारळकर व सौ. इंदिराबाई नारळकर, इत्यादि साहित्यिकांनीं व रसिक सुहृदांनीं माझें हें लिखाण वाचून पाहिलें व दुरुस्त्या सुचवून मला उत्तेजन दिलें याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

छापखान्यांत कामाची अत्यंत गर्दी असतांनाहि सवडींत सवड काढून माझें लिखाण हातीं घेतलें याबद्दल 'व्हीनस प्रकाशन' संस्थेचे उत्साही चालक श्री. भाऊसाहेब पाध्ये व त्यांचे सहकारी यांचाहि मी आभारी आहे.

माझे पूज्य प्रिय मित्र प्रो. ना. ग. ऊर्फ नाना नारळकर यांनीं हें पुस्तक त्यांना अर्पण करण्याची माझी इच्छा पुरविली, म्हणून मी त्यांचाहि आभारी आहें.

आणि शेवटीं 'घरचा आहेर' करणाऱ्या माझ्या पत्नी सौ. गंगूबाई, यांनीं माझ्या इच्छेला मान देऊन प्रस्तावनेदाखल चार शब्द लिहिले याबद्दल मी त्यांचेहि आभार मानतों.

झालें तें सगळें चांगलेंच झालें. एका गोष्टीचें बरीक वाईट वाटतें. पुस्तकाचें लेखन व त्याचें प्रकाशन या दोहोंत इतका कांहीं काळ लोटला कीं दरम्यान माझ्या वहिनी—ती० यमुनाबाई—या आम्हांला सोडून गेल्या ! शेवटच्या मुद्रितरूपांत पुस्तक त्यांच्या नजरेस पडलें असतें तर त्यांना किती तरी आनंद झाला असता.

'विसावा,' शुक्रवार, १२९१ पुणें २.
स्वतंत्र महाराष्ट्र राज्य दिन, १ मे १९६०

ना. म. पटवर्धन

१०९९

## घरचा अहेर

'विरंगुळा' या आपल्या आत्मचरित्रपर पुस्तकाला मीं प्रस्तावना लिहून त्याचा पुरस्कार करावा अशी इच्छा 'ह्यांनीं' व्यक्त केली व मी त्यांतला हेतु व भाव ओळखून ती पुरी करण्यास प्रवृत्त झालें.

अशा आत्मपर लिखाणांत लेखक आपल्या जीवनांतील अनेक घटना व प्रसंग ह्यांचें वर्णन अति मोकळेपणानें व कांहीं आडपडदा न ठेवतां करीत असतो. त्यांतील कांहीं प्रसंग अत्यंत नाजुक, खाजगी पण जीवनाच्या दृष्टीनें अतिशय महत्त्वाचे तसेच चिर-परिणामकारक असतात; आणि ते सांगितल्या-शिवाय लेखकाला आपल्या यशापयशाचें योग्य तें मूल्यमापन करतां येत नाहीं किंवा जगलेल्या जीवनाचें यथार्थ दर्शन इतरांसहि घडवितां येत नाहीं. अर्थात् अशा ग्रंथांत तो आजपर्यंत कोणाला न सांगितलेले किंवा न समजलेले असे प्रसंग वर्णन करतो. मात्र असें करतांना आपण आपल्या जीवनाच्या जोडीदाराला किंवा जोडीदारणीला कांहीं अन्याय तर करत नाहीं ना, अशी शंका त्याला सारखी डाचत असते—त्रस्त करीत असते. ह्यासाठीं 'तसें कांहीं घडलें नाहीं' अशा आश्वासनाची त्यांस गरज भासते. 'विरंगुळ्यां'तील कांहीं भाग अशा स्वरूपाचा असल्यानें माझ्या आश्वासनाचें व पुरस्काराचें औचित्य व महत्त्व आहे हें मीं जाणलें व म्हणूनच हा 'घरचा अहेर' करायला धजलें.

१२ मे १९२२ रोजीं सहजीवन जगण्याच्या दृष्टीनें आम्हीं दोघांनीं महत्त्वाचें पाऊल टाकलें. सातपदीन मैत्री जोडली. हें सहजीवन अमूक एक निश्चित ध्येय मनांत बाळगून जगावयाचें अशा दृढ निश्चयानें परस्परांच्या संमतीनें तें पाऊल टाकलें होतें. आपला विवाह लौकिक दृष्टीचें लग्न, शरीर-संबंध-नसून, नैष्ठिक ब्रह्मचर्य ज्याचा पाया-गाभा-आहे, असा हा असामान्य आत्मसंबंध आहे, अशी खूणगांठ हृदयांत बाळगून आम्हीं संसारांत प्रवेश केला.

लग्न हा दोन व्यक्तींतील जिव्हाळ्याचा संबंध आहे. इतरेजनांनीं तो कसा असावा हें ठरविण्याचें प्रयोजन काय? दोन सुबुद्ध, प्रौढ, विचारक्षम व्यक्तींनीं एकमेकांच्या इच्छा आकांक्षा जाणून घेऊन स्वतःच्या जीवनाबद्दल जो निर्णय घेतला असेल, तोच योग्य समजणें उचित आहे. त्या दोन व्यक्ति एकमेकांविरुद्ध तक्रार करीपर्यंत त्रयस्थ व्यक्तीला किंवा समाजाला त्या निर्णयाविरुद्ध बोलण्याचें कारण नाहीं. वरील प्रकारच्या वैचारिक भूमिकेनें आजपर्यंतचें अडतीस वर्षांचें सहजीवन आम्ही जगत आलों आहों. कांहीं वर्षें एकमेकांपासून दूर राहण्याची वेळ आली असली तरी सुट्टयांतून व अडीअडचणीला एकमेकांकडे जात येत असल्यानें त्यांत तसा खंड पडलेला नाहीं. आज तीन तपांहून अधिक काळ जीवनांतील सुखदुःखें, मर्षामर्ष, स्तुति निंदा, इत्यादींचा एकत्र अनुभव घेत आलों आहों. तत्त्वाच्या बाततींत पड खायची नाहीं आणि तपशिलाचा हट्ट धरायचा नाहीं, असें धोरण आम्ही स्वीकारलें होतें व तेंच आमच्या जीवनांतील यशाचें इंगित आहे. दोघांनींहि आपापल्या परी व आपापल्या शक्तीप्रमाणें स्वतःच्या कुटुंबाची व समाजाची सेवा त्यागबुद्धीनें व प्रामाणिकपणें केलेली आहे.

अशा तऱ्हेचें आमचें सहजीवन आम्हांस सहजतेनें व सुलभतेनें जगतां आलें असें मात्र नाहीं. लोखंडाचे चणे खाण्याइतकें तें कठिण ठरलें. माझा एकटीचा कितीहि दृढ निश्चय असला, तरी दुसरी बाजू जर तितकी साथ देणारी नसती तर आमचें इच्छित ध्येय आम्हांला कधींच प्राप्त करतां आलें नसतें. तसेंच, माझ्या जीवनांत सर्व बाबतींत संयम व निग्रह करण्याचें बळ परमेश्वरानें मला दिलें नसतें, तर क्षणोक्षणीं होणारे मोह टळले नसते हेंहि मी ओळखून आहे.

आमच्यासारखीं जोडपीं विरळा आहेत. महात्मा गांधींच्या नैष्ठिक वैवाहिक ब्रह्मचर्य पाळण्याच्या कसोटीला उतरलेलें एकच जोडपें मला माहीत आहे आणि तें म्हणजे श्री. जयप्रकाश नारायण व त्यांच्या पत्नी श्री. प्रभावतीदेवी. या दोघांचा उल्लेख केला, तो त्यांच्याशीं आमची तुलना करण्याकरितां म्हणून नव्हे, तर थोरांचा पाठिंबा आम्हांला मिळाला येवढेंच सांगण्याकरितां.

ही गोष्ट सर्वांनाच साधण्यासारखी नाहीं. अशा परिस्थितींत ह्या वाटेला फारसें कोणी जात नाहीं. कोणी जावें असाहि उपदेश मी करणार नाहीं. आमचें ध्येय आम्हांला गांठतां आलें त्याचा आनंद व समाधान त्यामुळें विशेष वाटतें.

अशा आनंदी मनस्थितींत, आमच्या ' विसावा ' बंगलींत विसावा घेत असतां पूर्वचरित्राची आठवण लेखकाला व मलाहि व्हावी हें स्वाभाविकच नाहीं ? आपल्याला मिळालेल्या अनुभवांचें मूल्यमापन करून, आलेल्या यशापयशाची कारणमीमांसा करून शेवटीं फळ काय प्राप्त झालें ? जोखून पाहण्याचा मोह सहजच निवृत्त जीवनांत कोणाहि माणसाला होतो. शिक्षकाचें जीवन घालविलेल्या व्यक्तीला आपले कडुगोड अनुभव इतरांस सांगण्याची खोडच जडलेली असते. ते अनुभव दुसऱ्याला ऐकविल्याशिवाय त्याच्यानें राहवत नाहीं व टिपून लिहून वांचविल्याशिवाय समाधान होत नाहीं. हें असें करण्यांतच रिकामपणीं मनाला विरंगुळा मिळतो. ' हे ' म्हणतात त्याप्रमाणें आजार किंवा झोंप न येणें हीं तात्पुरतीं कारणें असूं शकतील.

' विरंगुळा ' हें लिखाण स्वतःचें समाधान करण्यासाठीं प्रथम अवतरलें. पुढें त्यापासून इतरांसहि कांहीं विरंगुळा मिळाला तर पाहावें म्हणून तसा प्रयोग करण्यांत आला. तो प्रयोग पुष्कळसा यशस्वी वाटल्यानें ग्रंथरूपानें आज तें रसिक वाचकांपुढें येत आहे.

ह्या पुस्तकांत चरित्रलेखकानें स्वतःच्या जीवनांतील आठवणी त्यास जशा व जितक्या आठवल्या त्या जमेस धरून कल्पनेच्या व कल्पकतेच्या साहाय्यानें त्या निःसंकोचपणें व सरळपणें, कोणताहि आडपडदा न ठेवतां, विशद करून सांगितल्या आहेत अशी मी ग्वाही देतें.

साठ वर्षांपूर्वीचें पुणें, त्यावेळचीं तीं खानदानी व वैभवशाली कुटुंबें, तात्कालीन शाळा-कॉलेजें व इतर संस्था, त्यावेळच्या लोकांचे व मुलांचे करमणुकीचे प्रकार व शौक इत्यादि, तसेंच त्यावेळेपासून शिक्षणक्षेत्रांत होत आलेले फेरबदल, त्या क्षेत्रांत वावरणाऱ्या प्रमुख व्यक्ति, शिक्षणांत व शिक्षणपद्धतींत आढळून आलेले गुण-दोष, त्यावेळची राजकीय व

सामाजिक परिस्थिति इत्यादींची समर्पक चर्चा, आत्मचरित्रांतील प्रसंग वर्णन करतां करतां, लेखकानें मोठ्या मार्मिकतेनें, हळुवारपणानें व रसिकतेनें केलेली आहे. ती निश्चित उद्बोधक होईल.

हें लिखाण प्रकाशित व्हावें अशी माझी स्वतःची फार इच्छा होती. व्हीनस प्रकाशनचे रा. पाध्ये ह्यांनीं ही मोठी जबाबदारी स्वीकारली व आमच्या दोघांच्या इच्छेला मूर्त स्वरूप दिलें ह्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच होतील. रसिक वाचकांकडून आमच्या ' विरंगुळ्या 'चें स्वागत होवो येवढीच आतां इच्छा आहे.

हा बोलून चालून ' घरचा अहेर ' आहे. त्याचें मोल त्याच्या किंमतींत नसतें, तर मांगल्यांत असतें. ज्यांना मीं तो केला आहे, ते त्याच दृष्टीनें तो स्वीकारतील असा विश्वास वाटतो. इतरांनींहि त्याच भावनेनें त्याकडे पाहावें अशी नम्र विनंति आहे.

नव महाराष्ट्र स्थापनादिन
१ मे, १९६०

गंगूताई पटवर्धन

# अनुक्रमणिका


| प्रकरण | | पान |
|---|---|---|
| १. | माझी आई | १ |
| २. | माझे वडील | १४ |
| ३. | माझीं भावंडें | २७ |
| ४. | माझें बालपण | ३७ |
| ५. | माझी शाळा ( नू. म. विद्यालय ) | ५४ |
| ६. | जंजिऱ्यांतील जीवन | ६५ |
| ७. | पुण्यांतील वास्तव्य | ७३ |
| ८. | माझें फर्ग्युसन कॉलेज | ८६ |
| ९. | खामगांवचा मुक्काम | १०० |
| १०. | जबलपूर ट्रेनिंग कॉलेज | १०८ |
| ११. | अकोला : दोघा नानांचा जोडसंसार | ११९ |
| १२. | अकोला : नाना गेले-भाऊ आले | १२७ |
| १३. | महर्षि कर्वे यांच्या आश्रमांत | १३९ |
| १४. | आमचें वैवाहिक जीवन | १५१ |
| १५. | माझें हिंगण्यांतील कार्य | १६७ |
| १६, | माझ्या वेळची आजन्मसेवक मंडळी | १८० |
| १७. | माझीं सोलापूरचीं चार वर्षे | १९३ |
| १८. | हिंगण्याच्या आश्रमाचा निरोप | २११ |
| १९. | बडोद्यांतील निवृत्त जीवन | २२३ |
| २०. | पुण्यांतील अलीकडचें वास्तव्य व दिनचर्या | २४२ |
| २१. | माझें लेखन | २५५ |

# मुद्रण शुद्धि

छपाईच्या धांदलींत झालेल्या कांहीं चुका दुरुस्त करावयाच्या चुकून राहिल्या आहेत. त्यांतील महत्त्वाच्या दुरुस्त्या पुढीलप्रमाणें असून वाचकांनीं त्या लक्षांत घेण्याची कृपा करावीः—

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ५ | ५ | महागंडतेचें | अहंगंडतेचें |
| ३१ | १० | जराहि | जरा ही |
| ३१ | १४ | नातू | नानू |
| १२४ | १० | सामाजिक | सामाइक |
| १३६ | ११ | चोखावा | चोखाळा |
| १४८ | ६ | खेळ | खळ |
| २१९ | ८ | निश्चितपणें | निश्चिंतपणें |

मराठी ग्रंथ सं... ठा... स्थळप्रत.
अनुक्रम ....... दि: ...........
क्रमांक .... नों: दि: ...........

# माझी आई : : : १

मी माझ्या आईला ‘ माई ’ म्हणत असें. अगदीं पहिल्यांदा तर मी तिला ‘ आऊ ’ म्हणें असें मीं माझ्या वडिलांकडून ऐकिलें आहे. एकदां माझी ‘ आऊ ’ दूर कोठेंतरी गेल्यानें मी रडूं लागलों; तेव्हां माझी समजूत घालण्यासाठीं माझ्या वडिलांनीं मला एक मातीची आऊ करून दिली, व मी–म्हणे–खरी आऊ घरीं परत येईतों तिच्याशीं खेळत राहिलों होतों. माझा हा भोळाभाव पुढें बरींच वर्षें टिकला होता; आजहि तो पूर्णपणें नाहींसा झाला आहे असें नसून भावाचे व श्रद्धेचे विषय बदलेले आहेत येवढेंच.

महाराष्ट्रांत सावत्र आईला ‘ माई ’, ‘ माईसाहेब ’ असें म्हणण्याचा पूर्वी प्रघात होता. सुप्रसिद्ध कादंबरीकार ह. ना. आपटे यांनीं याच अर्थानें व कांहीं विशेष आशयानें हा शब्द आपल्या कादंबऱ्यांत वापरला आहे. माझ्या माईच्या बाबतींत तसला कांहीं प्रकार नव्हता. तिच्या सर्व धाकट्या बहिणी तिला माई म्हणत, व त्यांचें ऐकून ऐकून आम्ही मुलेंहि तिला माईच म्हणूं लागलों.

माईसंबंधींची माझी पहिली आठवण अशी आहे. मी त्या वेळीं चार-पांच वर्षांचा असेन. मी आतां सत्तरीचे घरांत गेलों आहे. म्हणजे माझी पहिली आठवण पासष्ट वर्षांपूर्वीची आहे. मला त्यापूर्वीचें कांहीं आठवत नाहीं म्हटलें तरी चालेल. माझी स्मरणशक्ति आयुष्यांत कधींच तीव्र नव्हती. कित्येकांना–म्हणे–वयाच्या दुसऱ्या वर्षांपासून किंवा तत्पूर्वींचेंहि स्मरतें. माझें इतर बौद्धिक बाबतींतल्याप्रमाणें याहि बाबतींत अगदी यथा-यथा आहे.

संध्याकाळीं पांचचा सुमार असावा. सूर्य पश्चिमेकडे ढळला असून पूर्वेकडच्या सावल्या लांब लांब होऊं लागल्या होत्या. माझी माई डाव्या

कमरेवर मातीचा चूलवैल घेऊन व उजव्या हाताच्या बोटानें माझें बोट धरून ‡तळ्याच्या पाळीवरून पर्वती गांवांतील आमच्या नवीन घरीं जात होती.

यापूर्वीं आम्ही पुण्यास शुक्रवार पेठेंत मंडईच्या मागच्या बाजूला डॉ. गर्दे यांच्या वाड्यासमोरील शिधयांच्या घरांत भाड्यानें रहात असूं. तेथून निघून पर्वतीला पोंचेतों कितीतरी ठिकाणें मागें टाकून आम्ही पुढें गेलों होतों. [1]काळें वावर, त्यांतला [2]काळा हौद, रावळाचें दत्तमंदिर, शेजारची [3]चिंचेची तालीम, नातूंची बाग, पुरंदऱ्यांचा बाग, आमराईचें नाकें, कात्रजच्या पाण्याचे तीन उस्वास, [4]रेशीमवाल्याच्या तक्क्या, व त्याचेवरील तो भला मोठा वटवृक्ष, लोटण बाग, आदमबाग व [5]टराकिन्-साहेबाचा बंगला, मधला तो अरुंद लाकडी पूल इत्यादि ठिकाणें ओलांडून आम्ही [6]सश्याच्या बागेच्या पाळीपर्यंत रखडत रखडत आलों होतों.

पुण्यांत शुक्रवार पेठेचा लौकिक चांगला नसतांना व शुक्रवार पेठेंतील ही आळी फारशी स्वच्छ व चांगली नसतांनाहि तिच्यांतून जातां-येतांना मला अद्यापहि आपलें बरें वाटतें. त्याचें कारण माझा या पेठेशीं व विशेषत: या आळीशीं फार जुना व जिव्हाळ्याचा संबंध आहे हें होय.

पर्वतीला रहावयास गेल्यानंतर बरींच वर्षें आमचा या आळीशीं असलेला संबंध सुटला होता; पण वडिलांच्या पश्चात् माझ्या बंधूंनीं पर्वती गांव सोडलें, व छप्परबंद आळींत कांहीं काळ वास्तव्य करून ते पुन्हां या आळीलगतच असलेल्या पंतसचिवांच्या पिछाडीला रहाण्यास आले. माझ्या बंधूंच्या मृत्यूनंतर माझे पुतणेसुद्धां अजून पंतांच्या त्याच पिछाडीला

‡ आजच्या पेशवे पार्कच्या पूर्वेकडील वाट.

१. शुक्रवार पेठेचा दक्षिणेकडचा भाग सबंध मोकळा असून तेथील माती काळी होती. २. काळ्या वावरांतील हा हौद बराचसा लांबरुंद व अतिशय खोल असे. हल्लीं तो बुजविला असून त्यावर 'इंद्रायणी' बंगला उभारला आहे. ३. या तालमीवर चिंचेच्या झाडाची गर्द छाया असे. ४. येथें मोठा वटवृक्ष असून त्याखालीं बऱ्याचशा कबरी दिसतात. या छायेखालीं रेशीम तयार करीत असत. तकिया–तक्क्या म्हणजे मुसलमानी फकिराचें विश्रान्ति स्थान. ५. पेशवे पार्कच्या अलिकडील उंचावरील मोकळी जागा व तेथील बंगला. ६. हल्लींचें 'पेशवेपार्क' पेशव्यांच्या काळांत त्या बागेंत ससे असावेत.

हल्लींच्या केंजळे वाड्यांत रहात आहेत. पुणें सोडून माझे वडील पर्वतीला गेले, माझे बंधू पर्वती सोडून पुण्यास आले, व कोणीं सांगावें ? कदाचित् माझे पुतणे पुणें सोडून पुन्हां पर्वतीला स्थलांतर करून स्वतःच्या सत्तेच्या घरांत रहावयास जातील. सृष्टीच्या उत्क्रांतींत हा चक्र-नेमि-क्रम सारखा चालूंच असतो.

माझ्या माईला व मला स्वतःला तळ्याच्या पाळीनें तसेंच रखडत ठेवून मीं जें हें स्थलांतर, कालान्तर व विषयांतर केलें त्याला कारण आठवणींना मध्येंच उधाण आलें व त्या लोंढ्यांत मी अगतिकपणें वाहवत गेलों हें होय. पण माझें हें वाहवणें या लेखनांत असेंच चालावयाचें आहे. आतांशें स्थलकालादि कसलींच बंधनें सोसेनाशीं झालीं असून कृत्रिमाचा व औपचारिकाचा कंटाळा येत चालला आहे. एके काळीं कृत्रिमाचा, उपचाराचा, कलेचा वगैरे मी भोक्ता होतों. त्यांचें मानवी जीवनांतील महत्त्व, त्यांची उपयुक्तता, व आवश्यकता यांवर माझी श्रद्धा असे. पण हल्लीं हल्लीं इतर श्रद्धांप्रमाणें माझी ही श्रद्धाहि ढासळूं लागली आहे. हें बरें नव्हे हेंहि मला कळतें, पण अद्यापि तितकेसें वळत नाहीं खरें; असो.

चालतां चालतां मी जेव्हां अतिशय दमून अगदीं रडकुंडीला आलों, व 'मला उचलून घे, उचलून घे' असा भुंगा जेव्हां माईच्या मागें लावूं लागलों तेव्हां माझ्या माईनें मला डाव्या खांद्यावर घेतलें, व चूलवैल उजव्या कडेवर घेऊन ती तशीच पुढें चालूं लागली. याचें मला वाईट न वाटतां उलट आनंदच झाला. आनंदाच्या त्या भरांत मी माईची वेणी हातांत लगामासारखी धरून तिला 'झ्या, झ्या' करूं लागलों. तीहि हंसत हंसत घोड्यासारखी तुर तुर चालूं लागली ! हल्लींच्या एखाद्या स्त्रीनें अशा प्रसंगीं काय केलें असतें कोणास ठाऊक !

कष्टानें कशीं तरी पावलें टाकीत व कडेखांद्यावरील निर्जीव व सजीव ओझीं सावरींत माझी माई दिवे लागणीला पर्वतीच्या घरीं पोंचली. माझे वडील—आम्ही मुलें त्यांना 'बाबा' म्हणत असूं—देवापुढें समई व पुढच्या सोप्यांत एक जस्ती भडकेल लावून ठेवण्यांत गुंतले होते. आमची चाहूल लागतांच बाबा तडक आमच्याजवळ आले व माझी एक तंगडी धरून व 'मादरचोद' ही खास सवयीची शिवी हांसडून त्यांनीं मला खसकन् खालीं ओढलें. मला सावरण्याच्या धांदलींत कडेवरील चूलवैलावरची माईची

पकड ढिली पडली व आतापर्यंत कमरेवरून जिवापाड वाहून आणलेल्या त्या दांपत्यांन्चें एका निमिषार्धात प्राणोत्क्रमण झालें.

बाबा एवढे संतापले कां, त्यांनीं मला असें खालीं ओढलें कां, माई प्रथम ओरडली कां, पुढें रागावली कां, व शेवटीं हंसली कां—आणि या सर्वाला मी कारण कसा हें माझ्या बालबुद्धीला त्या वेळीं कांहींच उमगलें नाहीं. तो सर्व प्रकार इतक्या झटकन् अन् अनपेक्षितपणें झाला कीं मी गोंधळून—गांगरून गेलों व कांहीं वेळानें रडूं लागलों.

रात्रीं काम संपवून अंथरुणावर पडल्यावर माझेकडे पाहून माईला संध्याकाळच्या त्या प्रसंगाची आठवण झाली. तिनें एकदम एक हुंदका देऊन मला जवळ ओढलें व म्हटलें " नानू—! " पुढें तिच्यानें बोलवेना.

हा प्रकार पाहून वडिलांनाहि त्या प्रसंगाची स्मृति झाली असावी व संध्याकाळच्या आपल्या तापटपणाबद्दल खेद झाला असावा. कारण " फार थकलीस, नाहीं ? कशाला बरं एवढी चूल उरींपोटीं घेऊन आलीस ? " असें म्हणत ते माईच्या पावलांवरून हात फिरवूं लागले.

माझ्या बालमनांत आतां प्रकाश पडला. वडील माझ्या अंगावर एवढे धांवून आले ते माझ्यावरील रागापेक्षां माईवरील प्रेमामुळें ! ती इतक्या लांब माझें व चुलीचें ओझें अंगाखांद्यावर वाहून थकून गेली असतांना मी मात्र खुशाल तिचा घोडा-घोडा करीत होतों हें त्यांना खपलें नाहीं. माझे वडील मला त्या वेळीं कठोर, निर्दय, तापट वाटले तरी वस्तुतः ते फार ममताळू होते व माईला कोणी त्रास दिलेला त्यांना मुळींच सहन होत नसे. पण हें त्या वेळीं मला कसें उमगणार ? मला फक्त त्यांचा तापटपणाच दिसत होता. माईनें मात्र तें सर्व हंसण्यावरी नेलें होतें.

माईचा स्वभावच तसा होता; सर्व कांहीं सोसायचें,— शेवटपर्यंत सहन करायचें. बाबांच्यापुढें कांहीं समजावून सांगण्यासवरण्याची सोयच नव्हती. ती त्यांच्या तोंडावर तर कधीं बोलत नसेच, पण त्यांच्या मागेंहि तिनें त्यांच्यासंबंधीं कधीं कोणापाशीं तक्रार, चिरचिर वगैरे केल्याचें मला आठवत नाहीं.

बाबांचा खाष्ट व तापट स्वभाव ती पूर्णपणें ओळखून असल्यामुळें, व तो आतां बदलणें शक्य नाहीं अशी खूणगांठ मनाशीं बांधल्यामुळें त्यांच्याशीं

कसल्याहि प्रकारची बाचाबाचीं, वादविवाद वगैरे करून ती हुज्जत घालीत नसे; उलट यजमानांच्या व मुलांबाळांच्या हातून होणाऱ्या सर्व चुका ती पोटांत घाली. नाहीं म्हणावयास त्या चुका उघडउघड मूर्खपणाच्या असल्या म्हणजे डोळ्यांतल्या आसवांबरोबर तिच्या ओठावर नाजूक हंसूं दिसे; पण तें हंसूंसुद्धां आपण तेवढे शहाणे, बाकीचे सगळे मूर्ख अशा महागंडतेचें नसे.

माई अत्यंत शांत व सोशीक खरी, पण तीसुद्धां बाबांच्या चमत्कारिक वागण्यावर एखादे वेळीं अशी कांहीं रागावे व चिडे कीं त्या भरांत ती त्यांना वाटेल तसें बोले आणि आणखी कांहीं विशेष झालें म्हणजे आजारी पडे.

ती एकदां अशाप्रकारें आजारी पडली असतांना बाबांनीं सत्यनारायणाच्या पोथीचें, पूजेचें व मेहुणाचेंहि आमंत्रण घेऊन सत्यनारायणाचा [1]प्रसाद तयार करून देण्याचेंहि कबूल केलें. माई त्या दिवशीं हें सर्व करायला—मनानें व म्हणूनच शरीरानें—बिलकूलच तयार नव्हती. तथापि बाबा ऐकेनात, आणि म्हणून ती कशीतरी पूजेचे ठिकाणीं गेली.

मन अत्यंत अस्वस्थ असल्यानें प्रसाद तयार करण्यांत तिचें बिलकूलच लक्ष नव्हतें. प्रसादाच्या सामग्रींत साखऱ्याच्या पुड्याशेजारींच एक रांगोळीचाहि पुडा होता. तोच साखऱ्याचा समजून तिनें भाजलेल्या रव्यांत ओतला! शिरा जमेना व झालेली चूकहि उमगेना. शेवटीं रांगोळीच्या पुड्यांतून साखऱ्या निघाला तेव्हां झालेली चूक लक्षांत येऊन ती चरकली! पण करणार काय? शेवटीं साखऱ्या घालून दुसरा प्रसाद बनविला वगैरे व्हावयाचें तें झालें. पण फजितीचें शल्य कायम राहिलें.

या प्रसंगासंबंधानें पुढें बोलतांना माई म्हणाली, "त्या वेळीं माझ्या स्वतःजवळ जर पैसे असते तर मी ही फजिती या कानाची त्या कानाला ऐकूं दिली नसती. पण थोडेसुद्धां पैसे बाईनें जवळ ठेवण्याची त्या वेळीं चालच नव्हती. देवापुढें ठेवायला एखादा पैसा जरी लागला तरी नवऱ्यापुढें तोंड वेंगाडून मिळवावा लागे.

आम्ही मुलेंहि माईसारखीं सामान्यतः अबोल व सोशीक बनलों होतों, बाबांच्यापुढें तोंडांतून चकार शब्द काढण्याची सोयच नव्हती. केव्हां काय

१. मराठे लोकांत भटजीलाच नैवेद्य तयार करण्यास सांगण्याची चाल होती.

प्रसाद मिळेल याचा नेम नाहीं अशा भीतीनें त्यांच्यापुढें गप्प, तर माईचें बोलणें, रागावणें वगैरे आमच्याच हिताचें असणार, ती वाईट कधीं सांगायची नाहीं अशा विश्वासानें व श्रद्धेनें माईपुढें गप्प. एवंच एकंदर गप्पचाच प्रकार.

घरांतलीं इतर सर्व गप्प-गप्प असल्यामुळें बाबा एकटेच कोणावर व कितीसे रागावणार ! त्यांच्या रागाला आम्हां कोणाकडूनच योग्य तो पडसाद न मिळाल्यामुळें तो त्यांच्यावरच उलटे व ते कधीं कधीं स्वतःवरच चिरचिरूं लागत; आणि फारच झालें म्हणजे स्वतःलाच शेलक्या शिव्या हसडून घेत ! आमच्या या घुम्मेपणामुळें चिडून जाऊन एकदां तर त्यांनीं स्वतःच्याच थोबाडींत मारून घेतल्याचें मला चांगलें स्मरतें.

आमच्या या गप्पगप्पपणाला व शांतपणाला शेजारीं-पाजारीं फार वाखाणीत आणि घरांतल्या मंडळीपुढें आगचें उदाहरण आदर्श म्हणून ठेवीत. पण हा शांतपणा कसल्या जातीचा होता हें आमचें आम्हांला माहीत !

माझ्या भावंडांच्या बाबतींत हा अबोलपणा कालांतरानें थोडेफार नाहींसा होऊन तीं सरळ, स्पष्ट व रोखठोकपणें बोलूं लागलीं. पण माझ्यांतील घुम्मेपणा मात्र कायमचें घर करून बसला आहे. घरांतील माणसांशीं—किंवा पुढें [१]संस्थेंतील सहकाऱ्यांशीं—कांहीं मतभेद झाला म्हणजे तो बोलून टाकण्याऐवजीं मी मूकव्रत धारण करीत असें व अजूनहि करतों. म्हणून माझ्या जीवनांत जिला खडाजंगी किंवा चकमक म्हणून म्हणतात ती कधीं उडालेली मला फारशी आठवत नाहीं. माझें जीवन या दृष्टीनें भारी आळणी व मिळमिळीत आहे.

माईचा शांतपणा खुलून दिसण्यासाठीं मी बाबांच्या तापट स्वभावाचा वर उल्लेख केला खरा; पण त्यांचे ठिकाणीं पुष्कळसे गुणहि वसत होते हें आम्ही जाणून होतों. पण यासंबंधीं पुढें येईलच.

माईच्या सोशीकपणासारखाच तिचा कामसूपणाहि कांहीं आगळा होता. पर्वती देवस्थानांत पूर्वी दिवसांतून चारदा चौघडा वाजत असे, व तो गांवांतील सर्व घरादारांतून ऐकूं जात असे. पहांटे चारच्या चौघड्याबरोबर माई निजून उठत असे, व प्रातर्विधी उरकून तुळशीपुढें निरांजन लावीत

---

१. हिंगण्याची अनाथ बालिकाश्रम संस्था हल्लीं तिला नुसतेंच 'हिंगणें—स्त्री-शिक्षण संस्था' असें म्हणतात.

असे. तेव्हांपासून ओंचापदर करून ती जी कामाला लागे ती थेट रात्रीं बारा वाजेपर्यंत. ‘ उठा, उठा हो सकळिक ’, ‘ धांव रे रामराया ’, ‘ अनुदिनि अनुतापें ’ इत्यादि भूपाळ्या, धांवे, करुणाष्टकें वगैरे एकीकडे तोंडानें चालू असे व दुसरीकडे हातानें काम चालू असे.

स्वयंपाकघर, माजघर, ओसरी, अडगळीची खोली, मागलीं पुढलीं अंगणें, वगैरे सर्व लख्ख झाडणें, चूलपोतेरें करणें, देवांपुढें सारवणें, घरांतील दोन्ही-तिन्ही मोऱ्या धुणें, बाबांचें तस्त व तांब्याभांडें घासून-पुसून ठेवणें इत्यादि कामें होईतों पांच वाजत. नंतर ती दळायला बसे व ओव्यांच्या तंद्रींत सगळें दळण उरकीत असे.

माईनें ओव्या म्हणण्यास सुरुवात केली कीं मी आपोआप जागा होईं व चौघडी लपेटून घेऊन तिच्या डाव्या मांडीवर डोकें ठेवून पडून राहीं. माईचें ओव्या म्हणणें इतकें साधें पण सुरेल व रसाळ असे कीं आम्हां बहुतेक मुलांत गाण्याची जी आवड पुढें उत्पन्न झाली तिचें एक कारण या ओव्या होत असें मला वाटतें.

दळण पुरें होईतों बाहेर फटफटीत उजाडलेलें असे. देवापुढें, तुळशी-वृंदावनापुढें व पुढच्या उमऱ्यावर गोपद्में वगैरे रांगोळी घालून ती वेणी-फणी उरकी. तिचे केस फार अखूड व विरळ असून भांग फाटून पुढें टक्कल पडूं लागलें होतें. म्हणून केशप्रसाधन फार थोडक्यांत आटपत असे. इतर स्त्रियांसारखा त्याचा परगणा पडत नसे.

बाबा परसांतल्या विहिरीचें पाणी शेंदून देत व माई तें घागरीनें नेऊन घरांतलीं सर्व लहान मोठीं भांडीं भरून टाकी. पाणी तापवून मुलांना आंघोळी घालण्याचें काम बाबांनीं स्वतःकडे घेतलेलें असल्यामुळें माईला या बाबतींत फारसें पहावें लागत नसे. आम्हां मुलांचें संध्या, नमस्कार वगैरे सर्व आह्निक यथास्थित आटोपल्यावर माई आम्हां सर्वांना रात्रीची शिळी भाकरी व फोडणीचें वरण खावयास देई. वरण नसल्यास लोणचें, फोडणीच्या मिरच्या किंवा कधींमधीं काकवी किंवा गूळच घाली. तेल-मसाला अन् पोहे हें तर आमच्या आवडीचें पक्वान्न होतें.

माझ्या लहानपणीं, चहा, कॉफी, कोको असलें कांहीं नसल्यानें ऐपत-वानांच्या मुलांना सामान्यतः दूध देत. पण गाय किंवा म्हैस पाळण्याइतकी

माझ्या वडिलांची ऐपत नसल्यामुळें शिळ्या भाकरीवरच आम्हांला भागवावें लागत असे. रोज रोज शिळे पदार्थ द्यावयाला माईलाच आपलें कसेंसें वाटायचें म्हणून ती वर्ष-सहा महिन्यांनीं मधल्या वेळच्या खाण्याकरितां कणीक भाजून गूळपापडीचे किंवा दळ्याचे लाडू अथवा थंडीचे दिवसांत मूगदळाचे लाडू करीत असे. पण खरें सांगूं? त्या वेळची ती शिळी भाकरी व कांहींतरी तोंडीं लावणें हींच इतकीं गोड लागत कीं आम्हांला दुसऱ्या कशाची इच्छाच होत नसे. घरांतल्या माणसांचें परस्परांवर प्रेम असलें व त्यांना स्वतःच्या परिस्थितीची नीटशी जाणीव असली म्हणजे साधी मीठ-भाकरीहि गोड लागते व शरीराला मानवतें हेंच खरें.

सर्वांचीं धुणीं पडल्यावर त्यांचें एक मोटाळें बांधून व एखाद्या मोठ्या मुलीला बरोबर मदतीला घेऊन माई गांवाबाहेरून वाहणाऱ्या [1]अंबील ओढ्यावर जाई. हा अंबील ओढा भयंकर व बेभरंवशाचा समजला जात असे. पावसाळ्यांत त्याला मोठाले पूर येत व धुवावयास गेलेलें माणूस त्यांत दगावण्याची भारी भीति असे. आमच्या शेजारच्या फडक्यांच्या [2] उमाकाकू अशाच पाहतां-पाहतां वहात गेलेल्या मीं प्रत्यक्ष ऐकलें होतें. म्हणून माई धुणें धुऊन सुखरूप परत येईतों आम्हां सर्वांना मोठी काळजी वाटे. तासाभरानें ती धुणीं धुऊन परत यावयाची, व अंगावर पाणी घेऊन तडक स्वयंपाकाला लागायची. नुसतीं पुरुषांचींच नव्हे, तर बायकांचींहि धुणीं वाळत घालण्याचें काम बाबांचें असे. आम्ही मुलेंहि तें काम करीत असूं. अर्थात् बाबांच्या इतकें चांगलें साधत नसे.

स्वयंपाक करतां-करतांच माई तोंडानें स्तोत्रें वगैरे म्हणत असे. व्यंकटेश स्तोत्रांतील तिनें म्हटलेल्या त्या ओव्या—विशेषतः "धांव पाव रे गोविंदा, हातीं घेऊनियां गदा, करीं माझ्या कर्मांचा चेंदा, सच्चिदानंदा श्रीहरी." "पुत्राचे सहस्र अपराध माता काय मानी तयाचा खेद?" "उडदामाजीं काळे-गोरे काय निवडावे निवडणारे," "कुबेर तुझा भांडारी, आम्हां

१. पेशवे पार्क व पर्वती गांव यांमधून वाहणारा ओढा.

२. काशीचे महापंडित व अजमीरच्या वेदपाठशाळेचे मुख्याध्यापक अनंतशास्त्री फडके यांच्या मातुश्री.

फिरविशीं दारोदारीं, यांत पुरुषार्थ मुरारी, काय तुजला पैं आला ? ”
अशासारख्या प्रासादिक ओव्या आम्हांला अतिशय आवडत व आमच्याहि त्या पाठ झाल्या होत्या. पुढें मोठेपणीं बाबांचें म्हणणें ऐकून ऐकून गीतेचा १५ वा अध्यायहि असाच पाठ झाला होता.

दहा-साडेदहाचे सुमारास शाळकरी मोठ्या मुलांची पंगत बसे. आम्हां लहान मुलांकरितां गांवांतच कालव्याचे शेजारीं पटवर्धन मास्तरांची एक शाळा असे. ( बिचारे पटवर्धन मास्तर पुढें लवकरच गेले, पण ती शाळा अद्याप तेथेंच अन् तशीच उभी आहे. ) पण चौथीच्या पुढच्या शिक्षणासाठीं माझ्या मोठ्या भावांना, व पुढें मलाहि पुण्यास जावें लागे.

आतांसारखी पर्वती त्या वेळीं पुण्यास जोडलेली नव्हती. त्या दोहोंत निदान तीन-एक मैलांचा बिनवस्तीचा टापू असे. आतांसारख्या बसेस्, मोटारीच काय पण टांगे छकडेहि नव्हते; आणि समजा हीं वाहनें असतीं तरी रोज रोज त्यांतून जाण्याइतकी आमची ऐपतहि नव्हती. आम्ही सर्व भावंडें पायींच जात-येत असूं. माझें दुसरीच्या पुढचें शिक्षण नू. म. विद्यालयांत, व मॅट्रिकनंतरचें फर्ग्यूसन कॉलेजांत झाल्यामुळें मला रोज सात-आठ मैलांची रपेट करण्याची सवयच लागली होती. पुढें पुष्कळ वर्षांनीं माझ्या मधल्या मोठ्या बंधूंनीं मला एक जुनी सायकल घेऊन दिली व तेव्हांपासून मात्र माझी पायीं रखडपट्टी थांबली.

मुलांचें जेवण झालें म्हणजे सावकाशीनें माई तुळशीला पाणी घाली व देवाला फुलें वाही. तिला या कामीं गर्दी खपत नसे. कोणी विचारल्यास तोंडानें म्हणे मात्र ‘ तुम्हीं मुलें जेवलांत म्हणजे देवांना नैवेद्य पोंचला. ’

बाबा पर्वतीवरून पुराण वाचून व नैवेद्य घेऊन घरीं आले ( यासंबंधीं सविस्तर पुढें येईलच ) म्हणजे बारासाडेबाराचे सुमारास त्यांचें जेवण होई, व त्यांचेच ताटांत ती जेवावयास बसे. अलीकडे अलीकडे तिचे मुलगे व त्यांच्या बायका एकदम व एकत्र जेवावयास बसलेलीं पाहून आपणहि त्या काळीं असें एकदम कां बसलों नाहीं हा विचार मनांत येऊन ती थोडीशी हंसे व म्हणे ‘ कोणत्याहि गोष्टीची वेळ यावी लागते. ’

उष्टीं-खरकटीं व भांडीं-कुंडीं होईतों तिला चांगले अडीच-तीन वाजत; नंतर थोडा वेळ बाबांच्या पायांना तूप लावून ती स्वत: एका जुनेरावर

दुसरें एक जुनेर उशाला घेऊन थोडी पडे. धान्य साफसूफ करून पहाटेच्या दळणाची तयारी करणें, दुसऱ्या दिवसाकरतां परसांतली भाजीभिजी काढून निवडणें इत्यादि कामें होईतों चांगले पांच वाजत. नंतर बाबा घरच्याच राममंदिरांत पुराण वाचीत तें ऐकावयास व एकीकडे वाती करावयास ती बसे; आणि दिवे लागणीच्या सुमारास पुन्हां रात्रीच्या कामाला लागे.

संध्याकाळचे केर-वारे करणें, घरांत दिवे व वृंदावनाशीं पणती किंवा लामणदिवा लावणें, लहान मुलांचीं अंथरुणें घालून ठेवणें, स्वयंपाक करणें, मुलांचीं जेवणें उरकणें, त्यांचीं उष्टीं-खरकटीं करणें, इत्यादि कामें झालीं म्हणजे ती बाबांची वाट पहात, व एकीकडे मुलांना गोष्टी-गाणीं सांगत बसे. व बाबा जेवल्यावर स्वतः जेवी. यापुढचें काम फारसें न लांबवितां ती तें थोडक्यांत आटोपी व आम्हां मुलांच्या अंगावरचीं पांघरुणें सावरून स्वतः अंथरुणावर पडे; आणि देवाचें नांव घेत घेत झोपीं जाई. इतकें होईतों कधीं कधीं बाराहि वाजत, आणि कधीं कधीं खूप दमल्यामुळें ती बसल्या जागीं पेंगायलाहि लागे.

माझी माई फार ममताळू होती हें सांगण्यांत काय स्वारस्य आहे ? आया ममताळू असतातच. पण त्यांच्या ममता करण्यांतहि कांहीं वेळां मोठा मार्मिकपणा व आकर्षकपणा असतो. पुढच्या काळची गोष्ट आहे. मी त्यावेळीं नूतन मराठी विद्यालयांत तिसरीच्या वर्गांत असेन. मुंबई इलाख्याचे गव्हर्नर—ते लॉर्ड लॅमिंग्टन् असावे असें वाटतें—हे आमच्या शाळेला भेट द्यावयास येणार असून त्यानिमित्त एक भला मोठा समारंभ व्हावयाचा होता. स्वागतप्रसंगीं स्वागतगीतें म्हणण्यासाठीं हजारभर मुलांच्या सबंध शाळेतर्फे कांहीं चार-पांच मुलेंच निवडण्यांत आलीं होतीं त्यांत मीहि एक होतों.

तो समारंभाचा दिवस उजाडला. माईनें मला बासनांतले चांगले चांगले कपडे घातले, व मी शाळेंत जाण्यास निघतांना खडीसाखर घातलेलें कढत कढत दूध प्यावयास दिलें. " अग, आतां मला भूक नाहीं " असें मी म्हणतांच ती मोठ्या ममतेनें म्हणाली " नानू, तूं आज गवर्नरापुढें गायला निघाला आहेस. आयत्या वेळीं आवाज बसून गाणं बिघडूं नये म्हणून हें कढत कढत दूध पिऊन घसा शेकून जा. " समारंभाहून मी परत आल्यावर, माझें गाणें चांगलें झाल्याचें बाबांकडून ऐकून ती घरांत गेली

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
वि:
अनुक्रम
क्रमांक


व माझ्यावरून मीठमोहऱ्या ओंवाळून मग ती देवापुढें बसली. तिच्या त्या प्रेमळपणाची व कौतुकाची आठवण अजून होते.

आमंत्रण नसतांना बाबाहि या समारंभास आले होते. " मला गव्हर्नर पहावयाचा होता " असें ते वरकरणी म्हणाले; पण खरें सांगायाचें म्हणजे त्यांना माझें गाणें ऐकावयाचें होतें; व त्याहूनहि खरें म्हणजे त्यांना मला गव्हर्नरासमोर उभा असलेलें पहावयाचें होतें. माझ्याबद्दल त्यांना त्यावेळीं काय वाटत होतें कोणास ठाऊक !

मी माझ्या माईची ही जी इतकी तपशीलवार व थोडीशी कंटाळवाणी दिनचर्या दिली ती येवढ्यासाठींच कीं पूर्वीच्या पिढींतल्या खेड्यांतल्या बायकांना किती व किती प्रकारचीं कामें करावीं लागत हें हल्लींच्या शहरी पिढीच्या लक्षांत यावें. दुसरीहि एक गोष्ट लक्षांत आली असेल कीं ज्याला कलात्मकता किंवा गृहिणीचा सुगरणपणा म्हणतात तो माईच्या अंगांत तितकासा नव्हता. मला वाटतें त्या काळच्या बहुतेक बायकांत तो नसेच. रोजचा साधा स्वयंपाक—व विशेषतः थालीपीठ, सांडगे, फोडणीच्या मिरच्या, गोळ्याचें सांबारें, धिरडीं, अंबोळ्या असले खमंग व चविष्ट पदार्थ ती चांगले करी. बाबांना तिचा रोजचा स्वयंपाकहि फारसा आवडत नसे, कारण त्यांची चमचमीतपणावर भक्ति जास्त असे. तिच्यापेक्षां तिची आई—म्हणजे आमची आजी—स्वयंपाकांत फारच तरबेज असे असें ते नेहमीं म्हणत. आजीच्या हातची पुरणपोळी तर त्यांच्या लक्षांत कायमची राहिली होती.

साधें शिवणकाम, वीणकाम वगैरेहि माईला फारसें जमत नसे. जमाखर्च मांडणें, रोज नियमानें बाहेरचें थोडें तरी वाचणें याची तिला फारशी जरूरी वाटली नाहीं. मुलांना प्रत्यक्ष शिकविण्याच्या फंदांत तर ती कधींच पडली नाहीं; आणि एकप्रकारें तें बरेंच झालें; नाहींतर आम्हां मुलांना तिच्याबद्दल जें प्रेम व आदर शेवटपर्यंत वाटत असत तीं कदाचित कमी झालीं असतीं. संध्याकाळीं दिवे लागणीच्या सुमारास मात्र ती आम्हां मुलांना जवळ घेऊन हरिविजय, रामविजय, भक्तिविजय, संतविजय, शिवलीलामृत, गुरुचरित्र अशांसारख्या प्राकृत पोथ्या मोठ्यांदा सुरावर

वाची व त्यांमधूनच आम्हांला अप्रत्यक्ष शिक्षण मिळे. याचवेळीं रामरक्षा, स्तोत्रें आरत्या इत्यादि ती शिकवी.

ती इतक्या पोथ्या वाची, पण मौज अशी कीं तिला लिहिण्याचें कधींच जमलें नाहीं—नाहीं म्हणजे स्वतःचें नांवहि काढतां आलें नाहीं! पण तेवढ्यामुळें ती असंस्कृत राहिली असें माझ्यानें म्हणवत नाहीं. मला आपलें असें वाटतें कीं शिक्षणाचा आणि सुसंस्कृतपणाचा फारसा संबंध नसावा. असलाच तर फार थोडा. अशिक्षित माणूससुद्धां सुसंस्कृत असूं शकतो असें मला आमच्या माईच्या उदाहरणावरून वाटतें.

माझ्या माईला जात्याच फारसें रूप नव्हतें. ती गोरी असली तरी अंगानें काटकुळी व बाबांच्या मानानें जरा उंच वाटे. नटण्यासवरण्याची हौसहि तिला नसे. दागदागिने फारसे नव्हतेच. नथ, बुगड्या, मूद, गळेसरी, पाटल्या, जोडवीं एवढींच सौभाग्यलेणीं तिचीं होतीं. नाहीं म्हणावयास तिनें इतरांच्या आग्रहावरून वर रामनाम कोरलेली एक मोहोरीची अंगठी करविली होती. ती तिच्या हडकुळ्या बोटांत इतकी विशोभित दिसे कीं तिनेंच ती पुढें आपल्या थोरल्या मुलीला देऊन टाकली. मला स्वतःला आंगठीचा इतका तिटकारा कां वाटतो याचें हें तर एक सुप्त व अबुद्ध कारण नसावें ना? माईचें रोजचें लुगडें मात्र स्वच्छ व झुळझुळीत असे व तें नेसण्याची तिची पद्धतीहि टाकटिकीची असे आणि तेवढ्यानेंच ती चांगली दिसे.

माईच्या अंगच्या आणखी एका गुणाचा ओझरता उल्लेख करून हें लांबलेलें मातृपुराण समाप्त करतों. तो गुण म्हणजे काटकसरीपणा हा होय. ती तशी काटकसरी नसती तर बाबांचा अक्षरशः दहा माणसांचा संसार झाला इतका सुखाचा, सोयीचा, व समाधानाचा झाला नसता. स्वतःचीं दहा बाळंतपणें, मुलीबाळींचीं लग्नकार्यें, डोहाळ जेवणें, अहेर-देणग्या इत्यादिसारखीं नैमित्तिक देणीं देणें, घरांतल्या सर्वांचे कपडे-लत्ते, बाबांच्या मित्रपरिवाराचा धबडगा, इत्यादि सर्व—कांहीं एक कर्जबाम न करतां—एरवीं कसें झालें असतें? ती होती म्हणूनच आमच्या कुटुंबाला इतक्या नेकीनें व लौकिकानें दिवस काढतां आले.

माई बाबांचे मागें चांगली दहा-बारा वर्षें होती. ती अकल्पितपणें गेली. तेव्हां मी नोकरीनिमित्त दूरदेशीं होतों. तिला मोठें दुखणें-बाहणें फारसें आलेंच नाहीं. म्हातारपणावारी सर्व गेलें, म्हणून घरच्यांनीं कोणीं मला अगाऊ कळविलेंहि नाहीं. ताप हळूंहळूं वाढूं लागला तशी माझे थोरले भाऊ मला पत्र लिहून कळवायला निघाले; पण तिनेंच ' कळवूं नका, त्याला उगीचच काळजी लागेल, तो नसतांना मी मरणार आहें थोडीच ? ' असें निक्षून सांगून दादांना पत्र लिहूं दिलें नाहीं. कोणत्या मातेला मुलगा मरणकाळीं जवळ असूं नये असें वाटेल ? पण माझ्या माईचें सगळेंच निराळें; तिला स्वतःच्या सुखापेक्षां माझ्याच सुखाची काळजी अधिक होती.

आतां मी तिचें इतकें गुणगान करीत आहें, पण तिच्या वृद्धापकाळीं मला तिची कसलीच सेवा करतां आली नाहीं एवढेंच नव्हे तर तिच्या अंतकाळीं नुसतें जवळहि रहातां आलें नाहीं हें शल्य माझ्या मनाला अजूनहि टोंचत आहे.

◎ ◎ ◎

# माझे वडील : : : २

माझ्या वडिलांचें नांव महादेव. पण ते शास्त्री असल्यामुळें लोक त्यांना महादेवशास्त्री म्हणत. आम्ही घरांतलीं माणसें त्यांना ‘ बाबा ’ म्हणत असूं. आणि शेजारचे बाळंभट तर मित्राच्या नात्यानें त्यांना ‘ महाद्या ’च म्हणत !

माईच्या मदतीनें बाबांचा संसार फार चांगला झाला याची जाणीव त्यांना स्वतःला मनांतून असल्यानें ते तिला प्रेमानें व आदरानें वागवीत. कृतकृत्यतेच्या जाणीवेनें ते स्वतःवर व जगावरहि संतुष्ट असत. जगावर संतुष्ट असण्यास माणूस प्रथम स्वतःवर संतुष्ट असावयास पाहिजे, नाहीं का ? तशी स्थिति बाबांची त्यावेळीं होती.

माईसारखाच बाबांच्या अंगचा पहिला मोठा सद्‌गुण म्हणजे ते अत्यंत कामसू व कष्टाळू होते. कोणींहि त्यांना कधीं आळसांत लोळत पडलेले किंवा रिकामटेकड्या गप्पा मारीत बसलेले पाहिलें नाहीं. पहांटे उठल्या-पासून तों रात्रीं निजेपर्यंत त्यांचें सारखें कांहीं ना कांहीं उपयुक्त काम चाललेलें असे. अर्थात दोन प्रहरच्या वामकुक्षीच्या दोन-तीन घटका सोडावयाच्या.

पाणी तापविण्याचें व मुलांना अंघोळी घालण्याचें काम त्यांनीं स्वतःकडे घेतलें होतें; हें काम ते अत्यंत मनापासून व एक प्रकारच्या निष्ठेनें करीत. त्यांत होणाऱ्या त्रासाचें, कष्टाचें व कालापव्ययाचें त्यांना मुळींच कांहीं वाटत नसे. त्याकाळीं स्टोव्ह, बंब, कोळशाच्या शेगड्या वगैरे पाणी तापविण्याचीं आधुनिक साधनें व त्यांना लागणारीं रॉकेल, कोळसे वगैरे शक्तिसाधनेंहि उपलब्ध नव्हतीं. दगडमातीच्या चुली व पालापाचोळा किंवा

काटक्या-कुटक्या यांवरच स्वयंपाक, पाणी तापविणें वगैरे सर्व कामें करावीं लागत.

पाणी तापविण्याच्या कामीं बाबांनीं मोठ्या किंमतीच्या लाकडांचाहि उपयोग कधीं केला नाहीं. परसांत सीताफळ, कडुलिंब, शेवगा, पपई, कण्हेरी, पांढरा चाफा यांचीं जीं कांहीं झाडें होतीं त्यांच्या पाचोळ्यावर व कुंपणाला घाणेरी, निर्गुडी, अडुळसा वगैरे जो कांहीं झाडोरा होता त्याच्या काटक्या-कुटक्यांवर ते दहा माणसांच्या आंघोळीला लागणारें पाणी बाराहि महिने तापवीत असत.

जमा केलेला पालापाचोळा, काटक्याकुटक्या, दुसरें सटरफटर करुतन वगैरे सांठविण्यासाठीं लागणारीं फाटकीं पोतीं, जुन्या पाट्या, दुरड्या, टोपलीं, अशा बारदानानें घरामागची पडवी व्यापलेली असे. ओलें सरपण वाळत टाकणें, ओल्यासुक्याची प्रतवारी लावणें, दुसऱ्या दिवशीं लागणारें सरपण व करुतन आदल्या दिवशीं तयार करून ठेवणें इत्यादि क्षुल्लक दिसणाऱ्या गोष्टी बाबा मोठ्या साक्षेपानें करीत असत. यापायीं जाणाऱ्या वेळाचें व पडणाऱ्या कष्टाचें त्यांना कांहींच वाटत नसे. नाहीं तरी दिवसाच्या चोवीस तासांत असें काय महत्त्वाचें करावयाचें असतें ? ज्यांना तसें काम असेल त्यांनीं फार तर असल्या कामांत पडूं नये.

जळणासंबंधींचा साक्षेप व आस्था दुसऱ्याहि दोन गोष्टींसंबंधीं ते दाखवीत. एक देवपूजेला लागणारीं फुलें, व दुसरें स्वतःला लागणारीं विड्याचीं पानें. फुलांच्या तांब्यांत व पानांच्या डब्यांत ताजेपणा-शिळेपणा या तत्त्वावर ते फुलांपानांचे तीन प्रकार व थर करून ठेवीत असत. एक वेळ मुलांच्या जोपासनेंत त्यांनीं कसूर केली असेल, पण या पानांफुलांच्या बाबतींत त्यांनीं ती चुकूनहि केली नाहीं.

आमचे मामा कै. ती. बाळाभाऊ गणपुले मोठे इंग्रजी शिकलेले; सरकारी हिशेब खात्यांत हेड्क्लार्क असून फार व्यवस्थित असत. कधींमधीं रस्त्यांत भेटले म्हणजे ते बाबांसंबंधीं एकच प्रश्न विनोदानें विचारीत असत. “ काय, बाबांचीं फुलें-पानें, पाला-पाचोळा वगैरे सर्व सुखरूप आहेत ना ? ”

पण बाबांच्या वतीनें मी विचारतों, याबाबतींत पडणारा त्रास त्यांनीं आनंदानें सोसला नसता तर कोळशां-लाकडांवर होणारा खर्च त्यांना

परवडला असता काय ? त्या काळांत आंबा, चिंच, पेरू वगैरे रायवळ-लाकडें पांच-सहा आणे मण व बाभळ-खैर वगैरे तर आठ-दहा आणे मण इतकीं महाग असत; आणि असा खर्च त्यांनीं नुसत्या पाणी तापविण्यावर केला असता तर दरमहा वीस रुपये पगारावर दहा माणसांचा नित्याचा व नैमित्तिक खर्च कसा भागला असता ? जेव्हां प्राप्ति वाढविण्याचें दुसरें कांहीं साधन नसतें तेव्हां हिशेबी माणसानें पैसा वांचविण्यावरच भिस्त ठेवली पाहिजे.

पाणी तापविण्याच्या व अंघोळी घालण्याच्या कामांत बाबांचे चांगले तीन तास जात असत; पण त्याचें त्यांना कांहीं वाटत नसे. कारण हातांनीं हें कार्य चालू असतांनाच ते तोंडानें अथर्वशीर्ष, रुद्र, पवमान, विष्णु-सहस्रनाम, भगवद्गीता इत्यादींचें पारायण करीत, व आम्हां मुलांना संध्या, पूजा, पुरुषसूक्त, वैश्वदेव वगैरे नित्योपयोगी गोष्टी शिकवीत. या गोष्टी मला अद्यापहि थोड्याशा चुकत-माकत येतात त्या त्यांनीं पहांटे पाणी तापवितांना मला शिकविलेल्या आहेत.

स्वतः पाणी तापविण्यानें होणाऱ्या फायद्यांबरोबरच बाबांचें एक कायमचें नुकसानहि झालें होतें. रोज धुरांत बसून बसून त्यांचे डोळे जे एकदां बिघडले ते कायमचे बिघडले, व तशा त्या धुरांत ते मलाहि आपलेपाशीं म्हणावयास बसवीत असल्यानें माझ्याहि डोळ्यांवर थोडा परिणाम झाला.

आतां आमच्या वरच्या पाणी भरण्याची मजा सांगतों. पर्वती गांवांत पाण्याचें फार दुर्भिक्ष असे. अजूनहि बरेंचसें आहे. गांवाशेजारून वाहणाऱ्या सरकारी कालव्यांतून तीन-चार हजार वस्तीच्या सबंध गांवाकरितां बोर्डानें एक हौद घेतला होता. या एकाच हौदाच्या पाण्यावर सर्व गांवकऱ्यांना आपली गुजराण करावी लागे. पर्वती गांव डोंगराच्या अगदीं पायथ्याशींच वसलें असल्यानें विहिरी अति खोल खोदल्याशिवाय त्यांना पाणी लागण्याचा संभवच नसे. नाहींतर राऊत, केंजळे, पाटणकर वगैरे मातबर ग्रामस्थांनीं त्या केव्हांच खोदल्या असत्या. आमच्या कुटुंबाला रोज कमीतकमी पंचवीस–तीस घागरी पाणी लागत असे, आणि तें सर्व आम्ही त्या हौदांतून भरीत असूं.

हें पाणी भरण्याचेंहि एक मजेशीर तंत्र होतें. बाबा, माई, माझीं मोठीं भावंडें व मधून मधून मी स्वतः—बायका कमरेवरून घागरींनीं व पुरुष

डोक्यावरून हांड्यांनीं — आडव्या पद्धतीनें सगळें पाणी तासाभरांत भरून टाकीत असूं. हौद ते घर ही अर्ध्या-पाऊण मैलाची खेप प्रत्येकानें न घालतां कांहींनीं हौदापासून अर्धें अंतर यावयाचें व त्यांच्या जोडीदारांनीं पुढचें घरापर्यंतचें अर्धें अंतर जावयाचें. त्यांतच लवकर चालण्याच्या शर्यती लागत व अधून-मधून गाण्याच्या लकेरीहि ऐकूं येत. व अशा रीतीनें एका मोठ्या कष्टाच्या व कंटाळवाण्या कामाला सहकारितेच्या व खेळीमेळीच्या तत्त्वावर सोपें व मनोरंजक रूप प्राप्त होई. पुढें शिक्षणशास्त्रांतील 'प्ले-वे मेथड' समजावून सांगतांना मी विद्यार्थिनींना माझ्या लहानपणच्या पाणी भरण्याच्या या पद्धतीचें उदाहरण देत असें.

पाण्याची अशी टंचाई असल्यामुळें आम्हांला आमच्या आंघोळी अगदीं थोडक्या व मोजक्या पाण्यांत उरकाव्या लागत. पुढें कालान्तरानें आलेल्या 'रेशन' पद्धतीचें तंत्र आम्हीं लहानपणींच घटवून ठेवलें होतें. अंघोळी अशा काटकसरीनें करावयाच्या असल्यामुळें मलाच नव्हे, तर मोठ्या मुलांनाहि बाबा स्वतःच अंघोळी घालीत.

पाणी तापवून अंघोळी घालणें, व हौदाचें पाणी भरणें हीं दोन नित्याचीं कामें झाल्यावर बाबा स्वतःचे उद्योगाला लागत. स्नान-संध्या (ब्रह्मयज्ञासह) करून व ठराविक नमस्कार घालून झाल्यावर ते पर्वतीवर देवदेवेश्वराच्या देवळांत पुराण वाचण्यास जात. (घरच्या खाटळभर देवांची पूजा मात्र माझे दोघे थोरले बंधु व पुढें पुढें मी असे करीत असूं. इतक्या देवांची पूजा करायला दोन-तीन माणसें लागतच.) व अकरा-साडे अकराचे सुमारास देवळाखालील संस्थानच्या वाड्यांतून आमच्या घरच्या रामाला सोंवळ्यानें नैवेद्य घेऊन येत. घरीं आल्यावर पर्वतीवरून आणलेल्या फुलांची—वर वर्णिलेल्या पद्धतीनें—निवड साठवण वगैरे करीत. मुलाबाळांचीं धुणीं व माईचें लुगडेंहि झाडून व घड्या वगैरे घालून वाळत टाकीत, व मग जेवावयास बसत. हें सर्व होईतों साडेबारा-एकाचा सुमार येई.

बाबांच्या या चेंगट नादिष्टपणानें माई अगदीं कंटाळून व कधीं कधीं त्रासूनहि जाई. त्यामुळें जेवणाच्या वेळीं फारसें प्रसन्न वातावरण नसे. जेवण झाल्यावर ते विड्याच्या तयारीला लागत, व तासाभरानें झोंपत.

तीन-साडेतीनला उठल्यावर ते तांब्यानेंच घट-घट असा आवाज करीत वरून पाणी पीत व अर्धा-अधिक तांब्या खलास करीत, व पुन्हां एकदां पानतंबाकूचा बार भरून कामाला लागत.

झोंप चांगली झालेली असली किंवा सकाळचीं सर्व कामें मनासारखीं झालेलीं असलीं म्हणजे बाबा आम्हां मुलांना (त्यांत सुनाहि येत) सोंगट्या खेळावयास बोलावीत व स्वतः दान देत. कधीं कधीं ते माईलाहि खेळण्यास येण्याचा आग्रह करीत; त्या वेळीं ते आम्हां मुलांशीं—विशेषतः सुनांशीं – इतक्या खेळी-मेळीनें वागत कीं बहुधा गंभीर व रागीट दिसणारे बाबा आमच्याशीं नेहमींच असे हंसत-खेळत कां वागत नाहींत असा आम्हांला प्रश्न पडे.

बाबांना पर्वतीवरच्या पुराणाशिवाय पुण्यांत तुळशीबागेंतील शेषशायीच्या पुढेंहि पुराण सांगावें लागे. त्याची तयारी ते न चुकतां करीत. या सार्व-जनिक म्हणजे देवळांतल्या पुराणांशिवाय एक-दोन खाजगी म्हणजे कुटुंबांतलीं पुराणेंहि ते वाचीत असत. इतकें सर्व होईतों घरीं परत येण्यास रात्रीचे आठ नऊ वाजत. संध्या, धूपार्ती वगैरे करून व [1]धान्य फराळ आटोपून ते झोंपी जात. ही झाली बाबांची नेहमींची दिनचर्या. ती एकंदरींत कष्टाची, जिकीरीची व गरीबीच्या काटकसरीची असूनहि ती ते मोठ्या आवडीनें, कर्तव्यभावनेनें व गृहस्थाश्रमाच्या बुद्धीनें आचरीत. ते कधीं कंटाळलेले, आमलेले किंवा विटलेले नसत हें विशेष. आम्ही पुण्यास भाड्याच्या घरांत रहात असूं. तें सोडून आम्ही पर्वती येथील स्वतःच्या घरांत कसें आलों हें सांगितलें म्हणजे बाबांच्या कर्तृत्वासंबंधीं निराळें सांगावयास नको. बाबा घरांत जरी जरा रागीट व कडक असले तरी लोकांशीं वागतांना ते मोठे गोड, व आर्जवीपणानें वागत. (माई त्यांना परधार्जिणे म्हणून म्हणे सुद्धां). व याच गुणांचे जोरावर त्यांना चांगली मानाची नोकरी—चाकरी, जिवाला जीव देणारी मित्र-मंडळी व नेकीचे शेजारीं—पाजारी यांची जोड लाभली.

---

१. जोंधळा, बाजरी वगैरे धान्य भाजून व दळून त्याच्या पिठाची केलेली दशमी व तांदूळ भाजून शिजविलेली सोजी.

थोडक्यांत म्हणजे त्यांनीं लोकाराधन फार चांगलें केलें व त्याचें योग्य तें फलहि त्यांना मिळाल्यावांचून राहिलें नाहीं.

श्रीमंत नानासाहेब पेशव्यांनीं सन १७४९ मध्यें पुण्याच्या दक्षिणेस एका टेकडीवर पर्वती मंदिर व संस्थान स्थापन केलें. या पर्वती संस्थानांत वंशपरंपरेनें वतन म्हणून कामें करणारीं जीं चारपांच घराणीं आहेत, त्यांत आमचें पटवर्धनांचें घराणेंहि आहे. कोंकणच्या लिमयांच्या घराण्यांत मुख्य देवदेवेश्वराच्या पूजेचें काम चालू असून कोंकणांतून त्यांचे वंशज अद्याप पाळी-पाळीनें येऊन ती सेवा बजावितात. श्रीविष्णूच्या पूजेचें काम पर्वती गांवांत स्थायिक झालेल्या पुरंदरे कुटुंबांत अजून चालू आहे. सूर्यनारायण आणि गणपति यांचें पुजारीपण पाटणकर कुटुंबाकडे होतें, पण कांहीं वर्षांपूर्वी तें काम करण्यासारखी कोणी व्यक्ति त्या कुटुंबांत न उरल्यामुळें तें वतन संस्थानांत जमा करण्यांत आलें. याच कुटुंबांतील एक सेवानिवृत्त इंजिनिअर श्री. रावसाहेब पाटणकर हल्लीं डेक्कन जिमखान्यावर स्वतःच्या बंगल्यांत राहात आहेत.

या तीन पुजाऱ्यांशिवाय देवदेवेश्वराचे देवळांत पुराण वाचण्याचें काम ढेरे या कुटुंबाकडे होतें; पण पुढें ढेऱ्यांपैकीं कोणी योग्य व्यक्ति न मिळाल्यामुळें माझ्या बाबांना तें काम देण्यांत आलें. बाबांचे पश्चात् तें काम संस्थानच्या अधिकाऱ्यांनीं महिन्या-महिन्याच्या पाळीनें ( त्यालाच वर्णी म्हणतात ) कित्येक वर्षें करवून घेतलें. अलीकडे वीस-पंचवीस वर्षें मात्र तें काम ढेरे कुटुंबांतील एक व्यक्ति करीत असते.

श्रीविष्णूचे देवळांत पुराण वाचण्याचें काम पटवर्धन कुटुंबाकडे संस्थान स्थापन झाल्यापासून आलेलें असून आज सतत दोनशें वर्षें तें आमच्या घराण्याकडे चालू आहे. माझ्या आजोबांच्या पश्चात माझे वडील तें काम करूं लागले. देवदेवेश्वराकडील पुराणाचें काम करण्यापूर्वीं बाबा श्रीविष्णूचे देवळांतच पुराण वाचीत असत. पण योग असा आला कीं, माझे सर्वांत थोरले बंधु ( त्यांना आम्ही 'दादा' म्हणत असूं व बाहेरचे लोक रामशास्त्री म्हणत ) पुराण सांगण्याइतपत संस्कृत शिकून तयार होण्याच्या सुमारास देवदेवेश्वराकडील ढेरे कुटुंबाकडची जागा खालीं झाली. अर्थात् बाबांच्या चांगूलपणामुळें ती जागा त्यांना मिळाली व त्यांच्या स्वतःच्या

मूळ जागेवर श्रीविष्णूकडे त्यांनीं आपल्या मोठ्या मुलाला—रामशास्त्र्यांना लावून घेतलें.

तेव्हांपासून म्हणजे मला आठवतें तेव्हांपासून—देवदेवेश्वराकडील व श्रीविष्णूकडील अशा दोन्ही जागा आमच्या घराण्यांत चालू झाल्या. श्रीविष्णूकडील पुराणाचे कामांत भाऊबंदकीची वाटणी असून वर्षांतून सहा महिने माझे चुलतबंधु तें पहात; आतां त्यांचे पश्चात् त्यांचा मुलगा नानाशास्त्री पहातो. माझ्या थोरल्या बंधूंनंतर माझे मधले बंधु कांहीं दिवस श्रीविष्णूकडील काम पहात असत. आतां त्यांच्या पश्चात् त्यांचा मुलगा—चि. भाऊ हा तें पहातो. नाहीं म्हणावयास माझा हात मात्र त्या कामाला कधीं लागला नाहीं.

देवदेवेश्वराकडील काम स्वत:कडे घेऊन व श्रीविष्णूकडील वतनी जागेवर मुलाची स्थापना करवून घेऊन बाबांनीं मोठ्या धूर्तपणानें आणखी एक कमाई केली.

पर्वती गांवांत पुष्कळ वर्षांपूर्वीं एक राममंदिर बांधण्यांत येऊन त्याला पर्वती संस्थानांतून नैवेद्याची नेमणूक करून घेण्यांत आली होती. हें मंदिर व ही नेमणूक चालविण्याचें काम रामभाऊ अकोलकर नांवाचे कोणी एक वृद्ध गृहस्थ पुष्कळ वर्षें पहात होते. तें काम त्यांना होईनासें झाल्यावर तें त्यांनीं पर्वतीवरील श्रीविष्णूचें देवळांत पुराण वाचीत असलेल्या वे: शा. सं. महादेवशास्त्री पटवर्धन ( म्हणजेच माझे वडील ) यांना देऊं केलें. देवाची रोजची पूजा करावयाची, दरवर्षीं रामनवमीचा उत्सव नऊ दिवस साजरा करावयाचा, देवापाशीं दिवा लावायचा. मंदिराची निगा राखावयाची, पर्वती संस्थानांतून रोज नैवेद्य आणून तो देवाला दाखवायचा, खुद्द अकोलकर जिवंत असेतों त्यांची शुश्रूषा करायची व त्यांच्या पश्चात् मंदिर व त्याला लागून असलेली—अकोलकर रहात ती—जागा कायमची आपल्या नांवावर करून घ्यावयाची असें उभयपक्षीं ठरलेलें दिसतें.

अकोलकरांकडून मिळविलेली ही जागा पर्वती गांवांत दक्षिणेच्या बाजूला अद्यापहि एका ओसाड बखळीच्या रूपांत असलेली दिसूं शकेल. मात्र तें राममंदिर व तें घर आतां तेथें दिसणार नाहींत. त्या दोहोंचें

स्थलान्तर झालें. गांवांतल्या गांवांतच पर्वती डोंगराच्या पायथ्याजवळ भर वस्तींत असलेली सरकारी कोंडवाड्याची एक मोकळी बखळ ठराविक मुदतीच्या करारानें मामुली भाड्यावर खरेदी करून त्यावर एक लहानसें घर वांधण्यांत आलें, व त्यांतच श्रीरामाची स्थापना व कुटुंबाची रहाण्याची सोय करण्यांत आली. पहिल्या राममंदिराचें व रहात्या घराचें हें स्थलांतर व रूपांतर घडण्याला पुढील भीषण घटना कारणीभूत झाली.

त्याचें असें झालें कीं, पहिल्या राममंदिराचा जीर्णोद्धार करण्याचें ठरून तें जमीनदोस्त करण्यांत आलें. दगड–चिरा वगैरे बांधकामाचें सर्व सामान व तुळया, लगा, खांब, खिडक्या-दारें इत्यादींना लागणारीं सागवानी बिमें येऊन पडलीं. अरकस काम, सुतार काम सुरू झालें. सर्व कांहीं होऊं लागलें पण मूळ मंदिराच्या वास्तूचा कोप होऊनच कीं काय माझी सर्वांस थोरली बहीण–मनूताई–प्लेगानें एकाएकी वारली व बांधकामाला खळ पडला.

तिच्या सुतकांतच एके दिवशीं रात्रीं आम्ही सर्वजण त्या उघड्या जागेंत झोंपलों असतांना आमच्या घरावर एक मोठा दरोडा पडला. मी त्या वेळीं सहा-सात वर्षांचा असून बायका मंडळींत निजलों होतों. तोंडाला काळीं फडकीं बांधून व हातांत कुऱ्हाडी घेऊन आलेल्या त्या दरोडेखोरांनीं आल्याबरोबर पुरुष मंडळींना कुऱ्हाडींनीं घायाळ केलें, व नंतर ते बायकांकडे वळले. पण इतक्यांत ओरडा–ओरड झाल्यानें शेजारी-पाजारी धावून आले व दरोडेखोर हातीं लागेल तें घेऊन पळून गेले. माझ्या थोरल्या बंधूंच्या चेहऱ्यावर व मेहुण्यांच्या ( मनूताईचे यजमान, मोरूनाना यांच्या ) डोक्यावर इतक्या खोल खोल जखमा झाल्या होत्या कीं त्यांना ससून हॉस्पिटलमध्यें पुढें किती तरी दिवस पडून राहावें लागलें.

नवीन मंदिर उभारण्याचे कामीं मोरूनानांनीं विशेष पुढाकार घेतला असून सुरुवातीचा सर्व खर्च त्यांनींच केला होता. बायको मेली, भयंकर स्वरुपाचा मार खावा लागला, या गोष्टींचा विषाद वाटून उमेदीनें हातीं घेतलेल्या कामांतून व सामान्यतः आमच्या कुटुंबांतून त्यांचें लक्ष कायमचें उडालें. मृत्यूपर्यंत ते आमचे घरीं येत-जात, मुक्कामहि करीत पण पहिली गोडी नाहींशी झाली व ते आम्हांला पारखे बनले.

मोरूनाना हे साधे कांपौंडर असूनहि त्यांनीं आमच्या घरच्या कितींतरी मंडळींचीं दुखणीं बरीं केलीं होतीं. प्लेग, कॉलरा वगैरे मोठ्या दुखण्यांतून त्यांनींच मला-आपल्या गांवठी औषधांनीं उठविलें होतें. त्यांची एकंदर रहाणी अत्यंत स्वच्छ असून तिचें अनुकरण आम्हां मुलांकडून नकळत होत असे. मार खाल्लेली सर्व मंडळी बरी झाली. दरोडेखोरांबद्दल वाटत असलेली भीतीहि चेपूं लागली, पण त्या जागीं करमण्याचें चिन्ह दिसेना, व म्हणून आम्हीं वर सांगितलेली कोंडवाड्याची जागा विकत घेतली व पहिल्या घरासाठीं खरीदलेलें सर्व सामान आणून तेथें दुसरें एक लहानसें घर उभें केलें, आणि त्यांतच श्रीरामाच्या मूर्तींची स्थापना केली.

कालांतरानें स्वतः पर्वती संस्थानानेंच त्या राममूर्ती संस्थानांत जमा करण्याचें ठरविलें व त्यांची स्थापना श्रीविष्णूचे देवळांत मुख्य मूर्ती-शेजारींच–पण जरा एका बाजूला केली. अद्यापहि त्या तेथें उभ्या असलेल्या दिसतात. पण आम्हांला त्यांच्या दर्शनानें पहिल्यासारखा प्रसन्नतेचा आनंद होण्याऐवजीं दुःखच होतें. देवांनासुद्धां कधीं कधीं दैव सोडीत नाहीं हेंच खरें !

देव गेले, देवघर गेलें, तसेंच आमचें रहातें घरहि जाऊं म्हणत आहे. एका भाडेकऱ्यानें ती जागा बहुतेक व्यापली असून तो तेथून निघण्याची फारशी आशा नाहीं. घर स्वतःच्या नांवावर, त्याच्या डागडुजीचा खर्च स्वतः करायाचा, जमिनीचा वार्षिक सारा स्वतः भरावयाचा; पण प्रत्यक्ष वापर करावयाचा मात्र दुसऱ्यानें ! काय ही लाजीरवाणी स्थिति !

बाबांनीं कोणकोणत्या गोष्टी कशा कशा कमावल्या याचें वर्णन आतां-पर्यंत झालें. या कमाईत त्यांच्या काटकसरी स्वभावानें भारीच भर घातली. ते माईप्रमाणें अत्यंत काटकसरी होते याचें एक उदाहरण म्हणून त्यांच्या पाणी तापविण्याच्या तंत्राचें वर दिलेंच आहे.

माझे आईबाप काटकसरी असले तरी कृपण किंवा कंजुष बिलकुलच नव्हते. उलट तीं दोघेंहि मनानें उदार, हाताचीं सढळ व हृदयाचीं दिलदार होतीं; श्रीमंत पाहुणे–रावळे, व मातबर नातेवाईक उभयतांच्या पाहुणचारावर व आतिथ्यावर पूर्णपणें संतुष्ट असत. माझ्या मावशीचे

यजमान– कै. [1] बापूसाहेब गाडगीळ व त्यांच्या कुटुंबांतील सर्व लहान-थोर मंडळी श्रीमंतींत लोळलेली–घोळलेली असूनहि बाबा-माईकडे अगत्यानें येत व त्यांच्या पाहुणचाराचा आनंदानें परामर्श घेत. तीच गोष्ट सर्कसवाले छत्रे बंधू, गणपतराव फडके, दामोदरपंत कात्रे वगैरे बाबांच्या मातबर मित्रांची. सारांश आमचें घर म्हणजे एखाद्या मुक्कड भिक्षुकाचें, किंवा कष्टानें संसार करणाऱ्या एका अकिंचन माणसाचें असें कोणालाहि कधीं वाटलें नाहीं. उलट सर्वजण बाबा-माईंच्या औदार्याची वाखाणणी करीत.

त्यांच्या औदार्याची एक लहानशी बाब आठवली आहे तेवढी जातां जातां सांगतों. आमच्या परड्यांत शिताफळीचीं दहा-बारा झाडें असून हंगामांत त्यांना खूप फळें लागत. आढी पिकली म्हणजे घरांतल्या मुलां-बाळांसाटीं त्यांतलीं थोडीं व सामान्य दर्जाचीं ठेवून बाबा बाकीचीं सर्व शेलकीं व टप्पोऱ्या डोळ्यांचीं फळें बाहेरच्या सर्वांना वाटून देत. आमचे नातेवाईक, बाबांचे इष्टमित्र, आम्हां मुलांचे मास्तर, पर्वती संस्थानांतील नोकर-चाकर, धान्यवाले, कापडवाले, दुकानदार इत्यादि सर्वजण या वार्षिक वानगीची मोठ्या आतुरतेनें व आपुलकीनें वाट पहात असत. आम्ही मुलेंहि शिल्लक राहिलेलीं जीं थोडीं मिळत त्यावर खूष असून बाबांच्या या देण्याचें कौतुक करीत असूं. त्या काळीं हें कसें काय होत असे कोणास ठाऊक! हल्लीं मात्र कोणीं कोणाला कांहीं दिलें–सवरलेलें फारसें खपत नाहीं. अर्थात हें सारें औदार्य त्यांना अवघ्या वीस रुपयांच्या पगारावरच दाखवितां आलें असें नाहीं. मिळकतीच्या आणखीहि कांहीं गौण बाबी होत्या.

माझे पूर्वज–ज्यांनीं श्रीविष्णूकडील पुराणिकाची जागा मिळविली ते अग्निहोत्री असल्यानें परान्न घेत नसत. संस्थानची व्यवस्था पहाणारी त्या वेळची मंडळी मोठी सुजाण असावी. त्यांनीं संस्थानांतल्या इतर नोकरां-प्रमाणें माझ्या पूर्वजांनींहि रोज जेवणासच आलें पाहिजे, नाहींतर नुसत्या कोरड्या पगारावर रहाण्यास तयार असलें पाहिजे असा आडमुठेपणाचा आग्रह न धरतां नेहमींच्या नियमाला एक अपवाद म्हणून माझ्या पूर्वजांना दरमहा वीस रुपये पगार व त्याशिवाय दरमहा एक कोरडा शिधा तेला-

१. बडोदें राज्यांत एका काळीं मुख्य न्यायाधीश होते.

तुपासह देण्याचें मान्य केलें. दूध, भाजीपाला, विड्याचीं पानें, केळींचीं पानें अशासारख्या बिनटिकाऊ वस्तु मात्र रोजच्या रोज देण्याची व्यवस्था केली. तेव्हांपासून आमच्या घराण्यापुरती ही शिधापद्धति सुरूं झाली. माझे वडील व बंधु हे अग्निहोत्र पाळीत नसल्यानें ही शिधापद्धति बंद करावी असें कांहीं हिशेबी चालकांनीं सुचविलें होतें, पण तें तसेंच राहिलें.

अशा रीतीनें पगाराला पूरक म्हणून दोन माणसांना पुरेल इतका नैवेद्य, तितकाच दर महिन्याच्या शेवटीं मिळणारा कोरडा शिधा, व रोजचें अच्छेरभर दूध, भाजीपाला, विड्याचीं पानें, केळीचीं पानें इतकें सर्व वर्षानुवर्ष मिळत असल्यानें बाबा-माईंना मोठ्या मजेनें, कसलेंहि दैन्य न दाखवितां संसार करतां आला. तुपासाखरेनें भरलेल्या दादरे बांधून ठेवलेल्या तपेल्या शिंक्यांवरून टांगतां आल्या.

आणखीहि दोन-तीन गौण बाबींचा येथें उल्लेख करावासा वाटतो. ज्येष्ठ महिन्यांतील दशाहारांत नारळ, आंबे, अंजीर, बत्तासे, पेढे, करंज्या अनारसे, घीवर, खारका, बदाम अशासारख्या खाद्य पदार्थांचीं वाणें बाबा व दादा यांना मिळत असल्यामुळें दोन-तीन महिने घरांत खाण्याची मोटी चंगळ असे. अधिक मासांत व गोकूळ अष्टमी, रामनवमी अशा प्रसंगीं तुळशीबाग, बेलबाग, रामेश्वर, सोमेश्वर इ. ठिकाणीं रामायण-भागवतांचे सप्ताह होत. त्या वेळींहि पुराणिकांना धोतरजोडे, उपरणीं, धाबळ्या व कधीं कधीं तर शालजोड्याहि मिळत. दहावीस वर्षांनीं मध्येंच एखादी भाविक बाई भांडीं-कुंडीं, अंथरुणें, पांघरुणें पाट-घडवंच्या इ. सर्व संसारच्या संसार पुराणिकबुवांना अर्पण करी. श्री. बहिणाबाई दातार या विधवा बाईनें असा संसार बाबांना दान दिल्याचें मला आठवतें. अशा रीतीनें विविध प्रकारच्या उत्पन्नाच्या योगानें माझ्या वडिलांना आपला संसार मोठ्या ऐपतीचा करतां आला.

पागोटें गुडघ्यावर बांधणें, कपडे हातानें शिवणें, छत्री दुरुस्त करणें, स्वयंपाकपाणी करणें, द्रोण पत्रावळी लावणें, अशासारखीं कामें त्या काळीं कला या सदरांत पडत व त्या कला बाबांना चांगल्या अवगत असत. चित्रकला, गायन-वादन वगैरे हल्लीं विशेष मान्यता पावलेल्या ललितकला मात्र त्यांना

येत नसत. गायन-वादन ऐकण्याची आवड मात्र त्यांना अतिशय होती. आणि ती लागण्याचें एक कारणहि होते.

देवदेवेश्वराचे देवळांत पुराण वाचतांना जवळच पूजेचे वेळीं गवयांचें गाणें चाले, तें रोज-रोज त्यांच्या कानावर पडे. झारदार आवाज असलेले शिवभक्त बुवा, उंच सुरेल व जनानी गळा असलेले [१] जगन्नाथबुवा पंढर-पूरकर, अशांसारखे गुणी गवयी रोज देवापुढें गात असत व ग्यानबाराजे गुरवासारखे नाजूक नरम हाताचे पखवाजी त्याची साथ करीत असत. अशा गुणी कलावंतांच्या निकट सान्निध्यांत असल्यामुळें बाबांना व आम्हां मुलांनाहि—गाणीं–बजावणीं ऐकण्याची आवड उत्पन्न झाली नसती तरच नवल !

बाबांच्या खाण्यापिण्याच्या खास अशा आवडी–निवडी नसतच. त्यांचा दुबारचा आहार चांगला भरभक्कम असून ते मोठ्या चविष्टपणें जेवत. चहा-पाणी वगैरे कांहीं नसेच. कधीं कधीं मधेंच कांहीं खावेंसें वाटल्यास [२] पाऊण पैशाचे चुरमुरे व दमडीचे दाणे घेऊन खात; व ते त्यांना अतिशय आवडतहि. पुराणें सांगून परत येतांना दमल्यासारखें वाटल्यास कधीं कधीं तें तुळशीबागेच्या पिछाडीला असलेल्या कुशाबांच्या गुऱ्हाळीं जात व तीन शेराची चरवी एकदम तोंडाला लावीत. रसहि त्या काळीं अतिशय स्वस्त—म्हणजे पैसा—शेर होता.

हें व्यक्तिवर्णन बरेंच लांबलें; पण खरें सांगायचें म्हणजे तें याहूनहि लांबविण्यासारखें आहे. कारण माझे बाबा म्हणजे मला आदरणीय वाटणारी एक व्यक्ति तर आहेतच, पण त्याचबरोबर ते त्या काळच्या गरीबीनें पण सन्मानानें संसार करणाऱ्या मध्यम स्थितींतील गृहस्थांचा व शास्त्री-मंडळींचा एक प्रातिनिधिक नमुना आहेत. आणि म्हणून त्यांच्या वैयक्तिक जीवनावरून त्या वेळच्या सामाजिक जीवनाचीहि थोडी-फार कल्पना येण्यासारखी आहे.

---

१. गंधर्व नाटक मंडळींत नायकाचीं कामें करीत असलेले नट. विद्यमान गायक-जगन्नाथबुवा पंढरपूरकर नव्हत.

२. हल्लीं एवढ्याच चुरमुऱ्यांना व दाण्यांना दोन आणे पडतात.

बाबांच्या जीवनवृत्तांताचा थोडक्यांत समारोप करावयाचा तर असें म्हणतां येईल कीं ते एक आदर्श गृहस्थाश्रमी असून त्यांनीं आपला संसार मोठ्या आस्थेनें, आवडीनें व अगत्यानें केला व आम्हां मुलांना पितृसुख पुरेपूर लाधूं दिलें. ह्यांत काय आहे अन् त्यांत काय आहे असला धादांती वेदांत त्यांनीं कधीं केला नाहीं. संसार सुखाचा करून, जमला तो परार्थ व परमार्थहि केला. स्वतः सुखी झाले, दुसऱ्यांनाहि सुखी केलें.

ते तारीख एकोणतीस ऑगस्ट १९०९ रोजीं नागपंचमीचे दिवशीं संध्याकाळीं अर्धांग वायूचा झटका येऊन अचानक वारले. दुपारीं दिंडाचें जेवण नेहमीसारखे जेवून व थोडी वामकुक्षी करून ते तिसरे प्रहरीं रोजच्याप्रमाणें अंगणांत काम करण्यासाठीं म्हणून गेले व तेथेंच मूर्च्छा येऊन पडले. ते पुन्हां म्हणून शुद्धीवर आले नाहींत.

त्याच दिवशीं व त्याच वेळीं नानावाड्यालगतच्या किर्लोस्कर [1]नाटकगृहाचा उद्घाटन समारंभ मोठ्या थाटानें साजरा होत होता. किर्लोस्कर नाटक मंडळी आपल्या शाकुंतल नाटकाचा हातखंडा प्रयोग करून दाखवीत असून पुण्यांतील बहुतेक निवडक नागरीक तो पहाण्यासाठीं तेथें उपस्थित होते.

आमच्या कुटुंबाचे गृहवैद्य व आमच्याशीं सुहृद्संबंध असलेले श्री. कृष्णशास्त्री माटे वैद्य हेहि नाट्यप्रयोग पहाण्यास तिकडेच गेले होते. माझे दोघेहि थोरले बंधु घरीं नसल्यामुळें वैद्यबुवांना घेऊन येण्याची कामगिरी माझेवरच आली होती. मी मोठ्या मिनतवारीनें दारावर असलेल्या शंकरराव [2]मुजुमदारांची परवानगी मिळवून आंत गेलों, व वैद्यबुवांना घेऊन पर्वतीस परत आलों. नाटक इतकें रंगलें होतें कीं वैद्यबुवांना—व मलाहि तेथून पाय काढण्याचें जिवावर आलें होतें. त्यांच्या येण्याचा अर्थात्च कांहीं उपयोग न होतां माझे बाबा त्याच दिवशीं उत्तर रात्रीं आम्हां सर्वांना सोडून कैलासवासी झाले.

१. हल्लींचें वसंत टॉकीज. २. किर्लोस्कर मंडळीचे कर्तबगार व्यवस्थापक.

# माझीं भावंडें : : : ३

आम्ही एकंदर दहा भावंडें—पांच भाऊ व पांच बहिणी. यांपैकीं फक्त दोन थोरले भाऊ व एक मोठी बहीण यांच्याच आठवणी विशेष स्पष्ट व उल्लेखनीय आहेत. भावांचीं नांवें रामचंद्र व बाळकृष्ण असून मी त्यांना अनुक्रमें दादा व अण्णा म्हणें. बहिणीला चिंगुताई म्हणतों.

**दादा:**— माझ्या दादांना लोक रामशास्त्री म्हणत. ते भारी मायाळू होते. मी सर्व भावंडांत लहान असल्यानें व जरा होतकरू दिसत असल्यानें त्यांची माझ्यावर मोठी माया असे. आणि माझ्यासंबंधीं त्यांनीं अपेक्षाहि मोठ्या बाळगल्या होत्या. त्या अपेक्षांपैकीं बऱ्याचशा माझ्याकडून पुऱ्या होऊं शकल्या हे दैवाचे माझ्यावर फार उपकार आहेत. एक अपेक्षा मात्र पुरी होऊं शकली नाहीं; पण त्यासंबंधीं पुढें येईलच.

दादा एखादे वेळीं फार रागवावयाचे, पण लगेच राग निवून गहिंवरून यावयाचे. पर्वती संस्थानांतून येणाऱ्या शिध्यांत केळीचीं पानें यावयाचीं, म्हणून आम्ही जेवावयास ताटें, ताटल्या वगैरे न घेतां केळीच्या फाळक्यांवरच जेवीत असूं. एकदां मी मोठ्या फाळक्यासाठीं हट्ट घेतला व रुसून माळ्यावर जाऊन बसलों. दादांनीं माझी चौकशी करून शोध शोध शोधलें. शेवटीं मी माळ्यावर दडलेला दिसल्याबरोबर 'चल रे खालीं जेवायला; येतोस् ना नानू?' असें ते मोठ्यानें ओरडले. माझा हट्ट वाढतच चालला. रागाच्या भरांत त्यांनीं माझ्या पाठीवर एक रपाटा दिला; पण लगेच ते स्वतःच गहिंवरून आले, आणि माझीं आर्जवें करूं लागले. तरीहि मी ऐकेना. 'बरं तर, तूं येत नसलास तर मीहि तुझ्या-

शिवाय जेवीत नाहीं' असें म्हणून ते दूर गेले; व सुमारें दोन तास मी जेवावयाला जाईतों ते स्वतः उपाशी राहिले ! बाब अगदीं क्षुल्लक, पण त्यांच्या त्या प्रेमळपणाचा माझ्या मनावर कायमचा परिणाम झाला. मी तेव्हांपासून आपोआप त्यांच्या इच्छेनुरूप वागूं लागलों. माझ्या पुढील सबंध आयुष्यांत असा एकच प्रसंग आला कीं त्या वेळीं मला त्यांच्या इच्छेविरुद्ध जावें लागलें. तो प्रसंग पुढें येईलच.

दादा जितके प्रेमळ तितकेच माझ्या बाबतींत तरी हौशी होते. मी खूप शिकावें अशी त्यांची भारी इच्छा असे. मी कॉलेजच्या पहिल्या [1]परीक्षेंत नापास झालों. पुढें अभ्यास न करतां मी पुराणिकाच्या वडिलोपार्जित धंद्यांत पडावें असा माझ्या वडिलांचा आग्रह पडला. पण त्या आग्रहाला न जुमानतां दादांनीं मला पुढें शिकूं दिलें. याचसंबंधीं विचार घेण्यासाठीं म्हणून माझे वडील मला आपले मित्र—दिवाणबहादुर काशीनाथपंत गोडबोले यांचेकडे घेऊन गेल्याचें आठवतें. त्यांचाहि सल्ला दादांसारखाच पडला; ते वडिलांना म्हणाले, 'हें बघ, गड्या, त्याला एकदां पी. ई. होऊं दे. मग आपण पाहूं.' दादांनीं त्या वेळीं वडिलांच्या इच्छेला मान तुकविली असती तर माझें शिक्षण तेथेंच खुंटलें असतें, व मग मी जन्मभर 'सूतोवाच' करीत बसलों असतों.

माझ्या वरातीला दादांनीं इंग्रजी बँड लावला होता. त्या काळीं आमच्यासारखे मध्यम स्थितींतील लोक लग्नकार्यांत नुसतीं वाजंत्रीं—फार झालें तर ताशा—आणि फार फार झालें तर चौघडा लावीत. पण दादांनीं लोकांचें हसें सहन करून व खर्चाकडे न पहातां या तिहींशिवाय आणखी बँड लावला ! वरातीपुढें रविवारांतील प्रसिद्ध कापडाचे व्यापारी रामभगत पछानदास यांचा शृंगारलेला घोडा नाचत होताच ! तरी बरं, छत्रे यांच्या सर्कशींतला हत्ती आणून नाहीं झुलविला. छत्रे बंधू बाबांचे मित्र असल्यानें तो सहज मिळाला असता.

जेवणावळीला चारचौघांप्रमाणें नुसत्या बुंदीवर न भागवतां जिलब्यांचा व मोतीचुराचा बेत केला ! माझ्या सर्व मित्रांना व शिक्षकांनाहि जेवावयास

१. त्या काळीं तिला 'प्रीव्हिअस' परीक्षा म्हणत.

बोलावलें; दादा स्वतः आग्रह करकरून जिलब्या वाढीत होते. सुप्रसिद्ध गायनाचार्य भास्करराव बखले श्लोक म्हणत होते. अशा थाटांची ती पंगत पेरूगेटाजवळील केळकरांचे वाड्यांत ( हल्लींच्या शिवाजी मंदिराशेजारीं ) झालेली मला अद्याप आठवते. स्वतःच्या व घरांतील इतरांच्या बाबतींत ते थोडेतरी खर्चाकडे पहात, पण माझे बाबतींत ते अत्यंत सढळ असत.

दादा गाढे विद्वान् किंवा व्युत्पन्न पंडित नसले तरी पुराण सांगण्याची त्यांची शैली इतकी गोड व आकर्षक असे कीं तुळशीबागेंतील दत्ताचे देवळांत त्यांचें पुराण ऐकायला श्रोत्यांची झुम्मड पडे. विशेषतः दशहारांत वाचावयाची गंगालहरी तर ते इतक्या सुरेलपणें, सहृदयतेनें व तन्मयतेनें वाचीत कीं सर्व श्रोते अगदीं रंगून जात. सत्यनारायणाची कथा सांगण्यांत तर त्यांचा हातखंडा असे. एकेका दिवशीं दोन–दोन तीन–तीन आमंत्रणें त्यांना येत; आणि तितक्याच सहजतेनें ते तीं पार पाडीत. गंधर्व नाटक मंडळींतला सत्यनारायण तर दादांवांचून कधीं झालाच नाहीं. त्यांच्या गोड गळ्यावर व सुरेल सांगण्यावर ' गंधर्वां 'सकट सर्व नट अत्यंत खूष असत.

दादा मोठे रसिक व गाण्याबजावण्याचे शौकीन होते. दिवसाचे सर्व उद्योग आटोपल्यावर कितीहि रात्र होवो, ते रामेश्वरासमोरील साठ्यांचे वाड्यांत शंकरबुवा अष्टेकर यांचेकडे गुरुवारचे गाण्याला हटकून हजर असत. त्या वेळीं शंकरबुवांचें घर कलावंतांचें व गुणीजनांचें एक माहेरघर बनलें होतें. भास्करबुवा बखले, बालगंधर्व, कृष्णा मास्तर, कै. जगन्नाथबुवा पंढरपूरकर, कधीं कधीं गोविंदराव टेंबे, गुंडोपंत वालावलकर, सुंदराबाई, वजीरबाई, शंकरभय्या, ग्यानबाराजे गुरव अशांसारखे गवय्ये व पखवय्ये तेथें सतत जमत व गाण्याच्या मैफली रंगत. दादा तेथले एक कायमचे श्रोते बनले होते. माझा गळा त्यांच्यासारखाच गोड असून मलाहि गाणीं–बजावणीं ऐकण्याची चटक लागली होती व म्हणून ते मलाहि आपल्याबरोबर अधून–मधून तेथें घेऊन जात. योग्य ठिकाणीं मार्मिकपणें मान हलवून किंवा तोंडानें ' बहोत खाशीं ' अशी शाबासकी देऊन ते कलावंतांना उत्तेजन देत. शिवाय अधूनमधून थट्टा–विनोद करून किंवा प्रसंगीं विडे वगैरे तयार करून देऊन ते गायकाला प्रसन्न राखीत. या सर्वांमुळें दादा सर्वांना हवेहवेसे वाटत.

दादा बाबांच्या प्रमाणेंच अत्यंत कामसू व कष्टाळू असून त्यांचेपेक्षांहि जास्त स्वच्छ, व्यवस्थित व चटचटीत असत. कसलाहि घोळ किंवा गोंधळ चालीत नसत. म्हणून त्यांचे[1] यजमान त्यांच्यावर नेहमीं खूष असत. पुराणिकाच्या धंद्याप्रमाणेंच त्यांची भिक्षुकीहि चांगली चाले.

दादा दिसायला मोठे देखणे व शरीरानें सुडौल होते. त्यांचा पोषाख स्वच्छ, विविध तऱ्हेचा, नीटनेटका व व्यवस्थितपणें केलेला असे. नेसा-पांघरायचीं धोतरें ते स्वतः सदाशिव पेठेच्या हौदावर धूत व त्यामुळें त्यांवर एक प्रकारची गुलाबी झांक आलेली दिसे. ते फुलांचे व अत्तरांचे भोक्ते असून पुराणाचे वेळीं गळ्यांत पडलेल्या माळांचा व कपाळाला लावलेल्या बुक्क्याचा नाजूक सुवास त्यांच्या कपड्यांना येई. ते लोकांच्या उपयोगी पडत व पडेल तें काम आनंदानें करीत.

दादांची ही उपयुक्तता व इतर गुणवत्ता उतार वयापर्यंत टिकून राहिली. पण जसजसें म्हातारपण येऊं लागलें व प्रापंचिक अडचणी भेडसावूं लागल्या, तसतशी त्यांची शारीरिक व मानसिक स्थिति पालटूं लागली. त्यांचा कामसूपणा कमी होऊं लागला, थट्टा-विनोद दुर्मीळ झाला, व आनंद मावळला. उतारपणीं केलेलें कुटुंबहि (सीताबाई) तांब्याभर पाणी देण्यास अखेरपर्यंत उरलें नाहीं. विश्रांति व शांति मिळावी म्हणून श्री. नानल वैद्यांच्या सल्ल्यावरून दादांना ताराचंद रामनाथ इस्पितळांत ठेवलें होतें. त्यांची शुश्रूषा करण्यासाठीं म्हणून वहिनी तेथें गेल्या ! पण दोन-तीन दिवसांच्या तापानें त्याच तेथें वारल्या !

वहिनींना अहेवपणीं मरण आलें हें त्यांच्या जीवाचें सोनें झालें असें शोकसमाचाराला आलेला त्यांचा एक मित्र म्हणाला असतां दादा एकदम उद्गारले; " हो, तिचें सोनें झालें खरें, पण माझी मात्र चांदी उडाली " ! आणि तें खरेंच होतें. वहिनी दादांच्या मागून जात्या तर दादांची अशी स्थिति होतीना. कारण त्या मोठ्या धोरणी, प्रेमळ व अबोल असून दादांवर त्यांचें वजन असे. त्यांना व इतरांना त्यांनीं सारखेंच संभाळून घेतलें असतें.

---

१ ज्या गृहस्थांच्या घरचें हव्यकव्य भिक्षुक लोक दक्षणा घेऊन करतात त्यांना 'यजमान' म्हणतात.

दादांना दोन मुलगे. पण थोरला—यशवंत ऊर्फ तात्या-नोकरीनिमित्त दूर दूर तर धाकटा—सदाशिव ऊर्फ बापू—अगदींच लहान. म्हणून करायला सत्तेचें असें कोणीच जवळ नसे. आतांपर्यंत सबंध संसार स्वतः करण्याची संवय लागलेली, पण अंगांत त्राण व मनांत धमक न उरल्यानें परावलंबन आलेलें. शक्ति कमी कमी होत होती. तर रोग जास्तजास्तच बळावत होता. एक अन् दोन हजार तऱ्हांनीं त्यांना वार्धक्याचा त्रास होऊं लागला.

वास्तविक पहातां हें सर्व सहाजिकपणेंच घडत नव्हतें का? म्हातारपण, रोगग्रस्तता व एकाकिता—ही परिस्थितीच अशी आहे कीं स्वतः त्या व्यक्तीला व जवळच्यांना कांहीं ना कांहीं त्रास होणें अगदीं अपरिहार्य आहे. दोष कोणाचाच नाहीं; शिक्षा मात्र सर्वांना. अशा परिस्थितींत जराहि जीवनाला वरदान नसून एक शापच आहे असें वाटूं लागतें. कोणाच्याहि काय, इतक्या चांगल्या गतकाळाची परिणति अशा अवस्थेंत होऊं नये.

दादांना माझा दुसरा विवाह आवडला नाहीं; कारण तो सप्रवर व म्हणून शास्त्रनिषिद्ध होता. नेहमीं आपल्या आज्ञेप्रमाणें चालणारा ‘ नातू ’ असल्या महत्वाच्या बाबतींत आपली इच्छा व आज्ञा मोडायला धजला—हें शल्य, मला वाटतें, त्यांना सर्वांत जास्त जाणवलें.

दादांचा माझ्यावर इतका राग, पण मजा अशी कीं माझ्या पत्नीवर त्यांचा अति विश्वास. तिच्याशीं त्यांची वागणूक अत्यंत सरळ व प्रेमळ असे. आपल्या भावजईनें आपल्या थोरल्या मुलाला विद्याभ्यासाकरितां आपल्याबरोबर बडोद्यास नेलें होतें याचें दादांना अतिशय कौतुक वाटे. मी मात्र त्यांच्या लोभाला कायमचा अंतरलों !

बरींच वर्षें अशा रुग्णावस्थेंत काढून शेवटीं हवा पालटण्यासाठीं म्हणून दादा कोंकणांत—वेळासला—आपल्या सासूरवाडीं गेले. पण तेथें बरें वाटण्याऐवजीं आजार वाढतच गेला. प्रकृति अत्यवस्थ असल्याची तार आली. मी व तात्या मोटारनें महाडला निघालों. वाटेंत मोटार तीनदां पंक्चर झाल्यानें संध्याकाळीं पोहोचण्याऐवजीं रात्रीं बारा वाजतां दासगांवला पोहोंचलों. स्पेशल मचवा काढून पूर्णिमेच्या चांदण्यांत आम्ही दोघेंच वेळासला निघालों. एरवीं या गोष्टीचा किती आनंद झाला असता ! पण हा प्रसंग निराळा होता.

सकाळीं बाणकोटला उतरून वेळासला जातांना वाटेंत किनाऱ्यावर राखेनें भरलेला एक खड्डा दिसला. पोटांत धस्स झालें! दादा आदल्याच रात्रीं शांत व शीतल किनाऱ्यावर पूर्णिमेलगतच्या चांदण्यांत सुखानें गाढ झोपीं गेले होते!

अशाप्रकारें त्यांना भेटावयास म्हणून गेलों तो त्यांच्या अस्थी गोळा करून व 'दादा, झालें गेलें सर्व विसरून जा, आणि शांत अंतःकरणानें देवाघरीं चला', असें म्हणून परत आलों! मी एका प्रेमळ आत्म्याला, माझें पुत्रवत् पालन-पोषण करणाऱ्या माझ्या भावाला कायमचा अंतरलों!

**अण्णा**:—माझे दुसरे बंधू—अण्णा—यांची सर्वच गोष्ट दादांपेक्षां निराळी होती. लहानपणीं रोगिष्टपणामुळें त्यांचें कोणतेंच शिक्षण पुरें, सलग व निर्वेध झालें नाहीं. पुण्यांत 'खडका' वर असलेल्या व्ही. जे. टी. स्कूलमध्यें सुतारकाम, शिवणकाम, चित्रकला इ. विषय शिकण्याचे थोडे-फार प्रयत्न झाले, पण कसलेंच शिक्षण पुरें झालें नाहीं.

कांहींच जमेना, तेव्हां ते रविवार पेठेंतील बोहरे आळींत एका मणेरी सामानाचे दुकानीं एका मारवाड्याकडे नोकरीस राहिले. सकाळीं दुकान उघडून तें साफसूफ करण्यापासून तों तें बंद करून किल्ल्या मालकाच्या हवालीं करून घरीं परत येईतों रात्रीचे नऊ वाजून जात. नंतर कसे तरी चार घांस खाऊन दिवसभराच्या श्रमानें दमल्यामुळें लगेच झोपीं जात. अर्थात् कांहीं वाचन-चिंतन किंवा दुसरी कांहीं करमणूक करण्याला वेळच उरत नसे. अशा प्रकारच्या एका ठराविक चाकोरीच्या दिनचर्येंत बहुतेक जन्म गेल्यामुळें त्यांच्या जीवनाला दुसरी कांहीं बाजूच राहिली नव्हती.

कमाई बेताची, मनावर मारवाडी रहाणीचे संस्कार झालेले; सोलापुरी चेकचा कोट, आणि तांबडा जरीकांठी रुमाल हे कांहीं कधीं अंगावरून हलले नाहींत. बरं, फार मितव्ययी किंवा चिक्कू म्हणावेत तर तसें नाहीं. मी बी. ए. च्या वर्गांत गेल्याबरोबर त्यांनीं मला सायकल बक्षीस दिली आणि पुढें खामगांवास नोकरीवर जातांना त्यांनीं मला त्या काळीं अत्यंत महाग असलेल्या काळ्या सर्जचा लोकरी कोट करविला व तीन रुपयांची हंगेरीअन् कॅप घेऊन दिली. वीस वर्षांच्या नोकरींत त्यांना वीस रुपयांपेक्षां जास्त पगार झाला नसावा. पाठीमागें दादांचा आधार होता म्हणून आट-

दहा माणसांचा प्रपंच त्यांना उत्तम प्रकारें करतां आला. कांहीं कर्जवाम करावें लागलें नाहीं हेंच विशेष.

शेवटीं शेवटीं त्यांनीं स्वतःचें दुकान काढलें, पण तें तेजींत चालत नसे. मारवाडी, गुजराथी, बोहरी अशांसारख्या पिढीजाद व पैसेवाल्या व्यापाऱ्यांनीं सबंध बोहरे आळी व्यापली असतांना त्यांच्याशीं सामना देऊन एका सामान्य ब्राह्मणानें चाळीस-पन्नास वर्षें आपलें दुकान जिवंत ठेवलें हीच फार मोठी करामत अण्णांनीं करून दाखविली, असें मी म्हणेन. तें त्यांचें दुकान त्यांचा मुलगा—भाऊ—कालमानानुरूप नवीन नवीन उपक्रम करून आतां उत्तम प्रकारें चालवीत आहे.

अण्णा दादांच्या मागें दोन वर्षें म्हणजे १९५० पर्यंत जगले. शेवटीं शेवटीं इतर रोगांतच इसबाची भर पडून ते जास्तच बेजार झाले. त्यांचा माझ्यावर फार लोभ असे. शेवटच्या दुखण्यांत त्यांनीं माझा ध्यास घेतला होता. मी बडोद्याहून त्यांना भेटावयास गेलों तेव्हां त्यांना समाधान झालेलें दिसलें; पण हें समाधान फार काळचें नव्हतें; ते त्याच दिवशीं रात्री दिवंगत झाले !

अण्णांच्या पत्नी म्हणजे माझ्या वहिनी—यमुनाबाई—देवाच्या दयेनें व मुलांच्या नशीबानें अद्याप हयात असून मुलाबाळांचें सर्व पहात आहेत. माझ्यावर व विशेषतः माझ्या मुलीवर माझ्या दोघी भावजयांचा अति लोभ होता याची जाणीव मला आहे. पण त्या दृष्टीनें माझ्या हातून फारसें कांहीं होत नसल्यानें त्या नुसत्या जाणीवेचा उपयोग काय ? यमुना-वहिनींसंबंधीं पुढें आणखी येणार असल्यानें आतांच आणखी कांहीं नको.

**चिंगुताई:**—चिंगुताईंत व माझ्यांत अंतर अवघ्या तीन वर्षांचें, आणि म्हणून सर्व बहिणींपेक्षां मी चिंगुताईचे सहवासांत जास्त काळ राहिलों. लहानपणापासून ती आम्हां मुलांत खेळे, रमे, बागडे व ऐकून-ऐकून शिकेहि. संध्या, पुरुषसूक्त, अथर्वशीर्ष, वगैरे जें जें मला बाबांनीं मुद्दाम शिकविलें तें तें ती काम करतांना ऐकून—ऐकून लक्षांत ठेवी, व माझ्या चुका काढी—इतकी तीव्र स्मरणशक्ति तिची होती.

तिनें पर्वतीच्या शाळेमध्यें माझ्याबरोबर पहिल्या दोन इयत्ता केल्या होत्या. भातुकलीच्या खेळांत ती शेजारच्या एका वात्रट मुलाची बायको

व्हावयाची याचा मला हेवा वाटे. कारण आमच्या नशीबीं मात्र एक वेंधळी मुलगी यावयाची ! सर्व बहिणींत ती रूपानें सुरेख व बुद्धीनें तल्लख होती. ती फार उफाड्याची असल्यानें बाराव्या वर्षीच तिला कोंकणांतल्या एका श्रीमंत वाडीवाल्या बिजवरानें मागणी घातली; आणि ती बाबा, दादा वगैरेंनीं मान्य केली. हा वाडीवाला बिजवर म्हणजेच श्रीवर्धनशेजारीं असलेल्या दिवें–अगरचे जमीनदार विष्णुपंत–ऊर्फ बाबा अवळसकर हे होत.

बाबा अवळसकर मोठे करडे व कर्तबगार गृहस्थ होते. त्यांनीं मोजणी-दाराची सरकारी नोकरी सोडून देऊन घरींच शेती-भाती करण्याचें ठरविलें, व वडिलांपासून विभक्त होऊन स्वतःचा निराळा संसार थाटला. त्यांचीं बाळबोध, मोडी व इंग्रजी–हीं तिन्हीं अक्षरें फार सुरेख होतीं. विशेषतः मोडी अक्षर तर इतकें चांगलें होतें कीं, मी तें सारखें घटवीत असें. इंदूर, गुजराथ, धारवाड वगैरे ठिकाणीं ते नोकरीनिमित्त बराच काळ राहिल्या-मुळें हिंदी, गुजराथी व कानडी अशा विविध भाषा त्यांना येत असत. ते तल्लख बुद्धीचे व हिशेब ठेवण्यांत तरबेज होते. ‘ उत्कृष्ट मॅनेजर ’ असें सर्टिफिकेट मीं त्यांना मनांतल्या मनांत कितीतरी वेळां दिलेलें आहे.

गडीमाणसांकडून गोड बोलून काम करून घेण्यांत त्यांचा हातखंडा असे. दारच्या गड्याला सकाळीं सात वाजतां ओरडून जागा करण्याऐवजीं ते पहांटे पांच वाजतांच त्याला मोठी गोड हांक मारतील व ‘ कंटाळा आला असल्यास लुटक हो आणखी थोडा वेळ ’ असें हंसत हंसत सांगतील. गडी खूष होऊन आणखी जरा निजतो आहे तोंच ते त्याला पुन्हां उठवतील व साताच्याऐवजीं सहालाच कामाला लावतील.

कांहीं काम सांगायचें झाल्यास ते एकदम सांगणार नाहींत; तर ‘ रामा रे, ओ रामा, न्याहरी कर लक्कन्, अन् मग बैल जोड. का अगोदरच बैल जोडून मग सावकाश न्याहरी करतोस ? ’ असें विचारल्यासारखें करून तें काम न्याहरीपूर्वीच त्याच्याकडून करवून घेतील.

मी आवडत्या कुटुंबाचा आवडता भाऊ, म्हणून त्यांचा माझ्यावरहि अति लोभ होता. इंग्रजी सातवींत मी माझें नू. म. विद्यालय सोडून जंजिरा हायस्कूलमध्यें गेलों. याला कारण पुण्यांतील प्लेग हें तर होतेंच; पण विशेष म्हणजे बाबांचा माझ्यावरील लोभ हें होय.

बाबांच्या मूळ घरांत भाऊबंदकी फार होती—कोंकणांतील बहुतेक मोठ्या कुटुंबांत ती असेच—भावांविरुद्धच नव्हे, तर खुद्द वृद्ध वडिलांविरुद्धहि त्यांचे दावे कोर्टांत चालू असत; व 'शेंडी तुटो वा पारंबी तुटो' अशा जिद्दीनें ते ते दावे लढवीत. त्यामुळें बाबांना दिवाणी कायद्याचें ज्ञान इतकें झालें होतें कीं, त्यांनीं वकिलाचा सल्ला घेण्याऐवजीं वकीलच त्यांचा सल्ला घेत असे. येवढ्या तल्लख बुद्धिमत्तेचा उपयोग अशा प्रकारें भांडणें भांडण्यांत होत असलेला पाहून मला वाईट वाटे; पण उपाय काय? 'स्वभावो दुरतिक्रमः'

बाबा राष्ट्रीय बाण्याचे टिळकभक्त होते. केसरीच्या अगदीं सुरुवातीच्या वर्गणीदारांमध्यें त्यांचा दुसरा क्रम असे. त्यांच्या घरीं भिंतीवरून टांगलेल्या फळ्यांवर केसरीचे सुरुवातीपासूनचे सर्व अंक वर्षोवर्षांच्या फायली बांधून ठेवलेले असत. 'काळ' पत्र व 'केरळ कोकीळ' मासिकाचे बरेचसे जुने अंक यांचेहि गठ्ठे फळ्यांवर असत. पुढें जंजिऱ्याच्या हायस्कुलांत शिकत असतांना शनिवारीं-रविवारीं, किंवा दुसऱ्या मोठ्या सुट्ट्यांत मी जंजिऱ्याच्या शाळेंतून अगरांत घरीं येईं तेव्हां हे सर्व अंक अधून-मधून चाळीत असें. केसरीचे देशाभिमानपोषक विचार व त्यांची सडेतोड भाषा, काळांतल्या ऐतिहासिक गोष्टी, त्यांतील कल्पनाविलास व कोटिक्रम, आणि केरळकोकिळाची मार्मिक व मर्मभेदक टीकापद्धति यांचा माझ्या मनावर त्या काळीं फार परिणाम झाला होता. अर्थात् तें वयहि तसेंच संस्कारक्षम होतें.

बाबांच्या टिळकभक्तीचें दुसरें एक उदाहरण सांगण्यासारखें आहे. ते दरवर्षीं उत्तमोत्तम श्रीवर्धनी रोठ्यांचा एक मोटा थैला लोकमान्यांना भेट म्हणून पाठवीत, आणि त्यांच्या राष्ट्रीय कार्याला ते मधून-मधून पैशाचीहि चांगली मदत करीत.

माझ्या मुरूडच्या मुक्कामाचा सबंध खर्च बाबांनीं स्वतः सोसला. हा त्यांचा माझ्यावर मोठाच उपकार झाला. या त्यांच्या उपकाराची अंशतः फेड करण्यासाठीं मीहि पुढें त्यांच्या थोरल्या मुलाला—शांतारामाला—अकोल्यास माझ्यापाशीं कांहीं दिवस ठेवून त्याचें शिक्षण केलें.

चिंगुताई आपल्या पतीच्या तालमींत चांगलीच तयार झाली आहे. पहिल्यापासून ती घरांतलें सर्व पहातेच आहे; पण पतीच्या पश्चात् व मुलगे

करण्याइतके मोठे होईतों तिनें सर्व कारभार सुरळीत चालविला. गुणांरूपां-प्रमाणें देवानें तिला संततीहि पुष्कळ दिली आहे. खरें सांगू का ? मला नक्की आंकडा आठवत नाहीं, पण कांहींतरी बारा-तेरा मुलें तरी असावींत. 'अष्टपुत्रा सौभाग्यवति भव' या वडीलधाऱ्या व्यक्तींनीं दिलेल्या आशीर्वादांतील पहिला भाग तरी बराचसा खरा ठरला आहे.

हे सहाहि चिरंजीव एकजात कर्तृत्ववान् असून आपापले संसार चांगल्या प्रकारें करीत आहेत. लहानपणीं माझेपाशीं शिकावयाला असलेला थोरला मुलगा—शांताराम—इतिहास संशोधक बनला असून त्याचें संशोधन सर्वमान्य झालें आहे. चिंगुताई पंचाहत्तराच्या जवळ जवळ आली असली तरी अद्याप खडखडीत असून सुना-लेकींचीं बाळंतपणें करीत व नातवंडांना उद्योग पुरवून त्यांचीं भांडणें मिटवीत सुखानें कालक्रमणा करीत आहे. तिचें घर म्हणजे एक मॅटर्निटि होम व नर्सरी स्कूल होऊन राहिलें आहे. मला आतां ती एकटी बहीण व मी तिला एकटा भाऊ हा विचार मनांत आला म्हणजे हृदय अस्वस्थ होतें.

भावा-बहिणींच्या प्रेमाच्या बाबतींत मी अत्यंत भाग्यवान् आहें यांत शंका नाहीं. त्यांचे माझ्या जीवनावर चिरकालीन संस्कार झाले आहेत हें मी विसरणें शक्य नाहीं.

माझे दोघे बंधु दादा—अण्णा अगोदरच दिवंगत झाले आहेत. चिंगुताई तरी दिर्घायुषी होऊन आम्हां सर्वांच्या सुखांत भर घालो म्हणजे झालें.

# माझें बालपण : : : ४

'बालपण' हें बोलून चालून 'बालपण'; त्यांत मोठ्या घटना किंवा विशेष सांगण्यासारख्या गोष्टी त्या काय असणार असें मोठ्या माणसांना वाटणें साहजिक आहे. पण त्या खुद्द मला त्या वेळीं अतिशय महत्त्वाच्या वाटल्या होत्या, आणि त्यांपैकीं कांहीं तर अजूनहि तशा वाटतात.

मी भाद्रपद वद्य प्रतिपदा, शके १८१२ या दिवशीं जन्माला आलों असें माझी पत्रिका सांगते. मूल अगदीं लहान असतांनाच त्याची पत्रिका करण्याची चाल त्या काळीं सर्रास होती. माझ्या बाबांनीं माझी केवढी लांबलचक पत्रिका करून घेतली आहे ! तिच्या घड्या उलगडल्या तर ती चांगली पंधरा-वीस फूट लांब भरेल !

जेव्हां जेव्हां मी माझी पत्रिका वाचतों तेव्हां तेव्हां मला मोठी मजा वाटते. 'विद्वान,' 'संपत्तिमान,' 'अधिकारी,' 'कलाभिज्ञ,' 'रसिक' 'लेखक' इ. होण्याचें माझ्या भाग्यांत आहे हें वाचलें म्हणजे मला आनंदाबरोबर आश्चर्यहि वाटतें; आणि पत्रिका, फलज्योतिष वगैरे सर्व खोटें व काल्पनिक असलें पाहिजे असें वाटूं लागतें. कारण, पत्रिकेंत वर्णिलेल्या गुणांपैकीं माझ्या ठिकाणीं फार थोडे व तेहि फार थोड्या प्रमाणांत आहेत.

पण, पंचविसाव्या वर्षापासून 'परग्रामे उदय', पंचावन्नाव्यापुढें 'अल्प धनलाभ,' 'मित्रसुखमुत्तमम्,' व शेवटीं ६५ वर्षापासून 'त्वचारोग !' असें जेव्हां वाचतों तेव्हां हें भविष्य मनाला पटतें; व भीति वाटूं लागून मी ती पत्रिका कांहीं वेळ गुंडाळून ठेवतों. पण चैन न पडून मी ती पुन्हां उलगडतों आणि वाचूं लागतों. तोंडानें मात्र म्हणत असतों कीं, ज्योतिष कांहीं खरें नाहीं !

पुण्याच्या शुक्रवार पेठेंत मंडईच्या पिछाडीला शिधयांच्या वाड्यांत माझा जन्म झाला. जन्मानंतरचीं ५-६ वर्षें तेथें काढून आम्ही पर्वती गांवीं राहण्यास गेलों होतों. या काळांत खाणें-पिणें, रांगणें, कोणीं " उभाबाई " म्हटलें कीं उभें राहणें, व " चाल चाल माते, पायीं मोडले कांटे " असें म्हटलें कीं, पावलें टाकणें, मध्येंच झोक जाऊन बुदकन् आपटणें, तोंडानें ' बाऽऽबा ' ' दाऽऽदा असें म्हणणें इत्यादि सर्वसामान्य कृतींपेक्षां दुसऱ्या कोणत्या कृति माझ्या हातून घडल्या असणार ?

चांगलें चालायला व थोडें-फार धांवायला येऊं लागतांच मला पाय फुटले व मी रस्त्यांतून धांवूं-पळूं लागलों. माझा शेजारचा बालमित्र बाळ कात्रे हा माझ्यापेक्षां वयानें जरा मोठा व जास्त बळकट होता. त्याच्या घरच्या गाईला एक खोंड व एक कालवड होती. खोंड रंगानें बांडा व कालवड तांबडी असल्यामुळें त्यांस ' बंड्या ' व ' तांबू ' म्हणत. आम्ही दोघे रोज संध्याकाळीं बंड्या व तांबू यांना घेऊन त्यांना त्या सबंध आळीभर धावडवून आणीत असूं. त्या काळीं आळींतलीं कितीतरी मुलें आपआपल्या घरच्या वांसरांना घेऊन हाच खेळ खेळत असत.

वांसरांना पळवून आणतांना त्या आळींतलीं सर्व घरें, त्यांतील सर्व माणसें व प्राणी माझ्या ओळखीचे झाले होते. शिधयांच्या घरापासून पश्चिमेकडे थेट [1] जाईच्या गेटाजवळच्या पानवाल्या भिड्यांच्या वाड्या-पर्यंतचा सर्व टापू तेव्हांपासून माझ्या जीवनाशीं निगडित झाला आहे. भिडे (आणि त्यांच्या ओटीवरील केळीच्या पानांचे भारे व चौकांत अगदीं ओणव्यानें चालणाऱ्या म्हाताऱ्या आऊताई, ) सोमण ( व त्यांच्या दरवाजांत बांधलेलें पांढरें कुलुंगी कुत्रें ), बर्वे ( व त्यांचेकडील घोडे व माकड ), कात्रे ( व त्यांच्या ओसरीवर बांधलेली ती थोराड, तांबडी सोरटी गाय ), डॉ. गर्दे ( व त्यांच्या तबेल्यांतील तो मोठा घोडा व [2]चारचाकी फैटण ) अशीं कितीतरी घरें, त्यांतील माणसें व वरच्यासारखे पाळीव प्राणी मला अजूनहि अगदीं परिचित व जवळच्यासारखीं वाटतात. यांपैकीं बहुतेक माणसें

१. काळ्या वावराचे तोंडाशींच तिकडच्या बंदोबस्तासाठीं एक पोलीस-चौकी होती. तिच्यावर जाईचे वेल होते.

२. याच चारचाकींतून डॉ. गर्दे व लोकमान्य टिळक बसून जात येत असत.

व प्राणी आतां काळाच्या पडद्याआड गेलीं असून अदृश्य झालेलीं असणार, कदाचित् कांहीं कांहीं घरांचीं नामरूपेंहि बदललेलीं असणार; पण या गोष्टींचें भान न उरतां तीं माणसें व ते प्राणी पुन्हां पूर्वीसारखीं आपल्या जागीं दिसतील अशा आशाळभूत नजरेनें मी जातां–येतां तिकडे पहात असतों !

थोड्याच दिवसांत आम्ही शिधयांचें भाड्याचें घर सोडून पर्वतीला स्वतःच्या घरीं गेलों. स्वतःच्या मालकीच्या घरीं जावयाचें म्हणून एकीकडे आनंद होत होता, तर माझा मित्र बाळ कात्रे याला सोडून जावयाचें म्हणून वाईट वाटत होतें. मी ज्या दिवशीं पर्वतीला जावयाला निघालों त्या दिवशीं बाळनें मला जेवायला बोलावलें, व यापुढें मला कोण 'मैत्र मिळेल' असें गहिंवरून विचारलें. मलाहि तोच प्रश्न पडला होता. अन् नुसत्या बाळलाच नव्हे तर त्याच्या बंड्याला व माझ्या तांबूलाहि मी कायमचा दुरावणार होतों. माझें पर्वतीला कसें होणार कोण जाणे ?

पण काळानें फार दिवस मला या चिंतेंत ठेवलें नाहीं. बाळ दुरावला तर त्याची जागा आतां लक्षुमण, चिंतु, पाण्या व मारत्या अशा चौघांनीं भरून काढली. लक्षुमण आणि मी घरांतल्या अंगणांत ठिकऱ्या खेळत असूं. तो लंगडी फार चांगली घालीत असे. सातव्या टाळीच्या घरांतून तो डाव्या पायाच्या अंगठ्यानें अशा कांहीं जोरानें ठिकरी मारी कीं, ती थेट पहिल्या घरापुढें जाऊन पडे. त्याच्या अंगठ्याला नेहमीं एक मळकट चिंधी बांधलेली असे. त्याच्या नाकाकडेहि कोणी पाहूं नये. सदा 'सू-सू' चाललेलें असे. तो आणि मी पत्त्याचा साधा डाव किंवा चित्रांचें लाडीस खेळत असूं. तो माझ्या हातांतील पानें नेमकीं ओळखीं तेव्हां मला त्याच्या बुद्धिमत्तेचें मोठें कौतुक वाटे.

दुसरा चिंतू. तो व मी क्रिकेट खेळत असूं. त्यांतल्या त्यांत एखादा वाटोळा दगड घेऊन त्याचा चेंडू, घरांतल्या रिफाडाची एक फळी घेऊन त्याची 'ब्याट' व एक फुटका डबा घेऊन त्याच्या 'स्टंपा' असा आमचा सेट होता. चिंतू [1]'इराशा' व मी मेजर [2]'ग्रेग्' होई;

---

१. हा अत्यंत फास्ट बोलर असल्याचें बोललें जात होतें.

२. हा युरोपिअन् टीममधील उत्कृष्ट फलंदाज व तिचा कॅप्टन असे.

आणि शाळेजवळील सपाट जागेवरच्या [1] ‘ युरोपिअन् ’ जिमखान्यावर आमचा सामना होई. अर्थात् इराद्याचें ग्रेग् पुढें कांहींच चालत नसे. ग्रेग् किंचित् लंगडत असल्याचें दिसे म्हणून मीहि त्याच्यासारखा धावा काढतांना किंचित् लंगडत धावें.

चिंतू उर्फ चिंतामण गणेश देव हे पुढें फॉरेस्ट खात्यांत कारकून म्हणून लागले, व ठराविक नोकरी करून ते आतां निवृत्त झाले आहेत. त्यांची पत्नी अकालीं निधन पावल्यानें दोघां लहान मुलांची सर्व जबाबदारी त्यांचेवरच पडली. मुलांचीं एकूणएक कामें ( न्हाणूं घालणें, वेणीफणी करणें इ. ) ते एखाद्या वत्सल माउलीप्रमाणें आनंदानें करीत. तीं दोन्हीं मुलें आतां मोठेपणीं आपापल्या मार्गाला लागलीं असून चिंतोपंत आतां ‘ हरि हरि ’ करीत स्वस्थ बसलेले असतात. पतीच्या पश्चात् प्रपंच उत्तम प्रकारें करणाऱ्या विधवा पुष्कळ दिसतात; पण पत्नीच्या मागें कुटुंबाचा सर्व बोजा—विशेषतः मुलाबाळांचा रगाडा–हंसतमुखानें स्वीकारणारे विधुर सहसा आढळत नाहींत.

माझे दुसरे खेळगडी–पाप्या व मारत्या. पाप्या मुसुलमान होता, तर मारत्या न्हावी जातीचा होता. पाप्या व मी तालमींत कुस्ती खेळत असूं. बहुधा तोच मला पाडी, पण एकदां मात्र मीं त्याला पाडलें; व त्याच्या छातीवर बसलों. तेव्हां भोंवतालच्या बच्यांनीं ‘ यंव् रे पठ्ठा शिवाजी ! अफझुल्याला चांगलं मातींत लोळवलंस ! ’ अशी शाबासकी दिली. पण या त्यांच्या शाबासकीनें मला आनंद झाला नाहीं, व पाप्याहि चिडला किंवा रागावला नाहीं. उलट तो उठला व खिलाडू वृत्तीनें माझ्याशीं हातमिळवणी करून तो निघून गेला. बचे मात्र शरमलेले दिसले.

मारत्या मोठा सालस होता. तो नुकताच हजामती करूं लागला होता. तो मला नेहमीं म्हणे, “ नानू, तूं मोठा झालास कीं हितेंच रहा. मी तुझी छान हजामत करीत जाईन.” मी मोठाचसा काय, अगदीं म्हाताराहि झालों आहे. मारत्या मात्र लवकरच गेला.

१. कौन्सिल हॉल शेजारचें सुंदर क्रीडांगण. हल्लीं त्याला पूना जिमखाना म्हणतात. त्याच्या टॉवरवरील घड्याळ दाते म्हणून हिंदूकडील एक फलंदाज होता त्यानें आपल्या भीमटोल्यानें फोडलें होतें असें आमच्या ऐकण्यांत होतें.

विटीदांडू खेळण्यांत आम्ही चौघेजण अगदीं रंगून जात असूं.

हा विटीदांडूचा खेळ पर्वतीच्या [१]रमण्यांत चाले. त्याचीं पडकीं भिंताडें पर्वतीच्या पायऱ्यांच्या दोन्ही बाजूंस मधून मधून अद्याप दृष्टीस पडतात. हा सर्व भाग अगदीं रुक्ष व शुष्क असून त्यांत फड्या निवडुंगाचीं उंच उंच बेटें जिकडे तिकडे वाढलेलीं असत. त्यांतच आम्ही मुलें इंग्रज–पेशव्यांच्या लढायाहि खेळत असूं. निवडुंगाचीं लाल बोंडें हीं जणूं इंग्रजांचीं लाल तोंडें, व तीं दगडांनीं उडवून त्यांचा लाल रंग खालीं गळला म्हणजे इंग्रज जखमी होऊन त्यांच्या रक्ताचें स्नान प्रिय भारतमातेला झालें अशी आमची त्या वेळची कल्पना !

त्या वेळचा आमचा आणखी एक खेळ म्हणजे झोका. तो खेळ नागपंचमीच्या आसपास महिना-महिना चाले. तालमीपुढें एका लांकडी चौकटीला एक मोठा दोर—मधोमध पाय ठेवायला आडवें उंच लाकूड असलेला —बांधलेला असे. समोरच्या बाजूला कांहीं अंतरावर एक उंच बांबू उभा करून त्याच्या टोंकाला एक खोबऱ्याची वाटी लटकावलेली असे. झोका घेणारानें झोका उंच-उंच चढवून ती खोबऱ्याची वाटी दांतांनीं तोडली कीं, पाहणारे टाळ्या वाजवीत. अर्थात् हें काम मोठ्या लोकांचें असे. आमच्यासारख्या पोरांसोरांचें नसे. पण आमची धडपड मात्र एक दिवस ती वाटी तोडण्यासाठीं असे.

आमच्या काळचा एक मोठा पुरुषी सण म्हणजे शिमगा. ‘होळीला लांकडें पांच पांच’ असें डफ, कुडमुडीं, डबडीं इत्यादींच्या तालावर व बोंबांच्या सुरावर ओरडत आम्ही मुलें प्रत्येक घरीं जाऊन तेथून गवऱ्या व लांकडें गोळा करीत असूं. कोणीं न दिल्यास त्याच्या नांवाचा उद्धार करीत वाद्यांच्या गजरांत पुढें जात असूं. रात्रीं-अपरात्रीं लाकडें, गवऱ्या व इतर जळाऊ पदार्थांच्या चोऱ्या करीत असूं. मुलांमधील कवित्व व कल्पनाविलास अचकट-विचकट उखाण्यांच्या रूपानें व्यक्त होत.

---

१. दर वर्षी श्रावणांत देशोदेशींहून येणाऱ्या विद्वान्, वैदिक, शास्त्री–पंडित, वगैरेंस पेशवे जेथें दक्षणा वाटीत तीच ही बंदिस्त जागा.

धुळवडीच्या दिवशीं धूळ व चिखल आणि रंगपंचमीला रंग यांचें जाणारा-येणारास सचैल स्नान घालण्यांत येई. स्वतःहि करीत असूं.

थोडक्यांत म्हणजे ज्या ज्या गोष्टी हल्लीं कायद्यानें मना केलेल्या आहेत त्या सर्व आम्ही मोठ्या धार्मिक भावनेनें व राजरोसपणें करून पुण्य संपादन करीत असूं. कौतुकाची गोष्ट अशी कीं, शिमग्याच्या दिवसांत लहान-मोठा, उच्च-नीच, गरीब-श्रीमंत असले सर्व कृत्रिम भेदभाव नाहींसे होत व सर्वजण एका समपातळीवर येत. आमच्याच घरचें पहाना! इतर वेळीं बाबांचा आम्हां मुलांना केवढा मोठा दरारा व भीति. पण शिमग्यांत तेहि आपली वडीलकी विसरून आम्हां मुलांशीं खेळत, आमचेवर रंग उडवीत व आमचे बरोबरीनें उखाणे घालून बोंबाहि मारीत!

एका फाल्गुनांतला असा हा शिमगा संपल्यानंतर पुढच्याच चैत्रांत पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर बाबांनीं मला पर्वतींतल्या शाळेंत घातलें. तो पहिला दिवस मला अजून आठवतो. पाटीपूजेचा काय तो थाट! कोळशानें घासून—पुसून लख्ख केलेल्या पाटीवर विद्यादेवी सरस्वती हिचें चित्र[1] काढायाचें, त्याची धूपदीपासह पूजा करायाची, हळदकुंकूं वहावयाचें, खोबऱ्याच्या खिरापतीचा नैवेद्य दाखवून तो मास्तरांना अन् मुलांना वाटावयाचा व शेवटीं मास्तरांना दक्षणा देऊन त्यांच्या पायांवर डोकें ठेवायाचें असा हा पूजेचा विधि असे.

---

१. एक, एक, एक असे नऊ एक पहिल्या ओळींत.
,, ,, ,, ,, आठ एक दुसऱ्या ,,
,, ,, ,, ,, सात एक तिसऱ्या ,,
,, ,, ,, ,, सहा एक चवथ्या ,,
,, ,, ,, ,, पांच एक पांचव्या ,,
,, ,, ,, ,, चार एक सहाव्या ,,
,, ,, ,, ,, तीन एक सातव्या ,,
,, ,, ,, ,, दोन एक आठव्या ,,
,, ,, ,, ,, एक एक नवव्या ,,
ओळींत काढून ते जोडले म्हणजे होणारी आकृति मोराच्या पिसाऱ्यासारखी दिसते. आणि मोर हें सरस्वतीचें वाहन.

सबंध शाळेवर पटवर्धन नांवाचे एकच मास्तर असल्यानें दोन्हीं वर्षे मी त्यांच्यापाशीं शिकलों. दांत पडलेले, विड्याचा लाल मुखरस सदा सद्यावर ओघळत असलेला, डोक्यावरची एकुलती एक बट वाऱ्यानें झुलत असलेली—अशा थाटानिशीं ते वर्गांत बोडकेच बसत, व उन्हाळ्यांत तर उघडेहि बसत. वर्गांतील मुलींकडे त्यांचा विशेष ओढा आहे, त्यांना ते कधींसुद्धां मारीत नाहींत, असा खरा-खोटा ग्रह सर्व मुलांचा झाला होता. मला मात्र तसें नसे वाटत.

गृहस्थ म्हातारा असल्यानें त्याची शिक्षणपद्धतीहि जुनीच असे. माझा आवाज सुरेल व उंच असल्यानें रोज शेवटच्या तासाला परवाचा सांगण्याचें काम माझें असे. परवाचा साध्या पद्धतीनें सांगायचा नसून ‘ क, का, ची कि, की, कु, कू, रे । के, कै, ची को, कौ, कं, कः रे । ’ अशा गाण्याच्या चालीवर व ठेक्यावर आणि पादपूरणार्थ ‘ ची ’, ‘ रे ’ हीं पदरचीं अक्षरें घालून सांगायचा असे; आणि असा तो सांगतांना आणि म्हणतांना मोटी मजा येई.

पालकांमध्यें आमच्या मास्तरांसंबंधीं चांगलें मत होतें. दर द्वादशी—अमावास्येला व श्राद्धपक्षांना ब्राह्मण म्हणून त्यांना नेहमीं बोलावणें असे. आमच्या माईकडे गूळपाणी घ्यावयास तर ते नेहमींच येत. त्या वेळीं चहा, कॉफी इत्यादि पेयें देण्या—घेण्याची चाल नसे.

शाळेंतल्या मधल्या सुटींतील आमची आवडती करमणूक म्हणजे शाळे-मागें असलेल्या कोंडवाड्यांतील गुरांना शेजारच्या झाडांचा पाला तोडून घालावयाचा, किंवा तोंडानें नुसतेंच ‘ अरेरे ! बिचारीं ’ असें हळहळायाचें. कधीं-मधीं विशेषतः पावसाळ्यांत शाळेमागची [1] ‘ सुकाळपुरी ’ पाण्यानें तुडुंब भरली म्हणजे तींत दगड फेंकून तिच्या तळाशीं दडून बसलेल्या हडळीला झोडपून काढायाचें ! उन्हाळ्यांत ती ‘ सुकाळपुरी ’ विहीर कोरडी पडल्यावर ती हडळ कां दिसत नाहीं, असा विचार आमच्या मनाला कधींच शिवत नसे. या सुकाळपुरींत दरवर्षीं एखादी तरी बाई

१. एक भला लांब, रुंद व खोल खड्डा. तो पावसाळ्यांत पाण्यानें तुडुंब भरलेला असून त्यांत हडळ राहते अशी लोकांची कल्पना.

नवऱ्याच्या किंवा सासूच्या छळाला त्रासून जीव देते असें आम्ही ऐकलें होतें.

शाळेसमोरच गांवच्या अप्पा कुळकर्ण्यांचें घर होतें. त्यांच्या परसांत एक भलें मोठें बोरीचें झाड होतें. त्या बोरीच्या बोरांसारखीं चविष्ट, स्वादिष्ट व टप्पोरीं बोरें मी पुढें कधींच खाल्लीं नाहींत. बोरी गदगदा हलवावी, व पडलेल्या सड्यांतील निवडक बोरें खाऊन बिया मुलांना माराव्या असा हा आमचा खेळ चाले. बोरीखालीं असलेल्या खोल खड्डयाला मात्र जपावें लागे. बोरें वेचण्याच्या नादांत एकदां एक मुलगा त्या खड्डयांत पडून रुतून गेल्याचें आम्ही ऐकलें होतें.

कुळकर्ण्यांच्या घराचे जागेवर हल्लीं कर्वे यांचें घर झालें असून त्याचें 'प्रभुपाखर' असें गोड नांव जाणारा-येणारांचे मनांत भरतें. सर्व कर्वे मंडळी सुशिक्षित असून सौ. सरलाबाई कर्वे या एका काळच्या माझ्या विद्यार्थिनी आहेत.

काळ पुढें पुढें सरकत होता, अन् वर्षांमागून वर्षे उलटत होतीं. मला सातवें वर्ष लागून माझी मुंज करण्याचें ठरलें. मी शेवटचा मुलगा असल्यानें बाबांनीं माझी मुंज दुसऱ्या दोघां मोठ्या मुलांच्या मुंजींपेक्षां जास्त थाटामाटानें केली असें माझीं भावंडें म्हणत. मला मुंजीकरतां गझनीची विजार ( ही आयुष्यांतली पहिली व शेवटलीच विजार होती. ) व तांबड्या चिटाचा कोट केला होता. मखमलीची झिगच्या फुलाफुलांची टोपी आणली होती. मुंजीच्या व भिक्षावळीच्या वेळीं पर्वती संस्थानांतली वाजंत्री व चौघडा लावला होता. देवाला जातांना दोन्ही रांगांनीं कितीतरी मशाली व हिलाल लावले होते.

गडगनेराला पुरणपोळी, व मातृभोजन, ब्राह्मणभोजन आणि गांवभोजन यांना केशरी भात व बुंदीचे लाडू केले होते. मातृभोजनाचे वेळीं गर्दीगर्दीनें जेवण उरकावयास लागणें, यापुढें मला जवळ घेऊन जेवतां येणार नाहीं म्हणून माईचे डोळे भरून येणें, मुंजीनंतर भटजींनीं माझ्या मांडींत १ बेटकुळी घालणें, संध्येंतलें नवें नांव कोणाला सांगण्याची

१. मुंज लागल्यानंतर मुंजामुलाच्या मांडीवर दर्भ ठेवून तो कापतात. या विधीला थट्टेनें बेटकुळी घालणें असें म्हटलें जाई.

परवानगी नसणें इ. गोष्टी आठवल्या म्हणजे-त्यांतील कांहीं गोष्टींचें त्या-वेळीं वाईट वाटलें तरी आतां मात्र हंसू येतें.

असो. माझी मुंज झाली, लंगोटी लागली, गळ्यांत जानवें पडलें, जानव्यांत हरणाच्या कातड्याचा तुकडा गोठवण्यांत आला आणि मी मुंजामुलगा बनलों. कितीतरी बायकांनीं माझ्या डाव्या पावलाच्या अंगठ्याचें तीर्थ घेऊन मला दक्षणा दिली. सात-आठ दिवस घरांतल्या घरांत सोंवळ्यानें राहिलों. मोरीवर जातांना कानावर जानवें घालण्याचें चुकून राही, तेव्हां वडील मंडळींकडून बोलणीं बसत.

संध्या मुंजीपूर्वींच लहानपणीं शिकलों असल्यानें भटजींचा लकडा मात्र फार दिवस मागें लागला नाहीं. लवकरच्च सोडमुंज झाली; आणि मी हातांत दंड घेऊन काशीयात्रेला निघालों. लगेच एकजण ‘ मामा ’ म्हणून पुढें झाला आणि त्यानें आपली मुलगी मला तावडतोब देऊं केली म्हणून माझा काशीयात्रेचा बेत रहित होऊन मी आपल्या नेहमींच्या शाळेला जाऊं लागलों.

जेवणावळीच्या दिवशीं माझ्या मास्तरांना व शाळेंतल्या ब्राह्मण मुलांना बाबांनीं जेवावयास बोलावलें होतें. पाप्याला अन् मारत्याला मात्र ते ब्राह्मण नव्हते म्हणून जेवायला बोलावतां न आल्यामुळें मी माईकडून लाडू घेऊन बाबांना नकळत त्यांना पोहोंचते केले होते.

काळ जात चालला होता, व माझें वयहि वाढत चाललें होतें. मला आठवें-वर्ष लागण्याचे अदले दिवशीं मी हळूंच बाबांजवळ गेलों व कोणी ऐकत नाहींसें पाहून त्यांना म्हटलें, “ मला उद्यां आठवें वर्ष लागणार असें माई म्हणते. शाळेंतल्या गणूचा वाढदिवस त्याच्या आईबापांनीं करून आम्हां शाळेंतल्या मुलांना खाऊ वाटला. माझाहि वाढदिवस करायला माईला सांगाना ! मी माझ्या वर्गांतल्या मुलांना जेवावयास बोलवीन.”

बाबा एकदम कांहींच बोलले नाहींत. ‘ अजीबात नाहीं म्हणावं तर मुलाची इच्छा मोडते. बरं, हो म्हणावं तर असे काय मोठे पराक्रम त्यानें केले आहेत, की तो आणखी एका वर्षानें वाढला याचें इतकें कौतुक करावें ? कोणातरी श्रीमंत बापाच्या मुलाचं पाहतो आणि तसं आपलंहि व्हावं असं म्हणतो ’ अशा आशयाचा विचार त्यांच्या डोक्यांत चालला असावा.

हल्लींचा एकसष्टयांचा सुळसुळाट पाहिला म्हणजे माझ्याहि मनांत हल्लीं असलेच विचार येतात !

बाबांनीं माईला हें सांगितलेलें दिसलें. तिनें दुसऱ्या दिवशीं मला तेल लावून स्वतः आंघोळ घातली, व दुपारीं जेवतांना माझ्या पानाभोंवतीं रांगोळी काढून गव्हल्याच्या खिरीची वाटी दिली. शेजारीं एक उदबत्तीहि लावली. किती फक्कड झाला माझा वाढदिवस !

माझ्या बाबांना मुलांचें कौतुक करायला नको होतें असें मुळींच नाहीं. दर दिवाळींत ते माझ्यासाठीं किल्ला करीत. ' करीत ' म्हणजे स्वतः फक्त सुरुवात करून देत; आणि मग बाकीचें सर्व माझ्याकडून करवून घेत. भाद्रपदांत घरीं गणपति बसवतांनाहि त्यांचें हेंच धोरण. फक्त मूर्ति काय ती विकत आणून देत; पण मखर करणें, आरास मांडणें वगैरे गोष्टी ते मुलांकडून करून घेत. एके वर्षीं मी बाजारी मखराचा हट्ट घेतला. तेव्हां त्यांनीं त्या वर्षीं गणपति बसविण्याचा बेतच रद्द केला.

गणपतीच्या दिवसांत गणपति व मेळे पहावयास बाबा आम्हां मुलांना गांवांत नेत. कितीतरी दिवस ते मला खांद्यावर उचलून घेऊन गणपति व डोले दाखवीत. भोरकर, भाऊ रंगारी, नाईक, मंडई, बाहुलीचा हौद, विंचूरकर वाडा, वगैरे ठिकाणचे गणपति व तेथील आरास पाहण्यासारखी असत. हसबनिसांची बखळ व विंचूरकर वाडा येथें सन्मित्र-समाज, भोरकर, मावळी मेळा वगैरे मेळे येत व आपले गाण्याचे व रंगीबेरंगी कंदिलांच्या कसरतीचे कार्यक्रम करून दाखवीत.

एकदां काय झालें कीं, विंचूरकर वाड्यांत सन्मित्र-समाज मेळा पाहण्यास टिळक बसले असतांना, मी बाबांना मागें सोडून दाटीदाटींतून रेटारेटी करीत टिळकांच्या अगदीं जवळची जागा बळकावली, व मेळ्याचा कार्यक्रम संपल्यावर टिळकांच्या हातांतून एक खोबऱ्याचा तुकडा प्रसाद म्हणून पटकावला. टिळकांना अगदीं जवळून पाहण्याचा जीवनांतला हा माझा पहिलाच प्रसंग. गणपतीचा प्रसाद आणि तोहि टिळकांच्या हातून ! मग काय विचारावें ! त्या वर्षीच्या परीक्षेंत मी चांगल्या प्रकारें पास झालों ! बाबा मात्र मी गर्दींत घुसल्याबद्दल मला खूप बोलले !

गणेश चतुर्थीचा गणपति, दिवाळींतील किल्ला यांप्रमाणेंच रामनवमीच्या निमित्तानेंहि स्वावलंबनाची व स्वयंशिक्षणाची आणखी एक संधि आम्हां मुलांना मिळे. आमच्या घरीं रामनवमीचा उत्सव दहा दिवस चाले. त्यासंबंधींचीं बहुतेक सर्व कामें बाबा व आम्ही सर्व मुलें घरच्या घरीं करीत असूं. देवघरांतल्या व बाहेरच्या जमिनी करणें, देव्हाऱ्याला तेलपाणी देऊन त्याच्या कमानींना वर्ख चिकटविणें, रंग-सफेती देणें, अंगणांत मांडव घालून छत-झालरी लावणें, हंड्या-झुंबरें लटकावणें येथपासून तों थेट राम-जन्माचे दिवशीं कीर्तन करणें (दादा कीर्तन करीत व मी मागें टाळ धरून साथ करी), आठ दिवस रात्रीं गांवकऱ्यांचें भजन होई त्यांत भाग घेणें, पारण्याला पुरणपोळीचें गांवजेवण होई त्यांत वाढण्याचें काम करणें इत्यादि सर्व कामें बाबा व त्यांच्या बरोबरीनें आम्ही मुलें करीत असूं.

हीं सर्व कामें घरच्या घरीं केल्यानें त्याकरितां आम्हांला पैसा पडला नाहीं हें तर झालेंच; पण त्याहिपेक्षां महत्त्वाचें म्हणजे आम्हांला सर्व प्रकारच्या शारीरिक कामांची व कष्टांची संवय होऊन उच्च–नीचतेच्या खोट्या कल्पना आमच्या डोक्यांत शिरल्या नाहींत. अशा रीतीनें हल्लीं ज्याला 'गृहशिक्षण,' 'कृतिद्वारां शिक्षण,' म्हणून म्हणतात तें आम्हांला घरच्या घरीं आपोआप मिळत असे.

पर्वतीच्या शाळेंतलें शिक्षण शिकत असतानांच माझें नित्यब्रह्मकर्माचें शिकणेंहि चालूंच होतें. बाबा मला संध्या, पूजा वगैरे कसें व कोणत्या वेळीं शिकवीत हें मागें आलेंच आहे. मी पर्वतीच्या शाळेंत असेंतों स्नान-संध्या व नमस्कार झाल्याबरोबर मी शाळेंत जाई. पण पुढें पुण्याच्या शाळेंत जाऊं लागल्यापासून मी सकाळीं अभ्यासाला बसें, व गुपचुपपणें अभ्यास करीं. त्या वेळांत गप्पागोष्टी, खेळणें वगैरे कांहीं करायाचें नाहीं अशी बाबांची सक्त सांगी असे. कारण सकाळच्या रामपहाऱ्यांतला थंड व शांत वेळ असल्या थिल्लर गोष्टी करण्यांत गेला म्हणजे अभ्यासासारख्या गंभीर कामाला दुसरी चांगली वेळ मिळत नाहीं असें ते सांगत. सुटीच्या दिवशीं मात्र मी माझें अह्निक उरकून पर्वतीवर जाई; व तेथें पुजेचे वेळीं चाललेलें गाणें–बजावणें ऐकत बसें. तें गाणें मला अति आवडे. शिवभक्त व पंढरपूरकर यांचें गाणें आणि ग्यानबांचें वाजविणें अद्याप माझ्या कानांत घुमत आहे.

मला गाण्याची गोडी लागायला पर्वतीवरील गाण्याशिवाय आणखी एक कारण झालें होतें. त्यामुळें नुसत्या गाण्याचीच नव्हे, तर नाटकें पाहण्याची चटकहि मला लागली. माझ्या लहानपणीं 'गोवा संगीत नाटक मंडळी' म्हणून एक नाटक कंपनी होती. तिचे मालक रामकृष्णपंत साठे यांना जन्मतःच त्यांच्या आईनें [ त्यांचीं मुलें जगत नसत म्हणून ] माझ्या माईच्या ओटींत घातलें होतें. आणि योगायोग असा कीं, तो मुलगा जगला, मोठा झाला, आणि आतां एका नाटक कंपनीचा मालक झाला होता.

तेव्हांपासून आम्हीं सर्व पटवर्धन मंडळी साठ्यांच्या गोवा संगीत मंडळीच्या घरचीं माणसें बनलों होतों. अर्थात् आम्हां सर्वांना नाटकें फुकट, पण मानानें पहावयास मिळत. याच कंपनींत त्या वेळीं 'गण्या' व 'दत्या हल्याळकर' हे दोन—पुढें प्रसिद्धीस आलेले नट—कामें करीत असल्याचें आठवतें. गणपतराव दासीचें व दत्तोपंत नायकाचें. मृच्छकटिक नाटकांतील 'श्रवणिं सखिच्या कादंब कुसुम पाहीं' ही दत्तोपंतांची दिंडी इतकी लोकप्रिय झाली होती कीं, तिला सात-सात वेळां वन्समोअर पडे. मी पुढें इंग्रजी तिसरींत असतांना 'तया कासारीं राजहंस पाहे' ही (नलदमयंति आख्यानांतली) दिंडी हुबेहूब दत्तोपंतांसारखी म्हणून वर्गांत पहिला नंबर मिळवीं. दत्तोपंत 'मनोविजय' नाटकांत 'विवेका'चें काम करीत तसें मींहि खेळांतल्या नाटकांत करी.

माझी गाण्याची आवड व माझा गोड गळा हीं एकदां दत्तोपंतांचे कानावर गेलीं. एके दिवशीं त्यांनीं मला कंपनींतल्या आपल्या खोलींत बोलावून माझ्याकडून एक गाणें म्हणून घेतलें. तें त्यांना बरेंच आवडलेलें दिसलें; कारण दुसऱ्याच दिवशीं त्यांची व दादांची गांठ पडली असतांना त्यांनीं मला आपल्या कंपनींत घालण्यासंबंधीं दादांना आग्रह केला. त्या-वेळीं दादांनीं संमति दिली असती तर! मीं येव्हांना राष्ट्राध्यक्षांचें पदकहि मिळविलें असतें. कोणीं सांगावें ?

आणि आतां त्या वेळच्या गाण्याच्या एका दिव्य प्रसंगाची एक अविस्मरणीय आठवण सांगतों. "बालगंधर्वांचें पुण्यांतील अगदीं पहिलें गाणें तें! मी त्या वेळीं आठ नऊ वर्षांचा व ते बारा-तेरा वर्षांचे असावेत. गाणें पेरुगेटासमोरील नंद्यांचे दिवाणखान्यांत चाललें होतें. वरचा हॉल व खालचा

चौक चिकार भरले असल्यामुळें मी प्रथम तें रस्त्यावरूनच ऐकत होतों. भैरवीच्या वेळीं मात्र वरपर्यंत घुसल्याशिवाय राहवेना. 'रामराज्यवियोग' नाटकांतील 'धन्य जाहला, माझा राम पाहिला' ही भैरवी एका लहान गोन्यागोमट्या, देखण्या मुलाच्या गोड गळ्यांतून ऐकून माझें मन आनंदानें हरखून गेलें.

पुढें बऱ्याच वर्षांनीं मी गंधर्वांची मुलाखत घेतली तेव्हां मी या प्रसंगाची आठवण त्यांना दिली आणि ती देतांना मन आनंदानें पुन्हां पहिल्यासारखें भरून आलं! त्यांनाहि त्या माझ्या आठवणीचें कौतुक वाटलें."

त्या काळीं महाराष्ट्रांतील तरुण-तरुणींवर गंधर्वांचें किती वजन होतें म्हणून सांगूं? प्रत्येक विद्यार्थ्यांचे टेबलावर किंवा त्याच्या खोलीच्या भिंतीवर सामान्यतः दोन फोटो दिसत. एक लो. टिळकांचा व दुसरा गंधर्वांचा. तरुणांच्या विचारांवर जशी टिळकांची छाप पडलेली दिसे तशी त्यांच्या वेषभूषेवर आणि गाण्याच्या आवडीवर गंधर्वांची छाप पडलेली असे. मी तरी याला कसा अपवाद असणार? आज सतत साठ वर्षें मी त्यांच्या गाण्याचा आस्वाद मनसोक्त घेत आहे.

गाण्या–नाटकाच्या शौकाप्रमाणेंच मला कीर्तन-प्रवचनांचाहि बराच शौक असे. दर एकादशीस पर्वतीवर श्रीविष्णूचे देवळांत बडोदेकर, त्र्यंबकबुवा नाशिककर, इचलकरंजीकर, ताहराबादकर अशांसारख्या नाणावलेल्या कीर्तनकारांचीं चांगलीं-चांगलीं कीर्तनें होत. बडोदेकरांचें पायांत घुंगूर घालून कथेंत नाचणें, नाशिककरांचें ठसठशीत बोलणें व गाणें, आणि इचलकरंजीकरांचें सुभद्राहरण आख्यान लावून अण्णासाहेब किर्लोस्करांच्या सौभद्र नाटकांतील गाणीं तशा तालासुरांत कथेंत म्हणणें, या सर्व गोष्टी नुकत्या घडल्यासारख्या वाटतात. ताहराबादकरांच्या गाण्याची पेटीवरची साथ त्या वेळीं भालेराव नांवाचे एक पट्टीचे पेटीवादक करीत असत. कै. गोविंदराव टेंबे यांचे अगोदर महाराष्ट्रांत पेटीवादक म्हणून भालेराव प्रसिद्ध होते.

कीर्तनें ऐकण्याची माझी आवड अद्यापहि तृप्त झाली नाहीं. पुण्याचे मुरुडकरबुवा, बडोद्याचे नानाबुवा, वाईचे पटवर्धनबुवा, इत्यादींचीं कीर्तनें मी मध्यंतरीं आवर्जून ऐकीं.

पुराणा-प्रवचनांचीहि आवड मला बरीच होती. माझे दादा, बेलबागेंतले नापूशास्त्री गुर्जर, पुण्यांतील पहिले प्रसिद्ध गीता-प्रवचनकार कान्हेरेशास्त्री व अलीकडचे भिडेशास्त्री, पांगारकर इ. चीं पुराणें-प्रवचनें मी मनापासून ऐकत असें; आणि व्याख्यानें तर पुसूंच नका. महाराष्ट्रांतील टिळक-परांजप्यांपासून बहुतेक सर्व अव्वल दर्जाच्या वक्त्यांचीं भाषणें मी ऐकलीं आहेत. नकला मात्र मी भोंड्याच्याच ऐकल्या व पाहिल्या, आणि त्याच मला अद्याप उत्कृष्ट वाटतात. केवढी मोठी कला देवानें त्यांना बहाल केली आहे !

आणि हळूंच सांगूं ? मी लहानपणीं तमाशेहि कांहीं कमी पाहिले नाहींत. पर्वती गांवांत दोन तालमी—आणि अर्थात् दोन तटहि—असून त्यांचे उरूस मोठ्या अटीतटीचे होत; आणि ही सर्व चुरस तमाशांचे बाबतींत चाले. तमाशांतील कोल्हाटणी, नाच्या पोऱ्या, गवळणी व लावण्या, दौलतजादा, त्यांतील अर्वाच्य विनोद,—सर्व कांहीं मी पाहिलें व ऐकलें आहे. आम्ही पोरेंच पहात—ऐकत असूं असें नव्हे तर गांवांतील वृद्ध व प्रतिष्ठित लोकहि मिटक्या मार-मारीत पहात व ऐकत असत. आतां फक्त लावण्याच ऐकाव्याशा वाटतात.

माझ्या लहानपणच्या आठवणींपैकीं एक भयंकर आठवण म्हणजे पुण्याच्या प्लेगोबाची. लागोपाठ तीन—चार वर्षें त्यानें नुसता कहर केला होता. प्लेगानें मेलेल्यांचा रोजचा आंकडा भाऊमहाराजांच्या वाड्यांत देवडीवर लावीत. तो आंकडा कधीं कधीं तीनशेंवर गेलेला मीं पाहिला आहे. लग्ना—मुंजींच्या दिवसांत गणपति—जोगेश्वरींना जशी अक्षदांची रांग लागे, तशीच प्लेगाच्या दिवसांत ओंकारेश्वराला प्रेतांची रांग लागे !

त्यावेळीं भाऊसाहेब गोखले म्हणून एक पहिलवानी पेशाचे परोपकारी गृहस्थ सदाशिव पेठेंत सोट्या म्हसोबापाशीं रहात होते. ते तर रोज पंधरा—वीस प्रेतें तरी खांद्यावरून ओंकारेश्वरावर पोंचवीत. अंगच्या शक्तीचा हा किती उदात्त उपयोग !

टिळक, हरिभाऊ आपटे वगैरे पुढारी प्लेग हटविण्याचे आटोकाट प्रयत्न करीत असल्याचें ऐकून त्यांचेबद्दल वाटणारा माझा आदर कितीतरी पटीनें वाढला. टिळकांनीं तर गायकवाड वाड्यांतील आपल्या राहत्या जागेंत

इ. क्र. १०८९९



प्लेगाचें एक इस्पितळच उघडलें होतें. माझे दोघे चुलत भाऊ याच इस्पितळांत वारले. मलाहि प्लेगचा एक मोठा थोरला गोळा आला होता; पण तो माझे मेहुणे—मोरूनाना यांनीं घरच्या घरींच एका साध्या सुईनें फोडून टाकून मला बरें केलें.

प्लेगानें दूषित झालेलीं घरें व त्यांतील सामान-सुमान धुण्याकरितां येणारे सोजीर भारी उद्दामपणानें वागत. भाजणी, मेथकूट, पापड अशांसारखे सोंवळ्यांतले पदार्थ व देव्हाऱ्यांतले देव यांना शिवून ते वाटेल तसे फेंकून देत. प्रेतें लपविलीं असतील अशा संशयानें अंथरुणें-पांघरुणें उलगडीत व वेळीं जाळूनहि टाकीत. पोरीबाळींची व म्हाताऱ्या कोताऱ्यांची चेष्टा करायलाहि कमी करीत नसत. मनूताईचे मृत्यूनंतर आमचें घर धुण्यासाठीं ते आले असतांना एका सोजिरानें माझ्या व माझ्या बहिणीच्या तोंडाला सबंध लाल रंग फासला व 'कुकु लाव् कुकु' म्हणून विचारलें. असल्या या छळाला आळा बसावा म्हणूनच चाफेकरांनीं रँडसाहेबाचा खून केला असें त्यावेळीं बोलत.

प्लेगाच्या पुढच्या एका प्रसंगीं आम्हीं पर्वती गांव सोडून रावतांच्या[1] पडळीवर झोपडी घालून राहण्यास गेलों. त्या ठिकाणाहून पुण्याच्या नू. म. विद्यालयांत जातांना अंबील ओढा ओलांडावा लागे. जाण्याच्या वाटेपासून थोड्याच अंतरावर एक प्रेत पुरलेलें माझ्या नजरेस आलें. तें भयंकर दृश्य पाहून मी इतका कांहीं घाबरलों कीं, पुढें शाळेंत जाण्याऐवजीं तसाच झोपडीवर परतलों, व तापानें फणफणून पडलों. सात—आठ दिवस निरनिराळे औषधोपचार झाले, पण ताप कांहीं हटेना अन् वातांतली बडबड कांहीं थांबेना.

शेवटीं एका अमावास्येच्या तिन्हीसांजा माईनें माझ्यावरून दही-भात ओवाळून टाकला आणि आश्चर्य असें कीं, त्याच रात्रीं माझा ताप हटला. हें एवढेंच नव्हे तर मी खडखडीत बरा झालों. ओवाळणें, मंत्र घालणें, वगैरेंवर कोणीं विश्वास ठेवो-न ठेवो, मला मात्र त्या रात्रीं ओवाळण्याचा तावडतोब गुण आला हें खास.

---

१. अंबील ओढ्यावरील विठ्ठलाच्या भट्टीपाशीं असलेल्या मोकळ्या जागेवर प्रसिद्ध माळी—राऊत—यांची पडळ असे.

मला एखादे वेळीं घरीं ( पर्वतीस ) करमेनासें झालें म्हणजे मी पुण्यास शनीच्या पारापाशीं गोखले-यांच्या वाड्यांत माझ्या [१]मावस बहिणी रहात त्यांच्याकडे जाई. सर्वांत थोरली वेणूताई ही माझ्यापेक्षां फार मोठी, तर सर्वांत धाकटी यमूताई माझ्याहून लहान. मधली कृष्णाबाई ही मात्र माझ्याच वयाची व मनोधर्माची असल्यामुळें हिचें व माझें अतिशय जुळे. आम्हांला एकमेकांचा इतका लळा लागला होता कीं, मला सारखें तिच्या-बरोबर असावेंसें वाटे.

एकदां बापूसाहेब वाईस असतांना त्यांचेकडे श्री. सयाजीराव गायकवाड यांच्या मातुश्री श्री. जमनाबाई मेजवानीकरितां आल्या होत्या. मीहि त्याच वेळीं कृष्णाबाईबरोबर वाईस गेलों होतों. मेजवानीचे वेळीं तिच्याजवळ बसावयास सांपडावें येवढ्यासाठीं माझी सारी धडपड चालली होती. तें जमेना. तेव्हां मी रागावून दूरच्या एका टेबलापाशीं उभा राहिलों व तेथल्या खाद्यपेयांवर यथास्थित ताव मारला. भाषणें काय झालीं, जमनाबाई काय म्हणाल्या इकडे माझें बिलकूलच लक्ष नव्हतें. नाहीं म्हणावयास जमनाबाईनीं जातां जातां एक भाकरीचा तुकडा श्रीखंडाला लावून तोंडांत घातला येवढेंच मीं पाहिलें. जमनाबाई गेल्यावर कृष्णाबाई माझेकडे आली आणि म्हणाली, ' नानू, मलाहि तूं माझ्याजवळ असावास असें वाटत होतें. पण कांहीं इलाज नव्हता ! ' तेवढ्यानेंच मला किती बरें वाटलें !

मी धुळ्यास तिच्या लग्नाला म्हणून गेलों असतांना भर वरात सोडून मी नाट्यकलाप्रवर्तक संगीत मंडळीच्या हरिश्चंद्र नाटकास एका माणसाच्या नादानें गेलों. कृष्णाबाईला अर्थातच फार वाईट वाटलें. दुसऱ्या दिवशीं गांठ पडल्यावर तिनें मला येवढेंच विचारलें, " अरे नानू, तूं माझा पाठीराखा भाऊ म्हणून ना लग्नाला आला होतास ? बहिणीची वरात सोडून भाऊ कधीं तरी दूर जातो का ? " मी ओशाळलों. गाण्याचा अन् नाटकाचा मोह मला आवरतां आला नाहीं हें माझ्यानें तिला सांगवलें नाहीं.

कृष्णाबाईचें शिक्षण तसें कांहीं फारसें झालें नाहीं. पण तिचें वाचन व श्रवण विस्तृत व धारणा तीव्र आहे. तिच्या ठिकाणीं दृष्टीस पडणारी जुन्या-

१. बडोदें संस्थानचे न्यायाधीश कै. बापूसाहेब गाडगीळ यांच्या कन्या.

नव्यांची सांगड मोठी मनोज्ञ आहे. तिनें जुन्या वळणाचें व भक्तिपर काव्य बरेंच केलें आहे. गेलीं कित्येक वर्षें तिला दिसत नाहीं. मध्यंतरी तिची वयांत आलेली एकुलती एक मुलगी तिला सोडून गेली. अशा आधिव्याधि-ग्रस्त स्थितींतहि तिच्या मूळच्या शांत व आनंदी स्वभावांत कांहीं कमी झालेलें नाहीं. आणि याला कारण तिचे पति.

श्री. लक्ष्मणरावजी ऊर्फ भाऊसाहेब खरे हे एक साधे, सरळ व सात्त्विक गृहस्थ आहेत. ते वकिली ' धंदा ' म्हणून नव्हे, तर व्रत म्हणून करतात. डोळ्यानें अधु झालेल्या आपल्या पत्नीची ते फार काळजी घेतात. रोज नियमानें तिला वाचून दाखविणें, तिच्या लेखनांत तिला मदत करून तिला उत्तेजन देणें, अशांसारखीं कामें ते मोठ्या तत्परतेनें व आनंदानें करतात. त्यांची पत्नी त्यांना ' आदर्श पति ' म्हणते तें सर्वस्वी योग्यच आहे.

आणि आतां बालपणांतली शेवटची महत्त्वाची गोष्ट—माझी ' नूतन मराठी विद्यालय ' शाळा हिच्यासंबंधीं सांगायाचें. पण तें सांगणें अवघ्या दोन-तीन पानांत शक्य नाहीं आणि म्हणून ती सर्व कथा पुढील अध्यायांत सांगणेंच योग्य होईल.

◎ ◎ ◎

त्यांना बाकावर उभे करणें, मास्तरांना मधूनमधून पाणी आणून देणें, ते शाळेंत आल्याबरोबर त्यांचे कपडे वर्गांतील पेटींत ठेवणें, व जातांना ते त्यांच्या हातांत देणें, हपिसांत फी भरून येणें–अशांसारखीं कामें वर्गाच्या सेक्रेटरीकडे असत.

सुमारें दीड तपाच्या माझ्या शिक्षणकाळांत पहिला नंबर हा असा एकदांच व तोहि एका महिन्यापुरताच माझ्याकडे आला, असें मला पक्कें स्मरतें. त्यामुळें पहिल्या नंबरासंबंधींचें माझें कुतूहल व औत्सुक्य नेहमींच जागृत असतें. अगोदरची बस् भरून नंतरच्या क्यूंत माझा पहिला नंबर आला म्हणजे मला अद्यापहि मोठीच धन्यता वाटते.

तिसऱ्या इयत्तेच्या दोन्ही वर्षांत मला कुळकर्णी आडनांवाचेच दोन मास्तर होते. त्यांपैकीं एकाचा पोषाख मोठ्या झाकीचा असून त्यांच्या डाव्या हातांत सोन्याचीं सलकडीं व छातीवर वड्याळाचा रुपेरी छडा रुळत असे. दोघेहि सारखेच वाकबगार पण मारकट असल्यानें त्यांचीं नांवें व त्यांच्या मूर्ती अद्यापहि डोळ्यापुढें आहेत. बाकी मारकटपणा हा त्या काळच्या सर्वच शिक्षकांचा समान गुण असे. मारण्याचें प्रमाण कमी–अधिक येवढेंच.

डोळ्यांपुढें वावरणारे त्या वेळचे आणखी दोन मास्तर म्हणजे शेंडे व बापट हे होत. दोघेहि फार चांगलें शिकवीत असले पाहिजेत. त्याशिवाय का मी दर वर्षी वरच्या वर्गांत जाऊं शकलों ? त्यांच्या शिकवण्यांतील विशेष कांहीं आठवत नसलें–आणि हें कोणाच्याच शिकवण्यांतील आठवत नाहीं–तरी शेंडे मास्तरांचा अत्यंत टापटिपीचा व कुलंदाजाला शोभेसा पोषाख, व बापट मास्तरांना विद्यार्थ्यांसंबंधीं वाटणारें वात्सल्य इ. गोष्टी मला चांगल्या आठवतात.

चवथीच्या वर्गाला श्री. देव मास्तर होते. त्यांची भिक्षुकी फार चांगली चालत असल्यानें त्यांना शाळेंत यावयास थोडासा उशीर होत असे, आणि आमचा पहिला तास मोठ्या मजेंत जात असे. बिचारे देव ! भिक्षुकी न करतील तर काय करतील ? प्रपंच तर भागला पाहिजे ना ? ते, डोंगरे इत्यादि कांहीं मराठी मास्तर विष्णुशास्त्र्यांच्या प्रेरणेनें मराठी ट्रेनिंग कॉलेजच्या पहिल्या वर्षाला रामराम ठोकून ध्येययुक्त व त्यागपूर्वक चाललेल्या नूतन

मराठी विद्यालयाला अत्यंत थोड्या पगारावर येऊन मिळाले होते. केवढी ही त्यांची निष्ठा ! केवढा त्याग !

मराठी चौथींतून मला इंग्रजी पहिलींत घालण्यांत आलें. मी इंग्रजी शिकावयाला लागलों या गोष्टीचा मला व माझ्या घरच्यांना किती आनंद व अभिमान वाटला ! सबंध घराण्यांत कोणाला इंग्रजी येत नव्हतें. इंग्रजी पहिली ते सहावीपर्यंतच्या शिक्षकांना निव्वळ स्मृत्यंजलि अर्पण करण्यापलीकडे फारसें कांहीं करतां येत नाहीं याचें वाईट वाटतें.

दाणी मास्तरांची पांढऱ्या शुभ्र अंगरख्यांतील ती उंच व धिप्पाड मूर्ति; दत्तोपंत जोशांचें तें गायन–वादन–नैपुण्य; जोगांचें इंग्रजी धर्तीवर उच्चारलेलें 'बेस् गॉडवा' ('बैस गाढवा' या शब्दांचें अपभ्रष्ट रूप.) सुप्रसिद्ध साहित्यिक लक्ष्मणशास्त्री लेले यांच्या चकाकणाऱ्या डोक्यावरील तुळतुळीत शेंडी व लाल पगडी, बगलेंतला उपरण्याचा बोळा आणि इंग्रजी वाचन शिकवितांना होणाऱ्या उच्चारांचे कृत्रिम आरोहावरोह; दामूअण्णा कुळकर्ण्यांचा ह. ना. आपटे यांच्या कादंबऱ्यांचीं प्रुफें वर्गांत शिकवतां-शिकवतां तपासण्याचा उरक, या सर्व गोष्टी अद्याप डोळ्यांपुढें घोटाळत आहेत.

सदरहू व्यक्तींसंबंधींच्या महत्त्वाच्या व चिरस्मरणीय गोष्टी न आठवतां नेमक्या थिल्लर व विसरण्याजोग्या गोष्टीच आठवाव्यात. हें पाहिलें म्हणजे The good is oft interned with the bones ही शेक्स्पिअरची उक्ति मनाला पटते.

इंग्रजी चौथींतील एक गोष्ट माझ्यासंबंधींचीच असल्यानें ती विशेष लक्षांत आहे. आमचे देवकुळे मास्तर वर्गांत घातलेल्या शब्दांचीं स्पेलिंगें वह्यांची अदलाबदल करून मुलांकडून तपासून घेत. माझी वही तपासणाऱ्या मुलानें मी एका शब्दाचें स्पेलिंग चुकीचें लिहिलें असतांना चुकून बरोबर धरलें होतें. माझे बहुतेक शब्द चुकलेच होते; तथापि हात वर करून 'सर, यानें माझी चूक सोडली' अशी तक्रार मी सरांकडे केली. माझ्या त्या जॉर्ज वॉशिंग्टनी सत्यप्रीतीवर व मनाच्या श्रेष्ठ धारिष्टावर सर एकदम खूष झाले, आणि खरें बोलण्याचें बक्षीस म्हणून बाकीच्या सर्व चुका मला माफ करून त्यांनीं मला वर्गांत पहिला नंबर दिला. ही गोष्ट मी मोठ्या ऐटीनें घरीं

सांगितली असतांना बाबांनीं माझ्या सत्यप्रीतीचें कौतुक न करतां माझे कान उपटले ! व माझा अजागळ अगोचरपणा माझ्या ध्यानांत आणून दिला.

त्या काळांत दामुअण्णा, लेले, गोखले, मोडक, डोंगरे, लागू, त्र्यं. गु. काळे, कुशाभाऊ फडके, वैद्य यांसारखे चांगले विद्वान् शिक्षक आम्हांला आमच्या नशीबानें लाभले होते. दामूअण्णांच्या हुशारीबद्दल, गोखल्यांच्या मनोरंजक शिकविण्याबद्दल आम्हांला विशेष वाटे. लेल्यांच्या मराठी साहित्य-सेवेसंबंधीं आम्ही बाहेर कितीतरी ऐकत असूं. ते शिकवीत मात्र इंग्रजी.

श्री. मोडक उभ्या महाराष्ट्रांत एक गाढे वैय्याकरणी म्हणून नांवाजलेले होते. त्यांचें व्याकरण आमच्या लक्षांत फारसें राहिलें नसलें तरी पांढऱ्या स्वच्छ पोषाखांतील त्यांची ती उभी सडपातळ शरीरयष्टि, गौर मूर्ति, तेजस्वी पण जरा उग्र मुद्रा, व अनवाणीं पाउलें या गोष्टी आमच्या लक्षांत राहिल्या आहेत.

श्री. काळे हे मोठे संशोधक असून 'वेश असावा बावळा, परी अंतरीं नाना कळा' हें रामदासी वर्णन त्यांना चांगलें लागूं पडे. ते वेदांवर व पुराणांवर नेहमीं लिहीत असत. श्री. फडके हे माझ्या मेहुण्यांचे नातेवाईक असल्यानें माझेसंबंधीं विशेष आस्था दाखवीत. पण त्यांना विद्यार्थ्यांना खोंचून बोलण्याची खोड असल्यामुळें त्यांच्या शिकवण्यापेक्षां त्यांचें बोलणेंच विद्यार्थ्यांच्या विशेष लक्षांत राही.

श्री. गोडबोले हे अत्यंत कर्तृत्ववान व हुशार शिक्षक असत. इंग्रजी शिकविण्यांत त्यांचा हातखंडा असे. चुकार विद्यार्थ्यांच्या पोटांत ते असे कांहीं पिरगळून चिमटे घ्यावयाचे कीं, त्यांचें नांवच 'पिंचर गोडबोले' असें पडलें होतें.

श्री. वैद्य हे नुकतेच शिक्षक म्हणून आले होते. ते इतिहास शिकवीत असल्याचें आठवतें. त्यांचा घसा जरा घोगरा, व बोलणें थोडेंसें रेकून असे. त्या वेळच्या माझ्या सर्व शिक्षकांपैकीं श्री. वैद्य हेच काय ते आज विद्यमान असून बाहेर वावरण्याइतके धडधाकट आहेत. शाळेच्या समारंभप्रसंगीं ते अजूनहि अगत्यानें उपस्थित असतात.

लहानपणीं माझें मोडी अक्षर फार चांगलें होतें. त्याचें सर्व श्रेय डोंगरे व लागू या जोडीला दिले पाहिजे. मॅक्मिलन कंपनीनें काढलेल्या मोडी

किंत्यांतील अक्षरें या दोघांचींच असून कित्तेवहीच्या मुखपृष्ठावर खालच्या बाजूस दोहींकडे या दोघांचे फोटो दिलेले असत. अक्षराप्रमाणेंच लागू मास्तरांचें वागणेंहि मोठें वळणदार असे.

माझें मोडी अक्षर फार चांगलें होतें असें आतांच म्हटलें. हल्लीं मात्र तें इतकें खराब झालें आहे कीं, सुभाषितांतील त्या चतुरतर भर्त्याप्रमाणें 'स्वयमपि लिखितं स्वयं न वाचयाते' अशी माझी केविलवाणी स्थिति झाली आहे.

डोंगरे मास्तरांच्या अक्षराप्रमाणें त्यांच्या त्यागबुद्धीचाहि माझ्या मनावर परिणाम झाला आहे. एक साधा शाळामास्तर, पण शास्त्रीबुवांच्या प्रेरणेनें केवढें मोठें लोकोपयोगी काम करूं शकतो! आणि तेंहि पैसा, कीर्ति, मोठेपणा यांपैकीं कशाचीहि अपेक्षा न करतां! आपली शाळा लोकप्रिय करण्याकरितां किती निरनिराळ्या योजना त्यांच्या डोक्यांत होत्या! एक साधी गोष्ट. दरवर्षी रसपानाच्या दिवशीं हजारों विद्यार्थ्यांना व शिक्षक, गडी वगैरेंना भरपूर पुरेल इतकी आंब्याची डाळ स्वतःच्या देखरेखीखालीं तयार करवून घेऊन ती सर्व विद्यार्थ्यांना स्वतः वाटण्यांत त्यांना किती सात्विक आनंद झालेला दिसत असे! त्यांची ही डाळ नू. म. वि. चा कोणीहि माजी विद्यार्थी विसरणें शक्य नाहीं.

इंग्रजी सहावींतून मी सातवींत म्हणजे 'मॅट्रिक' (हा शब्द आम्ही मोठ्या ऐटीनें उच्चारूं.) क्लासमध्यें गेलों. त्या वर्गाला स्वतः सुपरिंटेंडेंट– विनायकरावजी आपटे–संस्कृत शिकवीत. ते शिकवितांना तल्लीन होत. भोंवतालच्या वर्गांतील गोंगाट बंद व्हावा म्हणून वर्गांत शिकवतां शिकवतांच ते 'सायलेन्स' असें इतक्या जोरानें ओरडत कीं, तो शब्द नुसत्या वर्गातच नव्हे तर किबे वाड्याच्या सबंध चौकांत घुमून जाई, व सर्व वर्गांतून एक क्षणभर चिडीचीप होई. एक वात्रट पण हुशार विद्यार्थी आपट्यांनीं 'सायलेन्स' शब्द उच्चारल्याबरोबर हळूंच 'लायसेन्स' असें म्हणून बाकावर हशा पिकवी. विनायकरावांचा एरवींचा पोषाख अत्यंत साधा व सामान्य असे. पण इन्स्पेक्शनचे किंवा अन्य महत्त्वाचे प्रसंगीं ते काळा लांब कोट, पिवळें पागोटें व पायांत 'बूटिस्टाकण्या' (बूट स्टॉकिंग्) चढवीत तेव्हां ते अत्यंत रुबाबदार दिसत.

आपटे हे अत्यंत कामसू व निष्ठावंत होते. त्यांनीं शाळा हें दुसरें घर केलें होतें. त्यांच्याच आमदानींत कै. प्रो. व्ही. एस्. घाटे, वाय्. ए. गोडबोले अशांसारखीं तेजस्वी रत्नें व जगन्नाथ शंकरशेट स्कॉलर नू. म. विद्यालयांतून प्रकाशमान झालीं. पुढें बऱ्याच वर्षांनीं त्यांच्याच आमदानींत शिक्षण प्रसारक मंडळीचें न्यू पूना कॉलेज निघालें व विनायकराव त्याचे पहिले प्रिन्सिपॉल झाले.

विनायकरावजींची व माझी तोंडओळख माझ्या लहानपणींच झाली, व ती अखेरपर्यंत टिकली. नू. म. विद्यालय दर बुधवारीं व उन्हाळ्यांत सकाळीं भरे. मी पर्वतीहून शाळेंत जाण्यासाठीं सकाळीं सहाला निघे; नेमक्या त्याच वेळीं विनायकराव, हरिभाऊ आपटे, प्रो. पानसे, वांगीकर दिपूटी इत्यादि सात–आठ मंडळी पुण्याहून पर्वतीवर जात. वाटेंत विनायक-रावजींची व माझी गांठ हटकून पडे. मी नू. म. विद्यालयाचाच विद्यार्थी आहे असें समजल्यावर त्यांना माझेसंबंधीं विशेष आपलेपणा वाटूं लागला. हरिभाऊ पर्वतीवर गेले तरी प्रत्यक्ष देवळांत जात नसत असें त्या वेळीं म्हणत; विनायकराव मात्र अत्यंत भाविक असत.

शाळेचा शिपाई-गोविंदा—याचेवर विनायकरावांची भारी भिस्त. त्याच्या नांवाचा उच्चार केल्याशिवाय विनायकरावांचें वर्णन पुरें होणारच नाहीं. नू. म. विद्यालयांतील स्वामिभक्त व कर्तव्यनिष्ठ नोकरांची परंपरा फार जुनी आहे.

त्या वेळची दुसरी एक मोठी व्यक्ति म्हणजे केसकर मास्तर. मुलांच्या अभ्यासाप्रमाणेंच त्यांच्या खेळांकडेहि त्यांचें विशेष लक्ष असे. गृहस्थ मोठे सालस, सात्विक व धार्मिक वृत्तीचे असून ते पुढें योगी अरविंद यांचे शिष्य बनले. मध्यवर्ति सरकारच्या माहिती व नभोवाणी खात्याचे मंत्री डॉ. बाळकृष्ण केसकर हे आमच्या केसकर सरांचे चिरंजीव होत; ही अभिमानाची गोष्ट नव्हे का?

नू. म. विद्यालयांतील सहा-सात वर्षांच्या कालावधींत कितीतरी विद्यार्थी माझ्या बरोबरीनें एखादें वर्ष आगें–मागें–शिकत होते. त्यांपैकीं कितीतरी जणांची व माझी मैत्री झाली होती. त्यांतील अवघे दहा-बारा विद्यार्थीच आतांच्या क्षणाला माझ्या डोळ्यांपुढें यावेत ही खरोखरच दुःखाची गोष्ट

होय. आतांचे महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार, प्रो. हर्डीकर, सुप्रसिद्ध कॉंट्रॅक्टर धोंडूमामा साठे, मुंबईचे कॉंग्रेस कार्यकर्ते प्रो. दत्तोपंत धारपुरे, वाईचे जहागीरदार श्रीमंत बाळासाहेब साठे, व त्यांच्याबरोबर असलेले नाट्यशौकीन शंकरराव सहस्रबुद्धे, सुप्रसिद्ध क्रिकेटपटु दिनकरराव देवधर, शिक्षणशास्त्रज्ञ व समाजसेवक बाबूराव जगताप, मुंबईचे सुप्रसिद्ध डॉ. रघुनाथ साबाजी तिरोडकर, बुधवार चौकांतले रा. ना. रा. भिडे[1], भारत हायस्कूलचे संस्थापक, गोपाळराव अनगळ इ. मंडळी माझे समकालीन मित्र होते.

या सर्वांमध्यें प्रो. पोतदारांची मला विशेष आठवण आहे. स्वदेशी बाणा, राष्ट्रीय वृत्ति, भारतीय इतिहासाची नितान्त आवड, बुद्धिचापल्य, वैदिक संस्कृतीचा अभिमान, चतुरस्र विद्वत्ता, चटकदार व ढंगदार लेखनशैली, टसकेबाज वक्तृत्व, असामान्य कर्तृत्व इ. जे जे गुण हल्लीं त्यांचे ठिकाणीं प्रकर्षाप्रत पोचलेले दिसतात. त्यांचे मूळ अंकुर, त्याहि काळीं दिसूं लागले होते. ते स्वतःचें नांव ‘दत्तात्रय वामन’ असें न लिहितां ‘दत्तो वामन’ असें पेशवाई पद्धतीप्रमाणें लिहितात.

ते शाळेंत यावयाचे ते पेशवाई थाटाचा लांब अंगरखा घालून. पावसाळ्यांत देशी छत्री मिळाली नाहीं तर काळें कांबळें पांघरून ते पावसाचें निवारण करीत. हजामत केलेलें डोकें, व नाना फडणिशी तऱ्हेचें दुमोटी पांढरें गंध असलेलें तेजःपुंज कपाळ हीं त्यांचीं त्या वेळेपासूनचीं वैशिष्ट्यें आहेत. त्या काळीं त्यांचें एक खास मित्रमंडळ असून त्यांतील बहुतेकांनीं आमरण ब्रह्मचारी राहण्याची शपथ घेतली होती असें आमच्या कानावर होतें. बाकीच्यांचें काय झालें कोणास ठाऊक; दत्तोपंत मात्र अजून (आतां कायमचेच) हनुमानाप्रमाणें कडक ब्रह्मचर्य पाळून दुसऱ्याचे प्रपंच करीत आहेत.

दत्तोपंतांचें संशोधनात्मक व सांस्कृतिक कार्य इतकें मोठें व मूल्यवान आहे कीं, असा महामहोपाध्याय माझ्या बालमित्रांपैकीं एक असावा याची माझी मलाच धन्यता वाटते. पण हें सर्व संशोधन जितकें ग्रंथनिविष्ट व्हावयास पाहिजे होतें तितकें अद्याप झालेलें नाहीं, याचीहि रुखरुख वाटल्यावांचून रहात नाहीं.

---

१. हे दोघेहि नुकतेच दिवंगत झाले.

वहिवाटीचा व कायद्याचा प्रश्न आहे. नुसता इंग्रजी येण्याचा किंवा समान संधीचा नाहीं. जा, शिरा ताणताणून वितंडवाद करतां करतां दमला आहेस." आणि असें म्हणून ते तेथून निघाले. पण पुन्हां वळून ते म्हणाले, " हें पहा, तुला फीची मदत लागली तर माझेजवळ केव्हांहि माग; मी देईन." मी किती खजील व शरमिंधा झालों असेन !

' अव्यापारेषु व्यापार ' म्हणून नव्हे तर आर्थिक स्वावलंबनाच्या नादामुळें मीं कांहीं कांहीं चमत्कारिक गोष्टी—विद्यार्थिदशेला न शोभणाऱ्या अशा केल्या आहेत. त्यांत स्वावलंबनाच्या आवडीबरोबरच आज्ञापालनाचाहि भाग असल्यामुळें मला आतांहि त्या केल्याचें फारसें वाईट वाटत नाहीं. दादांना सवड नसे तेव्हां त्यांच्या ' यजमानां ' कडे सोमवारची रुद्राची एकादशणी करण्यासाठीं मी जात असें. ( एवढें बरीक बरें होतें कीं, मला रुद्र येत होता. ) शिवरात्रीचे तीन दिवस ओंकारेश्वराचे देवळांत रुद्राचा स्वाहाकार असे. तेथें जाऊन मी दक्षणा मिळवीत असें.

आणि एकदां तर पुण्यांतील सुप्रसिद्ध बॅरिस्टर काशिनाथपंत गाडगीळ यांचे घरीं पक्षाच्या ब्राह्मण म्हणून जेवून व बरीचशी दक्षणा घेऊनहि आलों ! श्राद्धपक्षविधींतलें मला कांहीं कळत नसतांनाहि मी तेथें एक पितर म्हणून बसलों याची माझी मलाच लाज वाटून मी सबंध जेवणभर मान खालीं घालून बसल्याचें चित्र अजून माझ्या डोळ्यांपुढें आहे. कोणी विद्यार्थी पैसे मिळवून विद्या करण्याच्या सद्हेतूनें श्राद्धपक्षांना ब्राह्मण गेला तर तें आतां मला बिलकूल आवडणार नाहीं.—तेव्हांहि फारसें आवडलें नाहींच; पण वडीलधाऱ्या माणसांच्या आज्ञा पाळायच्या हाच आम्हां लहानांचा धर्म असें त्या वेळीं वाटे. आणि म्हणून इच्छा नसतांहि अशा गोष्टी घडत.

◎ ◎ ◎

## जंजि-यांतील जीवन : : : ६

मी नू. म. विद्यालयांत सातवींत गेल्यावर थोड्याच दिवसांत पुण्यांत प्लेगाचा प्रादुर्भाव झाला व तेथील सर्व शाळा बंद करण्यांत आल्या. सुटींत मी दिवें अगरांत कसा गेलों, व माझे मेहुणे–ती. बाबा अवळसकर–यांनीं जंजिरा येथील सर सिद्दी अहमदखान हायस्कूलमध्यें मॅट्रिकचे वर्गात माझी सोय कशी केली हें मागें सांगितलेंच आहे.

जंजिरा हें बंदर मुंबईहून बोटीनें अवघ्या तीन-चार तासांत येतें, व माझ्या बहिणीच्या गांवापासून तेथें पायीं जावयालाहि तितकाच वेळ लागतो. मुरूड ही जंजिरा संस्थानाची राजधानी असून तें त्या वेळीं तरी फारसें मोठें नव्हतें. एखाद्या तालुक्याच्या गांवायेवढेंच असेल. पण एका मातबर मुसुलमानी संस्थानाची राजधानी म्हणून त्याचा दरारा असे. तेथील एक मोठी कौतुकास्पद व अभिनंदनीय गोष्ट म्हणजे सबंध संस्थानांत प्राथमिक शिक्षण तर मोफत होतेंच, पण दुय्यम शिक्षणहि नाममात्र फी ( महिना चार आणे ) घेऊन दिलें जात असें.

दिवें अगरांत कांहीं दिवस राहून मी मुरुडास गेलों. माझें अगरांतील तें वास्तव्य मोठ्या मजेंत व आरामांत गेलें. पहांटे उठून रहाटास बैल जुंपावेत, शीळ घालीत घालीत नारळी, पोफळीचें शिपणें काढावें, रहाटावर पन्हाळीखालीं बसून खूप वेळ स्नान करावें, किंवा विहिरींत मनसोक्त डुंबावें, स्वतःचीं धुणीं दादांच्या पद्धतीनें चुबकून व अघळून धुवावीं, बागेंतलीं फुलें काढून देवपूजा करावी, व शहाळ्याच्या चटणीबरोबर ऊन ऊन पानगी खावी; नंतर इकडे तिकडे करीत ताज्या वर्तमानपत्राची वाट पाहावी, नाहीं–तर केसरी, काळ, केरळ–कोकीळ यांच्या जुन्या फायलींच्याळींत बसावें.

दुपारच्या जेवणाचा बेत मला फार आवडत असे. विशेषतः तांदुळाची कढत भाकरी, घरचें साजूक तूप, बिरड्यांची उसळ, अळवाच्या वड्या व कढी हे पदार्थ माझ्या विशेष आवडीचे असल्यानें चिंगुताई ते बरेच वेळां करी. दुपारीं झोंप झाल्यावर पुन्हां थोडें वाचन करून मी माझ्या मोठ्या भाच्यांना सुपारी पष्ठळायला, किंवा नारळ निसायला लागें. एखादे वेळीं झांप विणायलाहि बाबांबरोबर बसे. संध्याकाळीं दही–पोहे किंवा कोळ–पोहे पोह्यांच्या पापडांबरोबर खाऊन मुलांबरोबर समुद्रकिनाऱ्यावर जाई, व तेथील मऊ पुळणीवर हुतुतू, लंगडी वगैरे खेळें, किंवा शंख शिंपले गोळा करीत लांबवर हिंडून येई. रात्रीं जेवण झाल्यावर झोंपाळ्यावर बसून बाबांकडून टिळक, परांजपे, सावरकर वगैरेसंबंधीं रसभरीत गोष्टी ऐकें.

अगरांत एक महिना अशा मजेशीर रीतीनें घालवून मुरूडची शाळा सुरू होण्याच्या सुमारास मी मुरुडास गेलों.

मुरूडला जाण्याचा तो दिवस मला अद्याप आठवतो. स्वतः बाबा मला पोंचविण्यास आले होते. दिवें अगर ते मुरूड हें अंतर दहा–वीस मैलांचें असेल. बराचसा रस्ता घाटींतून जातो. निम्में अंतर गाडींतून गेल्यावर कांहीं-तरी कारणानें ती गाडी आम्हांला अर्ध्या वाटेंतच सोडावी लागली. ट्रंक, वळकटी; वगैरे माझें सामान नेण्याला वाटेंत ऐत्या वेळीं कोणी हमाल मिळेना. ऊन म्हणजे मी म्हणत होतें. पुढच्या तरीवरील मचवा सुटण्याची वेळ होत आली होती. अशा परिस्थितींत वाट पाहत बसणेंहि शक्य नव्हतें. तेव्हां बाबांनीं स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारण्याचें ठरवून स्वतःच तें सर्व ओझें रुमालाची चुंबळ करून डोक्यावर घेतलें, व मी हातांत एक कंदील मात्र घेऊन त्यांचेबरोबर भराभर चालूं लागलों. बाबांचा वर्ण तांबूस गोरा होता; त्यांतच कडक ऊन ! त्यामुळें त्यांचा चेहरा लालबुंद झाला. डोक्यावरून घाम निथळत होता. हें सर्व दृश्य व बाबांचें माझ्यावरचें तें प्रेम मी कधींहि विसरणार नाहीं.

मुरुडास गणपति पाखाडींत अप्पाकाका जोशी नांवाच्या एका पोक्तशा ज्योतिष्यांच्या घरीं त्यांच्या पडवीवरच्या एका लहानशा खोलींत माझी राहण्याची योजना केली होती. ती खोली इतकी लहान होती कीं, मी तींत जेमतेम मावत असें. एका जुन्या झोंपाळ्यावर एक

सतरंजी व घोंगडी, पुढें एक लोखंडी ट्रंक व तिच्यावर लटकणारा एक जपानी कंदील एवढेंच काय तें माझें ' फर्निचर ' असे. खोलीला दर्शनी बाजूनें भिंत नसून नुसते उभे लाकडी गजच मारलेले होते, आणि म्हणून माझे मित्र माझ्या या जागेला ' खोली ' असें न म्हणतां पिंजरा किंवा सापळा म्हणत.

राहण्याची जागा जरी असली असली तरी घरांतलीं माणसें मात्र अत्यंत सालस व प्रेमळ असून मला परकें-परकें वाटूं नये म्हणून अतोनात झटत असत. घरांत मिरच्यांची उसळ झाली, नवीन पापड केले, दारच्या म्हशीच्या दुधाचा खरवस झाला म्हणजे तीं मला आठवणीनें घरांत बोलवीत, व ते पदार्थ देऊन आपला घरोबा व्यक्त करीत.

म्हातारबाबा व त्यांच्या पत्नी या दोघांशिवाय त्यांची एक बालविधवा मुलगीहि माझ्यासंबंधीं विशेष आपुलकी दाखवी. इतकी कीं, मी असल्या सापळेवजा खोलींत राहतों याचें हें एक प्रमुख कारण असावें असें माझे मित्र थट्टेनें म्हणतहि. त्यांचा नारायण म्हणून एक दोन-अडीच वर्षांचा गोरा, गुटगुटीत मुलगा होता. कांहीं सुचेनासें झालें म्हणजे मी त्याला खेळवीत असें. हल्लीं तो एक बडा व्यापारी झाला आहे असें ऐकतों.

समोरच्या वाडींत पहांटेस बैल लागले म्हणजे मी गार पाण्यानें स्नान करावें, कपडे धुवून वाळत घालावेत, खोलींतल्या खोलींत झोपाळ्यावर शें-दीडशें नमस्कार घालावेत, जेजारच्या गणपतीचें दर्शन करून यावें, व तेथपासून जें अभ्यासाला लागावें तें जेवणाची वेळ होईतों. मध्यंतरीं कांहीं तोंडांत टाकावेंसें वाटलेंच तर अगरांतून बहिणीकडून आलेल्या पोह्याच्या दोन मुठी गोव्याच्या खोबऱ्याच्या तुकड्याबरोबर,—चवीकरतां मिठाचा दाणा घालून मोठ्या चवीनें खाई.

जेवणापूर्वीचें पाटपाणी करणें, व नंतरचें उष्टें-खरकटें करणें हीं कामें मीच करीत असें. तांबूससर भात, पातळसर ताक व शेकटाच्या शेंगांचें कालवण या तीन पदार्थांवर बहुधा भागवावें लागे. पण मजा अशी कीं, ही एकंदर व्यवस्था माझ्या विद्यार्थिदशेला अनुरूप व साजेशीच आहे अशी माझी भावना असल्यानें त्या रुक्ष, कष्टाळू व काटक राहणीचें मला त्यावेळीं यत्किंचितहि वैषम्य वाटत नसे.

एकदां माझे दादा मला भेटण्याकरितां म्हणून पुण्याहून अचानकपणें माझ्या खोलीवर आले. खोलीचें तें वैभव व माझा तो थाट पाहून त्यांच्या डोळ्याला पाणी आलें; व मला तेथून पुण्यास परत नेण्याचें त्यांनीं मनाशीं ठरविलें. पण मी स्वत: अशाहि परिस्थितींत सुखी आहें व शाळेंतील माझें सर्व चांगलें चाललें आहे हें पाहून त्यांनीं मला नेण्याचा आपला बेत रद्द केला. नाहीं म्हणावयास जातांना मला तीन रुपये देऊन व 'जिवाचे हाल करूं नकोस' असें बजावून ते परत गेले.

माझें मॅट्रिकचें शिक्षण जंजिरा हायस्कुलांत झालें हें फार चांगलें झालें. वर्गाची फी—मागें सांगितल्याप्रमाणें—अवघी चार आणे असून जेवणा-खाण्याची व राहण्यासवरण्याची सर्व सोय बाबांनीं आपले मित्र भाऊराव वाडदेकर यांचेकडेच केली होती. त्यामुळें मला (म्हणजे माझ्या वडिलांना) कसलाच खर्च आला नाहीं.

शिवाय मी नू. म. विद्यालयांतच शेवटपर्यंत राहिलों असतों तर मॅट्रिकची परीक्षा पहिल्या खेपेसच पास झालों असतों असें सांगवत नाहीं. कारण तेथील शिक्षक कितीहि वाक्बगार असले तरी वर्गातील चाळीस-पन्नास विद्यार्थ्यांवर सारखेंच वैयक्तिक लक्ष ठेवणें त्यांना शक्य नव्हतें. आणि मग तेथेंच डुब्बी खाल्ली असती तर पुढचा सर्व जीवनौघच बदलला असता. असो. झालें तेंच बरें झालें.

जंजिरा हायस्कुलांत गेल्यानें माझा आर्थिक फायदा तर झालाच, पण त्याशिवाय दुसराहि मोठा फायदा झाला. तेथील मॅट्रिकच्या वर्गात त्या वेळीं चार-पांच विद्यार्थीच असल्यामुळें सर्व शिक्षकांचें लक्ष सर्व विद्यार्थ्यां-वर व्यक्तिश: राही.

तेथील शिक्षकांचा संचहि त्या वेळीं मोठा चांगला होता. मुख्याध्यापक श्री. बा. अ. भिडे हे सुप्रसिद्ध साहित्यिक व मराठींतील मार्मिक टीकाकार होते. ते शिकवीत मात्र रसायनशास्त्र व खगोलशास्त्र व तेंहि उपकरणांचा उपयोग न करतां नुसत्या नोट्स् देऊन व आमचेकडून घोकून घेऊन. त्यामुळें त्यांच्या मराठी विषयाच्या व्यासंगाची व त्यावरील असामान्य प्रभुत्वाची आम्हां विद्यार्थ्यांना कांहींच कल्पना नसे. ते त्या वेळीं मोरोपंतावर कांहीं तरी लिहीत असले पाहिजेत. कारण केव्हांहि त्यांचे घरीं जा ते तोंडांत

तंबाकूचा बार व हातांत मोरोपंती काव्य अशा स्थितींत आपल्या खोलींत येरझारा घालीत असलेले दृष्टीस पडत.

धामणकर, कुळकर्णी, बापू जोशी असे आणखीहि शिक्षक त्या वर्गाला होते. त्या सर्वांची व माझ्या मेहुण्यांची चांगली जान-पछान असल्यानें, व विशेषतः मी पुण्याच्या शाळेंतला विद्यार्थी, मराठी निबंध वगैरे चांगल्या प्रकारें लिहिणारा, असा असल्यानें ते माझी विशेष काळजी घेत. हे तिघेहि शिक्षक आपापल्या विषयांत तरबेज नसले तरी बऱ्यापैकीं होते येवढें खरें.

आमच्या वर्गांतल्या पांच विद्यार्थ्यांपैकीं मला या घटकेला तीनच आठवतात. एक दत्तोपंत सोहोनी, दुसरे भाईसाहेब मेढेकर व तिसरे मलुमामा कुळकर्णी. दत्तोपंतांचा व माझा अति स्नेह होता. मुंबईस परीक्षेस गेलों तेव्हां मी त्यांचेबरोबर त्यांच्या मामांकडेच उतरलों होतों. पुढें माझी भाची त्यांस दिल्यामुळें साध्या स्नेहाचें रूपांतर सासऱ्या-जावयाच्या नात्यांत झालें. भाईसाहेबांचे वडील जंजिरा संस्थानांत एक बडे अधिकारी असून भाईसाहेबहि पुढें सब्‌जज्‌च्या जागेपर्यंत चढले होते. ते आतां निवृत्त होऊन जंजिऱ्यासच वास्तव्य करीत आहेत.

भाईसाहेब मेढेकरांकडे मी अभ्यासाला जात असल्यानें त्यांच्या घरच्या सर्व मंडळींची व माझी चांगली ओळख झाली होती. एकदां त्यांच्या धाकट्या बहिणीला एका स्त्री-समाजांत ‘अहिल्याबाई’ या विषयावर निबंध वाचावयाचा होता. माझें मराठी बऱ्यापैकीं असल्यामुळें भाईसाहेबांनीं निबंध माझ्याकडून लिहवून घेऊन बहिणीकडून वाचविला. आश्चर्य असें कीं, तिच्या त्या निबंधाला पहिलें बक्षिस मिळालें. निबंध खरोखरच चांगला होता म्हणून त्याला बक्षीस मिळालें, का लेखिका एका बड्या अधिकाऱ्याची मुलगी होती म्हणून मिळालें हें समजण्यास आतां मार्ग नाहीं.

त्या काळीं मुंबई विद्यापीठाच्या सर्व परीक्षा फक्त मुंबईसच होत असल्यामुळें मला परीक्षेला मुंबईसच जावें लागलें. आपण गरीब असून दुसऱ्यांवर अवलंबून आहों ही जाणीव सारखी असल्यामुळें परीक्षा झाल्या-वरहि जिवाची मुंबई वगैरे करण्याच्या फंदांत मी पडलों नाहीं. शिवाय

आपण पास होतों का नाहीं अशी धाकधूक सारखी वाटत असल्यामुळें निकाल लागेपर्यंत घरींसुद्धां मी चोरट्याचोरट्यासारखाच वागत होतों.

शेवटीं एकदांचा निकाल लागला व मी पास झाल्याचें समजलें. माझ्या मातापितरांना—विशेषतः मातेला–माझ्या रिझल्टासंबंधीं इतकी काळजी वाटत होती कीं, मॅट्रिक्युलेशन म्हणजे मातृक्लेशन या श्लेषात्मक म्हणण्याची सार्थता पटे. आमच्या पटवर्धन घराण्यांतला मी पहिला मॅट्रिक याची घरच्या मंडळींना व इतर आप्तेष्टांनाहि केवढी धन्यता वाटली !

शिवाय मौज अशी झाली होती कीं, माझ्या वरच्या नंबरावर व खालच्या नंबरावर पटवर्धन आडनांवांचेच दोन विद्यार्थी रत्नागिरी हायस्कुलांतून बसले होते. पुढें प्रसिद्धीस आलेले १ गोविंद परशुराम पटवर्धन व २ रामकृष्ण पुरुषोत्तम पटवर्धन हेच ते दोन विद्यार्थी होत. त्यांचा तो कोंकणी पोषाख व कोंकणी बोलणें, पण तरतरीत मुद्रा व पाणीदार डोळे अद्यापहि मला चांगले आठवतात. परीक्षेंत दोघांचा अनुक्रमें दुसरा व पहिला नंबर येऊन दोघांनाहि जगन्नाथ शंकरशेट संस्कृत स्कॉलर्शिपा मिळाल्या होत्या. रा. पु. ना पहिली व गो. प. ना दुसरी.

हे दोघेहि युनिव्हर्सिटीच्या पुढच्या सर्व परीक्षांत सारखेच चमकले. पैकीं रा. पु. हे सतत पहिले येत गेल्यानें ते सरकारी कॉलेजांतून प्रोफेसर झाले व चढत चढत मुंबई प्रांताचे [1]डी. पी. आय्. होऊन निवृत्त झाले. गो. प. नीं स्वतःला पुण्याच्या शिक्षण-प्रसारक मंडळीला वाहून घेतलें व बरींच वर्षें सोलापुराला काढून तेथील हरिभाई देवकरण हायस्कूल फार नांवाला आणलें.

आम्हां तिघां पटवर्धनांचे नंबर जवळ-जवळ असल्यामुळें व त्यांपैकीं कोणातरी दोघांना शंकरशेट संस्कृत शिष्यवृत्ति मिळाल्याचें ऐकल्यामुळें ज्यांना माझें पूर्ण नांव माहीत नव्हतें अशा लोकांना मलाच संस्कृत शिष्यवृत्ति मिळाली असें वाटलें व त्यांनीं माझ्या वडिलांचें व वडील बंधूंचें

---

१. डी. पी. आय्. =डायरेक्टर ऑफ् पब्लिक एज्युकेशन. हल्लीं या अधिकाऱ्याला नुसतेंच डी. आय्. म्हणजे 'डायरेक्टर ऑफ् एज्युकेशन' असें म्हणतात.

अभिनंदन केलें. त्यांना तसें वाटणें हें निव्वळ सदिच्छेच्या पोटचें ( पायस् विशिंग् ) नसून त्याला थोडेंसें कारणहि होतें. मी शास्त्र्यांचा मुलगा, माझे बंधूहि उत्तम शास्त्री. अशा परिस्थितींत माझेंहि संस्कृत उत्तम असणारच, अशी तर्काधिष्ठित कल्पना त्यांनीं केली असल्यास त्या बिचाऱ्यांची फारशी चूक नव्हती. चूक असलीच कोणाची तर ती माझी. तरी बरं, दैवानें खैर केली म्हणून मी पास तरी झालों !

मी पास झाल्याचें ऐकल्याबरोबर माईनें पेढे वाटले कीं नाहीं तें आठवत नाहीं. बहुतेक नसावेतच. त्या काळीं परीक्षेचे पेढे वाटण्याची चाल सर्रास नव्हती. माईनें बाबांकडून सत्यनारायणाची पूजा मात्र करविली.

पुढच्या म्हणजे प्रीव्हिअस्च्या परीक्षेला आम्ही तिघे पटवर्धन पुन्हां एकत्र आलों. पण त्यांची संगति मला सतत नडत राहणार असें वाटून मी आपण होऊन त्यांस आनंदानें पुढें जाऊं दिलें, व माझें गाडें मुद्दाम मागें ठेवलें. शहाणा ड्रायव्हर नाहीं का मागल्या धांवत्या व धांदल्या मोटारीला हातानें खूण करून स्वतःच्या पुढें जाऊं देत ? ते दोघे त्याहि परीक्षेंत पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाले, आणि मी–पण पुढचें कशाला सांगूं ?

मी मॅट्रिक झाल्याबरोबर मला मिलिटरी अकौंट्स् ऑफिसांत एखाद्या कारकुनाच्या जागेवर चिकटविण्याची बाबांची फार इच्छा होती. आणि तें नच जमतें तर घरच्या घरींच संस्कृत अधिक शिकवून थोड्याच दिवसांत मला पुराणिक बनविण्याचा त्यांचा बेत होता. पण मागें सांगितल्याप्रमाणें माझ्या थोरल्या बंधूंनीं बाबांच्या बेतांत खो घातला व मला फर्ग्युसन् कॉलेजमध्यें घालण्याचा आग्रह धरला. अर्थात् वर्षाच्या साठ रुपये फीशिवाय दुसरा खर्च फारसा येणार नव्हता. कारण मी पर्वती ते फर्ग्युसन-कॉलेजपर्यंतचें एवढें अंतर पायीं जाणार होतों, व अभ्यास दुसऱ्यांच्या पुस्तकांवरून करणार होतों. आपण सायकलीची, किंवा पुण्यांत राहण्याची, किंवा स्वतःच्या पुस्तकांची मागणी केली तर कॉलेजच्या शिक्षणाला कायमचे मुकूं अशी धास्ती मनांतून वाटत असल्यानें मीं तसलें कांहीं केलें नाहीं.

गोष्टच निघाली म्हणून सांगतों; सबंध कॉलेजच्या शिक्षणांत पुस्तकांप्रीत्यर्थ

माझे फार तर वीस रुपये खर्च झाले असतील. बी. ए. च्या वर्गांत तत्त्वज्ञान विषय ऐच्छिक घेतला होता, त्या विषयाच्या नोट्स् खुद्द प्रो. भाटे वर्गांत सांगत व आम्ही विद्यार्थी त्या उतरून घेत असूं नाहीं म्हणावयास मॉर्टिनो नावाच्या तत्त्ववेत्त्याचीं दोन पुस्तकें दहा रुपये देऊन विकत घ्यावीं लागलीं. पण तीहि रक्कम माझ्या थोरल्या बधूंचे एक यजमान ( या शब्दाचा विशेष अर्थ मागें सांगितलाच आहे ) कै. वामनराव सहस्रबुद्धे यांनीं शास्त्रीबुवांवरील आपल्या लोभाखातर मला बक्षीस दिली.

० ० ०

# पुण्यांतील वास्तव्य : : : ७

मी मॅट्रिकची परीक्षा जंजिरा हायस्कुलांतून पास झाल्यामुळें माझें जंजिऱ्याचें व दिवें अगराचें जीवन संपुष्टांत आलें, व मी पुन्हां पहिल्यासारखा पर्वतीकर बनलों. आमच्या घराण्यांत चार-पांच पिढ्यांत इंग्रजी शिकलेला मी पहिलाच मुलगा होतों, व अत्यंत कठिण समजल्या गेलेल्या मॅट्रिकच्या परीक्षेंत पहिल्या झपाट्यांत पास झालों होतों; यामुळें घरांतील सर्वांनाच विशेष आनंद झाला, व त्या आनंदाच्या भरांत सर्वांनी—बाबांनीं सुद्धां—मला कॉलेजांत पाठविण्याचें ठरविलें. अर्थात् कॉलेज म्हणजे फर्ग्युसन कॉलेजच; कारण त्या काळीं डेक्कन कॉलेज येवढें एकच दुसरें कॉलेज असून आमच्यासारख्या गरिबांना तें परवडण्यासारखें नव्हतें.

मी कॉलेजमध्यें गेल्यानंतर थोड्याच दिवसांनीं माझे वडील अचानकपणें दिवंगत झाले, व रूढीप्रमाणें एका वर्षाचे आंत माझें लग्न उरकण्यांत आलें. माझा विवाह झाला तें वर्ष १९०९ असून माझें वय त्या वेळीं अवघें वीस वर्षांचें होतें.

त्या काळांत वधूपरीक्षा अशी फारशी नसेच. साधारणपणें गण-गोत्र कुल-शील वगैरे जमलें म्हणजे वधू पसंत पडण्यास हरकत नसे. हुंडा, करणी वगैरेसंबंधीं थोडासा घोळ पडे, नाहीं असें नाहीं. पण त्याहि बाबतींत फारसें ओढून धरलें जात नसे. वधूपरीक्षा करणाऱ्या परीक्षकव्यक्ती कुटुंबांतील सर्व लहान-थोर मंडळी असत. नाहीं म्हणावयास फक्त वरच काय तो नसे. उघडच आहे, त्याचें मत तें काय घ्यावयाचें आहे ! वर-पक्षाकडील परीक्षक आपलें काम जबाबदारीनें करीत असल्यानें त्यांनीं पसंत केलेली वधू वरालाहि पसंत पडे. माझीच बाबत घ्याना—

लिंबगोव्याचे रहिवाशी व पी. डब्ल्यू. डी. खात्यांतील एक सरकारी अधिकारी श्री. कृष्णाजी रामचंद्र वेलणकर यांची ज्येष्ठ कन्या सौभाग्य-कांक्षिणी यमू मला प्रथम सांगून आली, आणि तिच्याशींच माझें लग्न ठरलें. भाराभर मुली मला दाखविण्यांत आल्या नाहींत, आणि अर्थात् मींहि त्या पाहिल्या नाहींत. पुण्याचे सुप्रसिद्ध कॉंट्रॅक्टर फाटक यांचे कुटुंबांतील एक मुलगी मला सांगून आली होती, पण नाकापेक्षां मोती जड नको अशा पोक्त विचारानें ती नाकारली गेली, व म्हणून तिला दाखविण्यापर्यंत पाळीच आली नाहीं. वेलणकरांच्या मुलीलाहि मी समोरा-समोर असें पाहिलेंच नाहीं. असें समक्ष व साकसुरत पाहणें, किंवा प्रश्न वगैरे विचारून मुलीची चांचणी घेणें असल्या 'वाह्यात' गोष्टी त्या काळीं शिष्टसंमत नसत.

मुलीच्या प्रथम दर्शनाचा तो प्रसंग (चांगल्या अर्थी) मला अद्याप आठवतो आहे. सदाशिव पेठेंतील 'नव्या विष्णूचे'–ऊर्फ बायक्या विष्णूचे मंदिरासमोर कोंपऱ्यावर असनीकर जोशांचा वाडा आहे. तें माझें पंजोळ. त्या वाड्याचें अंगण भलें मोठें असून त्याच्या डाव्या हाताच्या कोंपऱ्यांत एक भलें मोठें लिंबाचें झाड होतें. या झाडाखालीं एक लहानसें दुमजली घर असून त्याच्या वरच्या मजल्याला 'लिंबाची माडी' म्हणत. माझी भावी वधू तें सबंध अंगण ओलांडून गजगतीनें मुख्य इमारतींत शिरली. लिंबाच्या माडीवरील खिडकींत दबा धरून बसलेल्या मीं टिपण साधून मोठ्या शिताफीनें तिचें ओझरतें दर्शन घेतलें, आणि ती मुलगी–मुलगी नाहीं तर काय! ती अवघी अकरा वर्षांचीच असेल–एकदम 'मनामधि भरली!' बोलणें नाहीं, दृष्टादृष्ट नाहीं–कूच कांहीं नाहीं.

मीहि माझ्या चुलत श्वशुरांना ([1]दादासाहेब वेलणकरांना–त्यांनींच

---

(१) दादासाहेबांनीं जसें मला प्रथमच पाहिलें तसें त्यांनाहि मी प्रथमच पाहत होतों. त्यावेळीं ते चांगले ताकदीचे जवान दिसले. पोषाख मात्र जरा धामेपणाचा दिसला. ते हातमागाचा धंदा करीत असल्याचें ऐकून माझ्यासारख्या कॉलेजमधल्या मुलाला तितकेसें बरें वाटलें नाहीं. हेच 'विष्णुकाका' पुढें एक मोठे कारखानदार व दोन गिरण्यांचे मालक बनून आपल्या कर्तबगारीवर गडगंज लक्ष्मी मिळवतील व

(टीप पुढील पानावर)

मला प्रथम पाहिलें ) एकदम पसंत पडलों. पहिल्याच पाहण्यांत मी त्यांना कसा दिसलों याचें किंचितसें वर्णन त्यांनीं आपल्या ' मी कारखानदार कसा झालों ' या ग्रंथांत केलें आहे. ते म्हणतात : " नारायणराव स्वभावानें सज्जन व निष्ठावंत आहेत. " माझें हें वर्णन लग्नावेळचें का ग्रंथ लिहिला त्या वेळचें ? आणि मला तें पूर्णपणें लागूं तरी पडतें का ? पण तें असो. त्यांचा माझ्याबद्दलचा सद्भाव लक्षांत घ्यावयाचा.

माझ्यासकट सर्वांना मुलगी पसंत पडून आमचें लग्न झालें. लग्न दादांनीं किती हौसेनें केलें याचें वर्णन मागें आलेंच आहे. लग्नाच्या दुसऱ्या दिवशीं आमचें ग्रामदैवत–पर्वतीवरील देवदेवेश्वर–याचे दर्शनासाठीं आमचें ओवर टांग्यांतून–मी टांगेवाल्यापाशीं, ती मात्र मागच्या सबंध सीटवर एकटी, अशा पद्धतीनें चाललें असतांना मी माझ्या प्रिय वधूला ' तुमचें नांव काय ? ' असें भीत–भीत विचारलें. ती उत्तरली ' यमू '. हेच काय ते आमचे सवाल-जबाब. त्याच वेळीं मी तिला समोरासमोर व साकसुरत पाहिलें. मुलगी दहाजणींसारखी होती. मी तरी कोठें लाखांतला होतों ? तिच्यांतील गुणांचें वगैरे वर्णन यथाकाल व यथावकाश येईलच. येथें एवढेंच सांगतों कीं, ती कृष्णेच्या पाण्यावर पोसलेली असल्यानें हाडापेरानें दणकट व प्रकृतीनें कणखर होती.

मी शास्त्री घराण्यांतला असलों तरी लग्नानंतर कांहीं थोडे दिवस थोडा–फार ' रोमान्स ' केला आहे. कपाळ दुखण्याचा बहाणा करून माईकडून बायकोला खोलींत जाण्याबद्दल सांगव, कधीं कोठें मेहूण जावयाचें झाल्यास ( आणि असें मेहूण पुष्कळ वेळां जावें लागे ) पर्वतीहून पुण्यास दोघांनीं बरोबर जा, जातांना सशाच्या पाळीवरच्या दाट आमराईत जरा आडोशाला बसून कानांत कुजबुजत हितगुज कर–अशा तऱ्हेचा तो आमचा रोमान्स

( मागील पानावरून )

आपली सुवर्णतुला करून लक्षावधि रुपयांचा दानधर्म कर्णाच्या औदार्यानें करतील, किंवा सबंध कारखान्याची जाळपोळ चालू असतांना तिच्याकडे जनकाच्या निरक्ततेनें व धैर्यानें पाहत राहून तो पुन्हां पूर्ववत् उभा करतील असें कोणाला स्वप्नांत तरी वाटलें असतें काय ? अशा कर्तृत्ववान् व दानशूर सासऱ्याचा जांवई होण्यालाहि भाग्य लागतें.

असे. हा रोमान्स नेहमीं नेहमीं पाहून माझ्या मोठ्या भावजया आपआपसांत कुजबुजत—"सासूबाईना आतां सर्व कांहीं चालेल ! आमच्याच वेळेला तेवढें चालत नसे. बायकोनें नवऱ्याकडे नुसतें पाहिलेलें सुद्धां खपत नसे."

वैवाहिक जीवनांतल्या नव्या नवतीचा तो काळ असल्यामुळें अभ्यासाकडे माझें दुर्लक्ष झालें, व मी कॉलेजच्या पहिल्या वर्षीच्या परीक्षेंत नापास झालों. नापास झाल्याचें कळलें त्या दिवशीं दुःखावेगांत तिन्हीसांजा आमची स्वारी आतां पेशवेपार्क शेजारीं जेथें बोटिंग्ची सोय आहे त्या ठिकाणच्या खोल पाण्यांत जीव देण्यासाठीं गेली होती; पण दहा—पांच मिनिटांतच मनाला उपरति होऊन ती मागें परतली; आणि तिनें देशाला एका मोठ्या राष्ट्रीय आपत्तींतून वाचवलें ! बरें झालें ना ! वडील अगोदरच निवर्तले होते, नाहीं तर मी नापास झालेला पाहून त्यांना रागहि आला असता आणि वाईटहि वाटलें असतें.

पर्वती ते फर्ग्युसन कॉलेज एवढें अंतर रोज पायीं तुडवावें लागतें, खाण्यापिण्याची आबाळ होते, अभ्यासाला पुरेसा वेळ मिळत नाहीं, स्वतःचीं पुस्तकें असलेल्या मित्रांचें पुरेसें सान्निध्य लाभत नाहीं अशा निरनिराळ्या खऱ्या—खोट्या सबबींवर मी पर्वती सोडून पुण्यास राहावयास जाण्यासंबंधीं बंधूंना सुचविलें, व त्यांनाहि माझें म्हणणें पटून त्यांनीं पर्वती सोडली. शुक्रवार पेठेंत छपरबंद आळींतील काळ्यांचें घर, सदाशिव पेठेंत पेरूगेटाजवळील मैराळांचा वाडा, सोमेश्वरानजीक शनीच्या देवळाजवळची जागा, गाडीखान्यावर असलेलें पाबळकरांचें घर अशीं स्थलांतरें करीत करीत शेवटीं पंतांच्या पिछाडीला महारावांचे घरांत (हल्लींचा 'केंजळे' वाडा) आम्ही कायम बिऱ्हाड केलें.

पुण्यांतील वास्तव्याचा हा काळ सामान्यतः १९०९ ते १९१५ असा सहा वर्षांचा असून त्यांत माझ्या जीवनांतील कांहीं महत्त्वाच्या घटना व किरकोळ पण मनोरंजक गोष्टी घडून आल्या आहेत. यांपैकीं अत्यंत महत्त्वाची घटना म्हणजे मी कॉलेजच्या सर्व परीक्षा उत्तीर्ण होत होत १९१५ च्या मार्चमध्यें फर्ग्युसन कॉलेजांतून एम्. ए. झालों ही एक, व बी. ए. झाल्याबरोबर मला कॅम्प् एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कुलांत मुख्याध्यापकाची नोकरी लागली ही दुसरी होय.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत


माझ्या या फर्ग्युसन कॉलेजानें माझ्या जीवनावर इतके विविध व विपुल संस्कार केलेले आहेत कीं, त्यांचें समग्र वर्णन करावयाचें झाल्यास तें एका स्वतंत्र प्रकरणांतच करावें लागेल. तेव्हां तें पुढच्या प्रकरणावर सोंपवून दुसऱ्या घटनेसंबंधीं व इतर कांहीं मनोरंजक प्रसंगांसंबंधीं येथें लिहून हें प्रकरण पुरें करतों.

एकोणीसशें तेराच्या नोव्हेंबरमध्यें मी बी. ए. झालों व पुढच्या जूनपासून पुणें लष्करांतील चार बावडीजवळ असलेल्या कॅम्प् एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कुलांत मुख्याध्यापक म्हणून काम करूं लागलों. एखाद्या नवथर फलंदाजानें क्रीडांगणावर गेल्याबरोबर सुरुवातीलाच चाराचा टोला लगावावा तसें मी शिक्षणक्षेत्रांत शिरतांच मुख्याध्यापक झालों हें विचित्रच होतें.

पण त्याचें असें झालें होतें कीं, त्या काळीं त्या शाळेची स्थिति अत्यंत हलाखीची असून तेथें बी. ए. मुख्याध्यापक २५–४० रुपयांवर कोणी मिळतच नसे. त्या सोसायटीचे चिटणीस श्री. बाळासाहेब म्हस्के यांनीं वकिलीच्या परीक्षेंत एकदांचें पास होण्यासाठीं म्हणून माझ्या दादांना देवीसप्तशतीचा पाठ करण्यास सांगितलें होतें. शास्त्रीबुवांचा भाऊ मी. अर्थात् मी बी. ए. झाल्याबरोबर त्यांनीं मोठ्या आपलेपणानें मला ३५ रु. पगारावर एकदम लावून घेतलें; व अशा प्रकारें मी एकदमच हेडमास्तर बनलों. प्राचार्य प्र. के. अत्रे, रा. सोहनी, रा. श्रोत्रीय इत्यादि हेडमास्तर माझ्या मागून आल्यामुळें माझ्याशीं तुलना करतां त्यांचें तेथील कर्तृत्व उठून दिसणें स्वाभाविकच आहे.

माझ्यापूर्वी, पुढें हुजूरपागेच्या हायस्कुलांत उत्तम शिक्षक व गणित आणि आरोग्यशास्त्र विषयांवरचीं पाठ्यपुस्तकें लिहून प्रसिद्धीस आलेले श्री. ग. म. देशमुख हे कॅ. ए. सोसायटीच्या हायस्कुलाचे हेडमास्तर होते. ते बाळासाहेब म्हस्के यांजबरोबर त्यांचे रीडर म्हणून वकिलीच्या परीक्षेचीं पुस्तकें वाचीत असत. (रीडर ठेवून परीक्षेचा अभ्यास करणें म्हणजे हाताला हात लावून 'मम' म्हणण्याप्रमाणें किंवा सिनेमांतल्या ब्रेक म्यूझिकप्रमाणें वाटतें. मी कॉलेजच्या पहिल्या वर्षी नापास झालों तो याच पद्धतीचा अवलंब केल्यामुळें.) बाळासाहेबांचें असे चार-पांच रीडर्स झाले होते म्हणे. ते सर्व वकिलीच्या परीक्षेंत पास होऊन गेले, पण बाळासाहेब

मात्र परीक्षेच्या तुटपुंज्या अभ्यासावर जणूं समाधान न मानतां पुन्हां पुन्हां परीक्षेला बसत.

प्रत्येक खेपेस यंदा नक्की पास होऊन आपण वकिलीला लागणार असा त्यांना दांडगा विश्वास वाटे; आणि एके वर्षी तर वकिलाच्या बगलेंत असलेले मिसलीचे कागदहि त्यांनीं अगाऊच छापून घेतले ! परीक्षेत पास होतांक्षणींच आपल्याला जज्–निदान–सब्‌जज् तरी नेमण्यांत येईल असें त्यांना वाटे व एकदां तर त्यांनीं तसें माझ्यापाशीं बोलूनहि दाखविलें होतें. ते शेवटीं पास झाले, पण पुढें थोड्याच काळांत अकालीं मृत्यु पावले. दैवाची काय ही निर्घृण करणी !

अभ्यास करण्याची त्यांची तऱ्हाहि जरा न्यारीच होती. मेन स्ट्रीटवरील घरांतील ४०–५० फूट लांबीच्या त्या विस्तृत हॉलमध्यें ते उजव्या हातांत पुस्तक व डाव्या हाताच्या चिमटींत तपकीर अशा थाटानें सारख्या येरझारा घालीत. तपकिरीचा मारा अखंड चालावा म्हणून हॉलच्या एका टोंकाच्या खिडकींत एक पुडी व दुसऱ्या टोंकाच्या खिडकींत दुसरी पुडी अशी त्यांची योजना असे. दमलेंसें वाटलें म्हणजे ते हॉलच्या मधून मधून मांडलेल्या गादीच्या कोंचावर लुटकत व तसेच झोपीं जात.

बाळासाहेबांनीं मला आपल्या थोरल्या मुलाला शिकवायला ठेवलें होतें. मुलगाहि वडिलांसारखा अत्यंत नम्र. शिक्षकापुढें चुकूनहि एक शब्द बोलणार नाहीं. माझें शिकवणें पाहावयाला म्हणून वडील कधीं कधीं मुला-बरोबर बसत. पण स्वतः अभ्यास करून थकल्यामुळें लवकरच झोपीं जात. पुत्रहि कधीं कधीं पित्याचें अनुकरण करी; आणि मग मी एकटाच त्या एवढ्या मोठ्या अंधारी हॉलमध्यें जाण्याची वेळ होईतों बसून राहीं. बाळासाहेबांना दैव अनुकूल असतें तर ते मोठ्या योग्यतेस चढले असते यांत शंका नाहीं. ते मोठे आशावादी व कष्टाळू होते.

कॅ. ए. सोसायटीचें हायस्कूल इंग्रजी पांचवीपर्यंतचेंच असल्यानें हेडमास्तरला देखरेखीच्या कामापेक्षां शिकवण्याचेंच काम जास्त पडे. शिकवण्याचा माझा अगदीं पहिला दिवस मला चांगला आठवतो. त्या दिवशीं मी प्रथमच रुमाल बांधून भारदस्त व रुबाबदार दिसण्याचा प्रयत्न करीत होतों. इंग्रजी पांचवीच्या वर्गाला " Breathes there the man with soul

so dead" ही स्काटॅची देशाभिमानपर कविता शिकवावयाची होती. घरून पाठ करून नेलेलीं दोन-तीन वाक्यें चाचरत-चाचरत कशीं तरी म्हटलीं; पण पुढें मात्र घाम फुटून वाचा बसल्यासारखी झाली. पण तितक्यांत प्रसंगावधान राखून 'तुम्हांला माझें इंग्रजी हाय पडत असेल तर मराठींत सांगतों;' असा बहाणा करून, व त्यांचेवरच टेपर ठेवून मी मराठींत शिकवूं लागलों. अन् चमत्कार असा झाला कीं, वर्गांतील सर्व मुलें (तीं सात-आठच होतीं) माझ्याकडे आश्चर्यवत् पाहूं लागलीं ! कळत होतें म्हणून, का कळत नव्हतें म्हणून- कोणास ठाऊक ?

मला प्रथम प्रथम चांगलें शिकवितां येत नसलें तरी मी मुलांच्या खेळांत त्यांच्या गप्पा-गोष्टींत व त्यांचेबरोबर हिंडण्यासवरण्यांत समरसतेनें भाग घेत असल्यामुळें थोड्याच दिवसांत त्यांना आवडूं लागलों. आणि एकदां का शिक्षक मुलांना आवडूं लागला म्हणजे त्याचे सर्व दोष व त्याच्यांतील सर्व उणीवा तीं दृष्टीआड करतात. मी त्या वर्षीं प्रथमच ज्यूनिअर क्रिकेट-टीमकरितां विद्यार्थी तयार केले. पहिल्याच फेरींत आमच्या टीमनें मार खाल्ला ती गोष्ट वेगळी.

मी या शाळेंत मुख्याध्यापक असतांनाच ज्याला सार्वजनिक भाषण म्हणतात तें करण्याचा अगदीं पहिला प्रसंग माझ्यावर आला, आणि म्हणूनच तो माझ्या विशेष लक्षांत राहिला आहे. तें १९१५ साल असावें. आमच्या शाळेच्या मदतीकरितां कै. दौलतराव बाबाजी राणे यांच्या राजापूर संगीत नाटक मंडळीनें बुधवारांतील नूतन आर्यभूषण थिएटरांत 'तुकाराम' नाटकाचा आपला हातखंडा प्रयोग केला होता. त्या वेळीं आमच्या संस्थेंत किंवा शाळेंत आभार मानतां येण्याइतपत बोलणारीहि कोणी व्यक्ति नव्हती. 'वांसरांत लंगडी गाय शहाणी' या न्यायानें मीच मंडळीच्या मालकांनीं केलेल्या उदार मदतीबद्दल त्यांचे आभार मानावेत असें ठरलें; आणि निरुपायानें मला हो म्हणावें लागलें.

तिसरा अंक संपल्याबरोबर ड्रॉप पडला व आमच्या सेक्रेटरीसाहेबांनीं मला विंगमधून पुढें स्टेजवर ढकललें. मी पांच-एक मिनिटेंच बोललों असेन. काय बोललों हें मात्र आतां आठवत नाहीं; आणि तेंहि एकप्रकारें बरेंच आहे. येवढें मात्र आठवतें कीं, मी तुकारामाची भूमिका करणाऱ्या

श्री. शुक्लांची शाहूनगरवासी नाटक मंडळीच्या श्री. गणपतराव जोशांच्या तुकारामाच्या भूमिकेशीं तुलना करून तिचें मनमुराद कौतुक केलें. आणि त्या भरांत भान न राहून त्यांच्या पाठीवर थाप मारली! लहान तोंडीं केवढा मोठा हा घास!

शुक्लांचें काम खरोखरच फार चांगलें झालें होतें. 'तुकाराम' बोलपटांतील विष्णुपंत पागनिसांची तुकारामाची भूमिकाहि मीं पुढें पाहिली आहे. तिचाहि आनंद मी चाखला आहे. पण शुक्लांच्या भूमिकेची सर तिला नव्हती असें मला आपलें वाटतें. पुढील अंकांतील शुक्लांचें काम पाहण्यासाठीं प्रेक्षक उत्सुक असल्यानें मी जास्त वेळ घेणें योग्य नाहीं असा समयोचित शेवट करून मीं आपलें भाषण संपविलें. भाषण संपल्याबरोबर प्रेक्षकांनीं टाळ्यांचा कडकडाट केला. माझें कंटाळवाणें भाषण संपलें म्हणून का आतां पुढचें रंगणारें नाटक लवकरच पाहावयास मिळणार म्हणून हें कळण्यास मार्ग नव्हता. पण ज्या अर्थी आमच्या सेक्रेटरींनीं मला नंतर शाबासकी दिली त्या अर्थी भाषण कंटाळवाणें झालें नसावें असें वाटतें.

पहिल्याच वक्तृत्वाचे वेळीं मला चांगलें यश आलें हें जसें जराशा फुशारकीनें सांगितलें तसें याच शाळेंत असतांना माझ्या फजीतीचे दोन प्रसंग घडले तेहि मोकळेपणानें सांगतों.

मी शाळेचा—ती लहानशी का असेना—हेडमास्तर म्हणून शिक्षण खात्यानें मला व्हर्नाक्युलर फायनल परीक्षेचा परीक्षक नेमलें; आणि सर्वांत ज्यूनिअर म्हणून माझ्याकडे भूगोल विषयाच्या उत्तरपत्रिका तपासण्यासाठीं पाठविल्या. त्या वेळचें माझें 'भूगोलाचें' ज्ञान जवळ-जवळ शून्य होतें म्हणाना. त्या काळीं मॅट्रिकच्या परीक्षेंत इतिहास-भूगोल हा जोड विषय असून इतिहासांत बरेचसे मार्क मिळाले म्हणजे भूगोलांत मुळींच मिळाले नाहींत तरी विद्यार्थी पास होऊं शके. मीहि तसाच पास झालों होतों.

प्रश्नांचीं उत्तरें पुस्तकांतून घोकून-घोकून मी पेपर तपासण्यास सुरुवात केली. पण तें एकंदरीत जरा जडच जात होतें. या माझ्या अडचणीचा माझ्या हाताखालच्या एका साळसूद शिक्षकानें नेमका फायदा घेऊन तो मला मदत करण्याच्या मिषानें पुढे आला व आपल्या शिकवणीच्या तीन-चार मुलांना पास करून घेऊन त्यानें चांगली कमाई केली. जगाचा व

विशेषतः हाताखालच्या शिक्षकांच्या लुच्चेपणाचा अनुभव नसल्यानें माझे हातून मला नकळत ही वाईट गोष्ट त्या वेळीं घडली. तरी बरें झालें कीं, वरच्या अधिकाऱ्यांना हा निष्काळजीपणा कळून आला नाहीं, आणि म्हणून पुढच्याहि वर्षीं परीक्षकाचें काम यावयाचें तसें आलें.

या वर्षीं गणिताचे पेपर तपासण्यासाठीं आले. या खेपेस दुसऱ्या कोणाच्या भिडेला बळी पडायाचें नाहीं असें ठरवून सर्व पेपर मी स्वतः तपासले. पण अनवधानानें एक चूक झालीच. एका उमेदवाराला बेचाळीस मार्क पडले असतांना माझे हातून निकालपत्रकांत त्याचे नांवावर नेमके उलटे म्हणजे चोवीस पडले व तो नापास झाला. त्याला पासाची खात्री असल्यानें त्यानें मुख्य अधिकाऱ्याकडे तक्रार केली. अर्थात् मला ऑफिसांतून बोलावणें आलें. चूक उघडच होती, आणि ती मी वाईट वाटून घेत कबूलहि केली.

मी गोरामोरा झालेला पाहून अधिकारी सहानुभूतीच्या आवाजांत म्हणाले, “ अहो, एवढें जिवाला लावून घेऊं नका. कितीतरी जणांच्या हातून असल्या चुका होतात. फरक एवढाच कीं, ते त्या कबूल करीत नाहींत, अन् तुम्हीं मात्र-अद्याप नवथर असल्यानें-ती कबूल केलीत. तुम्ही वाईट वाटून घेऊं नका. मला काय करायचें तें करतों.” मला त्या अधिकाऱ्या-बद्दल किती आदर वाटला ! पुढच्या वर्षीं मात्र माझ्याकडे कसलेच पेपर तपासण्यास आले नाहींत. मी काय समजावयाचें तें समजलों.

सदरहू शाळेंत नोकरी करतां करतां मी एम्. ए. परीक्षेचा अभ्यास करीत असें. सकाळीं कॉलेजवर प्रो. भाटे यांच्या किंवा ‘ जॉन स्मॉल मेमो-रिअल ’मध्यें रे. रॉबर्टसन् यांच्या व्याख्यानांना जावें, अकरा ते पांच शाळेंत शिकवावें व रात्रीं आळस येऊं नये म्हणून डाव्या हातांत कंदील व उजव्या हातांत पुस्तक धरून हिंडत हिंडत तत्त्वज्ञान वाचावें अशी सक्त मेहनत त्या दिवसांत चालू होती. त्यांत आनंदाची गोष्ट एवढीच कीं, तिसऱ्या वर्गांत का होईना, मी पास झालों.

माझ्या काळांत एम्. ए. परीक्षेला उमेदवार फार थोडे असल्यानें इच्छा असल्यास एकमेकांची तोंडओळख होण्यास पंचाईत पडत नसे. माझ्या वरच्या नंबरावर ताराबाई मोडक म्हणून वऱ्हाडांतल्या एक बाई होत्या. तापीबाई हर्डीकर एवढ्या एकच बाई एम्. ए. असलेल्या आतांपर्यंत आम्हांला

माहीत होत्या. कांहीं दिवसांनीं या दुसऱ्या बाई एम्. ए. होणार म्हणून मला तेव्हांपासूनच त्यांचेबद्दल आदर वाटूं लागला होता. पण रिझल्टमध्यें त्यांचें नांव न दिसल्यानें थोडासा हिरमोड झाला. कांहीं वर्षांनीं याच बाई महाराष्ट्रांत पूर्वप्राथमिक शाळा काढून मॉंटेसरी पद्धतीचा पुरस्कार धडाक्यानें करीत असल्याचें ऐकून व त्यांचें त्या संबंधींचें काम प्रत्यक्ष पाहून अतिशय आनंद झाला व त्यांचेसंबंधीं आदर वाटूं लागला.

खरोखरच ताराबाईंची त्या क्षेत्रांतील कामगिरी फार मोठी आहे. एम्. ए. त नापास झालेल्या त्या बाईच इतक्या कर्तृत्ववान् निघाव्या याचें आश्चर्य वाटतें. बाकी कर्तृत्व परीक्षेवर थोडेंच अवलंबून असतें? गेलीं वीस-पंचवीस वर्षें माझ्या कुटुंबामुळें माझा व ताराबाईंचा विशेषच परिचय जडला आहे.

तत्त्वज्ञानाच्या वाचनानें म्हणा किंवा नारळकरांच्या प्रेरणेनें म्हणा, मी या काळांत जरा ध्येयवादी व उच्च आचाराविचारांचा होऊं लागलों होतों. आम्ही त्या वेळीं गाडीखान्यावरील पाबळकरांचे वाड्यांत राहत होतों. आमच्या समोरच एक सोनाराचें जोडपें राहत असे. नवरा नेहमीं दारू पिऊन येऊन बायकोला बेदम बदडायाचा—निदानपक्षीं तिच्याशीं कडकडून भांडून शिवीगाळ तरी करायाचा.

एकदां अशी शिवीगाळी व झोंबाझोंबी चालली असतांना मीं हातांतलें एथिक्स्चें (नीतिशास्त्राचें) पुस्तक खालीं ठेवलें व तें भांडण तोडून बाईला वांचविण्यासाठीं त्या समरभूमीवर गेलों. "बरें आलांत वेळेवर, नाहींतर या राक्षसानें मला ठार मारलें असतें." असें कांहींतरी म्हणून ती बाई माझें स्वागत करील, असें मला वाटलें होतें. पण तसें कांहीं न होतां ती नवऱ्याला सोडून माझ्याच अंगावर धांवून आली. "मेल्या, तुला कोणीं चोंबडेपणा करायला सांगितला? आम्हीं नवरा-बायकू एकमेकांशीं भांडूं, नाहींतर एकमेकांचा जीव घेऊं. तूं कशाला माझी कड घ्यायला आलास?" असें तिनें मला रोखठोक विचारलें. मी खजील होऊन पसार झालों, व पुन्हां नीतिशास्त्र वाचूं लागलों. नीतिशास्त्र थोडें तरी समजूं लागलें होतें, पण व्यवहारशास्त्राच्या नांवानें पूज्य होतें.

बाहेरच्या नवरा-बायकोचें भांडण वर्णन करायला मला तितकीशी

दिक्कत वाटली नाहीं. पण माझ्या घरींहि तोच प्रकार नसे का चालत ? आम्ही नवरा-बायको मोठ्यांदा आणि परक्यांसमोर भांडत नसलों तरी खाजगीरीत्या आमच्या धुसफुशी नेहमींच चालत. तिनें सासूचें नेहमींच ऐकावें, थोरल्या दिरांजावांचें प्रेमानें व आस्थेनें करावें अशासारख्या अपेक्षा माझ्या असावयाच्या. उलट, आपण आतां मोठ्या होऊं लागलों असून, आपण आतां स्वतंत्रपणें वागावें असें तिला वाटावयाचें; आणि मग रुसणीं–फुगणीं चालावयाचीं.

एकदां तिनें माईनें सांगितलेलें काम केलें नव्हतें. मी जेवायाला बसलों होतों व ती वाढीत होती. घरांतलीं गाऱ्हाणीं ऐकायाला मला दुसरा वेळ मिळत नसल्यानें माई आपलीं सर्व तक्रारी-गाऱ्हाणीं जेवणाचे वेळींच माझ्या कानांवर घालीत असे. मी कांहीं विचारतंद्रींत असल्यामुळें माझें लक्ष तिच्या गाऱ्हाण्यांकडे फारसें नव्हतें. मी ऐकत नसल्याचें पाहून माई जास्तच रागावली व "अहारे बावळ्या ! आईची कांहीं चाड आहे की नाहीं ?" असें म्हणाली. तिच्या त्या मर्मभेदक डिवचण्यानें मी एकदम चिडलों, व सर्व अपराध बायकोचाच असला पाहिजे असें मानून मी तिच्यावर भडकलों. नुसता भडकूनच राहिलों नाहीं, तर ताटांतली रिकामी वाटी तिच्याकडे भिरकावली आणि व्हावयाचें तेंच झालें. ती ओक्साबोक्षी रडूं लागली, व मी अर्ध्या जेवणावरून उठून शाळेला निघून गेलों. रात्रीं सर्व गोष्टी समजून आल्यावर मी तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला, पण त्याचा काय उपयोग ?

सोनाराच्या घरीं भांडाभांडी, आमच्या घरीं भांडाभांडी—मला वाटतें, बहुतेक सर्वच कुटुंबांत या ना त्या प्रकारची भांडाभांडी थोड्याफार प्रमाणांत चालतेच. विशेष कांहीं झालें म्हणजे मारामारीहि होते. माझ्या एका सुशिक्षित मित्रानें केवळ एक सामाजिक पाहणी (Social Study) म्हणून आपल्या कांहीं सुशिक्षित मित्रांना मुद्दाम पत्रें लिहून विचारलें, "तूं आयुष्यांत आपल्या बायकोला कधीं मारलें आहेस काय ?" कांहीं थोड्यांनीं नाकबूल केलें, पण बाकीच्या बऱ्याच जणांनीं—जे प्रामाणिक आणि प्रांजल होते त्यांनीं कबूल केलें. हें सर्व सांगण्याचें कारण इतकेंच कीं, बोलाचाली, भांडाभांडी, मारहाण हे सर्व मानवी मनाचे धर्म आहेत. त्यांत

'सुशिक्षित' 'अशिक्षित' असा फारसा फरक नाहीं हें समजून त्यांना विशेष महत्त्व न देतां माणसानें सामोपचारानें व समंजसपणानें वागावें, तरच त्याचा निभाव लागावयाचा; एरवीं नाहीं !

पाबळकरांच्या याच घरांत आम्ही राहत असतांना मी, नारळकर व त्यांचे जुनागडचे गुरु प्रो. महादेव मल्हार जोशी यांना, ते दोघे जुनागडाहून नुकतेच आल्यामुळें जेवावयास बोलावलें होतें. माझे मित्र साठेहि पंक्तीला होते. एवढा मोठा विद्वान् प्रोफेसर, पण हजामत केलेलें डोकें, गळ्यांत तुळशीच्या मण्यांची माळ, व कमरेला कद असा त्यांचा साधा सोंवळा वेष पाहून व नारळकरांनीं त्यांना गुरुस्थानीं मानल्याचें ऐकून माझ्या घरच्या मंडळींना अतिशय आनंद झाला. दादा म्हणाले सुद्धां कीं, "असे गृहस्थ शंकराचार्य होण्याच्या योग्यतेचे आहेत."

प्रो. म. म. जोशी यांचेसंबंधीं नारळकरांकडून पुष्कळच ऐकलें होतें. पण त्यांची प्रत्यक्ष भेट होण्याची ही पहिलीच वेळ होती; आणि पहिल्याच वेळेस माझ्या मनावर त्यांची कायमची छाप पडली. येवढ्या मोठ्या थोर गृहस्थाच्या सान्निध्यात मी वावरतों हें पाहून माझ्या बंधूंना माझ्याबद्दलहि अभिमान वाटूं लागला.

प्रो. जोशी यांचा व माझा पुढें पुष्कळच संबंध आला. त्यांचे धाकटे बंधु प्रो. वामन मल्हार जोशी हिंगण्यास असतांना ते मोठ्या सुट्ट्यांत जुनागडाहून हिंगण्यास नेहमीं येत व आपल्या काव्यशास्त्रविनोदाच्या मेजवान्यांचा लाभ आम्हां हिंगणेकरांना देत. ते तेथेंच १९२८ सालीं कैलासवासी झाले. त्यांच्या सात्विक व उद्बोधक सहवासाच्या सुखाचें वर्णन मीं वा. म. जोशी यांच्या चरित्रांत केलेंच आहे.

याच घरांत असतांना आणखी एक स्मरणीय प्रसंग घडला. धुळवडीची रात्र होती. आमच्या घरापासून थोड्याच अंतरावर चौकांत असलेल्या एका नायकिणीच्या हिरव्या माडीवर गाण्याला रंग आला होता. गाणारणीचा आवाज इतका मोहक व एकंदर प्रसंग इतका मादक होता कीं, चौकांतून जाणाऱ्या–येणाऱ्या रसिक व रंगेल माणसाला तेथें घटकाभर उभें राहून तें गाणें ऐकण्याचा मोह पडल्यावांचून राहत नसे. अशा पांच–पंचवीस रसिक श्रोत्यांबरोबर मीहि तें गाणें ऐकत उभा राहिलों. मी शास्त्र्याचा

मुलगा, एम्. ए. चा विद्यार्थी—आणि तोहि तत्त्वज्ञान घेतलेला, एका शाळेचा हेडमास्तर इत्यादि प्रकारच्या कोणत्याहि गोष्टीचें भान मला त्यावेळीं नव्हतें.

नायकिणीचा मुखडा दिसत नसला तरी तिनें गायलेल्या गाण्याचे गोड आलाप व साजिंद्याची उठावदार साथ हीं स्पष्टपणें ऐकूं येत होतीं; आणि ते कर्णमधुर आलाप ऐकतांना मी स्वर्गीय सुखाचा आस्वाद घेत होतों.

गायिका होती—बाई सुंदराबाई व तीं गात असलेली चीज होती शिमग्याला साजेशी प्रसिद्ध शृंगारपर लावणी—

" मनिं आला गहिंवर । वरि पडलें दहींवर ।
झालें माझें संयिवर । कसा पिकला गहुं ग हरभरा ।
बाळपणिंच्या नाना तऱ्हा—ऽऽ ॥ "

याच काळांत मला पत्ते खेळण्याचा इतका नाद लागला, कीं मी, नारळकर, साठे, माटे व आमचे कॉलेज दोस्त वासूनाना रेटरेकर असे पांचजण रेटरेकरांच्या घरीं रात्र-रात्र बिझिक खेळत असूं. कांहीं दिवसांनीं आमचा हा अड्डा तेथून उठला व नारायण पेठेच्या गेटाजवळ शंकरराव आपटे यांचे घरीं– ( नारळकर कांहीं दिवस तेथें भाड्यानें राहत असत ) पडला. तेथें आम्हीं आतां बिझिक्‌ऐवजीं ब्रिज खेळायला सुरुवात केली. तो डावहि आम्ही रात्ररात्र खेळत असूं. नारळकर लवकरच पुणें सोडून जुनागडास गेले म्हणूनच आमचे हे पत्ते सुटले.

मनोरंजनाचीं दुसरीं कांहीं साधनें फारशीं उपलब्ध नसल्यामुळें आम्हांला हें वेड लागलेलें असावें. वास्तविक पाहतां. त्या वेळीं वाचनाचा किंवा दुसऱ्या एखाद्या ललित कलेचा नाद लागावयास हवा होता, पण दुर्दैवानें तो लागला नाहीं. तेव्हां कोणत्याहि ग्रंथालयांत ( कॉलेजाच्यासुद्धां ) जाऊन वाचण्याची बुद्धि झाली नाहीं. पुस्तकें तर नाहींतच, पण साधीं वर्तमानपत्रें व नियतकालिकेंहि मी वाचीत नसें. मंगळवारचा केसरी व शुक्रवारचा काळ हीं दोनच काय तीं अपवाद. आतां वाचावेंसें वाटतें, पण दृष्टि असहकार करते. असो.

आतां या काळांतील महत्त्वाच्या घटनेकडे—म्हणजे फर्ग्युसन् कॉलेज-कडे वळूं.

❁ ❁ ❁

## माझें फर्ग्युसन कॉलेज : : : ८

मी फर्ग्युसन कॉलेजांत गेलों तो काळ १९०८ चा म्हणजे सुमारें पन्नास वर्षांपूर्वीचा होता. त्या वेळच्या कॉलेजाची--त्याच्या रस्त्याची, त्याच्या इमारतीची, त्यांतील विद्यार्थ्यांची वगैरे कल्पना आतांच्या कॉलेजा-वरून मुळींच यावयाची नाहीं. तसेंच पाहिलें तर हल्लींच्या पुणें शहरावरून व पुणेंकरांवरून त्या वेळच्या पुण्याची व पुणेंकरांची तरी कल्पना कोठें होणार आहे? आम्ही म्हातारीं माणसें काळ जात नाहीं अशी तक्रार उगीच्च करीत असतों. वस्तुस्थिति अशी आहे की, नुसता काळच नव्हे तर त्या काळांत जगणारीं माणसें, त्यांचे आचार-विचार, त्यांच्या सामाजिक व धार्मिक चालीरीती, त्यांची आर्थिक व राजकीय परिस्थिति, त्यांचा संसार, त्यांचे प्रश्न व समस्या वगैरे सर्व कांहीं सारखें बदलत आहे. एक तत्त्ववेत्ता म्हणतो त्याप्रमाणें 'एव्हरिथिंग् इज् इन् ए फ्लक्स्'—

फर्ग्युसन कॉलेजला जाणारा त्या वेळचा रस्ता आतांसारखा रुंद, मोठा, दुतर्फा खूप घरें व बंगले असलेला, दाट लोकवस्तीचा, जाणाऱ्या येणाऱ्यांची सारखी रीघ लागलेला, दुकाना-बाजारांनीं गजबजलेला, विविध प्रकारच्या वाहनांची सारखी धांवपळ असलेला, बायका-मुलींनीं फुललेला असा मुळींच नव्हता. त्या वेळचा तो अरुंद लकडी पूल सोडला की जिकडे तिकडे शांत, उदास व भकास दिसे. मधून मधून गवताच्या गंजी डोकावत असत. आतांच्या डेक्कन जिमखाना कॉलनीच्या जागीं एकजात अंब्याच्या झाडांनीं व्यापलेलें एक मोठें मैदान होतें. त्याला 'आमराई' म्हणत. लकी रेस्टॉरंट्, पोस्ट ऑफिस, महाराष्ट्र बँक, आर्यभूषण छापखाना, रानडे इन्स्टिट्यूट ऑफ् सायन्स, थिऑसॉफिकल लॉज, इ. सारख्या

आज दिसत असलेल्या संस्था व त्यांच्या इमारती अस्तित्वांतहि नव्हत्या. जरा दूरच्या परिसरांत दिसणाऱ्या गोष्टींचा—उदाहरणार्थ टिळक तलाव, डेक्कन जिमखाना, गोखल्यांचा भारत सेवक समाज, लॉ-कॉलेज, भांडारकर इन्स्टिटयूट, बृहन्महाराष्ट्र कॉमर्स कॉलेज, जैन बोर्डिंग, तरुण-तरुणींची कुजबूज चाललेली टेकडी, म्हाताऱ्या-कोताऱ्यांनीं उच्छादिलेला मारुति, इत्यादि संस्था-स्थळांचा कोठें मागमूसहि नव्हता. सारांश, माणसांनीं व संस्थांनीं व्यापलेला आतांचा हा टापू त्या काळीं अगदीं निर्मनुष्य व निःसंस्थ अशा स्थितींत होता.

खुद्द कॉलेजाची जागा जरी ह्या वेळीं मोठी लांब-रुंद विस्तृत वाटे तरी आतांच्या मानानें ती फारच तोटकी होती यांत शंका नाहीं. कॉलेजाची इमारत म्हणजे एक दुमजली वाडा होता. सात आठ वर्ग, फिजिक्स—केमिस्ट्रीच्या लॅबोरेटरीज्, ग्रंथसंग्रह व वाचनालयांकरतां लागणारे हॉल, कॉलेजच्या कचेरीकरतां आणि प्रिन्सिपॉल व प्रोफेसर लोक यांचेसाठीं दोन-तीन मोठ्या सुसज खोल्या, इतक्यांचीच सोय त्या इमारतींत होती. आतां-सारखी अवाढव्य जागा, मोटमोठीं वसतिगृहें, खेळण्याचीं पटांगणें, पोहण्याचे तलाव, तालीमखाने, विद्यार्थीवाचनालयें, रंगमंच असलेलें अर्धवर्तुळ प्रेक्षागृह इ. सारखें त्या वेळीं कांहींहि नव्हतें. प्रोफेसरांची संख्या शेंकड्यांनीं व विद्यार्थ्यांची संख्या सहस्रांनीं मोजण्याइतकी मोठी नव्हती; आणि विद्यार्थिनी तर अभावानेंच तळपत असत. चारपांचशें विद्यार्थ्यांत एखादीच तापीबाई नाहींतर वेणूताई असावयाची.

फर्ग्युसन कॉलेजाचें हें पार्थिव किंवा बाह्य वर्णन झालें. आतां त्याच्या आत्मिक किंवा आंतर बाजूकडे वळूं. संस्थेंतील कार्य करणाऱ्या व्यक्ती ह्या संस्थेचा प्राण. संस्थेची प्रगति तिच्या बाह्य वाढीवरून मापायची नसते, तर तिच्या चालकांच्या गुणसामर्थ्यांवरून. या दृष्टीनें पाहतां—फर्ग्युसन कॉलेज हें आरंभापासूनच अत्यंत दैववान् आहे. आगरकर, टिळक, वा. शि. आपटे अशांसारख्या असामान्य व्यक्तींनीं त्याला जन्म दिला. गोखले, राजवाडे, भानू, पानसे, पटवर्धन, कर्वे, केळकर, लिमये, भाटे, काळे, नाईक, कानिटकर अशांसारख्यांनीं त्याला अंगाखांद्यावर वाहून शक्तिशाली केलें, व परांजपे, गुणे अशांसारख्यांनीं त्याला वैभवाला चढविलें. अशा

स्थितींत फर्ग्युसन कॉलेजाला आतांचें भरभराटीचें व मानाचें स्थान प्राप्त झालें नसतें तरच नवल. भोंवतालची परिस्थितीहि त्याच्या विकासाला थोडीफार कारणीभूत झाली असणार हें उघडच आहे. पण मुख्य कारण म्हणजे कार्यकर्त्यांच्या ठिकाणची वैयक्तिक गुणवत्ता हें होय.

मी कॉलेजांत गेलों तेव्हा रँग्लर रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे हे प्रिन्सिपॉल होते. 'डॉक्टर', 'सर', 'नामदार' इत्यादि उपाधी त्यांना प्रसंगा-प्रसंगानें पुढें मिळाल्या. आमच्या वेळीं ते फक्त 'रँग्लर'च होते. ते विलायतेंत रँग्लर झाले ही त्यांनीं फार मोठी मर्दुमकी गाजविली एवढीच जुजबी माहिती आम्हां सामान्य विद्यार्थ्यांना होती; पण रँग्लर म्हणजे नक्की काय, एम्. ए. कँटब्. म्हणजे काय, त्या वेळचे गव्हर्नर जनरल–लॉर्ड कर्झन-यांनीं परांजप्यांच्या या यशाबद्दल त्यांच्या वडिलांना कोंकणांत अभिनंदनपर तार केली होती हें खरें, का नुसती आपली ऐकीव बातमी, इत्यादि कौतुकाच्या प्रश्नांसंबंधीं निश्चित ज्ञान मिळविण्याचा आम्ही फारसा प्रयत्न केला नव्हता.

'रँग्लर' शब्दाचा अर्थ इंग्रजी कोषांतून काढण्याची इच्छा झाली; पण त्याचा अर्थ वाद घालणारा, भांडणारा, आपली बाजू तावातावानें मांडणारा असा निघाला. तेव्हांपासून रँग्लर या मानाच्या पदवीबद्दल विशेष कौतुक वाटण्याऐवजीं कांहीं चमत्कारिकच वाटूं लागलें; आणि 'कँटब्'चा अर्थ तर आज सकाळीं हें लिहितांना काढला! 'केंब्रिज' या गांवाला प्राचीन काळीं कँटरबरी असें म्हणत व त्याचें संक्षिप्त रूप कँटब असें बनलें आहे असें कोषावरून समजलें.

हें सर्व विस्तारानें सांगण्याचें प्रयोजन इतकेंच कीं, विद्यार्थि-दशेंत आपण निश्चित ज्ञान स्वतः मिळविण्याचा प्रयत्न करण्याऐवजीं सांगोवांगी व मोघम माहितीवर धकून नेतों, व या ढिलेपणामुळें खऱ्या व खात्रीच्या ज्ञानाला कायमचे पारखे होतों. कोणत्याहि गोष्टीच्या नुसत्या कुतूहलावरच मनुष्यानें समाधान न मानतां श्रवणानें, मननानें व निदिध्यासानें त्याचें खऱ्या शास्त्रोक्त आवडीमध्यें रूपांतर केलें पाहिजे. नुसत्या गोडीला व कुतूहला-लाहि जीवनांत स्थान आहे, नाहीं असें नाहीं. पण त्यानें फार तर रसिकता व बहुश्रुतता येईल, खरें ज्ञान होणार नाहीं, व्यासंग वाढणार नाहीं.

नुसत्या कुतूहलावर व गोडीवर समाधान मानल्यामुळें माझें जीवन शेवटीं शेवटीं तरी असमाधानाचें बनलें आहे. लहानपणापासून गाणें-बजावणें ऐकण्याची आवड—समेवर मान कशी नेमकी डुलते; पण स्वतः कधीं गायलों नाहीं कीं वाजविलें नाहीं; ताला-सुरांचें व रागरागिणींचें ज्ञान करून घेतलें नाहीं. लेखन—वाचन थोडेंसें केलें, पण तें अगदीं जुजबी व शिकविण्यापुरतें. शिकविणें संपल्यानंतरहि त्याची आवड टिकली आहे असें झालें नाहीं. क्रिकेटचा खेळ पाहण्याची गोडी, पण स्वतः कधीं हातांत बॅट् धरली नाहीं. चांगलीं प्रवचनें व व्याख्यानें ऐकतांना मन एकतान होतें, पण कधीं धिटाईनें व वक्तृत्वपूर्ण बोललों नाहीं. समाजकार्य, देशसेवा करावी ही इच्छा, पण प्रत्यक्ष कर्याला फारसें कधीं वाहून घेतलें नाहीं. माझ्या जीवनाच्या उत्तरार्धातील बहुतेक दुःखांचें मूळ हेंच आहे कीं, कोणत्याहि गोष्टीचा व्यासंग पूर्वार्धांत जडला नाहीं. मग आतांसारखें कांहींतरी लिहून मनाचा 'विरंगुळा' करतों. जन्मभर नुसता रसिकच राहिलों, स्वतः कलावंत व कार्यकर्ता बनलों नाहीं, ही रुखरुख सारखी वाटत असल्यामुळेंच माझ्याकडून हें विषयांतर झालें.

रँ. परांजपे यांच्याबद्दल आम्हांला ( एकट्या माझीच नव्हे, तर बहुतेक विद्यार्थ्यांची तीच स्थिति असे ) अतिशय आदर वाटे. पण तो त्यांच्या बुद्धिमत्तेचें किंवा स्वार्थत्यागाचें पूर्ण आकलन झाल्यामुळें नव्हे-तर कांहीं आनुषंगिक गुणांमुळेंच वाटे. ते त्या काळीं अतिशय देखणे दिसत. आधींच गोरा वर्ण, व त्यावर विद्येचा तजेला. देह उंचापुरा व रुबाबदार. प्रकृति अत्यंत निकोप व सुदृढ कधीं आजारी नाहींत, कधीं अशक्त नाहींत. चालणें दणदणीत, बोलणें खणखणीत !

आजारी पडल्यामुळें कॉलेजला न येऊं शकल्याचा त्यांचा एकच प्रसंग आठवतो. ते लकडी पुलावरून येतांना सायकलवरून पडले, व त्यांचा डावा हात बराच दुखावला. कांहीं दिवसांनीं थोडें बरें वाटल्यावर ते कॉलेजमध्यें नेहमींप्रमाणें आले; पण आले ते हात स्लिंगमध्यें अडकावलेला, दाढी बोट-बोट वाढलेली, चेहरा कांहींसा फिकट पडलेला, डोक्याला इटॅलियन् पिंगट कॅप् ( प्रिन्सिपॉलची नेहमींची गोंडेदार टोपी नव्हे ) अशा थाटांत आले. 'थाट'

म्हणण्याचें कारण असें कीं, असला चेहरा व असला पोषाखहि त्यांना त्यावेळीं अतिशय शोभत होता. 'जातीच्या सुंदरांना कांहींहि शोभतें' हेंच खरें.

अप्पासाहेबांच्या ( परांजप्यांना आपण यापुढें 'अप्पासाहेब' म्हणूं ) या बाह्य व्यक्तित्वाची आम्हां भावनाशील विद्यार्थ्यांच्या मनावर अशी कांहीं छाप पडे कीं, त्यांच्या लहान-सान गोष्टींचेंहि आम्हांला मोठें कौतुक वाटे. वर भिवयांना भिडणारे त्यांचे ते मिशांचे आकडे, मधेंच डोळे मिचकावणें, खर्ज स्वरांतील ओबडधोबड बोलणें, वर्गाच्या उमऱ्यावर पाऊल टाकतांच डोक्यावरची काळी-गोंडेदार टोपी लांबून टेबलावर फेकणें, भूमिति शिकवितांना फळ्यावर काढायाच्या आकृती-विशेषतः वर्तुळें कंपासाचें साह्य न घेतां नुसत्या हातानें झर्‌दिशीं काढणें, इ. बारीक-सारीक कृतींकडेहि सबंध वर्ग नुसता बघतच राही.

त्यांचें फळ्यावरील लेखनहि अत्यंत सुंदर, व्यवस्थित व लपेटदार असे. आणि त्यांची सही तर इतकी आकर्षक होती कीं, प्रत्येक विद्यार्थ्यानें ती घटविली होती. फोर्जरीकरितां नव्हे, तर आवड म्हणून. त्यांच्या या बाह्य दर्शनानेंच विद्यार्थी असा कांहीं भाळून जाई कीं, त्यांच्या प्रत्यक्ष शिकवण्याकडे कोणाचें—कांहीं असामान्य विद्यार्थी सोडून—फारसें लक्षच नसे. त्यांच्या त्या केशकलापाचा—विशेषतः त्यांच्या त्या आकडेबाज पिळदार मिशांचा—जनमनावर होणारा परिणाम मिशा अजिबात सफाचाट करण्याचा जमाना सुरू होईतों—दीर्घकाल टिकून होता. माझे एक सहध्यायी मित्र अप्पासाहेबां-प्रमाणें मिशांचीं टोकें वर वळवीत, पण परांजप्यांचा रुबाब व बुद्धिमत्ता त्यांचेपाशीं नसल्यानें त्यांचा तो थाट नुसता नाटकी व हास्यास्पद वाटे.

अप्पासाहेबांचा साधेपणा व मनाचें औदार्य साध्या साध्या गोष्टींतूनहि आमच्या ध्यानांत येत असे. शिकविण्याचीं पुस्तकें व उपकरणें वर्गांत नेण्यासाठीं कांहीं कांहीं प्रोफेसरांना बरोबर गडी लागे. अप्पासाहेब प्रिन्सिपॉल असूनहि सर्व पुस्तकें स्वतः बगलेंत मारून नेत. धोंडिबा-कोंडिबांनाच लाजल्यासारखें होऊन ते मागून धांवत येत. पण तोंपर्यंत अप्पासाहेब वर्गांतहि शिरलेले असावयाचे.

समोंवारच्या अंब्याच्या झाडांना कैऱ्या लागल्या कीं, त्या पाडण्याची इच्छा विद्यार्थ्यांना साहजिकच होई. अशा गुन्हेगार विद्यार्थ्यांना राखणदार माळी अप्पासाहेबांपुढें उभें करी. अप्पासाहेब काय शिक्षा करीत असतीलसें

वाटतें ? कांहीं नाहीं. आपल्या घोगऱ्या आवाजांत ते गुन्हेगारावर थोडेसें ओरडत, व पुन्हां असें न करण्याची ताकीद देऊन त्याला मार्गाला लावीत. त्यांच्या या ओरडण्याची भीतीहि पुढें पुढें सरावानें नाहींशी होई व कांहीं विद्यार्थी पक्के तर परांजप्यांनीं आपल्याला चांगलें चापलें असें खरेंखुरें न सांगतां आपणच अप्पासाहेबांना चापलें अशी खोटी फुशारकी मारावयास कमी करीत नसत.

आतांपर्यंत मी अप्पासाहेबांच्या पुष्कळशा फालतू गोष्टीच सांगितल्या असें कांहींना वाटेल, पण मला नाहीं तसें वाटत. त्यांची गणित विषयांतील पारंगतता, विद्वत्ता, प्रश्नांत दिलेल्या गोष्टी पाहिल्याबरोबर एकदम त्यांचें उत्तर आकलन करण्याचें त्यांचें असामान्य बुद्धिचापल्य, इ. बहुमोल गुणांचा मी उल्लेखहि केला नाहीं. मी उल्लेख करणार काय ! हे गुण समजण्याला लागणारी अक्कलच माझ्यापाशीं व आम्हां पुष्कळशा विद्यार्थ्यांपाशीं नव्हती. बरें, त्यांचें शिकवणें डोक्यावरून जात असे असेंहि म्हणतां येणार नाहीं. ते कितीहि खालच्या पातळीला आले तरी आमचीं डोकींच इतकीं ठेंगणीं बुटुक कीं, त्यांचें शिकवणें वरचेवर निघून जाई ! त्यांत त्यांचा दोष नव्हता. जरा बरी बुद्धि असती तर मलाहि त्यांच्या त्या गुणाची थोडी तरी कल्पना आल्याशिवाय राहिली नसती. दुसऱ्यांमधील गुण ओळखण्यालासुद्धां स्वतःपाशीं थोडी तरी अक्कल असावी लागते. परांजप्यांची एकच गोष्ट आम्हां विद्यार्थ्यांना त्यावेळीं आवडली नव्हती; आणि ती म्हणजे त्यांनीं सावरकरांना विलायती कापडाची होळी केल्याबद्दल कॉलेजांतून काढून टाकलें ही होय. त्यांनीं त्यांच्या देशभक्तीचें कौतुक करावयास पाहिजे होतें असें आम्हांस वाटे.

कॉलेजचे मुख्य कारकून—त्यांना ‘ हेडक्लार्क ’ म्हटलें की बरें वाटे—जोशीबुवा हे विद्यार्थ्यांवर सारखे खटले भरून त्यांना प्रिन्सिपॉलांसमोर उभे करीत. पण या खटल्यांचा निकाल सहसा फिर्यादीसारखा न लागतां बहुधा आरोपीसारखाच होई. जोशीबुवा मोठे खाष्ट व शिस्तबाज होते. ते विद्यार्थ्यांशीं कधीं समक्ष बोलत नसत. बोलायाचें तें सर्व ‘ व्हाया ’ मुकुंदा ( कॉलेजचा एक सभ्य व रुबाबदार शिपाई ) चाले. उदा. ‘ काय रे मुकुंदा, हीं पोरं येथें कां गिल्ला करीत आहेत ? अप्पासाहेबांकडे जावयाचें आहे का म्हणावं.’ मुकुंदा नुसता हंसे, अन् विद्यार्थ्यांना सावरून नेई.

त्यांची शिस्तहि मोठी कडक व कठोर असे. फी देतेवेळीं सर्व विद्यार्थ्यांनीं खिडकीपुढें एका रांगेतच उभें राहिलें पाहिजे व ठराविक क्रमानेंच फी दिली पाहिजे असा त्यांचा मोठा कटाक्ष असे. [ हल्लींच्या 'क्यू 'ची संवय झालेल्यांना जोशीबुवांच्या या कटाक्षांत कांहींच कठोरता वाटणार नाहीं. पण ही पन्नास वर्षांपूर्वीची गोष्ट आहे ] मी एकदां ठराविक क्रम मोडून फीची रक्कम ( त्या वेळीं नोटा देण्याची चाल फारशी नसे. ) रुपयांच्या चळदीच्या रूपानें खिडकींतून त्यांचेपुढें सारली. त्यांनीं चष्म्यावरून माझ्याकडे तांबारून पाहिलें, व ती सर्वच्या सर्व चळद खिडकीबाहेर भिरकावून दिली. सर्वत्र हंशा पिकला. मीहि त्यांत सामील झालों. न होऊन करणार काय ?

जोशीबुवा जिभेनें व कृतीनें कसेहि असले तरी मनानें मायाळू होते. विधवा–विवाह प्रसंगीं उपाध्यायाचें काम ( जें करण्यास सहसा कोणी धजत नसे ) करून विधवा–विवाहाच्या कार्याला हातभार लावीत, व त्यामुळें सर्वांना त्यांचेबद्दल आदर वाटे.

मी कॉलेजांत गेलों त्या वेळीं वासुदेवराव केळकर, नामदार गोखले, भानू, अण्णासाहेब कर्वे ही मंडळी कॉलेजांतून निवृत्त झाली होती.

प्रो. केळकरांना मी कधींच पाहिलें नाहीं. ते इंग्रजी फार चांगलें शिकवीत असा त्यांचा लौकिक होता. शेक्सपिअरच्या ' टेमिंग् ऑफ द श्र्यू 'च्या आधारें त्यांनीं त्राटिका नाटक लिहिलें आहे असें कानांवर आलें होतें.

प्रो. गोपाळ कृष्ण गोखले ( पुढें ' नामदार ' म्हणून जगप्रसिद्ध बनलेले ) यांनाहि पाहिल्याचें किंवा त्यांचें भाषण ऐकल्याचें आठवत नाहीं; आणि त्यांना पाहण्याची किंवा त्यांचें भाषण ऐकण्याची कधीं इच्छाहि झाली नाहीं. कारण ते कितीहि मोठे राजकारणी व वक्ते असले तरी ते ' मवाळ-गचाळांचे ' अग्रणी आणि टिळकांचे प्रतिस्पर्धी होते ना ? आणि टिळकांचे शत्रू म्हणजे आम्हां विद्यार्थ्यांचेहि शत्रू !

ते ' इंग्रजांचे बगलबच्चे ', ' पाश्चात्य–संस्कृतीचे कैवारी ', ' देशाभिमान-शून्य ' असल्याचें आमचें मत असल्यानें त्यांना पाहण्याचीहि इच्छा आम्हांला कधीं झाली नाहीं. त्यांना मी एकदांच पाहिलें, आणि तें म्हणजे

Servants of India Society मध्यें त्यांचें शव अंत्यदर्शनासाठीं ठेवलेलें होतें तेव्हां ! आतां मात्र वाटतें कीं, देशाभिमानाच्या खोट्या कल्पनेनें भारलेले आम्ही विद्यार्थी खरोखरच महामूर्ख होतों. जागतिक कितीच्या एवढ्या मोठ्या व्यक्तीचें ती जवळ असतांना नुसतें दर्शन घेण्याचीहि इच्छा आम्हांला कधीं होऊं नये यापेक्षां मोठा मूर्खपणा तो कोणता ?

प्रो. भानूचे हाताखालीं शिकण्याचा योग मला कधींच आला नाहीं. तरी पण गणेशोत्सव, शिवाजी उत्सव वगैरेंतून त्यांचीं व्याख्यानें, प्रवचनें वगैरे विद्वत्ताप्रचुर व देशाभिमानानें रसरसलेलीं वाटत. आंतल्या कडकडीत खमिसावरून भगवी कफनी घालून ते कसब्याच्या गणपतीच्या देवळांत कीर्तन करीत असलेले अजून डोळ्यांपुढें उभे राहतात. त्यांची मुद्रा, वाणी, पोषाख—सर्व कांहीं ढंगदार व बोलणें नाटकी असे. महाराष्ट्र नाटक मंडळींतील नटांना ते नाट्य शिकवीतहि असत.

प्रो. कर्वे यांना कॉलेजांत शिकवितांना पाहिलेलें आठवत नाहीं. त्यांची धीमेधीमे शिकवण्याची व विद्यार्थ्यांशीं प्रेमळपणें वागण्याची कीर्ति मात्र बरीच ऐकली होती. त्यावेळीं ते न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिकवीत असत. तसें म्हटलें तर मी त्यांना कधीं पाहिलेंहि नव्हतें. पण पुढें त्यांच्याच संस्थेंत ( अनाथ—बालिकाश्रम—हिंगणें ) काम करण्याची व त्यांना अगदीं जवळून पाहण्याची संधि मिळाल्यामुळें त्यांच्या दर्शनाला व शिकविण्याला त्या वेळीं मी मुकलों याचें तितकेंसें वाईट वाटत नाहीं.

प्रीव्हिअस्च्या पहिल्या वर्षीं ( मला दोन वर्षें लागलीं होतीं ) प्रो. राजवाडे इंग्रजी— विशेषतः गद्य— शिकवीत. स्कॉट्ची टॅलिसमन् ही कादंबरी त्यांनीं अत्यंत सुंदर शिकविली. इंग्रजी शब्दांच्या अर्थ—छटा व त्यांचे उच्चार या बाबतींत राजवाडे हे एक अधिकारी समजले जात. ( एकदां त्यांनीं एका इंग्रज प्रोफेसराचीहि चूक काढली होती असें म्हणतात. ) पण मुद्रा, बोलणें व शिकविणें हीं एकंदरींत रुक्ष व अनाकर्षक वाटत. तथापि त्यांची विद्वत्ता, त्याग, निःस्पृहत्व, इत्यादि गुणांमुळें लोकांवर व सरकारवरहि त्यांचें भारी वजन असून सर्वांनाच दरारा वाटे.

संस्कृतचे प्रोफेसर पानसे यांचें शिकविणें आम्हां विद्यार्थ्यांना परीक्षेचे दृष्टीनें उपयुक्त वाटलें तरी म. म. वासुदेवशास्त्री अभ्यंकर व डॉ. गुणे

यांची विद्वत्ता व चमक त्यांत दिसून येत नाहीं असें हुशार विद्यार्थी म्हणत. पानसे यांची विनोदवृत्ति पाठ मनोरंजक करण्यास उपयोगी पडे. शाकुंतल शिकवितांनाचा ‘ चिर विरहजां न त्वं वत्से शुचं गणयिष्यसि ’ या ओळींतील ‘ हजाम् ’ या अक्षरांवरील त्यांचा ग्राम्य विनोद आम्हांला त्या वेळीं मोठा हृद्य वाटे. त्यांनीं लाविलेली स्वतःच्या ‘ पानसे ’ या अडनांवाची संस्कृत उपपत्तीहि आमच्या अजून लक्षांत आहे.

विद्यार्थ्यांसंबंधीं मात्र त्यांना अतिशय वात्सल्य वाटे. केव्हांहि, कोठेंहि, कोणीहि विद्यार्थी भेटो, ते त्याची नक्की ओळख पटत नसली तरी अदमासा-अदमासानें विचारपूस केल्याशिवाय राहत नसत. अशा वेळचें त्यांचें व विद्यार्थ्यांचें संभाषण मोठे मजेदार होई. उदाहरणार्थः—

**पानसे**ः—‘ काय रे, आजोबा बरे आहेत ना ? ’

**विद्यार्थी**ः—‘ आजोबा जाऊन पुष्कळ वर्षें झालीं, नानासाहेब ! ’

**पानसे**ः—‘ हो, बरोबर; तर मग मला भेटले ते तुझे वडील वाटतें ? ’

**विद्यार्थी**ः—‘ वडीलहि गेले, नानासाहेब ! ’

**पानसे**ः—‘ अरेरे ! वाईट झालें. तर मग तूं हल्लीं मुंबईसच असतोस ? ’

**विद्यार्थी** : ‘नाहीं नानासाहेब, मी आपल्याच कॉलेजांत शिकत आहें ना ! ’

**पानसे** : ‘ बरोबर ! तरीच मला पाहिल्यासारखा वाटतोस.’ धोकेबाज स्मरणशक्तीला आपण नांवें ठेवूं वाटल्यास, पण भेटलेल्या विद्यार्थ्यांची विचारपूस करावीशी वाटणें हा त्यांचा गुण नाहीं का ?

प्रा. द्रवीड यांनीं आम्हांला इंटरमध्यें ‘ उत्तररामचरितं ’ शिकविलें. त्यांचें शिकवणें—विशेषतः संस्कृतचें इंग्रजींत भाषांतर अत्यंत मार्मिक असे.

प्रो. गुणे यांनीं एका सहामाहीपुरतेंच संस्कृत शिकवल्याचें आठवतें. ते अत्यंत हुशार असल्याचें आम्हीं ऐकलें असून त्यांचा तेजस्वी चेहरा त्याची साक्ष देत असे. त्यांचें साफ हजामत केलेलें डोकें, त्यावरील गुलाबी बत्ती, कपाळावरील गंधाचा तांबडा टिकला, पायघोळ धोतर, व पुणेरी जोडा हीं पाहून ते ब्राह्मणी संस्कृतीचे मोठे अभिमानी असावेत असें वाटे. त्या तेवढ्याशा काळांत माझ्यासारख्या सामान्य विद्यार्थ्याला त्यांच्या शिकवण्याची चमक फारशी दिसूं शकली नाहीं.

प्रो. वासुदेव बळवंत पटवर्धन हे नुसत्या नांवानेंच नव्हे तर स्वभावानेंहि वासुदेव बळवंतांसारखे–बंडखोर वृत्तीचे–होते. ते मराठीचे नामवंत तज्ज्ञ असून ओजस्वी लेखनहि करीत. 'विरोळ्यानें काय शिकविलें ?' हा त्यांचा लेख मला अजून आठवतो. त्या वेळीं कॉलेजच्या अभ्यासक्रमांत मराठी विषयाला स्वतंत्र स्थान नसल्यामुळें पटवर्धनांना इंग्रजी शिकवावें लागे. बी. ए. पर्यंतच्या चारी वर्गांना ते इंग्रजी काव्य शिकवीत. इंग्रजी शब्दसंपत्तीची उणीव ते कित्येक प्रसंगीं मार्मिक अभिनयानें भरून काढीत. त्यांनीं आम्हांला काव्याची गोडी लावली, व त्यांच्यामुळेंच आम्ही इंग्रजींत पास होत असूं हें कृतज्ञतापूर्वक सांगितलें पाहिजे.

पटवर्धनांचीं व्याख्यानें भाषादृष्ट्या सामान्यच असलीं तरी एकंदर शिकवणें अत्यंत भावनायुक्त व परिणामकारक असे. त्यांचीं शेक्स्पिअर-वरचीं व्याख्यानें इतकीं हातखंडा असत कीं, डेक्कन कॉलेजचे ( त्या वेळीं फर्ग्युसनशीं स्पर्धा करायाला पुण्यांत एकटें डेक्कन कॉलेजच असे ) विद्यार्थीहि तीं ऐकण्यासाटीं तेथें गोळा होत. हल्लीं कांहीं प्रोफेसरांचें शिकवणें ऐकावयास दुसऱ्या कॉलेजचे विद्यार्थी तर राहोतच–पण स्वतःच्या कॉलेजमधील व स्वतःच्या वर्गातील विद्यार्थीहि हजर राहत नाहींत हें पाहिलें म्हणजे वरील गोष्टीचें कौतुकच वाटतें. आम्हांला पटवर्धनांनीं बी. ए.च्या वर्गांत शेक्स-पिअरचें ज्युलिअस् सीझर हें नाटक शिकविलें. त्यांतील अँटनीचीं तीं गाजलीं–गरजलेलीं भाषणें ते इतक्या समरसतेनें, सूचकतेनें व अभिनययुक्त पद्धतीनें वाचीत कीं, आम्हां विद्यार्थ्यांच्या आठवणींत तीं कायमचीं राहिलीं आहेत.

इतिहास शिकविण्यांत आम्हांला आपले काळेच चांगले वाटायचे. हरिभाऊ लिमयांचा इतिहासाचा व्यासंग मोठा, ज्ञानहि सखोल; मराठी रियासत शिकवितांना तर ते अगदीं तल्लीन व्हावयाचे. पण आवाजाची देणगी व वक्तृत्व नसल्यानें त्यांचें शिकवणें सपंक व हिमूळ वाटे. हरिभाऊ मोठे धूर्त, धोरणी व हिशेबी असत. या गुणांमुळें व त्यांचा तो पेशवाई बाणा पाहून आम्ही विद्यार्थी त्यांना फर्ग्युसनचे 'नाना फडणवीस' म्हणत असूं.

परांजप्यांच्या जोडीला नाईक गणित शिकवीत. त्यांचें शिकवणें अत्यंत संथ, पण पद्धतशीर असे. याच त्यांच्या गुणामुळें कितीतरी सामान्य विद्यार्थी

गणिताची परीक्षा तरून जात. त्यांचा तो बारीक पण मंजुळ व झारदार आवाज दूरवर ऐकूं जाई.

एकदां आवाजासंबंधींच्या गोष्टी निघाल्या असतांना खुद्द परांजपेच म्हणाल्याचें ऐकतों—"पटवर्धन, वासुदेवशास्त्री व मी अशा तिघांचे आवाज कॉलेजमध्यें सर्वांत मोठे. माझा नुसताच मोठा, शास्त्रीबुवांचा मोठा व ओघवान् आणि पटवर्धनांचा मोठा पण भावनांनीं ओथंबलेला." आणि यांत भर म्हणून असें म्हणतां येईल कीं, नाइकांचा लहान, मंजूळ पण सर्वांना ऐकूं जाणारा असा असे.

प्रो. कानिटकर आम्हांला फिजिक्स शिकवीत. पण आम्ही काय शिकलों हें अद्यापहि सांगतां यावयाचें नाहीं. (हें ऐकून खुद्द कानिटकरांनाहि राग आला नसता इतके ते खिलाडू वृत्तीचे होते.) आणि याचें एक कारण असें असावें कीं, आमच्या वर्गावरचा त्यांचा तास नेहमीं पहिला असे. विद्यार्थी भरल्या पोटावर भर उन्हांतून लांबलांबून पायीं येत.—मी तर पर्वतीहून येई—अर्थात् दमले भागलेले असत. लाइटचें प्रकरण सुरु झालें म्हणजे वर्गाचीं सर्व खिडक्यादारें बंद करून अंधार केला जात असे. अशा परिस्थितींत सर्वसामान्य विद्यार्थी बांकापुढील फळीवर डोकें ठेवून थोडेफार कलले—कलंडले, व कांहीं थोडे घोरूंहि लागले तर तें स्वाभाविक नव्हे का?

ध्वनीचे गुणधर्म समजावून सांगतांना कानिटकर वर्गांत तंबोऱ्यावर गाऊन दाखवीत. ऐकायला मोठी मजा वाटे एवढेंच सांगतों.

पण कानिटकरांची एक विशेष कामगिरी म्हणजे परांजप्यांचे मागून ते जेव्हां प्रिन्सिपॉल बनले तेव्हां त्यांनीं कॉलेजच्या बाह्यांगांत खूपच भर घातली. कॉलेजचा दर्शनी दरवाजा, कॉलेजचा तालीमखाना, ग्राऊंडच्या सभोंवतीं लावलेलीं वडाचीं झाडें, पोहण्याचा तलाव इत्यादि कितीतरी सोयी त्यांनीं आपल्या राजवटींत केल्या. ते कांहीं दिवस डे. ए. सोसायटीच्या नवीन मराठी शाळेचे मुख्याध्यापक होते. त्यांनीं त्या शाळेकरितां सरकारकडून एक लाख रुपयांची ग्रँट वर्ष सरतां-सरतां मोठ्या हिकमतीनें मिळविली असें सांगतात; आणि त्यांची धडाडी व कर्तृत्व पाहतां तें खरें असलें पाहिजे.

फिजिक्सच्या जोडीला त्या वेळीं ट्रिगॉनॉमिट्री ( या शब्दाचा मराठी अर्थ व आशय मला अद्यापहि सांगतां यावयाचा नाहीं ) हा विषय असे. तो अप्पासाहेब शिकवीत. तोहि मला फारसा–म्हणजे–मुळींच–समजत नसे. पण चक्कू, ताड्या, घोक्या या ज्या अभ्यासाच्या तीन पूर्वापार चालत आलेल्या तऱ्हा त्यांचा अवलंब करून मी इंटरमध्यें पहिल्या खेपेसच पास झालों.

आतां राहिले प्रो. भाटे–आमचे दादा. त्यांचें इंग्रजी व शिकविण्याची एकंदर पद्धति मोठी चित्ताकर्षक होती. पण हस्ताक्षर मात्र विचारूं नका. उजव्या हातांतील खडू व डाव्या हातांतील [1]फडकें यांचा वापर एकसमयावच्छेदेकरून होत असल्यानें फळ्यावर लिहिलेलें फारसें शिल्लकच उरत नसे.

दादांच्या लॉजिक शिकविण्याचा परिणाम माझ्या तर्कशक्तीवर तरी फारसा झाला नाहीं. पण बी. ए. च्या वर्गांत फिलॉसफी विषय शिकवितांना मात्र मोठी मजा येई. विशेषतः कँटचें The True, the Good & the Beautiful ( सत्यं, शिवं, सुंदरम् ) हें प्रकरण चालू असतांना अतिशय आनंद होई. मला त्या वर्षीं सहामाही परीक्षेंत बहात्तर ( शंभरापैकीं ) गुण मिळाल्याचें व प्रो. व्ही. के. जोगांच्या खालोखाल माझा दुसरा नंबर आल्याचें मला चांगलें स्मरतें.

प्रो. भाटे हे अत्यंत सालस, कामसू व लोकप्रिय असल्यानें सांगलीच्या विलिंग्डन् कॉलेजचे पहिले प्रिन्सिपॉल होण्याचा मान त्यांना मिळाला हें योग्यच झालें. ते महाडचे रहिवाशी, मीहि महाडच्या गुजाभाऊ ओकांचा जांवई. अशा बादरायण संबंधानें त्यांचा माझ्यावर पुढें पुढें फार लोभ जडला.

कॉलेजच्या पांच वर्षांत माझी विशेष मैत्री अवघ्या तिघांशींच झाली. दत्तोपंत पोतदार, श्री. म. माटे, ना. सी. फडके, चिं. वि. जोशी यांपैकीं कोणी पुढें, तर कोणी मागें असल्यानें इच्छा असली तरी त्यांना मला सलगीचे मित्र मानतां येणार नाहीं. नाहीं म्हणावयास मधल्या सुट्टींत आम्ही

---

१. त्या काळीं फळ्यावर लिहिलेलें पुसण्यासाठीं ब्रश निघाले नव्हते–निदान आमच्या 'भटजी' ( हें विशेषण डेक्कन कॉलेजांतलीं पोरें वापरीत. ) कॉलेजांत तरी नव्हते.

विटीदांडू मात्र एकत्र खेळत असूं, आणि त्या कारणानें जी काय तोंड, ओळख झाली असेल तेवढीच. परस्परांना 'मित्र' मानणारे असे आम्ही चौघेच होतों—नारळकर, साठे, माटे व मी.

नारळकर फर्ग्युसन कॉलेजांत पहिलीं दोन वर्षेंच राहिल्यानें त्यांचा त्या वेळीं तितकासा संबंध आला नाहीं. त्यांचें इंग्रजी फार चांगलें असून सहामाही परीक्षेंत प्रो. राजवाड्यांचे हातून त्यांना सर्वांत जास्त गुण मिळाले होते. ते बी. ए. करितां जुनागडच्या कॉलेजांत गेले व आमचा त्यांचा संबंध कांहीं काळ सुटला. त्यांचेसंबंधानें पुढें निरनिराळ्या कारणांनीं व प्रसंगांनीं सांगायाचें असल्यानें येथें जास्त सांगत नाहीं.

म. दा. ऊर्फ अण्णा साठे यांत व माझ्यांत पुष्कळच साम्य व साधर्म्य आहे. आम्ही दोघेहि एकाच वयाचे, दोघेहि शास्त्री घराण्यांतले, दोघेहि गरिबींत वाढलेले, दोघेहि बी. ए. व एम. ए. त फिलॉसफी घेतलेले, दोघेहि कॉलेजांत बरोबर जाणारे-येणारे. त्यांच्या विवाहाला मी हजर राहिलेला, माझ्या दिवाळसणाला ते माझ्या सासुरवाडीस आलेले. पण ते पहिल्यापासूनच माझ्यापेक्षां जास्त हुशार. लहानपणीं कौमुदी वगैरे व्याकरणात्मक भाग झाल्यानें त्यांचें संस्कृतचें ज्ञान व पाठांतर मोठें. त्यांनीं बी. ए. व पुढें एम. ए. परीक्षांत दुसरा वर्ग मिळविलेला, तर मी मात्र तिसरा मिळविलेला. असें हें आम्हां दोघांतील साम्य—वैधर्म्य आहे.

ते प्रथम एक नामांकित शिक्षक व पुढें लोकप्रिय हेडमास्तर झाले. मध्यंतरीं कांहीं काळ ते जबलपूरच्या ट्रेनिंग कॉलेजांत प्रोफेसरहि झाले होते. ते गेलीं दहा-बारा वर्षें सेवानिवृत्त होऊन स्वत:च्या 'पारिजातांत' लेखन-वाचन करीत व नातवंडांना शिकवीत सुखानें कालक्रमणा करीत आहेत. आतां मला जुन्यांतले व जवळचे असे ते एकटेच मित्र राहिले आहेत हें लक्षांत आलें म्हणजे मनामध्यें एक सुखदु:खमिश्रित भावना उत्पन्न होते.

माझे तिसरे मित्र बाबुराव माटे, हे आमचे गृहवैद्य कृष्णशास्त्री माटे यांचे चिरंजीव होत. तसें पाहिलें तर शालेय विद्यार्थिदशेंतच त्यांचा व माझा संबंध जितका निकटचा व जिव्हाळ्याचा होता तितका दुसऱ्या कोणाचाच नव्हता. ते पूना हायस्कुलांत व मी. नू. म. विद्यालयांत असलों

तरी ते अगदीं लहानपणापासून वडिलांबरोबर पर्वतीला आमचेकडे जेवा-खायला येत. मीहि कॉलेजमध्यें जाऊं लागल्यापासून त्यांचेच घरीं ठिय्या देऊन असें. कॉलेजांत जातां–येतांना मी त्यांचेच बरोबर त्यांच्या टांग्यांतून जात-येत असें. अभ्यासहि त्यांच्याच घरीं व त्यांच्याच जोडीनें करीं. पण बी. ए. त त्यांनीं गणित व मी तत्त्वज्ञान घेतल्यानें आमच्या सहवासांत थोडें अंतर पडूं लागलें.

त्यांचें सबंध जीवन खानदानी पद्धतीचें होतें. कॉलेजमध्यें असतांना ते डोक्याला जरीची टोपी व हातांत सलकडीं घालीत, त्यामुळें इतर विद्यार्थी त्यांच्याकडे चमत्कारिक नजरेनें पाहत. बुद्धीनें तल्लख, पण चिकाटी कमी, त्यामुळें परीक्षेंत फारसे चमकले नाहींत. ते हाडाचे कलावंत होते. गाणें, बजावणें, चित्रकला इत्यादींत त्यांची बरीच प्रगति होती. त्यांची ही कला-प्रियता त्यांची मुलगी सुमन माटे व पुतण्या बाळ माटे यांमध्यें उतरली आहे. ते कागदावर नखांनीं फार सुंदर रेखाचित्रें काढीत. एल्एल्. बी. झाल्यावर ते पुण्यास वकिली करूं लागले, व थोड्याच काळांत त्यांनीं बरेंच नांव कमावलें. दुर्दैवानें ते अल्पायुषी ठरले. शेवटीं–शेवटीं ते पुण्यांतील भारत गायन समाजाचे एक पदाधिकारी झाले होते. त्यांचें एक तैलचित्र तेथें लावलेलें दिसेल.

फर्ग्युसन कॉलेज, त्यांतील माझे प्रिन्सिपॉल, माझे प्रोफेसर, माझे सहाध्यायी विशेष मित्र इत्यादींची आठवण झाली म्हणजे मन बहरून येतें व अशा कॉलेजांत आपल्याला शिकण्याची संधि मिळाली याबद्दल धन्यता वाटते. माझ्या नूतन मराठी विद्यालयानें माझ्यांत सत्प्रवृत्तींचें बीजारोपण केलें असें मानलें तर माझ्या फर्ग्युसन कॉलेजानें त्या वाढीला लावल्या असें म्हणावें लागतें. देव माझ्या या कॉलेजाची उत्तरोत्तर भरभराट करो व त्याला अधिकाधिक कार्यक्षम बनवो !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .................... वि: ...............
क्रमांक .................... नों: दि: ...............

# खामगांवचा मुक्काम : : : ९

एम्. ए. झाल्यानंतर लवकरच मी मुंबई इलाखा व वऱ्हाड-मध्यप्रांत यांच्या शिक्षणखात्यांत शिक्षकाच्या नोकरीकरितां अर्ज केले. नारळकर व साठे यांनींहि तसे अर्ज केले होते. मध्यप्रांत खात्याचें बोलावणें मुंबई खात्याच्या बोलावण्यापेक्षां अगोदर आल्यामुळें आम्ही तिघेहि वऱ्हाडांत नोकरीनिमित्त गेलों—मी व नारळकर खामगांवास व साठे यवतमाळाकडे.

खामगांवास निघण्यापूर्वीचा दिवस व रात्र मला अद्याप आठवतात. दिवसा मधल्या वेळच्या खाण्याकरितां माईनें मुद्दाम माझें आवडतें थालिपीठ लावलें होतें. पुढच्या काळांत मी थालिपीठें कांहीं कमी खाल्लीं नाहींत; पण माईनें पातेल्यांत लावलेल्या मऊ, अरळ व खुसखुशीत थालिपीठासारखें थालिपीठ पुढें क्वचितच मिळे. एकेकाचा एकेका बाबतींतला हातगुण, दुसरें काय ? पहिलें खाऊन पुन्हां मागितल्यावर पत्नीनें 'किती खावयाचें ? उद्यां गांवाला जायचं आहे, लक्षांत आहे ना ?' अशा आशयाच्या दृष्टीनें माझ्याकडे पाहिलें. माईच्या तें लक्षांत येऊन ती म्हणाली, "खाऊं दे ग; तेवढ्यानें काय होतें आहे ? पुढें त्याला कधीं मिळणार आहे माझ्या हातचें खावयाला ?" आणि तिचें तें बोलणें खरोखरच खरें झालें !

सौभाग्यवतीचा दिवसाचा नूर रात्रीं पार बदलला. ती रात्रभर अश्रु ढाळीत माझ्याबरोबर येण्याबद्दल हट्ट धरून बसली होती. समजूत घालण्याचा कितीतरी प्रयत्न केला, पण ती कांहीं हट्ट सोडीना. बालहट्टाबद्दल सुभाषितकारांनीं लिहिलें आहे. पण त्या वेळचा तिचा तो हट्ट बालहट्टापेक्षांहि जास्त दुर्निवार्य होता. बिऱ्हाडाची सोय करून दोन-तीन महिन्यांत तिला तिकडे नेण्याचें कबूल केलें तेव्हां कोठें जरासें स्थिरस्थावर झालें. पहांटे

१०८

उठतांना मात्र आम्ही दोघे आनंदांत उठलों व पुढें माझी सर्व बांधाबांध तिनें हंसतमुखानें करून दिली. स्टेशनावर पोंचवायला यावयाची चाल त्या काळीं फारशी नव्हती म्हणून; नाहीतर तेथेंहि ती आली असती.

देवाला व वडील मंडळींना नमस्कार करून जावयास निघालों. वहिनींनीं हातावर दहीं घातलें. सर्व मंडळी हंसतमुख—पण एकीकडे डोळे पुशींत दारापर्यंत पोंचवायास आली. मी टांग्यांत बसलों. 'आमचें पत्र आलें नाहीं तरी तूं पत्र धाडायला चुकूं नकोस' असें दादा ओरडून म्हणाले. घोड्याला चाबकाचा इशारा मिळाला अन् टांगा चालूं झाला.

नारळकर व मी खामगांवास एकदमच गेलों. तेथें कोणी विशेष ओळखीचें नसल्यामुळें तेथील सुप्रसिद्ध वकील दादासाहेब[१] पेंडसे यांचेकडे उतरलों, व जेवण वगैरे करून बिऱ्हाडाला जागा पाहण्यासाठीं बाहेर पडलों. सुदैवानें शेजारींच एक खोली मिळून भाडें—बिडें सर्व ठरलें व आम्ही आपला मुक्काम पेंडशांकडून हलवून नवीन जागेंत राहावयासहि गेलों. पेंडसे पतिपत्नी फार सज्जन दिसलीं. त्यांनीं ही ओळख पुढें कितीतरी वर्षें ठेवली होती.

आम्ही शेजाराचे बाबतींत भारी नशीबवान आहोंत. महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक श्री. जी. एन्. जोशी यांचे वडील श्री. ना. म. जोशी हेहि त्यावेळीं एक प्रसिद्ध वकील असून त्यांचें घर आमच्या खोलीला लागूनच होतें. त्यावेळीं स्वतः गोविंदराव वर्षा-दीड वर्षाचे असून आम्ही त्यांना 'गोंद्या' म्हणत असूं. ते अंगानें गुटगुटीत, वर्णानें गोरे व रूपानें सुंदर दिसत. या वर्णारूपांना कालांतरानें गोड आवाजाची व रसाळ गाण्याची जोड मिळणार असून ते महाराष्ट्राचे एक लाडके व नामवंत गायक होणार आहेत व आपल्या 'डोळे हे जुलमी गडे' या व असल्या भावगीतांनीं तरुण-तरुणींना भारून टाकणार आहेत अशी त्या वेळीं आम्हांला कल्पनाहि नव्हती. हल्लीं ते कोठें भेटल्यास अजूनहि त्यांना 'गोविंदराव' अशी बहुमानाची हांक न मारतां पूर्वींची 'गोंद्या' ही लाडकी हांकच मारावीशी वाटते. तेहि पूर्वींच्याच लाडकेपणानें व लाघवीपणानें आमच्याशीं मोठ्या घरोब्यानें बोलतात-चालतात.

१. हे पुण्याचेच असून तुळशीबागेच्या पुढच्या बाजूस राहत असत.

खोलीशेजारींच नारायणराव व बाबुराव नांवाच्या दोघा गृहस्थांची एक लहानशी खाणावळ होती. खाणावळ सामान्यच होती; पण मालक आमच्याशीं तरी, अति चांगले वागत. पोळी तव्यावर टाकली म्हणजे मुद्दाम खोलीवर बोलवावयाला येत व कढत कढत पोळ्या आम्हांला वाढीत. तुपाचा चमचाहि बराचसा आडवा धरीत. त्यांच्या या पार्शालिटीबद्दल इतर मेंबर तक्रार करीत, पण फारसा उपयोग होत नसे. बिचाऱ्यांना काय माहीत कीं, ते जसे तुपाच्या बाबतींत सढळ असत तसे आम्हीहि पैशाचे बाबतींत सढळ असूं. इतर दृष्टीनेंहि आम्ही त्यांना मदत करीत असूं.

खामगांव मुक्कामांतील एका वर्षाचें माझें शालेय जीवन पुष्कळच चांगलें गेलें. 'पुष्पसंगें मातीस वास लागे' या न्यायाप्रमाणें नारळकरांच्या संगतीनें माझ्यामध्येंहि पुष्कळ गुण येऊं लागले होते. मी त्यांच्या बरोबरीनें विद्यार्थ्यांच्या खेळांत, स्वदेशी स्टोअर्स चालविण्यांत म्हणजे व इतर चळवळींतहि भाग घेत असें. पण मुख्य म्हणजे तेथील हेडमास्तर श्री. अबासाहेब गोरे हाताखालच्यांचें काम गोड करून घेऊन त्यांना सर्वतोपरी उत्तेजन देणारे व मदत करणारे होते.

अबासाहेब दिसायला उग्र, करारी व जरासे तिरसट दिसले तरी मनाचे उदार व प्रेमळ होते. निदान आम्हां दोघां पुणेंकरांचे बाबतींत तरी ते तसे असत.—इतके कीं, त्या हायस्कुलांतील आमचे दुसरे सहकारी शिक्षक आमचा थोडासा हेवाहि करीत असलेले दिसत.

आम्ही दोघे—विशेषतः नारळकर—फार इमानेइतबारे सेवा करीत असूं. शाळेचें काम करतांना ते आपल्या एम्.ए. च्या अभ्यासाकडेहि दुर्लक्ष करीत. मींच त्यांच्या मागें नेट लावी म्हणून त्यांनीं तो अभ्यास कसाबसा पुरा केला व ते कसेबसे पास झाले. माझा हा स्वार्थी आग्रह त्यांना त्यावेळीं बिलकूल आवडत नसे.

आम्ही दोघेहि अबासाहेबांचे सारखेच 'पेट' होतों. त्यांतल्या त्यांत नारळकरांवर त्यांचा लोभ व विश्वास विशेष असे. नानांचें शिकवणें उत्कृष्ट असून ते विद्यार्थ्यांच्या खेळांत भाग घेत. त्यांनीं शाळेंत स्वदेशी स्टेशनरीचें दुकानहि सुरू केलें होतें; आणि ते एकंदरींतच मोठे हुशार व तरतरीत असून कामसू आणि कष्टाळू होते. अबासाहेबांची मर्जी सहसा कोणावर

बसत नसे; पण नारळकरांच्या अंगच्या या गुणांमुळें ती त्यांच्यावर—व त्यांच्या अनुषंगानें माझ्यावर—जी एकदां बसली ती कायमची बसली.

आम्ही दोघे गांवांतील क्रिकेटच्या क्लबांतहि खेळत असूं. नारळकरांना तर गांवाच्या इलेव्हनमध्येंहि घेण्यांत आलें होतें. ते खामगांवातर्फे बुलढाण्यालाहि खेळावयास गेले होते. मी मात्र 'निरस्त पादपे देशे एरंडोऽपि द्रुमायते' हें सुभाषित म्हणून त्यांना थट्टेनें चिडवीत असें. कारण मला खेळायला घेत नसत.

थोडक्यांत म्हणजे आम्ही दोघेहि खामगांव गांवांत व तेथील शाळेंत थोड्याच अवधींत बरेचसे लोकप्रिय बनत चाललों होतों. आमच्या नोकरीची सुरुवात तर दैवयोगानें चांगली झाली होती. पुढचें पुढें. आम्ही दोघे सुरुवातीला सडे-फटिंग असल्यामुळें अबासाहेब व त्यांच्या पत्नी आम्हांला सणासुदीचे दिवशीं जेवावयाला बोलावीत व इतर मार्गांनींहि आमच्यावर मोठा लोभ करीत. अबासाहेबांनीं आमची विशेष शिफारस केली म्हणून तर आम्हांला पुढल्याच वर्षीं जबलपुराला ट्रेनिंगकरितां जाण्याची संधि मिळाली. सेवानिवृत्त झाल्यावर अबासाहेब बरींच वर्षे, अगदीं परवांपरवां-पर्यंत वऱ्हाडांतील परतवाडा गांवीं शेती-भाती पाहत कालक्रमणा करीत असत. त्यांचा काव्यशास्त्राचा व्यासंग चांगला असून त्यांनीं 'अलंकार चंद्रिका' नांवाचें एक पुस्तकहि लिहिलें आहे.

त्या वेळीं शाळेंत असलेल्या शिक्षकांपैकीं पांचजण अद्याप चांगले आठवतात. पुण्याचे जी. एन्. जोशी, मिरजेचे नमूकाका गोखले, बऱ्हाण-पूरचे फडके, इंदूरकडील गोडबोले, व पेण-पनवेलकडील सोमण यांच्याशीं आमची चांगलीच मैत्री जमली. जोशी हे चांगले खेळाडू असून त्यांनीं हिंदुस्थानच्या इतिहासावर चांगलीं पाठ्य-पुस्तकें लिहिलीं आहेत. निवृत्त झाल्यावर त्यांनीं पुण्यास एक छापखानाहि चालविला होता. हल्लीं ते रुग्णावस्थेंत पडून असतात. नमूकाका गोखले पुढें चढत-चढत हेडमास्तर झाले. निवृत्तीनंतर ते हल्लीं वर्ध्यास गांधी आश्रमांत राहून आश्रमीय कार्य करीत असतात. श्री. फडके हे एक हुशार शिक्षक होते. त्यांची ती बऱ्हाण-पुरी हिंदी भाषा व जरा खोंचक विनोद अद्याप आठवत आहेत. गोडबोले व सोमण योग्य काळीं हेडमास्तर होऊन निवृत्त झाले.

वरच्या दोन वर्गांत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांपैकीं वासू गोरे, मनोहर दिवाण, अणेकर, वटजीकर व पुरवार हे विद्यार्थी विशेष आठवतात. वासू गोरे हा अबासाहेबांचा मुलगाच असून आम्हांला त्याचा विशेष लळा लागला होता. पितापुत्रांच्या इंग्रजी अक्षरांत इतकें साम्य असे कीं, परीक्षेंत वासूचे पेपर अबासाहेबांनीं लिहिले असते किंवा अबासाहेबांच्या पगार-पत्रकावर वासूनें सही केली असती तरी सहज निभून गेलें असतें. मनोहर दिवाण हा त्या काळीं अत्यंत हुशार, तल्लख बुद्धीचा, काळासांवळा पण तरतरीत नाकाडोळ्यांचा दिसे. तो मॅट्रिकमध्यें व पुढील परीक्षांतहि फार चमकला असें ऐकतों. असहकारितेच्या काळांत त्यानें स्वतःला गांधींच्या राजकारणाला वाहून घेतलें व हल्लीं तो महारोग्यांची शुश्रूषा करीत काल-क्रमणा करीत आहे असें ऐकतों. आपल्या एका काळच्या अशा थोर विद्यार्थ्याला समक्ष भेटावें व त्याच्या कार्याचें कौतुक करावें असें कितीतरी वाटतें, पण योग येत नाहीं.

अणेकर हा विद्यार्थी तेथील अणेकर वकिलांचा मुलगा असून तोहि मोठा हुशार असे. त्याचेसंबंधीं दुसरें कांहीं फारसें आठवत नसलें तरी त्यानें आम्हां दोघांना स्वतःच्या शेतांतला हुरडा व बागेंतलीं बोरें खावयास नेल्याचें चांगलें आठवतें. वऱ्हाडांतील हुरडा ही काय चीज आहे हें आम्हांला त्या वेळीं माहीत झालें. बोरेंहि अतिशय गोड व लिनकिडकीं असत व त्या ठेंगण्या झाडांना इतकीं लहडलेलीं असत कीं, झाडाखालीं उभें राहिलें म्हणजे बोरें आपोआप ओठाला लागत.

वडजीकर हाहि एक हुशार व अगत्यशील विद्यार्थी होता. त्याचा सज्जनपणा व समंजसपणा त्याच्या वयाच्या मानानें जरा अकालच वाटत. हे सर्व विद्यार्थी आतां कोठें कोठें आहेत कोणास ठाऊक ! जेथें–कोठें असतील तेथें सुखी असोत म्हणजे झालें.

आमची पहिली सहामाही सर्वच दृष्टीनें सुखांत व आनंदांत गेली. पुढच्या सहामाहींत गांवांत प्लेगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळें आम्ही शाळेच्या बाजूला–गांवापासून बरेच दूर–एक गवती झोपडी घालून तींत राहूं लागलों. अर्थात् जेवणा–खाण्याची गैरसोय होऊं लागल्यामुळें आम्ही दोघांनीं आपापल्या सौभाग्यवतींना तेथें आणलें.

नानांच्या पत्नी सौ. इंदिराबाई—त्यांना सर्वजण छबूताई म्हणतात—या जबलपूरच्या ट्रेनिंग कॉलेजांतील प्रोफेसर गं. गो. कानेटकर यांची कन्या. त्यांचा विवाह नारळकरांशीं सातान्यास झाला. त्या वेळीं मी तेथें गेलों होतों. त्यामुळें त्या मला अगदींच नवख्या नव्हत्या. माझ्या पत्नीनें मात्र त्यांना येथें प्रथमच पाहिलें. एकमेकींना पाहून त्या दोघींचा ग्रह काय झाला हें नक्की समजण्यास मार्ग नाहीं. कारण माझी पत्नी माझ्याशीं यासंबंधीं कधींच कांहीं बोलली नाहीं; आणि छबूताईहि आपल्या पतीपाशीं कांहीं बोलल्या असतील असें वाटत नाहीं; पण तो चांगलाच झाला असावा असें दोघींच्या स्वभावावरून व पुढील वागणुकीवरून वाटतें.

छबूताई इंग्रजी फारशा शिकलेल्या नसल्या तरी त्यांचें मराठी व हिंदी वाचन अत्यंत विस्तृत असून त्या फार बहुश्रुत आहेत. माझी पत्नी-यमूताई ही छबूताईच्या मानानें कमी शिकली—सवरलेली असली तरी एकंदर गृहव्यवस्थेंत ती फार वाकबगार होती.

आम्ही घातलेली झोपडी अतिशय लहान असून तींत आठ फूट लांबीच्या व सहा फूट रुंदीच्या अशा दोनच खोल्या होत्या. मागची खोली म्हणजे किचन्, स्टोअर रूम, डायनिंग हॉल, कम्—नानांची बेडरूम अशी योजना होती. मी नानांपेक्षां वयानें मोठा म्हणून पुढच्या खोलींत निजें. अभ्यासाची खोली, बैठकीची जागा, आल्यागेल्याच्या स्वागताचें स्थान अशा निरनिराळ्या नात्यांनींहि तिचा उपयोग होई. दोन खोल्यांचे मध्यें दार असें नव्हतेंच. आडोसा करतांना धोतराचा पडदा सोडला की काम भागे. जोशी व गोखले यांच्याहि झोपड्या आमच्या झोपडीलगतच होत्या.

ही आमची एकत्र कुटुंबपद्धति उभयतांना इतकी सोईची व सुखावह झाली कीं, आमचे सर्व शेजारी-पाजारी आमच्या या जोड-सामाइक संसाराचें मोठें कौतुक करीत. या सुखाचें सर्व श्रेय सर्वस्वीं आमच्या पत्नींना आहे आम्ही पुरुष बऱ्याच वर्षांचे स्नेही होतों; पण त्या दोघी अगदीं नवीन व नवख्या असूनहि एकदम एकजीव व समरस झाल्या हें विशेष होय.

छबूताई या माझ्या पत्नीपेक्षां थोड्याशा मोठ्या व जास्त अनुभवी असल्यानें संसाराची मुख्य जबाबदारी त्यांच्यावरच पडे. त्यांच्या पोक्त व

प्रेमळ मार्गदर्शनाचा माझ्या कुटुंबाला अतिशय फायदा झाला. त्या तसल्या झोपडींतहि आमचे सहा महिने अत्यंत सुखाचे गेले. शेजारी–पाजारी आम्हांला राम-लक्ष्मण म्हणत. अर्थात् त्यांत अतिशयोक्ति व थोडीशी थट्टा असली तरी थोडें-फार सत्यहि होतें, हें मी अभिमानपूर्वक कबूल करतों. ‘सहानाववतु, सहनौ भुनक्तु सहवीर्यं करवावहै’ अशी आम्हां दोघांची वृत्ति असल्यानें आमच्या कॉलेजमधील मैत्रीचें रूपांतर नकळत बंधुभावांत झालें. त्या दोघीहि बहिणी-बहिणी बनल्या.

आमच्या कँपांतील सर्वच शेजारीपाजारी एकमेकांच्या उपयोगी पडत असत. आम्ही प्रत्येकजण एकेक आठवडा झोपड्यांभोंवतालीं रात्रीचा पहारा करीत असूं. एकमेकांचा बाजारहाट करीत असूं. संध्याकाळीं शाळेंतून झोपडीवर बरोबर येत असूं व रात्रीं सर्वजण एकत्र गप्पागोष्टी करीत असूं. आमच्याच कँपमध्यें दातार आडनांवाचे एक वकीलहि राहत असत. ते दर गुरुवारीं-शनिवारीं रात्रीं घरीं भजन करीत. मी व नारळकर भजनाचे व गाण्याचे शौकीन असल्यानें दातार यांचेकडे नियमानें जात असूं. एकंदरीत आमचें तें कँप-जीवनहि अतिशय सुखाचें व आनंदाचें झालें.

खामगांवाला असतांना मी दर्यापुराला व यवतमाळला जाऊन एकेक आठवडा राहून आलों. दर्यापुराला माझ्या मावसबहिणीचे (कृष्णाबाईचे) यजमान–भाऊसाहेब खरे वकिली करीत असत. कृष्णाबाई माझी बहीण–अत्यंत लाडकी बहीण असल्यानें तेथील माझें वास्तव्य प्रेमाचें व आनंदाचें झालें यांत विशेष नाहीं. यवतमाळला माझ्या एका सख्ख्या बहिणीची भाची सौ. गंगूताई व तिचे यजमान–श्री. लक्ष्मणराव ऊर्फ नानासाहेब अभ्यंकर, वकील ही मंडळी राहत असत. वास्तविक पाहतां या दोघांचें व माझें प्रत्यक्ष नातें असें नव्हतें. तथापि त्या उभयतांच्या दिलदार व प्रेमळ स्वभावामुळें माझा तेथील मुक्कामहि मजेचा व सुखाचा झाला. गंगूताई पुण्यास आल्या म्हणजे अद्यापहि मला भेटून सुखदुःखाच्या गोष्टी बोलल्यावांचून जात नाहींत. त्यांनीं आपल्या गांवांत मुलींचें हायस्कूल चालविलें असून, अन्यत्ऱ्हेचें सामाजिक कार्यहि त्या पुष्कळ करतात.

या दोघांशिवाय माझे मित्र साठेहि तेथील हायस्कुलांत मास्तर होते. तेथील हेडमास्तर रावसाहेब कतरणी हे त्यांच्या कामावर खूष असत.

उमरावतीचे देवभानकर, अकोल्याचे डांगे, खामगांवाचे गोरे यांप्रमाणेंच यवतमाळचे कतरणी हे शिक्षणक्षेत्रांतलें एक बडें धेंड समजलें जाई; आणि म्हणून साठे यांचेसंबंधींचें त्यांचें मत महत्त्वाचें मानलें पाहिजे. अशा रीतीनें आम्हीं तिघांहि महाराष्ट्रीयांनीं वऱ्हाडांत चांगलेंच नांव कमावलें म्हणावयाचें. खामगांवचें आमचें वास्तव्य पुऱ्या वर्षाचेंहि नाहीं, तथापि तें अजून चांगलें स्मरतें व मोठा आनंद होतो.

◎ ◎ ◎

## जबलपूर ट्रेनिंग कॉलेज : : : १०

दोन-तीन महिने पुण्यास राहून मी १९१८ च्या जुलैमध्यें जबलपुरास जावयास निघालों. तेथें सात-आठ महिने राहावें लागणार व दरमहा रु. पंचवीस स्टायपेंड म्हणून मिळणार हें ऐकून दादा-अण्णांना बरें वाटलें. नारळकर व साठे हेहि माझ्याबरोबर तेथें येणार असल्यानें त्यांना तीहि काळजी राहिली नाहीं. यां खेपेस सौभाग्यवतीहि खुषींत होती—निदान मागच्या वर्षी मी खामगांवाला जातांना तिची जी उदासीन व दुःखी चर्या दिसत होती तसली या खेपेस दिसली नाहीं.

निघण्याचे दिवशीं तिनें सर्व व्यवहार आनंदानें व हंसतमुखानें केले. तिनें माझें सर्व सामान व्यवस्थित बांधलें. डिंकाचे लाडू, आल्याच्या वड्या, चिवडा वगैरेंचे डबे ट्रंकेंत खालीं घातले. निघतांना मात्र 'आसूं व हंसूं 'चें हृद्य दृश्य चेहऱ्यावर दिसल्यावांचून राहिलें नाहीं. मनाची गोंधळलेली स्थिति लपविण्याकरितां कांहींतरी बोलायचें म्हणून मीं विचारलें, 'तूं आतां थोड्याच महिन्यांत माहेरीं जाणार असशील ना? मलाहि चारपांच महिन्यांनीं तिकडे येण्याचा योग दिसतो आहे. गेल्याबरोबर खुशालीचें पत्र येईलच.'

जबलपूरला गेल्याबरोबर रेसिडेन्सीच्या रेक्टरला भेटून एक खोली काबीज केली, व तींत तिघांनींहि आपापलें सामानसुमान लावलें. नारळकरांनीं पुढील कामाची व्यवस्था लावून दिली. तिघांनीं सर्वांची कॉमन कामें (झाडलोट, दिवाबत्ती, दूध घेऊन तापविणें, परटीला कपडे देणें, मधल्या वेळच्या खाण्याची तरतूद करणें इ.) एकेका महिन्याच्या

पाळीनें करावयाचीं असें ठरलें. ज्याची पाळी असेल त्याला त्या महिन्यापुरतें 'दादा' म्हणायाचेंहि निश्चित झालें. ही व्यवस्था सर्वांनाच सुखावह झाली.

तेथले प्रिन्सिपॉल व प्रोफेसर निरनिराळ्या देशांचे व प्रांतांचे जणूं कांहीं प्रतिनिधि होते. प्रिन्सिपॉल मि. स्पेन्स[1] स्कॉच, व्हा. प्रि. सदरंगाणी-सिंधी, मि. झा—यू. पी. कडील हिंदी, श्री. घोशळ-बंगाली, प्रो. कानेटकर-महाराष्ट्रीय ब्राह्मण, व श्री. कडेगांवकर—नागपुरी ब्राह्मण—अशी ही मंडळी होती.

विद्यार्थीहि निरनिराळ्या प्रांतांतले, निरनिराळ्या भाषा बोलणारे, विविध संस्कृतीचे व विविध आचाराविचारांचे होते. या संमिश्रणाचा एक फायदा असा झाला होता कीं, कॉलेज व वसतिगृह यांतील एकंदर वातावरण Cosmopolitan म्हणजे सर्वप्रांतीय व सरभेसळीचें होतें. विविध प्रांतांतील आचाराविचारांमध्यें कांहीं कांहीं वेळां लहानसहान संघर्ष उत्पन्न होत, नाहीं असें नाहीं. पण अधिकारी मंडळींच्या समंजस व सर्वसंग्राहक वृत्तीमुळें आणि निःपक्ष धोरणामुळें हे संघर्ष जेथल्या तेथेंच शमून जात.

मि. स्पेन्स हे गृहस्थ उतार वयाचे असूनहि त्यांच्या बोलण्याचालण्यांत व शिकविण्यांत तरुणाचा उत्साह व तरतरी दिसे. शिकवितांना ते अत्यंत समरस होत. त्यांचें वागणें, बोलणें, लिहिणें—सर्व कांहीं व्यवस्थित व विद्यार्थ्यांनीं घेण्यासारखें होतें. त्यांच्या एक—दोन संवयी व लकबी अद्याप आठवतात !

वर्गांत मध्यभागीं एक भला लांब कापडी पंखा डोक्याच्या उंचीवर टांगलेला असून दारापाशीं बसलेला चपराशी तो सारखा हलवीत असे. वर्गांत वावरतांना त्या पंख्याजवळून जातेवेळीं मात्र मान किंचित् खालीं लववावी लागे. याची प्रिन्सिपॉलसाहेबांना इतकी संवय झाली होती कीं, थंडीचे दिवसांत एखादे वेळीं पंखा चालू नसतांनाहि त्याच्या जागीं गेले म्हणजे ते मान आपोआप खालीं करीत. संवयी व लकबा कशा लागतात हें वर्गांत समजावून सांगतांना ते निरनिराळीं उदाहरणें घेत, पण आम्ही विद्यार्थी मात्र त्यांच्या मानेचें हें प्रत्यक्ष उदाहरण लक्षांत ठेवूं.

---

१. हल्लींच्या कॉलेजाला यांचेंच नांव दिलें आहे.

त्यांच्यासंबंधींच्या आठवणी आठवायाच्याच झाल्या तर पुष्कळ आठव-तील. त्यांचें तंबाखू ओढण्याचें व्यसन फार जबरें होतें. त्यांच्या बसण्याचे खोलींत धुराचे लोटच्या लोट निघत, व तंबाखूच्या मादक दर्पानें सबंध वातावरण धुंद होई. ते तास घेण्यासाठीं वर्गांत आले म्हणजे ते आपलें मन शिकस्तीनें आवरत; पण तासाच्या शेवटीं शेवटीं त्यांना अशी कांहीं अनावर तल्लफ येई कीं, सिगारेटच्या ऐवजीं सिगारेटसारखी दिसणारी हातांतील खडूची पांढरी कांडीच ते ओठाकडे नेत.

शिक्षणशास्त्राच्या मुळाशीं असलेलीं मानसशास्त्रीय तत्त्वें व वर्गव्यवस्था हे विषय ते शिकवीत–शिकवीत म्हणजे त्यांचीं टिपणें सायक्लोस्टाईलवर स्वतः काढून विद्यार्थ्यांमध्यें वांटीत. तीं टिपणें–प्रथम जेव्हां मूळ पुस्तकें मिळत नसत तेव्हां–विद्वत्तापूर्ण वाटत. पण पुढें पुस्तकें उपलब्ध झाल्यावर त्या टिपणांत स्वतंत्र व स्वतःचें असें फारसें नसून त्यांत पुस्तकाचा नुसता सारांशच दिलेला आहे असें ताबडतोब समजून येई. अर्थात् बहुतेक विद्यार्थ्यांपाशीं स्वतःचीं पुस्तकें फारशीं नसल्यामुळें असल्या सारांशवजा टिपणीहि फार उपयोगी पडत हेंहि कबूल केलें पाहिजे.

मि. स्पेन्स अत्यंत शांत स्वभावाचे असून विद्यार्थ्यानें फारच मोठी चूक केली तर ‘It is not so, my dear sir’ येवढेंच वाक्य सावात व सावकाश उच्चारून ते आपला राग व्यक्त करीत. ते स्वतः आदर्श पाठ देत व ते खरोखरच आदर्श असत.

आतां आमचे व्ही. पी. सदरंगाणी साहेब. ते आम्हांला शिक्षणशास्त्राचा इतिहास व शरीरशास्त्र शिकवीत. त्यांचें वाचन व वक्तृत्व चांगलें असे, पण प्रत्यक्ष विषयापेक्षां विषयाबाहेरचेंच जास्त शिकवीत. अर्थात् विद्यार्थ्यांच्या सामान्यज्ञानांत त्यामुळें चांगलीच भर पडे. ते साध्या साध्या गोष्टींनाहि भव्य व गंभीर रूप देऊन आपल्या अध्यापनाचा फाजील बडेजाव करीत असें स्मरतें. शरीरशास्त्राच्या तासाला लागणारें भाराभर साहित्य आणण्याला त्यांना कितीतरी गडीमाणसें लागत. दृश्य दिसें चांगलें, पण त्यांत देखावाच फार. मध्यप्रांत शिक्षणखात्यांतून निवृत्त झाल्यावर कांहीं काळ त्यांना मुंबईस निघालेल्या बी. टी. कॉलेजचे पहिले प्रिन्सिपॉल नेमलें होतें.

जबलपूर ट्रेनिंग कॉलेज ...११
अनुक्रम ..........
क्रमांक .......... नों: दि: ..............

योगायोग असा की, मुंबई विद्यापीठातर्फे घेण्यांत आलेल्या पहिल्या बी. टी. परीक्षेंत सदरंगाणी व नारळकर हे गुरु–शिष्य सहकारी परीक्षक होते.

आमचे लज्जाशंकर झा मोठे विद्वान् व सात्त्विक दिसायचे. ते आम्हांला थोड्याशा कंटाळवाण्या पद्धतीनें अध्यापन चटकदार कसें करावें हें शिकवीत व आमच्या पाठांच्या टांचणांवर लांब–लांब शेरे देत. त्यांचा " मोडस् ऑपरेंडी " हा शब्द आम्हांला कितीतरी दिवस कळत नसे.

प्रो. कानिटकर हे सांगलीचे रहिवाशी. ते फर्ग्युसन् कॉलेजांतून एम्. ए. झाल्यावर त्यांनीं कांहीं काळ मुंबई प्रांताच्या शिक्षणखात्यांत नोकरी केली. पण मध्यप्रांताच्या शिक्षणखात्यांत मोठी नोकरी सांगून आल्यामुळें ते तिकडे गेले व जबलपूर येथें स्थायिक बनले. ते नारळकरांचे श्वशुर असल्यानें त्यांना व आम्हां त्यांच्या मित्रांना कानिटकर हे एक मुख्य आधार झाले होते. सबंध कानिटकर कुटुंबच आम्हांला घरच्यासारखें वाटे. ते शांत स्वभावाचे व गाज्यावाज्या न करतां शिकविणारे होते.

मराठी व हिंदी भाषांवर त्यांचें मोठें प्रभुत्व होतें. त्यांचें वाचन विस्तृत असून ते फार बहुश्रुत होते. प्रथम प्रथम ते लिहीतहि असत, व त्यांनीं तें पुढेंहि चालू टेवलें असतें तर ते मराठींतील एक नामवंत लेखकहि झाले असते. ' विविधज्ञानविस्तार ' या मासिकांतील त्यांचे मानसशास्त्रावरचे लेख त्यांच्या या अभ्यासू वृत्तीची व भारदस्त लेखनाची साक्ष देतील.

ते हाताचे सढळ व मनाचे सरळ असून आल्या–गेल्या सगळ्यांचा परामर्ष घेत. आपल्या फर्ग्युसन कॉलेजला त्यांनीं कांहीं अटींवर बरीच मोठी ( मला वाटतें, पंचवीस हजार रुपये ) देणगी दिली आहे. ते नुकतेच वर्षा-दीडवर्षापूर्वीं दिवंगत झाले. आपला बहुमोल ग्रंथसंग्रह त्यांनीं सांगलीच्या मुख्य वाचनालयाला देणगी म्हणून देऊन आपल्या ग्रामस्थ बंधूंना उपकृत केलें आहे. उलट सांगलीकरानींहि कानिटकरांचें स्मारक करून आपली कृतज्ञता व्यक्त केली आहे.

ड्रॉइंगचे प्रोफेसर कडेगांवकर यांचेसंबंधींहि चार शब्द सांगितले पाहिजेत. त्यांची चित्रकला आम्हांला फारशी साध्य झाली नाहीं; पण त्यांची गोड बोलण्याची कला मात्र थोडीशी साधूं लागली होती. आम्ही पंचवीस–तीस वर्षांचे घोड–विद्यार्थी, त्यांना गोड बोलण्याशिवाय दुसऱ्या कोणत्या साधनानें

ते शिकवणार ? कोणतेंहि चित्र—उदाहरणार्थ गायीचें—काढून त्यांना दाखविलें म्हणजे ते एकदम उद्गारत " वा ! पटवर्धन, चित्र चांगलें काढलें आहेस. मात्र शिंगें, शेंपूट व पाय येवढीं सुधारा. वशिंड लहान करा, आणि मानेखालच्या पोळीला जास्त घोळ आणा. बाकी चित्र बरोबर ! " इतकं कमी करा, इतकं वाढवा, मग बरोबर काय राहिलं ? कपाळ ! पण त्यांनीं असें बोलूं नये तर आमच्यासारख्यांशीं कसं वागावं ?

प्रोफेसरांच्या वर्गातल्या व्याख्यानांना सुरुवात झाली. आम्हीं तिघांनीं निरनिराळ्या वह्या वगैरे करून प्रोफेसरांच्या व्याख्यानांच्या नोट्स् घ्यावयाला व स्वतःच्या काढायला सुरुवात केली. प्रोफेसरांचे आदर्श पाठ व जाणत्या विद्यार्थ्यांचें टीका-पाठ होऊं लागले, व सर्वत्र अभ्यासाचें वातावरण खेळूं लागलें. इतक्यांत आम्हीं विद्यार्थ्यांनीं द्यावयाच्या पाठांची यादी व्ही. पी.च्या सहीनें नोटीस बोर्डावर झळकली. ज्यांचे पाठ लागले होते ते विद्यार्थी आतां गंभीर व विचारमग्न दिसूं लागले. माझा पहिला पाठ इं. सहाव्या इयत्तेवर संस्कृतचा व्हावयाचा होता.

ट्रेनिंग कॉलेजांत विद्यार्थ्यांच्या पाठांना फार महत्त्व असतें. विशेषतः पहिल्या पाठाला तर अतिशयच असतें; कारण त्यानें होणाऱ्या अनुकूल वा प्रतिकूल मतावरूनच पुढील पाठासंबंधींचीं मतें सामान्यतः बनतात. माझा पाठ चांगला व्हावा म्हणून मी जिवाचा अगदीं आटापिटा केला. पाठ लागल्या दिवसापासून तें तो देऊन होईतों मला दुसरें कांहीं सुचत नव्हतें. वाचनालयांतून संस्कृतचीं पुस्तकें आण, काढलेलें टांचण मित्रांना दाखव, त्यांच्या सूचनांप्रमाणें सारखे बदल कर, नंतर विशेष सलगीच्या प्रोफेसरांना तें दाखव, त्यांचा सल्ला निराळा पडल्यास ( आणि तो तसा पडतोच ) त्याप्रमाणें पुन्हां सबंध टांचण बदल—असें माझें सारखें चाललें होतें. तरी बरें, संस्कृतचाच पाठ असल्यामुळें नकाशे, आराखडे, चित्रें, प्रत्यक्ष वस्तु इ. साहित्य गोळा करण्याची यातायात मला करावी लागली नाहीं.

पाठाच्या वेळीं घालायचा कोट परटाकडून धुऊन व इस्तरी करून आणला, केस वाढले होते ते कापवून घेतले, आयत्या वेळीं आवाज बसूं नये म्हणून आवाज सुटणाऱ्या गोळ्या आणून ठेवल्या. सारांश, आपला पाठ

अगदीं सर्वांगसुंदर व्हावा, त्यांत कसलीहि उणीव राहूं नये म्हणून सदरहु प्रकारचीहि तयारी करून ठेवली.

आणखीहि एक गोष्ट केली. ज्या वर्गावर पाठ द्यावयाचा होता त्यांतील विद्यार्थ्यांची—विशेषतः त्यांतील हुशार पण खोडसाळ मुलांची, ओळख करून घेऊन त्यांची सहानुभूति संपादन करून ठेवली. हेतु येवढाच कीं, त्यांनीं पाठ चालू असतांना कांहीं भलते–सलते, उत्तरें देतां न येण्यासारखे प्रश्न विचारून माझी फजिती करूं नये.

तसेंच पाहिलें तर संस्कृतचा पाठ घेणें इतर 'पाठांच्या मानानें सोपें होतें. पाठ्य-पुस्तकांतील संस्कृत वाक्यें घे, त्यांचें मराठींत भाषांतर कर, एखाद्या शब्दाचें व्याकरणात्मक रूप सांग, इतकें केलें म्हणजे पुरें होई. प्रश्नपद्धति, मुलांकडून काढून घेणें, मुलांच्या बुद्धीचा विकास करणें, फळ्याचा सारखा उपयोग करणें इत्यादि गोष्टी—ज्या इतर विषय शिकवितांना कराव्या लागतात—त्या संस्कृत शिकवितांना केल्या नाहींत तरी चालण्यासारखें असतें.

त्या वेळच्या या तयारीची आठवण आतां झाली म्हणजे मोठें हंसू येतें. या सर्व आगंतुक व कमी महत्त्वाच्या गोष्टींवर, 'पाठाची तयारी' म्हणून आम्ही इतका भर कां देत होतों ? पाठ द्यावयाला सांगण्यापूर्वींच जर आमच्या प्रोफेसरांनीं आम्हांला अध्यापनांत ( बिनमहत्त्वाचें कोणतें व महत्त्वाचें कोणतें ) टरफलें कोणतीं व सत्त्वें कोणतीं किंवा जॉन् ॲडम्‌चे शब्द वापरावयाचे तर Externals कोणतीं व Essentials कोणतीं हें नीट समजावून सांगितलें असतें तर हा अव्यवहारीपणा व अडाणीपणा आमचे हातून तितका झाला नसता.

पाठाचा दिवस उजाडला. दाढी करणें, परटीचे कपडे घालणें, सभ्य व भारदस्त दिसावें म्हणून अंगावर उपरणें घेणें व डोक्याला रुमाल घालणें, शिकवितांना जड वाटूं नये म्हणून दोन घासांनीं कमी जेवणें इ. गोष्टी करून मी कॉलेजांत गेलों. पहिल्या दोन तासांच्या वेळीं तिसऱ्या तासाला शिकवावयाची मनांतल्या मनांत उजळणी करीत—विशेषतः सुरुवात कशी नाट्यपूर्ण करावयाची, शेवट कसा चटकदार करावयाचा, विनोद कोठें कोठें करावयाचा, हें ठरवीत तो काळ घालविला.

तिसरा तास सुरू झाला. मी वर्गांत शिरलों. अद्याप पर्यवेक्षकांचा पत्ता नव्हता. त्यांना उशीर झाला आणि मनांत योजलेलें विसरून गेलों, तर

'करायाचें काय ? इतक्यांत पर्यवेक्षक आले, व पाठाला सुरुवात केली. विषय संस्कृत, व तिकडले विद्यार्थी पुण्याकडील विद्यार्थ्यांपेक्षां संस्कृतांत तरी जरा मागासलेले, तेव्हां पाठ चांगला झाला यांत विशेष नव्हतें.

"मुलांना आलेला कंटाळा नाहींसा करण्यासाठीं मध्यंतरीं उठाबस्यांची कसरत करावयाची असते ती केली नाहीं, रसग्रहणाऐवजीं व्याकरणावर भर जास्त दिला इ. सोडलें तर पाठ एकंदरीनें बऱ्यापैकीं झाला" अशी पर्यवेक्षकानें टीका केली, व पासापुरते मार्क दिले. माझ्या पाठाचें निरीक्षण करणाऱ्या माझ्या शिक्षकमित्रांचे मतें मात्र पाठाला निदान पंचावन्न टक्के गुण तरी द्यावयास पाहिजे होते. इतक्यांत त्यांच्यापैकींच एकानें हे पर्यवेक्षक स्वतःचा आब राखण्याकरितां कधींहि जास्त गुण देत नाहींत अशी प्रति-टीका केली, व त्याच सुरांत डॉ. भांडारकरांचीहि अशीच एक गोष्ट सांगितली. पण माझा विश्वास दोहोंवरहि बसला नाहीं.

कॉलेज सुटल्यावर नारळकर, साठे व मी खोलीवर आलों. 'दादांची' पाळी त्या दिवशीं नानांकडे होती. मला पाठामुळें सकाळीं नेहमींसारखें जेवण गेलें नव्हतें हें पाहून त्यांनीं मधल्या सुट्टींत ताजे गुलाबजाम आणून ठेवले होते. ते खात व माझ्या दुपारच्या पाठाची चर्चा करीत आम्ही ती संध्याकाळ घालविली.

कॉलेजच्या संमेलनप्रसंगीं आम्ही महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांनीं भाऊबंदकी नाटक केलें. मी इतरांचे मानानें जरा पोक्त व भारदस्त दिसल्यानें मला सखारामबापूंची भूमिका, आणि नारळकर उंच, शिडशिडीत व मोठे घोरणी असल्यानें त्यांना नाना फडणविसांची भूमिका देण्यांत आली. त्यांनीं आपली भूमिका फार चांगली केली. मींहि आपली भूमिका म्हाताऱ्या पोक्तपणाला व विसराळूपणाला साजेशी केली. पाठीला मुद्दाम आणलेलें पोक योग्य प्रमाणांत दिसलें, पण विसराळूपणाचा इतका अतिरेक झाला कीं, स्वतःला विसरण्याऐवजीं मी स्वतःच्या भूमिकेलाच विसरलों !

प्रो. कानेटकरांच्या धाकट्या कन्येला–कुमुदला–बालपेशवे सवाई माधवराव म्हणून मांडीवर घेऊन बसलों खरा, पण नुसताच बसलों. सखारामबापूंच्या त्या मोठ्या व स्फूर्तिप्रद भाषणाचा (शेवटच्या अंकांतील)

एक शब्दहि आठवेना, व आठवला तो बाहेर फुटेना ! लवकर पडदा पडला म्हणून सर्व कांहीं निभावलें.

नाटकाला सुरुवात करणाऱ्या सूत्रधाराची ( बाजूच्या दोन परिपार्श्वकां-मधील मुख्य सूत्रधाराची ) माझी भूमिका मात्र फार चांगली वठली. भाऊबंदकी नाटक वस्तुतः गद्य आहे. पण सुरुवातीला संगीत असलें म्हणजे प्रेक्षकांवर अनुकूल परिणाम होतो असें मुख्य मॅनेजर साठे यांना वाटल्या-वरून त्यांनीं 'मानापमान' नाटकांतील सूत्रधाराच्या 'नमन नटवरा विस्मयकारा' या गाण्याचें नाट्यांतर केलें. माझें तें गाणें चांगलें झालें.

नामदार मनोहरपंत गोळवलकर,[१] डॉ. हर्षे,[२], श्री. साने,[३] श्री. ओक[४] इत्यादि महाराष्ट्रीय पुढारी नागरिक आम्हां महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांना उत्तेजन देण्याकरितां म्हणून आमच्या या नाटकाला सहपरिवार उपस्थित होते. त्यांनीं आमचें खूपच कौतुक केलें. आम्हीहि नाटकाला झालेल्या उत्पन्नाचा बराचसा मोठा भाग तेथील महाराष्ट्र समाजानें चालविलेल्या वाचनालयाला आमची भेट म्हणून दिला. अशा प्रकारें परस्पर संबंध जुळवून आणण्याच्या दृष्टीनें या नाटकाचा फारच चांगला उपयोग झाला. याचें बरेंचसें श्रेय प्रो. कानेटकरांच्या दूरदृष्टीला व योजकतेला दिलें पाहिजे.

पुढें अत्यंत कर्तबगार हेडमास्तर म्हणून प्रसिद्धि पावलेले श्री. टी. बी. जोग व व्ही. के. राजवाडे यांची ट्रेनिंग कॉलेजांतील विद्यार्थिदशा आमच्या अगोदरच्या वर्षीं संपलेली असून ते दोघेहि आतां आम्हांला आमच्या अध्यापनाची संथा देऊन आमचे पाठ पाहत.

---

१. जबलपूरचे महाराष्ट्रीय पुढारी, नाणावलेले वकील, व मध्यप्रांत कौन्सिलांतील सभासद.

२. जबलपूरचे एक नाणावलेले परोपकारी डॉक्टर. त्यांनीं आपल्या मुलीला व पुतणीला पुढें आमच्या हिंगण्याच्या संस्थेंत ठेवलें होतें.

३. जबलपूरचे एक वयस्कर व कर्तृत्ववान पुढारी व लोकमान्य टिळकांचे व्याही.

४. एक तरुण, हौशी समाजकार्यकर्ते. त्यांनीं 'हितकारिणी' हायस्कूल चालविलें आहे.

फर्ग्युसन कॉलेजांत पुढें प्रोफेसर झालेले श्री. वि. आ. आपटे हे प्रथम आमच्याच बरोबर जबलपुरास विद्यार्थी होते. मागें उल्लेखिलेले नमूकाका गोखले व जी. एम. जोशी हेहि आमचे तेथील सहाध्यायी होते. या पुणेंकरांशिवाय हर्द्यांचे देशपांडे (नाटकांतील राघोबादादा) रायपूरचे दांडेकर (नाटकांतील रामशास्त्री) व नागपूरचे लांडगे (नाटकांतील नमकशास्त्री) हेहि आमचे विशेष मित्र होते. ते तिघेहि हुशार असून दुसऱ्याला मदत करायला सदा तयार असत. जबलपूर सोडून आज चाळिसांवर वर्षें होऊन गेलीं आहेत; पण तेथील कॉलेज–प्रोफेसर, सहाध्यायी मित्र, ग्रामस्थ सुहृद् व विशेषतः कानेटकर कुटुंब या सर्वांच्या आठवणी अद्याप कायम आहेत.

जबलपूरला असतांनाचा एक गंमतीदार प्रसंग आठवतो. नारळकर, साठे व मी—आम्ही तिघेहि पुण्याचे, फर्ग्युसन् कॉलेजसारख्या त्यागी व देशाभिमानपोषक संस्थेंत शिक्षण घेतलेले, शिक्षणानंतर कांहींतरी देशसेवेला वाहून घ्यावयाचें अशा विचारानें प्रेरित झालेले; तेव्हां एल्. टी. झाल्या-बरोबर किंवा फार तर दोन वर्षें सरकारी नोकरी करून स्टायपेंडची अट पुरी केल्याबरोबर कोणत्या तरी राष्ट्रीय शिक्षणाच्या कार्याला वाहून घ्यावयाचें असा आमचा बेत होता.

आम्हां तिघांमध्यें नारळकर हे या बाबतींत जास्त उत्साही व जास्त उत्कट भावनेचे. महाराष्ट्रांत आमच्यासारख्यांची फारशी जरूरी नाहीं, कोणी आमची फारशी कदरहि करणार नाहीं, असें वाटूनच कीं काय, त्यांनीं आम्हां तिघांचे वतीनें बनारस युनिव्हर्सिटीचे संस्थापक पंडित मदन मोहन मालवीय यांना पत्र पाठवून आमची तिकडे येण्याची मनीषा प्रदर्शित केली व शिक्षणकार्याचें नच जमल्यास दुसरें कोणतें देशकार्य करावें अशी पृच्छा केली.

पंडितजींना महाराष्ट्रीयांच्या स्वार्थत्यागाचें व देशप्रेमाचें मोठें कौतुक वाटे; आणि म्हणून आमचें पत्र गेल्यावर ते आमचा मोठा गौरव करून आम्हांला ताबडतोब येण्याबद्दल उलट टपालीं कळवतील अशी आम्हांला मोठी आशा वाटत होती. नव्हे, अशी आमची खात्रीच होती. पुष्कळ दिवस झाले, पंडितजींचें कांहींच उत्तर आलें नाहीं. बनारस विद्यापीठांत

आमच्याजोगें कांहीं काम नसावें, हें एक; शिवाय कोणतें देशकार्य आम्ही करावें हें ते काय सांगणार ? अशा कारणांमुळें आम्हांला त्यांनीं कांहीं न कळविणें हेंच स्वाभाविक होतें.

बरें झालें, पंडितजी सौम्य व सात्त्विक वृत्तीचे होते म्हणून ते गप्पच राहिले. टिळकांसारख्यांनीं "देशसेवा करण्याची इच्छा असणाऱ्या माणसाला दुसऱ्याला विचारावें लागत नाहीं, तुम्ही आपली 'सरकारी हमाली' करा" असें एकदम व रोखठोकपणें सांगून टाकलें असतें.

'मी लग्न करूं का देशसेवा करूं?' असें भावूकपणें विचारणाऱ्या एका भाबड्या माणसाला टिळकांनीं असें सांगितल्याचें सांगतात कीं, 'तूं घरीं परत जा, आणि ताबडतोब लग्न कर. तुझी तीच इच्छा आहे, मला कौल लावण्याचा नुसता बहाणा करतो आहेस.'

मी जबलपुरास असतांनाच माझ्या इंदूचा तिच्या आजोळीं जन्म झाला. त्या वेळीं तिचे आजोबा ती. कृष्णाजी रामचंद्र वेलणकर ऊर्फ तात्या—नाशिक जिल्ह्यांतील विंचूर गांवीं नोकरीनिमित्त राहत असत. त्यांच्या व सौभाग्यवतीच्या आग्रहावरून मी थोडे दिवस तिकडे जाऊन सर्वांना भेटून आलों. मुलगी झाल्यामुळें सौभाग्यवती फारशी खुशींत दिसली नाहीं. मला मात्र ती मुलगी पाहिल्या वेळेपासूनच आवडूं लागली.

एक कर्तबगार ओव्हर्सिअर म्हणून तात्यांचा फार लौकिक होता. घरांत खाण्यापिण्याची सुबत्ता असून संसार मोठा समृद्ध दिसला. अर्थातच तेथून माझा पाय लवकर निघेना. पण कॉलेज बुडवून तरी कसें चालणार ? आणि बुडवायचें म्हटलें असतें तरी तात्या थोडेच तसें करूं देणार होते ! शेवटीं कष्टानें पाय काढला. तात्या धार्मिक वृत्तीचे, कडक सोंवळें-ओवळें व नेम-नियम पाळणारे होते. मीहि त्या काळांत सोंवळें पाळीत असें. शिवाय मी बराच शिकलेला आहें असें वाटून त्यांना माझ्याबद्दल मोठें कौतुक व आदरहि वाटे. मी विंचूरहून निघतांना त्यांनीं मला खास तेथें होणाऱ्या दोन वस्तु भेट म्हणून दिल्या. रेशमी कोशा व आपल्या हाताखालील लोहाराकडून मुद्दाम करवून घेतलेला नक्षीचा आडकित्ता. दोन्ही वस्तू अति मोलाच्या किंवा फार दुर्मिळ होत्या असें नाहीं; पण देणाऱ्यानें त्या मोठ्या आवडीनें व प्रेमानें दिलेल्या असल्यामुळें मला त्या फार आवडत. चाळीस

वर्षांपूर्वी दिलेला आडकित्ता तर मी अद्याप त्यांची आठवण म्हणून जवळ ठेवला आहे.

पुढें बरेच दिवसांनीं मेसापोटेमियांत लढाई सुरू झाली आणि इंग्रज सरकारनें तात्यांची बदली विंचूरहून तिकडे केली. आम्ही त्या वेळीं अकोल्यास होतों. तात्यांना तिकडे जाऊन बरेच दिवस झाले तरी खुशाल पोंचल्याचें पत्र येईना. सर्व मंडळी चिंतेंत पडली. शेवटीं एक पत्र आलें, पण तें तात्यांच्या हातचें नव्हतें. तें एक सरकारी पाकीट असून 'वेलणकर सन्‌-स्ट्रोकनें वारले' एवढेंच त्यांत कळविलें होतें. मेसापोटेमियाच्या अत्यंत प्रखर उन्हाळ्यानें, व तात्यांच्या भक्ष्याभक्ष्याच्या व सोंवळ्या–ओवळ्याच्या अतिरिक्त कल्पनांनीं त्यांचा अकालीं बळी घेतला; व मी एका सुहृद्‌ व प्रेमळ आप्ताला मुकलों. सौभाग्यवतीच्या दुःखाला तर पारावारच नव्हता.

एकोणीसशें एकोणीसच्या मार्चमध्यें आमचें जबलपूरचें ट्रेनिंग संपलें व आम्ही तिघे अलाहाबाद युनिव्हर्सिटीचे एल्.[१] टी. झालों. नारळकरांनीं परीक्षेंत पहिला वर्ग मिळवून आपलें शिक्षणशास्त्राचें सखोल ज्ञान व अध्यापनकलेंतील प्रावीण्य स्पष्टपणें सर्वांच्या नजरेस आणून दिलें. जबलपूर सोडण्याच्या दिवशीं आम्ही सर्व महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांनीं एकत्र जमून एक-मेकांचा निरोप घेतला.

थोडे दिवस नारळकरांबरोबर त्यांचे सासुरवाडीं–प्रो. कानेटकर यांचे घरीं–मुक्काम करून व बेडा[२] घाटाची पुन्हां एक ट्रिप काढून आम्ही तिघांनीं जबलपूर कायमचें सोडलें.

यापुढें कोणतें गांव मिळणार ? नारळकरांची व आपली ताटातूट तर होणार नाहीं ना ? इत्यादि विचारचक्र सुरू झालें.

---

१. हल्लीं जबलपूर अलाहाबाद युनिव्हर्सिटीपासून विभक्त झालें असून त्याच्या एल्. टी. परिक्षेस बी. टी. च म्हणतात.

२. नर्मदेचा प्रसिद्ध धबधबा.

## अकोला–दोघां नानांचा जोडसंसार : : : ११

माझी व नारळकरांची नेमणूक अकोला-हायस्कूलमध्यें झाल्यानें आम्ही दोघेहि १९१९ च्या जुलैमध्यें अकोल्यास बरोबर गेलों. सामानसुमान स्टेशनवरच ठेवून व भाड्याच्या सायकली घेऊन आम्ही बिऱ्हाडाला जागा पाहण्यास निघालों.

आमच्या खामगांवच्या एकत्र वास्तव्याचा आम्हांला अपेक्षेपेक्षां जास्त चांगला अनुभव आला होता. आम्हां दोघांबद्दल प्रश्नच नव्हता; पण आमच्या पत्नींचा संबंध तेथें पहिल्यांदाच यावयाचा असल्यानें त्यांना आमच्या एकत्र राहण्याचा बेत पसंत पडतो की नाहीं याची–नानांना नसली तरी मला थोडीशी शंका होती. पण तेथें त्यांचें आमच्यापेक्षांहि जास्त चांगलें जुळलें होतें. शिवाय जागा कितीहि लहान असली तरी आम्हां दोघां कुटुंबांत परस्परांना सामावून घेण्याची वृत्ति असल्यानें त्याबद्दलहि विचार करण्याचें कारण नव्हतें. तेव्हां एकत्र व मिळेल तेवढ्याच जागेंत दोघांनीं राहावयाचें व तशी जागा पाहावयाची असें आम्हीं ठरविलें.

नानांची तडफ, मग काय विचारावयाचें? गांवांत तीन-चार घरें झपाझप पाहून व नापसंत करून शेवटीं गांवाच्या पूर्वेस २–३ मैलांवर 'उमरी' म्हणून जो उपभाग आहे तेथें देशमुख वकिलांचें एक घर पाहिलें, व तें कायम केलें. भाड्या–बिड्याचा कांहीं प्रश्नच नव्हता. मालक मागतील तेवढें भाडें देण्याचें नानांनीं मनाशीं ठरविलें होतें.

त्यांचा हा नेहमींचाच खाक्या असतो. बाजारांत गेल्यावर अगोदर भाव विचारणें, घासाघीस करणें, दुसरीकडे चौकशी करणें, खरेदी लांबणीवर टाकणें, अशांसारख्या ज्या ज्या क्रिया माझ्यासारख्याकडून घडतात त्या ते

कधींच करीत नाहींत. ते मनानें भारी उदार व दिलदार असून दुसऱ्यावर चटकन् विश्वास टाकतात. या त्यांच्या गुणामुळें दुकानदार त्यांना कधीं फसवीतहि नाहींत, माल चोख मिळतो, विश्वासानें विश्वास वाढतो, व काम ताबडतोबीनें होतें.

नानांचा हा स्वभाव ओळखून देशमुख वकिलांनींहि भाडें रीतसर सांगितलें व आमचे संबंध कायमचे चांगले राहिले. घर थातुरमातुर व जुनसरच होतें; पण त्याला आम्ही ' बंगली ' असें लाडकें नांव दिलें होतें. घराभोंवतीं मुबलक मोकळी जागा, मध्यभागीं एक सुंदरशी विहीर, जवळच गर्द छाया असलेलें एक कडुलिंबाचें झाड अशा सोयी होत्या. सर्व घर स्वतः झाडून–झुडून आम्ही संध्याकाळचे आंत त्यांत वास्तव्यहि केलें. मी एकटा असतों तर किती घोळ घातला असता, किती दिरंगाई केली असती, कोण जाणें.

जागा हस्तगत केल्याबरोबर दोघांनींहि पत्नींना ताबडतोब निघण्याबद्दल तारा केल्या, व त्या येईतों आम्ही घर सर्व सुखसोयींनीं सज्ज करण्याच्या मार्गाला लागलों. भुसारी व वाणसवदा माल आणला, सायकलीवरून लाकडाची मोळी आणली व गांवांतल्या गिरणींतून दळूनहि आणलें. दोघांच्याहि टोप्या पिठानें पांढऱ्या झालेल्या अद्याप आठवतात. दोन दिवसांत दोघी गृहलक्ष्मी घरीं आल्या, व सर्व घर कसें स्वच्छ, सुंदर व सुव्यवस्थित दिसूं लागलें. इकडे शाळेंतहि दोघांचें बस्तान बसत चाललें.

त्या वेळीं अकोला हायस्कुलावर[१] नानासाहेब डांगे म्हणून एक मोठे करारी व कर्तृत्ववान हेडमास्तर होते. त्यांचा तो लांब, काळा कोट, काळा जरीकाठी रुमाल, उग्र चेहरा, पांढऱ्या भरघोस छपरी मिशा–सर्व कसें अजून डोळ्यांपुढें येतें. आम्ही दोघे ड्यूटीवर जॉईन झाल्याबरोबर हेडमास्तरसाहेबांनीं आम्हांपुढें दोन वेळापत्रकें टाकलीं व ' कामाला लागा ' असें फर्मावलें. नानांचें टाईमटेबल पूर्वीच्या सायन्स टीचरचें निघालें. माझें भूगोलाच्या शिक्षकाचें निघालें. आम्हां दोघांनाहि आलेल्या विषयांचा गंधहि नव्हता. पण तक्रार करण्याची सोय नव्हती. डांगेसाहेब (म्हणे) फार खाष्ट असून

१. पुण्यांतील प्रसिद्ध शिक्षणकार्यकर्ते श्री. नानासाहेब किंकर यांचे हे श्वशुर.

शिक्षकांच्या सोयी–गैरसोयींचा विचार करण्याची त्यांची रीत नव्हती. खालच्या अजीजीच्या आवाजानें त्यांच्या नजरेस ही गोष्ट आणून दिली तेव्हां ते म्हणाले, " हें पहा मिस्टर, तुम्ही त्यांचे सब्स्टिट्यूट आहां, तेव्हां त्यांचे विषयच तुम्ही घेतले पाहिजेत. प्रत्येकाची सोय–गैरसोय मी पाहूं लागलों तर पहायलाच नको." पण शेवटीं त्यांनीं आमचें म्हणणें मोठ्या मिनतवारीनें मान्य केलें व दुसरीं वेळापत्रकें करून दिलीं.

नानासाहेब मनानें मऊ व पुण्याकडले असल्यानें आम्हां पुणेंकरांवर त्यांचा लवकरच लोभ जडूं लागला; आणि इतर शिक्षकांना धारेवर धरणाऱ्या या राजश्रीनें आम्हांला मात्र सोयीनें वागविलें. पुढें त्यांच्याच शिफारशीनें तेथील सुप्रसिद्ध वकील रा. ब. दामले यांचे घरांत शिकवणीचे निमित्तानें माझा शिरकाव झाला व ते माझे कायमचे ऋणानुबंधी बनले. त्यांचा मुलगा म्हणजे माझा विद्यार्थी डाकू ( त्या वेळचें नांव ) आतां मोठा वकील झाला आहे.

पुढें थोड्याच काळांत दोन घटना घडल्या. एक-माझी बदली हायस्कुलांतून अकोला नॉर्मल स्कूलमध्यें झाली, व दुसरी–डांगेसाहेब निवृत्त होऊन त्यांचे जागीं केमकर नांवाचे एक तरण्या दमाचे, कामसू व कष्टाळू गृहस्थ हायस्कूलचे हेडमास्तर म्हणून आले.

नानांची व माझी शाळेच्या दृष्टीनें फारकत झाली खरी, पण माझी बदली एकंदरींत माझ्या पथ्यावरच पडली. नॉर्मल स्कूलचे प्रिन्सिपॉल अण्णासाहेब वैद्य म्हणून एक हुशार, कर्तबगार व गोड स्वभावाचे गृहस्थ होते. त्या शाळेंत मीच काय तो एम्. ए., एल्. टी. असल्यानें स्वतः प्रिन्सिपॉल, इतर शिक्षक व विद्यार्थी या सर्वांनाच माझ्याबद्दल एक प्रकारचा आदर वाटत असलेला दिसे. प्रि. वैद्य पुण्याचेच असल्यानें व माझें शिकवणें आणि इतर वागणूक त्यांना पसंत असल्यानें त्यांनीं थोड्याच दिवसांत माझ्यावर पुष्कळच जबाबदारी टाकली व बरेचजण माझ्याकडे व्हाईस् प्रिन्सिपॉल म्हणूनच पाहूं लागले.

येथील एकंदर परिस्थितीहि मला मानवण्यासारखी होती. विद्यार्थी वयानें प्रौढ, मनानें भाबडे, आस्थेवाईक, आज्ञाधारक व निष्ठावंत असून शिकण्यांत कसूर करणारे नव्हते. शिवाय सर्व शिकवणें मातृभाषेंतूनच

करावयाचें असल्यामुळें माझ्या बोलण्याला सराईतपणा येऊन त्यांत वक्तृत्वाची चमकहि दिसे. मी शिकविण्याची तयारीहि मनापासून करीं–विशेषतः विषयाची तयारी विशेष करीत असें. शेळीच्या शिकारीलाहि वाघाच्या शिकारीची तयारी असावी लागते ही ग्रामीण म्हण सदैव माझ्या डोळ्यांपुढें असे.

या सर्व तयारीचा फायदा असा झाला कीं, माझ्या शिकवण्यांत ज्ञान, बौद्धिक विकास व मनोरंजन या सर्वांचा सुंदर मिलाफ झालेला सांपडे. विद्यार्थ्यांच्या सहकार्याबरोबरच मला वरिष्ठांच्या सहानुभूतीचाहि लाभ होई, व दोघांच्याहि चांगल्या मतामुळें लोकांचें व पालकांचें मतहि चांगलें होऊन शिष्यप्रियतेबरोबरच लोकप्रियताहि प्राप्त होई. सारांश, यशस्वी शिक्षक व्हावयाला लागणाऱ्या बहुतेक सर्व गुणांचा समन्वय माझ्या ठिकाणीं होऊं लागलेला पाहून माझा मलाच आत्मविश्वास व आत्मप्रतीति हीं वाटूं लागलीं.

तिकडे हायस्कुलांत नारळकरहि आपल्या अंगच्या हुशारीनें व कर्तृत्वानें केमकरांचे उजवे हात बनले. अशा प्रकारें व्यवसायाच्या दृष्टीनें आम्हां दोघांचें चांगलें बस्तान बसलें.

मी नॉर्मल स्कूलमध्यें गेलों तेव्हां तें गांवांत एका लहानशा दुमजली भाड्याचे इमारतींत भरत असें. त्याची सरकारी इमारत बांधून होत होती. थोड्याच दिवसांत ती पुरी होऊन तिचा उद्‌घाटन समारंभ मध्यप्रांताच्या कमिशनरांच्या शुभ हस्तें करावयाचें ठरलें. त्या प्रसंगीं विद्यार्थ्यांकडून सुरुवातीचें स्वागतगीत व शेवटचें राष्ट्रगीत 'गॉड सेव्ह दि किंग्' म्हणून घेण्याचें काम मजकडे आलें. स्वागतगीत बरें बसलें, पण शेवटच्या राष्ट्र-गीताचे सूर कांहीं नीटसे जमेनात. तें कसें म्हणावयाचें हें समजून घेण्यासाठीं म्हणून सुप्रसिद्ध नाटककार श्रीपाद कृष्ण ऊर्फ तात्यासाहेब कोल्हटकर (हे त्या वेळीं अकोल्यास होते) यांचेकडे जाण्यास मला प्रिन्सिपॉलांनीं सांगितलें.

मी खामगांवास असतांना तात्यासाहेबांना पुष्कळ वेळां नुसतें दुरून पाहिलें होतें. पण ते नेहमीं विचारमग्न व गंभीर वाटल्यामुळें त्यांच्याशीं बोलण्याचें धाडस मीं कधीं केलें नव्हतें. त्यांना समक्ष व कारणपरत्वें भेटण्याची ही संधि आलेली पाहून मला अतिशय आनंद झाला.

मी तात्यासाहेबांच्या घरांत शिरलों तोंच माडीवरून गाण्याचे सुंदर सूर कानांवर आले. तात्यासाहेबच गुणगुणत होते. ते इतके सुंदर गात असतील अशी माझी कल्पना नव्हती. त्यांनीं मोठ्या आस्थेनें माझी विचारपूस केली. मी पुण्याचा असलेला ऐकून त्यांना बरें वाटलेलें दिसलें. त्यांनीं म्हणून दाखविलेल्या राष्ट्रगीताचे सूरहि मला गळ्यांतून काढतां आले, याचेंहि त्यांना बरें वाटलें. इतर थोडेंसें बोलणें झाल्यावर मी त्यांचा निरोप घेतला व जाण्यास निघालों. मी निघतांना 'चांगले शिक्षक व्हा, जमल्यास मातृभाषेचीहि सेवा करा' असा त्यांनीं संदेश दिला. केवढ्या मोठ्या व्यक्तीला मी त्या दिवशीं भेटलों होतों! पुढें कांहीं वर्षांनीं हिंगण्याहून मी त्यांच्या दर्शनाला गेलों, पण तें पुण्यास ओंकारेश्वरावर त्यांच्या निर्याणसमयीं.

राष्ट्रगीत बसविण्याचें कारण उद्भवलें नसतें आणि प्रि. वैद्यांनीं मला तात्यासाहेबांकडे जाण्यास सांगितलें नसतें तर मला नाहीं वाटत, मी आपण होऊन, केवळ त्यांना पाहण्याकरितां म्हणून त्यांचेकडे गेलों असतों. कवि 'बी' (कै. मुरलीधर नारायण गुप्ते) हे अकोल्यांतच राहत होते, तरी मी त्यांच्याकडे कधीं गेलों आहे? त्यांचें नांवहि त्या काळांत कधीं ऐकलें नाहीं; मग त्यांचें काव्य ऐकायाचें तर दूरच राहिलें. त्यांची प्रसिद्धिपराङ्मुखता हें एक कारण असूं शकलें तरी आमची ज्ञानासंबंधींची उपेक्षा हेंहि कारण नाहीं का? असेंच पुढें बडोद्यास असतांना 'चंद्रशेखरां'चे बाबतींत झालें.

नॉर्मल स्कूलमध्यें असतांना माझें शिकविण्याचें काम तर चांगलें चाललेंच होतें, पण शिक्षणविषयक इतर चळवळींतहि मी बराच भाग घेत असें. मला विद्यार्थ्यांबरोबर प्रत्यक्ष खेळतां येत नसलें तरी ते हॉकी खेळत असतांना मी क्रीडांगणावर हजर राहीं व त्यांना त्यांच्या खेळांत प्रोत्साहन देई.

आम्ही शिक्षकांनींहि सर्वांच्या सोयीचें कांहींतरी सामाजिक कार्य करण्याचें ठरविलें व प्रि. वैद्यांच्या सल्ल्यानें व सहानुभूतीनें शाळेंतच सहकारी तत्त्वावर सामाइक भांडवलानें एक वाणसवद्याचें दुकान काढलें. आम्हीं सर्व शिक्षक जातीनें व आळीपाळीनें माल विकीत असूं. रा. गोखले म्हणून एक हुशार व व्यवहारदक्ष शिक्षक होते ते लांबलांबच्या गांवांहून मोठी किफायतशीर खरेदी करीत.

दुकान झाडून स्वच्छ ठेवण्यांत मी वाकबगार होतों; पण दुकानांतील केराबरोबरच त्यांतील मालहि वाऱ्यावर उडून जाई. नमनावारी तेल जातें तसें मासल्यावारीच तूप संपे. भुइमुगाच्या शेंगांचें पोतें व गुळाच्या ढेपा जवळ जवळ असल्यानें सर्वच भागीदारांना गुडदाणीची लज्जत चाखावयाचा मोह होई. बरें, सर्वच सारखे खाबू असल्यानें सर्वांचींच तोंडें बंद! शेवटीं आमच्या अण्णासाहेब वैद्यांनीं एक तोड काढली. दुकानांत उरलेला माल सर्वांनीं सारखा वांटून घ्यावयाचा व दुकान आनंदानें बंद करायाचें! हलवाईच पेढे खाऊं लागला म्हणजे असेंच व्हावयाचें, नाहीं का?

आमच्या सहकारी दुकानाचें हें असें झालें तरी आमचा सामाजिक संसार मात्र फार उत्तम प्रकारें चालला होता. या आमच्या संसाराचे आम्ही मूळचे चार भागीदार. पण पुढें लवकरच त्यांत आणखी तिघांची भर पडली. एक नानांचे धाकटे बंधु—वसंतराव,[१] दुसरा म्हणजे माझी छोटी मुलगी—इंदू व तिसरा भागीदार म्हणजे मागें उल्लेखिलेला माझा भाचा शांताराम. आम्हां मूळ भागीदारांप्रमाणें या तिघां भागीदारांचेंहि आपापसांत अतिशय जुळे. माझ्या पत्नीला वसंतरावांचा व वसंतरावांना इंदूचा थोड्याच दिवसांत इतका कांहीं लळा लागला कीं, त्यांना एकमेकावांचून करमत नसे. आज चाळीस वर्षांनींहि इंदूसंबंधीं वसंतरावांची आठवण अगदीं कायम आहे, व जेव्हां जेव्हां ते व मी भेटतों, तेव्हां तेव्हां तिच्या आठवणीनें आमचे डोळे पाणावल्यावांचून राहत नाहींत.

वसंतराव त्या वेळीं नानांचे हाताखालींच मॅट्रिकचे वर्गात शिकत होते. आम्ही तिघे शाळेंतलीं आपापलीं कामें समाधानकारक रीतीनें उरकून घरीं येऊं तों छबूताई व यमूताई आपापलीं गृहकृत्यें उरकून बागेच्या कामासाठीं सज्ज असत. संध्याकाळचें[२] खाणें वगैरे झाल्यावर आम्ही आमच्या बागेची मशागत करावयास लागूं. वसंतराव सर्वांत तरणे व तगडे असल्यानें विहिरींतील पाणी उपसून बागेला घालण्याची सर्व जबाब-

---

१. हल्लीं ते रेल्वेखात्यांत एक वडे डॉक्टर असून निवृत्तीच्या मार्गावर आहेत.

२. त्या काळांत आम्हीं कोणीच संध्याकाळीं चहा घेत नसें.

दारी त्यांनीं पत्करली होती. हें झाल्यावर ते इंदूला हिंडावयास घेऊन जात. तिला वसंतरावांबरोबर हिंडायला जायची जणूं चटकच लागली होती. ते काम करीत असतांना ती सारखी त्यांच्या मागें-मागें असावयाची. तेहि ' झालं आं, झालं आं ' असें म्हणून तिला थांबवून ठेवीत.

शांताराम त्या वेळीं कांहीं तरी दहा-अकरा वर्षांचा असून इंग्रजी पहिलींत होता. बायकांपुरुषांतलें एक लिंबलोणचें व हरकाम्या म्हणून बारीकसारीक बाबतींत आम्हांला त्याचा भारीच उपयोग होत असे.

नाना व मी फिरायला व बाजारहाट करायला जाऊं व बायका मंडळी संध्याकाळच्या कामाला लागत. आम्हांपैकीं कोणालाच आमच्या या कुटुंबांतील मंडळींव्यतिरिक्त दुसरे पाश नसत व गृहकृत्याव्यतिरिक्त दुसरें काम नसे. त्यामुळें आम्हां सर्वांची अशी कांहीं एकजूट दिसे कीं, जाणारे-येणारे आम्हांकडे मोठ्या कौतुकानें व आदरानें पाहत. कांहीं थोडेजण ' यांचें हें असें किती दिवस चालणार ? ' अशा संशयात्मक मुद्रेनें बघत.

हिशेब ठेवण्याचें व एकंदर खर्च विभागून घेण्याचें महत्त्वाचें काम नाना स्वतः मोठ्या आवडीनें व शहाणपणानें करीत. ते खानदानी कुटुंबांतले व थोरामोठ्या वडिलांचे चिरंजीव असले तरी आम्हां दोघांची मिळकत व दर्जा सारखींच असल्यानें, आमच्या पत्नीहि समान दर्जानेंच वागत असल्यानें, व त्यांचें कामहि परस्परपूरक असल्यानें सबंध कुटुंबांत एक समानतेचें वातावरण खेळत असे. या सर्वांमुळें आमचा सामाइक संसार अत्यंत समाधानकारक चालला होता.

बाहेरचीच नव्हे तर आम्हां दोघांच्या घरची मंडळीहि आमच्या या संसारावर अगदीं खूष असत. त्या सालीं माझी आजी व बहीण जीजी ( दोघीहि वयस्कर व सोंवळ्या होत्या ) काशीयात्रेस जातांना आमच्या बिऱ्हाडीं उतरल्या होत्या. त्यांनीं आमच्या या एकत्र राहणीचें अतिशय कौतुक केलें.

आमच्या या जोड-संसाराला दृष्ट लागली की काय कोणास ठाऊक ? हो, दृष्टच नाहींतर काय ? एरवीं बीज रुजून पानाफुलांना आलेलें रोपटें थोड्याच दिवसांत वठलें कां असतें ? वर्षा-दीडवर्षाच्या अवधींत आमच्या जोड-संसाराची फारकत झाली.

त्याचें असें झालें कीं, नानांना एल. टी.चे परीक्षेंत पहिला वर्ग मिळाल्या-मुळें ते प्रिन्सिपॉल् स्पेन्सच्या नजरेंत भरले होते, व तो पुढें मागें त्यांना आपल्याच कॉलेजांत प्रोफेसर म्हणून घेण्याच्या विचारांत होता. नानांचे श्वशुर गंगूनाना हेहि अशा प्रकारची थोडीफार खटपट करीत होते. पण थोड्याच दिवसांपूर्वी पुण्यास ' शिक्षण प्रसारक मंडळी 'चे ' न्यू पूना कॉलेज निघालें असून हुशार व होतकरू व्यक्ति टेहळून त्यांना आजन्म सेवक करून घेण्याचें काम चालूं होतें. कॉलेजच्या संस्थापकांपैकीं एक प्रो. द. रा. धारपुरे हे जबलपुरास आल्यावेळीं त्यांनीं नानांपाशीं तशा प्रकारची गोष्ट काढली होती.

नाना जुनागडच्या कॉलेजांतून बी. ए. होऊन इकडे आले ते तेथील प्रो. म. म जोशी यांच्याकडून मिळविलेल्या स्फूर्तीनें भारलेले व देशसेवेच्या प्रेरणेनेंच आले होते. अर्थात् प्रो. धारपुरे यांचें बोलावणें नानांच्या मनाला मानवलें व त्यांनीं प्रि. स्पेन्स, गंगूनाना व शिक्षण-खात्याची कमींत कमी दोन वर्षें नोकरी करण्याची अट यांपैकीं कशाचीच पर्वा न करतां घेतलेल्या सर्व स्टायपेंडची परतफेड करून पुण्यास प्रयाण केलें. अर्थात् सर्वांनीं हेवा करावा असा आमचा जोड-संसार मोडला व मी अकोल्यास एकटा पडलों.

नानांच्या पुण्यास जाण्यानें इंदु वसंतरावांच्या प्रेमळ सहवासाला पारखी झाली, व मी आणि यमूताई नाना–छबूताईंच्या मार्गदर्शनाला मुकलों. पण देवदयेनें याचीहि थोडीफार भरपाई पुढें थोड्याच दिवसांत एका अकल्पित योगायोगानें झाली.

◎ ◎ ◎

# अकोला – नाना गेले – भाऊ आले : : : १२

त्याचें असें झालें कीं, नाना पुण्यास गेल्यावर मी उमरीवरची आमची बंगली सोडली, व गांवांत ताजना पेठेंत श्री. अप्पासाहेब कोल्हटकर यांच्या घरांत राहायला गेलों. जागा बेतापुरती असून भाडें मला झेपण्यासारखें होतें. शिवाय मालक कोल्हटकर हे माझे आप्त तात्या[1] गाडगीळ यांचे मेहुणे असल्यानें त्यांची ओळख निघाली.

नवीन जागेंत जातों तों शेजारींच 'वासुदेव लक्ष्मण चिपळूणकर–वकील' अशी पाटी दरवाजावर लटकावलेली दिसली. या गृहस्थांना मी नांवानें व चेहऱ्यानें अगोदरपासूनच ओळखीत होतों. पुण्याच्या वसंत-व्याख्यानमालेंत अमरावतीचे वीर वामनराव जोशी, भुसावळचे दास्ताने, बडोद्याचे दाजीसाहेब आपटे, एलीचपूरचे श्री. नी. चाफेकर, सोलापूरचे रामभाऊ राजवाडे, कोल्हापूरचे तोफखाने, धुळ्याचे शंकरराव देव, कऱ्हाडचे आळतेकर इत्यादींसारख्या ज्या कांहीं वक्त्यांचीं भाषणें आवर्जून होत, व पुणेंकरांना विशेष आवडत अशा वक्त्यांपैकीं अकोल्याचे वासुदेवराव ऊर्फ भाऊसाहेब चिपळूणकर हे एक प्रामुख्यानें असत. त्यांच्या प्रवाही व विचार-परिप्लुत वक्तृत्वाबद्दल आम्हां विद्यार्थ्यांना त्या काळीं त्यांच्यासंबंधीं भारी आदर वाटे. शिवाय ते विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे पुतणे, व त्यांचेकडून देशभक्तीचा वारसा मिळविलेले. तेव्हां अशा आदरणीय व्यक्तीच्या शेजाराचा लाभ मला झाला हें माझें भाग्यच म्हणावयाचें.

खरोखरच, मी शेजाराच्या बाबतींत अत्यंत भाग्यवान् आहें. पुणें सोडून

---

१. प्रो. कर्वे यांच्या संस्थेंतील पहिल्यांपैकीं आजन्म सेवक.

खामगांव, जबलपूरसारख्या परप्रांतीय शहरीं गेलों असतांना नाना माझ्या 'सांगातीं' असल्यानें मला कोठेंच परकें वाटलें नाहीं. आतां नाना पुण्यास गेल्यामुळें माझ्यावर एकट्याला राहण्याची पाळी पहिल्यांदाच आली होती. नवीन शेजार कसा काय मिळतो या विवंचनेंत असतांनाच दैवानें भाऊसाहेब चिपळूणकरांसारख्या वडीलधाऱ्या व्यक्तीच्या सान्निध्यांत मला आणून सोडलें, आणि अशा रीतीनें नाना गेले तर त्यांची जागा भरून काढण्यास भाऊ आले अशा विचारानें मला हायसें वाटलें.

चिपळूणकर[१] कुटुंब अत्यंत प्रेमळ व परोपकारी असून त्यांच्या सान्निध्यांत व सहवासांत मोठा आनंद वाटे. त्यांचें घर आमच्या घराच्या अगदीं समोर असून आमचीं कितीतरी बोलणीं-बसणीं समोरासमोरच्या खिडक्यांतून चालत.

श्री. वासुदेवराव चिपळूणकर हे अकोल्यांतील एक नाणावलेले वकील असून अत्यंत शांत, सात्त्विक व सोज्ज्वळ आहेत. ते पूज्य बिझांटबाईंचे निष्ठावंत शिष्य असून त्यांनीं अकोल्यास असतांना एक थिऑसॉफिकल लॉजहि चालविलें होतें. त्यांचा पोशाख अत्यंत स्वच्छ आणि वागणें व्यवस्थित व नियमितपणाचें असें. त्यांचें रोजचें दुबार स्नान व सकाळ-संध्याकाळ हिंडणें कधीं चुकत नसें. हातधुलाईचा कफाचा सदरा, पांढरा लांब कोट, खांद्यावरून घेतलेलें पांढरें शुभ्र उपरणें, डोक्यावर गुलाबी पगडी, पायांत पुणेरी जोडा असा त्यांचा रुबाबदार पोषाख व विचारमग्न मुद्रा हीं पाहिल्याबरोबर पाहणाराला त्यांचेबद्दल एक प्रकारचा आदर व दरारा वाटे. सामाजिक नीतिमत्तेची त्यांची कल्पना इतकी उच्च दर्जाची असे कीं, खोट्या अशिलांचे खटले जाणूनबुजून घेऊन त्यांनीं आपल्या वकिली बाण्याला कधीं विटाळलें नाहीं, सच्ची वकिली करूनच जें कांहीं मिळेल त्यावर समाधान मानलें.

त्यांच्या पत्नी-राधाबाई ऊर्फ ताई-याहि प्रपंचदक्ष, सुसंस्कृत व प्रत्येक

---

१. हल्लीं चिपळूणकर कुटुंब कर्वे रोडवरील भोंडे कॉलनींत स्वतःच्या बंगल्यांत राहत आहे.

बाबतींत भाऊसाहेबांना साथ देणाऱ्या अशा आहेत. त्या टिळकानुयायी असून त्यांनीं केसरी वगैरेंतून बरेंच[1] लिखाण केलें आहे.

चिपळूणकर कुटुंबाचा लोभ आमच्यावर बसायाला मुळींच काळ लागला नाहीं. आम्ही एकमेकांना मनोमन समजलों व अगदीं घरच्या-सारखे वागूं लागलों. दर रविवारीं एकमेकांनीं एकमेकांकडे आलटून-पालटून जेवावयास जमावें, लॉजमध्यें रविवारच्या वर्गाला बरोबर जावें व अधून-मधून सहली व प्रवास एकत्र करावेत–अशा प्रकारें आमच्यांतील सातत्य व सख्य सारखें वाढीस लागलें.

यमूताई छबूताईच्या मार्गदर्शनाला मुकली, पण ताई चिपळूणकरांच्या पोक्त मार्गदर्शनाचा तिला लाभ झाला. पाटी–पुस्तकें पदराआड धरून ती त्यांच्याकडे शिकायला जाई. इंदू त्यांच्या 'सुशी' कडे खेळायला जाई. (परलोकींहि त्या दोघी अशाच खेळत असतील काय ?) शांताराम त्यांच्या मोरू[2]–गंगाधराचा स्नेहि बनला व मी त्यांचा थोरला मुलगा[3] 'गोपी', भाचा[4] 'तनु' यांजबरोबर समाजकारण-राजकारण इ. वर गप्पा-गोष्टी करीं. ही सर्व मंडळी आतां बडी झाली असून आपल्या घराण्याच्या लौकिकांत भर घालीत आहेत.

मी भाऊसाहेबांबरोबर १९१९ सालच्या अमृतसरच्या कॉंग्रेसला गेलों. त्यांच्या रुबाबदार चेहऱ्यावरून व तांबडया पगडीवरून तिकडील लोक त्यांना लोकमान्य टिळक समजून हात जोडीत, व मी त्यांच्या बरोबरचा म्हणून माझ्याकडेहि जराशा आदरानें पाहत. मी मूळचा आळशी व सुखासीन, पण तेथें त्यांच्याबरोबर कडक थंडींत पहांटे चार वाजतां थंडगार

१. हे लेख नुकतेच पुस्तकरूपानें 'नाणीं नवीं आणि जुनीं' या नांवानें प्रसिद्ध झाले आहेत.

२. हे दोघेहि हल्लीं अनुक्रमें पुणें–विद्यापीठ व सागर–विद्यापीठ यांत प्रोफेसर आहेत.

३. 'गोपी' ऊर्फ गोपाळराव हे न्यायाधिशाचे नोकरींतून नुकतेच निवृत्त झाले.

४. 'तनु' ऊर्फ एस्. एस्. जोशी हे बनारस विद्यापीठांत प्रोफेसर असून थोड्याच दिवसांत ते निवृत्त होऊन आपल्या 'हिरॅक्लिटस्' होममध्य त म्हणतात त्याप्रमाणें सुखानें कालक्रमणा करूं लागतील.

पाण्यानें स्नान करीं, व त्यांच्यासारखा नियमस्थ राहीं. माझ्या जीवनावर चिरपरिणाम करणाऱ्या ज्या कांहीं थोड्या व्यक्ती माझ्या जीवनांत आल्या आहेत त्यांपैकीं भाऊसाहेब व त्यांच्या पत्नी-ताई या आहेत असें म्हटलें म्हणजे त्यांत सर्व कांहीं आलें.

या वास्तव्यांत भाऊसाहेब चिपळूणकरांप्रमाणेंच आणखी तीन-चार व्यक्तींचा मला लाभ झाला. मागें उल्लेखिलेले रा. ब के. जी. ऊर्फ अप्पासाहेब दामले हे एक निष्णात वकील असून त्या काळीं वऱ्हाडांतील मवाळांचे एक पुढारी व सरकार दरबारीं वजन असलेले असे एक सत्वस्थ गृहस्थ होते. मुलाच्या शिकवणीशिवाय अन्य मार्गांनींहि त्यांनीं मला पुष्कळ प्रकारें मदत केली. माझा भाचा शांताराम अवळसकर याचा त्यांच्या कुटुंबांतील मंडळींशीं दाट घरोबा जमला. शांताराम तर पुढें मी पुण्यास आल्यावर त्यांचेकडेच राहत असे.

दामल्यांचे बरोबर वकिली करणारे पी. बी. ऊर्फ दादासाहेब गोळे यांचाहि माझेवर लोभ जडला. हे दिसायला अत्यंत देखणे, तरतरीत, व तल्लख बुद्धीचे होते. कॉंग्रेसनें राज्यसूत्रें हातीं घेतल्यावर वऱ्हाडच्या पहिल्या मंत्रिमंडळांत अर्थमंत्री म्हणून त्यांचा समावेश झाला होता. हल्लीं ते वेदान्त-विषयक वाङ्मय वाचीत मोठ्या समाधानानें कालक्रमणा करीत आहेत.

दुसरे एक नाणावलेले वकील व निष्ठावंत कार्यकर्ते रा. सा. दादासाहेब महाजनी. यांचाहि माझ्यावर लोभ होता. केव्हांहि व कोठेंहि भेटोत, मोठ्या अगत्यानें माझी चौकशी केल्याशिवाय ते कधींहि पुढें गेले नाहींत. त्यांचे चिरंजीव एकनाथपंत हे माझे विद्यार्थी असून त्यांनींहि तो लोभ चालूं ठेवला आहे.

आणखीहि एका तरुण व्यक्तीशीं माझा निकट स्नेह जमला; व पुढें त्या स्नेहाचें रूपांतर नात्यांतहि झालें. ही व्यक्ति म्हणजे सुप्रसिद्ध क्रिकेटपटु वाय्. जी. जोशी ही होय. हे या वेळीं अकोल्यांत वकिली करूं लागले होते. मी त्यांना फर्ग्युसन कॉलेजमध्यें असल्यापासून ओळखत असें. ते त्या कॉलेजकडून क्रिकेट खेळत असून बोलिंगमध्यें त्यांचा विशेष हातखंडा असे. त्यांचे बहुतेक चेंडू स्टंपांवरून अचूक जात, पण प्रत्यक्ष स्टंपांना मात्र सहसा स्पर्श करीत नसत. याचा राग म्हणून आम्ही फर्ग्युसनचे विद्यार्थी त्यांना

वाय्. जी. जोशी असें साधें व सरळ न म्हणतां ' वाय्. ज्या गुड बॉल ' असें थोड्याशा उपरोधानें म्हणत असूं.

अकोल्यांतल्या पहिल्याच भेटींत जेव्हां त्यांना मीं ही ओळख दिली तेव्हां ते मनापासून मोठ्यांदा हसले, व त्या प्रसंगांतूनच आमची गट्टी जमली. पुढें त्यांचा व माझा पुष्कळच जवळचा म्हणजे सासरे-जांवयाचा संबंध आला. तो कसा हें पुढें येईलच.

वाय्. जीं.च्या बोलिंगचें चातुर्य मी कॉलेजमध्यें असल्यापासूनच पाहत होतों. त्यांच्या बॅटिंगचें चातुर्यहि मला अकोल्यास पाहावयास सांपडलें. ऑफ्‌कडे आलेले चेंडू उजवा पाय ऑफ्‌कडे टाकून, व शरीराला थोडीशी उशी (Jump) घेऊन ते अशा कांहीं जोरानें व तडफेनें फटकारीत, कीं ऑफ्‌कडे असलेल्या सहा-सात क्षेत्ररक्षकांची कोंडी फोडून चेंडू तडक सीमापार जावा ! या त्यांच्या हातखंडा टोल्याचें कंकय्या (C. K.) नायडूंनाहि मोठें कौतुक वाटायचें. अकोल्यास येत तेव्हां ते स्वतः वाय्. जीं.ना बोलिंग टाकून त्यांचा हा टोला मोठ्या कौतुकानें पाहत राहात.

अकोल्यास असतांना माझा आणखीहि एका व्यक्तीशीं संबंध येऊन त्यांतूनच पुढें एक दोन मनोरंजक प्रसंग उद्‌भवले. ही व्यक्ति म्हणजे तेथील दत्तोपंत ऊर्फ बाळाभाऊ बापट वकील. रा. ब. दामल्यांच्या शिफा-रशीवरून बापटांनीं आपल्या भाचीला माझी शिकवणी लावली होती. कांहीं दिवसांनीं अमरावतीचे सर मोरोपंत जोशी यांची सून होण्याचें भाग्य तिला लाभलें. या तिच्या भाग्योदयाचा माझ्या शिकविण्याशीं अर्थाअर्थीं कांहींहि संबंध नव्हता. पण लोकांना काय ? ते मला म्हणत, ' काय ? तुमची विद्यार्थिनी सरसाहेबांकडे पडली, आहे बुवा ! ' आणि असें म्हणून माझें अभिनंदन करीत ! माझ्या शिकवण्याचा व तिच्या सरसाहेबांकडे 'पडण्याचा ' खरोखरच कांहीं संबंध असता तर माझ्या सर्वच विद्यार्थिनींना सरसाहेबांसारखे सासरे मिळाले नसते काय ?

याच बापटांची दुसरी भाची लोकमान्य टिळकांचे धाकटे चिरंजीव कै. श्रीधरपंत यांना दिली होती. मी बापटांच्या घरचा शिक्षक, म्हणून मलाहि या लग्नाचें निमंत्रण आलें. मी गायकवाडवाड्यांत पानसुपारीला गेलों. स्वतः लोकमान्य व श्री. बापट निमंत्रितांचें स्वागत करण्यासाठीं दर्शनी

माडीच्या दाराशीं उभे होते. मी जवळ गेल्याबरोबर बापटांनीं ' हे आमचे पटवर्धन मास्तर. एम्. ए. असून सरकारी हायस्कुलांत मास्तर आहेत ! ' अशा भलावणीच्या शब्दांनीं लोकमान्यांशीं माझी ओळख करून दिली. लोकमान्यांनीं आपल्या गंभीर चेहऱ्यानें ' असं का ? ' असं म्हणून ते दुसरीकडे वळले.

ही लहानशीच मुलाखत अजून माझ्या लक्षांत आहे. टिळकांचें अगदीं जवळून दर्शन झालें याचा आनंद झाला; पण बापटांनीं ' हे सरकारी हायस्कुलांत मास्तर आहेत ' अशी जी माझी ओळख करून दिली ती मात्र मनांत सलली. टिळकांना सर्वांत जास्त वावडें कोणाचें असेल तर तें सरकारी नोकरांचें आणि माझ्यासारखा एक एम्. ए. सरकारी हमालखान्यांत हमाली करतो हें ऐकून माझ्यासंबंधीं टिळकांचें मत अनुकूल होण्याऐवजीं प्रतिकूलच झालें नसेल काय ? भोळे बिचारे बापट !

शाळेच्या कामाव्यतिरिक्त आपल्या हातून दुसरें कांहीं शैक्षणिक कार्य व्हावें असा विचार मनांत घोळत असतांनाच तेथील एक सुधारक पंथीय तरुण वकील श्री. राजाभाऊ गद्रे यांची ओळख झाली. ते वकील असले तरी इतर सार्वजनिक कार्यांतच आपला बहुतेक वेळ घालवीत, व स्वतःच्या धंद्याच्या उपेक्षेबद्दल, अर्थातच, आप्तेष्टांची बोलणीं खात. ते अस्पृश्यांच्या मोहल्यांत जाऊन रात्रीं त्यांच्या मुलांना शिकवीत. या त्यांच्या सामाजिक कार्यांत त्यांना आपल्या हातून थोडीफार मदत व्हावी म्हणून मीहि त्यांच्या-बरोबर कांहीं दिवस जात असें; पण शारीरिक दुर्बलतेमुळें राजाभाऊंना तें काम सोडावें लागलें, आणि राजाभाऊंनीं काम सोडलें म्हणून मीहि सोडलें. राजाभाऊ गेले तर गेले, मी जरा जास्त मेहनत करून एकट्यानेंच काम चालविण्याचा निश्चय केला असता तर, कोणाला ठाऊक, माझी चिकाटी पाहून दुसऱ्या एखाद्याला मला मदत करण्याची स्फूर्ति झाली असती, व काम पुढें चालू राहिलें असतें. पण ती चिकाटी व त्यागाची तयारी माझे ठिकाणीं नसल्यानें मी स्वतंत्रपणें व स्वतःच्या हिंमतीवर कांहीं करूं शकत नाहीं. मला कोणी तरी पुढारी लागतो; व तो मिळाला म्हणजे माझ्या हातून कांहींतरी काम होऊं शकतें.

या निमित्तानें झालेली ओळख राजाभाऊंनीं अद्याप कायम ठेवली आहे.

राजाभाऊंना सामाजिक कार्याची नुसती आवडच आहे असें नाहीं, तर समाजकार्य हें त्यांचें एक व्यसनच बनलें आहे. सर्व्हंट्स् ऑफ् इंडिया सोसायटी-मध्यें कांहीं किरकोळ काम कर, प्रार्थनासमाजाच्या रविवारच्या उपासना चालव, वाचनालय–चळवळींत भाग घे, जयंत्यांच्या व 'दिनां'च्या दिवशीं व्याख्यानें देण्यासंबंधीं शाळांतून आलेलीं आमंत्रणें स्वीकार–नव्हे, प्रसंगीं आपण होऊन बोलावणीं लाव–असें त्यांचें सारखें चालें; आणि दुर्दैव असें कीं, या त्यांच्या फुकटच्या कार्याचें कोणालाच कांहीं वाटत नसे. उलट कांहीं प्रसंगीं ते चेष्टेचा विषय बनत. त्यांचें उदाहरण पाहिलें म्हणजे सामाजिक कार्यकर्त्यांनेंहि स्वतःला फारसें सवंग करून घेऊं नये असें म्हणावेंसें वाटतें.

राजाभाऊंच्या निमित्तानें आणखीहि एका व्यक्तीची विशेष ओळख झाली. ही व्यक्ति म्हणजे पुढें विदुषी, लेखिका व कॉंग्रेस कार्यकर्त्या म्हणून प्रसिद्धीस आलेल्या श्री. दुर्गाताई जोशी ही होय. त्यांनीं शिक्षणाला सुरुवात फार उशिरां केली, पण चिकाटी व ध्येयवादित्व या गुणांच्या जोरावर त्यांनीं हायस्कुलाचें व कॉलेजाचें शिक्षण पुरें केलें, आणि त्या १९२२ मध्यें भारत महिला विद्यापीठाच्या जी. ए. झाल्या. त्यांची आणि कमलाबाई देशपांडे व गंगूबाई यांची दाट मैत्री असे.

पुण्याहून अकोल्यास आल्यावर त्या तेथील भगिनी–मंडळ व टिळक–कन्याशाळा यांत मोठ्या आस्थेनें काम करीत. पुढें त्यांनीं स्वतःला महात्मा गांधींच्या कार्यक्रमाला वाहून घेतलें, व त्या अनुषंगानें आलेला कारावासहि पत्करला. शेवटीं त्या वऱ्हाड–मध्यप्रांताच्या कौन्सिलमध्येंहि निवडून आल्या. त्यांनीं बरेचसें लेखनकार्य केलें आहे. आमच्या विद्यापिठाची विद्यार्थिनी व माझ्या कुटुंबाची मैत्रिण येवढ्या मोठ्या योग्यतेला चढलेली पाहून मला त्यांचेसंबंधीं विशेष आदर व अभिमान वाटणें सहाजिकच नाहीं काय ?

तसेंच पाहिलें तर राजाभाऊ व दुर्गाताई यांच्या मनाचे मूळ कल समाजसेवा करावयाचेच; पण दोघे निरनिराळ्या मार्गाला व प्रवाहाला लागून एकाचें कार्य व जीवन अयशस्वी झालें व दुसऱ्याचें मात्र पूर्ण यशस्वी झालें. समाजकार्याची नुसती इच्छा असून भागत नाहीं, तिला योग्य नेतृत्वाची व मार्गाची जरुरी लागते, तरच तें कार्य केल्याचें समाधान मिळतें.

दुर्गाबाईंची या संदर्भात मला आठवण होण्याचें विशेष कारण म्हणजे त्यांच्या वशिल्यानें मला तेथील एक ज्येष्ठ व नामांकित वकील, कै. नानासाहेब दाते, यांच्या मुलीची शिकवणी मिळाली होती. एके दिवशीं सकाळीं तिची शिकवणी संपवून माडीवरून खालीं येत असतांना 'लोकमान्य दिवंगत झाले' हे कोणींतरी उच्चारलेले अभद्र शब्द माझ्या कानांवर येऊन आदळले! ते शब्द ऐकतांच माझी कंबर अक्षरशः खचली व मी जिन्यांतच कितीतरी वेळ अश्रुविमोचन करीत बसून राहिलों. लोकमान्य आजारी असल्याचें ऐकत होतों, पण इतक्यांतच ते सर्वांना दुःखाच्या खाईंत लोटून निघून जातील असें वाटलें नव्हतें. भारत-विशेषतः महाराष्ट्र-एका मोठ्या पुढाऱ्याला मुकला!

एक ऑगस्ट, एकोणीसशें वीस हा दिवस तर मी कधींच विसरणार नाहीं; पण दुसऱ्या दिवशींची ती सकाळ, व तें जिन्यांत बसून रडणेंहि मी कधीं विसरणार नाहीं. पुढें दोन-तीन दिवस मला कांहीं सुचलें नाहीं. शाळेंत गेलों तरी वर्गांत टिळकांच्या कार्यासंबंधीं सारखा बोलत राहीं. याचा एक फायदा मात्र असा झाला कीं, मुलांना टिळकांच्या मोठेपणाची ओळख झाली व मी टिळकांचा एक मोठा भक्त म्हणून गणला जाऊं लागलों.

चिपळूणकर पतिपत्नींच्या सहवासांत माझा प्रपंच फार चांगला चालला होता. यमूताई दिसायला काळी-सांवळीच व नाकाडोळ्यांनीं दहाजणीं-सारखीच असली तरी पाककलेंत हजारांत एक होती. रोजचा साधा स्वयंपाकचसा काय, पण पुरणपोळी, घीवर अशांसारखीं नाजूक व अवघड पक्वान्नेंहि ती कुशलतेनें करी. तिचा चटपटीतपणाहि नांवाजण्यासारखा होता. ना घोळ, ना गोंधळ. आल्यागेल्यांचें ती फार चांगलें करी, व त्यामुळें आतेष्टांकडे जाण्याला व त्यांना आपले घरीं बोलावण्याला संकोच वाटत नसे.

अशा प्रकारें आमचें सर्व कांहीं मजेंत व आनंदांत चाललें असतांना एके दिवशीं हिंगण्याचे प्रो. कर्वे व त्यांचे सहकारी प्रो. दिवेकर हे माझे घरीं त्यांच्या आश्रमाकरितां वर्गणी मागण्यासाठीं म्हणून आले. हिंगण्याच्या आश्रमाची व तेथील त्यांच्या कार्याची माहिती मला अगोदरपासून होतीच. बऱ्याच वर्षांमागें मी तात्या गाडगिळांच्या ओळखीनें तेथें गेलों होतों व त्यावेळच्या लेडी सुपरिंटेंडेंट कृष्णाबाई ठाकूर (श्री. सरलाबाई नाईक) यांची-माझी ओळख झाली होती. शिवाय मीं प्रो. कर्वे यांचें 'आत्मवृत्त 'हि

वाचलें होतें. तेव्हांपासूनच मला त्यांचेसंबंधीं आदर वाटत असे. तेव्हां या प्रसंगीं संस्थेसंबंधीं फारसें बोलणें न करतां त्यांच्या आश्रमाला काय द्यावयाचें तें दिलें व दुसऱ्या दिवशींचें जेवणाचें निमंत्रण केलें.

त्या दोघांनीं माझ्यासंबंधीं गांवांत जरा बरें ऐकलेलें दिसलें. कारण माझ्याशीं बोलतांना त्यांच्या बोलण्यांत एकप्रकारचा लाघवीपणा होता–निदान मला तरी तसें वाटलें. मी राजाभाऊ गद्रे वकील यांचे समवेत महारवाड्यांतील रात्रींच्या शाळेंत शिकविण्याचें काम मोफत करीत होतों तेंहि कर्वे यांच्या कानांवर गेलेलें दिसलें.

दुसऱ्या दिवशीं (त्या दिवशीं होळी होतीसें स्मरतें) सौभाग्यवतीनें मोठ्या हौसेनें व आस्थेनें पुरणपोळीचा बेत केला होता. ते दोघेहि त्या बेतावर अगदीं प्रसन्न झालेले दिसले. पुन्हां बोलणीं वगैरे झालीं. दिवेकरांचें तें मोठ्यांदा बोलणें व मोकळें हंसणें, आणि कर्व्यांचें तें थांबत–थबकत, शब्दांना हेलकावे देत, पण खणखणीत आवाजांतलें बोलणें अद्याप माझ्या कानांत घुमत आहे. ते दोघे जावयास निघाले. कर्वे ह्यांनीं हळूंच मी त्यांच्या संस्थेला जाऊन मिळावें, त्यांना माझ्यासारख्या एल्. टी. ची व सार्वजनिक कामाची आवड असलेल्या माणसाची अत्यंत जरुरी आहे असें सहज सुचविलें; आणि ती सूचना आपलें काम मला नकळत करूं लागली.

माझें अंतर्मन कर्व्यांची ती सूचना चघळूं लागलें. नाना नारळकर अदल्याच वर्षीं सरकारी स्टायपेंड परत करून शिक्षण प्रसारक मंडळीला जाऊन मिळाले होते. ते गेले, मग मी मागें कां राहावें? माझी नोकरी दोन वर्षांवर होऊन गेल्यानें त्यांच्यासारखा मला स्टायपेंडसुद्धां परत करावा लागणार नव्हता. आपल्याहि हातून त्यांच्यासारखें कांहीं सामाजिक व त्यागात्मक व्हावें; पगार, बढती, अधिकार–हें सर्वांनाच हवें–हवेंसें वाटतें. मग आपलें विशेषत्व तें काय? अशा प्रकारचे ध्येयवादी विचार मनांत मधून–मधून डोकावूं लागले.

पुढें पांच-सहा महिने विशेष कांहीं घडलें नाहीं. सर्व संसार सुखानें अन् समाधानानें चालला होता. रा. ब. दामल्यांच्या पुतण्याची तीस रुपयांची एक घवघवीत शिकवणी मिळाली होती. सौभाग्यवतीला कांहीं दिवस गेले होते. इंदूला कोणींतरी घरचा जोडीदार मिळणार असें वाटूं लागलें होतें.

त्या वर्षी कॉंग्रेस नागपुरास भरली होती. मी यमूताईला घेऊन मुद्दाम कॉंग्रेसला गेलों; पण प्रवासाची दगदग व प्रकृतीची अबाळ सहन न होऊन तिला ताप आला; व आम्हांस परत फिरावें लागलें. तिचा ताप नवज्वराचा ठरला. उपाय व उपचार चालू झाले. ताई चिपळूणकर तिची सर्व प्रकारची काळजी घेत होत्या.

दहाव्या दिवशीं घाम येऊन ताप निघाला. सर्वांचा जीव भांड्यांत पडला. दुसऱ्या दिवशीं पहांटेस सौभाग्यवतीनें मला जवळ बोलावलें आणि मी गेल्यावर ती मनापासून हंसली. मला वाटलें, तें आनंदाचें हंसूं असेल; पण त्या हंसण्यांत एक प्रकारची विषण्णता व भेसुरता होती. "आतां लवकरच मी जाणार, इंदूला तुम्ही संभाळालच—माझ्यापेक्षांहि चांगलें संभाळाल; तुम्ही आपला मार्ग चोखाळा." अशा प्रकारचें ती थांबत-थबकत बोलली. मी मनांत चरकलों, भ्यालों, दुःखी झालों. पाध्ये, गोडबोले वगैरे डॉक्टरांना आणलें. त्यांनीं तपासलें. 'कांहीं अर्थ नाहीं,' एवढेंच म्हणून ते निघून गेले. तीहि लवकरच भरल्या संसारांतून निघून गेली! तिचें सोनें झालें, पण इंदूचें व माझें काय?

रूढीप्रमाणें सर्व कांहीं सुरू झालें. दादा पुण्याहून मुद्दाम आले. इंदूची माई मावशी सिंगावलहून अगोदरच आली होती. आम्ही सर्वजण नाशकास गेलों. तेथें करायचें तें सर्व केलें. तेथून दादा पुण्याला व मावशी सिंगावलला गेली. ती जातांना गाढ व निःशंक निजलेल्या इंदूला मी भुसावळच्या स्टेशनावर तिच्या पदरांत घातलें व एकटाच जड अंतःकरणानें अकोल्यास परत आलों. तोंपर्यंत ताईंनीं घरांतलें सर्व सामान लावून व आवरून ठेवलें होतें. माझ्या विद्यार्थ्यांनीं मला बोर्डिंगमध्येंच जेवावयास येण्याचा आग्रह केला. थोड्याच काळांत मी शाळेंतल्या कामाकडे पूर्वीसारखें—नव्हे, पूर्वीपेक्षांहि जास्त लक्ष देऊं लागलों.

प्रो. कर्वे व प्रो. दिवेकर यांनीं केलेली सूचना मनांत जास्त-जास्तच मूळ धरूं लागली. पुण्याहून नानांचा सल्ला मागविला. त्यांनींहि माझ्या विचाराला दुजोरा दिला. प्रो. कर्व्यांना सर्व कळविलें. त्यांनीं माझ्या बेताचें स्वागत केलें. मी प्रथम एक वर्ष रजा घेऊन हिंगण्यास जावें, व तेथील रागरंग पाहून पुढचें ठरवावें असें ठरलें.

त्या वेळीं बालाघाटचे वकील नारायणराव केळकर वऱ्हाड-मध्यप्रांताचे शिक्षणमंत्रि होते. त्यांना कर्व्यांनीं मला एक वर्ष रजेवर सोडण्याची विनंति केली. त्यांना समक्ष भेटण्यासाठीं मी नागपुरास गेलों. दोन-तीन दिवस त्यांचेकडेच मुक्काम केला. गृहस्थ अत्यंत थोर व सज्जन असून त्यांना कर्वे यांच्याबद्दल आदर व त्यांच्या कार्याबद्दल आपुलकी वाटे. (त्यांची मुलगी वेणू पुढें हिंगण्यास शिकायला होती) त्यांनीं माझें म्हणणें मान्य करून मुख्य शिक्षणाधिकाऱ्यास तसें कळविलें व त्यानेंहि माझी रजा मंजूर केली.

नाशिक सोडल्यापासून इंदू सिंगावलला आपल्या मावशीकडे चार-पांच महिने होती. पुण्यास जाण्याचे वेळीं मी तिला आणण्याकरितां तेथें गेलों. ती पुष्कळ वेळ माझ्याकडे दुरून-दुरून पाही. व तेंहि चोरून! शेवटीं आसपास कोणी नाहींसें पाहून व मनाचा धडा करून ती माझ्याजवळ आली, व मला हळूंच म्हणाली, ‘तुम्ही नानांच ना?’ एकच वाक्य, पण मला त्यांत फार मोठा आशय दिसला. अवघ्या चार महिन्यांत तिला माझा विसर पडूं लागला ना? तिला तेथेंच मावशीपाशीं ठेवावें का आपल्याबरोबर पुण्यास घेऊन जावें हा जो प्रश्न मला सतत सतावीत होता त्याचा निकाल आपोआप लागला. मी मनाशीं ठरविलें–‘बस् ठरलं, यापुढें या पोरीला आपल्यापासून दूर ठेवायचें नाहीं. जिथें मी तिथेंच ती.’

इंदूला घेऊन परत अकोल्यास येतांना चितोड, अजमीर, वगैरे पाहून श्रीमहाकाळेश्वराचें दर्शन घ्यावें म्हणून मी उज्जयनीस गेलों. देवाचें दर्शन घेण्यापूर्वीं तेथील मोठ्या तीर्थांत स्वतः स्नान करण्याकरतां व इंदूलाहि स्नान घालण्याकरितां तिला खांद्यावर घेऊन पाण्यांत दोन तीन पायऱ्या उतरतों, तोंच माझा पाय निसरड्यावर असा कांहीं निसरला कीं, मी पडतां-पडतां सावरलों. बरें झालें ना देवानें खैर केली म्हणून! नाहींतर मी तर आपटलोंच असतों, पण खांद्यावरील इंदूहि पाण्यांत पडून कांहीं भलतंच झालं असतं. धसक्यामुळें ती चांगलीच घाबरली; पण थोड्याच वेळांत ती भानावर येऊन मला विचारते, ‘नाना, फार लागलं का हो? मला कशाला उचलून घेतलंत?’ मला थोडेंसें खरचटलें होतें. पण तिच्या त्या मायेच्या विचारण्यानें मी आपलें दुःख विसरून गेलों, व तशा

त्या ओलेल्या स्थितींतच तिचा पापा घेतला ! ओलेतीच्या[1] त्या कुप्रसिद्ध चित्रापेक्षां ' ओलेत्यां 'चें हें आमचें चित्र जास्त आकर्षक झालें नसतें का ?

मी अकोल्याच्या नॉर्मल स्कुलांत असतांना तेथें सावजी नांवाचा ( तो बहुतेक मलकापूरचा असावा ) एक अत्यंत साधा, सालस, व वयानें इतरांचे मानानें जरा मोठा असा विद्यार्थी होता. तो जवळ जवळ माझा भक्तच बनला होता. त्यानें अधून–मधून घरीं यावें, इंदूला खेळवावें, यमूताईना कांहीं हवें–नको विचारावें व माझ्याकडे नुसतें पाहून व किंचित् हंसून परत जावें; असा त्याचा नित्यक्रम असे. माझ्यावर आलेल्या प्रसंगांत त्यानें मला अतिशय मदत केली होती.

मी पुण्यास जाण्याचें ठरविलेलें ऐकून त्याला दोन दिवस जेवण-खाण सुचलें नाहीं. नेहमीं दुःखी-कष्टी असे. माझी तेथून निघण्याची नक्की वेळ मी प्रिन्सिपॉलसाहेबांशिवाय दुसऱ्या कोणासहि कळविली नव्हती. हेतु असा की, कांहीं ' सीन-बीन ' होऊं नये. तथापि सावजीला माझ्या प्रयाणाची नक्की वेळ व गाडी यांचा सुगावा लागला व आपल्या कांहीं खास मित्रांना घेऊन तो स्टेशनावर नेमक्या वेळीं आला. अर्थात् जें नको होतें तें सर्व झालें व मुकाट्यानें सहन करावें लागलें. सावजीनें मला हार घातला व मान फिरविली. मीहि कांहीं बोलूं शकलों नाहीं. विद्यार्थ्यांच्या जयघोषांत गाडी सुटली. असा हा सावजी, पण त्याचें दुसरें नांवहि या घटकेला आठवूं नये हें आश्चर्य नव्हे काय ?

◎ ◎ ◎

---

१. ' ओलेती ' हें सुंदर चित्र ठाकूरसिंग यांनीं काढलेलें असून महाराष्ट्रांत गाजलेल्या ' कला व नीति ' या वाङ्मयीन वादाला कारणीभूत झालें होतें.

# महर्षि कर्वे यांच्या आश्रमांत : : : १२

मी अकोलें सोडून हिंगण्यास गेलों तें साल १९२१ होतें. पत्नीच्या मृत्यूनें उत्पन्न झालेल्या मनाच्या विकल व विव्हल अवस्थेंत 'तिचें सोनें झालें, पण आमचें ?' असें प्रश्नार्थी स्वरूपाचें एक वाक्य मी मागचे प्रकरणांत लिहून गेलों आहें. आतां एकदमच सांगून टाकतों 'आम्हां दोघांचेंहि ( इंदूचें व माझें ) सोनेंच झालें; आणि असें सोनें होण्यास ज्या कांहीं गोष्टी कारणीभूत झाल्या त्यांतील मुख्य गोष्ट म्हणजे हिंगण्यासच शिक्षिकेचें काम करणारी प्रो. गो. म. चिपळूणकर यांची मेहुणी कु. गंगू ओक-या चलाख, तरतरीत व होतकरू शिक्षिकेशीं झालेला माझा विवाह ही होय.

अकोल्याहून हिंगण्यास येतांना मी एका वर्षाची रजा घेऊन आलों होतों; तेव्हां ती रजा संपण्याच्या आंत मला माझें भवितव्य ठरवायचें होतें. हिंगण्याचें कार्यक्षेत्र माझ्या मनाला मानवलें नसतें, किंवा तेथील चालक मंडळीला माझें काम व वागणूक तितकीशी आवडली नसती तर मी परत अकोल्यास माझ्या मूळच्या कामावर गेलों असतों, व मग पुढें यथाकाल व यथाक्रम जें कांहीं व्हावयाचें तें झालें असतें. तेथील माझ्या कामावर शिक्षणाधिकाऱ्यांनीं वेळोवेळीं दिलेले शेरे, माझी शैक्षणिक लायकी, माझ्याबद्दल सर्वत्र असलेलें चांगलें मत, इ. गोष्टी लक्षांत घेतां माझी उत्तरोत्तर बढती होत जाण्याला मुळींसुद्धां अडचण पडली नसती असें मला वाटतें. मी योग्य वेळीं एखाद्या नॉर्मल स्कूलचा प्रिन्सिपॉल होऊन किंवा आणखी कांहीं वरच्या जागांवर जाऊन पेन्शनीचे वयांत पेन्शनींत निघालों असतों.

कोणीं सांगावें ? मध्यंतरीं विवाह करून पुन्हां संसार थाटला असता; किंवा कदाचित् शेवटपर्यंत तसाच विधुर राहिलों असतों, वऱ्यापैकीं पेन्शन घेऊन पुण्यास आलों असतों आणि एखादें घर बांधून सुखानें कालक्रमणा केली असती. पण माझें तारूं या ठराविक मार्गानें न जातां दुसऱ्याच एका थोड्याशा निराळ्या मार्गाला लागलें; आणि हाच मार्ग पहिल्यापेक्षांहि जास्त सुखाचा, मानाचा व उन्नतीचा ठरला असें दैवाचे आभार मानून म्हटलें पाहिजे.

प्रोबेशनची एका वर्षाची मुदत संपत येतांच माझ्या पुढच्या राहण्याविषयीं व आजन्म सेवक होण्याविषयीं चालकांत विचार सुरू झाला. बहुतेक सर्वांचें मत माझ्या बाजूनें पडलें असून, स्वतः कर्वे यांचें मत तर फारच अनुकूल पडलें होतें असें मला मागाहून समजलें. कोणत्याशा एका प्रसंगानें मीं तेथील एका सभेंत भाषण केलें होतें, त्याचा उल्लेख करून तें आपणांस फारच आवडल्याचें कर्वे यांनीं सभेंत बोलून दाखविलें. अर्थात् माझें काम त्यांना पूर्णपणें पसंत पडल्याचा तो एक पुरावाच होता.

माझें राहणें पुढें चालू ठेवण्यास कोणाचीच कांहीं हरकत नव्हती. मात्र मी एक तरुण विधुर होतों एवढी एक गोष्ट कांहींच्या मतें विचार करण्यासारखी होती. ही अडचण टाळण्यासाठीं म्हणून मीं एखादी योग्य वधू पाहून तिच्याशीं लग्न करावें अशी व्यावहारिक सूचना कांहीं आजन्म सेवकांनीं केली व कांहींजण तर नुसती सूचनाच करून राहिले नाहींत, तर त्यांनीं एक वधूहि सुचविली.

स्वतः कर्व्यांचा या बाबतींत कितीसा कटाक्ष होता हें समजण्यास मार्ग नव्हता. कोणीं तसें स्पष्ट विचारलें असतें तर त्यांनीं निश्चितपणें सांगितलें असतें असेंहि नाहीं. मीच जरा कणखर बनून ' आहे या स्थितींतच मला ठेवून घेण्यास तयार असाल तरच मी राहतों, नाहींतर माझी पहिली नोकरी कांहीं कोठें गेली नाहीं ' असें निक्षून सांगितलें असतें तर मला तसेंहि ठेवण्यांत आलें असतें; पण माझ्याच मनानें तेथें राहण्याचें घेतल्यामुळें मी दुसरें लग्न करण्याचें मान्य करून तेथेंच राहण्यास तयार झालों. सर्वांच्याच दृष्टीनें झालें तें उत्तम झालें. थोड्याच दिवसांत विवाहबद्ध होऊन १९२२ मध्यें मी संस्थेचा आजन्म सेवक झालों.

सांगण्याच्या एका ओघांत व एका सुरांत 'मी दुसरें लग्न केलें' असें सांगून टाकलें खरें; पण ती गोष्ट सुखासुखी व सहजासहजी घडली नाहीं. ती घडण्याच्या मार्गांत पुष्कळ अडथळे आले व पुष्कळ विरुद्ध सूर उठले.

मुख्य अडथळा आला तो माझ्या घरच्या माणसांकडून आला. आमचें घराणें शास्त्र्याचें. आजपर्यंतचे सर्व वैवाहिक संबंध गण, गोत्र, प्रवर वगैरे गोष्टी पूर्णपणें पाहून व पाळून केलेले. सगोत्रचसा काय, पण सप्रवर विवाहसुद्धां धर्मशास्त्राविरुद्ध मानला गेलेला. अशा परिस्थितींत माझ्या घरच्या मंडळींनीं—विशेषतः माझ्या थोरल्या बंधूंनीं—माझ्या या असल्या विवाहाला मान्यता देऊं नये हें त्यांच्या दृष्टीनें बरोबरच होतें.

माझ्या मेहुण्यांनीं (ती. बाबा अवळसकर यांनीं) हा विवाह धर्मशास्त्राला धरून तर नाहींच, पण कायदेशीरहि ठरूं शकत नाहीं असा निर्णय सुप्रसिद्ध कायदेपंडित बॅरिस्टर बाबासाहेब जयकर यांचेकडून आणला असल्याचें ठासून सांगितलें.

माझा निग्रह पाहून 'तूं एक वेळ विधवेशीं लग्न लावलेंस तरी माझी तितकीशी हरकत नाहीं, पण असला निषिद्ध विवाह तूं करूं नकोस' असें दादांनीं परोपरीनें सुचविलें, पण मी माझा हेका सोडावयास तयार नव्हतों. उलट 'विवाह करीन तर याच मुलीशीं करीन, नाहींतर आमरण विधुर राहीन' असें निश्चितपणें पण नम्रपणें सांगितलें.

दादा-बाबांसारख्या घरांतल्या मोठ्या व कर्त्या पुरुषांचें कांहीं चालत नाहीं असें पाहून माझ्या वहिनींनीं व बहिणींनीं डोळ्यांत पाणी आणून आर्जवपूर्वक माझी आळवणी केली, पण मी त्यांच्या त्या नाजूक आळवणीलाहि जुमानलें नाहीं. एखादे वेळीं मनांत येई, 'इतका दुराग्रह धरण्यासारखा निर्दय व निष्ठुर मी कसा बनत आहे? त्यांच्या म्हणण्याखातर दुसऱ्या एखादीशीं लग्न लावून मी त्यांच्या मनाची बूज कां राखीत नाहीं? त्यांना दुखवून मला काय सुख लागणार आहे?' पण हा विचार तेवढ्यापुरताच येई आणि शेवटीं मीं याच विवाहाचा बेत नक्की केला.

माझा हा बेत ऐकून नारळकरांनाहि माझ्या या धाडसाचें कांहीं वेळ आश्चर्य वाटलें. पण वधूची निवड त्यांना आवडल्यामुळें कांहीं वेळानें त्यांनीं संमति दिली.

चाळीस वर्षांपूर्वी असल्या विवाहाला किती कडवा विरोध होत होता, त्यांतील दोन्ही बाजू त्या बाबतींत किती हिरीरीनें व अटीतटीनें भाग घेत होत्या तें समजावें एवढ्याच दृष्टीनें हा एवढा पाल्हाळ लावला. आतांच्या तरुण पिढीला हा सर्व मूर्खपणाच वाटेल. असले विवाह हल्लीं दररोज व राजरोस चालले आहेत. त्यांना ना धर्माचें बंधन, ना कायद्याची बंदी.

ह्याच विवाहाचा बेत नक्की करण्याचें एक कारण म्हणजे हिंगणें येथील चालक मंडळींचा याबाबतचा पुरस्कार हें होय. स्वतः कर्वे तर बोलून-चालून सुधारकच होते. अर्थात् त्यांनीं पूर्ण संमति दिली. वधू–गंगूबाई ही प्रो. चिपळूणकरांची मेहुणी; आणि आपल्या पत्नीच्या विचारानेंच त्यांनीं तिचें नांव सुचविलें होतें. तेव्हां त्यांच्या अनुकूलतेचाहि प्रश्न नव्हता. प्रो. दिवेकर, प्रो. जोशी, प्रो. आठवले, प्रो. मायदेव, श्री. कमलाबाई देशपांडे वगैरे व्यक्ती माझे सहकारी मित्र असून माझ्या हिताच्या दृष्टीनें विचार करणाऱ्या; त्यांनींहि संमति देऊन उत्तेजन दिलें.

एवढेंच काय, पण प्रो. वा. म. जोशी यांचे थोरले बंधु प्रो. म. म. जोशी यांच्यासारख्या विद्वन्मान्य व गुरुतुल्य गृहस्थानें सुद्धां उत्तेजन देऊन अभीष्ट-चिंतन केलें. आम्हीं दोघांनीं त्यांना मुद्दाम वनदेवीच्या टेकडीवर नेऊन आमचा विचार त्यांच्या कानांवर घातला. तो ऐकून त्यांना अत्यंत आनंद झाला; व त्या आनंदाच्या भरांत 'समानयंस्तुल्यगुणं वधूवरं, चिरस्य वाच्यं न गतः प्रजापतिः' हा शाकुंतलांतील चरण तोंडानें गुणगुणले व "तुम्हां दोघांचा विवाह हें एक साधें शारीरिक लग्न नसून तो दोन उन्नत आत्म्यांचा संगम आहे. तुम्ही उभयतां गीता, उपनिषदें, अशांसारख्या आध्यात्मिक ग्रंथांचा जोडीनें अभ्यास करीत संसार करा" असा आशीर्वादात्मक संदेशहि त्यांनीं दिला.

एक वेळ हिंगण्याच्या मित्रांची संमति थोडीफार स्वार्थीपणाची असणें शक्य होतें. कारण आमच्या विवाहानें संस्थेला उपयोगी पडणारीं दोन चांगलीं माणसें एकदम व कायमचीं लाभणार होतीं. पण म. म. जोश्यां-सारखे त्रयस्थ व तिऱ्हाईत (Disinterested) सन्मान्य गृहस्थहि ज्या अर्थी आपली संमति व शुभाशीर्वाद देतात त्या अर्थी आमच्या करण्यांत चूक असणें शक्य नाहीं, उलट आमचा संबंध जुळून येणें ही देवानें घडवून

आणलेली घटना आहे, व तींत आम्हां उभयतांचें पूर्ण हित व शाश्वत कल्याण असणारच असा भरंवसा वाटूं लागला.

आमचा हा विवाह म्हणजे एक साधें शारीरिक लग्न नसून तो दोन आत्म्यांचा संगम आहे, तो उभयपक्षीं उन्नतिकारक आहे असें जसें प्रा. म. म. जोशी यांना वाटत होतें, तसेंच आम्ही दोघां सुशिक्षितांनीं विवाहबद्ध होऊन स्वतःला स्त्री-शिक्षणाच्या कार्याला वाहून घेतलें म्हणजे हिंगण्याच्या शिक्षणकार्याला जोराची चालना मिळेल अशी आशाहि कांहीं-जणांना वाटत असावी असें दिसलें.

श्री. कमलाबाई देशपांडे यांनीं आमच्या विवाहप्रसंगीं जीं मंगलाष्टकें केलीं होतीं त्यांत ही आशा काव्यमय अत्युक्तीनें व्यक्त केलेली आहे. एका श्लोकांत भरतभूला धीर धरायाला सांगून त्या म्हणतात, " थांबे धीर धरी, अगे भरत भू ! ही पातली दंपती । उद्धारार्थ तुझ्या सदैव झटण्या, देई शुभाशीप्रती ॥ "

कवि अतिशयोक्ति करूं लागला म्हणजे त्याची मजल कोठपर्यंत जाऊं शकते हें पाहण्यासारखें आहे. दोन व्यक्तींच्या विवाहानें सबंध भरतभूचा उद्धार होणार, म्हणे !

हाच विवाह नक्की करण्याचें आणखी एक कारण असें कीं, माझी वधू ही प्रो. गो. म. चिपळूणकरांसारख्या साध्या, सालस व सात्त्विक पुरुषाची मेहुणी व सौ. अक्का चिपळूणकरांसारख्या कर्तृत्ववान् बाईची बहीण—त्यांच्याकडे वाढलेली व त्यांच्या शिकवणुकींत तयार झालेली. अक्कांची व्यवहारकुशलता व त्यांचा मायाळूपणा हीं त्यांच्या बहिणींत थोडीतरी उतरलेलीं असणारच.

अक्कांच्या कनवाळूपणाचा एक अनुभव नुकताच येऊन गेला होता. मी संध्याकाळची सामुदायिक प्रार्थना घेण्याकरितां रोज ' गीतामंदिरां'त जाई. जातांना लहानग्या इंदूलाहि बरोबर नेई. एकदां मी प्रवचन करीत असतांनाच ती माझ्या मांडीवर झोंपली. अर्थात् मला थोडेसें अवघडल्या-सारखें होत होतें. माझी अवघडलेली स्थिति लक्षांत येऊन अक्का एकदम जवळ आल्या व त्यांनीं झोपलेल्या इंदूला हळूंच उचलून मांडीवर घेतलें व

आपल्या अंगावरचा थोडासा पदर तिच्या अंगावर घातला. त्यांच्या या कनवाळूपणानें मी गहिंवरून गेलों असलों पाहिजे. कारण पुढें माझ्या बोलण्याचा ओघ थंडावला व मी नेहमींपेक्षां प्रवचन लवकर संपविलें असें मुलीं म्हणतांना ऐकूं आलें.

शिवाय असें कीं, महाडच्या ओकांसारख्या लौकिकवान् व खानदानी घराण्यांत गंगूबाईंचा जन्म झाला होता. अशा प्रकारें मूळ जमीन सुपीक व जोपासना करणारी माळी मंडळी सुज्ञ व प्रेमळ असल्यावर फळ सुंदर, स्वादिष्ट व पथ्यकर असणार यांत शंका नाहीं. हाहि विचार पहिल्या विचारांइतकाच प्रभावी झाला.

मध्यंतरीं प्रो. चिपळूणकर, प्रो. जोशी, प्रो. मायदेव, श्री. कमलाबाई देशपांडे इत्यादि मंडळी आम्हां उभयतांशीं या विवाहासंबंधीं बोलून आमचीं मनें बोटचेपी करीत होतीं. अकाहि आपला आग्रह चालूं ठेवून बहिणीचें मन तयार करीत होत्या.

अशा परिस्थितींत एके दिवशीं सकाळीं नवाचे सुमारास गंगूबाई अचानकपणें माझ्या खोलीवर आल्या. मी त्या वेळीं दुपारच्या शिकवण्याची तयारी करतां-करतांच इंदूला पाठीवर बसवून घोडा–घोडा खेळत होतों. अशा चमत्कारिक स्थितींत त्यांनीं मला पाहिल्यामुळें मी जरा गडबडून व गोंधळून गेलों. “ कांहीं हरकत नाहीं,” अशा आशयाच्या दृष्टीनें मजकडे पाहून त्या म्हणाल्या, “ मला दुपारच्या माझ्या पाठासंबंधीं कांहीं विचारावयाचें आहे. आपल्याला वेळ आहेना ? ”

त्यांनीं विचारलेल्या प्रश्नांसंबंधीं मला जें कांहीं सांगतां आलें तें मीं सांगितलें; व त्यांचें समाधान झालेलेंहि दिसलें. खरें बोलायचें म्हणजे पाठाची तयारी ही पुढील उपन्यासाची प्रस्तावना होती.

कांहींएक आढेवेढे न घेतां व न लाजतां-सवरतां त्या पुढें म्हणाल्या, “ खरें सांगूं का ? तुमची तयारी असल्यास तुमच्याशीं विवाह करण्याची माझी इच्छा आहे. तुमची सर्व माहिती मला मिळाली आहे. माझ्या पालकांची पूर्ण संमति आहे. आपला विवाह तुम्हांला व विशेषतः इंदूला सुखावह होईल असें मला मनांतून वाटतें. ”

" काय ! माझ्याशीं विवाह करणार ? माझ्याशीं विवाह करण्याइतका कोणता गुण तुम्हांला माझ्यामध्यें दिसला ? " मी आश्चर्यानें विचारलें.

या प्रश्नाचें उत्तर न देतां गंगूबाई धीटपणानें म्हणाल्या, " त्याचें उत्तर देण्यापूर्वीं मी आणखीहि एक गोष्ट आतांच स्पष्टपणें तुमच्या कानांवर घालतें—कांहीं गैरसमज राहायला नको म्हणून. आणि ती म्हणजे आपलें होणारें हें लग्न लौकिकदृष्ट्या लग्न असलें तरी तें करण्यांत माझा हेतु आपण नुसता मुलांबाळांचा संसार करावा असा बिलकूल नाहीं. तो आपणां उभयतांच्या उन्नतीकरतां व ध्येयसिद्धीकरतां व्हावा असा आहे. दिसायला आपण गृहस्थाश्रमी दिसलों तरी आमरण ब्रह्मचारी राहावें व अंगीकृत कार्य एकनिष्ठेनें, निर्व्यत्यय व अविरतपणें करावें असा माझा हेतु आहे. आणि हा हेतु पार पाडायला तुम्ही योग्य आहां असं मला दिसतं. या मुलीचा पाशहि मी तुमच्या मार्गाआड येऊं देणार नाहीं. मी तुम्हांला समक्ष भेटून विवाहासारख्या बाबतींत सर्व स्वतः सांगणें हें तुम्हांला कसेंसेंच वाटेल; पण मला समक्ष भेटून सरळ व स्पष्ट विचारणें व सांगणेंच आवडतें."

गंगूबाईंच्या या सरळ वृत्तीचा व स्पष्ट-स्पष्ट बोलण्याचा माझ्या मनावर इतका परिणाम झाला कीं, मी गोंधळलों, घोटाळलों, हतबुद्ध झालों. 'He came, he saw, and he conquered' या सीझरसंबंधींच्या उक्तीची मला आठवण झाली. गंगूबाई आल्या काय, माझ्याशीं बोलल्या काय आणि निमिषार्धांत त्यांनीं मला आपलेंसें केलें काय ! साराच चमत्कार ! त्यावेळीं गंगूबाईंचे मनावर महात्मा गांधींच्या वैवाहिक विचारांचा पगडा विशेष झालेला उघड दिसला. असाध्य मानल्या गेलेल्या गोष्टीहि अभ्यासानें साध्य होतात अशी त्यांची श्रद्धा होती.

मी त्यांच्या वर्गांतल्या हुशारीबद्दल, वादविवादांतील कौशल्याबद्दल, निरनिराळ्या खेळांतील प्रावीण्यांबद्दल वामनराव, मायदेव वगैरे त्यांच्या प्रोफेसरांकडून ऐकलेंच होतें; वर्गांतील शिकविण्यासंबंधींचा त्यांचा लौकिकहि श्री. मोडक यांचेकडून माझ्या कानांवर आला होता. घरांतल्या व घराबाहेरच्या त्यांच्या कामाबद्दल शंकाच नव्हती, कारण त्यांना अक्का–बापूसाहेबांचें वळण होतें; त्यांच्या ध्येयवादाबद्दलहि तर्कानें जाणतां येण्यासारखें होतें व आतां तर तें त्यांनीं स्पष्टच सांगितलें होतें. इंदूच्या

सुखाची व कल्याणाची जाणीव त्यांना होती हेंहि त्यांच्या बोलण्यावरून दिसलें. अशा या परिस्थितींत मूळचा सनातनी व धर्मनिष्ठ वृत्तीचा आणि आप्तेष्टांच्या इच्छेचा कधींहि भंग न करणारा—असा मी या विवाहाला कां प्रवृत्त झालों हें सहज समजण्यासारखें आहे. मीं केलेली निवड निव्वळ दैहिक पातळीवरून झाली नव्हती तर वरच्या आध्यात्मिक पातळीवरून झाली होती.

मी कर्तव्याकर्तव्याच्या लढ्यांत सांपडलेला पाहून गंगूबाईनीं मोठ्या खिलाडू वृत्तीनें मला वचनमुक्त करण्याची तयारी दाखविली. " तुम्हांला मानसिक त्रास होणार असेल तर तुम्ही माझा नाद सोडून बंधूंच्या सांगण्याप्रमाणें वागा. मला त्याचें यत्किंचितहि वाईट वाटणार नाहीं—उलट बरेंच वाटेल. मी तुमच्या स्थितींत सांपडलें असतें तर कदाचित् या विवाहाला नकारच दिला असता. तरी पुन्हां विचार करा व मग काय तें ठरवा—" असें त्यांनीं मला मोठ्या समंजसपणें सांगितलें. याचा परिणाम मात्र उलटाच झाला. या त्यांच्या चांगुलपणामुळें मी जास्तच आकर्षिला गेलों, व माझा निश्चय मी हलवून बळकट केला. शेवटीं कोणाच्याहि विरोधाला न जुमानतां मी विवाहाला तयार झालों.

आमचा हा विवाह शिरवळ मुक्कामीं कमलाबाई देशपांडे यांच्या सासरच्या गांवीं ता. १२ मे १९२२ रोजीं झाला. वराकडचे वऱ्हाडी असे फारसे नव्हतेच. अकोल्याचे वासुदेवराव चिपळूणकर, हिंगण्याचे गाडगीळ पतिपत्नी, माझी मावसबहीण यमूताई केळकर व माझे मधले बंधु—अण्णा—अशीं शकुनाचीं पांचच माणसें हजर होतीं. नारळकर आपलीं सर्व कर्तव्यें पार पाडून ऐन लग्नाचे वेळीं सायकलवरून ३२ मैल आले होते. याला म्हणतात कर्तव्यनिष्ठा व मित्रप्रेम. वधूकडील मंडळी मात्र बरींच होतीं. गंगूबाईंचे वडील—मातुश्री, बहीण—अक्का व मेहुणे—बापूसाहेब चिपळूणकर, सहाहि सख्खे बंधु, मावसबंधु अकोल्याचे यशवंतराव ऊर्फ वाय्. जी. जोशी इ. पंधरा-वीस माणसें जमलीं होतीं. सर्व मंडळी श्रीमंत व सुखवस्तु दिसलीं.

सासूबाईंचें भडक रंगाचें टोपपदरी लुगडें, टपोऱ्या दाणेदार मोत्यांची मोठी थोरली नथ, कानडी पद्धतीचें उभटें कुंकू, हातांतील भरदार गोठ-पाटल्या, कर्तेपणा दाखविणारा चेहरा, भेदक व शोधक डोळे—सगळें कांहीं अजून डोळ्यांपुढें दिसतें. इतर बायकाहि डागदागिन्यांनीं लहडलेल्या होत्या

नुसत्या स्त्रियाच नव्हे तर पुरुषहि वस्त्राभरणांनीं झगमगत होते. एकजात सगळ्या मेहुण्यांच्या हातांत पोची व गळ्यांत कंठ्या पाहून मी तर खजील झालों. माझ्या गळ्यांत नुसतें जानवेंच !

वधूचा पोषाख मात्र अत्यंत साधा असून दागदागिन्यांचें तर तिला वावडें असल्याचें दिसलें. मेहुण्यांच्या मानानें माझे श्वशुर ( घरांतली मंडळी त्यांना 'भाऊ' व आसपासची 'गुज़ाभाऊ' म्हणत. ) अतिशयच साधे दिसले. लग्नांत महावस्त्र हवें म्हणूनच त्यांनीं पीताम्बर व शालजोडी धारण केलेली दिसली.

आमचा हा विवाह सप्रवर होता. हा सप्रवरत्वाचा डाग धुऊन टाकण्यासाठीं गंगूबाईंना मावसभावाचे-म्हणजे वायू जी. जोशी यांचे मांडीवर दत्तक देण्यांत आलें, व त्या लग्नापूर्वीं एका घटकेंत ओकांऐवजीं जोशी बनल्या ! हा विधि तरी कितपत सशास्त्र होता कोणास ठाऊक !

लग्न वैदिक पद्धतीनें व अत्यंत थोडक्या वेळांत उरकण्यांत आलें. मंगलाष्टकें स्वतः कमलाबाई देशपांडे यांनीं केलीं होतीं. ( त्यांतील दोन ओळी मागें दिल्याच आहेत. ) तीं संपून अंतरपाट दूर झाल्याबरोबर कमलाबाईंचे दीर–श्री. वाग्भट देशपांडे आपल्या नेहमींच्या विनोदी स्वभावानुसार उद्गारले, "झालं, एकदाचं. गंगेत घोडें नाहलें !" गंगूबाई म्हणजे 'गंगा' हें उघडच होतें. पण 'घोडें' कोणतें अशा शंकेनें सर्वांनीं माझ्याकडे पाहिलें. आम्ही सर्वजण हंसलों. वैदिकांच्या वेदघोषांत व आप्तेष्टांच्या हास्यविनोदांत आमचें 'शुभमंगल' झालें !

सप्तपदीच्या वेळीं भटजींनीं ध्रुवाचें दर्शन घेण्यास सांगितलें. ध्रुव उत्तर दिशेला असतो हें माहीत होतें; पण उत्तर कोणत्या बाजूला यासंबंधीं क्षणभर संभ्रम पडला. तेव्हां गंगूबाईंनीं हळूंच मोठ्या चपलाईनें अंगुलीनिर्देश करून संभाळून नेलें. जीवनांत मला संभाळून नेण्याचे प्रसंग गंगूबाईंवर पुढें पुष्कळच आले, त्यांची ही नुसती नांदी होती.

कांहीं वेळानें एक सभा झाली, व तींत आमचें अभिनंदन करण्यांत आलें. मुख्य वक्ते अर्थात् वाग्भट हेच होते. अशीं भाषणें करण्याची त्यांना मोठी हौस ! मेजवानी वगैरे सर्व यथास्थित होऊन सर्व मंडळी

प्रसन्न अंतःकरणानें आपापल्या ठिकाणीं परतलीं. आम्ही उभयतां मात्र महाडकर मंडळींबरोबर बैलगाडींतून महाडलाच गेलों.

काय तो त्या काळचा महाडचा प्रवास ! बैलगाडीनें रखडत रखडत जायला दोन-अडीच दिवस लागायचे. रस्ता किती वाईट ! गाडींत बसून बसून अंग अवघडून यावयाचें—अंबून जावयाचें ! पण या वेळीं मंडळी पुष्कळ असल्यामुळें, त्यांच्या थट्टा-विनोदाला व गप्पा-गाण्यांना खेळ नसल्यामुळें, बरोबर फराळाचें भरगच्च असल्यामुळें तो खडतर प्रवास नुसता सुसह्यच नव्हे तर सुखाचा झाला. आणि मी नुकत्याच झालेल्या विवाहाच्या रम्य व लोभस वातावरणांत अद्याप तरंगत असल्यामुळें मला तर तो जास्तच सुखाचा झाला.

महाडची नदी ओलांडून बाजारपेठेंतून आम्ही घराकडे वळलों. घरांत शिरण्यापूर्वीं त्याच्या समोरच्या चवदार तळ्याचा देखावा मोठा सुंदर दिसला. घर जुनसरच असलें तरी त्याची मांडणी खानदानी पद्धतीची होती. पुढें—मागें विस्तृत अंगणें, त्यांत नारळी, पोफळीं, आंबा, फणस, सोनचांफा वगैरेंसारखे मोठे वृक्ष असून पपई, पपनीस, महाळुंग, केळीं वगैरेंसारखीं लहान झाडेंहि होतीं.

मागच्या बाजूला भलें—मोठें भात—खांचर होतें. मागच्या पडवीला लागूनच एक चिरेबंदी विहीर असून शेजारींच एक ऐसपैस दगडी चौरंग व पाणी सांठविण्यासाठीं एक मोठी दगडी दोणी दिसली.

घराचें हें जुनें वैभव जाऊन आतां त्या ठिकाणीं नवीन तऱ्हेचा पुष्कळच बदल झाल्यामुळें वरील वर्णनाला आठवणीपुरतीच गोडी आहे. त्यावेळीं सबंध कुटुंब अविभक्त असून सर्व भाऊ—भाऊ एकत्रच राहत होते. त्यांनीं व त्यांपैकीं कांहींच्या मुलांबाळांनीं घर कसें गोकुळासारखें भरलेलें दिसलें. पडवींतील गडी—माणसांचा व गोठ्यांतील गुरांढोरांचा भरणाहि मोठा वाटला. सकाळ, दुपार, संध्याकाळ मिळून पंचवीस—तीस पानें उठत. गडी—मोलकरणी, आले—गेले, पाहुणे—रावळे हीं सर्व निराळींच.

घरांत येवढा मोठा राबता असला तरी सर्वांचें सगळें कांहीं सुरळीत व सुव्यवस्थित होत असे आणि याचें मुख्य कारण माझ्या सासूबाई—सौ. चिंगूताई. त्यांचा दरारा, रुबाबदार वागणूक, चौफेर नजर, कामसूपणा, दूरदृष्टि

इत्यादि पाहिलें म्हणजे पाहणाराला आपण एखाद्या मातृसत्ताक राज्यांत आहोंत असें वाटे.

खरें म्हणजे माझे श्वशुर ती. गुजाभाऊ घरांत फारसें पाहतहि नसत. बाहेरची शेती-भाती व शेट-सावकारी मात्र त्यांनीं मोठ्या दक्षतेनें चालविली होती. घरांतलें सर्व कांहीं हवें नको, हव्यकव्य, आल्यागेल्याचा सत्कार-समाचार, मुलाबाळांचीं शिक्षणें, लग्नकार्यें वगैरे सर्व कांहीं त्यांनीं आपल्या कर्तृत्ववान् पत्नीकडे सोंपविलें होतें.

आणि चिगूताईंचें कर्तृत्वहि अजून– नव्वदीच्या सुमारासहि तसेंच टिकून आहे. पाकक्रिया, शिवणकला, नेहमींच्या दुखण्याबाहण्यावरच्या औषध-पाण्याचें अनुभवसिद्ध ज्ञान, तिथि–नक्षत्रें, सण-वार, मुहूर्त-योग, इ. पंचांगीय व खगोलविषयक माहिती, हिशेब ठेवण्याबाबतची हुशारी सर्वत्र अवधान, चिरकालीन स्मृति इ. सारखे गुण जे एकाच व्यक्तीचे ठिकाणीं असलेले सहसा आढळत नाहींत–ते त्यांच्यामध्यें आहेत. यांतील बहुतेक गुण त्यांच्या तिघी मुलींमध्येंहि उतरले आहेत. प्रत्येकीच्या अंगच्या गुणांचें क्षेत्र थोडेंफार निराळें येवढेंच.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे हें सबंध कुटुंबच मला त्या वेळीं मोठें नमुनेदार दिसलें, व अक्का आणि गंगूबाई ( तिसरी बहीण बबन त्या वेळीं अगदींच लहान होती. ) यांच्या अंगच्या गुणांची मूळ गंगोत्रि त्यांच्या मातुश्रींत असल्याचें प्रत्ययास आलें.

असो. अशा प्रकारच्या माझ्या सासुरवाडीस कांहीं दिवस सुखानें घालवून आम्हीं उभयतां हिंगण्यास आमच्या भावी संसाराची सुरुवात करण्याकरितां परतलों. हिंगण्यास आल्यावर ‘ आश्रमांतील ’ यच्चयावत् मंडळींना आम्हीं जिलबीचें जेवण दिलें व त्यांचा दुवा घेतला. जिकडे तिकडे आनंदी-आनंद झाला.

माझ्या जीवनावर या विवाहाचे फार मोठे व चिरकालीन परिणाम झाल्यामुळें मी या घटनेला आयुष्यांत अत्यंत महत्त्व देतों. यांतील एक दोन परिणामांचा आतांच उल्लेख करतों. या विवाहामुळें माझ्याकडे पाहण्याची लोकांची दृष्टीच बदलली. गंगूबाईसारख्या हुशार, शिकलेल्या,

कर्तबगार, ध्येयवादी व सर्वांना आवडणाऱ्या एका तरुण मुलीनें मला आपण होऊन पसंत केलें त्या अर्थी मीहि तितकाच गुणवान् व कर्तृत्ववान् असलों पाहिजे असें वाटूं लागून लोक माझ्याकडे विशेष आदरानें व आपुलकीनें पाहूं लागले. माझे मित्र मला थट्टेनें म्हणाले सुद्धां—'काय रे गड्या, एकदम एवढा मोठा कसा झालास? इतकी शिकलेली व थोरा-मोठ्याची मुलगी तुला भाळली अशी जादू तरी काय केलीस?' मित्रांच्या बोलण्यांत थोडीफार थट्टा असली तरी त्यांत सत्यहि बरेंच होतें. मीहि स्वतःला फार मोठा व भाग्यवान् वाटूं लागलों.

या विवाहामुळें आलेला हा नैमित्तिक मोठेपणा आपल्याला नित्याचा टिकवावयास पाहिजे अशी ईर्षा उत्पन्न होऊन मी आपोआप तसा प्रयत्न करूं लागलों. हा या विवाहाचा दुसरा मोठा परिणाम होय. आपण हुशार आहोंत, कर्तृत्ववान् आहोंत अशा प्रकारच्या आत्मसंतुष्टतेंत राहून आतां चालणार नव्हतें. आपण आहों त्यापेक्षां जास्त जास्त मोठे झालों पाहिजे अशी जिद्द वाटूं लागून माझ्या स्वतःसंबंधींच्या आशा-आकांक्षा वाढूं लागल्या; व जीवनाला एक प्रकारचें उच्च वळण लागूं लागलें.

या विवाहाचे आणखीहि कांहीं परिणाम माझ्यावर झाले; पण ते कोणते व कसे हें यथावकाश कळेलच.

◎ ◎ ◎

## आमचें वैवाहिक जीवन : : : १४

विवाहानंतर महाडहून हिंगण्यास आल्यावर आम्ही शिक्षकांच्या चाळींतील एका ब्लॉकमध्यें बिऱ्हाड थाटलें. तोंपर्यंत मी पुण्यांतील माझ्या बंधूंच्या घरापासून रोज पहांटे—इंदू जागी होण्यापूर्वी—सायकलीवरून हिंगण्यास येई, व सबंध दिवस तेथें काम करून संध्याकाळचे सुमारास परत पुण्यास जाई. मी हिंगण्यास आलेला असलों म्हणजे इंदूच्या काकू तिची फार काळजी घेत, व आपापल्या परीनें तिला रंजवून—रिझवून आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करीत.

पण संध्याकाळ होऊन माझी घरीं येण्याची वेळ झाली रे झाली म्हणजे मात्र तिला कांहीं सुचेनासें होई, व ती सारखी माझ्या वाटेकडे डोळे लावून पुढच्या दाराच्या उंबऱ्यावर बसून राही. तिला खांद्यावर घेऊन बाहेरून जरा हिंडवून आणलें म्हणजे पोर अशी कांहीं खुशालून जाई कीं बोलायची सोय नाहीं ! तिला तशी खुशाललेली पाहून मलाहि मोठा आनंद होई, व सबंध दिवसाचा शीण नाहींसा झालासा वाटे. पण पुढच्या पहांटे पुन्हां तिला दूर सारून हिंगण्यास पसार व्हावयाचें याचें वाईट वाटे.

हिंगण्यास बिऱ्हाड थाटल्यावर कांहीं महिने आम्ही वैवाहिक जीवनाचा आनंद मनमुराद लुटला. ' पंच—पंच उषःकाले उठावें, एकत्र गुंफूनि जीवितधागे ' ही माधव ज्यूलिअनच्या ' संगमोत्सुक डोह ' या भावगीताची प्लेट लावून तिच्या भावगंभीर व नादमधुर सुरांत चहापान करावें, दोघांनीं झाडलोट वगैरे गृहकृत्यें उरकावीं, व स्नानें आटोपून शाळेच्या उद्योगाला लागावें. मधल्या सुटींत घरीं येऊन गंगूबाईनीं कुकर लावावा, व मलाहि स्वयंपाकाची संथा द्यावी. ( या संथेतून फारसें कांहीं निष्पन्न झालें नाहीं

ही गोष्ट निराळी.) जेवणानंतरचीं कामें हातासरशीं उरकून पुन्हां उद्योगाला लागावें. संध्याकाळीं परत येऊन थोडेंसें तोंडांत टाकावें व डोंगरावर हिंडावयास, किंवा मुलींचे खेळ व्यावयास ग्राउंडवर जावें. दिवे-लागणीला मी गीतामंदिरांत प्रार्थना घ्यावी; रात्रीं जेवणखाण झाल्यावर कांहीं काळ जोडीनें वाचावें (प्रो. म. म. जोशी यांनीं तसें सांगितलें होतें) व सबंध दिवस चांगला गेला या समाधानांत झोपीं जावें. अशा-प्रकारें आमची दिनचर्या मोठ्या आनंदानें, सहकारितेनें, टापटिपीनें, व्यवस्थितपणें, व ध्येयाकडे दृष्टि देत देत चाले.

नाहीं म्हणावयास कांहीं कांहीं प्रसंग मात्र असे येऊं लागले कीं, त्यावेळीं आम्हां उभयतांचींहि मनें थोडीबहुत दुखावलीं जात. आमच्या संसारांतील पहिल्याच संकष्टी चतुर्थीचे दिवशीं संध्याकाळीं माझे एक विशेष स्नेही श्री. बाबुराव माटे (यांचेसंबंधीं मागें आलेंच आहे) आमचेकडे आले व चतुर्थी सोडण्यास राहिले. मी एकटाच असतों तर चंद्रोदयानंतर व सोंवळ्यानें पूजा-नैवेद्य न करतां रोजच्याप्रमाणें संध्याकाळींच व ओंवळ्यानेंच जेवलों असतों. फार तर तोंडानें 'मोरया' म्हणत व हातानें नमस्कार करीत जेवणाला सुरुवात केली असती. पण बाबुराव हे उपासा-तापासाचे व सोंवळ्या–ओंवळ्याचे बाबतींत कट्टर सनातनी असल्यामुळें गंगूबाईंनीं त्या रात्रीं सोंवळ्यानें स्वयंपाक करावा व चंद्रोदयानंतर जेवणें करावींत अशी इच्छा मी प्रदर्शित केली. त्यांनीं माझी इच्छा मानली, नाहीं असें नाहीं. पण ती इच्छा मानीत असतांना त्यांच्या चेहऱ्यावरून त्यांच्या मनाला अतिशय कष्ट होत आहेत असें स्पष्ट दिसलें.

गंगूबाई या कर्वे, चिपळूणकर, वा. म. जोशी यांच्यासारख्या सुधारकी संगतींत आणि बुद्धिवादी वातावरणांत वाढल्या असल्यामुळें व वर्गांत आगरकरांचे धर्माधर्मविषयक विचार वामनरावांसारख्या तार्किकाच्या तोंडून ऐकल्यामुळें त्यांना असल्या रूढ धार्मिकतेबद्दल आदर वाटेनासा झाला होता. आणि म्हणून त्यांना त्या रात्रीं आपल्या सदसद्विवेक बुद्धीविरुद्ध वागावें लागलें होतें. याचा परिणाम व्हावयाचा तोच होऊन ती सबंध रात्र मित्र आल्याच्या आनंदांत न जातां पत्नीला मात्र दुखावल्याच्या विषादांत गेली.

या प्रसंगासंबंधानें—एवढेंच नव्हे तर आमच्या धार्मिक आचारांविचारां-संबंधानें आम्ही एकमेकांशीं स्पष्ट असें कधींच बोललों नाहीं. दोघेहि मनांत मात्र काय समजावयाचें तें समजलों; व एकमेकांच्या इच्छांना शक्य तेवढा मान द्यावयाचा व स्वतःच्या इच्छांना शक्य तेवढी मुरड घालावयाची असें कायमचें ठरविलें.

मीं तेव्हांपासून उपास—तापास कायमचे सोडले. सोंवळें-ओंवळें तर तत्पूर्वींच सोडलें होतें. प्रकृतिस्वास्थ्याच्या दृष्टीनें महिन्यांतून एखादें लंघन तरी घडावें असें वाटून मी हल्लीं विनायकी चतुर्थीच्या दिवशीं चहा, दूध, ताक अशांसारख्या नुसत्या पेयांवर राहतों. दुसऱ्या कोणाकडे गेल्यास त्यांच्या रिवाजाप्रमाणें मीहि उपास-तापास व सोंवळें-ओंवळें करतों. स्वतःचा असा कसलाच नियम व निर्बंध न पाळतां प्रत्येक प्रसंगीं इतरां-प्रमाणें चालणें हें योग्य का अयोग्य हें देवाला माहीत. पण मी मात्र तसें वागतों हें खरें. माझें वागणें कै. तात्यासाहेब केळकरांसारख्या सारासार विचार करणाऱ्या व्यवहारी माणसासारखें असतें येवढें समाधान मात्र मला लाभलें. धर्माचें तत्त्व जेव्हां खुद्द देवालाहि आकलन करतां येत नाहीं तेव्हां ' महाजनां 'चा मार्ग चोखाळावा असाहि एक दंडक आहेच ना ?

नाराजीचे, नाखुषीचे व बेबनावाचे आणखीहि कांहीं प्रसंग आले. लग्नानंतर लवकरच वटपूर्णिमा आली. शेजारच्या सुवासिनी स्त्रिया पूजा-साहित्य घेऊन वडाची पूजा करण्याकरितां निघाल्या. त्यांचें लक्ष गंगूबाई पूजेला येतात का नाहीं इकडे असल्यानें त्या आमच्या खोलीकडे आतुर-तेनें पाहूं लागल्या. गंगूबाईंना त्याचें कांहींच वाटलें नाहीं. मी मात्र त्याच्याइतका मनानें तयार झालों नव्हतों. मला वाटे, कांहीं गोष्टी बुद्धीला पटत नसल्या तरी त्या लोकव्यवहाराकरितां कराव्या. त्या करावयाच्या नाहींत—कायम सोडायाच्या—असें मनानें ठरविलें असलें तरी त्या हलके-हलके सोडाव्यात. गंगूबाईंना हें ' हलकें-हलकें 'चें धोरण पसंत नव्हतें. बुद्धीला मान्य नसलेल्या गोष्टी थोडा वेळ तरी, व केवळ लोकांना बरें वाटावें म्हणून कां करावयाच्या ? तसें करणें म्हणजे मनांत एक व हातानें दुसरें करण्यासारखा मिथ्याचार आहे असें त्यांचें मत.

साताऱ्यास, व पुढें इंग्लंडला जाण्यास त्या निघाल्या, तेव्हां "किती दिवसांकरितां जात आहां?" असें लोक स्वाभाविकपणेंच विचारीत. गंगूबाई उत्तर देण्यापूर्वींच मी घाईघाईनें सांगें, "फार नाहीं कांहीं, फक्त वर्ष-सहा महिन्यांकरितां." असें सांगण्यांत माझा हेतु असा कीं, अगदीं नक्की व खरें सांगून त्यांना डिवचण्या–दुखवण्याऐवजीं थोडें मोघम व खोटें बोलून त्यांचें दुःख व काळजी कमी करावींत. मोठें व भारतांतील उदाहरण द्यावयाचें म्हणजे धर्मराजानेंसुद्धां कृष्णाच्या सांगण्यावरून–'नरो वा कुंजरो वा' असें दुटप्पी व अर्धवट खरें सांगून म्हाताऱ्या द्रोणाचार्यांना तेवढ्यापुरतें चिंतामुक्त केलें नाहीं का? डॉक्टरलोकहि कांहीं वेळां असेंच करीत नाहींत का? अनिष्ट गोष्ट सांगायाचें कितीहि लांबणीवर टाकलें तरी सत्य उघडकीस यावयाचें राहत नाहीं हें खरें. तथापि त्या अनिष्टतेची तीव्रता थोडी तरी कमी होते.

गंगूबाईना हें माझें अर्धवट व गुळमुळीत बोलणें पसंत नसे. त्यांना तो भ्याडपणा वाटे. त्या विचारावयाच्या, 'तुम्ही खरें एकदमच सांगून मोकळे कां होत नाहीं? काय जें वाईट वाटायाचें तें एकदांच व एकदमच वाटेल.' आणि तेंहि एकप्रकारें खरेंच होतें. हीच गोष्ट श्रावणांतल्या मंगळागौरीला व भाद्रपदांतल्या पक्षाला बंधूंच्या घरीं जाण्यासंबंधीं. असले प्रसंग दिसायला क्षुल्लक दिसले तरी ते मनाला सारखा सारखा त्रास देतात, आणि उभयतांत आढी निर्माण करतात हें कांहीं खोटें नाहीं.

माझा पोशाख व एकंदर राहणी गंगूबाईना तितकीशीं पसंत नसत, असें कालांतरानें लक्षांत आलें. बापूसाहेब व हिंगण्याचे दुसरे कांहीं लोक रोज दाढी करावयाचे. मला रोज रोज दाढी करण्याचें महत्त्व व त्याची आवश्यकता तितकीशी वाटत नसत. आठवड्यांतून दोनदां दाढी केली तरी मला पुरत असे. ते मिशा रोज कटाक्षानें काढीत, माझ्या वाढलेल्या असत. मी धोतर नेसें व तेंहि ब्राह्मणी पद्धतीनें नेसें. ते पॅंट वापरीत किंवा धोतर नेसलेच तर काचा मारीत. शेंडी, जानवें इत्यादि ब्राह्मण्याच्या खुणा माझ्या अंगावर दिसत. त्या त्यांच्या अंगावर नसत. मी घरांत उघडा वावरें, उघड्यावर अंघोळ करण्याचें मला विशेष कांहीं वाटत नसे; त्यांना नेहमीं अंगांत कांहींतरी लागे, अंघोळीला बाथरूमच लागे. एक-नि-दोन.

या माझ्या संवयी व हीं माझीं वागणीं गंगूबाईंना व त्यांच्यासारख्या शिकलेल्या स्त्रियांना कशींशींच वाटत. हिंगण्याचे बहुतेक लोक आरोग्य-पोषणाचें साधन म्हणून अधून-मधून अंडीं खात; मला तीं अद्याप निषिद्ध वाटत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे आम्हां उभयतांच्या आवडी-नावडी कांहीं कांहीं बाबतींत परस्परभिन्न असल्याचें दिसून आल्यावर आमच्यांतील पहिला पहिला एकोपा हळूहळू कमी-कमी होऊं लागला, व दोघांनाहि चिवचिवल्यासारखें होई.

दोघांच्या मित्रपरिवारांतहि थोडा-फार फरक पडे. गंगूबाई फार दिवसांपासून हिंगण्यास वाढलेल्या असल्यामुळें त्यांचा मित्रपरिवार मोठा असे. मी तेथें नुकताच आल्याकारणानें माझा मर्यादित असे. बोलण्या-चालण्याचे व थट्टामस्करीचे त्यांचे विषय निराळे असत,—माझे निराळे पडत. त्या मैत्रिणींबरोबर हिंडाफिरायला जात, मला त्या सर्वांबरोबर जाण्यास संकोच वाटे. मी त्यांच्याबरोबर असलों म्हणजे त्यांच्या गप्पागोष्टींना व हंसण्याखेळण्याला स्वाभाविकतःच मर्यादा पडे, व हिंडण्यांतली गोडी तितक्या प्रमाणांत कमी होई. दोघां-दोघांनींच बरोबर जावयाचें तर बोलण्यांत तोच-तोपणा येऊन बोलणें कंटाळवाणें होई.

पतिपत्नींच्या मनोरचनेंत किंवा आवडी-निवडींत असले बारीक-सारीक फरक पडले म्हणून तेवढ्यानें वाईट वाटायला हवें, किंवा एकमेकांचीं मनें बिघडायला पाहिजेत असें मुळींच नाहीं असें दोघांनाहि अलीकडे पटत चाललें आहे. जगांत व्यक्ती तितक्या प्रकृती असावयाच्याच, व व्यक्तींना जुळवून-मिळवून घ्यावयाचें तर त्यांच्या भिन्न प्रकृतींकडे काणाडोळा करावाच लागतो याचा प्रत्यय आतां दोघांनाहि येऊं लागला आहे. पण त्या काळीं प्रत्येकाच्या प्रकृतीचे व स्वभावाचे कोंपरे-कंगोरे अद्याप पूर्णपणें कणखर व शाबूत असल्यामुळें, आणि दोघांचेहि पूर्वग्रह व पूर्वसंस्कार कायम असल्यामुळें दोघांच्याहि मनांना यावा तितका गोलदारपणा, उदार-पणा व लवचिकपणा प्राप्त झाला नव्हता. तसेंच सुधारकपणा व सनातनीपणा यासंबंधींच्या दोघांच्याहि कल्पना नक्की व निश्चित नसल्यानें एकानें दुसऱ्यास सनातनी मानावें, तर दुसऱ्यानें पहिल्यास सुधारक मानावें असें चाललें होतें. आतां दोघेहि विचारानें व अनुभवानें शहाणे होऊन एक-

मेकांच्या बोचक व जाचक आवडी-निवडींकडे दुर्लक्ष करतों व एकमेकांना समजून व संभाळून घेतों. आतांचा हा समंजसपणा दोघांतहि यापूर्वींच आला असता तर किती बहार झाली असती !

हे सर्व दोष ' दोष ' न वाटूं द्यावयाला माणसांत एखादा तरी एकदम उठून दिसणारा ( Out-standing ) गुण असावा लागतो, तो माझ्यांत नव्हता ( व नाहीं ). बलवत्ता, सौंदर्य, संपत्ति, विद्वत्ता, कलावत्ता, त्याग, कर्तृत्व, धैर्य, धडाडी इत्यादींसारखा कोणताहि गुण माझ्या ठिकाणीं प्रकर्षानें वास करीत असता तर त्याच्या प्रकाशाच्या झोतांत माझ्यांतील बारके-सारके दोष झांकून नसते का गेले ?

बेबनावाचे दुसरे प्रसंग ह्यांहून बरेच वेगळे व जास्त गंभीर स्वरूपाचे होते. त्या अविस्मरणीय प्रथम-भेटींत गंगूबाईनीं सांगितलेल्या सर्व गोष्टी—विशेषत: ' आपण आमरण ब्रह्मचाऱ्यांसारखें राहावयाचें ' ही गोष्ट मान्य करून मी विवाहाला तयार झालों होतों. त्या क्षणीं मी मनाच्या फार उच्च-अतिमानुष-अवस्थेंत असलों पाहिजे. एरवीं असली असिधाराव्रताची अट माझ्यासारख्या सामान्य माणसाकडून मान्य केली जाती ना.

विवाह होऊन थोडके दिवस लोटले तोंच माझ्यांतला दबलेला ' पुरुष ' जागृत होऊं लागला; व मी त्या मुख्य अटीचा मला अनुकूल व सोईस्कर असा अर्थ करून घेण्याचा प्रयत्न करूं लागलों. ' लंघन ' म्हणजे पूर्ण निरशन नव्हे तर कमी जेवण ( लंघनं लघु भोजनम् ) असा सोईस्कर अर्थ करून भुकेला माणूस जेवायला नाहीं का प्रवृत्त होत ? तशी स्थिति माझी होऊं लागली. पण गंगूबाईच आपल्या अत्यंत कणखर व निग्रही स्वभावाच्या, म्हणूनच घेतलेलें व्रत मनानें नसलें तरी शरीरानें-माझेकडून पाळलें गेलें, व मी ब्रह्मचर्याचें श्रेय फुकटफाकट घेऊं लागलों.

आमच्या लग्नानंतर थोड्याच काळांत आमच्या स्वभावांचीं भांडीं एकमेकांवर आदळूं-आपटूं लागून तीं आवाज करूं लागलीं. मला वाटे, हा आवाज घराच्या चार भिंतींपर्यंतच पोंचत असेल. पण एकदां एका सकाळीं मी हिंगण्याहून पुण्यास जात असतांना कालव्यावर कै. डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर, खांद्यावर पुस्तकांची शबनमसारखी पिशवी टाकून व तोंडानें कांहींतरी चघळीत-चघळीत समोरून हिंगण्यास येत असलेले दिसले.

एवढा मोठा प्रकांडपंडित पायीं रखडत-रखडत येत असलेला पाहून मला कसेंसेंच वाटलें. त्यांनीं मला ओळखलेलें दिसलें. नमस्कार वगैरे झाल्यावर ते कीवेच्या आवाजांत म्हणाले, "वाईट झालें ! नको होतें त्यांनीं आतांच तसें करायाला. आणखी कांहीं दिवस वाट पाहावयास हवी होती."

मला त्यांच्या त्या मोघम पण सहानुभूतीच्या बोलण्याचा अर्थच समजेना. वस्तुस्थिति अशी होती कीं, त्याच सुमारास दुसऱ्याच एक मिसेस् पटवर्धन घटस्फोट घेण्यासाठीं बडोद्यास गेल्याचें डॉक्टरसाहेबांनीं वाचलें असावें; व बडोद्यास नोकरीनिमित्त गेलेल्या गंगूबाई पटवर्धन व या पटवर्धनबाई–दोघी एकच असें वाटून डॉक्टरसाहेबांनीं माझें सांत्वन करण्याकरितां म्हणून वरील प्रकारचे सहानुभूतीचे शब्द वापरले असावेत. डॉक्टरसाहेबांपर्यंत आमच्या कौटुंबिक कुरबुरी गेल्याचें पाहून वाईट वाटलें, तरी त्यांना आम्हां उभयतांबद्दल इतकी सहानुभूति वाटते हें पाहून बरेंहि वाटलें.

पुढें पुष्कळ वर्षें मला-मी स्वतःवर खुषीनें लादून घेतलेल्या ब्रह्मचर्याचा भारी त्रास व्हावयाचा; आणि त्या त्रस्त स्थितींत मी गंगूबाईंवर निष्कारण रागवावयाचा, चडफडायाचा व त्यांना लागेसें बोलावयाचा. पण हें सर्व कां होत आहे हें जाणून त्या त्या सर्वांची गय करायाच्या. मधून-मधून साम, दाम, भेद इत्यादींचाहि अवलंब करून पाहायाच्या.

अशा स्थितींत बरींच वर्षें गेलीं. अलीकडे कांहीं वर्षें मनाला स्थिरता येऊन ह्या असिधाराव्रतांतील आनंदहि उपभोगतां येण्याइतपत सात्विकता प्राप्त झाली आहे. 'प्लेटॉनिक लव्ह' सारख्या अशक्य व अतिमानुष वाटणाऱ्या गोष्टीहि कालांतरानें आनंद देऊं शकतात याचा प्रत्यय येऊं लागला. गंगूबाईंना माझी कींव येऊन त्यांनीं मनाचा जरा लेचेपेचेपणा दाखविला असता म्हणजे सर्वच ऑफस् झालें असतें. वैवाहिक जीवन तरून जात असतांना पति-पत्नींपैकीं कोणींतरी एकानें दुसऱ्यास तारायाचें असतें. आमच्या बाबतींत पतीनें पत्नीला तारण्याऐवजीं पत्नीनें पतीला तारलें येवढेंच !

या अस्वस्थतेच्या काळाच्या आतां आठवणी झाल्या म्हणजे आम्हां दोघांनाहि हंसूं येतें. पण त्या हंसण्यांतहि फरक असतो. गंगूबाईंची मान हंसतांना ताठ राहते, तर माझी नकळत खालीं जाते. हें त्यांच्या ध्यानांत

आलें म्हणजे त्या सांत्वनाच्या सुरांत म्हणतात, " उगीचच्च नाहीं का प्रसंग ओढून घेतलांत? तरी मी स्पष्ट सांगितलें होतें कीं, सर्व-सामान्य स्त्रियांसारखी मी तुमच्याशीं विवाह करीत नाहीं; आणि इतकें स्पष्ट सांगितलें असतांनाहि तुम्ही माझ्या म्हणण्याला आनंदानें संमति दिलीत. तुमचा तो ध्येयवादीपणा पाहून मला किती आनंद झाला म्हणून सांगूं? माझ्यासारखी भाग्यवान् स्त्री नसेल असें मी मनांत सारखं म्हणें. पण तें भाग्य कायमचें राहावयाचें नव्हतें. तुम्ही माझ्या म्हणण्यांत श्लेष काढून त्याचा फायदा घेण्याचें ठरविलें व पुरुषीपणा दाखवूं लागलांत.

" मी याबद्दल तुम्हांला आतां बिलकूल दोष देत नाहीं. मलाहि पुरुषी मनाचें तितकेंसें आकलन झालें नाहीं हा माझाहि दोष नव्हता का? तुम्हांला मी उगीचच्च भलत्या मार्गाला लावलं. वास्तविक पाहतां हें तुम्हींच मला म्हणायाचं; पण तुमचा स्वभाव झाल्या-गेल्या गोष्टी उकरून काढण्याचा नसल्यानें तुम्ही शांत राहिलांत आणि म्हणूनच आपल्या संसाराचा गाडा कुरकुरत का होईना, येथपर्यंत सुखरूप आला. नाहीं तर त्याचें एक चाक केव्हांच निखळून कोठें तरी घरंगळत गेलें असतें! पण आतां त्यासंबंधीं एक अवाक्षरहि न काढतां, झालं-गेलं विसरून जाऊन दोघेहि उर्वरित आयुष्य सुखासमाधानानें घालवूं या. होय ना? "

असले असंतुष्टतेचे प्रसंग सोडले म्हणजे आमचा संसार सुखाचा चालला होता. पण तो फार दिवस तसा सुखाचा चालावयाचा नव्हता. एका वर्षाचे आंतच त्यांत थोडा खंड पडला.

त्याचें असें झालें कीं, कमलाबाई देशपांडे यांनीं साताऱ्यास आपल्या सासरच्या गांवीं एक कन्याशाळा काढण्याचें मनाशीं योजलें; व मदतीकरितां गंगूबाईंना बरोबर नेण्याचें ठरवून तशी मागणी केली. " मेहुणीचे नात्यानें विनोदानें थोडें कमजास्त बोलण्याचा हक्क सांगून " त्यांनीं मला लिहिलें— " आमची गंगू तुम्हांला दिली असली तरी एक वर्षपर्यंत माझी मला परत द्या. " वडील मेहुणीच्या नात्यानें व हक्कानें त्यांनीं केलेली मागणी मान्य करण्याशिवाय गत्यंतरच नव्हतें.

गंगूबाईचें साताऱ्यास जाण्याचें घाटत असल्याचें ऐकून त्यांचे अधिकारी- श्री. मोडक, पूज्य गुरु प्रो. लागू हे दोघेहि कधीं नव्हत ते माझ्या खोलीवर

आले, व ‘ आम्ही शाळेचे इंग्रजी सुधारण्याचे जे बेत रचीत आहोंत ते ढासळून लावूं नका ’ असें म्हणाले. त्यांना आपल्या कार्यांत गंगूबाईंची इतकी आवश्यकता भासावी याचें मला आश्चर्य वाटलें व गंगूबाईंच्या अध्यापनकौशल्याची नव्यानें खात्री पटली. पण गंगूबाईंना आपल्या बेतापासून परावृत्त करण्याची माझी असमर्थता त्यांच्या लक्षांत आणून दिल्यावर ते दोघेहि नाराज होऊन परत गेले.

गंगूबाई व कमलाबाई–दोघी अगदीं जिवाभावाच्या व एका मनाच्या मैत्रिणी. दोघीहि प्रो. दिवेकरांच्या आवडत्या शिष्या, त्यांच्या आचारां-विचारांनीं बऱ्याचशा प्रमाणांत प्रेरित झालेल्या, त्यांचेकडून स्फूर्ति पावलेल्या, दोघीहि सुसंस्कृत, ध्येयवादी व स्वार्थत्यागी. माणसानें स्वतःच्या संसाराशिवाय जास्त कांहीं केलें पाहिजे अशा विचाराच्या. गुरु. अण्णा, बापूसाहेब यांच्याप्रमाणें आपणहि निराळें कार्यक्षेत्र आंखून घेऊन तें यशस्वी रीतीनें चालवून दाखवावें अशी दोघींचीहि आकांक्षा व मनाची धमक. हें झालें त्या दोघींचें.

पतिपत्नींनीं एकमेकांच्या आशा–आकांक्षांचे आड यावयाचें नाहीं, परस्परांच्या उन्नतीला व उत्कर्षाला पूर्ण वाव ज्यांत मिळेल असा सहवास म्हणजे विवाह, अशा आशयाची भाषा आम्हीं दोघांनीं लग्नापूर्वींच वापरली असल्यानें आम्ही एकमेकांशीं वचनबद्ध झालों होतों. कर्तृत्व दाखविण्याची ही संधि चालून आल्याबरोबर तिचा फायदा गंगूबाईंना घेऊं देणें हें माझें पति म्हणून कर्तव्य आहे असें वाटून मी त्यांना कमलाबाईंबरोबर साताऱ्यास जाण्याला संमति दिली. अर्थात् विरहदुःख जाणवत नव्हतें असें नाहीं. त्या दृष्टीनें दुसरे कांहीं पर्यायहि–उदाहणार्थ वारजाची शाळा चालविणें, साताऱ्यास मधून मधून जाऊन त्यांना मदत करणें इ.—सुचवून पाहिलें. पण कमलाबाईंची अडचण तेवढ्यानें दूर होत नसल्यानें मनांत नसतांनाहि केवळ निरुपाय म्हणून मीं त्यांना मोठ्या आनंदानें (? ) परवानगी दिली.—[ मनांतून नको असलेल्या गोष्टीची परवानगी मोठ्या आनंदानेंच द्यावयाची असते. ] व नुकताच सुप्रतिष्ठित झालेला आमचा संसार दुभंगला. गंगूबाईंनीं जातांना इंदूला बरोबर नेलें हें फार चांगलें केलें. इंदू दुरावणार म्हणून वाईट वाटलें; पण तिचें सर्व कांहीं त्या उत्तम प्रकारें करतील अशी

माझी खात्री असल्यानें, व पोरीला गंगूताईचा पुष्कळ लळा लागला असल्यानें मी तिला त्यांचेबरोबर जाऊं दिलें.

गंगूबाई साताऱ्यास गेल्यानंतर कांहीं दिवसांनीं हिंगण्याच्या आजन्म-सेवक मंडळीनें मला ती शाळा तपासण्यासाठीं साताऱ्यास पाठविलें. बरें झालें, ऐतेंच गंगूबाईंना व इंदूला भेटतां आलें. त्या दोघी तेथें आनंदांत असल्याचें पाहून मलाहि फार आनंद झाला.

शाळेची तपासणी झाल्यावर आम्ही तिथें जवळच लिंबगोव्यास माझ्या पहिल्या सासूबाईंना भेटण्यासाठीं गेलों. त्यांनीं आमचें अत्यंत उत्कटतेनें स्वागत केलें. गंगूबाई फार शिकलेल्या, सुधारक कर्व्यांच्या आश्रमांत राहिलेल्या, स्वतः मास्तरणीचें काम करीत असलेल्या, इ. गोष्टी सासूबाईंचे कानांवर गेलेल्या असल्यानें त्यांची गंगूबाईसंबंधीं जरा विकृत कल्पना होऊन बसली होती. पण गंगूबाईची व त्यांची प्रत्यक्ष गांटभेट होऊन थोडासा परिचय झाल्याबरोबर त्यांची ही मूळ कल्पना पार बदलून गेल्याचें त्यांनींच निःसंकोचपणें कबूल केलें.

गंगूबाईच्या वागण्याचें हें एक विशेष धोरण आहे कीं, त्या ज्या समाजांत जातात त्याच्याशीं समरस होतात. प्रो. म. म. जोशी एकदां कमलाबाई देशपांड्यांचे गुण सांगतांना एकदम बोलून गेले; "त्या अशिक्षित दिसतात." खरें म्हणजे 'त्या सुशिक्षितांत सुशिक्षित व अशिक्षितांत अशिक्षित दिसतात' असें प्रो. जोशी यांना म्हणावयाचें होतें. आणि तें योग्यच होतें. कमलाबाईप्रमाणें गंगूबाईहि जुन्यांत जुन्या, व नव्यांत नव्या दिसतात.

सासूबाईंनीं त्यांना मुलीच्या प्रेमानें व कौतुकानें वागविलें; व अशा सुशील मुलीची मीं निवड केली म्हणून माझेंहि अभिनंदन केलें. इंदू त्यांच्यापाशीं आनंदानें राहते या गोष्टीचाहि त्यांना फार आनंद झाला. सासूबाई फार प्रेमळ व कर्तृत्ववान् दिसल्याचें गंगूबाईंनीं मला सांगितलें. त्यांचा निरोप घेऊन व कोटेश्वराचें दर्शन करून आम्हीं गोत्रें सोडलें. ही त्यांची भेट शेवटचीच ठरेल असें त्यावेळीं कोणासच वाटलें नाहीं.

कमलाबाईच्या इच्छेप्रमाणें साताऱ्यास सुमारें एक वर्षभर राहून गंगूबाई परत हिंगण्यास आल्या. यापुढें त्या कायम शिक्षिका होऊन हिंगण्यासच

राहणार, व आमचा संसार पुन्हां सांधला जाणार म्हणून मी मनांत मोठा खूष होतों. पण नियतीची योजना कांहीं निराळीच होती. या योजनेनुसार दोन वर्षांनींच गंगूबाईंना इंग्लंडला जाण्याची संधि मिळाली व त्याप्रमाणें त्या तिकडे गेल्या.

इंग्लंडला जाण्याची, तेथील शिक्षणाची, तेथील वास्तव्याची वगैरे हकीगत लांब आहे. (गंगूबाईंनीं ती त्या काळच्या 'चित्रमय–जगत्' च्या दोन-तीन अंकांत दिलेली आहे.) पण थोडक्यांत सांगायचें म्हणजे असें कीं, कै. बाबासाहेब इचलकरंजीकरांच्या औदार्यानें इंग्लंडला जाऊन शिक्षण-शास्त्राचा अभ्यास करण्याकरितां पांच हजार रुपयांची एक मोठी रक्कम कर्जाऊ मिळाली व तिचा फायदा आम्हीं ताबडतोब घेतला.

बाबासाहेबांनीं केलेल्या या उदार मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्या-करितां व इंग्लंडला जाण्यापूर्वीं त्यांना नमस्कार करून त्यांचे शुभाशीर्वाद घेण्याकरितां आम्ही उभयतां इचलकरंजीस गेलों, व तीन दिवस त्यांच्या प्रेमळ व घरोब्याच्या पाहुणचाराचा उपभोग घेऊन परत आलों. त्या तीन दिवसांच्या सहवासांत बाबासाहेबांच्या अंगच्या किती तरी थोर-थोर गुणांचें दर्शन आम्हांला घडलें, व त्यांचेबद्दलचा आमचा आदरभाव वृद्धिंगत झाला. त्यांना माणसांतील गुणांची खरी पारख असून त्या गुणांचा योग्य तो परामर्ष घेण्यास ते सदैव तत्पर असत.

एकोणीसशें सत्तावीसच्या मार्चमध्यें गंगूबाई इंग्लंडला गेल्या. आम्ही सर्व आप्तेष्ट त्यांना निरोप देण्याकरितां बोटीवर गेलों होतों. गंगूबाई शेवटपर्यंत आपली मुद्रा आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करीत होत्या; पण पुढें पुढें त्या खिन्न व गंभीर होऊं लागल्या; आणि जाण्याच्या शेवटच्या क्षणीं तर उरांत सांठविलेलें सर्व विरहदु:ख एकदम बाहेर फुटलें! सर्वांनीं त्यांचे गळ्यांत हार घातले. मीं व इंदूनेंहि घातले. तेच हार उलट आमच्या गळ्यांत घालून त्यांनीं इंदूचा मुका घेतला व कोणाकडे न पाहतांच त्या तडक आपल्या केबिनकडे वळल्या. बोट सुटण्याचा भोंगा झाला, जिने काढून घेण्यांत आले व आम्ही गंगूबाईकडे पाहत पाहत धक्क्यावर आलों. बरोबरच्या सर्व मुलांना घेऊन मी व वाय्. जी. एका मोठ्या हॉटेलांत गेलों व थंडगार आइस्क्रीममध्यें विरहाचा दाह शमन करण्याचा प्रयत्न केला.

इंग्लंडांत गंगूबाईचें थोड्याच दिवसांत फार चांगलें बस्तान बसलें. त्या मिसेस् पॉन्सफर्ड नांवाच्या एका पोक्त इंग्लिश बाईकडे राहत असून त्यांच्यावर तिचा लौकरच लोभ जडला. जेवणाखाणाची सर्व व्यवस्था हिंदी पद्धतीची असूनहि त्यांची प्रकृति चांगली राहिली. शिकण्याचेंहि सर्व उत्तम जुळलें. गुरु० कर्वे व नामदार परांजपे यांच्या शिफारशीनें फ्रोबेल व मॉटेसरी कोर्सला बसण्याची परवानगीहि त्यांना मिळाली.

अशा प्रकारें गंगूबाईचें तिकडे सर्व ठीक चाललें असतांना इकडे माझे डोळे एकदम फार बिघडले. मुंबईचे विख्यांत नेत्रवैद्य डॉ. डग्गन यांजकडे डोळे दाखविण्यास गेलों ;असतांना त्यांचे मदतनीस डॉ. चिटर्णीस माझे डोळे पाहून एकदम उद्‌गारले, " I wonder how you did not go blind before long ". त्या त्यांच्या उद्‌गारांनीं मी इतका घाबरलों कीं, मला त्या क्षणापासून ' आपण खरोखरीच आंधळे झालों ' असें वाटूं लागलें. वामनराव जोशी, मायदेव व मी रात्रीं सिनेमा पाहण्यास गेलों असतांना मला समोरच्या पडद्यावरचें कांहींहि दिसलें नाहीं.

झालें ! प्रसंग मोठा बाका येऊन ठेपला. गंगूबाईंना तावडतोब परत बोलवावें असें वाटून मी त्यांना सर्व हकीगत कळविली. एखादी घायकुती व भावनेला बळी पडणारी सामान्य स्त्री असती तर तिनें परीक्षेची वाट न पाहतां तावडतोब घरची वाट धरली असती. पण गंगूबाई खरोखरच मोठ्या धीराच्या व विचारी; त्यांनीं त्या वेळीं तेथें टी. डी. चा अभ्यास करीत असलेल्या बाबूराव अत्र्यांना विचारून व नारळकरांना मोठ्या विश्वासांत घेऊन ' अशा परिस्थितींत मी काय करूं ? ' असा सल्ला विचारला. नारळकरांनींहि तात्कालिक फायद्याकडे लक्ष न देतां माझ्या शाश्वत हिताकडे पाहून ' सध्यां न येणेंच बरें, आम्ही आहोंतच ' असें कळविलें. अर्थात् धसक्यामुळेंच मी आंधळा झालों, असें मला वाटत होतें. तो धसका ओसरल्यावर मला पूर्वींसारखें दिसूं लागलें; व गंगूबाई अंगीकृत कार्य पुरें करून योग्य समयीं परत आल्या. या प्रसंगानें नारळकर, गंगूबाई व मी अशा तिघांच्या स्वभावावर प्रकाश पडतो, नाहीं का ?

फ्रोबेल व मॉंटेसरी कोर्स पुरे करून व फॉक्सलीज् येथें गर्लगाईडचें शिक्षण घेऊन त्या १९२८ च्या ऑक्टोबरमध्यें सुमारें दीड वर्षांनीं इंग्लंडहून परत आल्या.

आतां हिंगण्यास संसार थाटावयाचा; पण डोक्यावर कर्जाचा मोठा थोरला बोजा असतांना हिंगण्याच्या तुटपुंज्या पगारावर संतुष्ट राहून कसें निभावणार असा विचार मनांत येऊन गंगूबाईनीं मिळेल ती मोठ्या पगाराची नोकरी पत्करावयाची व कर्ज शक्य तितक्या लवकर फेडावयाचें असें आम्ही ठरविलें.

कांहीं दिवस सुप्रसिद्ध उद्योगपति रामनारायण रुइया यांचे कुटुंबांत त्यांच्या मुलींना शिकविण्याची नोकरी गंगूबाईनीं पत्करली. त्या रुइयांकडे असतांनाच अचानकपणें त्यांचे मेहुणे श्री. बापूसाहेब चिपळूणकर विषम-ज्वरानें वारले ! या प्रसंगानें कर्जफेडीच्या जबाबदारीबरोबरच चिपळूणकर कुटुंबाची जबाबदारीहि गंगूबाईवर येऊन पडली. त्यामुळें रुइयांकडील नोकरी सोडून त्या बडोदें येथील स्त्री–अध्यापन पाठशाळेंत व्हाईस प्रिन्सिपॉलची जागा मिळाली तेथेंच रुजू झाल्या. प्रोबेशनरी पीरियड संपल्यावर त्या तेथेंच कायम झाल्या व आस्ते आस्ते मुख्य प्रिन्सिपॉलच्या जागेवर चढल्या. अशा रीतीनें बडोदें हें त्यांचें कायमचें ठिकाण बनलें व आमच्या एकत्र संसाराची आशा पार मावळली.

बडोद्यास अत्यंत काटकसरीनें राहून गंगूबाईनीं इंग्लंडला जाण्यापायीं झालेलें सर्व कर्ज अवघ्या सहा वर्षांत फेडलें. स्वतःच्या सुखसोयींकडे न पाहतां झालेलें कर्ज शक्य तितक्या लवकर फेडण्याच्या या त्यांच्या तत्परतेवर व दक्षतेवर श्री. बाबासाहेब इतके कांहीं खूष झाले कीं त्या भरांत त्यांनीं व्याजाच्या रकमेंत पूर्ण सूट दिली. गंगूबाईनीं केलेल्या लेखनकार्याबद्दल बरीचशी बक्षिसी दिली, व विशेष म्हणजे त्यांनीं परत केलेली सर्वच्या सर्व रक्कम हिंगण्याच्या संस्थेस दिली. हिचाच विनियोग पुढें हिंगण्याच्या माळावर ‘ इचलकरंजी हॉल ’ बांधण्याचे कामीं करण्यांत आला. खरोखरच गंगूबाईनीं हें फार स्पृहणीय कार्य केलें !

गंगूबाई बडोद्यास १९३० मध्यें गेल्या. तेव्हांपासून १९३५ पर्यंत मी हिंगण्यासच होतों. त्या वर्षीं मला सोलापुरास तेथील ‘ सरस्वती मंदिर ’

हायस्कूलची वाढ करण्याकरितां धाडण्यांत आलें. तेथें चार वर्षें राहून व उद्दिष्ट कार्य करून मी १९३९ मध्यें हिंगण्यास परत आलों व तेथें तीन वर्षें पूर्वीचेंच काम केल्यावर १९४२ मध्यें सेवानिवृत्त झालों. अशा-प्रकारें १९२२ ते १९४२ पर्यंतचें वीस वर्षांचें आमचें जीवन खंडित व विभागलेल्या स्थितींत गेलें व त्याला स्थैर्य व सातत्य फारसें लाधलें नाहीं. अर्थात् बराच काळपर्यंत आम्ही उभयतां कायेनें दूर असलों तरी मनानें एकत्र होतों, व तोच आनंद खरा ! बायरनचा 'प्रिझनर ऑफ् शिलॉन' त्याच गोष्टीमुळें समाधान व आनंद मानीत नव्हता का ? तो म्हणतो—

"Yet together, though apart,
Fettered in hand, but joint at heart."

एकत्र संसार करण्याची आमची इच्छा पुरी होण्याची एक संधि मध्यंतरीं १९३९ सालीं चालून आली होती. त्या वर्षी पुणें येथील कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका श्री. बाळूबाई शेवडे यांनीं प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें ती जागा सोडली. गंगूबाईनीं त्या जागीं एक वर्ष (व जमल्यास पुढेंहि) यावें असा विचार पुढें आला व न्यायमूर्ति पाटकर, लेडी ठाकरसी अशा-सारख्यांची त्याला संमति मिळून गंगूबाईंना बडोद्याहून पुण्याच्या कन्या-शाळेवर पाचारण करण्यांत आलें. त्याप्रमाणें त्या एका वर्षाची रजा काढून बऱ्याचशा कमी पगारावर तेथें येऊन दाखल झाल्या.

पगार कमी तर कमी, पण बापूसाहेबांनीं काढलेल्या शाळेंत काम केल्याचें समाधान लाभावें व जमल्यास सर्वांना एकत्र राहण्याची संधि मिळावी एतदर्थ हा त्यांचा प्रयत्न होता. पण कांहीं कारणानें एका वर्षापेक्षां जास्त राहण्याचें त्यांचें जमलें नाहीं, आणि त्या पुन्हां बडोद्यास आपल्या पूर्वीच्या कामावर रुजू झाल्या.

गंगूबाईंच्या सतत सहवासाचा अभाव एवढी एक बाब सोडली तर माझें हिंगणें येथील जीवन बऱ्याच चांगल्या प्रकारचें गेलें. मनासारखा उद्योग होता; लोकांत मानमान्यता मिळत होती; गुरु० अण्णांचा व इतर सहकाऱ्यांचा लोभ होता; वामनराव, चितळे, फाळके, देव, रा. वि. जोशी, बचुभाई, मोने, फाटक, कवी वगैरेंसारख्यांची प्रेमळ व उत्साहवर्धक संगति होती; श्री. अक्का चिपळूणकरांचें बिऱ्हाड तेथेंच असल्यामुळें व बोर्डिंगवर

मेट्रनहि त्याच असल्यामुळें जेवण-खाण, चहापाणी वगैरेंत कसलीहि कमतरता नव्हती; सईताई, कावेरीबाई वगैरे बॅडमिंटन खेळण्यांत साथ देत होत्या; सखूताई जोग, पार्वतीबाई कुलकर्णी, सीताबाई चिटणीस, इंदिराबाई वैसास, गंगूबाई अनगळ इत्यादींसारख्या—एका काळच्या विद्यार्थिनी व आतां सहकारी शिक्षिका—यांची हुकमी मदत होत होती. सखाराम, अनंता इत्यादि गडीमाणसांचें निष्ठायुक्त साहाय्य मिळत होतें; व विशेष म्हणजे अध्यापिका शाळेंतील सर्व विद्यार्थिनी माझ्यावर मुलीप्रमाणें प्रेम करीत होत्या. थोडक्यांत म्हणजे जीवांनतील सुखसोयींची कसलीच कमतरता नव्हती.

हिंगण्याच्या या वास्तव्यांत माझ्यावर दुःखाचे दोन दारुण प्रसंगहि कोसळले. ते म्हणजे माझे ज्येष्ठ सहकारी व आप्त बापूसाहेब चिपळूणकर, व माझी लाडकी मुलगी इंदू यांचे अकालीं मृत्यु. या दोन दुःखद व शोकगंभीर गोष्टींच्या आठवणी करावयाच्या नाहींत असें मनाशीं कितीहि ठरवलें तरी त्या झाल्यावाचून राहत नाहींत.

'सायंटिफिक बेसिस् ऑफ् वूमेन्स् एज्युकेशन' हें पुस्तक पुरें करण्याच्या व शाळेसंबंधींच्या अन्य कार्यांच्या अविश्रांत श्रमांचा भयंकर ताण पडून बापूसाहेब तापानें आजारी पडले. पण तो ताप त्यांनीं तसाच अंगावर काढल्यामुळें तो सारखा चढत चालला, व ते बेशुद्ध पडले. अर्थातच त्यांना ससून हॉस्पिटलमध्यें नेण्यांत आलें. त्यांचा तो भयंकर ताप, तापांतील ती तगमग व वायू, वायूंतील ती लिहूं घातलेल्या पुस्तकासंबंधींची बडबड, जिवाची होणारी ती उलघाल, नाकांतून घातलेल्या त्या ऑक्सिजनच्या नळ्या, कॉटेभोंवतीं उभें असलेलें डॉक्टरमित्रांचें कोंडाळें, परिचारकांचे चिंतातुर चेहरे, व त्यांची धांवपळ, आप्तेष्टांच्या मुद्रेवरचें नैराश्य, त्यांच्या प्रकृतीसंबंधीं वर्तमानपत्रांतून येणाऱ्या चिंताजनक बातम्या, त्या ऐकून त्यांना भेटावयास येणाऱ्या मित्रांची व विद्यार्थिनींची लागलेली रीघ, त्यांचा तो मोठ्यांदा चालणारा श्वासोच्छ्वास, वर लागलेली भेसूर दृष्टि-अशीं कितीतरी भयंकर दृश्यें वर उसळी मारून डोळ्यांपुढें उभीं राहत आहेत.

आणि १९२९ च्या डिसेंबराची विसावी तारीख उजाडली. बापूसाहेबांचा प्राण जातां जात नव्हता. कोणाची अन् कशाची तरी वाट पाहत आहे असें दिसलें. कॉटच्या एका बाजूस अक्का व एका बाजूस गंगूबाई उभ्या होत्या.

एका क्षणीं गंगूबाईकडे पाहावें, लगेच दुसऱ्या क्षणीं अक्कांकडे पाहावें असें त्यांचें सारखें चाललें होतें. त्यांच्या जिवाची ही घालमेलीची स्थिति पाहून गंगूबाई जरा पुढें झाल्या व त्यांच्या कानांशीं तोंड नेऊन त्या गंभीरपणें म्हणाल्या, "अक्कांची व मुलांची काळजी मी घेईन. तुम्ही सुखानें अन् शांतपणें जा." आणि आश्चर्य असें कीं, तो तळमळणारा आत्मा निमिषा-र्धांत शांत होऊन परमात्म्यांत विलीन झाला! वीस डिसेंबर ही तारीख दर वर्षीं त्यांची पुण्यतिथि म्हणून हिंगण्यास साजरी होते व त्यांनीं काढलेल्या 'भाऊबीज फंडा'ची पर्स गुरु. अण्णांना अर्पण करण्यांत येते.

अशीच गोष्ट इंदूच्याहि मृत्यूची. स्थळ तेंच—ससून हॉस्पिटल, समय-मध्य रात्रीचा. सन १९३१. इन्फंटाईल पॅरॅलिसिसचा झटका आल्यामुळें तिला हिंगण्याहून तेथें आणून दोन-तीन दिवस झाले होते. तिला गंगूबाईचा सारखा ध्यास लागला होता. बडोद्यास त्यांना तार केली होती. पण ती त्यांना उशीरां केली गेली होती. कोणत्याहि स्थितींत पडलें तरी शरीराच्या वेदना कमी होत नव्हत्या. माझें सर्व गणगोत व तिच्या मैत्रिणी यांच्या येरझारा सारख्या सुरु होत्या. पण अजून गंगूबाई मात्र येऊन पोंचल्या नव्हत्या.

शेवटची घटका भरली. डोळ्यावरील दिव्याचा त्रास असह्य होऊं लागला. दिवा तेथून हलविण्यासाठीं मुख्य नर्सला तोंड भरुन विनंति केली. तिनें ती थोड्याशा दुस्स्यानेंच मान्य केली. आगगाडीची शिट्टी इंदूच्या कानांवर पडली. तिनें पुन्हां विचारलें, 'गंगूताई आल्या का?' मी बोललों नाहीं. ती समजली!

शेवटचा क्षण येऊन ठेपला. अजून ती शुद्धीवर असून तोंडानें गंगू-ताईच्या नांवाचा जप चालला होता. अक्का, सखूताई देवधर जरा बाजूला झाल्या. मी, कमलाबाई देशपांडे व सखूबाई जोग पुढें झालों. तिनें एकदां हंसून मान टाकली व डोळे फिरविले! भोंवतालचे 'राम राम' उद्गारले. ती रामचरणीं विलीन झाली!

गंगूबाई दुसरें दिवशीं सकाळीं साडे अकरा वाजतां पुण्यास येऊन पोंचल्या. स्टेशनावरच त्यांना कळावयाचें तें कळलें. त्या तडक टांग्यांतून कशा तरी हिंगण्यास आल्या. घरांत शिरल्या तों फिट येऊन पडल्या! सांचलेलें दुःख गोठलें होतें; फुटतां फुटेना. शेवटीं कसेंतरी बाहेर पडलें म्हणून बचावलें. नाहींतर कठिण प्रसंग आला होता.

@ @ @

## माझें हिंगण्यांतील कार्य : : : १५

प्रो. कर्वे व प्रो. दिवेकर यांनीं मला हिंगण्यास येण्याचें जें पाचारण केलें त्याला कारण त्यांचे कानांवर पडलेला माझा चांगुलपणा व सेवा-भावीपणा हें तर होतेंच, पण शिवाय त्यांच्या संस्थेला–विशेषतः अध्यापिका शाळेला मी पुढें-मागें उपयोगी पडणारा होतों, हेंहि होतें.

एकोणीसशें सोळा सालीं प्रो. कर्वे यांनीं भारत महिला विद्यापीठाची स्थापना केली व त्याच्या एका उद्देशानुसार प्राथमिक शाळांत अध्यापनाचें काम करूं इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींना अध्यापनाचें शिक्षण देण्यासाठीं हिंगण्यास एक अध्यापिका शाळा ( Training College for Women ) काढण्याचेंहि ठरविलें. अशा प्रकारची शाळा १९१७ सालीं काढण्यांत आली, व तिची सर्व जबाबदारी प्रो. गो. म. चिपळूणकर यांजवर सोंपविली गेली. कारण शिक्षणशास्त्राची पदवी मिळविलेले असे ते एकटेच आजन्म सेवक त्या वेळीं होते. पण पुढें त्यांच्याच प्रयत्नांनीं पुण्यांत स्थापन झालेल्या कन्याशाळेचीं सूत्रेंहि त्यांच्याच हातीं आलीं. दोन्ही संस्था एकाच व्यक्तीवर सोंपविणें व्यक्तीच्या सोयीचें व संस्थेच्या हिताचें नसल्यानें गांवांतील कन्याशाळेचें काम चिपळूणकरांकडे गेलें, व हिंगण्याच्या अध्यापिका शाळेचें काम प्रो. मायदेवांकडे आलें.

पण मायदेवांची जरूरी 'महिला पाठशाळा' कॉलेजला अधिक भासूं लागल्यानें अध्यापिका शाळेचें काम कोणाकडे द्यावें अशा विवंचनेंत व विचारांत हिंगण्याची मंडळी असतांना मी त्यांना मिळालों, व त्यांची अडचण भागविली. या जाणीवेनेंच की काय त्यांनीं मला एक वर्षभर इतर आजन्मसेवकांपेक्षां जास्त पगार देण्याचें ठरविलें व मला अध्यापिका-

शाळेचा उपमुख्याध्यापक नेमलें. सुमारें वर्षभर प्रोबेशनर म्हणून काम केल्यावर मी १९२२ मध्यें संस्थेचा अधिकृत आजन्मसेवक बनलों व अध्यापिका शाळेचा रीतसर मुख्याध्यापक झालों.

आयुष्याचीं चाळीस वर्षें मीं जें शिक्षणकार्य केलें त्यापैकीं निम्में एकट्या अध्यापिका शाळेंत केलें असल्यामुळें त्या कामाबद्दल मला विशेष आपुलकी व ममत्व वाटणें स्वाभाविकच आहे. याच कामाचे योगाने माझ्यांतील सर्व सुप्त गुणांचा विकास होऊन जीवनाला पूर्णत्व लाधलें. मला पुढें जी कांहीं थोडीशी प्रतिष्ठा लाभली ती हेंच काम करीत असतांना लाभली. लेखक म्हणून मला जी थोडी मान्यता मिळाली तीहि याच कामाच्या चिंतनानें, अभ्यासानें व येथील प्रो. वा. म. जोशी यांच्या मार्गदर्शनानें मिळाली. आणि म्हणून मला अध्यापिका शाळेप्रीत्यर्थ वेंचलेल्या आयुष्या-बद्दल नेहमींच आनंद व अभिमान वाटतो.

हिंगण्यास मी मुख्यतः दोन विषय शिकवीत असें—मराठी भाषाविषय व शिक्षण आणि अध्यापन–यांपैकीं, मराठी शिकविण्याची मलों सुरुवातीला तरी जरा भीतीच वाटे.–मला तो विषय येत नव्हता, किंवा आवडत नव्हता, किंवा तो विषय मी पूर्वीं कधीं शिकविला नव्हता म्हणून नव्हे, तर मी तो विषय शिकवूं लागण्यापूर्वीं तो प्रो. मायदेव शिकवीत असत म्हणून. विशेषतः काव्य मायदेवांनींच शिकवावें असा त्यांचा लौकिक असे. काव्य नुसतें म्हणूनच—-वाचून नव्हे–ते विशद करीत. गोड आवाज, रसानुकूल चाल, ठेकेबाज व ठसकेबाज म्हणणें, मधून-मधून प्रसंगोपात्त विनोद, तदनुरूप चर्याभिनय इ. गुणांमुळें त्यांचें काव्याध्यापन अत्यंत गुणकारी व प्रभावी होई.

शिवाय ते वृत्तीनें व कृतीनें कवि असल्यामुळें कवीचें हृद्गत त्यांना आपोआपच कळे व तें ते विद्यार्थिनींमध्येंहि सहजगत्या संक्रांत करूं शकत. दलित वर्गांबद्दल–विशेषतः पतित व विधवा स्त्रियांबद्दल–सहानुभूति, बालसुलभ खेळकरपणा, विनोद वृत्ति इ. वैयक्तिक गुणहि त्यांच्या शिकविण्याला उपकारक होत.

अशा स्थितींत त्यांचा विषय शिकविण्यास मी तयार होणें हें मला प्रथम थोडेंसें धाष्टर्याचें वाटे. परंतु सांगायाची गोष्ट अशी कीं, पुष्कळशा

अभ्यासानें व अनुकरणानें मी थोड्याच काळांत बरेंचसें मायदेवांप्रमाणें शिकवूं लागलों. तसेंच पाहिलें तर माझा गळा जात्याच गोड होता; व रसपोषक रीतीनें कसें वाचावें हें मी माझ्या थोरल्या बंधूंपासून शिकलों होतों. कवीशीं समरस होतां आलें म्हणजे त्याच्या काव्यानें घेतलेली चाल ( काव्याला चाल कवि देत नाहीं, तर तें काव्यच आपली चाल घेऊन येतें असें एक श्रेष्ठ कवीच सांगतात. ) आपल्याला आपोआप येते हें मीं जातीनें अनुभवलें होतें. मायदेवांमुळें माझा तो अनुभव दृढ झाला एवढेंच.

माझा काव्याचा तास संपून नंतरचा तास लागला तरी कांहीं काळपर्यंत विद्यार्थिनी तेच सूर गुणगुणत राहत. भ्रमर फुलांभोंवतीं गुं गुं करीत रुंजी घालतो तसे आम्ही सर्वजण मनानें त्या काव्याभोंवतींच घोटाळत असूं. आमच्या मोने मास्तरांचा तास बहुधा माझ्या तासानंतर असे. तें वर्गांत जाऊन शिकवूं लागले तरी विद्यार्थिनी पुष्कळ वेळां काव्यसमाधींतून बाहेर पडून भानावर आलेल्या दिसत नसत. मोने मास्तरांना याचें मोठें कौतुक वाटे व माझा थोडा रागहि येई.

पद्यांत भावनेला महत्त्व, तर गद्यांत विचाराला, विषयाला, आशयाला व शब्दाला महत्त्व. शब्दाचें महत्त्व समजून घ्यावयास मी प्रो. वा. म. जोशी यांजपासून शिकलों. शब्दचसे काय, भाषेसंबंधींच्या इतरहि बऱ्याच गोष्टी मी त्यांच्यापासून उचलल्या. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे मी गद्यहि बऱ्यापैकीं शिकवूं लागलों.

निबंध, व्याकरण इ. भाषांगें सुप्रसिद्ध व्याकरणकार श्री. मोने हे शिकवीत असल्यानें त्या कठिण विषयांतहि विद्यार्थिनी बऱ्याच तरबेज झाल्या होत्या. या सर्वांचा परिणाम असा झाला होता कीं, हिंगण्याच्या अध्यापिका शाळेंतील विद्यार्थिनी दुसऱ्या ट्रेनिंग कॉलेजांतील विद्यार्थिनीं-पेक्षां कांकणभर सरस असतात असें तज्ज्ञ परीक्षक परस्परच म्हणत व अप्रत्यक्षतः माझा व मोने मास्तरांचा गौरव करीत. याचें निदर्शक म्हणजे कित्येक वर्षें ट्रेनिंग कॉलेजच्या सरकारी परीक्षांकरितां आम्ही खाजगी कॉलेजांतले असूनहि मराठीचे परीक्षक नेमले जात असूं.

मी शिकवीत असलेला दुसरा महत्त्वाचा विषय म्हणजे शिक्षणशास्त्र व अध्यापनकला हा होय. हा विषय मीं पूर्वीं अकोला येथील नॉर्मल स्कूलमध्येंहि

शिकवीत असल्यामुळें माझी आधींच थोडी–फार तयारी होती; पण तेवढ्यानें माझें समाधान झालें नाहीं. अध्यापिका शाळेचा मुख्याध्यापक झाल्याबरोबर मीं पहिली गोष्ट केली ती ही कीं, मराठी व शिक्षणशास्त्र या विषयांवरचीं बरींचशीं पुस्तकें वाचनालयांत आणविलीं. त्यामुळें पुस्तकांचीं नुसतीं कपाटेंच वाढलीं असें नसून माझी या विषयांतील गतीहि वाढली. मी हे विषय अकोल्यापेक्षां कितीतरी चांगले शिकवूं लागलों. त्या वेळचीं माझीं टांचणें–टिपणें माझ्या हलगर्जीपणामुळें आतां माझ्यापाशीं नाहींत. तीं असतीं तर माझा मलाच माझ्या तयारीचा अंदाज करतां आला असता. टांचणें–टिपणें नाहींशीं झालीं असलीं तरी माझें 'आमच्या इंदूचें शिक्षण' हें पुस्तक त्या तयारीची ओझरती कल्पना सहज देऊं शकेल.

त्या काळीं शिक्षण–अध्यापन शास्त्रांत माझी तयारी चांगली असे याचा प्रत्यय मला मोठमोठ्या शैक्षणिक व्याख्यानांतून व परिषदांतून बोलण्यास बोलावणीं येत तेव्हां येई. कोल्हापूर संस्थानांतील प्रायमरी ट्रेनिंग कॉलेजांतील विद्यार्थ्यांच्या मेळाव्यापुढें माझें मॉंटेसरी पद्धतीवर भाषण ठेवलें होतें.[1] प्रो. बा. रा. कोल्हटकर हे अध्यक्ष होते. विषयाची तयारी असल्यामुळें व मोठमोठ्या श्रोतृसमुदायापुढें बोलण्याची संवय झाल्यामुळें माझें त्या वेळचें भाषण चांगलेंच रंगलें. इतकें कीं, खुद्द प्रो. कोल्हटकरांनीं–ते स्वतः उत्तमपैकीं वक्ते असूनहि–सभेंतल्या सभेंत माझ्या वक्तृत्वाचें कौतुक केलें. जमलेल्या शिक्षकांनाहि तें अतिशय आवडलेलें दिसलें; कारण त्यांनीं मला मुद्दाम पन्हाळगडावर नेऊन तेथील शिक्षकवर्गापुढेंहि माझें एक व्याख्यान करविलें.

तीच गोष्ट सांगलीस प्रथमच निघालेल्या प्रायमरी ट्रेनिंग कॉलेजमधील माझ्या व्याख्यानाची. कॉलेजचे प्रिन्सिपॉल श्री. रा. स. जोशी व माझे जबलपूरचे प्रोफेसर श्री. गं. गो. कानेटकर यांना माझें भाषण विशेष आवडलें. त्या दोघांना तें पसंत पडलें याचें मला विशेष वाटतें. गुरूचा संतोष हाच विद्यार्थ्यांचा गौरव.

शिकवावयाच्या विषयाची तयारी चांगली असेल तर शिक्षकाला पद्धति, साहित्य इ०सारख्या गोष्टींची फारशी मातब्बरी वाटण्याचें कारण

---

१. हे मुंबई शिक्षण खात्यांतील E. I.च्या जागेवरून नुकतेच निवृत्त झाले आहेत.

नाहीं; पण विषयाच्या बाबतींतच जर का अपुरेपणा असेल तर इतर गोष्टींचा कितीहि मोठा प्रपंच केला असला तरी त्याचा इष्ट तो परिणाम होऊं शकत नाहीं. पाठांच्या परीक्षेच्या प्रसंगीं ही गोष्ट चांगलीच जाणवते. विषयाच्या ज्ञानाचाच मुळांत खडखडाट असल्यास तुम्ही पद्धतीचे पोहरे कितीहि जोरानें आदळा-आपटा ते रिकामेच्या रिकामेच वर येतात. आडांतच नसल्यावर पोहऱ्यांत कोठून येणार ?

'अध्यापनांत महत्त्व कशाला? ज्ञानाला-का तें ज्ञान देण्याच्या पद्धतीला ?' असल्या प्रकारचा वाद शैक्षणिक परिषदांतून व परिसंवादांतून नेहमीं घालण्यांत येतो. वास्तविक, त्याचें उत्तर देणें इतकें कठिण नसावें. मला स्वतःला असें वाटतें कीं, शिक्षक आपल्या विषयांत तरबेज असला, तो शिकवतांना रंगून गेला म्हणजे त्याला इतर अवधानें बाळगण्याचें फारसें कारण उरत नाहीं.

चांगल्या पाठांत कोणते गुण व वाईटांत कोणते दोष संभवतात हें विद्यार्थांना कळण्यासाठीं प्रत्येक पाठाचे शेवटीं थोडा वेळ त्या पाठावर टीका- गुण-दोषदिग्दर्शन-करण्याचा प्रघात असतो. अशी टीका करण्यांत आमच्या विद्यार्थिनी फार वाकबगार झाल्या होत्या. मध्यभागाचे एज्युकेशनल इन्स्पेक्टर श्री. बाबासाहेब पुंडलिक व इतर परीक्षकहि या बाबतींत आमच्या विद्यार्थिनींचें व अप्रत्यक्षपणें आम्हां पाठ-निरीक्षकांचेंहि नेहमीं कौतुक करीत.

शिक्षण-अध्यापन विषयांत आजी विद्यार्थिनींची विशेष प्रगती व्हावी, व माजींच्या तद्विषयक ज्ञानाला उजळा देऊन त्यांना त्यांच्या कार्यांत अधिकाधिक कार्यक्षम करावें या हेतूनें अध्यापिका शाळेतर्फे १९३२ व १९३३ सालीं हिंगणें येथें दोन प्राथमिक शिक्षण-सप्ताह साजरे करण्यांत आले. या दोन्ही सप्ताहांना दूरदूरच्या प्रांतांतील व संस्थानांतील प्राथमिक शिक्षक उपस्थित होते. सदरहु सप्ताहांतील उपयुक्त कार्यक्रमांमुळें आणि त्या वेळच्या समतेच्या, खेळीमेळीच्या व उत्साहाच्या वातावरणामुळें ते सप्ताह इतके यशस्वी झाले व गाजले-गरजले कीं, त्यांच्या गोड आठवणी तेथें आलेल्या कितीतरी शिक्षकांच्या मनांत अद्यापपर्यंत कायम आहेत.

हिंगण्याचे हे सप्ताह पुढें इतके लोकप्रिय झाले कीं खुद्द पुण्यांतील व पुण्याबाहेरील अध्यापन संस्थांनीं त्यांचें अनुकरण केलें. दोन-तीन वर्षांनीं

हिंगण्याचे हे सप्ताह बंद पडले, व या दृष्टीनें ते अल्पायुषी ठरले खरे; तरी त्यांनीं तसल्याच दुसऱ्या सप्ताहांना जन्म देऊन शिक्षणाध्यापनाचें कार्य अखंड तेवत ठेवलें व त्या दृष्टीनें ते चिरंजीव ठरले यांत शंका नाहीं.

शिक्षण–अध्यापन या विषयासंबंधीं सुरुवातीला मीच जबाबदार असलों तरी रा. मोने, रा. जोशी, रा. दामले, व पुढें पुढें विशेषत: श्री. भास्करराव कर्वे या सर्वांची मला विशेष मदत झाली. भास्करराव लीड्सचे M.Ed. होऊन आल्यापासून आमच्या ट्रेनिंग कॉलेजांतील या विषयाचा दर्जा व लौकिक विशेषच वाढला.

मराठी व शिक्षण–अध्यापन ह्या दोन विषयांशिवाय भूगोल, सामान्यज्ञान असलेहि विषय मी मधून-मधून घेत असें. भूगोल शिकविण्यांत आपण आपले सहकारी श्री. मोडक यांसारखे निष्णात व्हावें अशी माझी एक सुप्त आकांक्षा होती. त्या बाबतींत मी मानवी दृष्टीनें भूगोल (Human Geography) कसा शिकवावा याचा बराचसा अभ्यासहि केला होता. मीं यासंबंधीं लिहिलेलीं पांच छोटीं छोटीं पुस्तकें मला व इतरांना फार उपयोगी पडत असत. पण मानवी भूगोलाशिवाय जो प्राकृतिक व शास्त्रीय भूगोल शिकवावा लागतो तो शिकविण्यांत मात्र मला मोडकांइतकें यश कधींच आलें नाहीं हें कबूल केलें पाहिजे. तो भाग शिकविण्याच्या बाबतींत त्यांचा हातखंडा असे. त्यांच्या शिकविण्यावर विद्यार्थिनी फार खूश असत; आणि हें पाहून मला आनंद वाटे व मोडकांचा हेवाहि वाटे.

अध्यापिका शाळेंतील शिक्षकांचा त्या वेळचा सबंध संचच मोठा नांवाजण्यासारखा होता. प्रत्येकजण आपापल्या शिकवण्यांत तर तरबेज होताच; पण त्यांचा आपापल्या विषयाचा व्यासंगहि मोठा असून त्यांवर त्यांनीं कांहीं कांहीं पुस्तकेंहि लिहिलीं होतीं. वामनराव व मायदेव यांचें लेखन तर विश्रुतच होतें. शिवाय मी शिक्षण व भूगोल या विषयांवर, श्री. मोडक यांनीं भूगोलावर, श्री. पतके यांनीं इतिहासावर, श्री. मोने यांनीं व्याकरणावर व श्री. भास्करराव यांनीं अध्यापन-मानसशास्त्रावर बऱ्यापैकीं पुस्तकें लिहिलीं असून हीं सर्व त्या काळांत पाठ्यपुस्तकें म्हणून लागलेलीं होतीं. आपले अध्यापक नुसते शिकवितातच चांगलें असें नसून

ते चांगले लेखकहि आहेत या गोष्टीचा मुलींच्या मनावर विशेष परिणाम होत असल्यास तें योग्यच होतें.

विद्यार्थिनींच्या सामान्यज्ञानांत भर पडावी; त्यांना स्वतःला त्याची आवड उत्पन्न व्हावी म्हणून चालू महत्त्वाची बातमी, सद्‌विचार, सुभाषितें, मार्मिक म्हणी, सामान्यतः चुकणाऱ्या शब्दांचीं शुद्ध रूपें, इत्यादीपैकीं रोज कांहीं ना कांहीं फळ्यावर लिहून तें विद्यार्थिनींच्या जातां–येतां सहज दृष्टीस पडेल अशा रीतीनें ते फळे मांडणें; जरूर तीं पुस्तकें, संदर्भग्रंथ, नकाशे–चित्रें, उपयुक्त मासिकें व वर्तमानपत्रें इत्यादींनीं वाचनालय समृद्ध व सुसज्ज ठेवणें अशांसारख्या गोष्टींचा माझ्या वेळीं नवीनच उपक्रम झाला.

यांतील बहुतेक गोष्टी हल्लीं सर्व चांगल्या शाळांत सर्रास केलेल्या दृष्टीस पडतात. माझे मित्र नारळकर यांनीं तर आपल्या नू. म. विद्यालयाच्या चौकभर असले ज्ञानफलक व भित्तिपत्रकें लावून ठेवलेलीं असत; व ती प्रथा त्यांचे वारस प्रो. दबडघाव अद्यापिहि चालवीत आहेत; आणि म्हणून वरीलसारख्या गोष्टी करण्यांत मी विशेष असें काय केलें असा माझा मलाच प्रश्न पडतो. पण त्यांत विशेष हें कीं, इतरांनीं हें करण्यापूर्वीं बरेच दिवस अगोदर मला तें करावयाचें सुचलें आणि याच जाणिवेनें मी तें सांगत आहें.

'सायंप्रार्थना' ही आमच्या हिंगण्याची एक विशेष बाब होऊन बसली होती. खुद्द गुरु. कर्वे, प्रो. दिवेकर, प्रो. वा. म. जोशी, प्रो. मायदेव, श्री. देव व स्वतः मी असे आलटून–पालटून रोज संध्याकाळीं अर्धा–तासभर गीतामंदिरांत धार्मिक, पौराणिक, ऐतिहासिक, नैतिक, तात्कालिक महत्त्वाच्या–अशा कोणत्या ना कोणत्यातरी विषयावर प्रवचन करीत असूं. हीं प्रवचनें व विशेषतः त्यांच्या सुरुवातीचीं भक्तिगीतें विद्यार्थिनींना इतकीं आवडतीं झालीं होतीं कीं तीं त्यांच्या स्मरणांत कायमचीं राहिलीं आहेत. गीतामंदिरांतील त्या सायंप्रार्थनेसंबंधीं, ती चालू असतांना तेथें उत्पन्न होणाऱ्या पुण्यपावन वातावरणासंबंधीं, व विद्यार्थिनींच्या मनांवर तिनें केलेल्या बहुमोल संस्कारांसंबंधीं मी प्रो. वा. म. जोशी यांच्या चारित्रांत अगोदरच विस्तारानें लिहिलें असल्यानें येथें त्याची पुनरुक्ति करीत नाहीं.

सायंप्रार्थनेनंतर मी विद्यार्थिनींचा दररोज एक तास घेत असें. आठवड्यांतून दोन दिवस–मंगळवार व शुक्रवार–केसरी वाचन, व इतर

दिवशीं इंग्रजीचा अभ्यास—असें त्या तासांत चालें. भावी शिक्षकांना जागतिक दैनंदिन घडामोडींचें सामान्यज्ञान, व इंग्रजीचें चालचलाऊ ज्ञान असल्याशिवाय त्यांच्या शिकविण्यांत जिवंतपणा, व्यावहारिकपणा व अद्ययावतपणा येणार नाहीं अशी माझी धारणा होती. आणि म्हणून मी याहि गोष्टींचा उपक्रम केला. अर्थात् सर्व विद्यार्थिनी वसतिगृहांतच राहत असल्यानें हें शक्य झालें.

विद्यार्थिनींच्या अंगीं सभाधीटपणा व समयसूचकता यावींत याकरितां मी शाळेंतील ज्ञानाभिलाषिणी सभेमार्फत चांगल्या—चांगल्या वक्त्यांना कधीं—कधीं हिंगण्यास बोलावीं व त्यांचीं व्याख्यानें करवीं. या प्रघाताप्रमाणें एकदां आचार्य अत्रे यांना व्याख्यानाकरितां बोलावलें होतें.

'व्याख्यानाला मुली किती ?' म्हणून त्यांनीं पहिला प्रश्न केला. 'फार तर पांच—पन्नास' असें ऐकल्यावर ते आपल्या नेहमींच्या पद्धतीनें हंसले व म्हणाले, 'अहो, मी कालच शनिवारवाड्यापुढें पन्नास हजार लोकांपुढें बोलून आलों, आणि आज पन्नास मुलींपुढें—आणि त्याहि एका विशिष्ट जातीच्या, वर्गाच्या व वयाच्या मुलींपुढें—काय कपाळ बोलूं ?' ते बोलले, थोडा फार रंगहि आला हें खरें; पण त्यांचें म्हणणें बरोबर होतें. व्याख्यानाला बराचसा जमाव असल्याशिवाय वक्त्याचें भाषण रंगत नाहीं. नाटक जसें गर्दींतच रंगतें तसें व्याख्यानहि विविध व विपुल श्रोतृवर्गांतच रंगतें.

अत्र्यांच्या भाषणानें प्रेरित होऊन एका धीट व हुशार विद्यार्थिनीनें त्यांना विचारलें, "तुमचीं भाषणें इतकीं प्रभावी होतात त्याचीं एक-दोन कारणें सांगाल काय ?" मुलीच्या या प्रश्नावर खूष होऊन अत्रे म्हणाले : "मी प्रश्न विचारा असें न सांगतांहि तुम्ही आपण होऊन विचारलांत हें फार चांगलें केलें. हल्लीं कांहीं कांहीं व्याख्याते श्रोत्यांना 'प्रश्न विचारा' असा आग्रह करतात तें मला कृत्रिम प्रकारचें वाटतें. व्याख्यात्याचें व्याख्यानच असें उद्बोधक व विचारप्रवर्तक झालें पाहिजे कीं, श्रोत्यांच्या मनांत आपोआप प्रश्न उभे राहिले पाहिजेत—सूतांचें भाषण चालू असतांना शौनकांच्या मनांत प्रश्न उभे राहत तसे; आणि श्रोत्यांना व्याख्यात्याबद्दल इतका विश्वास व आपलेपणा वाटूं लागला पाहिजे कीं, त्यांना त्याची लज्जा, भय वगैरे वाटतां कामा नये. 'कामातुराणां न भयं न लज्जा' असें म्हणतात ना ? तसें."

[ येथें आम्ही सर्वजण मोठ्यांदा हंसलों, तसे अत्रे म्हणाले, ' काम म्हणजे तो भयंकर संस्कृत काम—मदन—नव्हे. आपलें मराठी गांवटी काम ' ]

ते पुढें म्हणाले, " माझें व्याख्यान मी कधीं लिहून काढीत नाहीं. एखादे प्रसंगीं जेव्हां लिहून काढावें लागतें तेव्हां तें वाचून दाखवीत नाहीं. व्याख्यान वाचून दाखविणें म्हणजे त्याचा मुडदा पाडण्यासारखें आहे. श्रोत्यांच्या जांभयांना अन् झोपेला आवाहन करण्यासारखें आहे. व्याख्यानाची तयारी खूपच करावी, पण तें वाचून दाखवूं नये, तर बोलून दाखवावें. ' दाखवावें ' म्हणजे त्यांत नुसता श्रव्य भागच नसावा तर दृश्यहि असावा.

व्याख्यानाची सुरुवात एखादा वैयक्तिक अनुभव सांगून करावी. मीं नाहीं का मघाशीं—मागें हिंगण्यास आलों होतों त्या वेळची एक आठवण सांगितली ? अशी आठवण नसलीच तर एखादा खुसखुशीत विनोद करावा किंवा कोटी करावी. वक्ता व श्रोते—दोघेहि—एकदां खदखदून हंसले म्हणजे त्यांची मानसिक गट्टी जमते व ते दोघेहि समरस होतात. व्याख्यानाचा शेवट चटकदारपणें करावा. प्रस्तुत विषयाला पूर्णपणें लागूं पडणारें एखाद्या प्रसिद्ध लेखकाचें एखादें लहानसें—सहज लक्षांत राहील असें—वाक्य, किंवा म्हण, किंवा सुभाषित किंवा काव्यपंक्ति—सांगून करावा; म्हणजे तें व्याख्यान श्रोत्यांच्या मनांत बराच वेळ रेंगाळत राहतें.

मी तयारी करतों तेव्हां या सुरुवातीची व अखेरीचीच करतों. सुरुवात चांगली झाली म्हणजे पन्नास टक्के यश आलेंच समजावें. Well begun is half done. ( अरे, हो. तुम्हांला इंग्रजी येत नसेल, नाहीं का ? ) शेवट चांगला झाला म्हणजे तें व्याख्यान व तो व्याख्याता हीं कायमचीं लक्षांत राहतात. तुम्हांला माझी कायमची आठवण राहिली म्हणजे माझ्या या व्याख्यानाचा शेवट चांगला झाला असें मानावयाचें." इतकें सांगून अत्र्यांनीं आपलें भाषण संपविलें. अत्र्यांच्या व्याख्यानाचा इतका विस्तार केला तो त्यांत वक्तृत्वासंबंधींच्या बऱ्याच उपयुक्त गोष्टी ओघानें आल्या आहेत म्हणून केला.

देवादिकांचे उत्सव व जन्मतिथि, विभूतींच्या पुण्यतिथि इ. निमित्तानें निरनिराळ्या नामवंत व्यक्तींना हिंगण्यास आणण्यांत येई. अर्थात् त्यांचा

वैयक्तिक परिचय व त्यांचीं व्याख्यानें–प्रवचनें यांचाहि लाभ मुलींना मधून मधून होई.

हिंगण्याच्या विद्यार्थिनींना आसपासच्या व दूरदूरच्या सहलींना जाण्याचे योगहि मी घडवून आणीत असें. हल्लीं सर्वच शाळा सहली काढतात, व आम्ही काढीत असूं त्यापेक्षां कितीतरी जास्त व लांबलांबच्या काढतात. पण त्या वेळच्या आमच्या सहली व आतांच्या सहली यांत मोठें अंतर आहे असें वाटतें. आमच्या दूरदूरच्या सहली बहुतेक करून व शक्य तों पायीं, स्वावलंबनाच्या तत्त्वावर व अत्यंत कमी खर्चांत केलेल्या असत. भाटघर, बनेश्वर, सिंहगड, लोणावळा, खंडाळा, कार्ला अशांसारख्या स्थळीं आम्ही पायानें व कच्ची शिदोरी पाठीशीं बांधून जात असूं. तेथील झाडलोट, सडा–संमार्जनें, स्वयंपाकपाणी इत्यादि सर्व कामें विद्यार्थिनी स्वतः करीत. हिंडणें–फिरणें झाल्यावर त्या एखाद्या सार्वजनिक जागीं किंवा देवळांतून भजनें, गाणीं वगैरे गात, व अशा रीतीनें नकळत स्थानिक लोकांशीं सामुदायिक संगठन ( मास कॉंटॅक्ट ) घडवून आणीत.

बौद्धिक, नैतिक, व्यावहारिक व सांस्कृतिक शिक्षणाबरोबरच शारीरिक शिक्षणाचीहि योग्य तरतूद करण्यांत येई. पुणें महाराष्ट्रीय मंडळाचे श्री. दामले व सोमण, बॉयस्काऊट व गर्लगाईड संस्थांचे संचालक डॉ. आबासाहेब नातू अशांसारख्या तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानें व सहकार्यानें हिंगण्यास दरवर्षी नाताळांत शारीरिक–शिक्षणसप्ताह भरविण्यांत येत, व पुण्यांत मोठ्या सुट्ट्यांत भरणाऱ्या त्यांच्या वर्गांना विद्यार्थिनी पाठविण्यांत येत.

या सर्व गोष्टी घडवून आणण्यांत मी बराच पुढाकार घेतला. मुख्याध्यापक म्हणून तो तसा घ्यावयास पाहिजेच होता, आणि म्हणून मला त्याचें विशेष वाटावयास नको, हें जरी खरें असलें तरी विद्यार्थिनींच्या हिताच्या या सर्व गोष्टी करण्याची सद्बुद्धि मला झाली व त्याकरतां करावी लागणारी सर्व खटपट माझ्याकडून झाली, यांतच मला धन्यता वाटल्यास व त्या धन्यतेच्या भरांत एखाद्या पढतमूर्खासारखा स्वतःच स्वतःची स्तुति करण्यास मी प्रवृत्त झालों असल्यास तें क्षम्य नाहीं का ?

मी प्रिन्सिपॉल असतांना आणखी एक गोष्ट आवर्जून करीं. बाब दिसायला अत्यंत साधी, पण अंतीं फार फलदायी ठरे. संस्था पाहण्यास

अनुक्रम



क्रमांक ............ नों: द्रिः ............

आलेल्या लोकांना ती तात्रडतोब व आस्थेनें दाखविण्यावर माझा मोठा कटाक्ष असे. पाहणाऱ्या व्यक्तीच्या मनाचा कल ओळखून त्या अनुरोधानें संस्थेंतील गोष्टी खुलवून–फुलवून दाखविणें ही एक कला असून ती मला बरीचशी साध्य झाली होती असें माझे मित्र म्हणत. संस्था दाखविणाराची आस्था व त्याची अगत्यशीलता ही संस्थेची एक उत्कृष्ट जाहिरात असून तिचा फायदा झाल्यावांचून राहत नाहीं. उन्हाचे वेळीं कोणी संस्था पाहण्यास आलें तर त्याला गूळ–पाणी देण्याची चाल मी बोर्डिंग सुपरिंटेंडेंटच्या सहकारितेनें सुरू केली होती.

संस्थेकरितां वर्गणी मागतांनाहि माझें हेंच धोरण असे. देणाराला प्रसन्न ठेवूनच घेणारानें काय घ्यावयाचें तें घ्यावें. त्याला सतावून व आग्रह करून एखादे वेळीं कदाचित् जास्त मिळूं शकेल, पण त्याची सहानुभूति मात्र कायमची नाहींशी होईल. पण यासंबंधींहि मी वा. म. जोशी यांच्या चारित्रांत अगोदरच पुष्कळ लिहिलें असल्यानें येथें त्याची पुनरुक्ति करीत नाहीं.

हिंगण्यास असतांना माझा जो एक विशेष फायदा झाला तो दुसरीकडे असतांना मुळींच झाला नसता. आणि त्या दृष्टीनें मी स्वतःला मोठा भाग्यवान् समजतों. किती तरी थोर थोर व्यक्ती प्रो. कर्वे यांच्या संस्थेला भेट देण्यासाठीं म्हणून हिंगण्यास येत; व त्या तशा आल्या म्हणजे त्यांचा आदरसत्कार करणें, त्यांना संस्था दाखविणें, मुलींना त्यांचें दर्शन घडविणें, त्यांचे तोंडून चार शब्द ऐकविणें इ. पुढाकाराचीं कामें–वा. म. जोशी नसतील तेव्हां–मला करावीं लागत. महात्मा गांधी, रवींद्रनाथ टागोर, पंडित मदनमोहन मालवीय, लाला लजपतराय अशांसारख्या महानुभावांना–ज्यांचीं दर्शनें महत्पुण्याईनें एखादे वेळींच घडावयाचीं अशांना–जवळून पाहण्याचा, त्यांच्याशीं समक्ष बोलण्याचा, व त्यांचीं भाषणें प्रत्यक्ष ऐकण्याचा योग मला स्वतःला आला, व माझ्या विद्यार्थिनींनाहि आला.

तसेंच महाराष्ट्रांतील नामांकित साहित्यिक, कवी, नट, गायक इत्यादींच्या भेटीहि घडवून आणून त्यांच्या साहित्याचा व कलाकृतींचा आस्वाद घेण्याची संधि माझ्या मध्यस्थीनें मुलींस मिळे. अर्थात् ही मंडळी हिंगण्यास येत ती विशेषतः वामनरावांच्या भेटीसाठीं येत. कोणत्याहि कारणानें का येईनात–तीं आलीं म्हणजे त्यांचा लाभ सर्व हिंगणेंवासियांना होई यांत

शंका नाहीं. अशा भेटींचा उपयोग शिक्षणाच्या दृष्टीनें किती मोठा असतो हें सांगावयास नकोच.

अध्यापिका शाळेच्या विद्यार्थिनींचा बौद्धिक, शारीरिक, नैतिक, व्यावहारिक व सांस्कृतिक दर्जा वाढविण्याबरोबरच माझ्या हातून एक महत्त्वाची कामगिरी झाली व ती म्हणजे त्यांचा सामाजिक दर्जा वाढविणें ही होय.

हिंगण्याची अध्यापिका शाळा भारत-महिला विद्यापीठाला जोडलेली होती, आणि विद्यापीठाला सरकारी मान्यता नसल्यानें अध्यापिका शाळेलाहि ती नव्हती. त्यामुळें तिच्यांतून पास होऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थिनींना प्राथमिक शाळांतून शिक्षकाची नोकरी मिळण्यास पंचाईत पडे, व मिळालीच तर सरकारमान्य ट्रेनिंग कॉलेजांमधील विद्यार्थिनींपेक्षां त्यांना पगार कमी मिळत असे.

सुरुवाती सुरुवातीच्या विद्यार्थिनींमध्यें ध्येयवाद जरा जास्त प्रमाणांत असल्यानें त्यांनीं या कमीपणाबद्दल फारशी फिकीर केली नाहीं. आपण आपलें काम उत्तम प्रकारें केलें म्हणजे त्याचें फळ मिळतेंच आणि नाहीं मिळालें तरी कर्तव्य केल्याचा आनंद तर कोणीं हिरावून घेत नाहींना, अशा भावनेनें त्या काम करीत असत. पण अशा भावनेनें त्यांनीं नेहमींच काम करीत राहावें अशी अपेक्षा नेहमींच कशी करायची ?

सरकारी मान्यता जर आवश्यक असेलच तर ती मिळवून विद्यार्थिनींचें होणारें नुकसान थांबविलें पाहिजेच, आणि तें थांबवावयाचें तर त्यासंबंधींचा पुढाकार संस्थेनेंच घेतला पाहिजे. अशा जाणिवेनें हिंगण्याची संस्था कामाला लागली. हें घडवून आणावयाचें तर आपल्या ध्येयवादाला व तात्त्विकतेला थोडीशी मुरड घालून सरकारशीं जुळतें-मिळतें घेतलें पाहिजे. हें तडजोडीचें तत्त्व हिंगण्याच्या व्यवस्थापक मंडळीला पटून ही कामगिरी माझ्याकडे—मी ट्रेनिंग कॉलेजचा प्रिन्सिपल म्हणून—व प्रो. ना. म. आठवले यांजकडे—ते एक ज्येष्ठ सहकारी म्हणून —सोंपविली. (अर्थात् गुरु. अण्णाहि होतेच ) सुदैवानें भारत-महिला विद्यापीठाचे कुलगुरु सर चुनिलाल मेहता हेच या काळीं शिक्षणमंत्रि होते. त्यांना ही गोष्ट पटून त्यांनीं आपल्या आस्थापूर्वक मध्यस्थीनें व कुशल कर्तृत्वानें शिक्षण खात्याचे मुख्य अधिकारी मि. लॉरी व मि. ग्रीव्ह यांचीहि समजूत घातली व एक—

दोन किरकोळ अटींवर सरकारांतून अध्यापिका शाळेला पूर्ण मान्यता मिळवून दिली; आणि त्याबाबत १९३० सालीं एक जी. आर. हि प्रसिद्ध करविला.

हा जी. आर. प्रसिद्ध झाल्या वेळेपासून अध्यापिका शाळेच्या कामांत व तिच्या दर्जांत सरकारी मान्यतेच्या दृष्टीनेंहि कांहीं कमतरता राहिली नाहीं, व तिच्यांतून पास होणाऱ्या शिक्षिकांना इतर सरकारमान्य संस्थांतून पास होणाऱ्या शिक्षिकांपेक्षां पगार, बढती वगैरे कोणत्याहि बाबतींत कमी लेखण्यांत येणार नाहीं अशा अर्थाचीच ही घोषणा असल्यामुळें तेव्हांपासून लोकांचे—विशेषतः विद्यार्थिनींचे—मनांत वसत असलेली एक न्यूनभावना कायमची नाहींशी झाली.

अशा प्रकारें मिळालेली सरकारमान्यता ही अध्यापिका शाळेच्या इतिहासांतील अत्यंत महत्त्वाची घटना असून ती घडवून आणण्यांत माझे सहकारी व मी यांचा समजूतदारपणा, तडजोडीचें धोरण, सर्वांची सहानुभूति मिळविण्याला लागणारा गोडवा स्वभाव, स्वतःच्या ध्येयवादाच्या बडेजावापेक्षां विद्यार्थिनींच्या शाश्वत हिताची काळजी घेणें इत्यादि गुणांचा बराच उपयोग झाला. ही हितकर गोष्ट घडवून आणण्यांत माझें कर्तृत्व व कौशल्य दिसून येऊन मला सर्वांकडून–विशेषतः माझ्या विद्यार्थिनींकडून—धन्यवाद मिळाले. मला स्वतःलाहि धन्यता वाटते.

हें सर्व सांगत असतांना 'मी केलें,' 'माझ्यामुळें झालें' असले अहंकार-वाचक व आत्मप्रौढीदर्शक शब्दप्रयोग कांहीं ठिकाणीं झाले आहेत. पण खरें सांगूं का–यांत अहंकार किंवा आत्मप्रौढी बिलकूलच नाहीं. ज्या कांहीं बऱ्या गोष्टी घडल्या त्या वस्तुतः संस्थेकडूनच घडल्या. पण 'संस्था' ही एक अमूर्त व केवळ भाववाचक कल्पना असल्यानें त्या करण्याला एखादी व्यक्ति कारण व्हावी लागते; आणि या बाबतींत मी तें कारण झालों एवढेंच.

# माझ्या वेळची आजन्म सेवक मंडळी : : : १६

हिंगण्यांतील माझ्या कार्यासंबंधीं लिहून झाल्यावर ज्यांच्या सहानुभूतीनें अन् सहकारितेनें मी तें सर्व करूं शकलों त्या माझ्या सहकारी बंधु-भगिनींसंबंधीं थोडें तरी लिहिणें माझें कर्तव्यच आहे. हिंगण्याच्या अनाथ बालिकाश्रम संस्थेंत आतांपर्यंत चाळीसांवर आजन्म सेवक-सेविकांनीं काम केलें आहे. पण मी असतांनाच्या काळांत ( १९२१ ते १९४२ ) माझा साक्षात् असा संबंध दहा-बारा सेवकांशींच आला. कांहीं मी संस्थेंत जाण्यापूर्वींच संस्थेंतून निवृत्त झाले होते. कांहींजण मी असतां वेळींच कार्य करीत होते, पण त्यांचें कार्यक्षेत्र व वास्तव्य हिंगण्याबाहेर असल्यानें त्यांचा-माझा संबंध फारसा आला नाहीं, आणि कांहींतर मी निवृत्त झाल्यावर संस्थेस येऊन मिळाले.

महाराष्ट्रांतील एक ज्येष्ठ व श्रेष्ठ शिक्षण-संस्था—जी डेक्कन एज्युकेशन सोसायटी—तिच्या घटनेप्रमाणेंच आमच्या संस्थेची घटना बनविलेली असल्यामुळें ती एकंदरींत पुष्कळच चांगली झाली आहे. प्रो. कर्वे हेच तिचे संस्थापक व प्रवर्तक असल्यानें त्यांच्या व त्यांच्या खास अशा थोड्या व्यक्तींच्या मताला व शब्दाला कधीं कधीं थोडेसें जास्त महत्त्व दिलें जात असलें तर तें योग्य व स्वाभाविकच आहे. एरवीं संस्था लोकांनीं निवडून दिलेल्या प्रतिनिधींनीं घालून दिलेल्या धोरणानुसार व त्यांनीं केलेल्या नियमांनुसार चाललेली असून सर्वतोपरी लोकमतानुवर्ती आहे असें म्हणतां येईल.

संस्थेच्या आजन्म सेवक-सेविकांची संख्या माझे वेळीं तरी फार थोडी असल्यामुळें, व सर्वजण समान ध्येयानें प्रेरित होऊन आलेले असल्यामुळें

त्यांच्यांतील एकोपा नांवाजण्यासारखा होता. वैमनस्याचे – भांडण्याचे– फाटाफुटीचे प्रसंग अगदींच आले नाहींत असें नाहीं. पण संस्थेच्या साठ वर्षांच्या अस्तित्वांत ते फारच थोडे होते असें म्हटलें पाहिजे. संस्थेचा आर्थिक व्यवहार स्वतः कर्वे हेच पाहत असल्यामुळें व पैशाचा विनियोग त्यांच्याच तंत्रानें चालत असल्यामुळें जनता त्या बाबतींत पूर्णपणें निःशंक व निश्चित असे. सर्वांचा पगार सारखा व कामहि समान दर्जाचें असल्यानें सर्व आजन्म सेवकांमध्यें समानतेचें नातें नांदत होतें. थोडक्यांत म्हणजे आमची अनाथ बालिकाश्रमाची मंडळी महाराष्ट्रांतील एक आदर्श संस्था गणली जाई व अद्यापहि तशीच गणली जात आहे.

संस्थेचे मूळ संस्थापक प्रो. धों. के. कर्वे यांचेसंबंधीं लिहावयासच नको. त्यांचें सामाजिक व शैक्षणिक कार्य आणि ध्येयासक्ति, कार्यतत्परता, परिश्रमशीलता, निर्लोभता, साधी स्वतंत्र वृत्ति, चिकाटी इ० वैयक्तिक गुण – हीं इतकीं विश्रुत आहेत कीं, त्यांचेसंबंधीं नव्यानें कांहीं सांगणें शक्य नाहीं व आवश्यकहि नाहीं. पारतंत्र्याच्या काळांत या त्यांच्या कार्याचें व गुणांचें योग्य तें चीज झालें नसलें तरी सध्यांच्या स्वतंत्र राजवटींत तें न्याय्य प्रमाणांत झालें आहे असें म्हटलें पाहिजे. भारताचे राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद, भारताचे पंतप्रधान पं. जवाहरलालजी, अशांसारख्या सर्वश्रेष्ठ व्यक्तींकडून त्यांचे योग्य ते मानसन्मान व सत्कार करण्यांत आले. त्यांना अत्यंत मानाचीं पदकें व 'भारतरत्न'सारख्या अत्युच्च पदव्या अर्पण करण्यांत आल्या व त्यांच्या कार्याचा मोठमोठ्या देणग्यांच्या रूपानें पुरस्कार करण्यांत आला.

निसर्गाचाहि त्यांचेवर पूर्ण वरदहस्त आहे. 'शतायुर्वै पुरुषः' हें वेदवचन त्यांचे बाबतींत पूर्णपणें सार्थ झालें आहे. शंभर वर्षांच्या प्रदीर्घ काळांत मोठीं दुखणीं अशीं दोन-तीनच आलीं व आलीं तशीं गेलीं. परवांचीच गोष्ट घ्याना. त्यांचें मूत्राशयाचें ऑपरेशन करून डॉक्टर मंडळी ऑपरेशन थिएटरबाहेर आलीं. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद नुसता ओसंडत होता. 'किती शुद्ध रक्त ! किती सोशिकपणा ! किती निकोप शरीर ! एक वेळ वाळेल, सुकेल, पण कुजणार नाहीं' अशा अर्थाचे उद्‌गार त्यांच्या तोंडून बाहेर पडत होते. शरीराप्रमाणें मनहि शुद्ध, निकोप व निष्पाप. कोणाशीं भांडण नाहीं, कोणावर राग नाहीं. अंगीकृत कार्याशिवाय दुसरा विचार नाहीं, संस्थेशिवाय दुसरी चिंता नाहीं.

नाहीं म्हणावयास बरोबरीनें काम करणाऱ्यांकडे पाहण्याच्या दृष्टींत मात्र कधीं कधीं डावें-उजवें होई. पण तेंहि स्वाभाविकच नाहीं काय? विशेष जवळच्या व कर्तृत्वाच्या व्यक्तींकडे मन जरा जास्त ओढलें जाणें हें मानवी स्वभावाला धरूनच आहे. सर्वांवर सारखेंच प्रेम करणें कोणाहि व्यक्तीला शक्य नाहीं–मग ती कितीका लोकोत्तर असेना! मनांत थोडासा स्वार्थहि वावरे; पण त्याचा वापर संस्थेच्या कल्याणाकरितांच होई.

स्वत: माझ्यावर त्यांचा लोभ होता, पण माझ्याशीं आलेला त्यांचा संबंध जवळून न आल्यामुळें आम्ही मनानें फारसे जवळ येऊं शकलों नाहीं. कांहींजण मला विचारतात, "काय हो, तुम्ही अण्णांच्या सान्निध्यांत वीस वर्षें होतांत. अण्णांचा तुमच्यावर विशेष लोभ असेल नाहीं? तुम्हांला त्यांच्यासंबंधींच्या पुष्कळशा खास गोष्टी माहीत असतील, नाहीं?" या त्यांच्या प्रश्नाचें उत्तर काय द्यावें हें मला कळत नाहीं. अगोदर ते हिंगण्यास फारसे कधीं येत नसत. आले तरी आपल्या नातेवाईकांकडे जाऊन थोडा वेळ बसतील, चहा घेतील, व परत जातील.

सहकाऱ्याकडे जाऊन, संस्थेच्या हिताच्या गोष्टी करून, किंवा पुढचे कांहीं बेत किंवा योजना आंखून त्या त्याला सांगतील किंवा त्याला आपुलकीनें आपल्यांत घेतील असें फारसें होत नसे—निदान माझ्या बाबतींत तरी तसें झालें नाहीं. मी एक सामान्य माणूस म्हणून त्यांचा माझ्यावर विशेष विश्वास नसल्यास तें एका प्रकारें योग्यच होतें. पण वा. म. जोशी, कमळाबाई देशपांडे हीं माणसें तर माझ्यापेक्षां जास्त मातबर व संस्थेच्या दृष्टीनें जास्त महत्त्वाचीं ना? पण त्यांच्याशींहि वागण्याची अण्णांची तऱ्हा तीच दिसे.

संस्थेच्या हिताला बाध येतो आहे असें दिसल्यास अगदीं जवळच्यालाहि तट्दिशीं तोडून टाकण्याइतका कठोरपणा त्यांच्या वृत्तींत कधीं कधीं दिसे. असल्या गोष्टी सोडल्या तर ते 'महर्षि' पदवीला पूर्णपणें योग्य असून त्यांच्याच पुण्याईनें संस्थेचा इतका उत्कर्ष होत आहे.

श्री. पार्वतीबाई आठवले:–यांनाच आम्ही कृष्णाताई असे म्हणत असूं. त्या मनानें मोकळ्या, जिभेनें तिखट पण भडभड्या, व वृत्तीनें थट्टेखोर असून त्यांच्याशीं बोलण्यांत व विनोद करण्यांत मला आनंद वाटे. त्यांच्या शेवटच्या

दुखण्यांत मी त्यांना भेटावयास गेलों असतांना त्या म्हणाल्या, "कांहीं कांहीं माणसं भेटायला यायला नकोशीं वाटतात. तुम्ही आलांत म्हणजे मात्र बरं वाटतं."

अमेरिकेसारख्या दूरच्या देशांत एकाकी जाऊन, तेथें हालअपेष्टा सोसून, जें कांहीं शिक्षण घेतां आलें तें घेऊन, व संस्थेला बरीचशी आर्थिक मदत मिळवून त्या सुखरूप परत आल्या हें त्यांचें कर्तृत्व त्या काळीं तरी असामान्यच म्हटलें पाहिजे. हिंगण्याची 'पार्वतीबाई अध्यापिका शाळा' हें तर त्यांचें कायमचें स्मारक आहेच, पण माझ्यासारख्यांना हिंगण्याची हिरवी व्हॅन् मोटार त्यांची जितकी आठवण करून देते तितकी तें स्मारक करून देत नाहीं. कारण ती पार्वतीबाईंनीं मिळविली होती. 'माझी कहाणी' हें त्यांचें छोटें पण सुंदर पुस्तक त्यांचें आणखी एक स्मारकच नव्हे काय ?

श्री. महादेव केशव ऊर्फ तात्या गाडगीळ आणि त्यांच्या पत्नी पार्वतीबाई ऊर्फ काकू :– हीं दोघें अण्णांच्या अगदीं पहिल्या सहकाऱ्यांपैकीं होतीं. या उभयतांची व माझी लहानपणापासून ओळख असून आमचें लांबचें नातेंहि होतें. तात्या हे बडोदें संस्थानांत एक मोठे अधिकारी व बडे पगारदार असूनहि त्यांनीं तेथील नोकरी सोडून ते १९११ सालीं प्रो. कर्वे यांस सपत्नीक येऊन मिळाले. ते कांहीं दिवस पगार वगैरे कांहीं घेत नसत; उलट त्यांनीं स्वतःचीच एक मोठी रक्कम ( रु. दहा हजार ) संस्थेला देऊन टाकली. सुमारें दहा वर्षें संस्थेची सेवा करून ते कांहीं मतभेदामुळें संस्था सोडून गेले. मी संस्थेंत आलों त्याला एक कारण तात्यांनीं दिलेली भर हें होय. हें दांपत्य मोठ्या गोड स्वभावाचें असून त्यांना विद्यार्थिनींचा फार लळा असे.

श्री. सीताबाई जोशी ( वनारसे ) ऊर्फ मावशी:—फारसें कांहीं शिक्षण नसतांनाहि संस्थेच्या कार्याला अत्यंत उपयुक्त ठरलेल्या अशा ज्या थोड्या आजन्म सेविका अण्णांच्या संस्थेला लाभल्या त्यांपैकीं सीताबाई या एक होत. संस्थेची वसतिगृह–विषयक बाजू पार्वतीबाई गाडगिळांप्रमाणेंच त्यांनीं उत्तम प्रकारें संभाळली. शिवणशिक्षिका म्हणूनहि त्या काम करीत. हुशारी, कामसूपणा, गोडवा स्वभाव इ. गुणांचे जोरावर त्या सर्व लहानथोरांना सारख्याच प्रिय झाल्या होत्या.

साहित्याचार्य डॉक्टर हरि रामचंद्र ऊर्फ दादा दिवेकरः—संस्थेचा दर्जा उंचावण्यांत व लौकिक वाढविण्यांत ज्या थोड्या व्यक्ती कारणीभूत झाल्या त्यांत दिवेकरांना अग्रस्थान देणें योग्य होईल. पौर्वात्य व पाश्चात्य विद्यांत ते सारखेच पारंगत होते हें साहित्याचार्य व डॉक्टर या त्यांच्या पदव्यांवरून सहजच दिसून येतें. ते विद्वान्, हरहुन्नरी, कर्तृत्ववान् व ध्येयवादी होते. पण या त्यांच्या गुणांचा फायदा संस्थेला पूर्णांशानें मिळण्याचा योग नव्हता. कारण एका दुर्दैवी घटनेमुळें त्यांना थोड्याच दिवसांत संस्था सोडून जावें लागलें. तथापि संस्थेवरील त्यांचा लोभ व अण्णांवरील त्यांची निष्ठा ही पूर्वींइतकीच उत्कट व अचल आहेत.

कालमानाप्रमाणें स्वतःच्या ध्येयांत व आचरणांत बदल करण्यास लागणारा लवचिकपणा व कुशलता दादांचे ठिकाणीं असून हल्लीं त्यांनीं पूज्य विनोबाजींचें तत्त्वज्ञान व मतप्रणाली स्वीकारलीं आहेत, व शक्यतों ते तीं आचरीत आहेत. त्यांच्यामध्यें असामान्य व्यक्तींबरोबर उंच चढण्याचा जसा गुण आहे; तसाच सामान्य व्यक्तींबरोबर खालीं उतरण्याचा मोठेपणाहि आहे; आणि म्हणूनच ते सर्वांना सारखेच आपलेसे वाटतात. एरवीं त्यांनीं माझ्यासारख्याला इतकं जवळ कां केलें असतें? कमळाबाई व गंगूबाई या दोघी मैत्रिणींच्या जीवनावर त्यांचा फार मोठा परिणाम झाला आहे.

प्रा. नारायण महादेव ऊर्फ ‘नाना’ आठवलेः— लहानपणच्या परिस्थितीवरून जर कोणीं नानांचें भविष्य वर्तविलें असतें तर तें आतां-इतकें उज्ज्वल खास दिसलें नसतें. एका गरीब विधवेचा मुलगा, तिला दैवयोगानें कर्व्यांसारख्या विभूतीचा सहवास लाभतो, आणि म्हणून नानाहि कर्व्यांच्या सहवासांत येतात; त्यांच्याच संस्थेंत काम करूं लागतात; ‘निष्काम कर्म-मठ’ मंडळांत समाविष्ट होऊन, गरिबींत आयुष्य काढण्याचें ठरवितात; एम्. ए. होऊन महिला—पाठशाळेंत शास्त्रीय विषय शिकवूं लागतात; अगदीं पहिल्यांपैकीं आजन्मसेवक म्हणून महिला विद्यापीठानें सुरू केलेल्या एका लहानशा कॉलेजाचे प्राध्यापक व प्राचार्य बनतात; मधून मधून संस्थेच्या कल्याणाकरितां तिच्या विरोधकांशीं अटीतटीचा सामना देतात; नोकरीची मुदत संपल्यावर सेवानिवृत्त होतात, व शास्त्रीय उपकरणांचा एक कारखाना काढून व शेजारींच एक घर बांधून सुप्रतिष्ठित होतात.

या सामग्रीवरून नानांच्या आतांच्या उज्ज्वल व उदात्त वर्तमानाचें भविष्य वर्तवितां येणार नाहीं. आम्हां चार-चौघां आजन्म सेवकांप्रमाणेंच ते एक पांचवे समजले गेले असते. फार तर आमच्यापेक्षां जरा जास्त कर्तृत्ववान, जास्त उद्योगी, व जास्त पैसेवाले असे मानले गेले असते. नानांनीं सतत पन्नास वर्षें उद्योग करणें; प्रतिकूल परिस्थितीशीं निकरानें झगडून तिला अनुकूल करून घेणें, कौटुंबिक व सामाजिक बाबतींत लोकापवाद शांतपणें सहन करणें; पैसा-गडगंज पैसा—केवळ कष्टावर कमावणें; चढत्या आर्थिक स्थितीबरोबर येणाऱ्या सुखसोयींचा विरक्तपणें योग्य तो आस्वाद घेणें इत्यादि गोष्टींत मला त्यांच्या श्रेष्ठत्वाची चाहूल लागते, व शेवटीं त्याचें संपूर्ण दर्शन जेथें त्यांनीं निष्काम कर्माची दीक्षा घेतली त्या संस्थेला त्यांनीं दिलेल्या एक लाखाच्या देणगींत होतें. नानांनीं मिळविलें असामान्यपणें आणि देऊन टाकलें तेंहि असामान्यपणेंच. आणि म्हणून माझ्यासारख्यांना त्यांचें विशेष कौतुक वाटतें.

प्रो. गोपाळ महादेव ऊर्फ बापूसाहेब चिपळूणकर :—माझा व गंगूबाईंचा विवाह जुळवून आणण्यांत बापूसाहेबांनीं आपल्या पत्नीस साथ दिली व गंगूबाईंसारखी पत्नी मला प्राप्त करून दिली हें त्यांनीं माझें फार मोठें कल्याण केलें. सततोद्योगीपणाचा पाठ त्यांनींच मला दिला. त्यांची कार्यैकतत्परता कौतुकास्पद होती. कुकरचा प्रयोग करणें, शाळा काढणें, शाळेसाठीं मुली जमविणें, शिक्षण विषयावर पुस्तक लिहिणें—कार्य कोणतेंहि असो—तें करीत असतांना बापूसाहेब इतके दंग होत कीं, लोक त्यांना वेड्यांत काढीत. पण लोकांच्या निंदण्याची त्यांना पर्वा नव्हती. पुस्तक पूर्ण करतांना 'देह जावो अथवा राहो ' अशा निष्ठेनें व निश्चयानें ते रात्रंदिवस खपत होते. इतके कीं त्यांत त्यांचा देह खरोखरचाच गेला. कीर्ति मात्र कायमची राहिली.

अंगीकृत कार्याच्या सिध्यर्थ ते वाटेल तें काम व पडतील तितके कष्ट करावयास तयार असत, हें पुण्यांतील कन्याशाळा काढतांना त्यांनीं जीं व ज्या प्रकारचीं कामें केलीं त्यावरून निदर्शनास आलें. मुली आणि मास्तर मिळविण्यापासून तो थेट शाळेला स्वतःची जमीन व मालकीची इमारत मिळविण्यापर्यंत बापूसाहेबांनीं अपरंपार कष्ट केले. तीच गोष्ट पहिल्यांदा

अमेरिकेला जाण्याची, आणि शेवटीं पुस्तक लिहिण्याची. त्यांचा सबंध जीवनपट ध्येयवादित्व व प्रयत्नशीलता यांनीं विणलेला होता. आपल्या कन्याशाळेंत दहाव्या हजार विद्यार्थिनी झाल्याचें व आपला भाऊबीज-निधि दोन हजार रुपयांपासून दोन लाखावर गेल्याचें पाहण्यास बापूसाहेब हवे होते.

प्रो. वा. गो. मायदेव व श्री. वि. अ. मोडक :—हे दोघेहि १९१७ सालीं संस्थेचे आजन्म सेवक बनले. दोघेहि आपापले विषय किती तळमळीनें व अभ्यासपूर्वक शिकवीत हें मागें सांगितलेंच आहे. प्रा. मायदेव संस्थेची वीस वर्षें सेवा करून निवृत्त झाले व नंतर भारत महिला विद्यापीठाचे प्राध्यापक व पुढें ऑर्गनायजर झाले. आपल्या कष्टाळू व गोडव्या स्वभावानें त्या संस्थेकरितां त्यांनीं हजारो रुपये मिळविले.

श्री. मोडकहि आपल्या अंगच्या चिकाटीनें व दमदारपणानें सातारच्या कन्याशाळेचा डोळ्यांत भरेल असा विस्तार करूं शकले. ते हिंगण्यास असतांना ते हायस्कूलचे प्रमुख, व मी अध्यापिका शाळेचा प्रमुख असून दोघांनाहि आपापल्या शाळा चांगल्या चालाव्यात असें वाटे. अर्थात् आम्हांमध्यें थोडीशी चुरस व सात्विक स्पर्धा चाले. पण या वैयक्तिक चुरशीचा व स्पर्धेचा परिणाम दोन्ही शाळांच्या दृष्टीनें हितावहच झाल्यामुळें त्याचा उल्लेख केला.

श्री. वारुताई शेवडे व श्री. गंगूबाई तांबोळे:—या दोघी एकाच वर्षी ( १९१९ ) संस्थेंत दाखल झाल्या. दोघीहि शांत व धिम्या स्वभावाच्या असून आपापलें काम आस्थापूर्वक करीत. गंगूबाईनीं विद्यापीठाच्या कचेरींतील आपलें काम अत्यंत चोखपणें केलें. अण्णांचा त्यांच्यावरचा विश्वास व त्यांची अण्णांवरील निष्ठा कौतुकास्पद असत. अण्णांच्या बरोबर असणें, त्यांना वाचून वगैरे दाखविणें इ. वैयक्तिक स्वरूपाचीं कामें त्यांनीं शेवटपर्यंत मोठ्या आपुलकीनें केलीं.

श्री. वारूबाई यांनीं हिंगणें, मुंबई व पुणें येथील कन्याशाळांत वेळोवेळीं मुख्याध्यापिका म्हणून उत्तम काम केलें, पण तें जुजबी व तात्पुरत्या स्वरूपाचें ठरल्यानें त्यांना आपलें कर्तृत्व दाखविण्यास कोठेंच पूर्ण वाव मिळाला नाहीं. शिवाय शरीरप्रकृतीनेंहि त्यांना फारशी साथ दिली नाहीं.

गुरु. कर्वे यांनीं काढलेल्या ‘ समता संघा ’च्या व ‘ हिंगणें माजी विद्यार्थिनी संघा ’च्या त्या चिटणीस असून हीं दोन्हीं कामें त्यांनीं आत्मीयतेनें केलीं.

प्रा. वामन मल्हार ऊर्फ तात्या जोशी:—माझ्या जीवनावर विशेष परिणाम करणाऱ्या ज्या थोड्या व्यक्ती आहेत, त्यांमध्यें तात्यांचें स्थान बरेंच वरचें आहे. हिंगणें येथील वीस वर्षांच्या माझ्या वास्तव्यांत त्यांनीं मला आपल्या सहवासाचें सात्विक सुख लाधूं दिलें व सहज बोलतां-चालतां मला साहित्याची दृष्टि देऊन त्यांत मार्गदर्शन केलें, हा त्यांनीं माझ्यावर फार मोठा अनुग्रह केला. तात्यांनीं मला जनतेपुढें आणलें. आम्हीं दोघांनीं हिंगण्यास एकत्र वास केला, एवढेंच नव्हे—बराचसा प्रवासहि एकत्र केला. त्यामुळें त्यांचे बहुतेक नातेवाईक, आतेष्ठ, मित्र व चहोत आणि त्यांच्या विद्यार्थिनीहि मला ओळखत व मान देत.

अशा प्रकारें माझ्या ओळखीचें क्षेत्र सारखें वाढत जाऊन माझें मन विस्तृत व उदार बनलें. थोडक्यांत म्हणजे माझ्यांतील संकुचित स्वार्थबुद्धि कमी–कमी होत जाऊन मी समाजाभिमुख बनलों. व्यक्तीचें समाजीकरण होणें म्हणजे तिची उन्नति होणें; आणि ही उन्नति मुख्यतः तात्यांनीं घडवून आणली हें मला त्यांचें फार मोठें देणें लाभलें. ‘ पापान्निवारयति, योजयते हिताय ’ हें जें सन्मित्राचें मुख्य लक्षण तें तात्यांना तंतोतंत लागूं पडतें. कौटुंबिक आपत्तींचे प्रसंगीं त्यांनीं मला जो दिलासा दिला तो तर सांगतांच येत नाहीं. काव्यशास्त्रविनोदाची गोडी लावून त्यांनीं माझ्या जीवनांत गोडवा निर्माण केला.

तात्यांचा ध्येयवाद, त्याग, त्यांची विद्वत्ता, रसिकता, मानवता इ. गुणांसंबंधीं मीं त्यांच्या चरित्रांत अगोदरच सांगितलें असल्यामुळें येथें त्याची पुनरुक्ति करीत नाहीं.

प्रा. रामचंद्र हरि केळकर :—हे १९२० सालीं संस्थेंत दाखल झाले व १९४२ मध्यें सेवानिवृत्त झाले. त्यांना राजकारण व समाजकारणाची आवड असून ते ना. गोखले यांचे अनुयायी होते. ते कांहीं काळ संस्थेचे सेक्रेटरी, हिंगण्याच्या हायस्कूलचे हेडमास्तर व पुण्याच्या कन्याशाळेचे मुख्याध्यापक असून हीं कामें त्यांनीं चांगल्या प्रकारें पार पाडलीं.

डॉ. कमळाबाई देशपांडे:—कमळाबाई माझ्या अदल्याच वर्षी संस्थेंत आल्या. मात्र आम्ही दोघेहि एकाच वर्षी व एकाच दिवशीं संस्थेंतून निवृत्त झालों. त्या हिंगण्यास असतांना त्यांचें माझें अतिशय जुळत असे. दोघेहि समान विचारांचीं, समान वृत्तीचीं, सारखींच उत्साही-नव्हे अति उत्साही,—व सारखींच विनोदप्रिय. मात्र त्या जास्त स्वतंत्र वृत्तीच्या व जास्त बाणेदार. साताऱ्याची कन्याशाळा या त्यांच्या स्वतंत्र वृत्तीची व सर्वांगीण कर्तृत्वाची साक्ष देत आहे. त्यांचे ठिकाणीं विद्वत्व व कवित्व एकत्र नांदतांना पाहून मोठें कौतुक वाटतें. त्यांचें संशोधनकार्य सतत चालू असून त्यांचा एक ग्रंथ 'स्त्रियांच्या कायद्याची वाटचाल' प्रसिद्ध होण्याच्या मार्गावर आहे. भारत महिला विद्यापीठाच्या जी. ए. पदवीला परदेशांत सरकारमान्यता व देशी-परदेशी विद्यापीठांच्या मान्यता मिळवून देण्यास त्यांची विद्वत्ता पुष्कळच कारणीभूत झाली आहे. त्यांचें 'स्मरण-सांखळी' हें आत्मवृत्त वाचनीय झालें आहे.

श्री. सीताबाई अण्णिगेरी:—सीताबाई व मी एकाच वर्षी आजन्म सेवक झालों असलों तरी त्यांचा संस्थेशीं संबंध माझ्यापेक्षां कितीतरी पूर्वीपासूनचा होता. त्यांचें सर्व शिक्षण आश्रमांतच झालें असल्यामुळें व लहानपणापासूनच त्या कर्व्यांच्या प्रभावळींत वावरत असल्यामुळें त्यांनीं संस्थेचीं सर्व स्थित्यंतरें व तेथील कार्यपद्धति लहानपणापासून प्रत्यक्ष पाहिलीं होतीं ! आणि म्हणून त्या आजन्म सेविका झाल्याबरोबर जबाबदारीच्या व अधिकाराच्या जागांवर चढूं शकल्या.

साताऱ्याची कन्याशाळा ही जशी कमळाबाईच्या व मोडकांच्या कर्तृत्वाची साक्ष देत उभी आहे तशी मुंबईची कन्याशाळा सीताबाईच्या प्रयत्नशीलतेची, त्यांच्या उमद्या स्वभावाची व सर्वांशीं जुळतें-मिळतें घेण्याच्या त्यांच्या धोरणाची साक्ष देत उभी आहे. त्यांच्यापुढें चालून आलेल्या सर्व संधींचा त्यांनीं चांगला फायदा घेतला व स्वतःची तशीच संस्थेची प्रतिष्ठा वाढविली. भारत महिला विद्यापीठाला श्री. ठाकरसी यांजकडून पंधरा लाख रुपयांची मोठी देणगी मिळण्याला एक कारण सीताबाईंचा त्या कुटुंबाशीं आलेला संबंध, जडलेला स्नेह व त्यांनीं तेथें मिळविलेला चांगुलपणा आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. मुंबईच्या

कन्याशाळेची स्वतःची इमारत उठली म्हणजे सीताबाईंचें कार्य कळसास पोंचलें असें म्हणावयाचें.

मुंबईला जाण्यापूर्वी त्या हिंगण्यास बोर्डिंग सुपरिंटेंडेंट असतांना त्यांचे व माझे कांहीं बाबतींत—विशेषतः विद्यार्थिनींवर शिस्त राखण्याबाबत—मतभेद होत; पण एरवीं आम्हां दोघांचें परस्परांसंबंधींचें मत चांगलें असें, आणि त्यांच्या कर्तृत्वाबद्दल तर मला अजूनहि आदर वाटतो.

श्री. बनूबाई अहो:—सीताबाईंप्रमाणेंच बनूबाई लहानपणापासूनच हिंगण्याच्या संस्थेंत वाढल्या व शिकल्या. त्या १९२३ सालीं संस्थेच्या आजन्म सेविका झाल्या, व थोड्याच दिवसांत त्यांना बेळगांवास शाळा काढण्यासाठीं पाठविण्यांत आलें. त्या हिंगण्यासच राहत्या तर मोठ्या वृक्षाखालीं उगवलेल्या लहान रोपट्यासारखी त्यांची स्थिति होऊन त्यांच्या अंगच्या गुणांना वाव मिळाला नसता व त्यांचें कर्तृत्व आतांसारखें उठून दिसलें नसतें. त्यांची काम करण्याची धमक, धिमी वृत्ति, जनतेशीं मिळून-मिसळून वागण्याची हतोटी, इ. गुणांमुळें थोड्याच काळांत त्यांनीं बेळगांवासारख्या दूरच्या व द्विभाषिक प्रदेशांत लोकांचा विश्वास संपादन केला. २५–३० वर्षे त्या ठिकाणीं अविरतपणें काम करून शाळा नांवा-रूपास आणली व तिला स्वतःची भव्य इमारतहि मिळवून दिली. सेवा-निवृत्त झाल्यावर त्यांनीं आपली बहुतेक गिळकत नगर येथील एका रुग्णालयाला देऊन टाकली हें तर त्यांनीं विशेषच केलें. शाळेपेक्षां हेंच त्यांचें खरें स्मारक असें मी मानतों.

श्री. भास्कर धोंडो कर्वे:—डॉ. दिवेकर संस्था सोडून गेल्याला कांहीं दिवस होतात तोंच भास्करराव संस्थेला येऊन मिळाले. तेहि दिवेकरां-प्रमाणेंच हुशार, विद्वान्, हरहुन्नरी, कर्तृत्ववान, उद्योगी व कामसू असून त्यांनाहि परदेशप्रवासाचा व परदेशी विद्यापीठांतील शिक्षणाचा फायदा मिळाला होता. त्यामुळें दिवेकरांच्या जाण्यानें संस्थेची झालेली नुकसानी थोड्याच काळांत थोड्या-फार प्रमाणांत भरून निघाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. एका बाबतीचा तर भास्कररावांना विशेषच फायदा मिळाला. ते अण्णांचे प्रत्यक्ष चिरंजीवच असल्यानें वडिलार्जित स्थान व महत्त्व

त्यांना आपोआप प्राप्त झालें. त्या स्थानाला व महत्त्वाला भास्कररावांनीं आपली पात्रता सिद्ध केली ही त्यांची खरी शहामत.

भास्कररावांनीं लीड्स् विद्यापीठाची एम्. एड्. ही शिक्षणशास्त्रविषयक पदवी मिळविली असल्यानें संस्थेंत दाखल झाल्याबरोबर अध्यापिका शाळेचें उपप्रमुखत्व त्यांचेकडे जाणें साहजिकच होतें. कांहीं दिवसांनीं संस्थेच्या चिटणिशीचें कामहि त्यांच्यावरच सोंपविण्यांत आलें. हीं दोन्हीं कामें त्यांनीं फार हुशारीनें व अत्यंत कष्टपूर्वक केलीं. विशेषतः चिटणिशीचें काम तर त्यांनीं उत्कृष्टपणें केलें.

भास्कररावांचें व माझें सुरुवाती–सुरुवातीला तरी तितकेंसें जुळत नसे. शिस्तीच्या, इभ्रतीच्या व मानापमानाच्या त्यांच्या कल्पना माझ्यापेक्षां निराळ्या असत. शिस्तीच्या बाबतींत ते कडक व करडे तर मी नरम व चालवून घेणारा. विद्यार्थिनी, हाताखालची मंडळी व गडीमाणसें यांच्याशीं असलेली माझी सलगी व त्यांना संभाळून घेण्याचें माझें धोरण हीं त्यांना मनापासून आवडत नसत; पण माझ्या शिकवण्याबद्दल व खिलाडू वृत्तीबद्दल त्यांना आदर वाटे व मलाहि त्यांच्या उद्योगीपणाबद्दल, चतुरस्र माहितीबद्दल व कार्यैकतत्परतेबद्दल आदर वाटे. हल्लीं तर ते माझ्याशीं अतिशयच सलगीनें वागतात. हिंगण्याच्या हल्लींच्या विस्ताराला व सुधारणेला भास्कररावांचा हात बराचसा कारणीभूत झाला आहे हें मान्य केलें पाहिजे.

कु. बाळूबाई खरे ( हल्लींच्या सौ. मालतीबाई बेडेकर ) व डॉ. सौ. इरावतीबाई कर्वे:—या दोघी संस्थेंत आल्या त्या एकाच वर्षी ( १९३२ ); व संस्था सोडून गेल्या त्याहि एकाच वर्षी ( १९३६ ). दोघीहि मोठ्या हुशार, एम. ए. सारख्या उच्चतम पदव्या मिळविलेल्या, अभ्यासू वृत्तीच्या आणि शास्त्रीय व ललित लेखनांत वाकबगार असल्यानें संस्था त्यांचेकडे मोठ्या आशेनें व कौतुकानें पाहत होती. पण आपल्या बुद्धिमत्तेला व कर्तृत्वाला संस्थेंत फारसा वाव नाहीं व इतर आजन्मसेवकांशीं आपलें फारसें जुळणार नाहीं अशी खरी-खोटी भावना करून घेऊन त्या दोघींनींहि चारच वर्षांत राजीनामे दिले व ते संस्थेला मोठ्या नाखुषीनें स्वीकारावे लागले. त्या राहत्या तर संस्थेच्या दर्जांत चांगली वाढ झाली असती.

इतर आजन्मसेवकांशीं त्यांचें कसेंहि असो, माझ्याशीं मात्र दोघीहि सलगीनें, मोकळेपणानें व आपलेपणानें वागत, व अद्यापीहि तशाच वागतात. विद्वत्त्व, रसिकत्व व 'माणुसकीचा गहिंवर' यांचा 'सुरेख संगम' इरावतीबाईंचे ठिकाणीं आढळतो, व शास्त्रीय आणि ललित अशा दोन्ही प्रकारचें वाङ्मय त्या लीलेनें लिहितात. बाळूबाई या बुद्धीनें चलाख, मनानें उमद्या व लेखणीच्या खेळकर असल्यानें मला त्यांचेसंबंधीं आस्था वाटे. उलट मी त्यांचेपेक्षां वयानें वडील, अनुभवी व व्यवहारी असल्यानें त्याहि मला मान देत व माझा सल्ला घेत. संस्थेला त्या लाभल्या नाहींत हें दुर्दैवच म्हणावयाचें.

श्री. शारदाबाई साठ्ये:—शारदाबाई या एके काळीं हिंगण्यास माझ्या विद्यार्थिनी असून तेव्हांपासूनचा त्यांचा गुरुभाव व श्रद्धा हीं शेवटपर्यंत कायम होतीं. त्यांना वाई व धुळें येथील कन्याशाळा चालविण्याचा अनुभव असल्यामुळें हिंगण्यास आल्याबरोबर त्या अध्यापिका शाळेच्या उपप्रमुख बनल्या व माझ्या पश्चात् प्रमुख झाल्या. त्या रुबाबदार असून त्यांचा सर्वांना दरारा वाटे. हिंगणें येथील माझ्या कार्याचा गौरव त्या मनापासून व मुक्तकंठानें करीत व मलाहि त्यांच्या कर्तृत्वाचें कौतुक वाटे. अध्यापिका शाळेच्या सर्व चांगल्या प्रथा त्यांनीं कसोशीनें चालविल्या. एवढेंच नव्हे तर स्वतः कांहीं नवीन प्रथांची भर घातली. समाजकार्याचें मोठें क्षेत्र पुढें चालून आलें असतांना तें त्यांना प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें स्वीकारतां आलें नाहीं, व त्यांचा अकालींच अंत झाला याचें वाईट वाटतें.

श्री. श्रीधर शंकर पतके:—१९४० सालीं श्री. पतके हे संस्थेचे आजन्म सेवक बनले. तसें पाहिलें तर त्यांनीं १९२९ सालापासूनच संस्थेच्या शाळांतून काम करून 'एक चांगले शिक्षक' असा लौकिक संपादन केला होता. आजन्म सेवक या नात्यानें त्यांचा–माझा फार थोडा संबंध आल्यामुळें त्यांचेसंबंधीं मला विशेष सांगतां येणार नाहीं. तथापि त्यांनीं शाळेबाहेरच्या जगांत स्वतःचा व संस्थेचा नांवलौकिक बराच वाढविला आहे एवढें मी सांगूं शकतों.

मी हिंगण्याच्या संस्थेंतून निवृत्त झाल्यानंतर सौ. कावेरीबाई कर्वे, श्री. केशव रामचंद्र पालकर, श्री. पुंडरीकाक्ष विनायक गोळे, श्री. येसूबाई बर्वे,

कु. काशीबाई नातू, सौ. नयनाबाई मोघे, श्री. ताराबाई परांजपे, व श्री. श. वि. वैद्य...इतकींजण संस्थेचीं आजन्म सेवक झालीं ही सर्व मंडळी होतकरू असून संस्थेच्या कार्यासंबंधीं त्यांना आस्था आहे. संस्थेलाहि त्यांच्यासंबंधीं विश्वास वाटावा अशींच तींहि आहेत. या सर्वांसंबंधीं माझें मत चांगलें असून त्यांचेंहि माझेसंबंधींचें मत तितकेंच चांगलें असावेंसें वाटतें. बाकी, हल्लींची माझी भूमिकाच त्रयस्थपणाची व तटस्थपणाची असल्यामुळें सर्वांचेच संबंध माझ्याशीं चांगले असल्यास त्यांत विशेष नवल नाहीं.

# माझीं सोलापूरचीं चार वर्षें : : : १७

मी सोलापुरास कां, कसा व कोणत्या परिस्थितींत गेलों याचें थोडक्यांत वर्णन ' हिंगणें स्त्री-शिक्षण संस्थेचीं साठ वर्षें ' या पुस्तकांत केलें आहे. तेंच येथें देतों, म्हणजे निराळें सांगावयास नको. त्या पुस्तकाचे संपादक श्री. मोडक म्हणतात :—

" सोलापूर येथें श्रीसरस्वती मंदिर नांवाची एक संस्था स्त्रियांच्या उन्नतीकरितां झटत होती. इ. स. १९२५ सालीं श्रीयुत मोडक यांनीं भारतवर्षीय महिला विद्यापीठाचा अभ्यासक्रम शिकण्याकरितां मंदिरांत जी एक मुलींची शाळा सुरू केली होती तिच्यांत इंग्रजी तिसरीपर्यंतचे वर्ग चालू होते. श्रीयुत मोडक हे परत हिंगण्यास आल्यावर मंदिरानें शाळा तशीच चालू ठेवली होती आणि ( सौ.काशीबाई लेले यांच्या नेतृत्वाखालीं ) इंग्रजी पांचवीपर्यंतचे वर्गहि चालविले होते. तथापि या शाळेस हायस्कूलचें संपूर्ण स्वरूप शक्य तितक्या लवकर आणून सरकारी मान्यता मिळवावी आणि भारत महिला विद्यापीठाची प्रवेशपरीक्षा व मुंबई विद्यापीठाची मॅट्रिक परीक्षा या दोन्ही परीक्षांसाठीं विद्यार्थिनी तयार कराव्या या हेतूनें शाळा चालविण्यासाठीं एका आजन्मसेवकाची व पैशाचीहि मंदिराच्या चालक मंडळींनीं आश्रमाकडे मागणी केली. आपल्या अंगीकृत कार्याचाच विस्तार होत आहे हें लक्षांत आणून आश्रमानें हिंगणें येथील कार्याची होणारी गैरसोय सोसून प्रि. ना. म. पटवर्धन या अनुभवी व कष्टाळू आजन्म सेवकास एस्. एच्. एन्. ( शेठ हिराचंद नेमचंद ) हायस्कूलचे मुख्याध्यापक म्हणून इ. स. १९३५ च्या जूनमध्येंच पाठविलें. आणि

रु. २००० पर्यंत रक्कम कर्जाऊ देण्याचें मान्य केलें. श्री. पटवर्धन हे सोलापुरास जवळ जवळ ४ वर्षें राहिले. आपल्या मनमिळाऊ व कष्टाळू स्वभावानें तेथील लोकांची संपूर्ण सहानुभूति संपादून त्यांनीं शाळेचें पूर्ण हायस्कूल केलें आणि सरकारी मान्यताहि मिळविली."

हिंगण्याच्या अध्यापिका शाळेंतील माझें काम उत्तम प्रकारें चाललें होतें. विद्यार्थिनी, सहकारी शिक्षक व आजन्म सेवक मंडळी माझ्या कामावर खूष होती. भूगोल, भाषा व शिक्षण या विषयांवर कांहीं उपयुक्त पुस्तकें लिहून मी लेखनक्षेत्रांतहि पुढें येत होतों. विशेषत: माझें 'आमच्या इंदूचें शिक्षण' हें पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध होऊन त्यानें मला बरीचशी मान्यता व लोकप्रियता प्राप्त करून दिली होती. अशा या सर्वतोपरीं अनुकूल परिस्थितींत मी सोलापुरास गेल्यामुळें तेथील लोकांवर माझी छाप ताबडतोब बसली.

गांवांतील सुशिक्षित समाजाच्या उपयोगी पडून त्यांची सहानुभूति मिळविण्यासाठीं म्हणून मी तेथें गेल्याबरोबर एक उपयुक्त उपक्रम केला. मी तेथें जाण्याच्या आदल्या वर्षी तेथील शाळांतील ज्या विद्यार्थिनी मॅट्रिकमध्यें नापास झालेल्या होत्या त्यांचे अभ्यास घेऊन त्यांना परीक्षेच्या कामीं मदत करण्याकरितां मी एक कोचिंग क्लास काढला. या वर्गाला २०–२५ मुली जमल्या. त्यांना विनावेतन शिकविण्यासाठीं श्री. गो. प. पटवर्धन, शिदोरे, हेर्लेकर, श्रोत्रीय, करंदीकर अशांसारख्या नाणावलेल्या शिक्षकांना विनंति केली व त्या सर्वांनीं ती मोठ्या आनंदानें मान्य केली.

मीं ठेवलेल्या बडदास्तीवर ते सर्व खूष होते. जमलेल्या फींतून जागाभाडें फर्निचर, स्टेशनरी, शिक्षकांचा रोजचा चहा वगैरेचा सर्व खर्च भागून थोडीशी शिल्लकच राही. क्लासचें काम उत्तम प्रकारें चाललें असतांनाच 'तो बंद करा' असा शिक्षणाधिकाऱ्यांकडून हुकूम आला व त्याप्रमाणें आम्हांला तो बंद करावा लागला. क्लासकरितां घेतलेलें सर्व फर्निचर 'मंदिराला' देणगी म्हणून मिळालें; मुलींची, त्यांच्या पालकांची व सर्वसामान्य जनतेची सहानुभूति मिळाली आणि गांवांतील निरनिराळ्या हायस्कुलांतील शिक्षकांमध्यें मैत्रीचें व ऐक्याचें नातें निर्माण झालें ही या क्लासची फलश्रुति.

या माझ्या उद्योगीपणामुळें तेथील संस्थेचे अध्यक्ष–डॉ. वा. का. किर्लोस्कर व चिटणीसद्वय–श्री. गणपतराव रानडे व सौ. सरस्वतीबाई रानडे यांचें माझ्यासंबंधीं फारच चांगलें मत बनलें. श्री. अण्णासाहेब जामदार वकील, यांच्या बंगल्यामागील बंगलींत (हा अकोल्याचा शब्द आला) मी राहत असून जामदार मंडळींचा लोभहि मीं थोड्याच काळांत संपादन केला. राहण्याची घरच्यासारखी सोय, सहकारी शिक्षकांचें संपूर्ण साहाय्य व्यवस्थापकांचा नितान्त विश्वास, लोकांत मिळूं लागलेली मानमान्यता या सर्व अनुकूल गोष्टींमुळें व माझा कष्टाळू स्वभाव, माझी कार्यासक्ति, माझें सर्वांशीं मिळतें घेण्याचें धोरण, इ. माझ्या अंगच्या गुणांमुळें माझें बस्तान थोड्याच दिवसांत फारच चांगलें बसलें.

त्या वेळच्या इन्स्पेक्ट्रेस् ऑफ् स्कूल्स्–मिस् ट्वेल्स्–यांनीं शाळेची तपासणी करून माझ्या कामावर व शाळेच्या प्रगतीवर अत्यंत अनुकूल शेरा दिला व पुढील काळांत सर्व प्रकारची मदत करण्याचें आश्वासन दिलें; व लवकरच शाळेची ग्रँट वाढली, शाळेचे वर्ग वाढले, विद्यार्थिनींची संख्या आणि वाढली, शाळेचा दर्जा व लौकिक वाढला. अशा प्रकारें अल्पशा काळांत शाळेची सर्व बाजूंनीं वाढ झाली.

ट्वेल्स् बाई मनाच्या मोठ्या सरळ, खेळकर वृत्तीच्या व चांगल्या चाललेल्या कार्याची बूज करणाऱ्या होत्या. त्या इन्स्पेक्शनसाठीं दोन-तीन दिवस सोलापुरास आल्या असतांना आमच्यांत इतक्या रुळल्या होत्या कीं सांगायाची सोय नाहीं. आम्हां शिक्षकांच्या क्लबांत चहा काय घ्यायच्या ! आम्हांबरोबर बॅडमिंटन् काय खेळायच्या ! मीं सुचविल्याबरोबर वर्गांत इंग्रजी कविता काय शिकवून दाखविली ! आपल्याबरोबर माझा फोटो काय काढवून घेतला ! दुसऱ्या एका शाळेच्या पाठांच्या परीक्षेला मला आपल्याबरोबर घेऊन काय गेल्या ! त्यांचें सर्वच कांहीं और दिसलें ! इतक्या अल्पावधींत झालेली आमची ही दोस्ती पाहून सर्वांना मोठें आश्चर्य वाटलें.

हिंगण्याच्या संस्थेंत गेल्यापासून मीं खाजगी शिकवण्या कधींच केल्या नाहींत. सोलापुरास असतांना मात्र तेथील धनिक नागरिक व सुप्रसिद्ध उद्योगपति, बाबासाहेब वारद, यांच्या पत्नीची शिकवणी मीं धरली; पण

दरमहा ४० रुपये मिळत ते सर्व परस्पर सरस्वती मंदिर संस्थेकडे जमा करीं. या माझ्या निर्लोभ वृत्तीचा जनतेच्या मनावर चांगलाच परिणाम झाला. अशा प्रकारें सुखद परिस्थितीच्या आनंदांत व कर्तृत्वाच्या समाधानांत चार वर्षे सोलापुरास राहून व तेथील शाळेचें एक चांगल्यापैकीं हायस्कूल बनवून मी परत हिंगण्यास पूर्वीच्या जागेवर रुजूं झालों.

मी सोलापुरास शिकवलें असें फार थोडें. सुरुवातीचे कांहीं दिवस इंग्रजी सहावीला इंग्लिश, व सातवीला शेवटपर्यंत संस्कृत शिकवीं. इंग्रजी सोडण्याचें कारण असें कीं, माझ्या इंग्रजी शिकविण्यापेक्षां माझे उत्साही मदतनीस श्री. अण्णा केळकर यांचें शिकविणें अधिक सरस व कळकळीचें असल्यामुळें तें मुलींना जास्त आवडे. त्यांची ही आवड ओळखून मींच माझें इंग्रजी केळकरांवर लादलें व त्यांनींहि तें आपल्या उत्साही व कामसू स्वभावानुसार आनंदानें पत्करलें,

सातवीच्या संस्कृतची गोष्ट निराळी होती. तें माझ्यापूर्वी सौ. काशीबाई लेले, व त्यांच्याहि पूर्वीं अण्णा जोशी नांवाचे एक वृद्ध पण रुबाबदार शिक्षक शिकवीत. पण काशीबाईंना काम फार व मला फारच कमी अशी स्थिति झाल्यामुळें मीच तें घेऊं लागलों. मला म्हणजे तें विशेष चांगलें येत होतें असें नाहीं. पण हरिभाई देवकरण हायस्कुलांतील नाणावलेले संस्कृत शिक्षक पंडित बागेवाडीकर शास्त्री यांचेपाशीं रोज संथा घेऊन मी शिकवीत असल्यानें मुलींचें नुकसान झालें नाहीं.

आतांच अण्णा जोशी यांचें नांव वर आलें, म्हणून त्यांची एक गोष्ट आठवली आहे ती सांगतों. त्यांचें शाळेमध्यें मोठें प्रस्थ असे, व जो तो त्यांना जरा टरकूनच वागे. मी प्रथम सोलापुरास गेलों तेव्हां मलाहि लोकांनीं त्यांची भीति घातली. शाळेचें पहिलेंच संमेलन ( माझ्या कारकीर्दींत ) होतें; तें मीं जरा निराळ्या पद्धतीनें करावयाचें योजलें होतें. पण अण्णांना ती पद्धति पसंत नव्हती, व त्यांचा विरोध होणारसें उघड दिसूं लागलें.

त्या माणसाशीं युक्तिवाद करण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें पाहून व संमेलनप्रसंगीं कोणीहि नाराज असतां कामा नये या आकांक्षेनें मी

संमेलनाच्या दिवशीं पहांटेसच अण्णांचे घरीं गेलों व एखाद्या धार्मिक कार्याला सुरुवात करतांना यजमान घरांतल्या वृद्ध व पूज्य माणसांना जसा वांकून व लवून नमस्कार करतो तसा मीं त्यांना केला, व त्यांचे आशीर्वाद मागितले. बस्, युक्ति सफल झाली ! अण्णा खूष झाले व पुढें कोणत्याहि प्रसंगीं व कसल्याहि प्रकारें त्यांचा विरोध झाला नाहीं. मीं इतकें नमतें घेतलें हें हेडमास्तराच्या दर्जाला साजेसें झालें कीं नाहीं कोणास ठाऊक ! शाळेचा फायदा मात्र निश्चित झाला.

अशा प्रकारें मी माझ्या नमतें घेण्याच्या गुणानें अण्णा जोशांसारख्या प्रस्थाची सहानुभूति मिळवूं शकलों, पण एका होतकरू शिक्षिकेची सहानुभूति मात्र मला कधींच मिळवितां आली नाहीं. ही शिक्षिका शिकवायला फार चांगली. विद्यार्थिनींनाहि ती आवडे. पण स्वतःसंबंधींच्या तिच्या अपेक्षा ‘मंदिरा’सारख्या गरीब संस्थेला झेपणाऱ्या नव्हत्या.

तिची मजा अशी कीं, ती शाळेंत बहुधा उशीरा यावयाची व त्याची भरपाई करण्याकरितांच कीं काय घरीं जावयाची मात्र लवकर; आणि कारण काय तर पतिराज जेवून बाहेर पडेतों तिला शाळेंत येतां येत नसे व ते ऑफिसांतून परत येण्यापूर्वीं तिला घरीं हजर रहावें लागत असे. जातां-येतां तिला टांगा लागे. शाळेंत आल्यावर बरोबरचीं पुस्तकें टांग्यांतून काढण्याकरितां व जातांना तीं परत टांग्यांत ठेवण्याकरितां तिला शाळेचा गडी लागे. अर्थात् माझ्यासारख्या एका गरीब शाळेच्या मुख्याध्यापकाला ही श्रीमंती वागणूक खपत नसे. या सर्व गोष्टी हव्या होत्या तर तिनें एखाद्या श्रीमंत शाळेच्या मुख्याध्यापिकेची जागा मिळवावयाची होती. या संस्थेंत यावयाला नको होतें एवढेंच माझें म्हणणें.

मी तेथें गेल्यापासून थोड्याच महिन्यांत असा एक काळ येऊं लागला होता कीं, मीं जर ती संस्था आमच्या हिंगण्याच्या संस्थेला जोडून घेण्याची इच्छा मनांत धरून तसे प्रयत्न केले असते तर ती संस्था हिंगण्याची संस्था बनली असती. पण तिचें स्थानिक स्वातंत्र्य नष्ट करण्याचें व तिला हिंगण्याच्या संस्थेंत विलीन करण्याचें माझें धोरण नसल्यानें ती संस्था स्वतःच्या पायावर उभी राहूं लागल्याबरोबर मी आपला पाय तेथून काढला व संस्था ज्यांची त्यांस सुपूर्त केली.

हिंगण्याच्या संस्थेच्या जमेकडे आणखी एक संस्था पडली व तिची कमाई करावयाला मी कारण झालों या घटनेनें मला थोडें बरेंहि वाटलें असतें—नाहीं असें नाहीं; पण या लोभाला बळी न पडतां मीं केवळ एक विश्वस्त, ट्रस्टी-म्हणून तेथें काम केलें व बाल्यावस्थेंत असलेली संस्था वयांत येऊन आपला कारभार स्वतः चालविण्यास समर्थ झाल्याबरोबर त्या विश्वस्तपदावरून दूर झालों याचें समाधान मला केव्हांहि काय अधिकच वाटेल.

सोलापूरच्या शाळेंत काम करीत असतांना तेथील संस्थेचे अध्यक्ष व चिटणीस यांपासून तों थेट विद्यार्थिनी व गडी यांचेपर्यंत सर्वांचें सहकार्य मला लाभलें म्हणून तर तेथील माझी कारकीर्द एवढी यशस्वी झाली. अध्यक्ष डॉ. बाबासाहेब किर्लोस्कर हे त्या वेळीं सार्वजनिक कार्यांतून जवळ जवळ निवृत्त होऊं पाहत होते; पण संस्थेच्या हितार्थ मी चालविलेली धडपड पाहून तेहि पुन्हां संस्थेच्या कामांत उत्साहानें लक्ष घालूं लागले.

चिटणीस-श्री. गणपतरावजी रानडे व त्यांच्या पत्नी सौ. सरस्वतीबाई यांनीं तर मीं संस्थेकरितां जी जी मागणी करावी ती ती आनंदानें पुरवावी, व जी पुरवणें संस्थेला झेपण्यासारखें नसे ती स्वतःच्या पदराला खार लावून पुरी करावी. त्यांनीं माझे सर्व चोजले पुरविले म्हणून तर संस्थेची इतकी भरभराट एवढ्याशा काळांत होऊं शकली.

शिक्षकांच्या सहकारितेसंबंधीं तर बोलावयासच नको. ज. वा. व स. वा. हे केळकर बंधु, हरिभाऊ जोशी, कार्यकर्ते, गोवंडे, लऊळकर, मराठी शाळेचे मुख्याध्यापक-कुळकर्णी—इ० मंडळीच—खरें म्हटलें तर शाळा चालवीत होतीं. मी नुसता नांवाचा मुख्य होतो. त्यांची माझ्यावरील निष्ठा, सहकार्याची आवड, कोणतेंहि काम करण्याची सततची तयारी इ० गुणांचा माझ्यावर परिणाम होऊन मीच माझें काम जास्त जास्त उल्हासानें व उत्साहानें करीत असें.

श्री. ज. वा. केळकर हे थोड्याच दिवसांत पुढें हरिभाई देवकरण हायस्कुलांत गेले व एक उत्साही व हरहुन्नरी शिक्षक म्हणून प्रसिद्धीस आले. श्री. स. वा. ऊर्फ अण्णा केळकर यांच्या अध्यापनकौशल्यासंबंधीं व उत्साहा-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

अनुक्रम ......

नों. दि. ........

संबंधीं मागें थोडेसें आलें आहे. हल्लीं मुंबईस त्यांचे फार मोठे कोचिंग क्लासेस असून त्यांचें ' व्हिक्टरी ' हें नांवच त्यांच्या यशस्वितेची ग्वाही देत आहे. वर्ग चालवीत असतांनाच त्यांनीं एम्. एड्. चा अभ्यास केला व त्यांत ते पहिले आले. त्यांनीं गणित विषयावरहि अत्यंत उपयुक्त पुस्तकें लिहिलीं आहेत. एक साधा शिक्षक आपल्या हुशारीनें, मेहनतीनें व कार्यतत्परतेनें जीवनांत किती यशस्वी होतो व हजारों रुपये कमवूं शकतो याचें अण्णा केळकर हें एक उदाहरण म्हणून सांगण्यासारखें आहे.

अण्णा व मी एकत्र आल्याला दोन तपांवर वर्षें होऊन गेलीं आहेत. आम्हीं दूर दूर असलों तरी आमचा स्नेह व लोभ अद्याप कायम आहेत. नव्हे ते उत्तरोत्तर वाढत आहेत. दर वर्षी माथेरान, महाबळेश्वर इ० सारख्या हवेच्या ठिकाणीं जातांना बरोबर चलण्यासाठीं ते मला इतका मनापासूनचा आग्रह करतात कीं, नाहीं म्हणायाला जिवाला लाज वाटते. जाण्याचें ठरवावें, पण प्रकृति आड यावी असें सारखें होतें. इतक्या अकारण मैत्रीचें एक कारण—मी त्यांचें लग्न सुमन नामजोशी या प्रेमळ व सालस मुलीशीं जुळवितांना दाखविलेली सहानुभूति व तत्प्रीत्यर्थ सोसलेला थोडासा त्रास हें असावें असें मला वाटतें.

अण्णांप्रमाणें सुमनलाहि माझेबद्दल नितांत आदर व आपलेपणा वाटतो. एकमेकांवर इतकें उत्कट प्रेम करणारीं व परस्परांना सतत साथ देणारीं अण्णा-सुमनसारखीं जोडपीं क्वचितच आढळतात. या जोडप्याची आपल्या गड्यावरील व त्याच्या मुलावरील माया पाहून मोठें कौतुक वाटतें. बाहेरच्यांवर एवढें प्रेम, मग घरच्यांवर किती असेल ?

श्री. हरिभाऊ जोशी हेहि एक उत्साही व हुशार शिक्षक असून मोठे महत्त्वाकांक्षीहि आहेत. शिक्षकाला मिळणारा तुटपुंजा पगार व समाजा-कडून मिळणारा कमी मान या गोष्टींचें वैषम्य वाटून त्यांनीं शिक्षकाचें काम कायमचें सोडलें व रेडिओचा धंदा स्वीकारला. यांत त्यांच्या कर्तृत्वाला पूर्ण वाव मिळाल्यानें थोड्याच काळांत त्यांनीं बरेंचसें नांव मिळविलें आहे.

याचे उलट श्री. कार्यकर्ते; ते अद्याप सरस्वतीमंदिरांतच साधे शिक्षक आहेत. मिळेल त्या मिळकतींत समाधान मानून ते आपलें कार्य अत्यंत

सचोटीनें, व कष्टाळूपणानें करीत आहेत. त्यांचें आडनांव त्यांच्या बाबतींत सार्थ झालेसें वाटतें. आमच्या सुरुवातीच्या संचापैकीं आतां ते एकटेच तेथें राहिले आहेत; आणि म्हणून आम्ही त्यांना थट्टेनें Last of the Romans असें म्हणतों.

या सर्व शिक्षकांचे व माझे संबंध अत्यंत सलोख्याचे व खेळीमेळीचे होते. आम्ही सर्व एकत्र काम करूं, एकत्र गप्पा मारूं, एकत्र खेळूं, एकत्र हिंडाफिरायला जाऊं व खाऊं-पिऊंहि एकत्रच. इतर शाळांतुन सहसा न दिसणारें हें दृश्य पाहून लोकांना आमचें मोठें कौतुक वाटे. खुद्द मिस् ट्वेल्स्‌हि हे आमचे जिव्हाळ्याचे संबंध पाहून मोठी खूष असे.

जी गोष्ट शिक्षकांची तीच शिक्षिकांचीहि असे. काशीबाई लेले, गद्रे, दांडेकर, पार्वतीबाई कुळकर्णी, वेलणकर, लगडकर, दिगडे, हिवाळे यांपैकीं बहुतेकजणी एके काळीं हिंगण्यास माझ्या विद्यार्थिनी असून आतां येथें सहकारी शिक्षिका म्हणून काम करीत होत्या. आणि म्हणून 'नानांनीं सोलापुराचें हिंगणें बनविलें;' असें लोक जें कौतुकानें व थोड्याशा थट्टेनें म्हणत त्यांत बरेंचसें सत्य होतें. माझ्या सोयीसाठीं या सर्व शिक्षिकांनीं सुरुवातीला 'मंदिरांत'च एका खोलींत एक जेवणाचा क्लब काढला होता. शाळेच्या प्रगतीसंबंधीं बोलत व थट्टामस्करी करीत जेवत असलेली ती पंगत मला अद्याप आठवते.

या प्रत्यक्ष नात्याच्या शिक्षकांशिवाय एक बाहेरचे (ह. दे. हायस्कूल-मधील) शिक्षकहि आम्हांला आपुलकीनें मदत करीत. त्यांचें नांव व्ही. के. कुळकर्णी. स्वतःच्या शाळेपेक्षां आमच्या शाळेवरच त्यांचा जीव जास्त असे कीं काय कोणास ठाऊक! आमच्या मुलींचीं कसरतीचीं विशेष कामें ते मोठ्या आस्थेनें घेत. हल्लीं ते औरंगाबाद येथील सरकारी हायस्कूलचे हेडमास्तर आहेत.

सुमन नामजोशी, अवंतिका केळकर, मधू मोहोळकर, गोदू लेले, अंबू कवीश्वर, सुशीला मेहेंदळे, मैना देवस्थळी, शशिकला आळंदकर, हिरा सूर्यवंशी, चोळकर, छबू सापटनेकर, इंदू बर्वे इ. पहिल्या विद्यार्थिनींना मी कसा विसरूं? ही आमच्या 'मंदिरा'च्या शाळेची पहिल्या वर्षीची

मॅट्रिकची बॅच्. त्या सर्व पहिल्याच खेपेस पास झाल्या म्हणून तर शाळेच्या व माझ्या लौकिकांत भर पडली. यांपैकीं तिघी-चौघी शिक्षिका, एक बाल–शिक्षणसंस्थेची संचालिका, एक सामाजिक व राजकीय कार्यकर्ती, एक लेखिका व बाकीच्या सुगृहिणी व सुमाता आहेत. या सुगृहिणी-सुमाताहि आपापले संसार संभाळून स्वतःच्या शैक्षणिक प्रगतीसाठीं धडपडत असून मिळविलेल्या शिक्षणाचें सार्थक करीत आहेत. प्रत्येकीसंबंधीं कांहीं विशेष लिहावें असें पुष्कळ वाटतें, पण लिहिणार तरी किती ? तथापि दोघीं-तिघींसंबंधीं लिहितोंच. इतरांनीं मात्र राग मानूं नये, किंवा वाईट वाटून घेऊं नये.

सौ. अवंतिका केळकर ही विद्यार्थिनी अत्यंत कर्तृत्ववान् निघाली आहे. तिच्या लहानपणच्या क्षयी प्रकृतीवरून ती एखादें मोठें बालविकास मंदिर काढून तें इतक्या मोठ्या दर्जाला व भरभराटीला आणील असें कोणालाहि वाटलें नसतें. अर्थात् तिच्या कार्यांत तिला तिचे पति ज. वा. केळकर यांची अतिशय मदत झाली. ते मात्र तसें मानीत नाहींत आणि बोलत तर नाहींतच नाहींत. पत्नीच्या कार्याला स्वतःला तन-मन-धनानें वाहून घेणारा पति विरळाच.

आणि आतां शशिकला आळंदकर. शाळेंत टिवल्याबावल्या करणारी ही उनाड पोर भारत महिला विद्यापीठाची बी. ए. होऊन एवढें मोठें लेखन-कार्य करील असें त्या वेळीं तरी वाटलें नव्हतें. बाकी जातीची कलावंत खरी ! ‘ छटा ’ या कथासंग्रहांतील छटा तिनें वर्गांत शिकतां-शिकतां ( का न शिकतां ? ) लिहिल्या आहेत हें खरें तरी वाटेल का ?

आणि तेव्हांची बडबडी मधू मोहोळकर आतां एक मोठी सामाजिक व राजकीय कार्यकर्ती बनली असून मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात ही म्हण तिच्या बाबतींत खरी ठरली आहे.

सोलापूरच्या शाळेंत असतांना गडी-माणसांपासून तों थेट चिटणिसा-अध्यक्षांपर्यंत सर्वांचें सहकार्य मला कसें लाधलें याची दोन-तीन उदाहरणें देण्यासारखीं आहेत. शाळेंत लक्ष्मण नांवाचा एकच गडी होता. तोहि एकदां बराच आजारी पडला. दुसरा गडी मिळेना. जास्त पगार देऊन कदाचित्

मिळाला असता. पण तितका खर्च करायची सेक्रेटरींची फारशी इच्छा दिसेना. हें मी वरच्या दोन इयत्तांतील मुलींपुढें बोललों मात्र, तोंच त्यांनीं गडी बरा होऊन परत कामावर येईपर्यंत शाळेचीं सर्व कामें—वर्ग झाडणें, पाणी भरणें, घंटा देणें, नोटिशी फिरविणें वगैरे—पाळीपाळीनें आपापसांत करण्याचें ठरविलें, व मला तसें कळविलें. मला किती आनंद झाला म्हणून सांगूं ?

शिक्षकांना हें समजतांच त्यांनीं ऑफिस व शिक्षकांची खोली साफ करणें, वर्गांतून नोटिसा पोंचविणें असलीं कामें आपण होऊन स्वत:कडे घेतलीं. मधल्या सुटींत शिक्षकांचा चहा करण्याचें गोड, पण फारसें कांहीं काम नसलेलें काम मी स्वतः करण्याचें ठरविलें. आम्हां सर्वांचें हें सहकार्य पाहून सेक्रेटरींनाहि आपण कांहींतरी करावें अशी स्फूर्ति झाली, व त्यांनीं संध्याकाळीं शाळा सुटल्यावर आम्ही सर्व शिक्षक बॅड्मिंटन खेळत असूं त्या वेळीं नेट बांधण्याची कामगिरी आपल्याकडे घेतली. एवढेंच नव्हे, तर गडी बरा होऊन कामावर आल्यानंतर त्यांनीं आम्हां सर्व शिक्षकांना व काम करणाऱ्या विद्यार्थिनींना एक थाटाची फीस्ट दिली.

खर्च केला त्यांनीं, पण बेत ( मेनू ) ठरविला मी. गरम-गरम चुरमुरे, त्यांत भरपूर खारे दाणे व बारकी शेव, मधून मधून कांद्याच्या फोडी आणि शेवटीं एक-एक पेला ताजा रस—हीच काय ती थाटाची फीस्ट ! खालची फरशी लख्ख धुऊन-पुसून व वर कागद पसरून सदरहू भेळीचे दोन मोठाले ढीग घातले, आणि एका ढिगाभोंवतीं शिक्षक व दुसऱ्या भोंवतीं विद्यार्थिनी अशा पद्धतीनें बसून, गप्पा गोष्टी करीत व गाणीं म्हणत, आम्ही सर्वांनीं त्या पोटभर चुरमुऱ्यांचा समाचार घेतला. ठरविलेल्या खर्चामध्यें बरीचशी बचत करून उरलेले पैसे मी गड्याला त्याच्या औषधपाण्याच्या खर्चाकरितां दिले.

सर्वांचें हें सहकार्य व चुरमुऱ्याची ही मेजवानी मला अद्याप आठवतात व पुढेंहि आठवत राहतील. माझ्या सबंध आयुष्यांत सोलापुरांतील हें जीवन अत्यंत सुखाचें, आनंदाचें व कर्तृत्वाचें गेलें असें मला नेहमीं वाटतें.

आमचा लक्ष्मण गडी जातीचा रामोशी होता; अर्थात् अत्यंत इमानी व स्वामिनिष्ठ होता. आम्हां सर्व शिक्षकांच्या सहवासांत राहून राहून तो इतर

रीतींनींहि पुष्कळच सुधारला होता. मी सांगितलेलें काम ताबडतोब करण्यावर त्याचा इतका कटाक्ष असे कीं, कांहीं वेळां तर नुसतें ' लक्ष्मण, हें पहा ' असें म्हणून मी प्रत्यक्ष काम सांगण्याला सुरुवात करण्यापूर्वींच तो मान डोलवून व ' हां ' म्हणून काम करण्याकरितां चालूं लागे ! त्या भरांत काम कोणतें करायचें हें समजावून घेण्याचें भानहि त्याला राहत नसे. मीं हांक मारून काम सांगितल्यानंतर आपण काम ऐकण्यापूर्वींच करण्यास निघालों होतों हें त्याच्या ध्यानांत येई, व तो हंसूं लागे.

लक्ष्मणचा माझ्यावर इतका विश्वास होता कीं, आपल्या घरांतील प्रत्येक अडी-अडचणीचे प्रसंगीं तो माझा सल्ला घेई. एकदां तर तो ' बायकू सारखी सारखी भांडते, तिला कांहींतरी सांगा ' असें सांगायला माझ्या घरीं आला. मी काय तिला सांगणार ? अन् ती काय माझें ऐकणार ? पण त्याची आपली निष्ठा.

सोलापूर सोडून हिंगण्यास परत आल्यावर बऱ्याच वर्षांनीं मी पुन्हां एकदां सोलापुरास गेलों. पूर्वीं हिंगण्यास शिक्षक व माझे सहकारी असलेले श्री. दामले हेच ' मंदिरांत ' माझे जागीं हेडमास्तर होते. अर्थात् शाळेतर्फे माझा सत्कार करण्यांत आला. मी तेथून परत जाण्यास निघतांना आमचा लक्ष्मण गडी आपल्या तान्ह्या मुलाला कडेवर घेऊन आला व त्यानें त्याला माझ्या पायांवर घातलें.

' बरें आहे ना ? ' असें मी विचारतांच ' आतां बायकू बरी वागते, पन् म्हातारा मात्र गमावला ' अशी खास बातमी अगदीं हलक्या आवाजांत त्यानें मला दिली; व शेवटीं कोणी जवळ नाहींसें पाहून ' तुम्हांला हार घालावंसं लई वाटतं, घालूं ना ? ' असें विचारलें. काय भाबडा माणूस हा ! तुम्हांला हार घालूं ना ? असं मलाच विचारतो ! केवढा हा त्याचा माझ्यावरचा विश्वास ! व माझेसंबंधींचा आदर ! गडी-माणसांचे बाबतींत मी खरोखर अत्यंत नशिबवान आहें !

सोलापूरच्या मुक्कामांत मी नवीन असें कांहीं लिहिलें नाहीं. एकच लहानसा लेख लिहिला. पण त्यानें माझ्या लौकिकांत भर मात्र खूप घातली. मी तेथें असतांना आचार्य अत्रे यांच्या अध्यक्षतेखालीं सोलापूर प्रांतिक

साहित्य परिषद भरली होती. त्या निमित्तानें ‘ अत्रे–व्यक्ति ’ अशा शीर्षकाचा एक लेख मीं श्री. बाबूराव जक्कल यांच्या सोलापूर-समाचारासाठीं लिहिला.

अत्र्यांचा व माझा पुण्यापासूनचाच इतका दाट परिचय होता कीं, मी तितका चांगला लेख लिहूं शकलों यांत विशेष असें कांहींच नव्हतें. लोकांना मात्र त्याचें इतकें कौतुक वाटलें कीं अत्र्यांची ओळख करून देतांना श्री. पद्माकर अळंदकरांनीं मोठ्या मोकळेपणानें प्रथमच सांगून टाकलें कीं, ‘ मी जें आतां सांगणार आहे तें सर्व पटवर्धनांच्या लेखांतलेंच आहे. सर्वांनीं तो लेख अवश्य वाचावा.’

‘ ज्ञानप्रकाश ’चे चतुर बातमीदार श्री. कोकजे यांनीं तर तो सबंधच्या सबंध लेख ‘ ज्ञानप्रकाश ’च्या दुसऱ्या दिवशींच्या अंकांत पुन्हां प्रसिद्ध केला. तो माझा लेख खरोखरच फार चांगला साधला होता. सोलापूर जिल्ह्याचे डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर श्री. दादासाहेब रेगे त्या माझ्या लेखावर बेहद्द खूष झाले होते. दुसऱ्या दिवशीं चहा पितां पितां ते म्हणाले, “ पटवर्धन, तुम्ही जर माझा मृत्युलेख इतका सुंदर लिहिणार असाल तर मी आतां मरायला तयार आहें.” अर्थात् मी त्यांचा मृत्युलेख लिहिण्याचें सपशेल नाकारलें व म्हणून ते पुढें पुष्कळ वर्षें जगले !

लेखनाप्रमाणें वक्तृत्वाचे बाबतींतहि मी एका प्रसंगानें प्रसिद्धीस आलों. त्याचें असें झालें कीं, सोलापूर येथील कांहीं हौशी शिक्षकांनीं आपापल्या शाळेंतील विद्यार्थ्यांच्या वक्तृत्वस्पर्धा भरविण्याचें ठरविलें; व त्यांत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या फायद्याकरितां म्हणून ‘ वक्तृत्व ’ याच विषयावर एखाद्या तज्ज्ञाकडून तीन-चार व्याख्यानें देवविण्याची योजना केली. असला तज्ज्ञ त्यांना माझ्यांत आढळला, व माझ्या विरोधाला न जुमानतां त्यांनीं तें काम मजवर लादलें. योग्यायोग्यतेचा फारसा विचार न करतां मी भिडेखातर हो म्हटलें.

संकल्पित व्याख्यानांची रूपरेषा मीं पुढीलप्रमाणें आंखल्याचें स्मरतें :— ( १ ) वक्तृत्वाचे उपयोग. ( २ ) वक्तृत्वाची पूर्व तयारी–शारीरिक, बौद्धिक, मानसिक. ( ३ ) महाराष्ट्रांतले नाणावलेले वक्ते–जुने व नवे. ( ४ ) सोलापुरांतले विद्यमान वक्ते. मी केलेलें सर्व विवेचन सोदाहरण असल्यानें

श्रोत्यांना–विशेषतः वरच्या वर्गांतील विद्यार्थ्यांना–तें फारच आवडलेलें दिसलें. कारण श्रोत्यांची संख्या उत्तरोत्तर वाढत जाऊन शेवटच्या दोन दिवशीं तर 'हिराचंद नेमचंद' वाचनालयाची सबंध जागा भरून जाऊन भोंवतालच्या व्हरांड्यांतहि मंडळी उभी रहात. लो. टिळक, परांजपे, केळकर, पांगारकर, अ. ब. कोल्हटकर, वीर सावरकर, वीर वामनराव जोशी, इ० जुने व पोतदार, माटे, फडके, खांडेकर, अत्रे इ० नवे–अशा सर्व वक्त्यांचीं वैशिष्ट्यें समजावून सांगितलीं.

माझा मुख्य भर शिवरामपंत परांजपे यांजवर होता. त्यांचें रुबाबदार व्यक्तिमत्व, विद्वत्ता, रसिकता, वक्तृत्व व त्याच्या जोडीला कर्तृत्व, त्यांचा आवाज, व्यंजना, उपरोध,–उपहास यांनीं युक्त असलेला विनोद, विचारपरिप्लुत लांब पल्लेदार वाक्यें, भावगर्भ छोटीं वाक्यें वगैरे कितीतरी गुणांचा मीं उदाहरणांदाखल उल्लेख केला. हें इतकें सर्व मी कसें सांगूं शकलों याचें माझें मलाच कौतुक वाटलें––श्रोत्यांनाहि वाटलें.

शेवटच्या व्याख्यानांत 'कर्मयोगी'चे राजवाडे, हिंदुत्वनिष्ठ डॉ. जगदेवराव देशमुख, जामदार व लळीत वकील, कवि कुंजविहारी इ. स्थानिक वक्त्यांचीं वैशिष्ट्यें सांगून व 'त्यांचें अनुकरण केल्यास तुम्हांला वक्तृत्वकला वश होईल' असा आशीर्वादात्मक संदेश देऊन मीं माझी माला गुंफून पुरी केली.

सर्वांनीं कृतज्ञतेच्या व समाधानाच्या टाळ्या वाजविल्या. व्याख्यानें निरध्यक्ष असल्यानें अध्यक्ष एखादा बदसूर काढून रंगाचा बेरंग तर करणार नाहींत ना हीहि धास्ती नव्हती. चिटणिसांना आपलें वक्तृत्व गाजवावेंसें वाटून त्यांनीं माझे ओतप्रोत आभार मानले. त्या प्रसंगानें माझ्यांतील वक्तृत्व-गुण किती उंचीपर्यंत पोंचूं शकतो याचा प्रत्यक्ष अनुभव येऊन 'मी चांगला वक्ता आहें' अशी अभिमानपर जाणीव झाली. ती उगीचच होती हें पुढें दिसून येईलच.

वक्तृत्वाच्या स्पर्धा ठरल्याप्रमाणें झाल्या. अर्थात् मला मोठ्या गटाकरितां परीक्षक म्हणून नेमण्यांत आलें. आमच्या शाळेंतील बऱ्याचशा विद्यार्थिनी बऱ्याच वरती आल्या आणि एका मुलीनें तर–ही मधुमालती मोहोळकर होती–पहिला नंबर पटकावला. पारितोषिक-वितरण-समारंभ केसरीचे लोकप्रिय

संपादक व माझे नू. म. विद्यालयांतील एक शिक्षक श्री. दा. वि. ऊर्फ बाबूराव गोखले यांचे हस्तें झाला.

त्यांनीं माझ्या मुलींचें फारच कौतुक केलें. कृतज्ञता बुद्धीनें अंतःकरण भरून येऊन मधूनें माझ्यासंबंधीं अत्यंत—नको होते इतके—प्रशंसेचे उद्गार काढले. पुढें कांहीं वर्षांनीं हीच विद्यार्थिनी पुण्याच्या वसंत-व्याख्यानमालेंत उपवक्ति म्हणून बोलतांना श्रोत्यांत बसलेल्या माझ्याकडे बोट करून व माझा नामनिर्देश करून तिनें माझ्यासंबंधींचा आपला आदरभाव व्यक्त केला. तिचें तें करणें मला अप्रस्तुत व अप्रासंगिक वाटलें, पण त्याच्या योगानें माझ्या अंतःकरणाला आनंदाच्या गुदगुल्या झाल्या हें कांहीं खोटें नाहीं.

सोलापूरच्या संस्थेची भरभराट करतांना तेथील जनता, संस्थेची चालकमंडळी, शाळेचा शिक्षक वर्ग व विद्यार्थिनी—या सर्वांना प्रसन्न ठेवणें जरूर होतें; व विशेष म्हणजे विरोधस्थानें हेरून त्यांच्याकडून होणारा संभाव्य विरोध नाहींसा करणें हेंहि जरूर होतें. या दृष्टीनें मी ज्या कांहीं गोष्टी मोठ्या धूर्तपणें केल्या, त्याचें मला स्वतःलाच आतां कौतुक वाटतें.

आमच्या संस्थेशीं स्पर्धा करण्याचा संभव असलेली दुसरी संस्था तेथील ‘ सेवासदन ’ ही होय. त्या संस्थेचे अध्यक्ष रा. ब. दादासाहेब मुळे ( हे नगरपालिकेचेहि अध्यक्ष होते. ) व चिटणीस श्री. सरस्वतीबाई भदे यांची सहानुभूति मिळविली म्हणजे बराचसा कार्यभाग होण्यासारखा होता. रा. ब. मुळ्यांची सहानुभूति मिळविण्यासाठीं मी त्यांचेकडे वरचेवर जाई-येई, व पुण्यांतील संस्थांसंबंधीं गप्पा गोष्टी करीं. तसेंच एका वर्षीं मीं आमच्या संस्थेच्या वार्षिक संमेलनाचें अध्यक्षस्थान मोठी गळ घालून त्यांचे माथीं मारलें. ते आजारी होते तरी खुर्चींतून आणून त्यांस अध्यक्षस्थानीं विराजमान केलें. अपेक्षेप्रमाणें त्यांचें मत ( आमच्या संस्थेबद्दल ) तर चांगलें झालेंच, पण म्युनिसिपालिटीकडील ग्रँटहि वाढली. श्री. भदे बाईंना तर आमच्या शाळेंत आमचेबरोबर बॅड्मिंटन खेळावयास आणून त्यांचीहि सहानुभूति कमावली.

त्याच वेळीं पुण्याच्या शिक्षण-प्रसारक मंडळीचे आजन्म सेवक प्रो. म. शं. गोडबोले, यांना सोलापूरच्या हरिभाई देवकरण हायस्कूलचे हेडमास्तर

नेमण्यांत आलें होतें. ते अत्यंत हुशार, कर्तबगार, ‘ सरळ तर सूत ’ व रा. ब. मुळे यांचे उजवे हात असल्यामुळें त्यांचीहि सहानुभूति मिळवून ठेवणें जरूर होतें. ते शि. प्र. मंडळींत असल्यावेळीं बहुशः प्रो. नारळकरांचे उलट बाजूला असत; व मी त्यांचा ( नारळकरांचा ) जिवश्च कंठश्च मित्र म्हणून माझेबद्दलहि त्यांची फारशी सहानुभूति नसे. त्यांची बदली सोलापुरास झाल्याचें ऐकतांक्षणींच मी त्यांना पत्र पाठवून सोलापुरास माझ्याकडेच उतरण्यास येण्याचा आग्रह केला. या पत्राचा उपयोग होऊन ते सुरवातीचे पांच-सात दिवस माझ्या जेवणाच्या डब्यांत भागीदार बनले. ही आमची सप्तपदीन मैत्री पुढें कायमची टिकली व तिचा संस्थेलाहि फार मोठा फायदा झाला.

आमच्या संस्थेचें कार्य वर थेट शिक्षणमंत्र्यांचे कानांपर्यंत पोंचावें म्हणून मीं त्या वेळच्या उपशिक्षणमंत्रि श्री. सौ. हंसाबेन मेहेता यांना दुसऱ्या एका संमेलनप्रसंगीं अध्यक्ष म्हणून आणलें. त्यांनाहि शाळेची अल्पकाळांतील प्रगति पाहून समाधान झालेंसें दिसलें. सरकारांत वजन वाढलें, ‘ टाइम्स ’ च्या शैक्षणिक पुरवणींत एक अनुकूल स्फुट आलें. शिवाय सोलापूरच्या गुजराथी समाजांतहि संस्थेचा बोलबाला झाला.

तिसऱ्या एका संमेलनाचे वेळीं सुप्रसिद्ध साहित्यिक ना. ह. आपटे यांची अध्यक्षस्थानीं योजना केली. त्यांच्या येण्याचा संस्थेला तर फायदा मिळालाच, पण विशेष म्हणजे दोन-तीन दिवसांच्या निकट सान्निध्यानें आम्हां दोघांची दाट मैत्री जमली. त्यांना माझें ‘ इंदूचें शिक्षण ’ हें पुस्तक अतिशय आवडलें होतें. पुढें बऱ्याच वर्षांनीं-मी बडोद्यास असतांना-त्यांचेकडून त्यांच्या स्वतःच्या ३०-४० पुस्तकांचें एक पार्सल पोस्टांतून आलें. ‘ प्रसाद पोंचला ’ असें लिहून मीं पावतीपत्र पाठविलें. त्याला उत्तर म्हणून ‘ हा प्रसाद नव्हे तर मित्रानें मित्राला दिलेली भेट आहे ’ असें लिहिलें होतें. किती आनंद झाला !

सदरहू पुस्तकें सोलापूरच्या संस्थेंतील वाचनालयांत जमा व्हावींत अशी— नानासाहेबांची मनांतली इच्छा असावी; आणि हें ओळखून मीं तीं सर्व बडोद्याहून सोलापुरास पाठवावयास पाहिजे होतीं. पण मला त्या पुस्तकांचा मोह पडून मी तीं स्वतःच्याच कपाटांत लावलीं !

निरनिराळ्या साहित्यिकांना त्यांनीं आपापलीं पुस्तकें संस्थेला भेट म्हणून पाठवावींत अशा आशयाचीं विनंतिपत्रकें मीं लिहिलीं होतीं. त्याप्रमाणें बहुतेकांकडून थोडीं-फार पुस्तकें आलींहि. विशेष म्हणजे प्रो. ना. सी. फडके यांनींहि आपलीं कांहीं पुस्तकें पाठविलीं होतीं. अप्पासाहेबांची ही देणगी संस्थेवरच्या लोभापेक्षां माझ्यावरच्या लोभाखातरच असावी असें मला वाटतें. कांहींका असेना, 'मंदिरा'चा ग्रंथसंग्रह तेवढ्या प्रमाणांत समृद्ध झाला हें खरें.

या वाढलेल्या ग्रंथसंग्रहासाठीं माझे मित्र अण्णासाहेब जामदार व त्यांच्या पत्नी सौ. माई यांनीं संस्थेला एक मोठें कपाट देणगीदाखल दिलें. ही देणगी संस्थेवरच्या लोभापेक्षां माझ्यावरच्या लोभामुळेंच त्यांनीं दिली हें गुपित मीं फोडलें तर तीं दोघें रागवणार नाहींत अशी माझी खात्री आहे. आणखी कितीतरी गोष्टी त्यांनीं माझ्यावरच्या लोभाखातर केल्या होत्या.

सोलापूर सोडतांना मी माझीं सर्व खाजगी पुस्तकें मंदिराच्या शाळेला भेट म्हणून दिलीं. तीं संख्येनें फार नसलीं तरी वेंचक व बहुमोल होतीं. विशेषतः त्यांत वा. शि. आपटे यांचा सुप्रसिद्ध संस्कृत-इंग्रजी कोष व शॉच्या नाटकांचा सबंध सेट् हीं होतीं. आपट्यांचा कोष मला माझ्या बंधूंनीं मी मॅट्रिकच्या वर्गांत असतांना-अवघ्या तीन रुपायांस विकत घेऊन बक्षीस दिला होता. त्याच्या नवीन आवृत्तीला आतां तीनशें रुपये पडतात असें समजतें. तो मला माझ्या बंधूंनीं दिला होता म्हणून-निदान अत्यंत अल्प-मोलाला एवढा बहुमोल ग्रंथ मिळाला म्हणून तरी मी तो देऊन टाकावयास नको होता.

तीच गोष्ट शॉच्या नाटकांच्या सेटची. तो गंगूबाईनीं लंडनच्या मार्केटांत खरेदी करून खास माझ्या मनोविनोदनाकरितां म्हणून मोठ्या प्रेमानें इकडे पाठविला होता. त्यांच्या त्या भावनेची बूज राखून त्यांच्या प्रेमाची आठवण म्हणून मीं तो सेट् स्वतःजवळ काळजीपूर्वक ठेवावयास पाहिजे होता. पण शाळेवरच्या प्रेमाच्या भरांत मीं तो देऊन टाकला. शाळेवरचें माझें प्रेम लोकांत शोभून दिसलें, पण पत्नीच्या प्रेमाची हेळसांड झाली ना? बऱ्याच बाबतींत माझें असेंच झाल्याचें आतां आठवतें, व त्याबद्दल वाईटहि

वाटतें; पण आतां त्याचें काय ? स्वत: गंगूबाईनीं त्या गोष्टीची ओळख मला अजून दिली नाहीं हा त्यांचा मोठेपणा.

गुरु. कर्वे यांना १८ एप्रिल १९३८ रोजीं ८१ वें वर्ष लागलें. या निमित्तानें अनाथ बालिकाश्रम संस्थेच्या व भारत महिला विद्यापीठाला जोडलेल्या सर्व शाळांतून मोठे अभिनंदन-समारंभ करण्यांत आले. सोलापुरासहि तेथील कार्यकर्त्यांनीं दिवाणबहादुर लिमये यांच्या नेतृत्वाखालीं एक समिति नेमून समारंभ करण्याचें ठरविलें, व त्याप्रमाणें प्रो. कर्वे यांस मुद्दाम सोलापुरास आणवून मेकॉनकी थिएटरमध्यें एक मोठा समारंभ घडवून आणला. शिवाय वर एक थैलीहि अर्पण केली.

अर्थात् हा समारंभ घडवून आणण्यांत व थैलीकरतां पैसे जमविण्यांत मला बराच पुढाकार घ्यावा लागला हें सांगावयास नकोच. संस्थेच्या जोड चिटणीस सौ. सरस्वतीबाई रानडे, सौ. कुसुमगौरी ठाकूर, सौ. काशीबाई लेले इ. स्त्रियांनींहि फार कष्ट घेतले आणि म्हणूनच माझ्या मेहनतीला यश आलें. माझ्या तेथील कामासंबंधीं पुष्कळांनीं गुरु. अण्णांपाशीं जें कांहीं बोलून दाखविलें तें ऐकून अण्णांना फार समाधान झालेलें दिसलें. मलाहि होतच होतें. सोलापूरच्या वास्तव्यांतील हें माझें शेवटचेंच उल्लेखनीय कार्य.

पुढें थोड्याच दिवसांत मला हिंगण्यास परत बोलावण्यांत आलें. मला सोलापुरास पाठविण्यांतला संस्थेचा मूळ हेतु तेथील शाळेचें पूर्ण हायस्कूल करणें व तें वाढीला लावणें हा असून तो माझ्या हातून चांगल्या प्रकारें साधला होता. पण हिंगणें येथील अध्यापिका शाळेची जबाबदारी आश्रमाचे चिटणीस श्री. भास्करराव कर्वे यांजवरच चार वर्षें पडली असून चिटणीस व मुख्याध्यापक या दुहेरी जबाबदारीमुळें त्यांना फार त्रास पडे. तो त्यांचा त्रास कमी करील व अध्यापिका शाळेच्या वाढत्या संख्येवर योग्य प्रकारची देखरेख ठेवण्याकरितां आपला सर्व वेळ अध्यापिका शाळेला देऊं शकेल अशा व्यक्तीची फार जरूरी वाटूं लागली. यामुळें मला परत बोलावण्यांत आलें व त्याप्रमाणें मी १९३९ च्या जूनमध्यें हिंगण्यास रुजू झालों.

सोलापुरांतील चार वर्षांच्या माझ्या कार्यामुळें तेथील सुशिक्षित जनतेंत माझें वजन पुष्कळच वाढलें होतें असें दिसतें. मला सोलापूर सोडून पुष्कळ

वर्षें झालीं तरी मी व माझें कार्य लोकांच्या लक्षांत बराच काळ राहिलें होतें याचें प्रत्यंतर पुढें एका प्रसंगानें आलें. संस्थेच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त संस्थेला देणग्या मिळविण्याकरितां मी सोलापुरास गेलों. आणि सांगावयाला आनंद व अभिमान वाटतो कीं अवघ्या तीन दिवसांच्या अवधींत मी हजारावर रक्कम मिळवूं शकलों. अर्थात् याला कारण माझ्या कर्तृत्वाला अण्णांच्या पायाच्या पुण्याईची जोड होती हें मी कसें विसरेन ?

सोलापुरांत घालविलेला काळ हा माझ्या आयुष्यांतील अत्यंत कर्तृत्वाचा व आनंदाचा काळ असून तो माझ्या सदैव स्मरणांत राहील.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम .................. वि: ..................
क्रमांक नों: दि: ..................

# हिंगण्याच्या आश्रमाचा निरोप : : : १८

सोलापुराहून मी हिंगण्यास आलों तो एखाद्या विजयी वीराप्रमाणें कृतकृत्यतेच्या आनंदांतच आलों. मालकानें सोंपविलेली कामगिरी आपण त्याच्या अपेक्षांपेक्षांहि जास्त चांगल्या प्रकारें बजावली याचें समाधान कांहीं आगळेंच असतें, नाहीं? मी परत आलों याचा माझ्या सर्व सहकाऱ्यांना फार आनंद झाला. मी सोलापुरास गेल्यापासून माझें काम श्री. भास्करराव कर्वे पाहत होते. मी परत आल्याबरोबर त्यांनीं मोठ्या आनंदानें प्रिन्सिपॉलची जागा माझ्याकरितां खाली केली.

नवीन विद्यार्थिनींना माझी ओळख करून देतांना त्यांनीं माझा मोठा गौरव केला, व आपल्यावरचें ओझें उतरलें गेलें म्हणून समाधानाचा निःश्वास सोडला. आपण यापुढें आणखी कांहीं कामगिरी करून दाखवूं असा नवा हुरूप माझ्यांत उत्पन्न झाला. पण पुढें थोड्याच दिवसांत अशा कांहीं गोष्टी घडल्या कीं त्यामुळें माझ्या मनांतले मांडे मनांतच राहून मला सेवानिवृत्त व्हावेसें वाटूं लागलें; व त्याप्रमाणें मी सोलापुराहून आल्यापासून तीन वर्षांनीं म्हणजे १९४२ मध्यें निवृत्त झालोंहि.

असें झालें कीं, मी आजारी पडूं लागलों. कामाचा कंटाळा येऊं लागला. हुरूप नाहींसा होऊं लागला. अध्यापिका शाळेचा कारभारहि दिवसेंदिवस गुंतागुंतीचा होऊं लागला. नवीन नवीन प्रश्न उत्पन्न होऊं लागले. थोडक्यांत म्हणजे आतां हें बस् झालें, यापुढें आपले हातून फारसें कांहीं होणार नाहीं, आहों ह्याच उच्च स्थितींत असतांनाच व दुसऱ्यांना हवे-हवेसे वाटत आहोंत तोंच आपण होऊन दूर व्हावें, कोणी दूर करण्याची वाट पाहूं नये,

असें मनानें घेतलें. अशा मनस्थितींत असतांनाच मनाला विशेष लागणारी एक गोष्ट घडली.

अध्यापिका शाळेची इन्स्पेक्शन् करण्याकरितां मिस् ट्वेल्स् आल्या होत्या. ती इन्स्पेक्शन् नेहमींसारखी चांगली झाली. विद्यार्थिनींना खेड्यांतील मुलांना शिकविण्याचा सराव व्हावा म्हणून हिंगण्याच्या संस्थेनें कोथरूडची शाळा चालवावयास घेतली होती. ती घेतल्यानें आमचें अध्यापनाचें काम चांगलें चाललें आहे असें मी ट्वेल्स्बाईंना थोड्याशा प्रौढीनें सांगितलें. तेव्हां त्यांना ती शाळा समक्ष पाहण्याची इच्छा झाली. मात्र गेले दोन-तीन दिवस इतका भयंकर पाऊस पडला होता व तेव्हांहि पडत होता कीं इन्स्पेक्शन्च्या दिवशींहि मुलें शाळेंत हजर राहूं शकलीं नाहींत. जिकडे तिकडे चिकचिकाट, व रबरबाट झाला होता. याची मला थोडीशी कल्पना होतीच, व म्हणून मी बाईंना कोथरूडच्या शाळेंत नेण्याचें टाळीत होतों.

वास्तविक पाहतां माझ्या सोलापूरच्या कामावर बाई बेहद्द खूष होत्या. माझ्या शब्दावर त्यांचा नितान्त विश्वास असे, पण दुर्दैवानें ( हो, दुर्दैवच नाहीं तर काय ? ) या वेळीं त्यांना कांहीं निराळें वाटलें, व त्यांनीं त्या तशा पावसांतुन व चिखलांतून तिकडे जाण्याचा हट्टाग्रह धरला. आम्ही त्यांच्याच मोटारींतून तिकडे जाऊन पोंचतों तों काय ! शाळेंत मुलें नाहींत. वर्गांत मास्तर नाहीं, जमीन चिखलानें माखलेली, छप्पर वरून ठिबकत असलेलें असा चमत्कारिक देखावा दिसला. माझें मन खट्टू झालें. समर्थन करतां येईना. बाईंचें मन एकदम कलुषित झालें. ' मिस्टर पटवर्धन, तुमच्याबद्दल माझें मत फार चांगलें होतें. तुम्ही मला असें फसवाल असें वाटलें नव्हतें,' अशा आशयाचें त्या इंग्रजींत बोलल्या व एकदम निघून गेल्या !

काय ही नामुष्की ! मी त्यांना जाणूनबुजून फसवीत होतों असें मला अजूनहि वाटत नाहीं. त्यांनीं जाऊन पाहूं नये असें मला वाटत होतें. अशा परिस्थितींत बाई तिकडे जाणार नाहींत आणि म्हणून फारशी तयारी करावयास नको असें वाटण्याइतपत गाफीलपणा माझे हातून झाला हें मात्र खरें. मदतनीस सहकारी ' मला तुम्हीं नक्की सांगितलें असतें तर मीं पाहिलं असतं ' असें म्हणून अंग झाडून मोकळा झाला. झालें, मी फशीं पडलों,

माझी नाचक्की झाली अशासारखें वाटूं लागलें, व सेवानिवृत्त होण्याचा बेत नक्की झाला.

मीं जरा भाबडाच आहें. मदतनिसांना काम निश्चितपणें वाटून द्यावें लागतें तेव्हां ते करतात, नाहींतर नाहीं अशी भावनाच मला कधीं झाली नाहीं. कुटुंब काय, किंवा दुसरी कोणतीहि संस्था काय,– संस्था म्हटली म्हणजे प्रत्येक गोष्टीकडे सर्वांनींच आपुलकीनें पाहिलें पाहिजे, प्रत्येकाला निराळें सांगण्याची गरज नाहीं, अशी माझी भोळी समजूत. संस्था लहान असतांना ही वृत्ति ठीक असेल. पण ती मोठी झाली म्हणजे कामकाजाची योजनाबद्ध वांटणी झालेलीच असली पाहिजे हें त्या वेळीं मला समजतें तर किती बरें झालें असतें !

मी १९४२ मध्यें सेवानिवृत्त होतांना मात्र दोन गोष्टी अगदीं मनासारख्या झाल्यानें कांहीं काळापूर्वी आलेला उदासपणा पार नाहींसा झाला, आणि हिंगणें सोडण्याचे क्षणीं मी अत्यंत आनंदांत होतें. अध्यापिका शाळा १९१७ मध्यें स्थापन होऊन आतां तिला पंचवीस वर्षें पुरीं झालीं होतीं. तिचा रजतमहोत्सव साजरा करूनच मी निवृत्त व्हावें असें सर्वानुमतें ठरलें.

समारंभ दोन दिवस मोठ्या थाटामाटानें व उत्साह-उल्हासानें पार पडला. बहुतेक माजी विद्यार्थिनी माझ्या राजवटींतील या शेवटच्या कार्याला हजर राहिल्या होत्या. मुख्य समारंभाचे दिवशीं सकाळीं त्यांनीं गुरु० अण्णांच्या अध्यक्षतेखालीं माझा सत्कार केला. आपापसांत वर्गणी करून त्यांनीं मला एक लहानशी थैलीहि अर्पण केली.

माझें मन त्या क्षणीं ध्येयवादानें तुडुंब भरलें असावें. त्याशिवाय का मीं विद्यार्थिनींनीं मोठ्या आपुलकीनें दिलेली थैली जशीच्या तशी अण्णांच्या हातीं देऊन संस्थेकडे जमा करण्यास सांगितलें असतें ? अण्णांनीं आपल्या छोट्याशा भाषणांत या गोष्टीचा उल्लेख करून माझ्या त्यागबुद्धीचें कौतुक केलें. माझें मन सुखावलें, पण या माझ्या करण्यानें मीं मुलींचीं मनें दुखविलीं याचें काय ?

मुख्य समारंभाच्या अध्यक्ष लेडी रमाबाई तांबे व इतर वक्ते यांनींहि माझ्या कामगिरीचा खूप गौरव केला. विशेषतः त्या रजतमहोत्सवाचे

प्रसंगानें मी जें एक ‘ कार्यदर्शन ’ ( सुव्हेनीर ) प्रसिद्ध केलें, तें सर्वांना अत्यंत आवडलें;—आणि तें कां नाहीं आवडणार ? झालेंच आहे तसें तें ! अजूनहि कांहीं करमेनासें झालें म्हणजे मी तें वाचीत बसतों, व स्वतःवर खूष होतों. अध्यापिका शाळेवरच्या प्रेमानें प्रेरित होऊन मीं तें लिहिलें होतें.

अध्यापिका शाळेच्या या रजतमहोत्सवाची स्मृति चिरंतन राहावी म्हणून हिंगण्याच्या माळावरच संस्थेच्या उपयुक्ततेंत व सौंदर्यांत भर पडेल असें कांहींतरी करावयाचें—व तें शक्यतों अध्यापिका शाळेशीं विशेष संबंध असलेल्या शिक्षकांच्या व विद्यार्थिनींच्या मदतीनें करावयाचें—असें आम्हीं ठरविलें. अर्थात् आमची आर्थिक कुवत ओळखून फार मोठी उडी न घेतां आमच्या अवसानांत बसेल अशीच योजना आंखली.

हिंगण्याच्या माळावर १९०० सालीं अण्णांनीं जी पहिली ‘ झोंपडी ’ बांधली होती तिची गेल्या चाळीस वर्षांत बरीचशी पड-झड झाली होती. या रजतमहोत्सवाचे निमित्तानें तिचें दर्शनी स्वरूप शक्य तितकें कायम ठेवून तिचा जीर्णोद्धार करावा असें आम्हीं योजिलें. या कामाकरितां कमीत कमी पांच-सात हजार रुपये तरी लागणार होते. ही रक्कम उभी करण्याकरितां मी महाराष्ट्रभर दौरा काढला व अध्यापिका शाळेच्या माजी विद्यार्थिनींना जाऊन भेटलों.

अध्यापिका शाळेच्या विद्यार्थिनी म्हणजे प्राथमिक शाळांत काम करणाऱ्या बिचाऱ्या गरीब मास्तरणी ! त्यांची प्राप्ति ती अशी कितीशी असणार ! त्यांतच बहुतेकींच्या गळ्यांत—स्वतःचा नसला तरी—भावाबहिणींचा प्रपंच पडलेला. ( असे प्रपंच त्या कसे सांभाळतात याचें मला नेहमीं कौतुक वाटतें व त्यांच्याबद्दलचा माझा अभिमान व आदर दुणावतो. ) पण अशा परिस्थितींतहि आपल्या अध्यापिका शाळेवरील प्रेमानें व अभिमानानें प्रेरित होऊन त्यांनीं करतां येईल ती मदत केली व मला विन्मुख पाठविलें नाहीं. कै० सुंदराबाई बापट या विद्यार्थिनीनें तर केवळ या प्रसंगानिमित्त एकशें एक रुपये दिले.

संस्थेतील आजन्म सेवकांनीं व शिक्षकांनींहि—विशेषतः अध्यापिका शाळेच्या शिक्षकांनीं—आपण होऊन बरीच मदत केली. रजतमहोत्सव-

स्मारकाची ही कल्पना आवडून इतर उदार धनिकहि मदतीकरतां पुढें आले. फलटण संस्थानचे अधिपति व सांगलीच्या 'गजानन मिल्स्'चे मालक श्री. वेलणकर हे अशा दात्यांपैकीं प्रमुख होत.

एकंदर रक्कम सात हजारांपर्यंत गेली आणि 'झोंपडी'च्या जीर्णोद्धाराचा संकल्प सिद्धीस गेला. शेवटीं जातां जातां हें काम आपले हातून— आपल्या पुढाकारानें—पार पडलें या गोष्टीचा किती आनंद झाला—केवढें समाधान झालें म्हणून सांगूं ? आतां या सुधारून वाढविलेल्या झोंपडीचा अण्णांचें माळावरील वसतिस्थान व संस्थेला भेट देणाऱ्यांकरितां अतिथि-निवास असा दुहेरी उपयोग होत असल्याचें पाहून आम्हांला आमच्या योजकतेचें कौतुक वाटतें.

या समारंभाला उपस्थित राहण्यासाठीं म्हणून गंगूबाईंनीं आपलें बडोद्यास जाणें लांबविलें होतें. तो समारंभ व त्यांत झालेलें माझें कौतुक पाहून त्यांना अतिशय आनंद झाला. दुसऱ्या लाखों लोकांनीं केलेल्या कौतुकापेक्षां स्वतःच्या एका 'माणसा'नें केलेल्या कौतुकाची मातब्बरी केव्हांहि काय जास्तच असते, नाहीं का ?

त्या वेळची दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे मी संस्था सोडून जातांना मला निरोप देण्याचा जो समारंभ झाला तो. श्री. कमळाबाई देशपांडे यांनाहि त्याच दिवशीं निरोप देण्यांत आला. सकाळीं त्यांचा समारंभ झाला—दुपारीं माझा. आम्हां दोघांना एकाच दिवशीं निरोप देण्यांत यावा हा एक योगायोगच नव्हे काय ?

कमळाबाईंचे वडील व मातुश्री—दोघेजण स्वतः हजर होतीं. समारंभ अत्यंत अनौपचारिक पद्धतीनें साजरा करण्यांत आल्यामुळें त्याला विशेष गोडी आली होती. दुपारीं माझेप्रीत्यर्थ समारंभ झाला. तोहि सकाळच्या-सारखाच गोडीचा व आनंदाचा झाला. अध्यक्षस्थानीं माझे मित्र नाना नारळकर यांची योजना झाल्यानें त्याच्या अनौपचारिकपणांत फार मोठी भर पडली होती. माझ्या वैयक्तिक गुणांच्या स्तुतिपर व कार्यांच्या गौरवपर विद्यार्थिनी, सहकारी, तात्या व खुद्द अण्णा अशांचीं भाषणें झालीं. माझेंहि झालें. दुःखाच्या व वियोगाच्या प्रसंगीं केलेलीं माझीं भाषणें नेहमींच

रंगतात. त्यावेळचेंहि भाषण असेंच रंगलें. संस्थेनें एक शाल व बाळूबाईंनीं ( आतांच्या मालतीबाई बेडेकर ) एक घड्याळ व फाऊंटन पेन असा अहेर केला. शेवटीं नाना नारळकर बोलावयास उठले. 'मी जास्त कांहीं सांगत नाहीं. तुमच्या नानांचा आदर्श डोळ्यांपुढें ठेवून जीवनांत वागा' अशा आशयाचें थोडक्यांत पण भावनायुक्त अंतःकरणानें त्यांनीं भाषण केलें. टाळ्यांचा कडकडाट झाला. मला स्वर्गीय आनंद झाला. गुरु० अण्णांनीं, तात्यांनीं, नानांनीं माझी पाठ थोपटली. यापरतें माझ्या सेवेचें दुसरें कोणतें बक्षिस मला पाहिजे होतें? सभा संपली, माझें हिंगण्याचें वास्तव्यहि संपलें.

हिंगणें येथील वीस वर्षांच्या माझ्या कार्यासंबंधीं व माझ्यासंबंधीं माझ्या सहकाऱ्यांचें काय मत बनलें होतें हें संस्थेच्या त्या वर्षाच्या अहवालावरून दिसून येतें. त्यांत म्हटलें आहे, "अध्यापिका शाळेच्या रजतमहोत्सव साजरा झाल्यानंतर श्री. नाना पटवर्धन यांची प्रकृति ठीक नसल्यामुळें त्यांना आपल्या सेवेचा राजीनामा द्यावा लागला, हें संस्थेचें दुर्दैव होय. कारण आपला गोड स्वभाव, विद्वत्ता, अध्यापनकौशल्य व सात्विकता या गुणांमुळें ते विद्यार्थिनींमध्यें फार प्रिय असत. संस्थेचे इतर आजन्मसेवक-सेविका, शिक्षक व शिक्षिका यांच्याशीं ते नेहमीं प्रेमानें वागत, म्हणून ते सर्वांना हवेहवेसे वाटत. अध्यापिका शाळेची-म्हणजे पर्यायानें आश्रमाची सेवा त्यांनीं एकनिष्ठपणें व मनोभावें केली." या धन्योद्‌गारांनीं माझ्या सेवेचें पुरें पुरें चीज झालें असें मी मानतों.

दुसऱ्या दिवशीं पहांटेसच हिंगणें सोडावयाचें म्हणून माळावरच्या मंडळींना अदल्या दिवशींच भेटावयास गेलों. जेथें जेथें गेलों, तेथें तेथें तत्कालीन व्यक्ती व गोष्टी तर पाहिल्याच, पण त्या व्यक्तींशीं व स्थळांशीं संबद्ध असलेल्या भूतकालीन व्यक्ती व गोष्टीहि आठवल्या.

सकाळीं स्नानाला 'फरसा'कडे निघालों. शेजारच्या सईताईंच्या खोलीवरून जातांना त्यांच्या बयोची आठवण झाली. 'आमच्या इंदूचें शिक्षण' हें पुस्तक मी लिहीत असतांना ती माझ्याकडे मुद्दाम येई व लिहून झालेला भाग मोठ्या आवडीनें वाची. आणि एकंदर लिखाण सुंदर होत असल्याचें सांगून मला उत्तेजित करी.

पुढें चिटणिसांच्या खोलीवरून जातांना त्यांच्या प्रमिलेची आठवण होऊन मन अस्थिर झालें. ती इंदूची 'फास्ट फ्रेंड' होती. खालीं भास्कर-रावांकडे गेलों. भास्करराव बूट-पॉलिश करीत होते.

"या नाना, बरे आलांत वेळेवर; चहा घ्यायला या!" कावेरीबाईंनीं हांक मारली. "आज कोणाला नाराज करावयाचें नाहीं," असें म्हणत कावेरीबाईकडे गेलों.

"भास्करराव, उद्यां पहांटे जाणार, लोभ असाच चालू ठेवा. तूं-तुम्ही आजन्मसेवक झाल्यावर आपण कधीं कधीं भांडलों असूं. पण तुझा माझ्यावर लोभ होता हें नक्की." मी जरा गहिंवरल्या आवाजानें म्हटलें.

"आज ही भाषा कां? आपला लोभ कधीं कमी होणार आहे का? माझें सहसा कोणाशीं जमत नाहीं, पण तुमच्याशीं मात्र अखेरपर्यंत जमलें." भास्करराव चहा पीत पीत म्हणाले.

"तुला ती सुरुवातीची सिंहगडाची ट्रिप आठवते ना? सबंध वाटभर आपण नाटकांतलीं गाणीं म्हणत चाललों होतों. आणि सीताबाई अणि-गेरींचें तें कड्यावरून कोसळणें? आपण चौघांनीं त्यांना खांद्यावरून धर्मशाळेंत नेलें होतें. बाई जायचीच त्या दिवशीं; पण नाहीं गेली." मी मागला प्रसंग आठवून म्हटलें.

"मुंबईच्या कन्याशाळेची वाढ व्हावयाची होती ना त्यांच्या हातून. पुढें कसें काय होतें तें पाहावयाचें." भास्करराव जरा अवांकत म्हणाले. कावेरी-बाईंनीं दिलेली आवळ्याची सुपारी तोंडांत टाकून तेथून निघालों.

स्नान आटोपून जयाबाईकडे धुणें टाकून मी 'अ' बोर्डिंगांत अक्कांच्या बोर्डिंगस्टाफचा चहा घ्यावयास गेलों. नांवाला 'चहा,' पण कितीतरी पदार्थ सोबतीला होते. "नाना, कॅरम् खेळावयाचा का?" माई बेंद्रे यांनीं नेहमींप्रमाणें हंसत हंसत विचारलें. "अजून हिंगण्यास नोकरी करायची आहे," अक्कांनीं काळा—वेळाची जाणीव दिली.

चहा पितां पितां व समोरच्यांशीं बोलतां बोलतां दुर्गाताई किर्लोस्कर व सीताबाई बनारसे यांचीं बोलणीं निघालीं. दुर्गाताईच्याबद्दल दुसरें काय बोलणार? त्यांचें कडक बोलणें, पण मऊ मन यांसंबंधीं वामनराव,

भास्करराव व मी विद्यालयाच्या चौकांत मांडव घालतांना दमून गेलेले पाहून मावशींनीं (सीताबाईंनीं) स्वतः होऊन गोड व थंडगार सरबताचे पेले आणून दिले होते असें सांगून, थोड्याशा खवचटपणें व चिडविण्याच्या बुद्धीनें मी म्हटलें, " असे होते आम्हां त्यावेळच्या काम करणाऱ्यांचे संबंध, नाहींतर आतां ! " बोर्डिंग स्टाफचा निरोप घेऊन निघालों.

' कृष्ण ' तलावाशीं आलों तों माझें धाड धाड आवाजाचें पहिलें नवथर पोहणें व कांठावरच्या मुलींचें तोंडाला पदर लावून हंसणें आठवलें. कसलें तें माझें पोहणें ! कांहीं कांहीं लहान मुली किती छान पोहत ! अक्का नि सईताई त्यांना शिकवीत असत. माझ्या पूर्वीच्या विद्यार्थिनी सरलाबाई खोत यांचीहि आठवण झाली. त्यांनीं त्या तलावाकरितां २८०० रुपये दिले होते.

ऑफिसवरून जातांना ' इचलकरंजी सभागृह ' लागलें; व गंगूबाईंनीं फेडलेलें कर्ज त्याच्या निर्मितीला कसें कारण झालें तेंहि आठवलें. सभागृहांत डोकावून बाबासाहेब इचलकरंजीकरांच्या फोटोला व बापूसाहेब चिपळूणकरांचे फोटोला नमस्कार केले. एक माझे उपकारकर्ते व हितचिंतक, तर दुसरे माझे आप्त व आध्यापिका शाळेचे पहिले प्रिन्सिपॉल होते.

त्या सभागृहाच्या जागीं तात्यांनीं व मीं तयार केलेली बाग, तिच्या सभोंवार लावलेलीं आंब्यांचीं व बुचाचीं झाडें इत्यादि गोष्टी, व बागेत संध्याकाळीं काम करीत असलेल्या राधाबाई कुळकर्णी, यशवंती शिर्के, घैसास, गद्रे, दांडेकर, जोशी, ताम्हनकर, इनामदार इत्यादि व्यक्ती झर्रदिशी डोळ्यापुढें येऊन निघून गेल्या. काम करीत असतांनाच तात्यांचा तो विनोद व आम्हां सर्वांचें हंसणें अजून कानांत घुमत आहेत.

पुढें ' आश्रमा 'कडे फिरकलों तों आश्रमाच्या चौकांतून " हे वंद्य आश्रमा त्वां, माझे प्रणाम घ्यावे," " गुरुराज थोर अण्णा लाधोत, श्रीमहर्षी, " " गुरुशिष्य भक्ति राहो, अतिपूज्य आश्रमींची," " लववीन नम्र माथा, हे आश्रमा पवित्रा." या मायदेवांच्या आश्रमगीतांतल्या ओळी कानांत निनादूं लागल्या. आश्रमाची रोजची सामुदायिक प्रातःप्रार्थना त्या चौकांत होत असे.

अध्यापिका शाळेच्या ऑफिसांत श्री. शारदाबाई साठये कागद चाळीत बसल्या होत्या. माझ्या मागून त्या प्रिन्सिपॉल् व्हावयाच्या होत्या. हळूंच जवळ गेलों व जरा भारावलेल्या अंतःकरणानें म्हणालों, "शारदाबाई, मी उद्यां पहांटे निघालों. माझ्या अध्यापिका शाळेचें पालन या पुढें तुम्हीं करावयाचें आहे; नीट करा. तुमचा एका काळचा गुरु, म्हणून तुम्हांला अधिकारानें सांगायला मला धीर होत आहे. बापूसाहेब चिपळूणकरां-पासून मिळविलेली ही ज्योत आतां तुमच्यापाशीं देत आहे."

त्याहि तितक्याच गंभीरतेनें म्हणाल्या, "नाना, सुखानें अन् निश्चितपणें जा. मी अध्यापिका शाळेचें पालन तर करीनच, पण शिवाय तुमच्या आशीर्वादानें तिचें पोषण आणि भरणहि करीन. तुम्हांला पुढें दिसेलच." आणि खरोखरच त्यांनीं आपला शब्द पुरा केला.

शिक्षकांच्या चाळीकडे चाललों तों फाटक व कवी यांच्या खोलीकडे पाय वळले. थोडा वेळ चहा, तपकीर, थट्टा-विनोद करून शेजारीं देवांकडे गेलों. एक फारशी किताब पढत असलेली त्यांची खादीधारी मूर्ति दाराशींच घोंगडीवर बसलेली दिसली. त्यांना नमस्कार करून व 'शुभास्ते पंथानः' असा आशीर्वाद घेऊन पुढें सरकलों, तों व्हरांड्यावरच आपल्या व्याकरणाचीं प्रुफें तपाशीत बसलेली मोने मास्तरांची मूर्ति आठवली. व्याकरणाची केवढी आवड व अभिमान! पुढच्या खोलींतील खिडकीशीं उभे असलेले रामभाऊ जोशी दिसले. तोंडांत विडी व हातांत एक रोपटें अशा पवित्र्यांत त्यांचें सृष्टिनिरीक्षण चाललें होतें. मित्रत्वानें त्यांच्या पाठीवर थाप मारून व त्यांचा निरोप घेऊन पुढें झटकलों. बचूभाई व मा. रं. देशपांडे यांची आठवण झाली. देशपांड्यांचें काय तें कडक सोंवळें! पश्चिमेकडील अगदीं पहिल्या खोलीकडे दृष्टि जाते तोंच तिच्यांतल्या आमच्या नव्या संसाराचा पहिला दिवस व इंदूच्या दुखण्याचा शेवटचा दिवस यांच्या गोड-कटू स्मृति जागृत झाल्या.

दुसऱ्या दिवशीं सकाळींच हिंगण्याच्या हिरव्या मोटारींत सगळें सामान भरून, सर्व गडीमाणसांना बक्षिसी देऊन व हिंगण्याच्या माळाला 'राम-राम' करून मुलींच्या जयजयकारांत मीं कालवा ओलांडला. मोटार जरा पुढें जाते तोंच 'वनदेवी' लागली; तिला नमस्कार केला. वळसा

घालून मोटार पुढें जाते तोंच म. म. जोश्यांची दहनभूमि दिसली. वीस वर्षांपूर्वी त्यांनीं आम्हां भावी वधूवरांना टेकडीवर दिलेला संदेश आठवला. दोन ओढे ओलांडून गाडी कोथरूडच्या महादेवासमोर आली. गाडींतूनच महादेवाला नमस्कार करून व आतांप्रमाणें पुढचेंहि आयुष्य चांगलें जावो अशी मनांत प्रार्थना करून कॉलेजाशेजारच्या कालव्यापाशीं आलों. पंधरा वर्षांपूर्वी गांवांतून सायकलीवरून येतांना तेथेंच एका निवडुंगाच्या बेटांत पडल्याचें व अंगभर कांटे भरल्याचें आठवलें.

कॉलेजच्या कांपाउंडांत मोटार घेऊन अण्णांना व बायांना नमस्कार करण्यासाठीं त्यांच्या खोलीवर गेलों. दोघें चहा पीत होतीं. मी आलेला पाहून आपल्या कपांतला एक घोटभर चहा दुसऱ्या कपांत ओतून बायांनीं तो माझ्यापुढें केला; व प्रसाद म्हणून मी आनंदानें स्वीकारला.

“ बडोद्याला जातों आहें—बायकोकडे मजा मारायला ” असें मी सांगितलें, तेव्हां बाया म्हणाल्या, “ कसली मारतोस मजा ! तुला तेथें करमायचें नाहीं. बघशील. मी नव्हतें का अशीच आफ्रिकेंत शंकराकडे गेलें-मजा मारायला ? मला वाटलं होतं, तिथल्या ऐषारामांत मी अगदीं रमून जाईन. पण जन्मांत कधीं स्वस्थ व सुखांत बसण्याचें माहीत नाहीं. सात-आठ दिवस केली मजा, पण पुढें मजेचा कंटाळा आला आणि पुन्हां येथल्यासारखी आश्रमाकरितां भिक्षा मागायला दारोदार जाऊं लागलें. ”

अण्णा आतांपर्यंत स्वस्थ ऐकत बसले होते. बायांचें बोलणें संपलेसें वाटून ते म्हणाले, “ खरें आहे बायांचें म्हणणें. कांहीं दिवसांनीं बरं वाटलं म्हणजे तुम्ही आपले इकडे या. वर्गणीच्या कामाकरितां-नाहींतरी-कोणी चांगलं माणूस पाहिजेच आहे. एकट्या कृष्णाताईच्यानें तें आतां होत नाहीं.”

दोघांच्याहि बोलण्याला नुसतं हं हं म्हणून व त्यांना अभिवादन करून मीं तेथून पाय काढला. नाहींतर बाया मोटारींत जागा आहे का म्हणून विचारावयाची !

शेजारींच नाना आठवल्यांकडे डोकावलों. नाना एका यंत्राशीं कांहीं खट्ट खुट्ट करीत होते. “ अरे ! तुम्ही आलांत का ! मीच हिंगण्यास तुम्हांला भेटायला येणार होतों. चला घरांत ! ” असें म्हणून त्यांनीं मला आपल्या राहत्या जागेंत नेलें.

" कृष्णाताई, अहो कृष्णाताई " मीं हांक मारली. त्या बागेंत कुदळीनें कांहीं काम करीत होत्या. त्या तशाच पुढें आल्या.

" तुम्हांला शेवटचा नमस्कार करायला आलों आहे." मी हंसत हंसत म्हटलें. ' शेवटचा ' ह्या शब्दाचा अर्थ ओळखून त्यांहि हंसत-हंसत म्हणाल्या, " जातां-जातां सुद्धां तुमची थट्टा चालू द्या, मेल्यानो. शेवटीं-सुद्धां असेच थट्टा करीत करीत जाणार कीं काय ? बाकी, मला तुमची थट्टा आवडते. आतां हिंगण्यास कोणी थट्टा करावयास मिळणारच नाहीं. जा आतां बायकोपाशीं, अन् नीट बरे व्हा." हीं सर्व वाक्यें त्या इतक्या झपाट्यानें बोलल्या कीं, मला कशाचेंच उत्तर देतां आलें नाहीं. फक्त त्यांना आणि नानांना नमस्कार केला, अन् सईताईनीं आणून दिलेल्या घरच्या पेरूच्या फोडींपैकीं एक फोड तोंडांत टाकून पुढें निघालों.

चर्च आलें. सोपानरावांना आतां बोलण्याला धीर आला. " येथेंच चिखलांत मोटार रुतली होती. तुम्ही नि तात्यांनीं चिखलांत उतरून ती वर उचलून ढकलली होती " त्यांनीं आठवण दिली. " मोटारशीच काय ! छकड्याचा बैल बसला होता तेव्हां छकडासुद्धां थोडासा ओढीत नेला होता." मीं सांगितलें. " आतां कमळाबाईकडे जायचं अन् तेथून थेट घरीं जायचें. " मीं आठवण दिली.

कमळाबाई ओटीवरच एक ग्रंथ वाचीत बसल्या होत्या. त्या उठून पुढें आल्या. " आज तुमच्याशीं कांहीं बोलायचें नाहीं, तुम्हांला कांहीं खायला-प्यायला द्यावयाचें नाहीं असें मीं ठरविलें आहे " असं त्या गर्दी-गर्दीत म्हणाल्या.

" फार चांगलं केलंत. नुसता नमस्कार स्वीकारा म्हणजे निघालों. " आणि खरोखरच फक्त नमस्कार स्वीकारून आणि ' बरे व्हा ' एवढेंच म्हणून त्यांनीं मान वळविली. मीहि निघालों. कमळाबाईचा आंतरिक हेतु मीं ओळखला. बाई शहाणी खरीच.

" नाना, लकींत चला, मी आज तुम्हांला चहा पाजतों. इतके दिवस तुम्हीं पाजलांत, मला एकदां तरी पाजूं द्या " असें म्हणून सोपानरावांनीं मोटार ' लकी ' समोर घेतली.

'लर्की 'त पाऊल टाकतों तों तेथें कोण दिसावें ? वामनराव विडी ओढीत, व वर्तमानपत्र वाचीत कोपऱ्यांतल्या टेबलासमोर बसले होते. एकमेकांना पाहून आम्हां दोघांना इतका आनंद झाला कीं, भोंवतालच्या बघ्यांचें भान नसतें तर आम्हीं एकमेकांना मिठीच मारली असती.

" इतका वेळ घरीं तुमची वाट पाहिली, अन् मग इकडे आलों. सामानसुमान घेऊन निघालांत ? आतां पुन्हां गांठी-भेटी ? का एकदमच वरती ? " असें म्हणून ते नेहमींच्या विषण्णतेनें हंसले.

सोपानानें दोघांकरितां चहा मागविला. तो पितां पितां इतर थोड्या गप्पा मारल्या व त्यांना तेथेंच वांकून नमस्कार करून मी मोटारींत चढलों. सोपानानें मला सुखरूप घरीं पोंचविलें.

" हिंगण्याची मोटार आली, काकांची मोटार आली " कमी, लिली, दत्ता व दुसरीं मुलें आनंदानें ओरडलीं.

◎ ◎ ◎

# बडोद्यांतील निवृत्त जीवन : : : १९

मी बडोद्यास सुमारें बारा वर्षें ( १९४२ ते १९५४ ) होतों. हिंगणें सोडून बडोद्यास जाण्याला निघते वेळीं मी एका चमत्कारिक मनःस्थितींत होतों. आपण निवृत्त झालों म्हणजे म्हातारे व दुर्बल झालों, आणि आतां आपल्याला प्रकृतीला जपून राहिलें पाहिजे अशी चमत्कारिक भावना होऊं लागली होती. हिंगण्यास तसा मी थोडासा आजारी पडत असें हें खरें, आणि म्हणूनच लवकर सेवानिवृत्त झालों हेंहि खरें. पण म्हणून कांहीं वरीलसारखी रोगट भावना उत्पन्न व्हावयास पाहिजे होती असें नाहीं.

तेथें जावयाचें म्हणजे मनानें मरगळलेल्या एखाद्या सेवानिवृत्तासारखें सकाळ-संध्याकाळ गरम कपडे घालून व हातांत काठी घेऊन हिंडायास जावयाचें, बेतानें खावया-प्यावयाचें, अधून-मधून केसरी, टाईम्ससारखें भारदस्त वर्तमानपत्र वाचावयाचें, किंवा तेथील वाचनालयांतून सात्विक व धार्मिक वाङ्मय आणून तें वाचावयाचें, दुपारीं विश्रांति घ्यावयाची-वीस वर्षांच्या खडतर नोकरीनंतर अशी विश्रांति शरीरास जरूरच आहे—आणि रात्रीं नवाचे आंत-चमचाभर त्रिफळा घेऊन व गीतेचा एखादा श्लोक म्हणून झोपीं जावयाचें असें बेत रचीत मी बडोद्यास निघालों.

निघतांनादेखील मी किती बंदोबस्तानें निघालों होतों ! अदल्याच दिवशीं व्हरायटी स्टोअर्समधून भारी किंमतीचे पायमोजे घेतले होते ते चढवले, एक स्कार्फ घेतला होता तो गळ्याभोंवतीं गुंडाळला. निवृत्त होतांना आजन्म सेवक मंडळींकडून एक शाल मिळाली होती ती अंगाभोंवतीं लपेटली, व दादरला गुजराथ मेलमध्यें बसून पुढें निघालों.

डहाणू-रोडपर्यंत त्या पॅकबंद स्थितींत गेलों; पण इतकें उकडावयास लागलें कीं एक-एक करतां-करतां सर्व गरम कपडे अंगावरून काढून पेटींत न भरतां पिशवींत कोंबले-न जाणो, मधेच लागले तर वरच असावेत. शेजारचे दोन-चार गुजराथी माझ्याकडे पाहून हंसलेसें वाटलें. त्यांना काय माहीत कीं मी पेन्शन घेऊन बडोद्यास जाण्यासाटीं व तेथें प्रकृतीस जपण्या-साटीं जात आहें ? मी रात्रीं दोनच्या सुमारास बडोद्यास जाऊन पोंचलों.

मी दिल्ली एक्स्प्रेसनें जाऊन फटफटीत उजाडल्यावर बडोद्यास घरीं पोंचेन अशा रास्त समजुतीनें गंगूबाई गाढ झोपल्या होत्या. गड्यानें दार उघडलें व उजाडावयास थोडाच अवकाश असल्यानें पुढच्याच खोलींत माझेसाठीं गादी घालून दिली. मी तेथेंच झोंपलों. सकाळीं गंगूबाई जाग्या होतांच गड्यानें 'बाहेर पाहुणे आले आहेत' अशी वर्दी दिली. त्या बाहेर येऊन पाहतात तों मींच ! 'अरे, हे पाहुणे नव्हत, मालक आहेत' असें गंगूबाईनीं गड्याला सुनावलें, व तो जीभ बाहेर काढून निघून गेला.

हा सर्व प्रसंग मोठा नाट्यमय झाल्यामुळें इतक्या विस्तारानें वर्णिला. चहा घेतांना गंगूबाई म्हणाल्या, 'प्रकृति बरी दिसते आहे; आतां विश्रांति घेऊन आणखी सुधारा.' काय ! प्रकृति बरी दिसते आहे ? मग मला जें गेले कित्येक दिवस अजारी-अजारी असल्याचें वाटत होतें तो भासच होता कीं काय ! आणि तेव्हांपासून स्वतःच्या प्रकृतीसंबंधानें कांहीं बोलावयाचें नाहीं, औषधपाणी वगैरे फारसें घ्यावयाचें नाहीं, चांगलें निरोगी स्थितींतल्यासारखें राहून शक्य तितक्या लवकर कांहींतरी कामाला लागावयाचें असें मीं ठरविलें.

पहिले कांहीं दिवस खरोखरच पेन्शनराच्या ऐटीनें व वैभवानें घालविले. पुण्याहून निघण्यापूर्वीं मनांत योजलेला सर्व रोजचा कार्यक्रम सुरू केला व तो चांगला मानवलाहि. सकाळ-संध्याकाळ हिंडावयास जावयाचें, एका मसाजिस्टकडून शरीर मर्दन करून घेऊन स्नान करावयाचें, सकाळचा टाईम्स वाचावयाचा, सकाळीं दुसऱ्यांदा चहा घ्यावयाचा, भोजनोत्तर दोन-तीन तास थोडीशी वामकुक्षी करावयाची, पुन्हां मधल्या वेळचें खाद्य चहापान करून हिंडावयास जावयाचें व रात्रीं निजतांना कांहीं सटरफटर

चाळावयाचें ( प्रो. म. म. जोशी यांनीं सुचविलेला गीता वाचण्याचा बेत बदलला ) अशा प्रकारच्या गोष्टींत दिवस जाऊं लागले.

घरांत गडी दिमतीला असल्यानें घरांतलें असें कांहींच काम मला करावयास उरलें नाहीं. बाजारांतले सर्व जिन्नस घरींच दारावर मिळत असल्यानें तेंहि काम उरलें नाहीं. मध्यम स्थितींतल्या लोकांचा एक क्लब होता. तेथें ब्रिज्, बॅडमिंटन् अशांसारखे खेळ चालत. ब्रिज पैसे लावून खेळत. पण पैसे लावून खेळणें हें आर्थिकदृष्ट्या सोयीचें व नैतिकदृष्ट्या प्रशस्त नव्हतें. मी सोलापुरास व हिंगण्यास असतांना थोडेंसें बॅडमिंटन् खेळलों होतों, पण त्याला बरेच दिवस लोटल्यानें ती शक्ति व तें चापल्य आतां उरलें नव्हतें. साहजिकच चांगले लोक माझ्याशीं खेळावयाला अळंटळं करीत. माझ्या वयाला व तथाकथित विद्वत्तेला ते खेळण्याचे बाबतींत कसा काय मान देणार ! फुकटच्या गप्पा मारून पाहिल्या, पण विषय निराळे पडत. त्यांच्या विषयांत मला गम्य नाहीं, माझ्या विषयांत त्यांना गोडी नाहीं. एवंच क्लब जॉईन केला, पण तेथें मन रमेना.

कमिटी बागेतला पशुपक्षीसंग्रह, तेथील चित्रशाळा ( पिक्चर गॅलरी ), पुराणवस्तूसंग्रह, हीं एकेकदां पाहून झालीं. आठवड्याचा बँड ऐकून पाहिला. सेंट्रल लायब्ररींतून पुस्तकें आणीं, पण आजपर्यंत वाचनाकरितां वाचन करण्याची संवय नव्हती. जें कांहीं वाचावयाचें तें शिकविण्याला लागणारें वाचीं. म्हणून तीं पुस्तकें वाचून होईनात.

दिसायला दिवस फार-चांगले जात. 'ना काम-धाम, ना धंदा, मी फुगेन बघतां बघतां' असें जें मला, गंगूबाईंना व इतरांना वाटत होतें तें मात्र घडेना. मुलींना शिकवण्याचा आणि वामनराव, नारळकर यांसारख्या प्रेमळ मित्रांशीं काव्यशास्त्र-विनोद करण्याचा व मनसोक्त गप्पा मारण्याचा मनाला लागलेला छंद येथें कसा पुरा होणार ? गंगूबाई सकाळपासून संध्याकाळ-पर्यंत-नव्हे पहांटेपासून रात्रीपर्यंत-आपल्या कामांत सदैव दंग. सकाळीं कर्वे कॉलेज, दुपारच्या जेवणापासून रात्रीच्या जेवणापर्यंत 'स्त्री-अध्यापन पाठ-शाळा;' त्यांतून सवड झालीच तर गांवांतील स्त्रियांचे निरनिराळे क्लब व समाज, सुटीचे दिवशीं सभा-संमेलनें,-किंवा भारत महिला विद्यापीठाच्या पुण्या-मुंबईतील बैठकी-अशा अनंत प्रकारच्या कार्यांत नेहमींच मग्न असलेल्या.

अशा स्थितींत माझा वेळ मजेंत व आनंदांत जावा, एतदर्थ त्यांना-इच्छा असूनहि कांहीं करतां येईना. आणि समजा, अंगीकृत कार्य थोडेसें बाजूला ठेवून माझ्या समाधानाकरितां कांहीं काळ देण्याचें त्यांनीं ठरविलें असतें तर मलाच तें आवडलें नसतें. सारांश, थोड्याच काळांत मला जिणं रिकामं-रिकामं वाटूं लागलं. 'आमच्या इंदूचें शिक्षण' या माझ्या पुस्तकांत माझ्या नाशिकच्या पेन्शनर मित्राच्या, व्यंकटरावांच्या 'रिकाम्या जिण्याची करुण कहाणी' मीं सांगितली आहे ती अर्थात् काल्पनिक आहे. पण माझ्या जिण्याची वर सांगितलेली करुण कहाणी मात्र अक्षरशः खरी आहे.

अशा कोंदटलेल्या जीवनांत माझ्या सुदैवानें अगदीं अचानकपणें एक सोन्याचा दिवस उगवला व मला हवा असलेला उद्योग मिळाला. त्याचें असें झालें कीं, सौ. रजनीबाई आपटे नांवाच्या एका हुशार व होतकरू विद्यार्थिनीनें मराठी हा ऐच्छिक विषय घेऊन भा. म. विद्यापीठाच्या जी. ए. परीक्षेला बसण्याची आपली इच्छा गंगूबाईंना—त्या कर्वे कॉलेजच्या प्रिन्सिपल असल्यानें—कळविली. त्या वेळेपावेतों बडोदें कॉलेजांतील मराठीचे प्रोफेसर श्री. स. वि. देशपांडे हे एकटेच या कॉलेजांत मराठी शिकवीत असत. त्यांना जास्त वेळ नसल्यानें या कॉलेजांत ऐच्छिक मराठी शिकवण्याची तरतूद नव्हती. अर्थात कोणीहि विद्यार्थिनी ऐच्छिक मराठी घेत नसे. आतां एक विद्यार्थिनी आपण होऊन विचारते आहे व मी तो विषय फुकट शिकविण्यास तयार आहें असें पाहून गंगूबाईंनीं माझी नेमणूक करवून घेतली.

माझ्या हिताकरितां म्हणून ज्या अनेक गोष्टी गंगूबाईंनीं आतांपर्यंत केल्या आहेत त्यांतील ही एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे असें मी मानतों. मीं हिंगण्याच्या आध्यापिका शाळेंत मराठी शिकवीत असें. मुंबई युनिव्हर्सिटीच्या मॅट्रिक्युलेशन परीक्षेंत व भारत महिला विद्यापीठाच्या प्रवेश (मॅट्रिकच्या तोलाची) परीक्षेंत मी मराठीचा परीक्षक असें. मी मराठींत कांहीं बऱ्यापैकीं पुस्तकें लिहिलीं असून लेखक म्हणून माझा थोडाफार लौकिकहि झाला होता. हें सर्व खरें असलें तरी बी. ए. अगर एम्. ए. परीक्षेंत माझा विषय मराठी नसल्यानें, किंवा मराठी साहित्यांत वामनराव जोशांप्रमाणें कांहीं उल्लेखनीय भर मीं घातलेली नसल्यामुळें मला

कॉलेजमध्यें मराठी शिकविण्याचा अधिकार नव्हता असेंच सर्वांना वाटणें साहजिक होतें. आणि गंगूबाईनाहि इतरांसारखेंच वाटून त्यांनीं हें काम मला दिलें नसतें तर तें योग्यच झालें असतें.

शिवाय मी त्यांचा अत्यंत निकटचा संबंधी म्हणून हें काम मला घरच्या घरीं देणें हें लौकिकांत अप्पलपोटेपणाचेंहि दिसलें असतें. गंगूबाईचा स्वभाव अत्यंत निःस्वार्थी व बाणेदार असल्यानें स्वार्थीपणाचा दोष दुरूनहि आपणांस कोणीं देऊं नये याबद्दल त्या अत्यंत दक्ष असतात. इतकें सर्व असूनहि त्यांनीं तें काम मला देण्याचें ठरविलें—ध्येयच्युतीचा थोडासा दोष पत्करूनहि देण्याचें ठरविलें हें विशेष होय.

'हें एक फॅमिली-ॲफेअर आहे, एक घरची मिरास किंवा कौटुंबिक मामला आहे' असें कांहींनीं त्यांना हिणविलेंहि. पण त्याची उपेक्षा करून त्यांनीं मला नेमलें. अर्थात् माझ्या पात्रतेबद्दल त्यांना मनांतून भरंवसा वाटत होता व म्हणूनच त्यांनीं आपल्या स्वभावाविरुद्ध जाण्याचें धाडस केलें. मला ही संधि मिळाली नसती तर माझ्या जीवनाचा डाव तेथेंच कुजून राहिला असता. असो. झालें तें सर्वच दृष्टींनीं फार चांगलें झालें, एवढेंच म्हणतों.

•

सौ. रजनीबाई ही एक महत्त्वाकांक्षी व अत्यंत उद्योगी अशी बाई आहे. संसाराला लवकर सुरुवात झाल्यामुळें कॉलेजचें शिक्षण सुटलें, पण पुढें शिकून बी. ए. होण्याची आकांक्षा कायम राहिली होती. आतां संसारांत थोडी सवड सांपडल्यावर त्यांनीं अभ्यास करण्याचें ठरविलें व वर सांगितल्याप्रमाणें गंगूबाईना विचारलें. कॉलेज फक्त सकाळींच भरत असल्यानें त्यांचा सर्व वेळ आवश्यक विषयांच्या अभ्यासांतच जाई; आणि म्हणून त्या मुद्दाम दुपारीं गर्दीगर्दीनें जेवण उरकून आमच्या घरीं येत व आम्ही रोज दोन-तीन तास जोडीनें वाचीत असूं. त्यांची जशी बी. ए. होण्याची आकांक्षा होती, तशी माझीहि एक आकांक्षा होती. ती म्हणजे माझ्यावर सोंपविलेल्या कामगिरीला मी पूर्णतया पात्र ठरून 'अपात्र माणसाला केवळ कौटुंबिक फायद्यासाठीं या जागेवर नेमलें' असा ठपका गंगूबाईना लागूं द्यावयाचा नव्हता. एकमेकांच्या आकांक्षा एकमेकांना

कळल्यामुळें आमच्यांतील सहकारितेला जोर आला व आम्हीं दोघांनीं येणाऱ्या सर्व अडचणींना तोंड देण्याचें ठरविलें.

मीं जें जें सांगावें तें तें त्यांनीं उतरून घ्यावें. मीं जें जें पुस्तक सुचवावें तें तें त्यांनीं कोठूनहि मिळवून वाचावें, मीं दिलेल्या टांचणा-टिपणांशिवाय स्वतःचीं टांचणें-टिपणें करावींत, ( त्यांचीं हीं टाचणें मला अद्यापहि उपयोगी पडत आहेत ) अशा प्रकारें आमचें काम-माझें मार्गदर्शनाचें व त्यांचें त्या मार्गानें जावयाचें-अतिशय समाधानकारक चाले. त्यांची धारणा व स्मरण-शक्तीहि वरच्या दर्जाची होती. याचा एकंदर परिणाम असा झाला कीं, तीन वर्षांचा अभ्यास दोन वर्षांत संपवून त्या जी. ए. च्या परीक्षेला ऐच्छिक मराठी घेऊन बसल्या, आणि उत्तीर्णहि झाल्या. नुसत्या उत्तीर्ण झाल्या एवढेंच नव्हे, तर ऐच्छिक मराठी विषयांत सबंध विद्यापीठांत पहिल्या आल्या.

केलेल्या श्रमाचें केवढें हें भरघोस फळ ! हा जसा रजनीबाईंचा व कॉलेजाचा विजय होता तसा तो व्यक्तिशः माझाहि होता. माझी पहिलीच विद्यार्थिनी पहिल्याच वर्षी सबंध विद्यापीठांत पहिली आली, तेव्हां मी मोठा मातबर प्रोफेसर असलों पाहिजे असें सर्वांस वाटूं लागलें; व माझी नेमणूक केल्याबद्दल ज्यांनीं ज्यांनीं गंगूबाईंना मनांतून दोष दिला होता, व जे आणखीहि देण्याची वाट पाहत होते-त्यांना गंगूबाईंनीं केलें तें योग्यच केलें असा विश्वास आतां वाटूं लागला.

रजनीबाईंनीं मला उत्तम साथ देऊन आपल्या व माझ्या श्रमाचें सार्थक केलें, कॉलेजला आपली विद्यार्थिनी पहिली आली याबद्दलचें श्रेय मिळालें, व विशेषतः गंगूबाईंनीं माझ्यावर टाकलेल्या विश्वासाचें मीं चीज केलें या सर्व गोष्टींमुळें माझें अंतःकरण आनंदानें व स्वतःसंबंधींच्या अभिमानानें भरून गेलें. माझी पूर्वींची उदासवाणी स्थिति नाहींशी झाली व नवी उमेद आली.

माझी शिकविण्याची ख्याति ऐकून पुढें बऱ्याच विद्यार्थिनी प्रथम वर्षापासूनच ऐच्छिक मराठी घेऊं लागल्या; व मी प्रो. देशपांड्यांचा सहकारी जोडीदार झालों. झालें हें ठीक झालें; पण आतां माझ्या

शिकविण्याची खरी कसोटी लागणार होती. रजनीबाईंच्या बाबतींत थोडासा गुण सोनाराचा तर बराचसा गुण सोन्याचा मानला जाई. आतां सर्वत्र सोनें बावन्न कशी नव्हतें. शिवाय प्रो. देशपांडे यांचा व्यासंग विस्तृत व सखोल असून, त्यांचें वक्तृत्व पट्टीचें होतें. अशा गृहस्थाच्या सहकारी म्हणून मला काम करावयाचें होतें व त्यांच्याशीं होणाऱ्या तुलनेंत उतरावयाचें होतें.

खरें सांगावयाचें म्हणजे देशपांड्यांचा व्यासंग, विद्वत्ता व वक्तृत्व हीं माझे ठायीं पूर्वी कधीं नव्हतीं, व पुढें कधीं आलींहि नाहींत. मीं परिश्रमपूर्वक अभ्यास करून शिकवीत असें, पण त्यांत जो सहजसुलभपणा, विद्वत्तेचें तेज व हजरजबाबीपणा असावा लागतो तो मला सहसा साध्य झाला नाहीं. माझ्यांतला एक गुण मात्र मला अत्यंत उपयोगी ठरला आणि त्याचे जोरावर मी पुढचें सर्व निभावून नेलें.

तो गुण म्हणजे विषय कितीहि कठिण असो, तो उत्तम प्रकारें मांडून व विशद करून विद्यार्थ्यांच्या आटोक्यांत आणून देणें हा होय. याला शिक्षणशास्त्राचें व विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्राचें ज्ञान असावें लागतें; आणि हें दोन्ही प्रकारचें ज्ञान मीं ट्रेनिंग कॉलेजामध्यें असल्यापासूनच कमावलेलें होतें. याच्या जोडीला विद्यार्थ्यांसंबंधीं वाटणारी कळकळ व त्यांच्या अडीअडचणी ( शारीरिक, बौद्धिक, आर्थिक, व्यावहारिक इ. ) सहानुभूतिपूर्वक समजून घेण्याचा समंजसपणा याहि गुणांचा मला भारी उपयोग झाला. सारांश, मी माझ्या सहकाऱ्यांपेक्षां ज्ञानानें थोडासा कमी असलों, तरी या उणीवेची भरपाई मीं इतर रीतीनें केल्यामुळें मीं त्यांच्या बरोबरीचा ठरलों.

याचा परिणाम म्हणून ऐच्छिक मराठीच्या विद्यार्थिनी सहसा नापास होत नसत. उलट पुढील सात-आठ वर्षांच्या अवधींत माझ्या दोन-तीन विद्यार्थिनी ऐच्छिक मराठींत सबंध विद्यापीठांत पहिल्या आल्या. त्या वेळीं मी हें सर्व कसें करूं शकलों असा विचार मनांत येऊन आतां माझें मलाच आश्चर्य वाटतें.

शिक्षकाच्या शिकविण्याचें मूल्यमापन त्याच्या विद्यार्थ्यांच्या प्रगतीवरून करावयाचें असतें. आणि या दृष्टीनें पाहतां विद्यार्थी हीच त्याची खरी

कसोटी व तेंच त्याच्या श्रमाचें खरें फळ. हें फल तर मला मिळूं लागलेंच पण त्याशिवाय आर्थिक फळहि मिळूं लागलें. पहिल्या वर्षीं विनावेतन, पुढचीं कांहीं वर्षें नाममात्र वेतन व शेवटचीं थोडीं वर्षें पूर्ण वेतन अशा वाढत्या श्रेणीनें माझी बढती होत गेली, व अशा प्रकारें मी सर्वच बाबतींत इतरांसारखा पूर्ण ( Full fledged ) प्रोफेसर बनलों. विद्यार्थिनींचें प्रेम प्राप्त केलें, मातृभाषेचें ज्ञान मिळविलें, लौकिक संपादिला, थोडासा पैका कमावला, व विशेष म्हणजे स्वतःच्या मनाचें समाधान साधलें ही या एकंदर कार्याची फलश्रुति म्हणतां येईल.

कॉलेजच्या कामामुळें माझ्या अभ्यासाला चांगली संधि मिळाली. याला उपकारक असें मीं आणखीहि एक क्षेत्र निर्माण केलें. मराठी साहित्याच्या व महाराष्ट्रीय संस्कृतीच्या बाबतींत बडोदें हें पुण्याच्या खालोखालचें केंद्र मानण्यांत येतें. तेथील महाराष्ट्रीय लोकांत मराठीच्या अभिमान्यांचा व विद्वानांचा वर्ग मोठा आहे. असें असून महाराष्ट्र साहित्य परिषदेमार्फत होणाऱ्या 'प्राज्ञ' व 'विशारद' परीक्षांना विद्यार्थ्यांना तयार करून पाठविण्याबाबत तेथें अद्याप कोणींच कांहीं केलें नव्हतें. ही वाण ओळखून ती भरून काढण्याच्या उद्योगाला मी लागलों.

पहिल्या एक-दोन वर्षीं मी प्राज्ञपूर्वीच्या पहिल्या दोन परीक्षांना विद्यार्थी तयार केले. वर्ग एका विद्यार्थिनीच्या घरीं व्हरांड्यावर भरवून शिकविण्याचें सर्व काम मी स्वतःच करीं. पुढें वर्गांची व विद्यार्थिनींची संख्या वाढली तेव्हां महाराष्ट्रांतील प्रसिद्ध कवयित्री सौ. अपर्णाबाई देशपांडे ( पुढें त्या कर्वे कॉलेजांत माझ्या जोडीनें काम करूं लागल्या. ) यांचें साह्य मिळविलें. पण त्यांना पुढें-पुढें सवड मिळेनाशी झाली, व विद्यार्थ्यांच्या व त्यांचें वेळेवगैरेंचे बाबतींत जमेनासें झालें. तेव्हां केलेल्या साह्याबद्दल त्यांचे आभार मानून मी एकटाच प्राज्ञ व विशारद परीक्षांचे तास घेऊं लागलों.

या परीक्षांच्या अभ्यासांत व अध्यापनांत माझे दिवसाकाठीं चार-पांच तास जाऊं लागले. कॉलेजमध्यें ४-५ तास व या वर्गांचे ४-५ तास असें ८-१० तासांचें भरगच्च काम मिळाल्यामुळें माझ्यांतील क्रियाशीलतेला योग्य तो वाव सांपडून मला समाधान होऊं लागलें.

विद्यार्थ्यांना परीक्षेला बसावेसें वाटे. पण त्याकरितां द्यावा लागणारा वेळ व करावा लागणारा खर्च त्यांना परवडत नसे; ही त्यांची अडचण ओळखून मी शनिवारीं-रविवारीं व इतर सुट्टीचे दिवशीं रोज तीन-तीन तास घेऊन सर्व अभ्यास भरून काढीं. खर्चासंबंधींहि तशीच सोय केली. 'प्राज्ञ' परीक्षेच्या विद्यार्थ्यांकडून सुरुवातीला रु. ३, व 'विशारद'च्या विद्यार्थ्यांकडून रु. ५, एकदमच घेतले म्हणजे काम भागे. त्यांना पुस्तकां-करितां निराळें खर्चावयास नको असें ठरवून जमलेल्या पैशांत येतील इतकीं पुस्तकें खरेदी करावींत, व तीं विद्यार्थ्यांमध्यें योग्य प्रमाणांत वांटून देऊन परीक्षा झाल्यानंतर सर्व पुस्तकें माझ्याकडेच ठेवावींत. पुढच्या वर्षीं त्यांत आणखी भर घालून तीं विद्यार्थ्यांना दिलीं म्हणजे त्यांचा अभ्यास जास्त सुकर होई. परीक्षेच्या फीशिवाय आणखी तीन किंवा पांच रुपयांत सबंध अभ्यास होत असल्यानें विद्यार्थ्यांची संख्या वाढूं लागली व माझे वर्ग मजेंत चालूं लागले.

पुढें पुढें हे वर्ग मीं घरींच घेऊं लागल्यानें वर्गांचें वातावरण अक्षरशः घरगुती वाटूं लागलें. मीं हें सर्व विनामूल्य-सर्वस्वीं विनामूल्य-व बऱ्याचशा घरगुती अडचणी सोसून करतों याची विद्यार्थ्यांना पुरेपूर जाणीव असल्यानें त्यांनींहि स्वतः त्रास सोसून मला साथ केली. या अभ्यासानें विद्यार्थ्यांना त्यांच्या कॉलेजच्या अभ्यासांतहि बरीच मदत होई, आणि त्याचा परिणाम म्हणून त्यांना जास्तच कृतज्ञता वाटे.

आमचे हे वर्ग अत्यंत घरोब्यानें, खेळीमेळीनें पण व्यवस्थितपणें चालत. आमचें एक लहानसें स्वयंपूर्ण केंद्रच निर्माण झालें होतें, म्हणाना! अभ्यासा-नंतर आम्ही सर्वजण फिरावयास जात असूं. मधून-मधून सहली काढीत असूं, एकमेकांकडे जाऊन उपयुक्त गप्पागोष्टी करीत असूं, व कधीं कधीं एकत्र खाणें-पिणेंहि करीत असूं. एखादे वेळीं कांहीं कारणांनीं वर्ग बंद ठेवावयाचें म्हटलें म्हणजे सर्वांना चुकल्या-चुकल्यासारखें वाटे व करमेनासें होई. इतका घरोबा आम्हांमध्यें उत्पन्न झाला होता.

मी बडोद्यास एक नवीन केंद्र स्थापन करून महाराष्ट्र–साहित्य-परिषदेच्या कार्याचा विस्तार करीत असल्यामुळें त्या संस्थेच्या चालकांनाहि माझेबद्दल आपलेपणा वाटूं लागून, तेहि मला सर्व प्रकारची मदत करूं लागले.

त्या वर्गांच्या निमित्तानें माझ्या ज्ञानांत वाढ झाली, आनंदांत भर पडली, आणि विशेष म्हणजे माझा कांहीं विशिष्ट तरुण व्यक्तींशीं अत्यंत निकटचा संबंध आला व लोभ जडला. हे वर्ग बंद पडून कितीतरी काळ लोटला आहे. पण अजूनहि कितीतरी विद्यार्थ्या-विद्यार्थिनींचा व माझा पत्रव्यवहार चालू असून आम्ही आपापलीं सुखदु:खें एकमेकांना मोकळेपणानें कळवीत असतों. वर्ग संपले, परीक्षा झाल्या, अभ्यास सुटला, स्थलांतरें झालीं, पण मैत्रीचा तंतु अद्याप कायम आहे. नव्हे, दिवसेंदिवस अधिकाधिक घट्ट व बळकट होत आहे व त्यामुळें जिवाला धन्यता वाटत आहे.

इतर कोणाचीं नांवें सांगितलीं नाहींत तरी अ. ज्यो. शिंदे या विद्यार्थ्याचें नांव सांगितल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. हा विद्यार्थी फार हुशार, अभ्यासू व महत्त्वाकांक्षी असे. त्याचें लिहिणें तर इतकें सुंदर व शुद्ध असे कीं मलाच त्याचेपुढें लाजल्यासारखें होई. ( माझे सोलापूरचे शिक्षक-बंधु-मुंबईचे स. वा. केळकर यांचेंहि लेखन असेंच दृष्ट लागण्यासारखें आहे. ) टांचणें-टिपणें काढण्यांत व कधीं कधीं प्रत्यक्ष शिकविण्यांतहि मला त्याची मदत होई. एकमेकांचीं मनें एकमेकांनीं पूर्णपणें ओळखल्यामुळें आमच्यांत पर्फेक्ट अंडरस्टँडिंग उत्पन्न झालें होतें.

ह्या सर्व आठवणी झाल्या म्हणजे आनंद तर होतोच, पण त्याबरोबरच ' तेहि नो दिवसा गताः ' असा एक विषादात्मक विचारहि मनांत डोकावून त्या आनंदाला गांभीर्य प्राप्त होतें.

या विद्यार्थी-मित्रांच्या जोडीला मला दुसरेहि पुष्कळ प्रौढ व विद्वान् मित्र लाभले होते. त्या सर्वांच्या संगतींत मला अमूप सुख व ज्ञान लाधलें, म्हणून कृतज्ञतेच्या दृष्टीनें त्यांचा नामनिर्देश तरी करणें मला कर्तव्य वाटतें. त्रयस्थांना कदाचित् तें कंटाळवाणें वाटेल.

शेजार-मित्र सबनीसबंधु, श्री. दाजीसाहेब आपटे, श्री. दाजीसाहेब तांबे, प्रो. माणीकराव, कतानबंधु, वाकनीस पति-पत्नी, टिळक पति-पत्नी, रड्डी पति-पत्नी, फाटक पति-पत्नी, भाटे पति-पत्नी, प्रो. कोल्हटकर पति-पत्नी, प्रो. स. वि. देशपांडे व सौ. अपर्णाबाई, प्रो. दांडेकर, श्री. घाडगे, श्री. संत, प्रो. महाबळ, प्रो. साळगांवकर, प्रो. जावडेकर, डॉ. पुसाळकर,

मराठी ग्रंथ संग्रहालय ... स्थळप्रत
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों. दि: ...



चित्रकार देऊसकर पति-पत्नी, डॉ. लिखिते पति-पत्नी, डॉ. आपटे पति-पत्नी, प्रो. चिं. वि. जोशी व वा. वि. जोशी, घारपुरे पति-पत्नी, बाम पति-पत्नी, डॉ. कीर्तने इ. थोर थोर व्यक्तींच्या मैत्रीचा लाभ मला झाला होता. यांपैकीं कांहीं दुर्दैवानें हें जग सोडून गेले असून, कांहीं हें शहर सोडून गेले आहेत. त्यांच्या गांठी-भेटी व्हाव्यात असें कितीतरी वाटतें. पण आतां तें कसें शक्य आहे? इतक्या व अशा मित्रांचा लाभ हें मला बडोद्यानें दिलेलें एक बहुमोल देणें आहे.

माझ्यावर भक्ति करणाऱ्या विद्यार्थिनींचा भरणाहि असाच मोठा आहे. पण त्यांचा निर्देश करण्याचें मुद्दामच टाळतों; कारण त्यायोगें निर्दिष्टांना बरें वाटलें तरी अनिर्दिष्टांना-त्यांचा निर्देश करावयाचा चुकून राहिला तरी-वाईट वाटायचें अशी भीति वाटते.

बडोद्याच्या कितीतरी मोठ्या व्यक्तींसंबंधीं सांगावेंसें वाटतें. त्यायोगें मला त्यांचेसंबंधीं वाटत असलेली कृतज्ञता-भावना व्यक्त होईल व वाचकांनाहि कांहीं मनोरंजक व उद्बोधक माहिती मिळेल.

प्रो० माणीकराव :—माझ्यावर व गंगूबाईवर माणीकरावांचा लोभ तर होताच, पण शिवाय आम्हां उभयतांबद्दल त्यांना आदरहि वाटत असे. गंगूबाईनीं त्यांना त्यांच्या व्यायामकार्यांत वेळोवेळीं मदत तरी केली होती, पण मीं तसें कांहींच केलें नव्हतें. मी बडोदें नक्की केव्हां सोडणार हें निश्चितपणें कोणालाच माहीत नव्हतें. माणीकरावांना मात्र माझ्या प्रयाणाचा दिवस माहीत असावा.

त्यांनीं त्या दिवशीं अगदीं सकाळीं ‘मी भेटावयास येतों, घरींच असावें’ असा लेखी निरोप पाठविला. मींहि उलट ‘आपण येऊं नये, मीच येतों’ असें कळविलें; पण दोन-तीन मिनिटांतच ते एक भला मोठा हार घेऊन आमच्या घरीं आले व त्यांनीं तो माझ्या गळ्यांत घालून आपल्या अडखळणाऱ्या वाणीनें माझें आयुरारोग्य चिंतून मला निरोप दिला. मला त्याचा आनंद झालाच, पण एवढा थोर गृहस्थ घरीं चालत येऊन प्रेमादरपूर्वक मला हार घालतो या जाणीवेनें लाजल्यासारखेंहि झालें. त्यांच्या स्फूर्तिप्रद दर्शनाचा लाभ मला पुन्हां झाला नाहीं. कारण थोड्याच काळानंतर बडोदें राज्याचें हें ‘राजरत्न’ काळानें हिरावून नेलें!

दाजीसाहेब आपटे :—मी एक त्यांचा चांगला शेजारी या भावनेनें दाजीसाहेब माझेकडे पाहत. मी त्यांचे घरावरून केव्हांहि जावो ते मला आवर्जून आंत बोलावीत. एकदां त्यांचे घरीं त्यांचे 'कॉलेजचम्' वीर सावरकर उतरावयास आले. त्यांच्याबरोबर चहा प्यावयास म्हणून दाजीसाहेबांनीं मला बोलावलें.

'मीहि सावरकरांसारखाच सांपडावयाचा, पण थोडक्यांत बचावलों' वगैरे गतगोष्टी ते मला सांगत असतांनाच सावरकरांना भेटण्यासाठीं बडोद्यांतील एक वर्तमानपत्रकार तेथें आले व 'आमचें सुप्रसिद्ध पत्र तुम्ही वाचतां ना'? असें त्यांनीं त्यांना विचारलें.

'नाहीं, नांव काय त्याचें? पाठवून देत चला' असें सावरकर म्हणाले.

'कोणत्या पत्त्यावर पाठवूं?' पत्रकार महाशयांनीं विचारलें.

'नुसतें 'दादर' लिहिलें म्हणजे पुरें.' सावरकर शांतपणें म्हणाले. पत्रकारांना प्रश्न पडला 'नुसतें दादर' लिहून सावरकरांना आपलें सुप्रसिद्ध पत्र कसें पोंचणार? ही त्यांची शंका ओळखून दाजीसाहेब मोठ्यांदा हंसले, मी गालांतल्या गालांत हंसलों आणि स्वतः सावरकर पहिल्या इतकेच गंभीर राहिले!

दाजीसाहेब तांबे :—मी कधीं टोपी न घालतां घराबाहेर पडत नसे. एकदां काय लहर आली कोणास ठाऊक! एखाद्या कम्युनिस्ट भाईप्रमाणें मी बोडकाच बाजारांत निघालों. समोरून दाजीसाहेब नेहमींप्रमाणें गर्दी-गर्दीनें येत होते. माझें असलें हें बोडकें ध्यान पाहण्याची त्यांच्या डोळ्यांना संवय नव्हती, आणि माझ्या बाबतींत तर उगीच सुखासुखी बोडक्यानें बाहेर पडणें तर त्यांना अशक्यच वाटलें. त्यांनीं जराशा चिंतेच्या चेहऱ्यानें एवढेंच विचारलें, 'हूंऽऽऽ कोण?'

त्यांची ती प्रश्नांकित व शंकाकुल चर्या पाहून मींच तावडतोब खुलासा केला, 'तसलें कांहीं नाहीं. हल्लीं बरेचसे लोक बोडके फिरतात, म्हणून म्हटलं आज आपणहि तसं करून पहावं.' दाजीसाहेब हंसत-हंसत ओरडले, 'भले भाईसाहेब! असलं कांहीं करीत जाऊं नका. आमच्यासारख्यांचा घोटाळा होतो.'

हा झाला दाजीसाहेबांच्या आठवणीचा एक क्षुल्लक व हास्योत्पादक प्रसंग. पुढचा यापेक्षां गंभीर व भयंकर आहे. दाजीसाहेब जसे मोठे कार्यकर्ते व सेवाभावी, तसेच ते मोठे उदार, रसिक व हौशी आहेत. त्यांचेकडे कोणी मोठी व्यक्ति आली म्हणजे ते आपल्या सर्व मित्र-परिवाराला—त्या परिवारांत मी व गंगूबाई हटकून असूं—चहाला किंवा जेवायला बोलावीत.

एकदां त्यांच्याकडे त्यांचे व्याही—सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. नानासाहेब चापेकर आले होते. अर्थात् त्यांच्या सन्मानार्थ बासुंदी-पुरीची एक मेजवानी झाली. तिला आम्ही दोघेंहि गेलों. बेत उत्तम असून जेवणाऱ्या मंडळींच्या काव्यशास्त्र—विनोदानें तर त्याच्या उत्तमपणांत आणखी भर पडली.

जेवणें वगैरे होऊन घरीं गेलों. भरल्या पोटावर झोंप फार चांगली लागेल असें वाटलें. पण ती मुळींच येईना. तडस लागल्यामुळें असें होत असावें असें वाटून सोडा पिण्याकरतां बाहेर पडलों. पण सोडा पितां-पितां शौचाची इतकी निकड लागली कीं, रस्त्यांतच कांहीं न होतां धडपणें घर कसें गांठतों असें झालें.

पुढचा सर्व प्रसंग बीभत्स व भयानक रसांचा जातिवंत आविष्कार होता. अशा प्रसंगीं ज्या ज्या घाणेरड्या व भयंकर गोष्टी घडतात त्या सर्व घडल्या. सबंध अंग घामानें दरदरून निघालें, हातपायांतली शक्ति पार नाहींशी झाली. शौचकूपांतून बाहेर येण्याची पंचाईत पडली. हा सर्व दुपारच्या त्या बासुंदीचा प्रसाद होता असें लक्षांत आलें.

गंगूबाई बाहेर एका सभेला गेल्या होत्या, त्यांना तातडीनें बोलावलें. त्यांचीहि स्थिति तीच झाली होती. पण कमी प्रमाणांत. शिवाय त्या माझ्यापेक्षां सोशिकहि जास्त. त्या तशाच परत आल्या म्हणून गांठ तरी पडली. झालें, डॉ. कीर्तन्यांना बोलावून आणलें. ते माझ्याहि पेक्षां जास्तच घाबरलेले दिसले. कारण असल्याच एक—दोन केसेस त्यांच्या कानांवर आल्या होत्या. त्यांनीं दिलासा दिला. ‘ हें पहा, नानासाहेब, घाबरूं नका. बऱ्याच जणांना असं झालं आहे. तुमचें जरा जास्त आहे, एवढेंच. तुमच्या जात्या शुद्ध प्रकृतीवर असल्या खाद्य—पेयांची रिॲक्शन जास्त

जोरांत होते.' डॉक्टरांच्या औषधानें, गंगूबाईच्या शुश्रूषेनें, व समाचारास आलेल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या शुभेच्छेनें पुढें यथाकाल बरा झालों वगैरे सर्व ठीक झालें.

तेव्हांपासून दाजीसाहेबांनीं मात्र मला पुन्हां म्हणून कधीं जेवायला बोलावलें नाहीं. हो, करायचं काय! विषाची परीक्षा पुन्हां पहावयास नको. ते पुण्यास आले म्हणजे न चुकतां आमच्या घरीं येतात, गप्पाहि खूप मारतात, पण या प्रसंगासंबंधानें चुकूनसुद्धां बोलत नाहींत. शुद्ध प्रेमानें केलेल्या चांगल्या गोष्टीहि एखादे वेळीं कशा अंगलट येतात पहा ना.

आम्हां उभयतांवर फारा दिवसांपासून लोभ करणाऱ्या आणखी दोन व्यक्ती म्हणजे श्रीमंत आबासाहेब मुजुमदार व त्यांच्या पत्नी सौ. अक्कासाहेब मुजुमदार ह्या होत. विद्वत्ता, सत्ता, श्रीमंती, कर्तृत्व, वगैरेंसारख्या मोटमोठ्या गोष्टींची अनुकूलता असतांना जणूंकांहीं त्या आपल्यापाशीं नाहींतच अशा लीनतेच्या व शालीनतेच्या भावनेनें वागणाऱ्या व्यक्ती सहसा आढळत नाहींत; पण बडोद्याचे (व पुण्याचेहि) आबासाहेब मुजुमदार मात्र याला अपवाद आहेत.

एकटी व्यक्ति दुसऱ्या कोणावर फारसें विसंबून न राहतां व गाजावाजा न करतां एका निष्ठेनें केवढें मोठें कार्य करूं शकते याचें मुजुमदार पतिपत्नींचा व्यायामकोश हें एक ठळक उदाहरण आहे. त्या उभयतांची लोकसंग्रह करण्याची वृत्ति नांवाजण्यासारखी आहे. व्यायामकोशांत प्रत्यक्ष काम केल्यामुळें आबासाहेबांचा, तर स्त्रियांच्या व्यायामविषयक चळवळींत विशेष उत्साहानें काम करण्याबद्दल सौ. अक्कासाहेबांचा-दोघांचाहि-गंगूबाईवर इतका लोभ आहे कीं पुण्यास आल्यावेळीं ही बडी मंडळी आमच्या घरीं येऊन आमचा गरीबीचा पाहुणचार घेतल्यावांचून सहसा जात नाहींत.

जनरल नानासाहेब शिंदे:—नानासाहेब ही बडोद्यांतील एक फार मोठी असामी. त्यांचा आम्हां उभयतांवर फार लोभ होता. नानासाहेबांमध्यें सैनिकाचा रुबाब व कर्तृत्वाची स्वयंजाणीव, तशीच शालीनता व साधेपणा हीं असल्यामुळें स्वतःला शिपाई म्हणवून घेण्यांत त्यांना मोठी धन्यता वाटे; त्यांनीं आपल्या आत्मवृत्ताला 'एका शिपायाचें आत्मवृत्त' असेंच सार्थ नांव दिलें आहे.

त्यांचा गंगूबाईवर लोभ असण्याचें कारण तें एका वाङ्मय परिषदेच्या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष असतांनाच गंगूबाई कार्यकारी मंडळाच्या सभासद होत्या. गंगूबाईंचें काम व कामांतील तडफ नानासाहेबांना फार आवडलीं होतीं.

माझ्यावर लोभ जडला तो थोडासा गंगूबाईमुळें तर खराच, पण त्याशिवाय त्यांचा व माझा एका विशेष कारणानें झालेला परिचय. मी 'हितपत्रें' या माझ्या पुस्तकाला त्यांची प्रस्तावना घेण्याचे निमित्तानें दहा-बारा वेळां तरी त्यांचेकडे गेलों होतों. केव्हांहि जा, नानासाहेब हंसतमुखानें स्वागत करायला व्हरांड्यांतील आपल्या प्रशस्त खुर्चीत बसलेले तयार असत. प्रत्येक खेपेला सुंदरसा चहा व बरोबर कांहीं तरी खाद्य हें असावयाचेंच.

त्यांनीं प्रस्तावना लिहिण्याचें कबूल करतांना मोकळेपणानें सांगितलें, "हें पहा मास्तर, मीं लिहितों, पण तुम्ही मला मदत कराल तर लिहितों." लिहिलें सर्व त्यांनींच, व मला मुळींच मदत करावी लागली नाहीं; तरीपण असें म्हणण्यांत त्यांची शालीनता व नम्रपणा जीं दिसलीं तीं लक्षांत राहण्यासारखीं आहेत.

त्यांनीं स्वतःचें एक साधेसुधें व सुंदर चरित्र व इतरहि बरेंचसें लेखन केलें आहे आणि म्हणूनच मीं त्यांना माझ्या पुस्काच्या सुरुवातीला 'तलवार व लेखणी सारख्याच कुशलतेनें पेलणारी एक सव्यसाची व्यक्ति' असें म्हटलें आहे.

नानासाहेब शारंगपाणीः—तसें पाहिलें तर नानासाहेब माझे मेहुणे—माझ्या मावस बहिणीचे—ती० वेणूताईंचे यजमान. पण नात्यापेक्षां मैत्रीचेंच संबंध आमच्यामध्यें जास्त होते. नानासाहेब अत्यंत प्रेमळ व व्यवस्थित असत. आम्हां दोघांबद्दल त्यांना कांहीं विशेष वाटे. गंगूबाईंचं 'कर्मसु कौशलं', त्यांचें गुजराथी समाजाशीं समरस होणें, साधा पण नीटनेटका, खादीचा पोषाख व वायफळ गप्पांबद्दलचा तिटकारा या गुणांचें नानासाहेब अगदीं मुक्तकंठानें कौतुक करीत. 'दुसऱ्यांच्या बायकांचें इतकें कौतुक करणें पुरुषाला बरें दिसत नाहीं, आणि त्यांच्या बायकोला तर तें मुळींच आवडत नाहीं' असें एकदां ते स्वतःच विनोदानें म्हणाले होते.

ज्याच्या घरीं जावयाचें त्याचा ताळमेळ पाहून वागावयाचें या माझ्या धोरणाचाहि ते कौतुकपूर्ण उल्लेख करीत. ते अत्यंत बहुश्रुत असून त्यांच्याशीं गप्पा मारण्यांत मोठा आनंद होई, व आपल्याला आज कांहींतरी नवीन समजलें असें वाटे.

आतां बडोद्याच्या वास्तव्यांतील माझ्या एका गोड फजितीचा उल्लेख करतों. ‘ बडोदें-संघ ’ आणि ‘ होळकर-संघ ’ यांचेमध्यें क्रिकेटच्या रणजी ट्रॉफीचा शेवटचा सामना पोलो जिमखान्यावर होता. त्या प्रसंगीं पुण्याचे प्रो० देवधर अंपायर म्हणून आले होते. त्यांचा—माझा दाट स्नेह असल्यानें त्यांनीं मला मुद्दाम आपला पाहुणा म्हणून खुद्द पॅव्हिलिअनमध्यें सर्व खेळाडूंचे अगदीं जवळ बसविलें होतें.

बडोदें-संघाचे विजय हजारे, रंगा सोहनी, अमीर इलाही, हेमू अधिकारी, एम्. एम्. नायडू, किशनचंद, सदू शिंदे, रावसाहेब निंबाळकर इ. सर्व टेस्ट प्लेअर्स व होळकर संघाचे कर्नल सी. के. नायडू, मुश्ताक अली, सी. एस. नायडू, सरवटे इ. टेस्ट प्लेअर्स यांना मला अगदीं जवळून पाहतां आलें; त्यांच्या आपापसांतल्या गप्पा—गोष्टी व थट्टा—मस्करी ऐकतां आल्या. सी. कें. च्या एका गोष्टीची मला विशेष आठवण आहे. ते आपल्या सर्व जोडीदारांना आपल्या भोंवतालीं घेऊन मॅच् पाहत बसले होते; व समोर फील्डवर चाललेल्या बॅटिंग, बोलिंग, फील्डिंग वगैरेसंबंधींचें गुण—दोषयुक्त विवेचन करीत, खेळण्यासंबंधीं मार्मिक सूचनाहि देत होते. त्यांची ही प्रत्यक्ष शिक्षण देण्याची तऱ्हा, व खेळासंबंधींची आस्था मला विशेष आवडल्या.

बडोद्याचे डी. के. गायकवाड यांनीं सी. कें. चा झेल घेतला, तेव्हां ते त्यांच्याजवळ येऊन ‘ I am very sorry, Sir ’ असें थोड्याशा ओशाळ-पणानें व दिलगिरीनें म्हणाले. सी. कें. नीं गायकवाडांच्या पाठीवर थाप मारून म्हटलें : ‘ But I am glad. This is Cricket, my friend ! ’ आणि त्यांचें कौतुक केलें. असले गोड व दिलदारीचे प्रसंग सामान्यत: तुरळक दिसत असल्यानें मला ते विशेष आवडतात व म्हणून ते माझ्या लक्षांतहि कायमचे राहतात.

‘ गोड फजितीं ’तील गोडपणाचा भाग येथें संपला. आतां त्यांतील फजितीचा भाग सांगतों. मॅचच्या पहिल्या दिवशीं सर्व कांहीं ठीक झालें. पण दुसऱ्या दिवशीं प्रो. देवधर अंपायरचा लांब पांढरा कोट चढवून फील्डवर गेल्यानंतर, पॅव्हिलिअन्‌चा एक शिपाई माझेजवळ येऊन माझें तिकीट मागूं लागला.

मी प्रो० देवधरांचा गेस्ट असल्यानें माझ्यापाशीं तिकीट नाहीं असें सांगतांच तो मोठ्या शांतपणें व संस्थानी अदबीनें म्हणाला–‘ साहेब, आपल्याला येथून उठावें लागेल. बाहेर पाहुण्यांसाठीं एक तंबू आहे तेथें आपण बसावें.’ त्यानें अत्यंत सभ्यपणें सांगितलें होतें, व तेंहि न्याय्य तेंच सांगितलें होतें. पण मला मात्र माझा अपमान झालासें वाटून मी अर्ध्या मॅचमधून घरीं निघून आलों.

देवधरांपाशीं किंवा घरांतील कोणापाशीं मीं हें बोललों नाहीं. बोललों असतों तर देवधर नुसते हंसले असते; पण गंगूबाई मात्र रागावून कांहींच बोलल्या नसत्या. मीं दाखविलेला असला लाचारपणा त्यांच्या स्वभावाला बिलकूलच खपला नसता. तेव्हांपासून मी असला फुकटेपणा पुढें कधींहि केला नाहीं.

आणखी एक प्रसंग सांगण्यासारखा आहे. माझें शिकविणें महिला–पाठशाळा कॉलेज व प्राज्ञ-विशारदवर्ग या दोहोंपुरतेंच मर्यादित असलें तरी माझें अध्यापन-कौशल्य बाहेरच्या पुष्कळांच्या कानांपर्यंत जाऊन पोंचलें होतें असें दिसतें. आमचे एक ऋणानुबंधी श्रीमंत मित्र श्री. अण्णासाहेब भाटे यांनीं आपल्या एका श्रीमंत मित्रापाशीं त्यांच्या मुलीला माझी शिकवणी ठेवण्यासाठीं शिफारस केली. मुलगी एरवीं चांगली, पण बुद्धीनें मागासलेली असल्यानें आतांपर्यंत कोणाच्याच शिकवणीचा गुण तिला आला नव्हता. शेवटीं ती केस माझ्याकडे आली. भरपूर मुशाहिरा, जातांयेतां गाडी, गेल्याबरोबर चहा अशी माझी तेथें बडदास्त होती.

दोन-तीन दिवस तिची चांचणी घेतल्यावर मला असें दिसून आलें कीं, हिला कोणी मनमोकळेपणानें बोलण्यासारखें मिळत नाहीं, हिच्याशीं कोणी खेळत नाहीं, सर्वजण तिला चिडवून तिच्यांतले दोषच काढतात. या सर्व

गोष्टी तिच्या वडिलांच्या कानांवर घालून मी त्या दृष्टीनें तिच्याशीं वागूं लागलों. अर्धे शिकणें तर अर्ध्या गप्पा, शिकणें झाल्यावर तिच्याशीं खेळणें, ती सांगेल तें गंभीरपणें ऐकून घेणें, असा माझा अध्यापनक्रम असे. लवकरच मुलगी मनानें मोकळी होऊं लागली. थोडा थोडा अभ्यासहि करूं लागली.

गप्पांच्या भरांत एकदां तिनें मला विचारलें, ' मास्तर, राणीसाहेबांना शिकवून आलांत ? ' ' हा काय प्रश्न आज ? ' असें मीं तिला विचारल्यावर ती म्हणाली, " तुम्ही खोटं बोलतां—माझे पपा सांगत होते मला. तुम्ही राजवाड्यावर राणीसाहेबांना शिकवायला जातां म्हणून. त्या माझ्यासंबंधीं तुम्हांला विचारतात ? " मीं खोटेंच म्हटलें, " हो विचारतात तर ! मीं त्यांना सांगितलं, ' मुलगी चांगली हुशार आहे, पण अभ्यास जास्त केला पाहिजे." " असं ! मग, उद्यांला काय काय करून ठेवूं, सांगा." आणि असें म्हणून ती लगेच गंभीरपणें अभ्यासाला लागली. अर्थात् हा अभ्यास जेम-तेम दोन-तीन दिवस चालला. पुढें मात्र येरे माझ्या मागल्या ! माझ्या शिकवणीचा कांहीं फायदा होत नाहीं असें पाहून मीं होऊनच ती शिकवणी सोडली. तिच्या आईबापांना बरेंच वाईट वाटलेलें दिसलें. तिला स्वतःला काय वाटलें कोणास ठाऊक ?

हें सर्व ठीक झालें. पण मी राजवाड्यावर जाऊन राणीसाहेबांना शिकवतों असं तिच्या पपांनीं तिला खरोखरच का सांगितलं होतं ? का ती निव्वळ तिच्या व तिच्या वडिलांच्या अंतर्मनांतली माझ्यासंबंधींची सुप्त शुभेच्छा ( wishful thinking ) होती ? कांहीं असलें तरी मला त्या बातमीनें आनंदच झाला.

या बातमीला कांहीं थोडा खरा आधार असलाच तर तो एवढाच कीं, राणीसाहेबांचे खास खाजगी चिटणीस श्री. घाटगेसाहेब यांनीं एकदां आपण होऊन राणीसाहेबांची व माझी भेट घडवून आणली होती. त्या वेळीं मीं आपलीं पुस्तकें त्यांना भेट म्हणून अर्पण केल्यावर त्यांनीं माझी, गंगूबाईची व प्रो. कर्वे यांची आपलेपणानें चौकशी केली व ' मीं तुमचें इंदूचें शिक्षण हें पुस्तक वाचलें आहे ' असें आठवणीनें सांगून मला निरोप दिला.

अर्थात् मला फार आनंद झाला. भेटीच्या वेळीं त्या माझ्या शिकवणीसंबंधीं कांहींच बोलल्या नाहींत. राणीसाहेबांना लवून नमस्कार (पुणेरी उभा नमस्कार नव्हे, किंवा बडोदी मुजराहि नव्हे) करून व दाराशींच उभ्या असलेल्या घाटगेसाहेबांचे आभार मानून मी तेथून निघालों. कांहीं कांहीं व्यक्तींचा माझ्यावर अकारण लोभ असे. तशांतले हे घाटगेसाहेब !

माझ्या जीवनांत बडोद्यानें जो आनंद भरला त्याचें वर्णन आतांपर्यंत केलें. पण आनंदाबरोबरच बडोद्यानें मला एका बाबतींत दुःखहि दिलें आहे तें मी कसा विसरूं ? तेथील अत्यंत कडक हवेमुळें इसब नांवाच्या एका चिकट व चिवट रोगानें मला ग्रासलें. तो रोग तेथें जडला नसता तर माझें तेथील वास्तव्य लांबलें असतें, व्यासंग वाढला असता व मान-लौकिकांतहि भर पडली असती. पण या जर-तरच्या गोष्टींचा उपयोग काय ? बडोदें मला एकंदरींत महाग पडलें एवढें निश्चित. पण कांहीं चांगलें प्राप्त करून घ्यावयाचें तर तत्प्रीत्यर्थ कांहींना कांहीं किंमत ही द्यावीच लागते. कमवायाचें तर गमवायाचीहि तयारी पाहिजे. ‘ नादत्तमुपतिष्ठते ’ हेंच खरें !

◎ ◎ ◎

# पुण्यांतील अलीकडचें वास्तव्य व दिनचर्या : : : २०

१९४२ सालीं मी पुणें सोडून बडोद्यास गेलों; व १९५४ सालीं बडोदें कायमचें सोडून पुण्यास आलों. दरम्यानच्या काळांत दर वर्षी माझ्या पुणें–बडोदें व बडोदें–पुणें अशा खेपा होतच होत्या; पण त्या उन्हाळ्याच्या सुटीपुरत्या किंवा तात्कालिक आजारपरत्वें असल्यामुळें जुजबी स्वरूपाच्या होत्या. या बारा वर्षांच्या बडोद्याच्या वास्तव्यांत मीं कमावलें काय व गमावलें काय याचा ओझरता आढावा मागील प्रकरणांत घेतला आहे. ज्ञान, नांवलौकिक व थोडासा पैका हीं कमावलीं, तर शरीरप्रकृति व आरोग्य हीं गमावलीं.

तोंपर्यंत मला माझ्या शरीराचा मोठा अभिमान वाटे. तें मोठें धष्टपुष्ट, पिळदार, सुडौल व बलशाली असें जरी नसलें तरी काटक, कष्टाळू, संसारांतील सर्वसामान्य दगदगींना न जुमानणारें; हवा–पाणी, खाणें–पिणें इ. संबंधीं फारसें चोखंदळ व तालेवार नसलेलें, आणि दैनंदिन कामकाज करण्यापुरतें तगडें असें होतें; व त्यांच्याच जोरावर मी जीवनांत पुष्कळसें साध्य करूं शकलों.

वयाच्या सातव्या वर्षापासून मी रोज कमींत कमी सात–आठ मैलांची रपेट करीत असें. अभ्यासाच्या पुस्तकांच्या बोजाशिवाय रोज [1]पायली–दोपायली तांदुळाचें ओझेंहि तुळशीबागेपासून पर्वतीपर्यंत अंगाखांद्यावर वाहून आणीत असें. धुणें–पाणी, झाड–लोट, इ. सारखीं कष्टाचीं ( आतां

१. माझे थोरले बंधू तुळशीबागेंतील दत्ताचे देवळांत पुराण वाचीत असत त्या वेळची ही मिळकत.

कष्टाचीं वाटणारीं ) कामें सहज लीलेनें व आनंदानें करीत असें. देवी प्लेग, कॉलरा अशांसारखीं बरींचशीं दुखणीं—बाहणीं यावयाचीं तशीं आलीं, पण आलीं तशीं गेलींहि. कशानेंच कायमचा पंगूपणा, अधूपणा किंवा अशक्तपणा आला नाहीं. सारांश, माझें शरीर जीवनांतील दैनंदिन उद्योगांना व कष्टांना तोंड देण्याइतपत धष्टपुष्ट असल्यानें कोणतेंहि काम अंगावर घेतांना आपल्या हातून तें होईल कीं नाहीं अशी शंकाहि मनाला कधीं शिवली नाहीं.

माझ्या मातापितरांनीं मला लहानपणापासून कष्ट करूं दिले, खाण्या-पिण्याचे बाबतींत नसते चोजले किंवा फाजील लाड केले नाहींत, स्वतःचें किंवा दुसऱ्याचें कोणतेंहि हलकें—सलकें काम करावयाला निर्बंध घातला नाहीं, कामाच्या चांगल्या—वाइटासंबंधींच्या खोट्या कल्पना मनांत रुजूं दिल्या नाहींत, व स्वावलंबनाचे आणि समानतेचे धडे स्वतः घालून देऊन मला ' आपणांसारिखे ' केलें याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें.

अशा प्रकारची शारीरिक अनुकूलता मला थोडीं थोडकीं वर्षें नव्हे, तर तब्बल साठ वर्षें लाधली; पण गेलीं सात-आठ वर्षें मात्र इसबाच्या चमत्कारिक व घाणेरड्या रोगामुळें प्रकृतीच्या या दैवी देण्याला आपण कायमचे मुकलों असें वाटूं लागून एक प्रकारची घृणा, विषण्णता, निरुत्साह, निराशावाद, मानव्यावरचा अविश्वास, जीवनाबद्दल उबग, स्वतःसंबंधींचा न्यूनगंड इ० हृद्रोगांच्या कृष्णच्छायांनीं माझें मनहि ढगाळूं लागलें. अशा प्रकारें बडोद्याहून पुण्यास आल्यापासूनचीं पहिलीं तीन-चार वर्षें माझी अत्यंत त्रासाचीं, कष्टाचीं व मनाच्या विकलावस्थेंत गेलीं.

गंगूबाईंना नोकरीसाठीं बडोद्यासच राहणें जरूर होतें. मींहि तेथेंच त्यांचेपाशीं राहावें म्हटलें तर मला तेथील कडक हवा मध्यंतरीं कांहीं दिवस मुळींसुद्धां सोसेना. अशा परिस्थितींत मीं पुण्यास माझ्या पुतण्याकडे राहावें असें ठरलें व मी त्याप्रमाणें पुण्यास आलों. गंगूबाई शक्य तितक्या वेळां रजा घेऊन बडोद्याहून पुण्यास येत. पण ही रजा चारपांच दिवसांचीच असावयाची; आणि त्यांपैकीं दोन-तीन दिवस तर नुसत्या जाण्यायेण्यांतच जावयाचे. उरलेल्या काळांत शक्य तेवढी सेवा-शुश्रूषा करून त्या परत बडोद्यास जात. इच्छा असूनहि त्यांना माझ्याकरिता जास्त कांहीं करतां

येत नसे याचें त्यांना व मला सारखेंच वाईट वाटे, पण कोणाचाच इलाज नव्हता.

पुतण्याकडील राहण्याची जागा अगोदरच लहान, त्यांतून त्याच्या दुकानांतील मालानें व्यापलेली अशी होती. दुसरें बरें ठिकाण मिळणें त्या दिवसांत तर शक्यच नव्हतें; अर्थात् तेथेंच दिवस काढणें जरूर होतें. पण दुःखांत सुख म्हणतात तें असें कीं, कुटुंबांतील यच्चयावत् माणसें माझ्या सुखासाठीं झटत होतीं. खुद्द वहिनींनीं व त्यांच्या मुलां-मुलींनीं तर माझें केलेंच, पण त्या मुलांच्या मुलांनींहि माझें केलें.

वहिनी आणि मी वयानें सामान्यतः सारखींच असून आम्ही आज पन्नास–पंचावन्न वर्षें एकमेकांच्या संगतींत व सहवासांत आहोंत. क्वचित् प्रसंगीं व कारणपरत्वें भांडलों सवरलों असूं. आम्हांमध्यें कांहीं कांहीं गैरसमजाहि झाले असतील. पण ते सर्व तेवढ्यापुरतेंच. पावसाळ्यांत वाहून आलेला गाळ वाहून-धुऊन गेला कीं, मूळचा प्रेमौघ गंगौघासारखा कसा स्वच्छ, निर्मळ नी पवित्र वाहत राही. माझें व माझ्या मुलाबाळांचें वहिनींनीं आईसारखें केलें आहे. त्या माझ्यापेक्षां दोन वर्षांनीं लहान म्हणूनच मी त्यांना 'आई' म्हणत नाहीं एवढेंच. त्या शिकलेल्या नसल्या तरी सुसंस्कृत आहेत. निष्काम सेवा, सतत दुसऱ्यांसाठीं राबणें हें जें संस्कृतीचें सार तें त्यांच्यापाशीं आहे.

आणि स्वयंपाक तर त्यांनींच करावा असें आम्हां कुटुंबियांनाच नव्हे तर इतरांनाहि वाटतें. त्या रोज माझ्याकरितां रुचकर, स्वादिष्ट व पथ्याचें पदार्थ नित्यनियमानें अलटून पालटून करून मला प्रसन्न ठेवण्याचा प्रयत्न करीत. पण प्रसन्न होण्याऐवजीं पुष्कळ वेळां त्यांची ती दक्षता व काळजी पाहून व आपण त्यांना किती त्रास द्यावयाचा असा विचार मनांत येऊन मला पानावर भडभडून येई, व त्यांच्या त्या करण्यावर विरजण पडे.

त्यांना आठवड्यांतून तीन-चार उपास तरी असतातच; आणि त्या उपासांच्या निमित्तानें केलेले व मला चालणारे पदार्थ त्या दुपारच्या चहाच्या वेळीं खावयाला देत. या खायला देण्यालाहि त्यांनीं एक प्रकारची धार्मिकता आणली होती.

व्याधीकडचें लक्ष कमी व्हावें, जमल्यास कांहीं आध्यात्मिक समाधान लाभावें व विशेष म्हणजे संत-वाङ्मय ऐकण्याची वहिनींची आवड पुरवावी या हेतूंनीं मी रोज तास दीड तास त्यांस प्राकृत पुराणें वाचून दाखवीत असें. अध्याय संपून मीं ' हरये नमः ' केलें कीं, त्या स्वयंपाकघरांत जात व ताटलींत माझें खाणें आणून नैवेद्यासारखें पोथीपुढें ठेवीत. व्यवहाराला परमार्थाची जोड देण्याची ही त्यांची तऱ्हा मोठी और होती. आपल्या हातच्या चविष्ट व स्वादिष्ट स्वयंपाकानें मुलां-बाळांना संतुष्ट राखणें, मोठ्या कर्त्या मुलांना सवड नसेल तेव्हां स्वतः आल्या-गेल्याचा परामर्ष घेणें, घराची राखण व घरांतल्यावर मायेची पाखर करणें हींच ध्येयें आतां त्यांनीं आपल्यापुढें ठेविलीं आहेत.

माझा पुतण्या [1]भाऊ, त्याची बहीण सुंदरी व [2]बायको येसू, त्यांस सवड सांपडेल तेव्हां-तेव्हां माझी शुश्रूषा करीत. स्वतःच्या उद्योगांमुळेंच त्यांचा जीव इतका रंजीस आलेला असे कीं, पुष्कळ वेळां माझी शुश्रूषा करतां-करतांच तीं पेंगूं लागत. सर्वांनींच माझी सेवा मोठ्या तत्परतेनें व आनंदानें केली. त्यांची ती सेवा नुसती वरवरची व दर्शनी नसे, तर काम कितीहि घामट, घाणेरडें, कष्टाचें व किळसवाणें असो, तें करायला ती मंडळी कधीं कंटाळली नाहींत.

त्या काळीं माझा त्रासिकपणा व चिडखोरपणा अतिशय वाढला होता, तथापि त्यांनीं आपल्या मनाचा तोल कधीं जाऊं दिला नाहीं. किंवा वाईट वाटून घेतलें नाहीं. माझा घायकुत्या स्वभाव भाऊला फारच चांगला समजला होता. त्याला मी अधून-मधून कांहीं गोष्टी बाजारांतून तावडतोबीनें आणावयास फर्मावीं. या गोष्टी खरें पाहतां

१. ' भाऊ ' व ' सुंदरी ' हीं नांवें जवळजवळ आलेलीं दिसलीं म्हणजे मला हरिभाऊंच्या ' मी ' मधील ' भावड्या ' व ' सुंदरी ' या प्रेमळ व्यक्तींची आठवण होते. आणि मला या भावंडांसंबंधीं विशेष कांहीं वाटूं लागतें.

२ येसू ही आमच्या नात्यांतलीच असून लहानपणापासून आमचे घरीं राहात असे. ती व सुंदरी या दोघीहि हल्लीं पुण्यांतील प्रसिद्ध प्राथमिक शाळांत शिक्षिका आहेत.

तितक्याशा जरूरीच्या नसत; तोच शहाणा, म्हणून 'उद्यां आणतों, दुकान बंद होतें, माल चांगला नव्हता' अशा प्रकारच्या खऱ्या-खोट्या सबबी सांगून त्या आणण्याचें लांबणीवर टाकी. मनांतला हेतु असा कीं, त्या गोष्टींची माझी खोटी गरज आपोआप कमी होऊन मी त्या मागायच्या विसरूनहि जाईन, किंवा त्या अजिबात लागणारच नाहींत. मी चांगल्या मनस्थितींत असलों म्हणजे मला या त्याच्या युक्तीचें व शहाणपणाचें कौतुक वाटे व हंसूं येई. गोष्टींतील एका गांङ्ळाच्या लेकीनें बैलाशीं लग्न करण्याचा मूर्ख हट्ट धरला असतांना गांङ्ळानेंहि 'एवढा चातुर्मास जाऊं दे' असें सांगून तिला गप्प नव्हतें का बसवलें ?

त्या काळांत डॉक्टरांनींहि ( माझे साडू डॉक्टर रामभाऊ भावे यांनीं ) आपली शिकस्त केली. किती औषधें व इंजेक्शनें त्यांनीं आलटून-पालटून दिलीं ! कांहीं उपयोग होत नाहीं असें दिसलें कीं कधीं कधीं ते स्वतः निरुत्साह होत, पण मला मात्र सारखा धीर देत.

त्यांच्या सहानुभूतीचा एक प्रसंग मला अजून चांगला आठवतो. संध्याकाळची दिवेलागणीची वेळ होती. दिवसभराच्या त्रासानें मी अगदीं व्याकूळ होऊन त्यांची वाट पाहत दवाखान्यांत बसलों होतों. इतर रोग्यांना मागें सारून रामभाऊ माझ्याकडे आले, आणि माझी ती अवस्था पाहतांच माझ्या पाठीवर हात ठेवून माझें सांत्वन करूं लागले. त्यांची ती सहानु-भूति पाहून मी गहिंवरलों व मला एक जोराचा हुंदका आला.

त्याबरोबर तेहि गहिंवरले व म्हणाले, "नाना, धीर सोडूं नका. काय वाटेल तें झालें तरी मी तुम्हांला बरें केल्यावांचून राहणार नाहीं." आणि आजतागायत त्यांचें तें व्रत चालूं आहे. त्यांना न कळवितां, कांहीं लोकांच्या भरीला पडून मी एकदां एका होमिओपाथिकडे गेलों. त्याच्या औषधानें आराम न पडतां उलट जास्तच त्रास झाला. तो निस्तरावयाला पुन्हां रामभाऊंनाच बोलावलें. ते मऊ पण निश्चयाच्या स्वरानें म्हणाले, "नाना, तुम्ही एक त्यांचें तरी औषध घ्या, नाहींतर माझें तरी घ्या. असे दोन्ही दरडींवर हात ठेवूं नका."

तेव्हांपासून मला रामभाऊंची थोडी भीति व बरीच लाज वाटे.

ते माझ्यासाठीं इतका जीव पाखडीत असतांना त्यांच्यावरची माझी श्रद्धा अधून-मधून ढळावी याचें मला वाईट वाटे. तेच मनानें उदार व प्रेमळ म्हणून त्यांनीं आपल्या प्रेमांत व कर्तव्यांत कमी केलें नाहीं एवढेंच. बाकी त्यांची सर्वच रोग्यांकडे पाहण्याची हीच दृष्टि आहे. रोग्याच्या प्रकृतीच्या काळजीनें हेच आपली प्रकृति बिघडवून बसतात. दुपारीं वेळेवर कधीं जेवण नाहीं, कीं रात्रीं कधीं निवान्त झोंप नाहीं; रोग्याच्या प्रकृतीप्रमाणेंच त्याच्या ऐपतीचाहि विचार करतील. एखादें औषध रोग्याला घेणें परवडणारें नसलें तर स्वतःचा खिसा सैल सोडण्यास ते बिलकूल मागें-पुढें पाहणार नाहींत.

मी हल्लीं मनाशीं एक खूणगांठ घालून ठेवली आहे—काय जो सोक्षमोक्ष व्हावयाचा तो त्यांच्याच हातून होईल. मरण यावयाचेंच असलें तर तें चांगल्या डॉक्टराच्याच हातून यावें, नाहीं का ?

रामभाऊ रोग्याला औषधानें बरें करण्याकरितां झटतात, तर त्यांची पत्नी—माझी मेहुणी डॉ० सौ. उषाबाई भावे आपल्या विनोदी व गोडव्या स्वभावानें रोग्याच्या जीवनांत आनंद व गोडवा उत्पन्न करतात. त्याहि पतीप्रमाणें एक नांवाजलेल्या डॉक्टर असून एक प्रसूतिगृह चालवीत आहेत. मी मात्र त्यांना अद्यापहि लहानपणाच्या संवयीनें व सलगीनें 'बवन'च म्हणतों. त्यांच्यांत इतरहि पुष्कळ गुण आहेत, पण ते सांगण्याचें हें स्थळ नाहीं, आणि शिवाय आपल्या माणसाचे गुण आपणच सांगावयाचे नसतात.

हें झालें अधिकृत डॉक्टरांसंबंधानें. मी न पुसतां-सवरतां आपण होऊन औषधें सुचविणारी परोपकारी मंडळीहि कांहीं कमी नव्हती. ते मोठ्या आत्मीयतेनें त्यांना माहीत असलेले उपाय–( शेळीच्या लेंड्या, गायीचें शेण अशांसारख्या क्षुल्लक व घरगुती उपायांपासून तों मुंबईचे स्किन् स्पेशॅलिस्ट, डॉ. फर्नांडिस यांच्या औषधापर्यंत ) मोठ्या विश्वासानें सांगत. अर्थात् मी तें सर्व कानानें ऐकून घेई व मनानें त्यांचे आभार मानीं. प्रत्यक्ष करीत मात्र कांहींच नसें. या सर्व महाभागांनीं सुचविलेलीं हीं सर्व औषधें व उपाय मीं एकत्र टिपून ठेवलीं असतीं तर माझ्या संग्रहीं इसबावरचा एक मोठा मटीरिआ-मेडिका तयार झाला नसता का ? पण

खरें बोलायचें तर मला ती दृष्टीच नाहीं. नकोत त्या गोष्टी टिपलेल्या सांपडतील, पण एखाद्या उपयुक्त गोष्टीची नोंद मात्र कोठें सांपडणार नाहीं.

खुद्द डॉक्टर, माझ्या वहिनी, पुतण्या भाऊ व त्याची बायको उषा, तात्यांची बायको विमल, भाऊच्या बहिणी—या सर्वांनीं केलेल्या शुश्रूषेचा उल्लेख मीं आतांपर्यंत केला. या शुश्रूषेंत आणखीहि कित्येकांचा भाग आहे. त्या सर्वांच्या नांवांचा नुसता निर्देश करणेंहि माझ्यानें शक्य होणार नाहीं. तथापि त्यांतल्या दोन व्यक्तींचा तरी उल्लेख मला करावा लागेलच. एक गंगूबाईचा भाचा ( ती. अक्कांचा मुलगा ) चि. मनोहर चिपळूणकर याचा व दुसरा त्याची बायको सौ. मीरा हिचा.

या दोघांना माझ्याबद्दल वाटणाऱ्या सहानुभूतीला सीमा नाहीं. थारेपालट व हवापालट म्हणून मी सुरुवातीला त्यांचे घरींच जाऊन राहिलों होतों. झोंपायला मात्र आमच्या नवीन घरांत—तें अर्धवट स्थितींत असतांनाच—जाई. मनोहरनें तर घाणीची किंवा किळशीची पर्वा न करतां माझ्या सर्वांगाला मलम लावावें, स्वतःचे सर्व उद्योग संभाळून मला लागणारीं औषधें, फळें वगैरे वेळोवेळीं आणावींत, रात्रीं नियमानें माझ्याजवळ बसून मला सुखवितील अशा गोष्टी सांगून थट्टा—विनोद करावा; आणि मीरानें मला आवडणारे तऱ्हे—तऱ्हेचे पदार्थ करून व माझ्याशीं घरगुती गप्पा मारून माझें मन रिझवावें.

वास्तविक पाहतां मी या रोगानें इतका घाबरून व निराश होऊन जावयाला नको होतें. माझ्यासारखी कितीतरी रोगग्रस्त माणसें—आपापल्या उद्योगांत मग्न असलेलीं—मी अवतीं-भवतीं पाहिलेलीं होतीं. मलाहि त्यांच्याप्रमाणेंच उद्योग-मग्न होऊन रोगावर मात करतां आली नसती काय ?

तसेंच अगदीं सुरुवातीला त्वचारोगाच्या एका विख्यात बंगाली डॉक्टरानें—मी त्याला प्रकृति दाखवावयास गेलों असतांना—स्पष्टपणें सांगितलें नव्हतें का कीं, माझा हा रोग कधींच कायमचा बरा होणारा नाहीं म्हणून ? तो तेव्हां इतकेंहि म्हणाला होता " We doctors can't work miracles. मी सांगितलेले उपाय करा, मलमें लावा, इंजक्शनें घ्या—पण तेवढ्यावरच

विसंबून राहूं नका. अशा व्याधींत थोडा-बहुत उपयोग झालाच तर देवाच्या दयाळुत्वावरील तुमच्या श्रद्धेचा व निष्ठेचाच होईल. ती मात्र कधीं ढळूं देऊं नका. खाणें, पिणें, व्यायाम, विश्रांति, इत्यादि संबंधींचे सामान्य नियम पाळीत जा, व आनंदानें व आशेनें राहण्याचा प्रयत्न करा असा माझा तुम्हांला सल्ला आहे."

कै. श्री. शंकर दिनकर सावरकर[1] हे होमिओपॅथीचे तज्ज्ञ असून माझे परोपकारी मित्र हरिभाऊ[2] गोखले मला त्यांच्याकडे घेऊन गेले होते. सावरकरांनींहि मला वरील बंगाली डॉक्टरांसारखाच सल्ला दिला होता. डॉक्टरांच्या व सावरकरांच्या सांगीचा उपयोग मीं त्या वेळीं जरी करून घेतला नाहीं, तरी आतां मात्र तो करून घेत आहे, व त्याचा सुपरिणामहि मला दिसून येत आहे. माझ्यांत बरा असा पुष्कळच बदल होत आहे असें मला निश्चित वाटतें.

हा बदल घडून येण्याला आणखीहि एक बलवत्तर कारण झालें. माझ्या शरीरप्रकृतीची व मनस्थितीची माहिती गंगूबाईकडून ऐकून नाना नारळकर यांनीं मुंबईहून एक सविस्तर पत्र लिहिलें. त्यांत ते म्हणतात :—

"काल समारंभानंतर सौ. गंगूताई भेटल्या. त्यांनीं आपल्या प्रकृतीची कल्पना दिली. मी आज सुमारें बारा वर्षें रुग्णाईत आहें—रोग्यानें कसें वागावें हें सांगण्याचा माझा अधिकार आहे. माझा अनुभव तुम्हांलाहि उपयोगी पडेल. मी डॉक्टराखेरीज कोणालाहि सविस्तर व वरचेवर माझ्या दुखण्याबद्दल सांगत बसत नाहीं. थोडें हंसून 'आतां बरें आहे असें सांगतों, रोगाकरतां काय काय पथ्यें पाळलीं पाहिजेत त्याचा नीट अभ्यास करून शक्य तेवढें जमतें घ्यावयाचें...व विशेषतः मनाला आवडतील अशा गोष्टी करावयाच्या—विनोदी इंग्रजी साप्ताहिकें, मासिकें वाचणें पेशन्सचा पत्त्याचा डाव खेळणें, रात्रीं ८॥ लाच अंथरुणावर पडणें, सकाळीं व दुपारीं रेडिओवर शास्त्रीय संगीत ऐकणें, नातवांना गोष्टी सांगणें, वाचून दाखविणें, त्यांचें नाट्य

१. माजी प्रिन्सिपल प्रायमरी ट्रेनिंग कॉलेज, पुणें; व एज्युकेशनल इन्स्पेक्टर, मध्यविभाग, पुणें व अहिल्यादेवी हायस्कूलच्या हल्लीच्या मुख्याध्यापिका–सिंधू सावरकर यांचे वडील.

२. नामवंत शिक्षक व कवि..

( स्वतः भाग घेऊन ) करणें, विम्याच्या योजना केव्हांहि व कोणालाहि उत्साहानें समजावून देणें ( यांत मी अद्यापि Expert आहे ) वगैरे वगैरे.

" एपिक्युरस म्हणतो तसें आनंदाचे क्षण टिपून घ्यायचे, फ्रिजिडेअर-मधला रॉजर्ससोडा, सुमधुर संत्रीं, ताजें ताक, कढत पोळीबरोबर पालेभाजी वगैरे मी खुषींत घेतों. अन् मी त्यामुळें उदासलेला कधीं नसतो. मृत्यु लांबावा अशी मुळींच इच्छा नाहीं, परंतु त्याची मागणीहि नाहीं. माझी भूमिका अशी—देव लेकाचा पक्का मारवाडी आहे. तो चित्रगुप्ताला विचारतो, ' काय रे, याचें झालें का दुःखाचें पुरेंपुरें माप ?' चित्रगुप्त म्हणतो, ' नाहीं, सर, अजून अर्धा टन बाकी आहे.' आणि ' समाजकार्य ? ' ' हो, अजून पुष्कळ उपयोग होतोय् लोकांना. ' ' होय का ? ' मग यमराजानें म्हणावें, ' तूर्त नको. ' या कृतीमुळें आपण इतरांना Perfect nuisance होत नाहीं. आणि आपल्याला जीवन सुसह्य होतें.

" एकदां का Nervous Depression आणि Counting of Frustration सुरू झालें कीं, त्या दोन्हीं गोष्टी जातात.

तसें म्हटलें तर आपणां तिघांच्याहि बाबतींत, आपल्या बरोबरच्या सवंगड्यांच्या मानानें, We have done much better than most ! वजाबाकी करतां झगझगीत + आहे. तेव्हां पूर्वस्मृति हा आपला केवढा आधार आहे.

" तेव्हां तुम्हांला प्रेमाचा सल्ला, आग्रहाची विनंति व निक्षून सांगणें कीं, तुम्ही आपणालाच कांहीं विशेष झालें आहे, मृत्यू येईल तो सुदिन आहे. हा काळ कसा तरी ढकलायचा वगैरे गोष्टी सोडून थोडें Epicurian बना, प्रत्येकाला आवडणाऱ्या कांहीं तरी गोष्टी असतातच. त्या शोधून, त्या जवळ करून, आनंदाचे क्षण टिपले पाहिजेत आणि एकप्रकारचा Sense of Achievement सदैव आठवून जीवन सुसह्य करावें. Depression प्रमाणेंच Ephilaration चें आहे. तें आणतां येतें. आल्यावर टिकवून धरतां येतें व मग त्याचीच संवय होते.

" तुम्हीं जरूर एकदां प्रयत्न कराच व यश मिळवाच ! क. लो. आहे.

आपला,

ना. ग. नारळकर "

सदरहू पत्र सविस्तर व जसेंच्या तसें देण्याचें कारण असें कीं, नानांनीं माझ्या प्रकृतीचें निदान, रुग्णावस्थेचें पृथक्करण व तीवर उपाययोजना किती बारकाईनें, सहानुभूतीनें व आपलेपणानें केलीं आहेत हें तर दिसावेंच, पण त्यावरून त्यांच्या स्वतःच्या धीरोदात्त, विचारी व विवेकी स्वभावाची व त्यांच्या जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाची जातां जातां ओळख व्हावी.

माझ्या या आजारपणाबद्दल आणखी पुष्कळ लिहितां येईल. औषधें, उपाय इत्यादींबद्दल नव्हे तर त्यांत मला घडलेल्या मानवी स्वभावाच्या मंगल दर्शनाबद्दल. मला जी पहिली गोष्ट दिसून आली ती ही कीं, जगांत वाईटा-पेक्षां चांगल्या लोकांचा भरणाच अधिक आहे; आणि वाईट असणारेहि कांहीं तसेंच कारण असल्याशिवाय वाईट होत नाहींत. आणि म्हणून वाईट माणसांची वाईट बनण्याचीं कारणें शोधून काढलीं तर तीं वाईट वाटणार नाहींत; व मग त्यांचेसंबंधींचे दुराग्रहहि नाहींसे होऊन त्यांचा राग येणार नाहीं. " To uderstand all is to pardon all " हेंच खरें आहे.

या रुग्णावस्थेंत दिसून आलेल्या मानवी स्वभावाच्या आणखी तऱ्हा पुष्कळ सांगतां येतील; पण त्या मूलतः याच तत्त्वाच्या निदर्शक असल्यानें त्यांचा बाह्य निराळेपणा सांगत बसत नाहीं. या सर्व लहान थोर मंडळींना माझे प्रणाम असोत. दुखण्याचा उरलेला अशुभ काल संपून लवकरच निरा-मयतेच्या व आरोग्याच्या पर्वकालाला प्रारंभ होईल या आशेवर आतां उर्वरित आयुष्य घालवावयाचें व स्वतः सुखी व आनंदी राहून दुसऱ्यांनाहि सुखानें आणि आनंदानें राहूं द्यावयाचें असें मनांतून तरी ठरविलें आहे.

माझ्या प्रकृतींत व मनःस्थितींत इष्ट असा बदल घडून येण्याला आणखीहि कांहीं बाह्य व परिस्थितिजन्य कारणें साहाय्यभूत झालीं असून तींहि सांगण्यासारखीं आहेत. मनाचा शरीरावर व परिस्थितीचा दोहोंवर कसा परिणाम होतो हें त्यामुळें दिसून येईल.

पहिलें कारण म्हणजे आमचें नवीन घर 'विसावा' हें होय. माझ्या त्रस्त जिवाला तो खरोखरचा विसावा झाला आहे. पुरंदरे कॉलनीसारखी एक स्वच्छ वसाहत, भोंवतालीं खूप ऐसपैस जागा, मध्यभागीं एक हवेशीर टुमदार बंगला, सभोंवार बाग, दोन्ही बाजूंनीं रुंद बिनवर्दळीचे, दिव्यांची व

वाहनांची सोय असलेले शांत रस्ते, म्हटलें तर गांवांत–म्हटलें तर गांवाबाहेर, थोड्याच अंतरावर हिंडाफिरायला किंवा देवदर्शनाला जाण्यासारखा जवळचा रस्ता–वगैरे किती तरी सुखसोयी या आमच्या ‘ विसांव्या ’ला लाभल्या आहेत.

गंगूबाई व अक्का या दोघींनीं मिळून आपल्या सर्व पैशानें हें घर बांधलें. इतकें सुंदर व भारी किंमतीचें घर तावडतोबीनें बांधण्यांत माझ्या प्रकृतीला आराम पडावा व बडोद्याहून सेवानिवृत्त होऊन आल्यावर आपल्याला आपलें सत्तेचें घर असावें असा दुहेरी हेतु होता; व तो अपेक्षेप्रमाणें चांगलाच साध्य झाला.

हें घर बांधलें जात असतांना अक्कांच्या अंगचें कर्तृत्व व व्यवहार-कौशल्य हें चांगलेंच निदर्शनास आलें. त्यासंबंधींच्या सर्व गोष्टी–त्यांतील खांचाखोचांसह–त्या इतक्या बारकाईनें व हुशारीनें पाहूं–समजूं शकत कीं, कोणतीहि गोष्ट करतांना गवंडी–सुतारचेस काय–खुद्द कॉंट्रॅक्टरहि अक्कांचा सल्ला घेत. आमचे कॉंट्रॅक्टर तर एकदां मोकळेपणानें व भाबडेपणानें म्हणाले सुद्धां–“ हें घर बांधतांना कितीतरी नवीन गोष्टी मी अक्कांपासून शिकलों ! ” अक्का आतां सत्तरीच्या सुमारास आल्या असतांहि नवीन–नवीन गोष्टी शिकण्याची त्यांची हौस आणि त्याला लागणारी त्यांची बुद्धिमत्ता–दोन्हीहि वाखाणण्यासारख्या आहेत. त्यांच्यांतील इतर गुणांचा उल्लेख इतरत्र आल्यामुळें त्यांची पुनरुक्ति करीत नाहीं.

सकाळच्या कोंवळ्या उन्हांत गच्चींतल्या गच्चीवर मनमानेल इतक्या फेऱ्या माराव्या, एकीकडे तोंडानें गणपति अथर्वशीर्षाचीं पारायणें करावीं, गच्चीवर हारीनें मांडून ठेवलेल्या गुलाबाच्या कुंड्यांना संध्याकाळीं पाणी घालीत व्यायाम करावा; नंतर स्वतःसाठीं ब्रेड व ‘ जिम्या ’ कुत्र्यासाठीं बटर आणण्यासाठीं जवळच्या बेकरींत, किंवा केवळ मनोरंजन करण्यासाठीं पेशवेपार्कमध्यें, किंवा देवदर्शनाकरितां म्हणून तळ्यांतल्या सिद्धिविनायकाला जावें; दोन्ही वेळां सात्विकसें जेवण करावें; तीन वेळां चहा घ्यावा; अधून मधून वामकुक्षीचे रूपानें विश्रांति घ्यावी, जो थोडासा वेळ उरेल त्यांत टाइम्स, केसरी, सकाळ अशांसारखीं वृत्तपत्रें वाचावींत, किंवा चालू लिखाणासारखें कांहीं ललित-लुलित लिहून मनाचा ‘ विरंगुळा ’ करावा,

त्यांतहि जमल्यास तिसऱ्या प्रहरीं पत्ते खेळावेत, व रात्रीं नऊ वाजतां रेडिओवर बातमी ऐकून व शरीरमर्दन करून देवाचें नांव घेत-घेत झोपीं जावें अशी माझी चालू दिनचर्या आहे. अर्थात् या सात्विक व राजयोगी दिनचर्येचा माझ्या प्रकृतीवर चांगला परिणाम होत असल्यास नवल नाहीं.

ही माझी राहणी सर्वस्वीं सुखासमाधानाची व पूर्णपणें आनंदमय आहे असें थोडेंच आहे? बोलून चालून हें मानवी जीवन आहे; आणि जीवन म्हटलें म्हणजे त्यांत सुखाबरोबर दुःख, समाधानाबरोबर असमाधान हें असावयाचेंच. शिवाय वार्धक्यसुलभ चिरचिरेपणा, चिडकेपणा, आवडी–निवडींबाबतचा छांदिष्टपणा, वर्तमानकालीन सुखांत समाधान मानण्याऐवजीं भविष्यकालीन काल्पनिक दुःखांतच निष्कारण चिंतातुर होणें इत्यादि अनिष्ट गोष्टींची ये-जा अधूंन-मधून चालतेच. तथापि एकंदरींत पाहतां व सुखदुःखांची वजावट करतां माझ्या वांट्याला दुःखापेक्षां सुखच जास्त आलें आहे असें मान्य करावयास पाहिजे.

आतेष्टांच्या व मित्रांच्या प्रेमळपणांत आणखी एका स्वामिनिष्ठ जीवाच्या प्रेमळपणाची भर पडली आहे. हा प्रेमळ जीव म्हणजे आमचा अल्सेशन कुत्रा ' जिम्या.' बंगली व बाग यांप्रमाणेंच माझा उमदा जिम्याहि माझें रंजन करून माझ्या सुखांत भर घालीत आहे. आपण जितकें प्रेम त्याच्यावर करावें त्याच्या दसपटीनें तो एखाद्या जिवलग माणसाप्रमाणें आपल्यावर प्रेम करतो आणि अशा अकृत्रिम प्रेमाच्या देवघेवीचा माझ्या मनावर फार चांगला परिणाम होत आहे.

सुखाच्या या तीन साधनांशिवाय आणखीहि एक-दोन साधनांनीं सुख मिळविण्याचा मीं प्रयत्न केला. बडोद्यांतल्या काळाप्रमाणें आपला पुण्यांतला काळहि शिकविण्याच्या आनंदांत जावा, म्हणून मी मुलींच्या ' जनता विद्यालयां 'त विनावेतन शिकवावयास जाऊं लागलों. सात-आठ महिने फार चांगलें जमलें. माझ्या शिकविण्याचा आनंद मुलींना व मला–दोघांनाहि होऊं लागला. ' पॅरेडाईज् रीगेन्ड ' असें वाटूं लागलें. पण थोड्याच दिवसांत आजारी पडून दुर्दैवानें ' पॅरेडाईज लॉस्ट 'चा प्रत्यय आला.

' प्राज्ञ ' परीक्षेचा वर्ग कन्याशाळेंत मोठ्या हुरुपानें काढला. शाळेच्या मुख्याध्यापिका–सौ० रत्नमालाबाई फणसे यांनीं किती तरी सोयी करून दिल्या.

पण त्याचीहि तीच गत झाली ! हें माझें शिकवणें जन्मांतलें शेवटचेंच ठरणार याचें मात्र अत्यंत दुःख होत आहे. वर्षांतून एखादे वेळ S. S. C. ला बसणाऱ्या दहा-बारा विद्यार्थिनी मराठी विषयांतल्या आपल्या शंका विचारण्या-साठीं एखादाच दिवस येतात. तेव्हां पूर्वींच्या वर्गांच्या आठवणी होऊन मला इतका आनंद होतो कीं, त्या मुलींना तुम्हीं नेहमीं येत चला, मी तुम्हांला फुकट शिकवीन ' असें सांगावेंसें वाटतें. पण आतां मराठी विषय व माझें शिकविणें हीं हवीं आहेत तरी कोणाला !

एकंदरींत, अशी आहे माझ्या आजाराची व तो कमी कमी होत जाण्याची हकीकत. या आजारांतून पूर्णपणें व कायमचा बरा होऊन मी पूर्वींच्या उमेदीनें एखादा नवीन उद्योग करीन असें मला वाटत नाहीं. सबंध अंग गेलेला एखादाच ' गोविंद कवि ' सुंदर मी होणार, आतां सुंदर मी होणार ' अशा आशेवर जगून जुन्या जीवनाचें पुनरुज्जीवन करूं शकेल. ' येऱ्या गबाळाचें काम नोहे.'

पण एवढें बरीक खरें कीं, मी पूर्वींपेक्षां पुष्कळच आशावादी व मनानें निकोप होऊं लागलों असून आणखी कांहीं चांगलें करीन असें वाटूं लागलें आहे. आणि अजून आयुष्य असलेंच तर तें कांहींतरी सत्कृत्यांत जावें अशी परमेश्वराची प्रार्थना करीत जगत आहें. ' विना दैन्येन जीवनं ' तर बरेंचसें झालेंच आहे. ' विनायासेन मरणं ' राहिलें आहे तेवढें व्हावें, आणि तोंपर्यंतचा काळ एखाद्या उच्च तत्त्वाच्या चिंतनांत व आचरणांत जावा एवढीच शेवटची इच्छा.

◎ ◎ ◎

मराठी ग्रंथ सं- ग्र- ठा. स्थळप्रत.
अनुक्रम.....	वि .........
क्रमांक............	नों. दि. ..............

# माझें लेखन : : : २१

तसें पाहिलें तर मीं फार किंवा फार वरच्या दर्जाचें लिहिलें आहे असें बिलकूल नाहीं. केळकर, वरेरकर इत्यादि अव्वल दर्जाच्या साहित्यिकांची मागची पिढी सोडून देऊन माझ्या पिढींतल्या फडके, खांडेकर, अत्रे इत्यादींचें लेखन पाहिलें तरी माझें लेखन दर्यामें खसखस अशा प्रकारचें वाटतें. परवांच फडक्यांचे घरीं कपाटांत हारीनें लावलेलीं त्यांचीं स्वतःचीं पुस्तकें पाहत होतों. मला वाटलें येवढेंच त्यांचें सर्व लिखाण असेल. पण लगेच फडकेच जराशा अभिमानानें म्हणाले, 'येवढ्यानें काय झालें आहे? मीं आतांपर्यंत एकशेंतीस पुस्तकें लिहिलीं आहेत.' खरेंच, केवढें हें आभाळासारखें विशाल वाङ्मय!

वामनराव जोश्यांनीं त्या मानानें लिहिलें थोडें; पण लिहिलें तें बावन्नकशी लिहिलें. माझें तसेंहि नाहीं. संख्येनें थोडें तर थोडें, पण वामनरावांसारखें गुणांनीं तरी मोठें असायाचें होतें; तर तसेंहि नाहीं. आणि असें असूनहि कांहीं दिवसांपूर्वीं लोक मला साहित्यिक म्हणून ओळखूं लागले होते. ओळखीचें कोणी केव्हांहि भेटो, 'हल्लीं काय लिहीत आहां?' असें मला आवर्जून विचारी. पुढें पुढें 'काय लिहीत आहां' असें विचारण्याऐवजीं 'काय, बरे आहांत ना' असें ते विचारीत. बोलण्याच्या ओघांत मीं हें बापूसाहेब माट्यांना सांगितल्याबरोबर ते आपल्या विशिष्ट पद्धतीनें हंसले व माझा हात आपल्या हातांत घेऊन म्हणाले, "बरं, अजून बरे आहांत ना, असें तरी विचारतात. थोड्याच दिवसांनीं नुसतेंच 'आहांत ना?' असें विचारतील." बापूसाहेबांची व माझी ही शेवटचीच भेट ठरली! बापूसाहेब गेले, पण त्यांचे हे मार्मिक शब्द कानांत कायमचे राहिले आहेत.

मी बरींच वर्षें—म्हणजे सुमारें अडीच-तीन तपें, अधून-मधून कांहींना कांहीं लिहीत आहें असें आतांच माझ्या लक्षांत आलें. मासिकांत छापून प्रसिद्ध झालेलें माझें पहिलें लिखाण १९२२ चे सुमारास असावें. प्रसिद्ध नाटककार मो. ग. रांगणेकर यांचें एक मासिक (बहुधा त्याचें नांव 'अरुण' असावें) होतें. त्यांत 'बालगंधर्वांची मुलाखत' हा माझा पहिला लेख अगदीं पहिल्या पानावर आला. लेखावर बालगंधर्वांचा एक मोठा फोटो छापला होता. लेखकाचाहि पुढें कोठेंतरी असेल असें वाटलें होतें, पण नव्हता.

लेखांत गंधर्वांची शारीरसंपदा, रूपसंपदा, त्यांच्या संवयी, लकबा इत्यादींचें वर्णन केल्यावर माझ्या मतें एक मोठा महत्त्वाचा प्रश्न मीं त्यांना विचारला होता. एम्. ए. च्या वर्गात मानसशास्त्र शिकत असतांना जेम्स्-लँग-थिअरी म्हणून एक वाद वाचला होता. त्याचा उल्लेख करून तो विचारला होता. वादाचा मुद्दा असा कीं, माणसाच्या मनांत भावना अगोदर उत्पन्न होऊन नंतर तिला अनुरूप असें शारीरिक वर्तन घडतें, का अनुरूप तें वर्तन केलें म्हणजे मागाहून भावना उत्पन्न होते? माझ्या प्रश्नाचें उत्तर गंधर्वांनीं त्या वेळीं काय दिलें तें आतां नक्की आठवत नाहीं. बहुधा त्यांना दुसऱ्या पक्षाचें म्हणणें मान्य असावें.

लेख प्रसिद्ध झाल्यानंतर दोन-तीन दिवसांनीं प्रो. श्री. नी. चाफेकर हिंगण्यास आले असतांना त्यांनीं त्याची वाखाणणी केली. चाफेकर त्या काळांत साहित्यिकांतले एक बडे प्रस्थ होते. त्यांच्या तोंडून बरें म्हटलेलें ऐकून मला मूठभर मांस चढल्यासारखें झालें. त्यांचें मत जर का तितकेंसें चांगलें पडलें नसतें तर 'प्रथम ग्रासे मक्षिकापातः' असें वाटून घेऊन मीं पुढें लेखणी हातांतहि धरली नसती. ती माझी मुलाखत व चाफेकरांचें तें अनुकूल मत मला शुभ शकुनाचींच झालीं.

रांगणेकरांच्या याच मासिकांत मीं 'व्हरंड्यावरची दिवाळी' हा आणखी एक लेख दिला होता. कॉलेजांतल्या कांहीं मुली दिवाळीचा फराळ करून व्हरांड्यांत जुन्या माणसांची टिंगल करीत बसल्या होत्या. त्यांचें बोलणें वक्तृत्व या दृष्टीनें फार चांगलें चाललें होतें. त्यांत विचार, कल्पना, विनोद वगैरे सर्व कांहीं होतें. फक्त नव्हतें तें सदभिरुचि व सहानुभूति. यावर मीं

नळे, चंद्रज्योती, फटाके व त्यांची शेवटीं सुटणारी घाण यांचें रूपक करून त्यांच्यावर टीका केली होती. लेख मुलींना लागलेला दिसला.

हे लेख प्रसिद्ध होण्यापूर्वी बरींच वर्षें मी दोन-तीन लांब लांब खाजगी पत्रें लिहिलीं होतीं. त्यांपैकीं एक माझे मित्र बाबुराव माटे वकील यांच्या पत्नीला, सौ. सोनूताईंना उद्देशून 'तुझी आई', अशा सहीनें लिहिलें होतें. त्या वेळीं मी हरिभाऊ आपटे यांनीं लिहिलेलीं 'सगुणाबाईंनीं आपल्या मुलीस लिहिलेलीं पत्रें' व केरळ कोकिळकर्ते श्री. आठल्ये यांची 'सासरची पाठवणी' हीं दोन पुस्तकें वाचलीं होतीं व तीं मला इतकीं आवडलीं होतीं कीं, आपणहि असेंच कांहीं लिहावें असें उत्कटतेनें वाटून मीं तें पत्र लिहिलें होतें. माटे मंडळीच सज्जन म्हणून त्यांना माझ्या या पत्रांत कांहीं आक्षेपार्ह वाटलें नाहीं. उलट त्यांनीं त्याचें कौतुकच केलें.

पत्राप्रमाणेंच मीं कांहीं विनोदी गोष्टीहि लिहिल्या होत्या. पत्रलेखनाची माझी हौस पुढें बऱ्याच वर्षांनीं 'हित पत्रें' या पुस्तकाच्या रूपानें पुरी झाली; पण गोष्टी लिहिणें मात्र अजिबात बंद पडलें.

हें झालें माझ्या प्रकाशित—अप्रकाशित किरकोळ लेखांसंबंधीं. माझें छापून प्रसिद्ध झालेलें पहिलें पुस्तक 'आमची दिवाळी' हें होय. तें १९३० सालीं प्रसिद्ध झालें. माझ्या पुढच्या पुस्तकांना कांहींना कांहीं लहानमोठे आधार आहेत. एक पुस्तक तर (तिचें अखेरचें पत्र) शुद्ध भाषांतरित आहे. दोन ('जगांतील मुलें' व 'जगांतील पिकें') रूपांतरित आहेत. 'आमच्या इंदूचें शिक्षण' हें आधारित आहे. पण 'आमची दिवाळी' हें निव्वळ काल्पनिक आहे. त्याची बीजकल्पना (Conception) व त्याचें बाह्य रूप, आकार वगैरे (execution) सर्व कांहीं माझें आहे. सुंदर कल्पनेला बाळसेदार रूप देऊं शकल्याबद्दल मी माझें अभिनंदन करतें.

त्या गोष्टींतल्या सर्वच व्यक्तिरेखा—विशेषतः पापासाहेबांची—वैशिष्ट्ययुक्त व सुस्पष्ट उतरल्या आहेत. पापासाहेबांच्या भूमिकेची कल्पना कमलाबाई देशपांड्यांचे दीर, कै. अप्पासाहेब यांचेवरून सुचली आहे. पापासाहेबांच्या कपाळावरील बुक्क्याचा घवघवीत टिळा, त्यांचें जेवावयाला बसतांनाचें 'ज्ञानदेव-तुकाराम' म्हणणें, थोडेसें वेदान्ती बोलणें, मनाचा वारकरी मोकळेपणा इत्यादि गोष्टी खास अप्पासाहेबांच्या आहेत.

पुस्तक अवघें ऐंशी पानांचें असूनहि त्यांत अवघ्या जगाची व भौगोलिक विषयांची तोंडओळख होते. त्यांतील माहिती खटकेबाज व विनोदगर्भ संवादांमुळें अत्यंत मनोरंजक व आकर्षक वाटते. त्या पुस्तकाची कल्पना त्या वेळीं लोकांना अभिनव वाटली असावी. कारण एका–दोघा लेखकांनीं तिचें अनुकरण करण्याचा निष्फळ प्रयत्न केल्याचें मला माहीत आहे.

पुस्तक लहान आकाराचें पण मोठ्या गुणाचें आहे या वस्तुस्थितीला उद्देशून 'ज्ञानप्रकाश'चे मार्मिक संपादक कै. बापूराव अंबेकर यांनीं ज्ञानप्रकाशांत 'मूर्ति लहान, पण कीर्ति थोर' असा अभिप्राय दिला होता. न्यू इंग्लिश स्कूलचे सुपरिंटेंडेंट प्रो. नाईक यांना हें पुस्तक फार आवडलें होतें व ते तें आपल्या शाळेंत लावणारहि होते. पण गोष्टींतील ते पांढरे बटाटे (अंडीं) त्यांच्या धार्मिक वृत्तीला न रुचून त्यांनीं तें आपल्या विद्यार्थ्यांच्या हातीं पडूं दिलें नाहीं. उलट नूतन मराठी विद्यालयाचे त्या वेळचे सुपरिंटेंडेंट प्रो. माधवराव परांजपे यांनीं तें आपल्या शाळेंत सामान्य वाचनासाठीं म्हणून आनंदानें लावलें. प्रो. वा. म. जोशी यांनीं पुस्तकाला मोठी मार्मिक व गुणग्रहणपर प्रस्तावना लिहिली आहे.

माझें दुसरें पुस्तक 'जगांतील मौजा' १९३१ सालीं प्रसिद्ध झालें. पुस्तकाची मूळ कल्पना व विशेषतः त्याची वर्णनशैली–माझ्या मतें फार चांगल्या साधल्या आहेत. भूगोलावरील कोणत्याहि एका विशिष्ट भागाचा अभ्यास करण्यापूर्वी सबंध जगाची सर्वसामान्य तोंडओळख मुलांस असावी हें तत्त्व त्याकाळीं सर्वमान्य होऊं लागलें होतें त्याला धरून मीं हा उपक्रम केला होता.

श्री. प्र. के. अत्रे यांच्यासारख्या प्रसिद्ध शिक्षणशास्त्रज्ञाच्या व सुप्रसिद्ध साहित्यिकाच्या प्रस्तावनेचा लाभ या पुस्तकाला मिळाला. त्यांनीं या पुस्तकाचें फार कौतुक केलें असल्यानें,–तें एखादें उत्तान काव्य, चटकदार कादंबरी, किंवा गूढ रहस्यकथा नसतांनाहि–अत्यंत लोकप्रिय झालें, व अवघ्या आठ वर्षांत त्याच्या तीन आवृत्त्या निघाल्या. प्रस्तावना–लेखक चांगला लोकप्रिय व लोकमान्य असला म्हणजे सामान्य लेखकाचाहि कसा बोलबाला होतो, हें मला या प्रसंगानें चांगलेंच कळून आलें.

वरील दोन पुस्तकांशिवाय मीं आणखी तीन भौगोलिक पुस्तकें लिहिलीं.

'जगांतील मुलें' (१९३२), 'साम्राज्यांतील आपले संबंधी' (१९३२) आणि 'जगांतील मुख्य पिकें आणि तीं पिकविणारे लोक' (१९३५) हीं तिन्ही पुस्तकें सामान्यतः भाषांतरित असलीं तरी तीं भाषांतरें अत्यंत सुबोध व सरळ झालीं आहेत, असें मला स्वतःलाच नव्हे, तर इतरांनाहि वाटतें. 'साम्राज्यांतील आपले संबंधी' यांतील बरीचशी माहिती सौ. गंगूबाई पटवर्धन यांनीं केलेल्या प्रवासवर्णनांतून घेतली असल्यानें भाषांतराच्या सुगमतेशिवाय त्याला एक प्रकारची व्यक्तिमत्ता (Individuality) आली आहे.

'आमची दिवाळी' या पुस्तकाला वामनराव जोशांसारखे श्रेष्ठ साहित्यिक प्रस्तावक म्हणून मिळाले. 'जगांतील मौजा'ना बालवृत्तीचे अत्रे लाभले. 'जगांतील मुलें' या पुस्तकाचे वेळीं मीं कोणासच विनंति केली नाहीं, कारण त्यांत माझें स्वतःचें असें फारसें नसून 'बोलविते धनी' वेगळेच आहेत. बऱ्यापैकीं भाषांतर एवढीच माझी कमाई. 'साम्राज्यांतील आपले संबंधी' या चौथ्या पुस्तकाचे वेळीं मात्र मी माझे मित्र प्रो. नारळकर यांची प्रस्तावना घेतली, आणि पुढें पांचव्या पुस्तकाचे वेळीं ('जगांतील पिकें') श्री. वि. द. घाटे या शिक्षणाधिकाऱ्यांची प्रस्तावना घेतली.

सदरहू चारी प्रस्तावना मार्मिक व महत्त्वाच्या असून त्या भूगोल शिकविणाऱ्या होतकरू शिक्षकांना मुळांतील मजकुरापेक्षांहि जास्त उपयोगाच्या झाल्या आहेत. तो विषय शिकविण्याच्या सर्व नवीन पद्धतींचें ज्ञान या चारी प्रस्तावनांत सूत्ररूपानें आलें आहे. या पुस्तकांतील मजकूर व माहिती पुष्कळजणांना आवडली असल्याचें मला माहीत आहे. मला स्वतःला मात्र तीं त्यांच्या प्रस्तावनांमुळें आवडतात, हें खरें. माझ्या सर्वच पुस्तकांना तज्ज्ञ, मार्मिक, सहृदय व रसग्राहक प्रस्तावक लाधले हें मी माझें भाग्य समजतों.

या पांचहि भौगोलिक पुस्तकांनीं मला थोडा-फार पैसा तर दिलाच, पण त्याहिपेक्षां जास्त म्हणजे मला शिक्षक व लेखक म्हणून कीर्तीहि मिळवून दिली. भूगोल विषयाचा एक व्यासंगी व आस्थेवाईक शिक्षक म्हणून लोक मला ओळखूं लागले. आणि एकदां तर एका मोठ्या जिल्ह्याच्या भौगोलिक परिषदेच्या अध्यक्षत्वाचाहि मान मला देण्यांत आला. माझी खरी योग्यता मला माहीत असल्यामुळें मी मात्र कित्येक वेळां मनांत म्हणतों, 'दुनिया झुकती है; झुकानेवाला चाहिये.'

पुढच्याच वर्षी म्हणजे १९३६ सालीं माझें ‘ आमच्या इंदूचें शिक्षण ’ हें अभिनव पुस्तक प्रसिद्ध झालें. आईबापांना आपलीं सर्वच मुलें सारखींच आवडतात, पण त्यांतलें एखादेंच विशेष आवडतें; माझेंहि माझ्या पुस्तकांबाबत तसेंच झालें आहे. माझ्या सर्व पुस्तकांत मला हें फार आवडतें, व इतरांनाहि तें तितकेंच आवडतें हें पाहिलें म्हणजे तर मला तें फार-फार आवडूं लागतें.

या माझ्या पुस्तकासंबंधीं बोलतांना कमलाबाई देशपांडे एकदां सहज असें बोलून गेल्या कीं, ‘ जेव्हां जेव्हां मला कांहीं सुचेनासें किंवा करमेनासें होतें, तेव्हां तेव्हां मीं हें पुस्तक उघडतें, व येईल त्या पानापासून पुढें वाचीत सुटतें. ’ साध्या, सोप्या, घरगुती भाषेंत केलेला हा माझ्या पुस्तकाचा फार मोठा गौरव आहे असें मी समजतों.

दुसऱ्याहि एका शिक्षणशास्त्रज्ञ व रसिक मित्राचे तोंडून असेच उद्‌गार अनाहूतपणें बाहेर पडले. हे मित्र म्हणजे महाराष्ट्रांतील भाषापंडित व सत्प्रवृत्त साहित्यिक प्रा. कृ. पां. कुळकर्णी हे होत. पुस्तक प्रसिद्ध होऊन कांहीं तरी एक आठवडा झाला होता. ते पूर्वीच्या त्या अरुंद लकडी पुलावर मला भेटले व माझ्या पाठीवर शाबासकी देत व प्रेमळपणें हंसत एकदम म्हणाले, ‘ रुसोच्या एमिलीची आठवण करून दिलीत बुवा ! ’ तो त्यांचा शेरा अत्यंत अनौपचारिक व मनापासूनचा असल्यामुळें मला त्याचें महत्त्व कांहीं अपरूप व आगळें वाटलें. माझें पुस्तक वाचून रुसोच्या एमिलीची त्यांना आठवण व्हावी—केवढें हें माझ्या पुस्तकाचें भाग्य ! वस्तुस्थिति अशी होती ( व अद्यापहि आहे ) कीं, मीं त्या पुस्तकाचें नांव जरी ऐकलें होतें, तरी तें माझ्या वाचनांत आलें नव्हतें—आणि अजूनहि तें मीं वाचलें नाहीं. माझ्या या पुस्तकाचें स्फूर्तिस्थान रुसो नव्हे, तर प्रसिद्ध अमेरिकन तत्त्ववेत्ता व शिक्षणशास्त्रज्ञ विल् ड्यूरंट हें होय; आणि हें मीं माझ्या पुस्तकांत जाहीररीत्या सांगितलें आहे. कदाचित् कुळकर्णी यांनीं छोट्या गोष्टीचें मोटें कौतुक करण्याच्या आपल्या स्वभावामुळेंहि असें म्हटलें असेल.

वरील दोन व्यक्तींच्या खाजगी बोलण्यांतील शेऱ्यांशिवाय साहित्य-सम्राट् न. चिं. केळकर, कै. वा. म. जोशी, प्र. के. अत्रे, वि. द. घाटे, रा. सी. तावडे, ना. ग. नारळकर, व भा. धों. कर्वे यांनीं लेखी शेरे दिले ते या पुस्तकाच्या सुरुवातीलाच छापलेले आहेत.

वरील व्यक्तींप्रमाणेंच दोन-तीन साहित्यिक संस्थांनींहि या पुस्तकाचा पुरस्कार केला आहे. हा पुरस्कार केवळ शब्दांनीं केलेला नसून त्याला आर्थिक पारितोषिकें देऊन केलेला आहे हें विशेष होय. श्री. कै. तात्यासाहेब केळकरांनीं आपल्या पूज्य मातापितरांचे नांवानें स्थापन केलेल्या यशोदा चिंतामणि ट्रस्टनें सदरहू पुस्तकाला १९३६ चें दुसरें बक्षीस ( रु. ३०० ) देऊन त्याचा गौरव केला व त्याच्या लेखकाला उपकृत केलें. या संबंधांत एक गोष्ट सांगण्यासारखी आहे. या पुस्तकांतील लैंगिक शिक्षणासंबंधींचा भाग खुद्द तात्यासाहेबांना फारसा पसंत नव्हता; आणि असें असूनहि ते पुस्तकाला पारितोषिक देण्याच्या विरुद्ध गेले नाहींत. केवढा हा मनाचा उदारपणा ! नवोदित लेखकांना उत्तेजन देण्याचें तात्यासाहेबांचें व्रतच होतें.

लैंगिक शिक्षणाला अनुकूल लिहिणें हें पंचवीस वर्षांपूर्वीं जरा धोक्याचेंच होतें. कितीतरी पुरोगामी लेखकांना त्याची झळ लागली आहे. पण तो धोका पत्करूनहि मीं तसें लिहिलें याचें वाईट न वाटतां उलट आनंदच वाटतो.

भोर संस्थानाचे आद्य संस्थापक शंकराजी नारायण यांचे नांवानें ठेवलेलें शंभर रुपयांचें पारितोषिकहि भोर संस्थानाकडून या पुस्तकाला मिळालें. या पारितोषिकाला प्रो. नारळकरांची शिफारस मुख्यतः कारणीभूत झाली असल्याचें मला माहीत आहे. श्रीमंत भाऊसाहेब पंतसचिव ( आतांचे निवृत्त झालेले भोरकर ) यांचा ऋणानुबंधहि त्याला उपकारक झाला असावा. या दोन्ही व्यक्तींच्या गुप्त मदतीबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

तिसऱ्याहि एका संस्थेकडे ( ही संस्था कोणती हें आतां नक्की आठवत नाहीं. बहुधा ती पुण्याची व्हर्नाक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटी असावी ) मीं पारितोषिकाकरितां विनंति केली होती. पण आमचें तें ‘ लैंगिक शिक्षण ’ प्रकरण आम्हांला भोंवलेलें दिसतें. पारितोषिक मिळालें नाहीं हें खरें. या संस्थेनें मला माझ्या दोन-तीन पुस्तकांना बक्षिसें दिलेलीं आहेत हेंहि येथें कृतज्ञतापूर्वक नमूद केलें पाहिजे. असो.

मागें सांगितल्याप्रमाणें या पुस्तकानें सर्वच अर्थांनीं मला माझ्या लेखन-कार्यांत उत्तेजन दिलें आहे. ‘ काव्यं यशसेऽर्थ कृते...! इत्यादि जीं जीं काव्यप्रयोजनें पूर्वसूरींनीं सांगितलेलीं आहेत तीं सर्व या पुस्तकाचे रूपानें साधलीं आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. पैसा, कीर्ति वगैरे मिळाली

हें खरें, पण त्यानेंच माझें एक नुकसानहि केलें आहे. तें पुस्तक इतक्या वरच्या दर्जाचें झालें आहे ( हो, ' झालें ' हेंच खरें. मीं तसें लिहूं म्हटल्यानें लिहिलें गेलें नसतें. ) कीं यापुढें पुस्तकें लिहावयाचीं तीं त्याच दर्जाचीं असलीं पाहिजेत; त्यापेक्षां हिणकस असतां कामा नये— नाहींतर कमावलेलें नांव गमावण्याची पाळी येईल, अशा प्रकारच्या अभिमानाच्या भुलीला मी बळी पडलों, व पुढें सुमारें सात वर्षें मीं स्वतंत्र असें कांहीं लिहिलें नाहीं.

हें पुस्तक प्रसिद्ध झालें तेव्हां त्याच्या स्वरूपाविषयीं निरनिराळ्या वाचकांच्या निरनिराळ्या कल्पना झालेल्या दिसल्या. कै. तात्यासाहेब केळकरांना सुरुवातीला तरी ती कादंबरीच वाटली. कांहींना तें माझें स्वतःचेंच चरित्र वाटलें, तर कांहींना ती सत्यकथा वाटली. कांहींना त्यांतलीं सर्वच पात्रें जरी नाहीं तरी बरीचशीं पात्रें खरीं वाटलीं; व गोष्टींतील अमूक पात्र म्हणजे खरी अमूक व्यक्ति असें समीकरण ते मनाशीं बांधीत राहिले. मला मात्र या सर्व वाचकांची मजा वाटे, व हंसू येई.

वाचकांचा असा गोंधळ होण्याचें कारण म्हणजे गोष्टींतील दोघां प्रमुख पात्रांचीं नांवें मीं खऱ्याखुऱ्या व्यक्तींचींच ठेवलीं होतीं. तीं पात्रें म्हणजे नाना व इंदू. वास्तविक माझें ' नाना ' हें नांव फक्त घरांतल्या मंडळी-पुरतेंच होतें; पण तेंच पुढें इतकें रूढ झालें कीं, मी त्याच नांवानें ओळखला जाऊं लागलों. माझ्या विद्यार्थिनी, माझे सहकारी शिक्षक, व शाळेंतील गडी माणसेंहि मला ' नाना 'च म्हणत असत. निदान गडीमाणसांनीं तरी मला ' नानासाहेब ' म्हणावें असें कितीतरी वाटे. त्यांना मला ' नानासाहेब ' म्हणण्यांत औपचारिकपणा व परकेपणा वाटे कीं काय कोणास ठाऊक !

माझ्या मुलीचें नांव इंदू असलें तरी गोष्टींतील इंदू माझ्या इंदूपेक्षां कितीतरी चलाख व हुशार दाखविली आहे. माझी इंदू भाबडी, भाविक व प्रेमळ होती. एका संमेलनप्रसंगीं मीं तिला गोष्ट सांगावयाला शिकवून गोष्टीच्या चढाओढींत भाग घ्यावयाला लावला होता, व तिला बक्षीसहि मिळालें होतें. पण तें तिच्या गुणांवर नसून ती प्रिन्सिपॉलची मुलगी म्हणून देण्यांत आलें होतें, हें मी जाणून होतों. गोष्टींतील इंदूला ती अभ्यास सोडून मैत्रिणींबरोबर खेळावयास गेल्याबद्दल तिच्या नानांनीं मारलें होतें; व नंतर ते हळहळत बसले. हा प्रसंग मात्र अक्षरशः खरा आहे आणि

म्हणूनच तो इतक्या जिव्हाळ्याचा उतरला आहे. गोष्टींतील इंदूच्या आईचा व खऱ्या इंदूच्या आईचा अर्थाअर्थी कांहींहि संबंध नाहीं. मात्र दोघींनाहि आपल्या मुलीला खूप खूप शिकवावें अशी इच्छा होती येवढेंच काय तें साम्य.

गोष्टींतील नाना खऱ्या नानांपेक्षां कितीतरी जास्त विनोदी व विचारवंत असून त्यांची जीवनाकडे पाहण्याची दृष्टीहि जास्त निकोप आहे. बायकोनें केलेल्या चेष्टेनें ते सहसा चिडत नाहींत, उलट चेष्टेला चेष्टेनेंच उत्तर देतात. त्यांना नवीन गोष्टी अद्याप पूर्णपणें आवडत नाहींत, तथापि त्यांच्या योग्यायोग्यतेचा विचार केल्यावर योग्य गोष्टींचें स्वागत करण्यास ते सदैव तयार असतात. कांहीं गौण पात्रांसंबंधींहि थोडेसें असेंच झालें आहे, असें आतां मला आठवतें. पण तें असो.

हें पुस्तक माझ्या हातून इतकें चांगलें कसें लिहिलें गेलें, याचा मी एकसारखा विचार करीत असें. 'मला तशी स्फूर्ति झाली' असें म्हणण्यांत फारसें तथ्य नाहीं. शिवाय स्फूर्ति म्हणजे काय, ती कशी झाली इत्यादि गुंतागुंतीचे प्रश्न उपस्थित होतात.

वस्तुनिष्ठ दृष्टीनें विचार करतांना मला त्याचें कारण पुढीलप्रमाणें वाटतें. १९२१–२२ मध्यें मी हिंगण्याच्या अध्यापिका शाळेंत शिक्षण व बालमानसशास्त्र हे विषय शिकवूं लागलों; आणि १९३५ मध्यें मीं हें पुस्तक लिहिण्यास घेतलें. म्हणजे मधलीं बारा-तेरा वर्षें मी या विषयासंबंधीं वाचन व मनन करीत होतों. या वाचना-मननाचा हेतु प्रथमतः चांगलें शिकवितां यावें येवढाच होता—पुस्तक लिहिण्याचा नव्हता. त्या अभ्यासाचे योगानें मन इतकें ओतप्रोत भरून गेलें कीं, तें ज्ञान कोणत्या ना कोणत्या दुसऱ्या निमित्तानें व प्रसंगानें बाहेर पडण्याची जणूं वाटच पाहत होतें आणि असा एक प्रसंग पुस्तकाच्या सुदैवानें पण माझ्या दुर्दैवानें माझेवर ओढवला.

१९३१ मध्यें माझी इंदू मला सोडून गेली ! दोन-तीन वर्षें मी अत्यंत व्याकूळ व विमनस्क होऊन गेलों होतों. रोजचे सर्व व्यवहार व कर्तव्यें करावयाचीं तीं करीत होतों. बाह्यतः माझ्यांत फारसा फरक पडलेला नव्हता. पण अंतर्यामीं मात्र मला तिच्याशिवाय दुसरें कांहीं सुचत नसे. 'येतां, जातां, बसत उठतां, कार्य करितां'—सारखी तिची आठवण व्हावयाची.

अशा व्यग्र स्थितींत असतांना विल् ड्यूइंट या अमेरिकन तत्त्वज्ञानाचें ' मॅन्शन्स् ऑफ् फिलॉसफी ' हें पुस्तक दैवयोगानें हातीं पडलें. त्या पुस्तकांतील ' About Children–A Confession ' ह्या प्रकरणानें माझें मन इतकें वेधून घेतलें कीं मीं त्याचीं अनेक पारायणें केलीं. शेवटीं त्यावर एखादा लेख लिहून ' किर्लोस्कर 'सारख्या मासिकांत प्रसिद्ध करावा अशा हेतूनें लिहावयास बसलों. आणि आस्ते आस्ते एका लेखाचें रूपांतर एका पुस्तकांत झालें.

मूळ लेखकाच्या ' एथल ' ( Ethal ) या मुलीमध्यें मला माझी इंदू दिसूं लागली, आणि लेखकानें जें जें ' एथल 'संबंधीं लिहिलें होतें तें तें मीं—योग्य तो बदल करून— माझ्या इंदूला लावलें. जसाजसा लिहीत गेलों तसतसें जास्त जास्त सुचूं लागलें आणि मनाला प्रसन्नता येऊं लागली. इंदूच्या विरहाबद्दल वाटणारें प्रत्यक्ष दुःख आतां रूपांतरित होऊं लागून मनाच्या प्रसन्नावस्थेंत दुःखांतील वैयक्तिक खळमळ व हिणकस जळून जाऊं लागलें आणि त्याला शुद्ध सोन्याचें सात्त्विक रूप प्राप्त झालें. मानसशास्त्राच्या भार्षेत सांगावयाचें म्हणजे जीं सुखदुःखें पूर्वीं एका व्यक्तीपुरतींच मर्यादित होतीं तीं आतां सबंध बालसृष्टीभर विस्तृत झालीं. एके काळीं जे विचार अत्यंत दुःखाचे होते त्यांचींच आतां गोड गाणीं बनलीं व जो केवळ दुःखाचा उमाळा होता त्याचें कांहीं काळानें स्मृतींत रूपांतर होऊन तें प्रसन्न व आल्हादकारक काव्य बनलें.

असें सुंदर काव्य स्फुरण्याला मनाची जी भावनोत्कटता लागते ती मला माझ्या इंदूच्या मृत्यूंतून लाभली व जी प्रसन्नता लागते ती विचारांतून व अभ्यासांतून प्राप्त झाली, आणि म्हणूनच इंदूच्या मृत्यूचा प्रसंग, वर म्हटल्याप्रमाणें, मला एका अर्थीं दुर्दैवाचा, पण दुसऱ्या अर्थीं सुदैवाचा वाटतो. वर्ड्स्वर्थ व कीटस् यांनीं केलेल्या काव्यासंबंधींच्या व्याख्यांचा अर्थ हें पुस्तक लिहिण्यापूर्वीं मला नुसता कळलाच होता, पण ' पुस्तकाच्या निमित्तानें तो पुरता प्रतीत झाला. असा आहे ' आमच्या इंदूच्या शिक्षणा 'चा इतिहास—त्याचा उद्भव व विकास.

हें पुस्तक प्रसिद्ध होऊन कांहीं दिवस लोटल्यावर निरनिराळ्या वाचकां-कडून कितीतरी प्रश्न मला विचारण्यांत आले. उदाहरणार्थ—'या पुस्तकाचा पुढचा भाग तुम्ही केव्हां प्रसिद्ध करणार ? मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न जसा तुम्ही

या पुस्तकांत हाताळलांत, तसा मुलांच्या शिक्षणाचा लिहिण्यास घेणार आहांत ना ?' इत्यादि. 'तुमची इंदू आपल्या बाईंच्या भावावर– मधुसूदनरावांवरें अनुरक्त होऊं लागल्याचें तुम्हीं दर्शविलें आहे. त्या दोघांचें शुभमंगल करून आम्हांला लाडू–निदान पेढे–केव्हां देणार ?' असेंहि एका थट्टेखोर वाचकानें विचारावयास कमी केलें नाहीं.

उलट एका मार्मिक पण हळव्या मनाच्या सद्‌गृहस्थानें मुद्दाम पत्र लिहून विचारलें आहे–"पण मला पडलेलें स्वप्न-स्वप्नच राहणार ना ? कां...!!! असा उदास–गंभीर व शंकामूलक शेवट तुम्हीं पुस्तकाचा कां केला आहे ! इंदूच्या जीवनाचा कांहीं बरा-वाईट शेवट करून या सुंदर गोष्टीची एखादी शोकांतिका करण्याचा तर तुमचा इरादा नाहीं ना ? तसा इरादा असल्यास तसं भलतं–सलतं कांहीं करूं नका. कांहीं थोड्या अत्याधुनिक वाचकांच्या आवडीला बळी न पडतां सर्वसामान्य सत्प्रवृत्त व ईश्वरनिष्ठ वाचकांकरितां ती गोष्ट सुखांतिकाच करा. तोच तिचा योग्य शेवट. इंदूच्या वडिलांनीं तिला जें इतकें चांगलें शिक्षण विचारपूर्वक दिलें आहे त्यानें तिचें भावी जीवन सुखासमाधानाचें व आनंदाचें झालें पाहिजे. तरच त्या शिक्षणाचा उपयोग."

असल्या प्रश्नांचीं योग्य तीं उत्तरें देणें मोठें मनोरंजक झालें असतें. विशेषतः शेवटचा प्रश्न शिक्षणशास्त्र व ललितवाङ्मय या दोहोंचे दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा आहे. खरोखरच मला आतां विचार पडला आहे–मीं पुस्तकांतील तें शेवटचें वाक्य त्या वेळीं असें संशयात्मक रीतीनें कां लिहिलें ? मला असें वाटतें कीं, मला पुढचें कांहीं सुचलें नसावें, किंवा कंटाळा येऊन पुस्तक एकदांचें हातावेगळें करण्याचा विचार केला असावा.

शिक्षण ही जीवनाची पूर्वतयारी आहे, त्याच्या बऱ्या वाईटपणावर पुढील सुख-दुःखें अवलंबून आहेत असें जें त्या सद्‌गृहस्थानें सूचित केलें आहे त्यावर माझा विश्वास अढळ होता का नव्हता ?– या घटकेला तरी तो तसा आहे कीं नाहीं ? विचार करतांना मला आतां असें वाटूं लागलें आहे कीं, सुशिक्षणाच्या सुपरिणामावर माणसानें निःशंकपणें अवलंबून राहून चालणार नाहीं. शिक्षण आणि जीवन यांमध्यें साधारणपणें संबंध असलेला आढळतो, पण तो नेहमींच तसा असला पाहिजे अशी भलती

अपेक्षा करूं नये, व ती सफल झाली नाहीं कीं, मनाच्या भ्रमनिरस्त व वंचित अवस्थेंत दुःखी-कष्टी होऊंहि नये.

एक साधा प्रश्न असा कीं, मी शिक्षणाच्या नवीन पद्धतीचा पूर्वी जितका उदो उदो करीत असें तितका आतां करीन का? इतरत्र चालू असलेल्या निरनिराळ्या आधुनिक पद्धतींच्या गुणकारीपणावर मी पूर्वी-इतका विसंबून राहीन काय? संवयी, गृहशिक्षण, प्रेमाधिष्ठित शिस्त, सहज-प्रवृत्तींच्या धोरणानें शिक्षण देणें इ० नवीन तत्त्वें चांगलीं खरीं; पण तीं विचारपूर्वक अंमलांत आणलीं तर उपयोग. आणि शिवाय आणखीहि कांहीं गोष्टी—कौटुंबिक, सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय सुद्धां—विचारांत घेण्यासारख्या आहेत हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे. कोणत्याहि एकाच गोष्टीचें देव्हारे माजवून इतरांची उपेक्षा करणें योग्य नाहीं. यापेक्षां जास्त स्पष्ट व निश्चित असें मला या घटकेला तरी सांगतां येणार नाहीं.

या शिक्षण-विषयक पुस्तकाशिवाय मीं 'पाश्चात्य शिक्षण-शास्त्राचा इतिहास' व 'प्राथमिक शिक्षणाच्या तीन पिढ्या' असे दोन प्रबंधहि लिहिले असून ते अनुक्रमें भा. धों. कर्वे यांनीं संपादित केलेलें 'शिक्षण-विषयक नवीन विचार' हें पुस्तक' व डे. ए. सोसायटीच्या सुवर्ण महोत्सवा-निमित्त प्रसिद्ध झालेला स्मारकग्रंथ यांत छापले आहेत. ते प्रबंधहि माझ्या मतें चांगले झाले आहेत.

प्राथमिक शिक्षकांच्या ट्रेनिंग कॉलेजांकरितां सरकारी शिक्षणखात्यानें शिक्षण—अध्यापन या विषयावर एक पाठ्यपुस्तक तयार करण्याचें योजलें आणि ताराबाई मोडक, म. का. कारखानीस व मी अशा तिघांना हस्तलिखितें पाठविण्याचें पाचारण केलें. कालांतरानें सरकारी पुस्तकाची योजना बारगळली, व मीं लिहिलेला प्रबंध सरकारी दप्तरखान्यांत कायमचा पडून राहिला. मीं तो लेख प्रसिद्ध शिक्षण-शास्त्रज्ञ वेल्टन् यांच्या पुस्तकाच्या आधारानें लिहिला असल्यामुळें तो फार चांगला झाला होता व शिक्षण-खात्यालाहि तो पसंत पडलेला दिसला. खात्यानें मला त्या लेखाबद्दल योग्य ती बिदागी ( रुपये ९० असावी ) दिली असली, तरी तो लेख पुस्तकरूपानें लोकांपुढें आला नाहीं याचें अजूनहि वाईट वाटतें.

पुढच्याच वर्षीं ( १९३७ मध्यें ) मी 'तिचें अखेरचें पत्र' व 'अघोर

अहंकार ' अशा दोन दीर्घकथा एकत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध केल्या. सदरहू दीर्घकथा सुप्रसिद्ध जर्मन कथालेखक स्टेफान त्स्वाईग याच्या ' ए लेटर फ्रॉम् अॅन् अनोन वूमन ' व ' अमॉक् ' या दीर्घकथांचीं भाषांतरें आहेत. मूळ कथा तर अत्यंत प्रभावी आहेतच, पण मीं केलेलीं त्यांचीं भाषांतरेंहि अत्यंत सुरस उतरलीं आहेत. विशेषतः पहिल्या गोष्टीचें भाषांतर इतकें चांगलें उतरलें याचें कारण, मला वाटतें, गोष्टींतील नायिकेशीं माझें झालेलें तादात्म्य, किंवा केळकर म्हणतात त्याप्रमाणें, ' सविकल्प समाधि.' मला तिच्या विरहावस्थेशीं समरस होतां आलें. भाषांतर उत्तम व्हावयाचें असेल तर नुसत्या मूळांतील शब्दांचें भाषांतर होतां कामा नये, तर त्यांतील भावनांचें मानसांतर झालें पाहिजे.

१९३७ ते १९४२ या अवधींत मीं कांहींच लिहिलें नाहीं. माझी शारीरिक व मानसिक परिस्थिति अस्वस्थतेची असल्यानें लिहिण्यासवरण्यास जी एक प्रसन्नता—समाधानता लागत असते तिला मी दुरावलों होतों. शरीराची व मनाची प्रसन्नता नसतांहि आपल्या कलेंत व कर्तव्यांत रममाण असणें हा लोकोत्तर व्यक्तींचा धर्म आहे. त्यांच्या थोरवीला माझ्यासारखीं सामान्य माणसें कधींच पोंचूं शकत नाहींत. सर्व कांहीं आबादी—आबाद असेल, सर्व प्रकारचीं सुखें सांगातीं असतील तरच आमच्या हातून कांहींतरी होणार. असो.

१९४२ मध्यें मी हिंगण्याहून सेवानिवृत्त होऊन बडोद्यास—घरीं गेलों. अर्थात् तेथें प्रकृति सुधारली, मनालाहि हुरूप वाटून कांहीं लिहावेसें वाटूं लागलें. विषय शोधीत असतांना प्रसिद्ध इंग्लिश मानसशास्त्रज्ञ विल्यम् मॅक्डुगल याचें ' Character & The Conduct of Life ' व अमेरिकन साहित्यिक डेल कार्नेजी याचें ' How to win friends and influence people ' हीं दोन सुंदर पुस्तकें आपाततः हातीं पडलीं; आणि त्यांतील विषयांचे आधारें लिहावें असें ठरविलें.

लहानपणची पत्रलेखनाची आवड पुन्हां जागृत झाली व लिहावयाचें तें पत्ररूपानें लिहावयाचें असा बेत केला. आणि हीं पत्रें म्हणजेच माझें ' हितपत्रें ' हें पुस्तक होय.

या पुस्तकासंबंधीं घडलेल्या कांहीं प्रिय-अप्रिय गोष्टी सांगण्यासारख्या आहेत. पहिली गोष्ट म्हणजे—पुस्तकांतील पहिलें पत्र— ' ती. अबा यांस ' हें

लिहून मीं किर्लोस्कर मासिकाकडे प्रसिद्धीकरितां पाठविलें. तें संपादकांना इतकें आवडलें कीं त्यांनीं तें खास दिवाळी अंकांत घालण्याचें ठरविलें व तत्पूर्वींच्या अंकांत त्याची भरघोस जाहिरात केली. हा अनुभव नवीन असल्यानें त्याचा विशेष आनंद झाला.

दुसरी गोष्ट म्हणजे पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर तें सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. द. र. कवठेकर यांच्या वाचनांत आलें. त्यांतील सर्वच पत्रें, विशेषत: 'चि. सौ. यमूस' हें पत्र त्यांना इतकें आवडलें कीं, त्यांना आपला आनंद मला उलट टपालीं कळविल्यावांचून राहवेना. इतक्या वरच्या तोलाच्या कथा-कादंबरीकाराला व मार्मिक रसिकाला आपलें पुस्तक अत्यंत आवडल्याचें ऐकून कोणा लेखकाला आनंदाचें भरतें येणार नाहीं ?

श्री. कवठेकरांप्रमाणेंच बहुतेक सर्व मराठी वर्तमानपत्रें व मासिकें यांतूनहि फार चांगले अभिप्राय आले. प्रसिद्ध टीकाकार श्री. तटणीस यांच्या 'विविधवृत्त' साप्ताहिकानें 'पत्रां'च्या भाषेसंबंधीं विशेष समाधानाचे उद्गार काढलेले आठवतात.

वामनराव जोशांच्या पिढींत व पठडींत शोभण्यासारखें असलें लिखाण आतां दिवसेंदिवस दुर्मिळच होत जाणार अशा आशयाचे त्यांचे उद्गार होते. या पत्रांच्या भाषेबद्दल महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध साहित्यसमीक्षक प्रो. रा. कृ. लागू लिहितात "पटवर्धनांची भाषा साधी, पण तिच्यांत बेंगरूळपणा नाहीं. आणखी तिचे सांगण्यासारखे विशेष म्हणजे विनोद, सुभाषितें व सर्वत्र अनुभवास येणारी आपुलकी." केवढ्या मानाचें व अभिमानाचें हें शिफारसपत्र ! माझ्या भाषेवर व विचारांवर वामनरावांचा वरदहस्त असल्याचें कांहींना वाटावें यापरतां माझा गौरव कोणता ?

या पुस्तकासंबंधीं घडलेल्या एका अप्रिय गोष्टीचाहि उल्लेख करावयास पाहिजे. त्यांतील पहिलेंच पत्र—माझ्या पितृतुल्य बंधूंना लिहिलेलें—अत्यंत अनुचितपणें लिहिलें गेलें. वाङ्मयांतील औचित्यवादाचा मी मोठा भोक्ता असूनहि तसलें दुष्ट पत्र लिहिण्याची दुर्बुद्धि मला व्हावी याचें मला आतां वाईट वाटतें. पुस्तकांतील इतर पत्रांतून सांगितलेलीं सत्यें शुद्ध निर्भेळ सत्यें नसून त्यांत वास्तवाचें व काल्पनिकाचें मनोज्ञ मिश्रण आहे, आणि म्हणून तर तीं इतकीं आल्हाददायी झालीं आहेत. उलट सदरहू पत्रांतील सर्वच

गोष्टी घडलेल्या रंगविल्या असल्यानें सामान्य वाचकांना त्यांपासून आनंद मिळाला तरी ज्या व्यक्तीला तें उद्देशून लिहिलें आहे तिला व तिच्या आप्तांना अत्यंत वाईट वाटणें स्वाभाविक आहे.

ज्याच्यावर आपण प्राणापलीकडे प्रेम केलें त्याच आपल्या धाकट्या भावानें शहाणपणाचा आव आणून आपल्याला शिकविण्यास उद्युक्त व्हावें याचें माझ्या बंधूंना मरणप्राय दुःख झालें. या पत्राकडे ते चारचौघांप्रमाणें केवळ कलेच्या दृष्टीनें पाहतील असें जें मला वाटलें तें चूक होतें. केवळ सत्यदर्शन हें खऱ्या कलेचें ध्येय नसून सत्याभास हें आहे, हें मला त्यावेळीं उमगलें असतें, तर ही कटु घटना घडली नसती.

वामनरावांनीं मला या संभाव्य दुष्परिणामाची थोडीशी कल्पना अगाऊ दिली होती. पण मी त्या वेळीं लेखणीच्या उन्मादांत असल्यानें त्यांनीं दिलेल्या इशाऱ्याची फारशी फिकीर केली नाहीं.

दुसऱ्याहि एका तरुण सुहृदाचा मीं असाच अवमान केला आहे. तोच मनाचा मोठा म्हणून त्यानें मला अद्यापि त्याची जाणीव दिलेली नाहीं. तथापि त्याचीहि मी क्षमा मागून स्वतःच्या टोंचणाऱ्या मनाचें समाधान करतों.

यापुढचें माझें पुस्तक म्हणजे वामन मल्हार जोशी यांचें चरित्र हें होय. तें मीं १९४४ सालीं कै० वामनरावांच्या प्रथम पुण्यतिथीचे प्रसंगीं प्रसिद्ध केलें. १९४३ च्या जानेवारींत त्यांचा षष्ट्यब्धि समारंभ अखिल महाराष्ट्रांत मोठ्या उत्साहानें साजरा झाला होता. सर्वत्र त्यांना दीर्घायुरारोग्य चिंतण्यांत आलें होतें; पण मानवी इच्छा—आशीर्वादांना डावलून काळानें अवघ्या सहा महिन्यांतच त्यांचेवर झडप घातली व महाराष्ट्रांतील एका नामवंत लेखकाला, विद्वान् प्राध्यापकाला व 'सत्यं शिवं सुंदरम्'च्या एका निष्ठावंत उपासकाला या लोकांतून हिरावून नेलें !

२१ जुलै, १९४३ या दिवशीं मुंबईस सोनापुरांत झालेल्या त्यांच्या अंत्यविधीचे वेळीं त्यांच्या शवाला एक पुष्पहार अर्पण करून मीं मनाशीं असा निश्चय केला कीं कांहीं होवो व कसेंहि होवो, मी पुढील वर्षश्राद्धाचे दिवशीं त्यांचें चरित्र लिहून प्रसिद्ध करीनच करीन. अर्थात् या कार्यांत थोड्या थोडक्या नव्हे—बऱ्याच अडचणी होत्या. वामनरावांच्या हिंगणें येथील जीवनाचें जवळून निरीक्षण करण्याचें भाग्य मला लाधलें होतें; पण

चरित्र लिहावयाचें म्हणजे तेवढ्यानें भागणारें नव्हतें. त्यांच्या नातेवाइकांकडून मागला कौटुंबिक इतिहास मिळवावयास हवा होता, त्यांच्या बालपणाच्या मित्रांकडून त्यांच्या शिक्षणासंबंधीं माहिती जमवावयास हवी होती, त्यांनीं केलेल्या नोकरीची नोंद व सोसलेल्या हालअपेष्टांची कहाणी माहीत असावयास पाहिजे होती, त्यांच्या अध्यापनपद्धतेच्चे व प्रेमळ मार्गदर्शनाचें साक्षात् ज्ञान त्यांच्या विद्यार्थिनींकडून करून घ्यावयास हवें होतें व विशेष म्हणजे त्यांच्या वाङ्मयाचा सखोल अभ्यास करावयाला पाहिजे होता. आणि हें सर्व अवघ्या पांच-सहा महिन्यांत उरकून त्यांच्या श्राद्धदिनापर्यंत पुस्तक छापून प्रसिद्ध करावयाचें होतें.

खरें पाहतां हें सर्व काम अत्यंत कुशलतेचें, कठिण व माझ्यासारख्यांच्या मगदुराबाहेरचें होतें. तें लिहिण्यास मी उगीचच हात घालून मी माझ्या अधिकाराचा अतिक्रम केला असें अजूनहि वाटतें.

पण काहीं कांहीं प्रसंगीं असा अतिक्रमच उपकारक ठरतो. लायक लेखक मिळेतों वाट पाहिली असती, किंवा स्वतःच लिहावयाचें तें संपूर्णतया सुंदर लिहूं—विलंब लागला तरी हरकत नाहीं—अशा विचारानें लिहिण्याचें पुढें ढकललें असतें तर कदाचित् हें चरित्र कधीं लिहूनच झालें नसतें, असेंहि वाटतें. मोठमोठ्यांचीं चरित्रें अशाच विचारानें कायमचीं मागें पडलीं नाहींत काय? वामनरावांच्या बोलण्यांत Better is the worst enemy of good ' अशी एक मार्मिक म्हण नेहमीं येई; तीहि या संबंधांत खरी ठरून सुंदर कृतीच्या नादीं लागल्यामुळें आतांच्या ओबडधोबड कृतीलाहि मुकावें लागलें असतें. असो. मनाचा हिय्या करून मीं वामनरावांचें चरित्र लिहावयास घेतलें आणि त्या मानानें तें बरेंचसें चांगलेंहि उतरलें.

या पुस्तकासंबंधीं एकच गोष्ट मनासारखी घडली नाहीं. चरित्र लिहिण्याचें ठरविलें तेव्हां ' वामनराव ' या व्यक्तीसंबंधीं मीं लिहावयाचें (आतां लिहिलें आहे तसें) व त्यांच्या वाङ्मयासंबंधीं भाऊसाहेब खांडेकरांनीं विस्तृतपणें लिहावयाचें (आतांसारखें त्रोटक नव्हे), आणि पुस्तक दोघांच्या नांवांनीं प्रसिद्ध करावयाचें असें ठरलें होतें. योजल्याप्रमाणें माझा सर्व भाग लिहून झाला, व कोल्हापुरास जाऊन तो मीं खांडेकरांना वाचून दाखविला.

अनुक्रम .. दि: 
क्रमांक ........................ नों० दि० ..........

पण भाऊसाहेबांना आयत्यावेळीं त्यांच्या प्रकृतीनें दगा दिल्यामुळें त्यांच्या हातून वाङ्मयविषयक भाग पुरतेपणीं मुदतींत लिहून झाला नाहीं. या पुस्तकातली कोणती एखादी उणीव मला विशेष जाणवली असेल तर ती हीच होय. प्रा. वा. ल. कुलकर्णी यांनीं पुढें स्वतंत्रपणें केलें तसें सुंदर व सर्वंकष रसग्रहण खांडेकरांना याच वेळीं करतां आलें असतें व तें याच पुस्तकांत समाविष्ट करतां आलें असतें तर या पुस्तकाचें मोल व महत्त्व कितीतरी पटीनें वाढलें असतें. असो. प्रकृतीपुढें कोणाचाच इलाज चालत नाहीं.

माझें हें पुस्तक मला स्वतःला जसें तितकेंसें आवडलें नाहीं तसें तें इतरांनाहि आवडलेलें दिसलें नाहीं. यापूर्वीच्या माझ्या सर्व पुस्तकांना व्यक्ति व वर्तमानपत्रें यांचे फार चांगले अभिप्राय पडले होते. या पुस्तकाचा परामर्ष मात्र फारसा कोणीं घेतला नाहीं. नाहीं म्हणावयास डे. व्ह. ट्रान्स्लेशन सोसायटीनें मात्र त्याची भलावण करून थोडें-फार बक्षीसहि दिलें होतें.

पुस्तक वामनरावांच्या श्राद्धदिनींच प्रसिद्ध करून तें त्यांचे थोरले बंधू—नारायण मल्हार जोशी—यांना अर्पण करावयाचें असें मी ठरविलें. मुंबईच्या साहित्यसंघानें चिकित्सक समूह विद्यालयाच्या वागळे हॉलमध्यें वामनरावांच्या वर्षदिनानिमित्त मोठा समारंभ करण्याचें ठरवून मला व खांडेकरांना प्रमुख वक्ते म्हणून पाचारण केलें.

मी तत्पूर्वीं कांहीं दिवस किर्लोस्कर मासिकांत ' ती. तात्यांची अकस्मात भेट ' असा एक लेख लिहून त्यांत तात्यांचें शब्दचित्र रेखाटलें होतें. तें शब्दचित्र सर्वांना इतकें आवडलें कीं, कित्येकांनीं तरी पत्रांनीं माझें अभिनंदन केलें होतें. एका रणजी ट्रॉफी क्रिकेट मॅचचे प्रसंगीं प्रा. ना. सी. फडके पूना जिमखान्यावर भेटले. त्यांनीं तर त्या लेखाचें अतीच कौतुक केलें. प्रा. फडके सहसा कोणाचें फारसें कौतुक करीत नसावेत. अशी माझी समजूत झाली होती. पण त्यांनींहि जेव्हां तें अभावितपणें केलें, तेव्हां मला खरोखरच आभाळ ठेंगणें वाटलें.

मी वामनरावांचा चरित्रकार, त्यांचा शब्दचित्रकार, त्यांचा सहकारी मित्र, त्यांच्या सान्निध्यांत वावरणारा; तेव्हां साहित्यसंघानें मुख्य वक्ता म्हणून माझी योजना करावी हें उचितच होतें. मीहि जरा हुरळून तें

( अ. क्र. १०९९८ )

निमंत्रण स्वीकारलें. समारंभ, भाषणें, वगैरे जें-जें व्हावयाचें तें सर्व ठीक झालें. पण मीं गहिंवरलों म्हणा, भांब्रावलों म्हणा, घाबरलों म्हणा—कांहीं तरी होऊन माझें भाषण मात्र सपशेल पडलें !

१९४४ ते १९५८ या चौदा वर्षांत मी म्हणण्यासारखें कांहीं लिहिलें नाहीं. नाहीं म्हणावयास कांहीं शब्दचित्रें व लघुनिबंध 'मनोहर' मासिकांत प्रसिद्ध झालीं.

१९५८ मध्यें गुरु० अण्णांच्या शताब्दिमहोत्सवानिमित्त १९२८ ते १९५८ पर्यंतचा त्यांच्या कामगिरीचा वृत्तान्त देऊन तो त्यांच्या 'आत्मवृत्ता'ची पुरवणी म्हणून प्रसिद्ध करण्याचें हिंगण्याच्या चालक–मंडळींनीं ठरविलें व तें काम माझ्यावर सोपविलें. त्या वेळीं माझी प्रकृति इतकी बिघडली होती कीं, मी प्रथम नकारच दिला होता. पण पुढें माझें मलाच वाटूं लागलें, हें काय देवानें व दैवानें माझेपुढें वाढून आणलें आहे आणि तें केलें असतां—कोणास ठाऊक—माझी प्रकृति सुधारूंहि लागेल. अशा भावनेनें थोड्या–फार कर्तव्यबुद्धीनें व कांहींशा जिद्दीनेंहि मीं तें काम अंगावर घेतलें. अर्थात् प्रकृतीमुळें काम मनासारखें झालें नाहीं. पण वेळेवर लिहून झालें व चालक मंडळींनीं टाकलेली जबाबदारी पार पाडली हें काय कमी झालें ?

वामनरावांच्या चरित्राबाबत जें झालें त्याचीच पुनरावृत्ति एका अर्थानें ह्या वेळीं झाली हें कबूल केलें पाहिजे. चरित्र—लेखनाचा आजपर्यंतचा अनुभव फारसा अनुकूल नसतांनाहि मी आतां माझें स्वतःचें चरित्रच लिहिण्यास उद्युक्त झालों आहे. चरित्र-लेखनाला लागणाऱ्या इतर सामग्रीची उणीव या वेळीं भासत नसली तरी उत्तम चरित्राला लागणारा धीरोदात्त नायकच या चरित्राला लाभला नाहीं असें माझ्या एका मार्मिक मित्रानें म्हटलें तें खरें आहे. असो. 'मणिकांचनयोग' केव्हांहि काय दुर्मिळच असायचा.

असा आहे माझ्या लेखनाचा अंतर्गत इतिहास.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्वकमत.

अनुक्रम ...................... वि: ....................

ओ. क्र. ..........